।। पणमामि वड्ढमाणं ।।

भगवत्कुंदकुंद आचार्यदेवविरचित प्रवचनसार या
ग्रंथाचे सरस विवेचन

प्रवचनसार :
जीवनस्वातंत्र्याची कला
(भाग ३ व ४)

(द्वितीय अध्याय पूर्वार्ध व उत्तरार्ध)

*** लेखिका ***

श्रुतप्रवर्तिका आर्यिकारत्न १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी

* Website *

https : // www.bhadrabharati.com

* Youtube Channel *

https://www.youtube.com/@bhadra-bharati

*** प्रकाशक ***

अनेकांत शोधपीठ,

श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली

प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग ३ व ४)
(द्वितीय अध्याय : पूर्वार्ध व उत्तरार्ध)

शुभाशीर्वाद व प्रेरणा –
प. पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज

प्रथम आवृत्ती – २००० प्रती

वर्ष – २०२४

मूल्य – नित्य स्वाध्याय

मुद्रक –
ममता ऑफसेट,
अहमदनगर, मो.नं. ९८२३०२४७७३

प्राप्तिस्थान –
भरतेश ग्रंथ भांडार, बाहुबली
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर-४१६ ११०
संपर्क - ९०४९४ ७३४३४

प.पू.आर्यिकारत्न १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी : अल्प परिचय

बाहुबली या पवित्र तीर्थक्षेत्रावरील बा. ब्र. (डॉ.) सुजाताताई रोटे ह्या संपूर्ण भारतभर व विदेशात ही **'ताई' या नावाने प्रसिद्ध होत्या. पण अनेक त्यागीगण त्यांना सभेत 'आई' म्हणून गौरवाने उल्लेख करीत होते.** त्या आता 'आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी' बनल्या आहेत. पंढरपूर-कूर्डूवाडी या महामार्गावरील 'नंदनवन' या आढवी गावाशेजारी असणाऱ्या डॉ. शीतल शहा यांच्या क्षेत्रावर दि. २८ जुलै २०२१ रोजी हा दीक्षाविधी संपन्न झाला. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांनी मुनिश्री सुहितसागरजी महाराज व आर्यिका अजितमती माताजी आणि अन्य व्रती, प्रतिमाधारी, श्रावक-श्राविका यांच्या उपस्थितीत ही दीक्षा प्रदान केली. नामकरणप्रसंगी आचार्यश्री सुयशसागरजी महाराज म्हणाले, 'जेव्हा आम्ही बाहुबली क्षेत्रावर आलो तेव्हा आम्ही असे पाहिले की **गुरुकुलातील प्रत्येक मुलांच्या पाठीवरील टी-शर्टवर ''शुद्धोऽहं'' असे लिहिले होते, आता ही आहे. म्हणून आम्ही या नवदीक्षित माताजींचे नाव ''आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी'' असे करीत आहोत.**'

त्या अनुषंगाने ताईंच्या आजवरच्या कार्याचा व योगदानाचा आढावा ...

*** बालपण व शिक्षण-**

कोल्हापुरातील प्रसिद्ध रोटे घराण्यात ताईंचा जन्म झाला. स्व. सुकुमार आण्णाप्पा रोटे आणि स्व. सुलोचना सुकुमार रोटे या माता-पित्यांनी दि. ०७ फेब्रुवारी १९६६ रोजी ताईंना जन्म दिला. जन्मासोबत धार्मिक संस्कार ही दिले, म्हणून त्या बालपणापासून ब्रह्मचर्य व्रताचे पालन करू शकल्या.

ताईंच्या मते, पूर्वभवाच्या विशेष संस्कारामुळे वयाच्या सोळाव्या वर्षी नंगमती माताजींच्या सान्निध्यात येऊन अल्पावधीचे ब्रह्मचर्यव्रत स्वीकारून त्यांच्या संघात राहू लागल्या. कदाचित वयाच्या अठराव्या वर्षी दीक्षा सुद्धा घेतली असती, पण ती अज्ञानतापूर्वक दीक्षा घडली असती जर त्यांच्या मातेने आग्रहपूर्वक बाहुबली येथील गुरुदेवश्री समंतभद्र महाराजांच्याकडे पाठविले नसते तर.....! त्यांच्या आईने कडक शब्दात ठणकावून सांगितले, 'तू बाहुबलीला समंतभद्र महाराजांना भेटून ये. ते जे सांगतील, ते मी ऐकायला तयार आहे. चल. पहिला महाराजांना भेटून येऊ.'

नियतीचा नियोगच असा विचित्र घडला की दि. १२ जुलै १९८२ रोजी सायंकाळी ६.३० वा. बाहुबली येथे त्यांचे आगमन झाले आणि बरोबर ३९ वर्षानंतर दि. १२ जुलै २०२१ रोजी सकाळी ६.४५ वा. त्यांनी बाहुबलीतून दीक्षेसाठी प्रस्थान केले.

ताईंचे शिक्षण दहावीपर्यंतचे झालेले होते, पण पुढील शिक्षण व्हावे. त्यातही ते लौकिकापेक्षा धार्मिक ज्ञान वाढावे याकरिता भूनच्या प्रेरणेने त्यांनी अलवर येथून पुढील शिक्षण घेतले. बारावी समकक्ष वरिष्ठ उपाध्याय अजमेर बोर्डातून रजतपदक घेऊन उत्तीर्ण झाल्या. बी. ए. समकक्ष शास्त्री आणि एम. ए. समकक्ष जैनदर्शनाचार्य ह्या पदवी व पदव्युत्तर पदव्या राजस्थान विश्वविद्यालय, जयपूर या युनिव्हर्सिटीतून मिळविल्या. त्यातही त्यांनी सुवर्णपदक मिळविले. ११वी ते शास्त्री पर्यंतच्या अध्ययनाकरिता त्यांना पं. श्री. जीवेंद्र जडे गुरुजींची ज्येष्ठ बंधूसमान अनमोल साथ लाभली.

त्यानंतर लालबहादुर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली येथून २००५ साली 'आचार्यकुन्दकुन्दग्रन्थोपरि जयसेनाचार्यप्रणीतवृत्ति-ग्रन्थानां समीक्षात्मकम् अध्ययनम्' या विषयावर प्रो. डॉ. वीरसागर जैन यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यावारिधि (Ph.D.) ही उपाधी मिळविली. संपूर्ण ३५० पानांचा शोधप्रबंध अस्खलित व प्रौढ, पण अत्यंत सरळ संस्कृत भाषेत लिहिला आहे.

❊ असीम उपकारबुद्धी–

दीक्षेपूर्वी ताई सांगत होत्या,' समंतभद्र महाराजांचे त्यावेळी वय ९२ वर्षाचे होते आणि मी १७ वर्षाची. तथापि महाराजांनी सहा-सहा तास वेळ काढून आम्हाला समजावून सांगितले. धर्ममार्गावर स्थिर केले. वास्तविक मार्ग दाखवला. पहिला धर्मज्ञान मिळवा, स्वाध्याय करा, मग संयम पाळणे सहजतेने घडते, कष्ट वाटणार नाही. प्रतिदिवस सायंकाळी एक-दोन सुभाषित लिहून देत असत. त्याचा अर्थ सांगत असत आणि ते डायरीमध्ये लिहून घेण्यास सांगून पाठ करून घेत असत. सुभाषिते पाठ केलेली ते स्वतः ऐकत असत. त्यासाठी वेळ देत असत. शब्दात वर्णन करू शकणार नाही इतके त्यांचे अनंत उपकार केवळ या जन्मातच नव्हे तर जन्मोजन्मी लक्षात राहतील यात शंका नाही.'

गुरुकुलमाता गजाबेन यांनी तर मानसकन्या म्हणून त्यांना स्वीकारले होते. भून आवर्जून सर्वांना सांगत ही माझी धर्मपुत्री आहे. खूप सेवा करते. खूप चांगलं शिकते व शिकविते. मला तिचा सार्थ अभिमान आहे. यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना सरस्वती जिच्या जिव्हेवर निवास करते, आनंदाने बागडते अशा ताईंना शब्द सुचत नव्हते. खरंच मौनात आणि अश्रूंच्या हुंदक्यातून जी अमर्याद कृतज्ञता व्यक्त होते ती

अन्य कशातूनही नाही.

आम्ही पाहिले आहे, जन्म देणाऱ्या माता-पित्यांच्या वियोगाने ज्या डोळ्यात अश्रू नव्हते, उलट एक धीरगंभीरता होती, पण ज्यांनी त्यांच्या ज्ञान-वैराग्याला सशक्त बनविले अशा बाहुबली क्षेत्राविषयी किंवा महाराज, भूनविषयी कृतज्ञता, उपकाराची जाणीव व्यक्त करताना फुटलेला अश्रूंचा बांध कशानेही रोखला जात नव्हता. असे एकदा नव्हे कित्येकदा घडलेले पाहिले आहे.

ताईंनी आपल्या मनोगतात बाहुबलीतील वास्तव्याच्या काळात आपल्या जडणघडणीत ज्या अनेक गुरुजनांचा सहयोग लाभला, त्यांचे कृतज्ञतापूर्वक संस्मरण केले. प्रामुख्याने ब्र. माणिकचंद भीसीकर, ब्र. माणिकचंद चवरे(तात्याजी), ब्र. माणिकचंद मोहोळकर गुरुजी, पं. श्री. जीवेंद्र जडे, ब्र. अजितकुमार करके गुरुजी, ब्र. भूपाल गुरुजी, पं. धन्यकुमारजी भोरे, पं. विजयाताई भीसीकर कारंजा अशा अनेक व्रती लोकांकडून स्वाध्यायाच्या निमित्ताने धर्मलाभ मिळाला, व्रतामध्ये स्थिरता लाभली. ब्र. जितेंद्र चंकेश्वरा, अकलूज यांच्याकडून धर्म जीवनात उतरविण्याची अद्‌भुत कला सापडली. बाहुबलीच्या विद्यमान ट्रस्टी लोकांनी दीक्षेसाठी सहर्ष अनुमती दर्शविली या सर्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सर्वांशी क्षमायाचना केली. बाहुबलीतील कार्यकर्ता, महिलावर्ग, गुरुकुल परिवार यांच्याशी क्षमाभाव ठेवला. दीक्षेवेळी माता-पिता बनून पुढील चर्येस ज्यांनी अनुकूलता दाखविली असे डॉ. शीतल शहा व सौ. सुषमा शहा, पंढरपूर यांच्याप्रति विशेष अनुग्रह दाखविला.

*** अध्यापन कार्य व धर्मातील स्थितीकरण –**

१. जून १९९० ते डिसेंबर १९९० – आर्यिका भरतमती माताजी, आर्यिका अजितमती माताजी, आर्यिका सुमतिमती माताजी व बाहुबलीमती माताजी (नंतरच्या प्रज्ञमती माताजी) यांना कर्मकाण्ड व जीवकाण्ड संस्कृत टीकासहित, अर्थसंदृष्टिसहित पहिल्यांदा शिकविले.

२. वात्सल्यवारिधि आचार्यश्री वर्धमानसागरजी महाराज यांच्या चातुर्मासप्रसंगी १९९५ साली संघासोबत श्री. जीवेंद्र जडे गुरुजींनी कर्मकाण्डची वाचना केली. ताईंनी प्रवचनसार पहिला अध्याय वाचला. तसेच संघातील चार माताजी व ब्र. भावनाबेन यांचे लब्धिसार व क्षपणासार घेतले.

३. १९९६ ते २००२ पर्यंत ब्र. मंजुषाताई दोशी, अकलुज यांना जीवकाण्ड, कर्मकाण्ड, लब्धिसार, क्षपणासार, प्रवचनसार, समयसार इत्यादी ग्रंथ शिकविले.

४. २००३ ते २००६ पर्यंत ब्र. सरिता दीदी (विद्यमान आर्यिका गरिमामती माताजी) व ब्र. मधु दीदी (विद्यमान आर्यिका गंभीरमती माताजी) यांना जीवकाण्ड,

कर्मकाण्ड, लब्धिसार, क्षपणासार, संस्कृत भांडारकर दोन पुस्तके, न्यायदीपिका, परीक्षामुखसूत्र, पंचास्तिकायसंग्रह, प्रवचनसार, समयसार, नियमसार इ. ग्रंथ शिकविले.

५. २००४ पासून ब्र. विद्याताई ह्या ब्र. सरिता व मधु दीदी यांच्या सोबत शिकत होत्या.

६. २००७ ते २०११ पर्यंत ब्र.प्रीतेश कोठारी, ब्र. श्रुतिका कोठारी पंढरपूर, ब्र. ज्योती व ब्र. वीतराग दोशी अकलूज, ब्र. विद्याताई या सर्वांना संस्कृत भांडारकर पुस्तक १ व २, जीवकाण्ड, कर्मकाण्ड,न्यायदीपिका, परीक्षामुख, प्रमेयकमलमार्तण्ड भा. १, प्रवचनसार, नियमसार, सर्वार्थसिद्धी, धवल पुस्तक १ ते ९ इत्यादी ग्रंथ शिकविले.

७. २००६ चातुर्मासप्रसंगी आर्यिका अजितमती व आर्यिका सुमतिमती माताजी यांच्यासोबत प्रवचनसार, लब्धिसार, क्षपणासार व परीक्षामुख या ग्रंथांची वाचना केली.

८. २००९ साली चातुर्मास प्रसंगी आर्यिका प्रशांतमती माताजी व आर्यिका प्रवेशमती माताजी यांच्यासोबत प्रवचनसार, लब्धिसार, क्षपणासार, परीक्षामुखसूत्र तसेच संघस्थ ब्र. सचिन भैया ब्र. भारती दीदी हे यासोबत संस्कृत इत्यादी विषय ताईंकडून शिकत होते.

९. २०१२ ते २०१६ पर्यंत ब्र. मृदुला दीदी खंडवा यांनी वरील व वेळोवेळीच्या चातुर्मासातील अनेक ग्रंथ शिकल्या.

१०. २०१२ साली चातुर्मासात आर्यिका लक्ष्मीभूषणमती माताजी व रिंपी दीदी यांच्या सोबत प्रवचनसार, जीवकाण्ड यांची वाचना केली.

११. २०१३ जुलै–ऑगस्टमध्ये बीना येथील ब्र. नमिता दीदी व ब्र. गीता दीदी लब्धिसार शिकत होत्या.

१२. नोव्हेंबर–डिसेंबर २०१४ मध्ये मुनिश्री विद्यासागरजी, ऐलक सिद्धांतसागरजी, संघस्थ अन्य पाच महाराज व तीन माताजी यांच्यासोबत जीवकाण्डची विस्तृत चर्चा केली. सोबत ब्र. मृदुला दीदी, ब्र. नमिता दीदी, ब्र. आभा दीदी दिल्ली यांनीही लाभ घेतला.

१३. १५ फेब्रुवारी २०१५ ते ३ एप्रिल २०१५ पर्यंत मुनिश्री विद्यासागरजी, शांतिसागरजी महाराज, ऐलक सिद्धांतसागरजी महाराज यांच्या सोबत जीवकाण्ड भाग २, कर्मकांड भाग १ यांची वाचना केली. सोबत ब्र. आभा दीदी, ब्र. नमिता दीदी, ब्र. मृदुला दीदी शिकत होत्या.

येथून विहार करतेवेळी मुनिश्री विद्यासागरजी महाराज यांनी ताईंना 'धर्ममाता' म्हणून स्वीकारत असल्याचे धर्मसभेत जाहीर केले होते.

१४. जून २०१६ ते जुलै २०१६ या काळात मुनिश्री विद्यासागरजी महाराज, ऐलक सिद्धांतसागरजी, आर्यिका ज्ञानमती माताजी यांचेशी कर्मकाण्ड भाग २ वर तत्त्वचर्चा केली. ब्र. आभा दीदी, ब्र. नमिता दीदी, ब्र. मृदुला दीदी यांनीही लाभ घेतला.

१५. २०१६ चातुर्मास प्रसंगी मुनिश्री विद्यासागरजी, मुनिश्री धर्मसागरजी, आर्यिका ज्ञानमती यांच्यासाठी लब्धिसार हा ग्रंथ घेतला. त्याचवेळी सप्टेंबर, ऑक्टोबर व ९ नोव्हेंबर २०१६ पर्यंत क्षपणासार, जीवकाण्ड भाग २ यावर चर्चा केली. यावेळी ब्र. आभा दीदी, ब्र. मृदुला दीदी, ब्र. नमिता दीदी, ब्र. गीता दीदी ह्या पण शिकत होत्या.

१६. १६ नोव्हेंबर २०१५ ते ८ एप्रिल २०१६ पर्यंत आचार्यश्री सन्मतिसागरांचे शिष्य आचार्यश्री वर्धमानसागरजी, मुनिश्री धर्मसागरजी व मुनिश्री वृषभसागरजी महाराजांचे वास्तव्य होते. दुधगाव येथील चातुर्मासप्रसंगी आचार्यश्री वर्धमानसागरजी महाराजांचे स्वास्थ्य बिघडले होते. त्यामुळे काही लोकांना असे वाटले की आचार्यश्री सल्लेखनेसाठी बाहुबलीत आले आहेत, पण ताईंनी त्यांची अशी सेवा-सुश्रुषा केली की त्यांचे स्वास्थ्य सुधारले आणि आज अखेर त्यांनी दोनवेळा सम्मेद शिखरजीची यात्रा केली आहे. असा क्षेत्राचा सातिशय महिमा अनेकांनी अनुभवला आहे.

१७. दि. ८ एप्रिल १९१६ पासून आचार्य सुनीलसागरजी महाराज यांच्या शिष्या आर्यिका श्रुतमती माताजी खास करणानुयोगाच्या जिज्ञासेपोटी प्रतापगड (राजस्थान) येथून बाहुबलीला १२०० किलोमीटर चालून आल्या. कर्मकाण्ड, लब्धिसार, क्षपणासार यावर विशेष चर्चा घडली. संघस्थ ब्र. प्रियंका दीदी यांनी ही लाभ घेतला. यावेळी आर्यिका ज्ञानमती माताजी यांची ही उजळणी झाली.

१८. दि. ३० डिसेंबर २०१८ रोजी १००० कि.मी.चा पायी प्रवास केवळ ४५ दिवसात पूर्ण करून बाहुबली येथे आचार्यश्री सुयशसागरजी व मुनिश्री सुहितसागरजी महाराज यांचे आगमन झाले. त्यांनी येथे दोन चातुर्मास केले. ते म्हणतात,'आम्ही संपूर्ण भारतभर विचारणा केली तेव्हा आचार्यश्री विशुद्धसागरजी महाराजांनी सांगितले की आपण इकडे-तिकडे न जाता, केवळ आणि केवळ बाहुबली येथेच तुम्हाला चांगले व व्यवस्थित करणानुयोग व अध्यात्म याविषयी तत्त्वचर्चा ऐकायला मिळेल.'

आचार्यश्री सुयशसागरजी म्हणतात, **'ताई या आई आहेत आणि आता त्या संपूर्ण जगाच्या माता आहेत.'** त्यांच्या सान्निध्यात येथे अभूतपूर्व असे कल्पद्रुम विधान संपन्न झाले. विद्यार्थ्यांसाठी नूतन भोजनालयाचा पायाभरणी समारंभ झाला.

१९. फेब्रुवारी २०२१ पासून वात्सल्यवारिधी आचार्यश्री वर्धमानसागरजी महाराज यांच्या संघातील मुनिश्री अपूर्वसागरजी,मुनिश्री अर्पितसागरजी, मुनिश्री क्षेमसागरजी,

मुनिश्री देवधरसागरजी, आर्यिका चेतनामती, आर्यिका विमुक्तमती माताजी तत्त्वचर्चेसाठी आले होते.

१९९० साली तत्कालीन संचालक माणिकचंदजी भीसीकर गुरुजींनी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये बालकांसाठी धर्मसंस्कार शिक्षण शिबिराची सुरुवात केली. ती परंपरा आज अखेर आहे. केवळ लोकडाऊनमुळे मागील दोन वर्षी शिबीर होऊ शकले नाही. ही शिबिराची धुरा ताईंनी २०१९ पर्यंत अत्यंत समर्थपणे वाहून नेली. २००१ पासून त्यांनी यास अनोखी जोड दिली, प्रत्येक शिबिरात दहा दिवस चालू शकेल अशी वेगवेगळी विधाने सुद्धा घेतली.

त्याहून विशेष व संस्मरणीय बाब म्हणजे जुलै २००७ पासून सप्टेंबर २०१९ अखेर करणानुयोगाची ३५ हून अधिक शिबिरे घेतली. यामध्ये जीवकाण्ड, कर्मकाण्ड, लब्धिसार, क्षपणासार, धवला पुस्तक १ ते १६, कषायपाहुड पुस्तक १ ते ३ अशा क्लिष्ट विषयांना सोप्या भाषेत शिकविले. यासाठी सोलापूर, पंढरपूर, अकलूज, नातेपुते, फलटण, कोल्हापूर, सांगली या सोबत दिल्ली, इंदौर, बीना अशा अनेक भागातून अनेक व्रती, प्रतिमाधारी, श्रावक-श्राविका शिकण्यासाठी येत होते. सुमारे ७० लोक असत, पण ते सर्व अभ्यासू व जिज्ञासू होते. अशा शिबिरांची मालिका संपूर्ण भारतात पुन्हा होणे कठीणच होय.

*** लेखन कार्य –**

१. सन २००५ पासून सन्मती मासिकाच्या संपादक मंडळात कार्यरत होत्या. तेव्हापासून आज अखेर निरंतर लेखमाला सुरू आहे.

२. लब्धिसार व क्षपणासार या आवश्यक ग्रंथांचे संस्कृत टीकेसह विविध तक्ते, माहिती मराठी व हिंदी भाषेत संपादित, अनुवादित करून प्रकाशन केले आहे.

३. गोम्मटसार कर्मकाण्ड मूळ गाथा अन्वयार्थ व विशेषार्थसहित भाग १ व २ रूपाने हिंदी भाषेत प्रकाशित झाला आहे.

४. गोम्मटसार जीवकाण्ड भाग १ संस्कृत टीकेसह हिंदी भाषेमधून प्रकाशित झाला आहे. द्वितीय भाग प्रकाशनाधीन आहे.

५. त्यांनी लिहिलेले 'गुरुकुलमाता गजाबेन : जीवनदर्शन' हे पुस्तक मराठी व हिंदीतून प्रकाशित आहे.

६. प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भा. १ व भा. २) प्रकाशित असून भाग ३ व ४ प्रकाशनाधीन आहे.

७. याशिवाय विविध शिबिर, संगोष्ठींमध्ये अनेक व्याख्यान व लेखन केले आहे.

*** सौजन्यशील अंत:करणवृत्ती –**

बाहुबलीतील भून बंगला म्हणजे अनेक निराधार स्त्रियांचे माहेरघर होते.

भूनप्रमाणे त्यांनी सुद्धा अनेक धर्मशील महिलांना आधार दिला. ब्र. लोचना, पद्मा, आशा उखळकर कारंजा अशा अनेक मुलींना शिकण्यासाठी ठेवून घेतल्या होत्या. त्यांच्या मनावर धर्माचे संस्कार केले. अनेक वृद्ध स्त्रिया त्यांच्याजवळ चौका करण्यासाठी व धर्म शिकण्यासाठी राहत असत. त्यांनी अनेक लोकांची सल्लेखना सुद्धा साधली आहे. ही न संपणारी एक मालिका आहे

ताईंनी भूनकडून वारसाहक्काने मिळालेल्या संपत्तीतील एक रुपया देखील स्वतःसाठी खर्च केला नाही. सुमारे साडेसहा लाख रुपये बाहुबली संस्थेस, एक लाख रुपये कारंजा गुरुकुलास, एक लाख रुपये कारंजा येथील श्राविकाश्रमास आणि समंतभद्र महाराजांची व भूनची ज्यांनी सेवा केली अशा गरजवंतास अल्पशी दानराशी देऊन सहकार्य केले. तसेच केवळ आपल्यानिमित्ताने एकत्रित झालेली भांडी-कुंडी गरजवंत धर्मशील लोकांना, विविध संस्थांना दिली. पण भूनची सर्व भांडीकुंडी त्यागीचौक्यासाठी ठेवली आहेत.

चंदुकाका सराफ अँड सन्स यांच्याकडून मिळालेल्या 'जिनदत्त स्मृती पुरस्कारा'तील रु. ७५ हजार अनेकांत शोधपीठ, बाहुबली या संस्थेस दिली. अनेकांत शोधपीठाची पुनर्बांधणी, तीन मजली त्यागी भवनासाठी सुमारे सव्वा कोटी, विद्यार्थ्यांच्या नूतन भोजनालयासाठी सुमारे दीड कोटी अशा अनेक वास्तुनिर्मितीसाठी विपुलप्रमाणात दानराशी गोळा करून दिली. तसेच गुरुकुलमाता गजाबेन स्मृती फंडासाठी सुमारे पन्नास लाखापर्यंतचा निधी जमविला.

*** ताईंविषयी मान्यवरांचे अभिप्राय –**

१. पंचम पट्टाधीश वात्सल्यवारिधी आचार्यश्री वर्धमानसागरजी महाराज यांच्या दर्शनासाठी संस्थेचे ट्रस्टी व कार्यकर्त्यासोबत गेलो असता तेथे आचार्यश्री म्हणाले, ''आम्हाला अनेक लोक प्रश्न विचारतात की ४० वर्षे निरंतर संघात राहणाऱ्या मुनिश्री अपूर्वसागरजी, मुनिश्री अर्पितसागरजी यांना आपण पहिल्यांदाच संघातून बाहेर एवढ्या लांब का पाठवत आहात ? त्यांना आम्ही असे उत्तर देतो की ज्याप्रमाणे आपण आपल्या मुलाला उच्च शिक्षणासाठी पाठवता त्याप्रमाणे **बाहुबली हे धर्मज्ञानाच्या उच्च शिक्षणाचे केंद्र आहे.** तेथे ते गेले आहेत.''

२. आचार्यश्री विशुद्धसागरजी, आचार्यश्री चंद्रप्रभसागरजी महाराज म्हणतात,''**ताई एक कोहिनूर हिरा आहेत. बाहुबलीचे शिखर व वैभव आहेत.**''

३. श्रवणबेळगोळचे जगद्गुरु स्वस्तिश्री चारूकीर्ती भट्टारकजी बाहुबली येथे नांदणी मठाच्या भट्टारकांच्या पट्टाभिषेकाच्या निमित्ताने आले होते. त्यावेळी ते म्हणाले, '**ज्याप्रमाणे उच्च शिक्षणासाठी मुलांना परदेशात पाठवितात. ऑक्सफर्ड किंवा केम्ब्रिज युनिव्हर्सिटीत पाठवितात त्याप्रमाणे बाहुबली सुद्धा करणानुयोगाची**

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी आहे. याचे कुलगरु सुजाताताई आहेत. त्यांच्यामुळे हे एक आध्यात्मिक साधना केंद्र बनले आहे. बाहुबली एक आध्यात्मिक प्रयोगशाळा आहे.'

४. स्वाध्यायप्रेमी डॉ. अशोक व्होरा, नातेपुते हे म्हणतात, **'ताई बाहुबलीसाठी कल्पवृक्ष, चिंतामणी रत्न आहेत.'**

५. पं. श्री. विमलचंद छाबडा, इन्दौर म्हणतात,**'ताई आमच्यासाठी लोहचुंबक आहेत. धर्मज्ञानाच्या निमित्ताने त्या आम्हाला बाहुबलीकडे आकर्षित करीत होत्या.'**

अशा अनगिणत लोकांच्या सुंदर प्रतिक्रिया आल्या आहेत. त्या सर्वच आम्ही येथे व्यक्त करू शकत नाही. त्याबद्दल क्षमस्व !

सारांश, शंभर वर्षाच्या जैन विद्वत्परंपरेचा इतिहास पाहिला तर आपणास असे दिसते की ऑफिशियल शास्त्री बनून दीक्षा घेणारी सुजाताताई ही एकमेव विदुषी दिसते. **आर्यिका दीक्षा घेणे हा शोकाचा नव्हे, हर्ष– आनंदाचा प्रसंग आहे. ज्ञान आणि वैराग्य यांचा सुंदर मिलाप त्यांच्या जीवनात दिसतो. स्वतः निरतिचार शीलाचे पालन करून त्यांनी इतरांनाही त्याप्रकारे सत्प्रेरणा दिली आहे. शुद्ध उच्चारण हा त्यांच्या उच्च विचारांचा मापदंड आहे. पाचवीतील मुलांनाही ते समंतभद्र महाराजांप्रमाणे आदराने, अहो–जावोच्या रूपात बोलवितात.**

आचरण हे विचारांचे प्रतिबिंब असते. आचरण निर्मळ, स्वच्छ असेल तर अनुमान करू शकतो की त्यांचे विचारही निर्मळ, स्वच्छ व उदात्त असणार. ताईंनी 'आगमचक्खू साहू' या उक्तीप्रमाणे आगमानुसार, विश्वव्यवस्थेनुसार समीचीन दृष्टी आत्मसात केली आहे. क्षमाभाव व सहनशीलता हा त्यांचा स्थायीभाव बनला आहे. जिनधर्माची प्रभावना व आत्मानुभूती हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. ना कोणाशी द्वेष, ना कोणाशी राग. कोणाशी वैरत्व नाही की कोणत्या विषयी आसक्ती नाही अशी समदृष्टी मिळविण्यासाठी त्यांनी अनंत पुरुषार्थ केला आहे. त्यांच्याजवळ ज्ञानाचा गर्व नाही की प्रतिष्ठेची हाव दिसत नाही. युक्ती व आगमामध्ये कुशल अशा व्यक्तिमत्त्वाचे ते धनी आहेत. ध्यानाची कला आत्मसात केल्याने त्या सत्यान्वेषी बनल्या आहेत.

एकंदरीत बा. ब्र. (डॉ.) सुश्री. सुजाताताई आता आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी बनल्या आहेत आणि त्या मोक्षमार्गस्थ झाल्या आहेत. आता त्यांना दोन–चार भवात मोक्षलक्ष्मी प्राप्त होवो, हीच सद्भावना....!

डॉ. नेमिनाथ शास्त्री,
सन्मति–संपादक, बाहुबली

* पुण्यार्जक परिवार *

श्री मनीषा राजेंद्र गांधी

सौ. व श्री. नम्रता इंद्रजित गांधी

सौ. व श्री. सोनल विराग गांधी

चि. आर्ष, आभा

चि. श्रेयस राजेंद्र गांधी

सौ. विनयश्री सुदर्शन दावडा

सौ. वर्षा संदेशकुमार दोशी

नेमचंद मियाचंद गांधी परिवार





केले जन्माचे सार्थक संयम सहित यम सल्लेखना साधून

जन्म मरणाच्या चक्रात सापडलेल्या जीवाचे कल्याण संयम सहित सल्लेखना मरण साधण्यानेच होणार आहे.

प.पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराजांनी श्री १०८ सुधेन्दुसागरांचे साधले

यांचे पूर्वाश्रमीचे नाव चि. राजेंद्र भारत गांधी. यांचा जन्म मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी विक्रम संवत २०२६ शुक्रवार दि. १२/१२/१९६९ रोजी झाला. तो गर्भामध्ये असताना मी स्वप्नात सरोवरात फुललेले कमळ पाहिले होते. तेव्हा प.पू. आर्यिका श्री १०५ सुपार्श्वमती माताजींनी सांगितले होते, पुत्ररत्न होणार आहे व त्याचे नाव अर्ककीर्ति ठेवा आणि हा सूर्याप्रमाणे तेजस्वी झाला. बालपणापासूनच स्वभाव हट्टी. ५ वी पासून पुण्याला ११ वी पर्यंत शिक्षण घेतले व पुढचे प्रोडक्शन इंजिनिअरचे शिक्षण सातारा येथे घेतले. स्वतःची फॅक्टरी काढण्याची महत्वाकांक्षा होती. परंतु पिताजींच्या आज्ञेप्रमाणे शेती व आडतीचा व्यवसाय, कापड दुकान व्यवसाय सुरू केला. सौ. मनीषा सारखी सुशील व विनयशील पत्नी लाभली. तिच्यापासून चि. विराग आणि चि. श्रेयस या दोन पुत्ररत्नांची प्राप्ती झाली.

त्यांनी आपले जीवन राजाप्रमाणे व्यतीत केले. इंद्राप्रमाणे नटून थटून अभिषेक पूजा करण्याची आवड होती. आमच्या घरी श्री सिद्धचक्र विधान, तीनही अष्टान्हिक पर्व करण्याची प्रथा पूर्वीपासूनच चालू आहे. मोठा महामंत्र, पूर्ण सहस्त्रनाम, तत्त्वार्थसूत्र, पंचपूजा, पूर्णार्घ्य नंतर प.पू. १०८ आचार्य श्री शांतिसागर पूजा व आज्ञा मागून श्री नंदीश्वर अष्टक देऊन श्री सिद्धचक्र विधान ८, १६, ३२ अशी करतो. शेवटच्या दिवशी विधान पूर्ण झाल्यावर २४ तीर्थंकर सम्मुच्चय पूजा, सरस्वती पूजा, गुरूपूजा करून पूर्णता होते. पूजा पूर्ण होईपर्यंत तो आपली जागा सोडत नसे. सिद्धचक्र विधान पूजा चालू असताना घरामध्ये आहारदानाचे कार्य होत असे.

त्यांनी पिताजींच्या इच्छेप्रमाणे गावातील व्रतिकांना घेऊन सर्व कुटुंबियांसमवेत श्री तीर्थराज सम्मेद शिखरजी यात्रा केली. माताजींच्या इच्छेप्रमाणे जेथे आचार्य सुनीलसागरजी व आचार्य सुंदरसागरजी महाराज असत तेथे चौका घेऊन जात असत. पिताजींच्या सल्लेखनेनंतर त्यांच्या मनात प्रतिमा घेण्याचे भाव जागृत झाले होते. आजी, आजोबा, माता, पिता व्रतिक असल्याने राजूला दीक्षेचे भाव होत होते. त्याची तयारी म्हणूनच त्यांनी आमच्याकडून दूसरी प्रतिमा धारण केली. मी, अनुश्रुतमती माताजी व अनुभूतमती माताजी तिघींचा संघ होता. राजू आवश्यकतेनुसार आमची वैय्यावृत्य करून पुण्यलाभ करून घेत असे.

अचानक असाताचा उदय झाला. राजूला हृदयविकाराने घेरले. दोन वेळा ॲन्जिओप्लास्टी झाली. परंतु त्यानंतर डॉ. धनेशने ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. तेव्हा त्याने परिवारातील आम्हा सर्वांना सांगितले की, यापुढे मला दवाखान्यात नेऊ नका. जेथे आचार्यश्री, संघ असतील तेथेच न्या. त्याप्रमाणेच सर्व साधले.

प.पू. आचार्य १०८ श्री सुंदरसागरजींचे परमशिष्य वास्तल्यसिंधु प.पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराजजींचा संघसहित २०२३ चा चातुर्मास नातेपुते येथे झाला. मी व अनुश्रुतमती माताजी पण त्यांच्यासोबतच नातेपुते येथे चातुर्मास केला. राजू आचार्यश्रींच्या जवळ राहूनच साधना करू लागला. साधनारत असतानाच अचानक पर्युषण पर्वात राजूला परत हृदयविकाराने त्रस्त केले. त्या आजारातसुद्धा तो आपल्या व्रतापासून विचलित झाला नाही. उलट आचार्यश्रींच्या चरणी समर्पण केले व म्हणाला, "आचार्यश्री, मी तुम्हाला शरण आलो आहे. मला जैनेश्वरी दीक्षा देऊन माझे कल्याण करा. मला आता कोणताही उपचार करायचा नाही."

आचार्यश्रींच्या आज्ञेवरून काही दिवस त्यांनी आयुर्वेदिक उपचार करून घेतले. 'भरतजी घरमें वैरागी' या उक्तीनुसार राजू घरात असूनही वैराग्याचे जीवन जगत होता. त्याच्या भावनेनुसार आचार्यश्रींनी त्याची दीक्षा २२ जुलै २०२४ ला करण्याचे निश्चित केले. २० एप्रिल २०२४ ला नातेपुते येथे गांधी मळ्यात

गोदभराई झाली. ०७ जुलै २०२४ ला राजू गृहत्याग करून फलटण येथे आचार्यश्रींच्या चरणी उपस्थित झाला. त्याची शारीरिक परिस्थिती पाहून आचार्यश्री म्हणाले, "काळाचा काही भरवसा नाही. २२ जुलैची वाट कशाला पहायची ?" म्हणून ०८ जुलै २०२४ लाच त्याला जैनेश्वरी दीक्षा प्रदान केली. त्याचे नाव 'सुधेन्दुसागर' असे ठेवण्यात आले.

मनुष्य किती वर्षे जगला ? यापेक्षा त्याने आपल्या जीवनात आत्म आराधना कशी केली ? यावर त्यांची महानता दिसून येते. ता. ११-०७-२०२४ ला दुपारी १२ वा. ४६ मि. यमसल्लेखनापूर्वक समाधी झाली.

त्यांची वैराग्यवृत्ति, निस्पृहता, दृढता, संयमात स्थिरता, सहनशीलता, धैर्य, व्रती, साधर्मी बंधूंच्या प्रति वत्सलता, त्यागी जनांच्या प्रति आदरभाव, विनय इ. अनेक त्यांचे गुण ग्रहण करण्यायोग्य आहेत.

प.पू. आचार्य १०८ श्री सुंदरसागरजी महाराजांना श्री सिद्धभक्ति, श्री श्रुतभक्ति, श्री आचार्यभक्ति पूर्वक त्रिवार नमोस्तु ! नमोस्तु !! नमोस्तु !!!. प.पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराजांना त्रिभक्तिपूर्वक त्रिवार नमोस्तु ! संघस्थ सर्व त्यागींना यथायोग्य नमोस्तु !

- आर्यिका अनुप्रेक्षामती माताजी

* अनुक्रमणिका *

गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक
गाथा –९२–१	१८
गाथा – ९३	१९
गाथा – ९४	२८
गाथा – ९५	३५
गाथा – ९६	४३
गाथा – ९७	५१
गाथा – ९८	५५
गाथा – ९९	६१
गाथा – १००	६८
गाथा – १०१	७४
गाथा – १०२	७९
गाथा – १०३	८२
गाथा – १०४	८५
गाथा – १०५	८८
गाथा – १०६	९२
गाथा – १०७	९८
गाथा – १०८	१००
गाथा – १०९	१०४
गाथा – ११०	१०७
गाथा – १११	१११
गाथा – ११२	११८
गाथा – ११३	१२२
गाथा – ११४	१२४
गाथा– ११५	१३०
गाथा– ११६	१३८

गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक
गाथा – ११७	१४६
गाथा – ११८	१५३
गाथा – ११९	१५९
गाथा – १२०	१६४
गाथा – १२१	१६९
गाथा – १२२	१७४
गाथा– १२३	१७८
गाथा– १२४	१७९
गाथा – १२५	१८३
गाथा – १२६	१८६
गाथा – १२७	२०१
गाथा – १२८	२०४
गाथा – १२९	२०५
गाथा – १३०	२०८
गाथा – १३१	२११
गाथा – १३२	२१३
गाथा – १३३	२१८
गाथा –१३४	२१८
गाथा – १३५	२२४
गाथा – १३६	२२७
गाथा – १३७	२३०
गाथा – १३८	२३२
गाथा – १३९	२३४
गाथा– १४०	२३६
गाथा– १४१	२३९

गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक	गाथा क्रमांक	पृष्ठ क्रमांक
गाथा – १४२	२४२	गाथा –१७२	३१३
गाथा – १४३	२४४	गाथा – १७३	३४८
गाथा – १४४	२४६	गाथा – १७४	३४९
गाथा – १४५	२५१	गाथा – १७५	३५४
गाथा – १४६	२५३	गाथा– १७६	३५७
गाथा – १४७	२५४	गाथा– १७७	३५९
गाथा – १४८	२५५	गाथा – १७८	३६२
गाथा – १४९	२५७	गाथा – १७९	३६५
गाथा – १५०	२६०	गाथा – १८०	३६८
गाथा – १५१	२६२	गाथा – १८१	३७०
गाथा – १५२	२६५	गाथा – १८२	३७५
गाथा – १५३	२६७	गाथा – १८३	३७८
गाथा – १५४	२७०	गाथा – १८४	३८१
गाथा – १५५	२७३	गाथा – १८५	३८४
गाथा – १५६	२७५	गाथा – १८६	३८८
गाथा – १५७	२७८	गाथा – १८७	३९१
गाथा – १५८	२८०	गाथा – १८८	३९४
गाथा – १५९	२८५	गाथा – १८९	३९७
गाथा – १६०	२८७	गाथा – १९०	४००
गाथा –१६१	२९२	गाथा – १९१	४०५
गाथा – १६२	२९४	गाथा – १९२	४०८
गाथा –१६३	२९९	गाथा – १९३	४१५
गाथा – १६४	३००	गाथा – १९४	४२२
गाथा – १६५	३०२	गाथा – १९५	४२५
गाथा – १६६	३०३	गाथा – १९६	४२९
गाथा – १६७	३०५	गाथा – १९७	४३६
गाथा –१६८	३०६	गाथा – १९८	४३९
गाथा – १६९	३०८	गाथा – १९९	४४४
गाथा –१७०	३१०	गाथा – २००	४४८
गाथा –१७१	३११		

ॐ

प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग ३)

द्वितीय महाधिकार (पूर्वार्ध)

ज्ञेयतत्त्व–प्रज्ञापन

अपरनाम

सम्यग्दर्शनाधिकार

जीवाच्या अशांतीचे कारण साधन व विषयासंबंधीचे अज्ञान आहे. ज्याच्याद्वारे जाणतो त्या ज्ञानाचे यथार्थ स्वरूप या जीवाला भासित होत नाही व ज्याला जाणतो त्या विषयाचे अर्थात ज्ञेयाचे यथार्थ स्वरूप हा जीव जाणत नाही, म्हणून दुःखाला प्राप्त होतो. कशाने व कोणाला जाणले असता जीवनात शान्ती मिळेल हेच या अज्ञानी जीवाला समजत नाही. इन्द्रियाने ज्ञान होते असे समजून इन्द्रियांचे अवलंबन सोडू इच्छित नाही. इन्द्रियाने जाणूनच शान्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो व इन्द्रियाचेच पोषण करतो. परन्तु इन्द्रियज्ञान दुःखाचे कारण आहे. जितका इन्द्रियज्ञानाचा प्रयोग करतो तेवढा अधिकाधिक दुःखी होत जातो. म्हणून प्रथम अध्यायामध्ये इन्द्रियज्ञान व अतीन्द्रिय ज्ञानाचे विस्ताराने वर्णन केले आहे. इन्द्रिय ज्ञान दुःखाला कारण आहे व अतीन्द्रिय ज्ञान सुखाला कारण आहे हे अनेक पद्धतीने तेथे सिद्ध करून दाखविले आहे. त्यामुळे साधनासंबंधीचे अज्ञान दूर झाले आहे. आचार्यांनी तर स्वतः निर्णय करून त्याची सिद्धी केली आहे; परंतु आम्ही जोपर्यंत आमच्या बुद्धीमध्ये त्या ज्ञानाचा यथार्थ निश्चय करणार नाही तोपर्यंत ज्ञानासंबंधीचे अज्ञान दूर होणार नाही व निराकुल शान्ती मिळणार नाही. म्हणून शान्तीसाठी आपल्या ज्ञानामध्ये ज्ञानाचा यथार्थ निर्णय करणे आवश्यक आहे.

कोणाला व कसे जाणले असता शान्ती मिळणार हे या जीवाला कळत नाही. हा जीव पराला जाणतो व जसे आहे तसे न जाणता विपरीत जाणतो. त्यामुळे दुःखी होतो म्हणून या जीवाचे दुःख दूर करण्यासाठी या दुसऱ्या

अध्यायामध्ये आचार्य ज्ञेय तत्त्वाचे विस्ताराने वर्णन करतात. म्हणून **या अध्यायाला अमृतचन्द्र आचार्यांनी 'ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन' असे नाव दिले आहे.** प्रथम अध्यायामध्येही ज्ञानतत्त्वाचे वर्णन करताना त्या अनुषंगाने संक्षेपात वस्तूस्वरूपाचे द्रव्यगुणपर्याय व उत्पादव्ययध्रौव्यरूपाने वर्णन आले आहेच. तथापि स्पष्टरूपाने प्रतीती होण्यासाठी दुसऱ्या अध्यायात विस्ताराने वर्णन करतात.

जैनदर्शन वस्तूस्वरूपाच्या ठोस भूमीवर उभारलेले आहे म्हणून जैनदर्शनाचा प्रासाद अनादिकाळापासून आजपर्यंत तग धरून उभा आहे. तो ढासळला नाही व पुढेही ढासळणार नाही. अन्यदर्शनाला वस्तूस्वरूपाचा आधार नाही त्यामुळे ते अंतराळात उत्पन्न होतात व अंतराळातच ढासळतात. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, दया, क्षमा इत्यादीकांचे वर्णन अन्य धर्मामध्ये सुद्धा केले आहे, तर मग अन्य धर्माहून जैनधर्मामध्ये काय वैशिष्ट्य आहे की ज्यामुळे जैनधर्म महत्त्वपूर्ण आहे. ते वैशिष्ट्य म्हणजे वस्तूस्वरूपाचे सांगोपांग विवेचन. वस्तूस्वरूपाचे ज्ञान झाल्याशिवाय आत्मकल्याण अशक्य आहे. **आत्मकल्याणासाठी वस्तूस्वरूपाचा यथार्थ निर्णय नितान्त आवश्यक आहे.** केवळ जिज्ञासापूर्तीसाठी किंवा मनोरंजनासाठी वस्तूस्वरूपाला न जाणता आपल्या जीवनात स्थायी शांती मिळविण्यासाठी वस्तूस्वरूपाला जाणणे आवश्यक आहे. सम्यग्दर्शनाशिवाय खऱ्या आनंदाला प्रारंभ होत नाही व वस्तूचे खरे स्वरूप समजून त्याचा निर्णय केल्याशिवाय सम्यग्दर्शन प्राप्त होत नाही. त्या सम्यग्दर्शनाच्या विषयभूत वस्तूस्वरूपाचे प्रतिपादन या अध्यायामध्ये असल्यामुळे **जयसेनाचार्यांनी या अध्यायाला सम्यग्दर्शनाधिकार असे नाव दिले आहे.**

पूर्वी ९१ नंबरच्या गाथेमध्ये संक्षेपाने सम्यग्दर्शनाचे व्याख्यान केले होते त्याचेच येथे विषयभूत पदार्थांच्या व्याख्यानाद्वारे ११३ गाथांमध्ये विस्ताराने व्याख्यान करतात. जयसेनाचार्यांच्या अपेक्षेने हा अधिकार चार अन्तराधिकारामध्ये विभागला आहे. १) प्रथम ३५ गाथांद्वारे सामान्य ज्ञेय पदार्थांचे व्याख्यान आहे. २) त्यानंतर १९ गाथांपर्यंत विशेष ज्ञेय पदार्थांचे व्याख्यान आहे. ३) त्यानंतर आठ गाथांपर्यंत सामान्य भेदभावना व त्यानंतर ४) ५१ गाथांद्वारे विशेष भेदभावना भावली आहे.

पदार्थांचे स्वरूप जाणण्याचे प्रयोजन भेदविज्ञानाची सिद्धी आहे. आत्मप्रतीती हे सम्यग्दर्शनाचे लक्षण आहे. शुद्ध आत्म्याचे श्रद्धान झाले असता सम्यग्दर्शन प्राप्त होते. शुद्ध आत्म्याचे श्रद्धान होण्यासाठी वस्तूच्या सामान्य स्वरूप व विशेष स्वरूपाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. जोपर्यंत सामान्य स्वरूपाचे ज्ञान होत नाही तोपर्यंत वस्तूची प्रतीती होत नाही. व जोपर्यंत वस्तूचे विशेष स्वरूप जाणत नाही तोपर्यंत परापासून भिन्न आत्मतत्त्वाची प्रतीती होत नाही, वस्तूच्या सामान्य विशेष स्वरूपाचे शब्दात्मक ज्ञान होऊन सुद्धा जर भेदविज्ञान झाले नाही तर ते ज्ञान निरर्थक आहे. ते तोतारटंत ज्ञान आहे. ज्याप्रमाणे पोपटाला जे शिकवू तो ते बोलायला शिकतो. परंतु त्याचा तो भाव समजत नाही. एका ब्राह्मणाकडे एक पोपट होता त्यांनी त्याला एक वाक्य शिकविले होते 'इसमें क्या शक'. एक सेठजी ब्राह्मणाकडे आले होते. त्यांना पोपट विकत घ्यायचा होता. म्हणून त्यांनी त्याची किंमत विचारली. तर ब्राह्मणाने त्याची किंमत १००० रूपये सांगितली. तेव्हा सेठजी म्हणाले, 'ही किंमत जास्त आहे. काही तरी कमी करा'. तेव्हा ब्राह्मण म्हणाला,'नाही हो सेठजी, किंमत योग्य आहे. पाहिजे तर तुम्ही पोपटालाच विचारा'. पोपटाला विचारले, 'तुझी ही किंमत योग्य आहे का ?' तेव्हा पोपट म्हणाला 'इसमें क्या शक ?' सेठजींना वाटले हा पोपट हुशार आहे.म्हणून त्यांनी १००० रूपये देऊन विकत घेतले व घरी घेऊन गेले. सेठजींनी काहीही विचारले तरी तो 'इसमें क्या शक' असेच म्हणायचा. सेठजींना थोडी शंका वाटू लागली म्हणून सेठजी म्हणाले, मी तुला १००० रू. देऊन चूक केली. तेव्हा पोपट म्हणाला 'इसमें क्या शक ?' त्याला त्या वाक्याचे भावभासनच नव्हते. त्या पोपटाप्रमाणे आमचे सुद्धा शास्त्रज्ञान भावभासनरहित असेल तर सम्यग्दर्शनाची उत्पत्ती दुर्लभ आहे.

परापासून भिन्न आत्मतत्त्वाच्या प्रतीतीशिवाय अकरा अंगाचे ज्ञान असून सुद्धा तो मिथ्यादृष्टीच आहे. म्हणून या अधिकारामध्ये प्रथम वस्तूच्या सामान्य व विशेष स्वरूपाचे वर्णन करून नंतर सामान्य व विशेष भेदभावनेचे सुंदर वर्णन केले आहे. जो भावभासनपूर्वक आत्मीयतेने याचे अध्ययन करतो त्याला भेदविज्ञानपूर्वक सम्यग्दर्शनाचा लाभ निश्चित होतो, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे.

पूर्वोक्त सम्यक्त्वसहित साधूंना नमस्कार करून सम्यक्त्वाच्या

विषयभूत पदार्थांना सांगण्याची आचार्य प्रतिज्ञा करतात.

तम्हा तस्स णमाइं किच्चा णिच्चं पि तम्मणो होज्ज ।
वोच्छामि संगहादो परमट्ठविणिच्छयाधिगमं ।।९२–१।।

अन्वयार्थ– (**तम्हा**) म्हणून (**तस्स**) त्या साधूला (**णमाइं किच्चा**) नमस्कार करून **(णिच्चं पि**) सदैव (**तम्मणो होज्ज**) त्यामध्ये मन लावून (**संगहादो**) संक्षेपाने (**परमट्ठविणिच्छयाधिगमं**)परमार्थाचे निश्चय करणाऱ्या सम्यक्त्वाला (**वोच्छामि**) मी सांगतो.

एका अपेक्षेने ही गाथा दुसऱ्या अधिकाराचे मंगलाचरण आहे. अमृतचन्द्र आचार्यांनी लिहलेल्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्ये ही गाथा उपलब्ध नाही. जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये ही गाथा समाविष्ट आहे.

सम्यग्दर्शनाशिवाय साधू होऊ शकत नाही, म्हणून त्या सम्यक्त्वासहित सम्यक्चारित्राने युक्त साधूंना येथे नमस्कार केला आहे. व त्यांच्यामध्येच उपयोग एकाग्र करून सम्यक्त्वाला सांगण्याची येथे प्रतिज्ञा केली आहे. पदार्थांचे यथार्थ ज्ञान व श्रद्धान केल्याने सम्यग्दर्शन होते, म्हणून या अधिकारात सम्यक्त्वाच्या विषयभूत पदार्थांचे कथन केले आहे.

सम्यक्त्वाच्या प्राप्तीचा राजमार्ग परमात्म्याचा अधिगम आहे. गुरु व शास्त्राच्या उपदेशाने पदार्थांचे जेव्हा यथार्थ ग्रहण होते तेव्हा देशनालब्धी होते. या लब्धीनंतर प्राप्त उपदेशाचे चिन्तन मनन करतो तेव्हा कर्मांची स्थिती घटते. त्यावेळी प्रायोग्यलब्धी प्रकट होते अर्थात प्रकटरूपाने सर्व बाजूंनी सम्यक्त्व होण्याची योग्यता येते. पुन्हा तत्त्वचिंतनामध्ये उपयोग एकाग्र करतो तेव्हा करणलब्धी होते. करणलब्धीमध्ये लोकातील सत्स्वरूपी सर्व पदार्थांच्या स्वभावाचा निश्चय करतो तेव्हा सर्व पदार्थ भिन्न भिन्न भासित होऊ लागतात व आपला शुद्धात्मासुद्धा ज्ञानामध्ये स्पष्ट भिन्न भासित होतो व त्यामध्येच अहंभाव उत्पन्न होतो तेव्हा सम्यग्दर्शनलब्धी प्रकट होते.

गाथेमध्ये परमार्थविनिश्चयाधिगम शब्द आला आहे. जयसेनाचार्यांनी त्याचा अर्थ सम्यक्त्व असा केला आहे. त्या शब्दाचा समासविग्रह २ प्रकाराने केला आहे. १) परम अर्थ म्हणजे शुद्ध बुद्ध एक स्वभावी परमात्मा त्याचा विशेषरूपाने अर्थात संशयादी रहितरूपाने जो निश्चय तोच परमार्थ विनिश्चयाधिगम होय. २) परमार्थ विनिश्चय अर्थात अनेकान्तात्मकपदार्थाचा

समूह त्याचा अधिगम ज्याच्यापासून होतो तो परमार्थ–विनिश्चियाधिगम अर्थात सम्यक्त्व होय.

सम्यग्दर्शनज्ञानचारित्र संपन्न साधूंच्याद्वारे प्राप्त धर्मोपदेशाला मनामध्ये धारण करून त्यामध्ये तन्मय होऊन संक्षेपाने जीवादी पदार्थांचे व्याख्यान करण्याची प्रतिज्ञा आचार्यांनी केली आहे. आम्ही पाठकांनी सुद्धा आपला उपयोग सर्व बाजूंनी संकुचित करून या व्याख्यानाच्या विचारामध्ये तन्मय करावा की ज्यामुळे आम्हाला सुद्धा पदार्थाचा यथार्थ बोध होऊन सम्यग्दर्शनाचा लाभ होईल. एकाग्रतेशिवाय ज्ञानाचा विकास होत नाही.

या ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन अधिकारामध्ये सर्वप्रथम यथार्थरूपाने द्रव्यगुणपर्यायाचे स्वरूप सांगतात.

अत्थो खलु दव्वमओ दव्वाणि गुणप्पगाणि भणिदाणि ।
तेहिं पुणो पज्जाया पज्जयमूढा हि परसमया ।।९३।।

अन्वयार्थ– (**खलु**) निश्चयाने (**अत्थो**) पदार्थ (**दव्वमओ**) द्रव्यमय आहे. (**द्रव्वाणि**) द्रव्य (**गुणप्पगाणि**) गुणात्मक (**भणिदाणि**) सांगितली आहेत. (**पुणो तेहिं**) पुनः त्याद्वारे अर्थात् द्रव्य व गुणांद्वारे (**पज्जाया**) पर्याय होतात. (**पज्जयमूढा हि**) पर्यायामध्ये मूढ असणारे जीव (**परसमया**) परसमय अर्थात मिथ्यादृष्टी आहेत.

तात्पर्य – वस्तू द्रव्यगुणपर्यायात्मक असताना जे केवळ पर्यायालाच वस्तूचे स्वरूप मानतात व त्यामध्ये आत्मबुद्धि करतात ते मिथ्यादृष्टी आहेत.

१) जो जाणला जातो तो अर्थ–

अर्यते निश्चीयते यः स अर्थः । जो निश्चित केला जातो तो अर्थ होय. जो ज्ञानामध्ये जाणला जातो अर्थात ज्ञानाचा विषय आहे तो पदार्थ होय. केवळ गुणांना कोणी जाणत नाही किंवा केवळ पर्यायांना कोणी जाणत नाही. जरी यांना जाणले तरी तेथे अर्थ जाणला जातो. पदार्थच गुणरूपाने अथवा पर्यायरूपाने जाणला जातो. ज्ञानी असो अथवा अज्ञानी असो पदार्थाला कोणत्या ना कोणत्या रूपाने जाणतो. ज्याप्रमाणे पुरुष आंब्याला गोडरसरूपाने जाणतो, केवळ गोडरसाला जाणत नाही, आंब्याला पिवळ्या रंगरूपाने जाणतो, केवळ पिवळ्या रंगाला जाणत नाही. आंब्याला कच्च्या किंवा पक्व अवस्थारूपाने जाणतो. केवळ कच्चा किंवा पक्व अवस्थेला नाही. जो जो

आमच्या ज्ञानाचा विषय आहे तो तो पदार्थ आहे.

२) पदार्थ द्रव्यमय–

जाणला जाणारा पदार्थ द्रव्यमय आहे. येथे अर्थ विशेष्य आहे व द्रव्य त्याचे विशेषण आहे. जितके पदार्थ आहेत ते सर्व द्रव्यमय आहेत; कारण ते विस्तार सामान्य समुदायस्वरूप व आयत सामान्य समुदायरूप द्रव्याने बनलेले आहेत. द्रव्य सामान्यस्वरूप आहे. सामान्य दोन प्रकारचे आहे. १) विस्तार सामान्य २)आयत सामान्य. विस्तार सामान्याचे दुसरे नाव तिर्यक् सामान्य आहे. एकावेळी अनेकामध्ये जो अन्वय अर्थात तोच तोच पणा त्यास तिर्यक् सामान्य म्हणतात. एकाच वस्तूमध्ये अनंत गुण एकावेळी आहेत. म्हणून गुणांना द्रव्याचा विस्तार (रूंदी-जाडी) म्हणतात. त्या विस्तारविशेषरूप गुणांमध्ये व्यापून असलेला जो एक अन्वय त्यास विस्तार सामान्य म्हणतात. जसे पुद्गलाचे स्पर्शरसगंधवर्ण गुण हा त्याचा विस्तार आहे व त्यामध्ये अन्वयरूपाने पुद्गलद्रव्यपणा हे विस्तारसामान्य आहे. जीवाचे ज्ञानसुखादी गुण हा त्याचा विस्तार त्यामध्ये एका जीवपणाचा अन्वय हे विस्तार सामान्य आहे. अथवा जीवाचे असख्यात प्रदेश एकावेळी आहेत त्या सर्व प्रदेशांमध्ये जीवपणाचा अन्वय तो तिर्यक् (विस्तार) सामान्य होय. सर्व प्रदेशांमध्ये जीवत्व समान आहे. आयत म्हणजे लांबी. कालक्रमाने होणारे पर्याय ही द्रव्याची लांबी आहे. आयत सामान्याचे दुसरे नाव ऊर्ध्वता सामान्य आहे. कालक्रमाने होणाऱ्या पर्यायांमध्ये जो एक अन्वय अर्थात तोच तोचपणा त्यास ऊर्ध्वता (आयत) सामान्य म्हणतात. जसे स्थास, कोश, कुशुल, पिण्ड व घट इत्यादींमध्ये मातीपणाचा अन्वय ते ऊर्ध्वता सामान्य आहे. दूध, दही, ताक इत्यादीमध्ये गोरसपणाचा अन्वय आहे. देव, मनुष्य, तिर्यंच, नारक इत्यादी पर्यायामध्ये जीवपणाचा अन्वय आहे, ते ऊर्ध्वता (आयत) सामान्य होय.

ज्याप्रमाणे वस्त्रामध्ये एक आडवा धागा असतो व एक उभा धागा असतो त्यालाच ताना व बाना म्हणतात. जो आडवा धागा आहे तो सर्वत्र समान आहे अर्थात स्थिर आहे व जो उभा धागा आहे तो प्रवाहरूप आहे अर्थात वस्त्राचा पन्ना सर्वत्र समान असतो. लांबी जी आहे ती क्रमाने वाढत जाते, १ मीटर, २ मीटर इत्यादी. वस्त्र या दोन धागामय आहे. कारण ते त्या दोन धाग्यांनी बनलेले आहे. वस्त्राचा पन्ना अर्थात आडवा धागा विस्तारसामान्य-समुदाय रूप आहे. व धावणारा उभा धागा आयतसामान्य समुदायस्वरूप आहे.

या दोन्हींने वस्त्र बनलेले आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण पदार्थ अवस्थायी विस्तारसामान्यसमुदायाने व कालक्रमस्वरूप धावणाऱ्या आयत सामान्य समुदायस्वरूप द्रव्याने बनलेले आहे. सामान्य हा तरंगामध्ये धावणाऱ्या एका प्रवाहाप्रमाणे असतो. क्रमवर्ती विशेषातील अन्वय हा कालाच्या अपेक्षेने पर्यायांना व्यापणारा असतो म्हणून त्यास धावणारा म्हटले आहे. सर्व गुण एकावेळी आहेत व सदैव आहेत म्हणून ते स्थायी आहेत. या गुणांमध्ये जो एक अन्वय आहे ते विस्तार सामान्य आहे. पर्याय कालक्रमाने होतात त्यामध्ये जो एक अन्वय आहे तोच आयत सामान्य आहे. गुण व पर्यायांमध्ये एक द्रव्य व्यापून असते. म्हणून द्रव्य विस्तारसामान्य व आयत सामान्यस्वरूप म्हटले आहे.

द्रव्य गुणात्मक आहे–

द्रव्य एकाश्रयरूप विस्तारविशेषात्मक गुणांनी रचले असल्यामुळे गुणात्मक आहे. जे एकाच वस्तूच्या आश्रयाने राहतात ते गुण होत. जसे गोड, पिवळा, सुगंधी, मृदु या सर्व गुणांचा आधार एक आंबा आहे. ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य इ. गुणांचा आधार एक जीवद्रव्य आहे. सहभावी गुण हे द्रव्याचा विस्तारूप आहेत म्हणून गुणांना विस्तारविशेष म्हणतात. प्रत्येक गुणाचे लक्षण वेगळे आहे, प्रत्येक गुण लक्षण अपेक्षेने भिन्न आहे म्हणून त्यांना विशेष म्हटले आहे. जसे ज्ञान, दर्शन, सुख इ. जीवांचे विस्तार विशेष आहेत.

ज्याप्रमाणे वस्त्रामध्ये अवस्थायी विस्तारसामान्य किंवा धावणारा आयत सामान्य गुणांनी रचलेले असून गुणापासून वेगळे आढळून येत नाही म्हणून शुभ्रत्वादी गुणमयच आहे. वस्त्राचे आडवे उभे धागे पांढरेपणा, मऊपणा इत्यादी गुणांनी बनलेले आहेत म्हणून ते गुणमय आहेत. त्याचप्रमाणे पदार्थामध्ये विस्तार व आयत सामान्यस्वरूप द्रव्य गुणांनी बनलेले असल्यामुळे गुणमयच आहे.

वस्तूची लांबी, रूंदी गुणांनी व्याप्त आहे. गुण वस्तूच्या संपूर्ण भागामध्ये व सर्व अवस्थांमध्ये राहतात. गुणांचा समूह म्हणजेच द्रव्य होय. साखरेची गोडी साखरेच्या सर्व भागात व्यापून आहे व त्याच्या सर्व भूत, वर्तमान, भावी अवस्थांमध्ये गोडी व्यापून आहे. म्हणून साखर गोडमय आहे. त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्य गुणांनी परिपूर्ण आहे, म्हणून गुणात्मक आहे. हे जाणल्यामुळे मी पण एक वस्तू आहे, म्हणून मी द्रव्यमय असल्यामुळे गुणमय

आहे. मी अनंत गुणांचा समूहात्मक द्रव्य व त्या अनंत गुणांमध्ये व्यापक एक अन्वयरूप द्रव्य आहे. त्यामुळे माझ्यामध्ये काहीच कमी नाही. हे समजल्यामुळे स्वाभाविक आनंद मिळतो.

द्रव्य परिणाम स्वभावी आहे ही गोष्ट अनेकवेळा सिद्ध केली आहे. ज्याप्रमाणे द्रव्य परिणमनशील आहे त्याचप्रमाणे त्यातील प्रत्येक गुण परिणमनशील आहे. द्रव्य व गुणामध्ये सदैव परिणमन होत असते, कारण द्रव्यत्व नावाचा सामान्य गुण सर्व द्रव्यांमध्ये आहे. त्यामुळे कोणतेही द्रव्य व त्याचे गुण कूटस्थ (परिणमन न करता) नित्य राहू शकत नाहीत. त्या परिणमनालाच पर्याय म्हणतात.

पर्याय द्रव्यात्मक व गुणात्मक–

पदार्थाचे अस्तित्व हे मात्र वर्तमान काळालाच स्पर्श करीत नसून भूत व भविष्यकाळासही स्पर्श करते. हीच पदार्थाची एक प्रकारे लांबी म्हणता येईल यालाच आयत म्हणतात. कालअपेक्षेने असणाऱ्या द्रव्याच्या या प्रवाहक्रमातील समयवर्ती सूक्ष्म अस्तित्वाला पर्याय म्हणतात. एका समयात एक पर्याय असतो तेव्हा अन्य पर्याय नसतात. म्हणून पर्यायांना क्रमभावी म्हणतात.

पर्याय द्रव्यांनी व गुणांनी रचित असल्यामुळे द्रव्यात्मक ही आहेत व गुणात्मक ही आहेत. अर्थात पर्यायाचे दोन भेद आहेत. १) द्रव्यपर्याय व २) गुणपर्याय.

१) द्रव्यपर्याय– अनेक द्रव्यामध्ये एकत्वाच्या व्यवहाराला जो कारणभूत आहे तो द्रव्यपर्याय होय. अनेक द्रव्यामध्ये एकतेचे ज्ञान ज्यामुळे होते तो द्रव्यपर्याय आहे. अर्थात अनेक द्रव्यांच्या संयोगाने बनलेला तो द्रव्यपर्याय. जसे जीवाचा मनुष्य, देव इ. पर्याय, पुद्गलाचा द्व्यणुक, त्र्यणुक इत्यादी पर्याय. द्रव्यपर्याय दोन प्रकारचा आहे. १) समानजातीय द्रव्यपर्याय व २) असमानजातीय द्रव्यपर्याय.

समानजातीय द्रव्यपर्याय–

अनेक सुती धाग्यांनी विणलेल्या सुती वस्त्राप्रमाणे पुद्गल-पुद्गलांच्या संश्लेषरूप अवस्थेला समानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात. जसे दोन परमाणूंचा मिळून एक द्व्यणुक स्कंध होतो. तीन परमाणूंचा मिळून एक त्र्यणुक स्कंध होतो तो समान जातीय द्रव्यपर्याय होय. प्रत्येक परमाणू स्वतंत्र द्रव्य आहे. परंतु

स्निग्धत्व, रूक्षत्व गुणामुळे त्यांचा परस्पर बंध होतो. त्यामध्ये एकतेचा व्यवहार होतो. आपला सर्व लौकिक व्यवहार या संयोगरूप बंधावर आधारलेला आहे. घागर, पातेले, डबा इत्यादींना एक वस्तू म्हटले जाते. वास्तविक त्यामध्ये अनंत पुद्गलद्रव्य आहेत. त्या अनंत परमाणूंचा मिळून एक स्कंधपर्याय झाला आहे, ते भिन्न असतानाही विशिष्ट बंधनामुळे त्यामध्ये एकत्वाचा उपचार होतो. अनेक परमाणू एकत्र बंधरूपाने परिणमतात तेव्हा त्यांची एक तिसरी अवस्था होते. ते परमाणू आपले पूर्वीचे स्निग्धरूक्षादी परिणाम सोडून अन्यरूपाने परिणमतात. त्या परमाणूंच्या संख्येप्रमाणे त्यांचे प्रदेश असतात. त्यामध्ये एकत्वरूप एक स्कंधरूप व्यवहार होतो. पुद्गलाप्रमाणे एका जीवाचा अन्य जीवाशी बंध होत नाही म्हणून जीवाचा समानजातीय द्रव्य पर्याय नाही. समानजातीय द्रव्यपर्याय फक्त पुद्गलामध्येच होतो.

असमानजातीय द्रव्यपर्याय –

एक जीव व अनेक पुद्गल मिळून बनलेल्या नाना द्रव्यात्मक पर्यायास असमानजातीय द्रव्यपर्याय म्हटले आहे. जसे मनुष्य, देव, नारक इत्यादी पर्याय.

सहाही द्रव्ये लोकाकाशाच्या प्रत्येक प्रदेशावर एकक्षेत्रावगाहरूपाने राहतात. तेवढ्यावरून त्यांचा परस्पर बंध आहे असे नाही. एकक्षेत्रावगाहरूपाने असणे बंधाचे किंवा द्रव्यपर्यायाचे लक्षण नाही. ज्यामध्ये परस्पर एक क्षेत्रावगाह असून निमित्तनैमित्तिक संबंधवश एकत्वाचा व्यवहार होतो तेथेच बंध संज्ञा आहे असे जाणावे. मनुष्य पर्यायामध्ये एक जीव व अनंतानंत परमाणूंचे मिळून संयुक्त परिणमन झाले आहे. जन्मापासून मरेपर्यंत ते एक बंधनामध्ये बद्ध आहेत. त्यांना वेगवेगळे करता येत नाही व दोन्हींच्या परिणमनाला मिळून एक मनुष्यपर्याय म्हटले आहे. तेथे जीव व पुद्गलांचा निमित्त नैमित्तिक संबंध आहे. जीवाला हात वर उचलण्याची इच्छा उत्पन्न होते त्यावेळी हात वर होतो. बसण्याची इच्छा होते तेव्हा ते शरीर बसते म्हणून त्यांच्यामध्ये एकत्वाचा व्यवहार होतो.

अशाप्रकारचा द्रव्यपर्याय धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्यामध्ये होत नाही. कारण ते सदैव असंयोगी आहेत. धर्म, अधर्म, आकाशद्रव्य एकेकच आहेत. कालद्रव्य असंख्यात असले तरी एका कालाणूचा दुसऱ्या कालाणूशी कधीही बंध होत नाही. ते रत्नराशीप्रमाणे स्वतन्त्रच असतात. म्हणून त्यांच्यामध्ये समानजातीय किंवा असमानजातीय द्रव्यपर्याय होत नाहीत.

गुणपर्याय–

गुणाद्वारे द्रव्यामध्ये अनेकतेच्या प्रतिपत्तीला (ज्ञानाला) कारणभूत पर्याय गुणपर्याय होय. द्रव्यपर्याय हा अनेक द्रव्यांमध्ये एकतेच्या प्रतिपत्तीला कारण आहे व गुणपर्याय एका द्रव्यामध्ये अनेकतेच्या प्रतीपत्तीला कारण आहे. अर्थात या गुणपर्यायामुळे एका वस्तूमध्ये भेद प्रतीत होतो. जसे हिरवा आंबा, पिवळा आंबा इ. आंबा एकच आहे, परंतु तो कधी हिरवा तर कधी पिवळा असा अनेक प्रकारचा दिसतो.

प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत गुण आहेत. प्रत्येक गुणामध्ये अनंत अविभागप्रतिच्छेद (गुणाचा सर्वात लहान शक्त्यंश) आहेत. अगुरुलघुगुणाच्या निमित्ताने त्यामध्ये षट्स्थानपतित हानी वृद्धी होत असते. अर्थात गुणांचे शक्त्यंश कधी वाढतात तर कधी कमी होतात. हा वस्तूचा स्वभावच आहे.

या गुणपर्यायाचे दोन भेद आहेत. १) स्वभाव गुणपर्याय व २) विभाव गुण पर्याय

स्वभावगुणपर्याय –

प्रत्येक द्रव्यामध्ये आपापल्या अगुरुलघुगुणाद्वारे प्रत्येक समयाला प्रगट होणारी षट्स्थानपतितहानिवृद्धिरूप अनेकता हा स्वभावगुणपर्याय आहे. स्वभावगुणपर्याय परनिमित्ताशिवाय होतो व सदैव एकसमान असतो. मात्र अविभागप्रतिच्छेदांची वृद्धिरूपच असतो. सिद्ध जीवांमध्ये ज्ञानगुणाचा केवलज्ञान, दर्शनगुणाचा केवलदर्शन, वीर्यगुणाचा अनंतवीर्य पर्याय हे स्वभावगुणपर्याय आहेत. याचप्रमाणे सिद्धांमध्ये अनंत गुणांचे परिणमन कर्मनोकर्माच्या निमित्ताशिवाय शुद्धरूपानेच होते. त्या अनंत गुणांचे अनंत स्वभावगुणपर्याय सिद्धांमध्ये निरंतर होत आहेत. तसेच पुद्गलद्रव्यामध्ये परमाणूच्या स्पर्शरसगंधवर्णादी गुणांचे परिणमन निरंतर चालू आहे. ते परनिमित्ताविना स्वभाव परिणमन आहे. म्हणून परमाणूच्या स्पर्शरस–गंधवर्णगुणांचे पर्याय स्वभावगुणपर्याय आहेत. त्याचप्रमाणे धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्याच्या गुणांचे ही स्वभावपर्यायच होतात. त्यामध्ये परनिमित्ताने अशुद्ध परिणमन कधी होतच नाही म्हणून शुद्ध द्रव्यांच्या गुणांच्या पर्यायांना स्वभावगुणपर्याय म्हणतात.

विभावगुणपर्याय –

द्रव्याची स्वतःची योग्यता व परनिमित्त असताना गुणांचे विसदृश

परिणमन होते हा विभावगुणपर्याय होय. ज्याप्रमाणे जीवामध्ये ज्ञानावरणकर्माच्या क्षयोपशमाच्या निमित्ताने ज्ञानामध्ये वृद्धी व हानी होते. त्यामुळे मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधि व मनःपर्ययज्ञान हे ज्ञानाचे विभावगुणपर्याय आहेत. पुद्गलांच्या स्कंध अवस्थेमध्ये रसादिगुणांचे विसृदशपरिणमन होते हा विभावगुणपर्याय आहे. जसा आंबा प्रथम आंबट होता नंतर गोड झाला. हा रसगुणाचा विभाव पर्याय आहे. आंबा प्रथम हिरवा होता नंतर पिवळा झाला हा वर्णगुणाचा विभावपर्याय आहे, दुर्गंधचा सुगंधरूप परिणमला, कठोराचा मऊरूपाने परिणमला इत्यादी सर्व विभावगुणपर्याय आहेत. विभावगुणपर्याय जीव व पुद्गलामध्येच होतात. धर्मादिद्रव्यांमध्ये होत नाहीत. विभावपर्याय द्रव्याच्या स्वतःच्या योग्यतेनेच झाला आहे, परंतु तो निमित्ताशिवाय झालेला नाही. म्हणून तो परसापेक्ष आहे. जीव व पुद्गलामध्ये जितके दृश्य परिणमन आहे, ते सर्व विभावरूपच आहे.

अन्यत्र आगमामध्ये पर्यायांचे भेद व लक्षण –

द्रव्याच्या प्रदेशांमध्ये जे आकार परिवर्तन होते त्यास द्रव्यपर्याय व गुणांच्या परिणमनाला गुणपर्याय म्हणतात. प्रत्येकाचे स्वभाव व विभाव असे दोन भेद केले आहेत.

स्वभावद्रव्यपर्याय –

स्वभावपर्याय प्रत्येक द्रव्याचा परनिरपेक्ष, स्वभावाने होतो. धर्म, अधर्म, आकाश, काल, सिद्ध आत्मा व शुद्धपरमाणूचा जो आकार आहे तो स्वभावद्रव्यपर्याय आहे. यांचा आकार प्रतिसमय एकसारखा राहतो, अन्य अन्यरूप होत नाही, हेच सदृश परिणमन स्वभावपर्याय आहे.

संसारी जीवाचा नामकर्माच्या उदयाच्या निमित्ताने मनुष्य, तिर्यंच, नारक व देवपर्यायांमध्ये नाना प्रकाराने शरीराच्या आकाराने आकार बदलतो तो विभावद्रव्यपर्याय आहे.

पुद्गलस्कंधांचा परमाणूंच्या संयोग व वियोगाने आकार बदलणे तो विभावद्रव्यपर्याय आहे. जसे घटाचा आकार, आंब्याचा आकार इ. या द्रव्यपर्यायालाच काही ठिकाणी व्यंजनपर्याय असे ही म्हटले जाते.

द्रव्यपर्यायाचे दोन अर्थ झाले. १) दोन किंवा अनेक द्रव्यांची संयोगरूप अवस्था द्रव्यपर्याय आहे. २) जो द्रव्यांच्या प्रदेशांचा आकार तो द्रव्यपर्याय. प्रथम द्रव्यपर्याय अशुद्धच आहे, कारण तो अनेक द्रव्यांचा संयोगरूप आहे.

दुसरा द्रव्यपर्याय स्वभाव व विभाव या भेदाने दोन प्रकारचा आहे.

पर्यायांचे व्यंजनपर्याय व अर्थपर्याय या रूपाने ही आगमामध्ये दोन भेद केले आहेत. यांची व्याख्या देताना जयसेनाचार्य पंचास्तिकायसंग्रह गाथा १६ मध्ये सांगतात. '**तत्रार्थपर्यायाः सूक्ष्माः क्षणस्थायिनस्तथाऽवाग्गोचरा अविषया भवन्ति । व्यंजनपर्यायाः स्थूलाश्चिरस्थायिनो वाग्गोचरा छद्मस्थदृष्टि-विषयाश्च भवन्ति ।**'

अर्थपर्याय सूक्ष्म, एक समयवर्ती असतात. सूक्ष्म असल्यामुळे ते वाणीचा विषय होत नाहीत. व्यंजनपर्याय स्थूल, दीर्घकाळ टिकणारे असतात. छद्मस्थांच्या दृष्टीचा विषय व वाणीचा विषय बनतात. अर्थात अनेक समयवर्ती स्थूल परिणमनला व्यंजनपर्याय म्हणतात. जसे मनुष्य, देव इत्यादी. बालक तरूण इत्यादी पर्याय. किंवा ज्ञानगुणाची मति, श्रुत इत्यादि अनेक समयवर्ती स्थूल पर्याय. येथे अनेक पर्यायाच्या समूहामध्ये एक पर्यायाचा आरोप केला आहे. प्रत्येक समयामध्ये गुणांचा जो पर्याय होतो त्यास अर्थपर्याय म्हणतात. परंतु प्रत्येक समयवर्ती परिणमन भिन्न-भिन्न आहे ते केवलीगम्य आहे. एक एक समयवर्ती परिणमन सूक्ष्म आहे. एक समयवर्ती परिणमनाला छद्मस्थ जीव जाणू शकत नाही. व्यंजनपर्यायास द्रव्यपर्याय व अर्थपर्यायास गुणपर्याय असेही काही ठिकाणी म्हटले आहे. वेगवेगळ्या अपेक्षेने व वेगवेगळा दृष्टिकोन ठेऊन आचार्यांनी जिनवाणीमध्ये पर्यायाचे विश्लेषण केले आहे. वाचकांनी ती अपेक्षा व तो दृष्टिकोन समजून घेतला तर कोठेही विरोध येत नाही. पर्याय म्हणजे क्रमाने होणारा बदल अर्थात परिणमन होय. ते परिणमन सर्व द्रव्य व सर्व गुणांमध्ये प्रतिसमयाला होत असते म्हणून प्रत्येक वस्तू द्रव्य-गुण-पर्यायात्मक आहे.

पदार्थांची पारमेश्वरी व्यवस्था सुसंगत –

ही सर्व पदार्थांची द्रव्यगुणपर्यायस्वभावाला प्रकाशित करणारी व्यवस्था सर्वज्ञ परमेश्वरांनी सांगितली आहे. त्यामुळे ती सुव्यवस्थित आहे. सर्वोत्तम आहे, निर्दोष आहे. अन्यदर्शनामध्ये प्रतिपादित वस्तुव्यवस्था निर्दोष नाही. कारण ती वस्तूस्वरूपाला धरून नाही. त्याची स्थापना छद्मस्थ रागीद्वेषी जीवांनी केली आहे, त्यामुळे ती सुसंगत व प्रामाणिक नाही. द्रव्य व गुण अनादि अनन्त, व्यापक एक अन्वयरूप असतात. ते व्यक्त दिसत नाहीत. त्यांचा पर्यायच व्यक्त असतो. द्रव्य व गुणासंबंधी अनभिज्ञ असलेले लोक त्या व्यक्त

पर्यायालाच पूर्ण वस्तू मानून त्यामध्ये मोहीत होतात. पर्याय क्षणिक आहे, नाशवंत आहे. हे पर्यायाचे सत्य न स्वीकारल्यामुळे पर्यायाच्या नाशाबरोबर दुःखी होतात. पर्यायालाच वस्तू मानून रागद्वेष करतात. या सर्व पर्यायांपैकी असमानजातीय द्रव्यपर्यायाशी अधिक तन्मय होतात. त्या पर्यायालाच आपले स्वरूप मानून मी मनुष्य, मी स्त्री, मी पुरुष अशाप्रकारे पर्यायमूढ बनून मिथ्यादृष्टी होतात.

द्रव्यगुणपर्यायाकडे पाहण्याची आमची दृष्टी कशी पाहिजे ? पर्याय प्रगट दिसतो, परंतु हा पर्याय आला कोठून ? कोणाचा आहे ? याचा विचार केला तर लक्षात येईल की पर्याय गुणांचा आहे, गुणातून पर्याय प्रगट झाला आहे. ज्याप्रमाणे व्यवहारात आपण विचारतो हा मुलगा कोणाचा आहे ? तर उत्तर येते हा मुलगा अमुक व्यक्तीचा आहे. तेथे मुलगा गौण होतो व त्याचा पालक मुख्य होतो. त्याप्रमाणे पर्याय कुणाचा आहे? तर गुणाचा आहे. येथे पर्याय गौण झाला व गुण मुख्य झाला. पर्याय गौण होऊन गुणाकडे दृष्टी गेली. पुन्हा विचारले गुण कुणाचा आहे? तर गुण अमुक द्रव्याचा आहे. येथे गुण गौण झाला व द्रव्य मुख्य झाले. पर्यायाला गुणामध्ये लीन केले व गुणाला द्रव्यामध्ये लीन केले. एका द्रव्यामध्ये दृष्टी दिली असता अखंड वस्तूचा अनुभव होतो. आम्ही आमच्या मूळ द्रव्यस्वरूपाला विसरून परसंयोग जनित पर्यायाला आपले स्वरूप मानून बसलो आहोत व परसंयोगाला स्वतःचे वैभव मानले आहे. त्यामुळे परसंयोगाच्या अभावामध्ये दीन-हीनतेचा अनुभव करतो किंवा परसंयोगाच्या सद्भावामध्ये उच्चतेचा व श्रीमंतपणाचा अनुभव करतो. पर्यायदृष्टी वा संयोगदृष्टी ही दुःखाची जननी आहे. मी अनंतगुण व पर्यायांचा अखण्ड पिण्ड आहे. चैतन्याचा करण्ड आहे. हे जाणले नाही, त्यामुळे दारो-दार सुखाची भीक मागत फिरतो. प्रत्येक द्रव्य स्वयं स्वतःचा मालक आहे. स्वयं स्वतःच्या परिणमनाचा मालक आहे. कोणी कुणाचा नाथ नाही.

एकदा एक राजा जंगलामध्ये गेला. तेथे एक युवा नग्न मुनी स्वतःची साधना करीत बसले होते. त्यांना पाहून राजाच्या मनात विचार आला की हे खूप दुःखी आहेत, यांच्याजवळ काही नाही. एवढ्या थंडीमध्ये अंगावर एक वस्त्रसुद्धा नाही. तेव्हा राजाने विचारले, 'आपण फार दुःखी दिसता, आपले नाव काय आहे? ' मुनींनी सांगितले 'माझे नाव अनाथ आहे'. राजा म्हणाला, 'आपण दुःखी आहात, माझ्याबरोबर चला म्हणजे तुम्ही सुखी व्हाल, मी

तुमचा नाथ आहे.' मुनींनी त्याला विचारले 'तुमच्या जवळ काय आहे?' राजांनी सांगितले, 'माझ्याजवळ विशाल राज्य आहे, धनदौलत, हीरे, माणके, मोती, नोकर-चाकर, महाल, हत्ती-घोडा, विपुल भोगसामुग्री सर्व काही आहे.' मुनी म्हणाले, ' हे सर्व माझ्याजवळ पण होते'. राजा म्हणाला, ' मग तुम्ही स्वतःला अनाथ का म्हणता ? ' मुनी म्हणाले, 'राजन्, एकदा माझ्या डोक्यात खूप वेदना होत होती, ती माझी वेदना दूर करण्यासाठी सर्व वैद्य बोलाविले, कुटुम्बातील सर्व लोकांनी सेवा सुश्रुषा केली, माता-पिता-पत्नी यांनी मिळून खूप उपचार केले; परंतु मला थोडाही आराम मिळाला नाही. माझी थोडीही वेदना ते दूर करू शकले नाहीत. माझे दुखणे कोणीही वाटून घेऊ शकले नाहीत. तेव्हा मला बोध झाला की कोणी कोणाचे नाही. मी एकटा आहे. आता या एकत्वाचा अनुभव करून निरन्तर सुखाचे वेदन करीत आहे. मी माझाच आहे. माझे सर्वस्व माझ्यामध्ये आहे. मी एक द्रव्यगुणपर्यायांचा अखण्ड पिण्ड स्वरूप आत्मा आहे. हे लक्षात आले'.

मागील गाथेमध्ये द्रव्य-गुण-पर्यायाचे यथार्थ स्वरूप सांगून जो पर्यायामध्ये मूढ आहे तो परसमय आहे असे सांगितले. समय म्हणजे आत्मा. अभिप्रायानुसार त्या समयाचे दोन भेद आहेत. १) स्वसमय व २) परमसमय. आता प्रसंगानुसार त्या दोन्हींचे लक्षण पुढील गाथेत सांगतात -

जे पज्जयेसु णिरदा जीवा परसमयिग त्ति णिद्दिट्ठा।
आदसहावम्हि ठिदा ते सगसमया मुणेदव्वा।।९४।।

अन्वयार्थ -(**जे जीवा**) जे जीव (**पज्जयेसु**) पर्यायांमध्ये (**णिरदा**) लीन आहेत ते (**परसमयिग त्ति**) परसमयिक (मिथ्यादृष्टी) आहेत असे (**णिद्दिट्ठा**) सांगितले गेले आहे व जे जीव (**आदसहावम्हि)** आत्मस्वभावामध्ये (**ठिदा**) स्थित आहेत (**ते**) ते (**सगसमया**) स्वसमय (सम्यग्दृष्टी) **(मुणेदव्वा**) जाणावेत.

तात्पर्य –पर्यायामध्ये लीन जीव परसमय आहेत व आत्मस्वभावामध्ये लीन जीव स्वसमय आहेत.

संपूर्ण अविद्येचे मूल द्रव्यपर्यायामध्ये आत्मबुद्धी -

अज्ञानी जीव ज्या पर्यायामध्ये जाऊन उत्पन्न होतो त्या पर्यायाला आपले स्वरूप मानून बसतो. मागील गाथेत पर्यायाचे अनेक भेद सांगितले

आहेत. त्यापैकी जीव पुद्गलाच्या संयोगाने बनलेला मनुष्य, देव, तिर्यंच, नारक इत्यादी असमानजातीय द्रव्य पर्याय आहेत. यामध्येच अज्ञानी एकत्व बुद्धी करतो. कारण हा असमान जातीय द्रव्यपर्यायच इन्द्रियाने दिसतो. छद्मस्थ संसारी जीवाचे सर्व ज्ञान इन्द्रियाच्या साहाय्याने उत्पन्न होते व जे इन्द्रियाने दिसते तेच सत्य आहे, अशी त्याची मान्यता बनते. इन्द्रियाच्या अतीत अतीन्द्रिय वस्तू सुद्धा आहे याची त्याला प्रतीती होत नाही. या मनुष्यादी असमानजातीय द्रव्यपर्यायालाच तो आपले स्वरूप मानतो. स्त्रीच्या शरीरात उत्पन्न झाला की स्वत:ला स्त्री मानतो. पुरुषाच्या शरीरात उत्पन्न झाला की स्वत:ला पुरुष मानतो. कुत्र्याच्या शरीरात उत्पन्न झाला की स्वत:ला कुत्रा मानतो. नारक शरीरामध्ये गेला की स्वत:ला नारकी मानतो. देव शरीरामध्ये गेला की स्वत:ला नारकी मानतो. या पर्यायाहून भिन्न आपले शाश्वत अस्तित्व आहे याचा त्याला परिचय नाही हेच या जीवाचे अज्ञान आहे.

पर्यायमूढतेमुळे आत्मभ्रांती –

एकदा मनुष्यादी पर्यायाला आपले स्वरूप मानले की याहून भिन्न आत्मस्वभावाची संभावना सुद्धा करण्यास अज्ञानी असमर्थ होतो. कारण जी वस्तू आपली नाही त्या वस्तूला आपली मानल्यानंतर आता स्ववस्तू शोधण्याची गरज भासत नाही. जशी एखाद्याची कोणती तरी वस्तू हरवली असेल तर ती वस्तु तो शोधत राहतो. चुकून स्वत: सारख्या दुसऱ्याच्या वस्तूला स्वत:ची मानून ग्रहण केल्यानंतर त्याचा स्व वस्तूला शोधण्याचा प्रयत्न थांबतो. त्याप्रमाणे अज्ञानी कर्मजनित प्राप्त पर्यायाला स्ववस्तू मानल्यामुळे स्वत:चा शोध घेत नाही. त्या पर्यायामध्येच स्ववस्तू मानून आसक्त होतो. या व्यतिरिक्त स्वसत्ता आहे याची तो कल्पनाच करू शकत नाही.

पर्यायदृष्टी एकान्तदृष्टी–

ज्याप्रमाणे एकदा चुकीच्या दिशेने एक पाऊल उचलले की त्यानंतरची पडलेली सर्व पावले चुकीचीच ठरतात. उतरंडीमधील पहिली घागर उलटी ठेवली की त्यावरच्या सर्व घागरी उलट्याच ठेवाव्या लागतात. गणित सोडवताना पहिली पायरी चुकली तर पुढील सर्व पायऱ्या चुकीच्याच होतात. त्याप्रमाणे एकदा पहिली मान्यता चुकीची झाली की त्या अनुषंगाने झालेल्या पुढील सर्व मान्यता चुकीच्या होतात. पर्यायाला पूर्ण वस्तू स्वीकारल्यानंतर द्रव्याचे अस्तित्व तो जाणत नाही. त्यामुळे त्याची एकान्तदृष्टी प्रगट होते.

वस्तूचे 'द्रव्य व पर्याय' हे दोन पैलू आहेत. अर्थात वस्तू सामान्य विशेषात्मक आहे अशी दृष्टी अनेकान्तात्मक आहे. परंतु अज्ञानी पर्यायाला आपले सर्वस्व मानतो त्यामुळे वस्तूच्या एका बाजूचा अंगीकार करून दुसऱ्या द्रव्यबाजूचा तो लोप करून टाकतो. या पर्यायाहून अतिरिक्त अनादि-अनंत ध्रुव द्रव्य मी आहे याचे भान नसल्यामुळे पर्यायमात्र तत्त्व स्वीकारून पर्यायाचा एकान्त करतो. त्याचे सर्व जीवन पर्यायाला समर्पित होते. पर्यायमात्रामध्ये तो संतुष्ट होतो.

अहंकार व ममकार हेच खरे ठक –

पर्यायमूढ एकान्तदृष्टी मिथ्यामती मी मनुष्य आहे असा अहंकार करतो व हे मनुष्यशरीर माझे आहे असा ममकार करतो. ज्याप्रमाणे ठक एखाद्या छोट्या व्यापाऱ्याच्या बालकाला पळवून आणतो व आपल्याजवळ ठेऊन घेतो. तो बालक अज्ञ असल्यामुळे ठकालाच आपला पिता मानतो. त्याचे वैभव ते आपले वैभव मानतो. त्यामुळे तो आपल्या खऱ्या मातापित्यांना विसरून जातो. आपले घर, आपले वैभव विसरून जातो. हा ठक आपल्याला फसवत आहे हे त्याला लक्षात येत नाही. त्याप्रमाणे अज्ञानी जीव मोहरूपी ठकाकडून फसविला जातो आहे. ज्याप्रमाणे तो बालक ठकाला आपले मानल्यामुळे त्याच्या सर्व संबंधीना आपले मानतो व त्या संबंधीच्या अनुकूल-प्रतिकूल परिणमनामध्ये रागी-द्वेषी होतो. त्याप्रमाणे अहंकार व ममकार ही मोहाचीच दोन रूपे आहेत. या मोहाने याला भुरळ पाडल्यामुळे 'मनुष्य पर्याय मी आहे' असे मानतो व मनुष्यपर्यायाहून भिन्न मी एक जीवद्रव्य आहे, मी चैतन्यतत्त्व आहे हे विसरून जातो. आपल्या अनंतगुणांच्या वैभवाला विसरून जातो. मोह ठक मला फसवत आहे हे त्याला लक्षात येत नाही.

आत्मव्यवहारापासून च्युती व मनुष्यव्यवहारास आलिंगन –

मी मनुष्य आहे असे मानल्यामुळे अविचलित चैतन्य विलासरूप आत्मव्यवहारापासून च्युत होऊन अज्ञानी जीव मनुष्य व्यवहाराचा आश्रय करतो. ज्याप्रमाणे तो बालक स्वत:ला ठकाचा मुलगा समजतो त्यामुळे तो आपला मूळचा व्यापार करणे रूप व्यवहाराला विसरतो व जो ठकाचा चोरी करण्याचा धंदा आहे त्याला आपला व्यापार समजून तो त्याचाच आश्रय करतो. चोरी करण्यामध्ये व्यापृत होतो. ठकाचा सर्व व्यवहार आपला व्यवहार जाणून त्यामध्ये निष्णात होतो. त्याप्रमाणे अज्ञानी मोह ठकाच्या अधीन झाल्यामुळे चैतन्याचा व्यापार हा माझा खरा व्यवहार आहे हे विसरून जातो व

मनुष्य व्यवहारालाच आपला व्यवहार समजून त्यामध्ये लीन होतो. खाणे, पिणे, झोपणे, धंदा, व्यापार करणे. विवाहादि कार्य करणे, मुलाबाळांचा सांभाळ करणे, सामाजिक व्यवहार सांभाळणे इत्यादी मानवोचित क्रियांना करण्यामध्ये आपली इतिश्री मानतो.

मनुष्य व्यवहाराची स्वीकृती रागद्वेषाची जननी –

मनुष्यपर्याय मी असे मानल्यामुळे मनुष्यपर्यायामध्ये जो संयोग आहे त्याला आपले मानतो. अज्ञानी मनुष्य पर्यायाच्या उत्पत्तीला निमित्त असणारे स्त्री–पुरूष त्यांना आपले मातापिता मानतो. मनुष्य पर्यायाला निमित्त करून उत्पन्न झालेल्या अपत्यांना आपले पुत्र पुत्री मानतो. मनुष्य शरीराला रमविणाऱ्या स्त्रीला आपली पत्नी मानतो. या सर्व संयोगामध्ये ममत्वबुद्धी करतो. ज्यावेळी या सर्व संबंधीचे परिणमन स्वत:च्या इच्छानुकूल होईल तेव्हा राग (प्रेम) उत्पन्न होतो. जेव्हा त्यांचे परिणमन स्वत:च्या इच्छेविरूद्ध घडते तेव्हा द्वेष उत्पन्न होतो. मनुष्य शरीरामध्ये जी इन्द्रिये आहेत त्यांना आपली इन्द्रिये मानतो. त्या इन्द्रियांचे इष्ट विषय प्राप्त झाले की राग करतो व अनिष्ट विषय प्राप्त झाले की द्वेष करतो. इष्टाचा संयोग झाला की हर्ष मानतो. इष्टाचा वियोग झाला की शोक करतो. अनिष्ट संयोग झाला की दु:खी होतो. अनिष्टाचा वियोग झाला की सुखी होतो. अशाप्रकारे मनुष्य पर्यायाला कवटाळल्यामुळे रागद्वेषाचा निरंतर व्यापार चालू राहतो.

कर्मबंधनाचे मूळ रागद्वेष –

पर्यायमूढ जीव रागद्वेषमोहाने युक्त झाल्यामुळे परद्रव्यस्वरूप कर्माशी बद्ध होतो. ज्याप्रमाणे त्या बालकाला ठकाच्या संगतीने चोरी करताना पाहून पोलीस त्याला पकडतात व बंधनात अडकवितात. त्याप्रमाणे मोह ठकाने फसविल्या गेलेल्या पर्यायमूढ जीवाला रागद्वेषरूपी अपराध करताना पाहून कर्मरूपी पोलीस पकडतात व त्याला बंधनामध्ये टाकतात.

परका स्वामी होता चोर, सजा मिलेगी उसे कठोर

जो पराला आपले मानतो तो सर्वात मोठा चोर आहे. त्याला ८४ लाख योनीरूप जेलमध्ये फिरावे लागते. नरक निगोदादी अंदमान बेटामध्ये त्याला पाठविण्यात येते व त्याला तेथे अपार कष्ट सोसावे लागतात.

अशाप्रकारे पराशी, अस्वभाव भावाशी आपल्या आत्म्याचे एकत्व मानणारा, पर्यायाला आत्मसर्वस्व मानणारा जीव परसमय म्हटला जातो.

परघर में जाकर रोता है, अपने घरमें सोता है।

जो पराला आपले मानतो तो परसमय म्हणजेच मिथ्यादृष्टी. त्याला आपल्या घराची खबर नाही. आपल्या घरापासून दूर आहे व दुसऱ्याच्या घरात राहतो. त्यामुळे पराधीन होऊन दु:खी होतो. **परघरामध्ये शान्ती नाही. स्वघरामध्येच निराकुल शान्ती आहे.**

जो परद्रव्याची संगती सोडून स्वद्रव्याची संगती करतो. तो स्वसमय आहे अर्थात जो स्वत:ला आपले मानतो तो स्वसमय अर्थात सम्यग्दृष्टी होय.

सर्व विद्येचे मूल : भगवान आत्म्याचा परिचय –

आत्मा एक द्रव्य–गुण–पर्यायात्मक वस्तुविशेष आहे. भगवान आत्मा स्वद्रव्य–स्वगुण–स्वपर्यायामध्ये सुस्थित आहे. जे जीव निज आत्म्याला आत्म स्वभावरूपाने स्वीकारतात. मी एक पर्यायमात्र तत्त्व नसून अनादिअनन्त ध्रुव शुद्ध ज्ञानस्वभावी ज्ञाता–द्रष्टा आत्मा आहे असे जाणतात ते स्वसमय अर्थात सम्यग्दृष्टी आहेत. त्यांना सम्यग्ज्ञानरूपी ज्योती प्रगट होते. त्यांनाच संपूर्ण विद्या प्राप्त होते. त्यांच्या जीवनात केवलज्ञानरूपी सूर्याचा उदय होतो. त्याद्वारे संपूर्ण अज्ञान अंधकार दूर होतो. आपले जीवन प्रकाशमय बनण्यासाठी आत्मस्वभावाला जाणणे परम आवश्यक आहे. जे आपल्या आत्मस्वभावाला जाणत नाहीत त्यांच्या जीवनातील अज्ञानरूपी अंधकार दूर होऊ शकत नाही. भले ही ते ११ अंग व दशपूर्वाचे पाठी असतील तरी आत्मज्ञानाच्या अभावात मिथ्यात्व अंधकूपामध्येच निमग्न आहेत.

जे जीव आत्मस्वभावाचा आश्रय करतात ते यथोक्त आत्मस्वभावाची संभावना करण्यामध्ये समर्थ होतात. आत्मस्वभावाला प्राप्त करण्याचा परमपुरुषार्थ ते करू शकतात. आत्मस्वभावाला यथार्थ ओळखल्यामुळे पर्यायामध्ये आसक्ती करीत नाहीत. पर्यायामध्ये लीन न होता आपल्या आत्मस्वभावामध्येच विश्रांती घेतात. त्यामध्येच स्थिर होतात. ज्याप्रमाणे ठकाने पळवलेल्या त्या बालकाला कोणीतरी त्याची खरी ओळख करून दिली तर तो आपल्या मूळ घराचा शोध घेतो. ज्यावेळी त्याला आपले खरे घर व मातापिता सापडतात तेव्हा तो त्या ठकाला आपले न जाणता त्यापासून दूर होतो. व आपल्या घरात आनन्दाने राहतो. चोरीचा धंदा सोडून आपल्या वडिलांचा मूळ व्यापार करतो. त्यामुळे आता त्याला पोलिसांचे भय राहत नाही व तो बंधनात अडकत नाही. त्याप्रमाणे श्रीगुरूंच्या सदुपदेशाने आपल्या

आत्मस्वभावाला ओळखून पराला आपले मानणे सोडतो व आपल्या आत्मघरामध्ये स्थिर राहतो. तो सहज विकसित अनेकान्त दृष्टीने संपूर्ण एकान्तदृष्टीचा आग्रह सोडून देतो. द्रव्य व पर्यायस्वरूप आत्मद्रव्याला जाणल्यामुळे पर्याय मात्राचा जो एकान्त आग्रह होता तो नष्ट होतो.

आत्मज्ञान हेच एक वरदान–

आत्मज्ञ जीव मनुष्यादी पर्यायांमध्ये अहंकार करीत नाही व मनुष्यादी शरीरांमध्ये ममकार करीत नाही. अनेक खोलीमधून फिरविलेल्या रत्नदीपकाप्रमाणे आत्मा एकत्वस्वरूपी आहे असा अनुभव करतो. ज्याप्रमाणे रत्नाचा दीवा अनेक खोलीमधून फिरविला तर तो अनेक रूप होत नाही तो आपल्या एका प्रकाशरूप स्वभावाला सोडत नाही, निष्कम्परूपाने दैदीप्यमान राहतो त्याप्रमाणे आत्मा जरी अनेक पर्यायांमध्ये फिरला तरी तो अनेक रूप होत नाही. तो आपल्या ज्ञानदर्शनरूप स्वभावाला सोडत नाही. सदैव सर्व पर्यायांमध्ये आपल्या एक चैतन्य स्वभावाने प्रकाशमान राहतो. ज्ञानी पर्याय दृष्टी सोडून या एकत्व स्वभावाचा अनुभव करतो.

ज्ञानी मनुष्यादी पर्यायामध्ये आत्मबुद्धी सुटल्यामुळे मनुष्य व्यवहाराला कवटाळीत नाही. खाणे, पिणे, झोपणे, धंदा व्यापार इत्यादी क्रियाकलाप ज्यामध्ये आहेत त्या मनुष्य व्यवहाराचा आश्रय न घेता अविचलित चेतनाविलास मात्र आत्मव्यवहाराचा अंगीकार करतो. केवळ जाणणे हेच माझे काम आहे असे जाणून ज्ञाता–द्रष्टा होतो.

ज्ञानावरणादी द्रव्यकर्म, रागद्वेषादी भावकर्म आणि शरीरादी नोकर्म हे सर्व माझ्या आत्मस्वभावापासून भिन्न आहेत. मी आपल्या स्वभावाचा कर्ता–भोक्ता आहे. परद्रव्य व परभावांचा कर्ता–भोक्ता नाही. मी मनुष्य नाही. मनुष्य शरीर माझे नाही. शरीराच्या अवस्था माझ्या नाहीत. माझा आत्मा या शरीरात राहत असला तरी शरीरापासून अत्यंत भिन्न आहे. या शरीराचा सुद्धा मी ज्ञाता–द्रष्टा आहे. असे वास्तविक जाणून ज्ञानी आपल्या आत्मस्वभावाच्या अनुभवाने उत्पन्न अतीन्द्रिय आनन्दाचा भोग घेतो त्यामध्येच रूची करतो.

ज्यांना हे संपूर्ण जग कर्माचे जालस्वरूप व पापण्याच्या द्वारे परिणमन करणारे एक क्रीडांगण भासित होते व स्त्री–पुत्र–मित्रादिकांचा संयोग एका नावेवर काही काळ एकत्रित झालेल्या वाटसरूच्या संयोगाप्रमाणे वाटतो. ते या मनुष्य व्यवहाराचा आश्रय न करता आपल्या चैतन्यामध्ये क्रीडा करीत आनंदी

होतात.

पराची संगती सोडल्यामुळे रागी द्वेषी न होता समता भावाचा आश्रय घेतात. संसार-शरीर-भोगापासून परम उदासीन होतात. पराला आपल्यापासून भिन्न जाणल्यामुळे त्यामध्ये इष्ट-अनिष्ट कल्पना करून राग-द्वेषाला प्राप्त होत नाहीत. संपूर्ण परद्रव्यांच्या संगतीपासून दूर हटल्यामुळे व स्वद्रव्याची संगती केल्यामुळे स्वसमय होतात.

ज्याप्रमाणे कोणी वाटसरू मार्गावर कुठे जात होता आणि जंगलात येऊन रस्ता चुकला आणि त्याचवेळी रात्र झाली. इकडे तिकडे फिरतो, परंतु रस्ता सापडत नाही. विवेकाने विचार करतो की जर मी असाच चालू लागलो तर कुठे तरी पोहचून जाईन आणि उद्या दिवसासुद्धा रस्ता सापडायचा नाही. त्यापेक्षा कुठे न जाता आजची रात्र येथेच थांबूया. इतक्यात वीज चमकते आणि त्या वीजेच्या क्षणिक प्रकाशात मार्ग दिसतो. परंतु त्या रस्त्यापर्यंत जाणे कठीण होते. आता जाऊ शकत नाही. परंतु आता विश्वास उत्पन्न झाला की सकाळ होताच आपल्या गन्तव्य स्थानाकडे मी चालू लागेन. जोपर्यंत रात्र आहे तोपर्यंत येथे राहतो. सकाळ होताच पाऊल वाटेने रस्त्याकडे चालू लागतो. रस्त्यात काटे कुटे, झाडी झुडपे, खड्डा, टेकडी आदि अनेक अडचणी होत्या. त्या सगळ्यातून मार्ग काढत चालू लागला. जसजसा रस्ता जवळ येतो त्याची प्रसन्नता वाढत जाते. रस्त्यावर पोहचला की मोठ्या आनंदाने विहार करतो. पहिल्यासारखे आता विकल्प नाहीत. चालता चालता आपल्या लक्ष्य स्थानापर्यंत पोहोचताच निर्विकल्प होऊन तेथे आरामाने बसला. त्याचप्रमाणे जीव संसारात भ्रमण करता करता मिथ्यात्वरूपी जंगलात मार्ग विसरला. तेथे कदाचित भेदज्ञानरूपी वीज चमकली. त्याच्या प्रकाशात खरा मार्ग प्रकाशित झाला. मार्गाची सम्यक् प्रतीती झाली. आत्मस्पर्श झाला. जोपर्यंत असंयम रूपी रात्री आहे तोपर्यंत चालत नाही. रात्री व्यतीत झाल्यावर संयमासंयमरूपी छोट्या पाउलवाटेने चालू लागला. तेथून जाणे सुद्धा कठिण आहे. आता संयमाच्या राजमार्गावर येऊन पोहचला. त्या राजमार्गावरून विहार करीत जसजसे गन्तव्य स्थान जवळ येते तसतशी प्रसन्नता, आनंद वाढतो पुन्हा विश्राम स्थळावर पोहचल्यावर आनन्दमग्न होतो.

मागील गाथेमध्ये प्रसंगानुसार स्वसमय व परसमयाचे स्वरूप विशद करून सांगितले आहे. **ज्याला आपला आत्मा पसंत आहे तो स्वसमय व**

ज्याला बाह्य जग पसंत आहे तो परसमय. जो समताभावस्वरूपाने परिणमतो तो स्वसमय व जो रागद्वेषरूप विषमभावरूपाने परिणमतो तो परसमय होय. प्राप्त पर्यायामध्ये अंहबुद्धि करतो तो परसमय व आत्मस्वभावामध्ये अहंबुद्धी करतो तो स्वसमय आहे. पर्यायाची निंदा केली की अज्ञानीला स्वतःची निंदा वाटते त्यामुळे तो द्वेष करतो, व या पर्यायाची स्तुती केली की आपली स्तुती केली असे वाटते त्यामुळे तो राग करतो. स्तुतीमध्ये संतुष्ट व निंदेमध्ये रूष्ट होतो. लौकिक लोकांनी केलेली निंदास्तुती माझी नाही. वास्तविक कुंदकुंदाचार्य आपल्या स्वभावाचा महिमा गातात ती खरी माझी स्तुती आहे असे वाटले पाहिजे. सम्यग्दृष्टीला आपल्या सम्यग्दर्शनाचा सुद्धा अहंकार असत नाही. तो स्वतःला उच्च व मिथ्यादृष्टीला तुच्छ मानत नाही. ज्ञानी मुनी स्वतःला मुनी मानत नाहीत. साधुपणाचा त्यांना अहंकार असत नाही. कारण मुनी ही सुद्धा एक अवस्था आहे. ज्ञानी श्रावक व साधू स्वतःला ज्ञानानन्दस्वभावी त्रिकाली ध्रुव आत्मा मानतात. त्यामध्येच अहंपणा स्थापित करून ते स्वसमयरूप होतात.

परसमयपणा उत्पन्न होण्याचे मूल कारण द्रव्यगुणपर्यायात्मक वस्तुस्वरूपाचे अज्ञान आहे. म्हणून आचार्य आता द्रव्याचे लक्षण सांगून ज्ञानरूपी अंजनाच्याद्वारे अज्ञानरूपी दृष्टिदोष दूर करतात.–

अपरिच्चत्तसहावेणुप्पादव्वयधुवत्तसंबद्धं ।
गुणवं च सपज्जायं जं तं दव्वं ति वुच्चंति ।।९५।।

अन्वयार्थ– (**अपरिच्चत्तसहावेण**) आपला स्वभाव न सोडता (**जं**) जे (**उप्पादव्वयधुवत्तसंबद्धं**) उत्पादव्ययध्रुवत्वाने सहित आहे (**च**) आणि (**गुणवं सपज्जायं**) गुणयुक्त व पर्यायसहित आहे (**तं**) ते (**दव्वं ति**) द्रव्य आहे असे जिनेन्द्र भगवान (**वुच्चंति**) सांगतात.

तात्पर्य – एकस्वभावरूप उत्पादव्ययध्रौव्यवान् व गुणपर्यायवान जे सत् आहे ते द्रव्य आहे.

द्रव्याचे त्रैलक्षण्य–

या गाथेमध्ये तीन प्रकाराने द्रव्याचे लक्षण सांगितले आहे, **प्रथम लक्षण सत् हे आहे. हे अभेद द्रव्यार्थिकनयाने द्रव्याचे लक्षण सांगितले आहे.** द्रव्य आपल्या स्वभावाला कधी ही सोडत नाही. म्हणजेच द्रव्य सदैव आहे. त्याचे अस्तित्व कधीच नष्ट होत नाही. वस्तूचे अस्तित्वच वस्तूचा स्वभाव

आहे. द्रव्य आपल्या स्वभावाला न सोडता उत्पाद, व्यय व ध्रौव्यरूपाने परिणमते.

२) उत्पाद-व्यय-ध्रौव्य हा एका सत्‌चाच विस्तार आहे. म्हणून **पर्यायार्थिक नयाने उत्पादव्ययध्रौव्य हे द्रव्याचे दुसरे लक्षण केले आहे.** उत्पन्न होणे उत्पाद आहे, नष्ट होणे व्यय आहे व स्थिर राहणे ध्रौव्य आहे. वस्तूमध्ये जे काही उत्पन्न होते ते आपल्या स्वभावाला न सोडताच उत्पन्न होते. जे काही नष्ट होते ते आपल्या स्वभावाला न सोडताच नष्ट होते. वस्तू स्वभावरूपानेच स्थिर राहते. उदा. सोन्याचे कडे मोडून कुंडल केले. सोन्यामध्ये कुंडल पर्याय उत्पन्न झाली ती सुवर्णत्वस्वभावाला न सोडताच, कडे पर्यायाचा नाश झाला तेथे सुवर्णत्व नष्ट झाले नाही. दोन्ही अवस्थेमध्ये सुवर्णत्व ध्रुव आहे.

प्रत्येक वस्तू उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. वस्तूला ओळखण्याचे हे चिन्हच आहे. वस्तूच्या या स्वतन्त्र अस्तित्वाला अज्ञानी जाणत नाही. त्यामुळे दुसऱ्याच्या उत्पादव्ययाचा स्वयं कर्ता बनून कर्तृत्वाचा अंहकार करतो. मी मयूरपिंछी बनविली, मी स्वयंपाक केला, मी झाडून काढले. मी लेख लिहला, मी कपडे धुतले, इत्यादी.

विचार करा. मी मयूरपिंछी केली म्हणजे काय केले. मोराची मोठी पिसे होती त्याची छाटणी करून ती एकत्र करून बांधली. मोराच्या पंखांनी आपला स्वभाव न सोडताच ते पिंछीरूपाने परिणमले. मोराच्या पिसांचा पूर्व आकार नष्ट झाला व दुसरा नवीन आकार उत्पन्न झाला. जीव त्या पिसरूपाने परिणमला नाही. जीव त्यावेळी आपली बुद्धी उत्पन्न करतो. हे पिस असे कट करायचे. त्यांना एकावर एक ठेवून १००, १०० पिसांची जुळणी करायची इत्यादी बुद्धी लावण्याचे काम जीव करीत आहे. त्यावेळीच हात इकडून तिकडे हालत आहे ती क्रिया हातामध्ये होत आहे. हाताची पूर्व अवस्था नष्ट होऊन नवीन अवस्था उत्पन्न होते. या तीन द्रव्यांच्यामध्ये एकावेळी उत्पादव्यय ध्रौव्य होत आहे, तो आपापल्या स्वभावानुसार होत आहे. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याच्या उत्पादव्ययाचा कर्ता नाही फक्त त्याच्या अनुकूल बनून त्यामध्ये निमित्त होते. जीवांनी आपल्या ज्ञानस्वभावाला न सोडता पूर्वबुद्धीचा नाश केला व उत्तरबुद्धीला उत्पन्न केले. मोरपिसांनी आपला स्वभाव न सोडता पूर्व आकाराचा नाश करून पिंछीच्या आकाररूपाने परिणमन केले. हातांनी आपला स्वभाव न सोडता हलनचलनरूप उत्पाद व्यय केला. या सर्व द्रव्यांचे स्वतन्त्र अस्तित्व न

जाणता अज्ञानी सर्वांचा उत्पादव्यय एक मानून मीच मयूरपिंछी तयार केली असे मानून कर्तृत्वाचा अंहकार करून रागीद्वेषी होतो व दुःखी होतो. म्हणून सुखी होण्यासाठी द्रव्याचे लक्षण जाणून तसेच मानणे आवश्यक आहे.

जर उत्पादव्यय ध्रौव्यपणा सत् पदार्थामध्ये नसता तर कोणी जन्मले नसते. कोणी मेले नसते. न कुणाला कर्मबंधनाने अशुद्धता झाली असती, न कोणी कर्मबंध तोडून मुक्त झाला असता, न बीजांपासून झाडे झाली असती, वृक्षापासून फल उत्पन्न झाले नसते, न जीव बदलत असताना आपले जीवत्व कायम टिकवू शकला असता म्हणून सर्व द्रव्ये उत्पादादी तीन स्वभावरूप आहेत.

३) द्रव्याचा परिचय होण्यासाठी गुणपर्यायवान् हे द्रव्याचे तिसरे लक्षण आहे. द्रव्य सदैव आपल्या गुणाद्वारे लक्षात येते. गुणांच्या समूहालाच द्रव्य म्हणतात. द्रव्यामध्ये गुण भरलेले असतात. पिशवीत भरलेल्या धान्याप्रमाणे गुण विखुरलेले नाहीत तर तिळामधील तेलाप्रमाणे प्रत्येक गुण द्रव्याच्या सर्व भागामध्ये व्याप्त आहे. गुण व प्रदेश हे द्रव्याचे विस्तार विशेष आहेत. द्रव्य प्रत्येक समयामध्ये आपल्या पर्यायरूपाने परिणमतात म्हणून पर्याय द्रव्याचे आयतविशेष आहेत. गुण व प्रदेश हा द्रव्याचा विस्तार आहे व पर्याय मालिका ही द्रव्याची लांबी आहे. कारण पर्याय कालक्रमाने होतात व गुण एकावेळी सर्व विद्यमान असतात. गुण दोन प्रकारचे आहेत. सामान्यगुण व विशेष गुण. जे अनेक द्रव्यामध्ये सापडतात ते सामान्य गुण व जे विशिष्ट द्रव्यातच आढळतात ते विशेष गुण होत. उदा. अस्तित्व, नास्तित्व, एकत्व, अन्यत्व, द्रव्यत्व, पर्यायत्व, सर्वगतत्व, असर्वगतत्व, सप्रदेशत्व, अप्रदेशत्व, मूर्तत्व, अमूर्तत्व, सक्रियत्व, अक्रियत्व, चेतनत्व, अचेतनत्व, कर्तृत्व, अकर्तृत्व, भोक्तृत्व, अभोक्तृत्व, अगुरुलघुत्व इत्यादी सामान्यगुण आहेत.

अस्तित्व व नास्तित्वगुणाचा परिचय –

अस्तित्वगुण सर्व द्रव्यांमध्ये आहे. प्रत्येक द्रव्य स्वद्रव्यक्षेत्र-कालभावरूपाने सदैव आहे. जसा अस्तित्व गुण सर्व द्रव्यामध्ये आहे तसा नास्तित्व गुणसुद्धा सर्व द्रव्यामध्ये आहे. नास्तित्वगुणामुळे द्रव्य परद्रव्यक्षेत्रकालभावरूपाने कधीही होत नाही. जर द्रव्यामध्ये नास्तित्व गुण नसता तर जीव जडरूपाने परिणमला असता, साखर खारट किंवा तिखटरूपाने झाली असती, जीव गोडरूपाने किंवा गतिहेतुत्वादी रूपाने झाला असता.

अस्तित्व म्हणजे स्वरूपाने असणे व नास्तित्व म्हणजे पररूपाने नसणे. आपली जी गुणरूपी संपत्ती आहे त्याला टिकवून ठेवण्याचे काम अस्तित्व गुण करतो व दुसऱ्याचे गुण आपल्यामध्ये घुसू न देण्याचे काम नास्तित्वगुण करतो. अस्तित्वगुण स्वराष्ट्रमंत्री आहे व नास्तित्वगुण परराष्ट्रमंत्री आहे. ज्याप्रमाणे स्वराष्ट्रमंत्री आपल्या देशाचे संरक्षण करतो. आपला माल आपल्यामध्ये टिकवून ठेवतो, बाहेर जाऊ देत नाही. परराष्ट्रमंत्री, परदेशी माल आपल्यामध्ये येऊ देत नाही. अतिरेक्यांना आपल्या देशात प्रवेश देत नाही. त्याप्रमाणे अस्तित्वगुण द्रव्याची अंतर्गत व्यवस्था सांभाळतो व नास्तित्वगुण परद्रव्यापासून स्वतःचे रक्षण करतो. अस्तित्व व नास्तित्वगुणामुळे प्रत्येक द्रव्य टिकून आहे.

अन्य सामान्य गुणांचा परिचय –

ते एकत्व व अन्यत्व गुण ही सर्व द्रव्यांमध्ये आहेत. प्रत्येक द्रव्य स्वतःशी एकरूप अभिन्न आहे व परापासून विभक्त आहे. सर्वगत म्हणजे सर्वामध्ये गेलेला. धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, संपूर्ण लोकाकाशात व्यापून आहेत. जीव केवलिसमुद्घाताच्यावेळी संपूर्ण लोकाकाशात पसरतो व पुद्गलाचा महास्कन्ध संपूर्ण लोकात व्यापून आहे या अपेक्षेने धर्म, अधर्म, जीव, पुद्गल व आकाशामध्ये सर्वगतपणा आहे. कालाणू व परमाणूमध्ये असर्वगतपणा सामान्य गुण आहे. धर्म, अधर्म, जीव, आकाश व स्कन्ध अपेक्षेने पुद्गलामध्ये सप्रदेशत्व गुण आहे. कालाणू व पुद्गलपरमाणूमध्ये अप्रदेशत्व गुण आहे. एका प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशावर जाण्याची क्रिया जीव व पुद्गलामध्ये होते म्हणून जीव व पुद्गलामध्ये सक्रियत्व गुण आहे. धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्यामध्ये अक्रियत्वगुण आहे. कारण ही द्रव्ये हलनचलन करीत नाहीत. चेतनत्व सर्व जीवांमध्ये व्यापून आहे त्या अपेक्षेने सामान्य गुण आहे. कर्तृत्व गुण जीवामध्ये आहे कारण काहीतरी करण्याची इच्छा जीवच करतो. जीव आपल्या परिणामांचा कर्ता आहे. परद्रव्याच्या परिणामाचा कर्ता नाही म्हणून जीवामध्ये अकर्तृत्व गुण आहे. पुद्गलादी द्रव्ये कर्तृत्वाचा अंहकार करीत नाहीत पण आपापल्या पर्यायरूपाने परिणमतात या अपेक्षेने त्यांच्यामध्ये सुद्धा कर्तृत्व गुण आहे. जीव निश्चयाने आपल्या चैतन्यपरिणामाचा भोक्ता आहे. व्यवहाराने कर्मफलस्वरूप सुख-दुःखाचा भोक्ता आहे, म्हणून जीवामध्ये भोक्तृत्व गुण आहे. जीव अन्यद्रव्याचा भोक्ता नाही, म्हणून अभोक्तृत्व गुण

आहे व पुद्गलादी द्रव्यांमध्येही अभोक्तृत्व सामान्य गुण आहे. अगुरुलघुत्व हा सामान्य गुण सर्व द्रव्यांमध्ये आहे. कारण अगुरुलघुगुणाच्या निमित्ताने सर्व गुणांमध्ये षड्गुणहानी वृद्धी होते, हानी वृद्धी होऊन सुद्धा द्रव्य आपल्या स्वरूपामध्ये प्रतिष्ठित राहते. अशाप्रकारे द्रव्यामध्ये अनन्त सामान्य गुण आहेत.

विशेष गुणांचा परिचय –

अवगाहनहेतुत्व आकाशद्रव्याचा, गतिहेतुत्व धर्मद्रव्याचा, स्थितिकारणत्व अधर्म द्रव्याचा, वर्तना कालद्रव्याचा, रूपादिमत्व पुद्गलद्रव्याचा व चेतनत्व जीवद्रव्याचा विशेषगुण आहे. विशेषगुण ही अनन्त आहेत. त्यापैकी येथे एकेक गुण सांगितले. विशेषगुण जाणल्यामुळे प्रत्येक द्रव्याचे भिन्न अस्तित्व लक्षात येते. अज्ञानी जीव परद्रव्याच्या संपत्तीवर अनधिकार चेष्टा करतो. पुद्गलाच्या स्पर्शरसगंधवर्ण गुणांना आपले मानतो. मी काळा गोरा, मी थंड गरम इत्यादी मानतो. मी दुसऱ्या जीवांचे व पुद्गलाचे गमन करवितो. मी दुसऱ्यांना राहायला जागा दिली असे मानतो व त्यामुळे रागद्वेषरूप परिणमून दुःखी होतो. ज्याची जी वस्तू आहे त्याला ती दिली पाहिजे. त्यामध्येच आपल्याला शांती समाधान मिळते. देवशास्त्रगुरुपूजेमध्ये आ. बाबू युगलजी म्हणतात.–

तुमसा दानी क्या कोई हो, जग को दे दी जगकी निधियाँ ।
दिनरात लुटाया करते हो, समशम की अविनश्वर मणियाँ।।

भगवान् व गुरू जगातील सर्व पदार्थांना आपापल्या स्वरूपाने जाणतात. स्वतःला स्वरूपाने जाणतात. प्रत्येक द्रव्याची आपापली गुणनिधी त्यांची त्यांना देऊन टाकली आहे, त्यामुळे स्वतःमध्ये शांती सुखाचा अनुभव करतात.

द्रव्य पर्यायरूप आहे. द्रव्य प्रत्येक समयाला कोणत्या ना कोणत्या पर्यायरूप असते. पर्यायाद्वारे द्रव्याचे अस्तित्व लक्षात येते. पर्याय क्रमाक्रमाने होतात. ज्याप्रमाणे बालक, तरूण, वृद्ध अवस्था.

९३ गाथेमध्ये पर्यायाचे ४ प्रकार सांगितले आहेत. द्रव्यपर्याय व गुणपर्याय. द्रव्यपर्यायाचे समानजातीय व असमानजातीय असे दोन भेद आहेत. गुणपर्यायाचे स्वभाव व विभाव असे दोन भेद आहेत.

तत्त्वार्थसूत्र ग्रंथामध्ये गृध्रपिच्छ आचार्यांनी द्रव्याची ही तीन लक्षणे

सांगितली आहेत. १) **'सद् द्रव्यलक्षणम्'** २) **'उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत्'** ३) **'गुणपर्ययवद द्रव्यम्'**

उत्पादव्ययध्रौव्य व गुणपर्याय द्रव्याचे लक्षण आहे व द्रव्य लक्ष्य आहे. अशाप्रकारे त्यांच्यामध्ये लक्ष्यलक्षण भेद असला तरी, स्वरूपभेद नाही. द्रव्य स्वरूपानेच उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप व गुणपर्यायस्वरूप आहे. ज्याप्रमाणे मलिन झालेले वस्त्र धुतल्यावर निर्मल अवस्थारूपाने उत्पन्न होते त्यावेळी ते वस्त्र त्या उत्पादाने लक्षित होते. वस्त्र स्वच्छ झाले, शुद्ध झाले असे आपण म्हणतो. निर्मलरूपाने उत्पाद झाला ते वस्त्राचे स्वरूपच आहे. वस्त्र निर्मलतेपासून भिन्न नाही. त्याप्रमाणे पूर्व अवस्थारूपाने असलेले द्रव्यसुद्धा यथायोग्य बहिरंग साधनाचे सान्निध्य असताना, स्वरूपाचा कर्ता व करणरूप सामर्थ्यस्वभावाने अनुगृहीत होऊन उत्तर अवस्थारूपाने उत्पन्न होते तेव्हा त्या उत्पादाने लक्षित होते. त्या उत्पादाशी द्रव्याचा स्वरूपाने भेद नाही. द्रव्य स्वयं स्वरूपानेच उत्पादरूप आहे.

कार्योत्पत्ती मध्ये साधन सामर्थ्य –

कोणत्याही द्रव्यामध्ये नवीन उत्पाद होताना अंतरंग व बहिरंग अशा दोन प्रकारच्या साधन सामग्रीचा सद्भाव असतो. बहिरंग साधनसामग्री निमित्तरूप असते, परंतु ती वस्तूमध्ये बदल घडवित नाही. अंतरंग साधनसामग्री म्हणजे त्या द्रव्याची कर्तृत्वशक्ती व करणशक्ती आहे. त्या द्रव्यामध्येच पर्यायरूपाने परिणमण्याचे सामर्थ्य आहे व त्या पर्यायाचे साधन बनण्याचे सामर्थ्य ही त्यामध्येच आहे. स्वतःच्या कर्तृत्व व करणशक्तीचा द्रव्यावर उपकार आहे की ज्यामुळे नवीन पर्यायाचा उत्पाद होतो. जर वस्तूमध्ये कर्तृत्व करणरूप सामर्थ्य नसते तर बहिरंग हजारो साधन मिळाले तरी वस्तूमध्ये उत्पाद झाला नसता.

मिथ्यात्वपर्यायाने सहित जीव देवशास्त्रगुरूंचे बहिरंग साधन मिळाले असता आपल्या अंतरंग साधनाच्या बळावर सम्यक्त्वरूप पर्यायाने उत्पन्न होतो. जर त्या जीवामध्ये सम्यक्त्वरूप परिणमण्याची योग्यता नसती तर कोणत्याही बाह्यसाधनाने मिथ्यात्वाचा अभाव होऊन सम्यक्त्वाचा उत्पाद झाला नसता. बहिरंग साधन निमित्तरूप अवश्य असते, परंतु त्या उत्पादाचा कर्ता किंवा करण होऊ शकत नाही. गुरू आपल्याला मोक्षमार्गाचा उपदेश देऊ शकतात, परंतु मोक्षमार्गरूपाने परिणमवू शकत नाहीत. तसे जर सामर्थ्य असते

तर आदिनाथ भगवंतांनी मरीचीला मिथ्यामताचा प्रचार कसा करू दिला असता ? त्याला सम्यक्त्वी बनविले असते.

ज्याप्रमाणे निर्मल अवस्थारूपाने असलेले तेच वस्त्र मलिन अवस्था रूपाने नष्ट होताना त्या व्ययाने लक्षित होते. वास्तविक मलिन अवस्थेचा व्यय व निर्मल अवस्थेचा उत्पाद एकाच समयात आहे. आमची दृष्टी जेव्हा ज्या अवस्थेकडे आहे तेव्हा त्या अवस्थारूपाने ते द्रव्य लक्षित होते. जेव्हा वस्त्राची मलिनता आपल्या दृष्टीमध्ये असते तेव्हा आपण म्हणतो, पहा, वस्त्र किती मलिन झाले होते. आता त्याचा मळ दूर झाला. जेव्हा वस्त्राच्या निर्मलतेकडे दृष्टी आहे तेव्हा वस्त्र उत्पादरूपाने लक्षात येते. आपण म्हणतो, पहा ! वस्त्र किती स्वच्छ झाले.

एखादा जीव मिथ्यात्व सोडून सम्यक्त्वी होतो. ज्यांची दृष्टी त्याच्या मिथ्यात्व अवस्थेकडे आहे ते म्हणतात. पहा तो किती मिथ्यात्वी होता, आता त्याचे मिथ्यात्व दूर झाले. कोणाची त्याच्या सम्यक्त्व अवस्थेकडे असते ते म्हणतात, पहा तो सम्यक्त्वी होऊन कसा चमकत आहे.

ज्याप्रमाणे एकाच समयात निर्मलरूपाने उत्पन्न व मलिनरूपाने नष्ट असे तेच वस्त्र अवस्थायी अशा वस्त्रपणाच्या अपेक्षेने ध्रौव्यरूप असून ते ध्रौव्याने लक्षित होते. ध्रौव्याशी त्याचा स्वरूपभेद नाही. ते स्वरूपानेच ध्रौव्यरूप आहे. वस्त्र मलिन अवस्था असो की निर्मल अवस्था असो दोन्ही अवस्थेमध्ये वस्त्ररूपाने ध्रुवच आहे. मलिन अवस्था नष्ट झाली म्हणून वस्त्रपणा नष्ट झाला नाही किंवा स्वच्छ अवस्था उत्पन्न झाली म्हणून वस्त्रपणा उत्पन्न झाला नाही. सर्व अवस्थेमध्ये वस्त्रपणा ध्रुव आहे. त्याचप्रमाणे एकावेळी पूर्वपर्यायरूपाने व्ययरूप, उत्तर पर्यायाने उत्पादरूप द्रव्य अवस्थायी द्रव्यत्वरूपाने ध्रुवरूप असून ते ध्रौव्यत्वाने लक्षित होते. ध्रौव्याशी त्याचा स्वरूपभेद नाही. द्रव्य स्वरूपानेच ध्रौव्यरूप आहे. ध्रौव्याला सुद्धा येथे अवस्था म्हटले आहे. कारण ध्रौव्यसुद्धा वस्तूचा एक अंश आहे. जसा उत्पाद व व्यय अंश आहे तसा ध्रौव्यसुद्धा अंशच आहे.

गुणपर्यायांशी द्रव्याची एकरूपता –

ज्याप्रमाणे तेच वस्त्र विस्तारविशेषात्मक गुणांनी लक्षित होते तेव्हा गुणांशी त्या वस्त्राचा स्वरूपभेद नाही. वस्तू स्वरूपानेच गुणमय आहे. पांढरे, जाड, मऊ, पातळ इत्यादी वस्त्रांच्या गुणाकडे दृष्टी असते तेव्हा ते वस्त्रच

पांढरे, मऊ, जाड, पातळ रूपाने लक्षित होते त्याप्रमाणे द्रव्याचा गुणाशी स्वरूपभेद नाही तर ते स्वरूपानेच गुणमय आहे. जीवाच्या ज्ञान, दर्शन, सुख वीर्यादी गुणाकडे आमची दृष्टी असते तेव्हा जीव ज्ञानदर्शनसुखवीर्यमय प्रतीतीला येतो. त्या गुणांपासून जीव वेगळा लक्षात येत नाही.

ज्याप्रमाणे तेच वस्त्र पर्यायरूप धाग्यांनी लक्षित होते तेव्हा त्या वस्त्राचा धाग्यांपासून स्वरूपभेद नाही. स्वरूपानेच वस्त्र धागामय आहे. धागे सुती असतील तर वस्त्रसुद्धा सूतीच म्हटले जाते, धागे टेरिकॉट असतील तर वस्त्र टेरिकॉटचे म्हटले जाते. कारण वस्त्र त्या धाग्यापासून भिन्न नाही. धाग्यांनीच वस्त्र बनले आहे. त्याप्रमाणे द्रव्यदेखील आपल्या आयतविशेषात्मक पर्यायांनी लक्षित होते. त्या पर्यायांशी द्रव्याचा स्वरूपभेद नाही. स्वरूपानेच द्रव्य पर्यायरूप आहे.

ज्याप्रमाणे वस्त्रामधील उत्पादव्ययध्रौव्य व गुणपर्याय हे वस्त्रापासून वेगळे नसून वस्त्राशी तन्मय आहेत. वस्त्रच स्वभावाने उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूप व गुणपर्यायरूप आहे त्याचप्रमाणे वस्तूमधील उत्पादव्ययध्रौव्य व गुणपर्याय वस्तूपासून पृथक् नसून त्याच्याशी तन्मय आहेत. द्रव्यही स्वभावाने तत्स्वरूप आहे. द्रव्य, उत्पादव्ययध्रौव्य व गुणपर्याय या सर्वांचे अस्तित्व एकच आहे. त्यांच्यामध्ये प्रदेशभेद नाही. सर्व मिळून एक अखंड वस्तू आहे.

द्रव्याचे लक्षण जाणून प्रत्येक वस्तूला आपापल्या गुणपर्यायरूपाने पाहणे हाच आपला पुरुषार्थ आहे. शाब्दिक परिभाषा पाठ करून आपले हित होणार नाही. जी वस्तू जशी आहे तशी त्याला जाणण्या व मानण्यामध्येच आपले हित आहे. आपले सुख, ज्ञान आपल्यामध्येच आहे ते दुसऱ्यामधून येत नाही किंवा दुसऱ्यामध्ये जात नाही. आपल्या प्रदेशांमध्ये अनंत गुण भरलेले आहेत व प्रत्येक समयाला मी माझ्या स्वभावरूपानेच परिणमत आहे. त्यामुळे स्वगुणांचा व पर्यायाचा विचार करून खूष रहावे. दुसऱ्याच्या गुणपर्यायांची चिंता करून आकुलित होऊ नये. वस्तूचे अस्तित्व आपल्या दृष्टीत आले तर वस्तूच्या विशेषता त्यामध्ये पाहिल्या जातील. समग्र वस्तू जर लक्षात आली नाही तर सर्व विशेषता इन्द्रजालाप्रमाणे काल्पनिक होतील. चैतन्य, सुख, ज्ञान इत्यादी विशेषता आहेत. व त्यांचा आधारभूत जीव नामक पदार्थ या शरीरामध्येच आहे. असे जाणल्याने स्वतःचे स्वतन्त्र अस्तित्व अनुभवात येईल. स्वतःचे स्वरूपच स्वतःला शरणभूत आहे. दुसरे कोणी शरण नाही. सर्व

व्यवस्था वस्तूमध्ये स्वयं व्यवस्थित आहे. फक्त त्याला जाणणे आपले काम आहे.

मागील गाथेमध्ये द्रव्याचे तीन प्रकाराने लक्षण सांगितले आहे. ते तिन्ही लक्षण द्रव्यामध्ये अविनाभावी रूपाने आहेत. जेथे एक लक्षण आहे तेथे दुसरी दोन्ही लक्षणे आहेतच. जे सत् आहे तेच उत्पादव्ययध्रौव्यरूप आहे व गुणपर्यायरूप आहे व जे उत्पादव्ययध्रौव्यरूप व गुणपर्यायरूप आहे तेच सत् आहे. या तीन लक्षणांपैकी सत् अर्थात अस्तित्व, सत्ता हे द्रव्याचे प्रथम लक्षण आहे. त्याचा खुलासा ९६ व ९७ नंबर गाथांमध्ये करतात. अस्तित्वाचे दोन भेद आहेत. १) स्वरूपास्तित्व व २) सादृश्यास्तित्व यालाच अवान्तरसत्ता व महासत्ता म्हणतात. प्रत्येक वस्तूचे भिन्न भिन्न विशेष अस्तित्व ते स्वरूपास्तित्व होय. सर्व वस्तूंमध्ये सामान्य अस्तित्व आहे ते सादृश्यास्तित्व अर्थात महासत्ता होय. त्यापैकी सादृश्यास्तित्वाचे लक्षण गाथा ९७ मध्ये सांगणार आहेत. प्रथम स्वरूपास्तित्वाचे लक्षण व त्याचे स्वरूप पुढील गाथेमध्ये सांगतात –

सब्भावो हि सहावो गुणेहिं सगपज्जएहिं चित्तेहिं ।
दव्वस्स सव्वकालं उप्पादव्वयधुवत्तेहिं ।।९६।।

अन्वयार्थ – (**गुणेहिं**) गुणरूपांनी (**चित्तेहिं सगपज्जएहिं**) आपल्या विचित्र पर्याय रूपांनी आणि (**उप्पादव्वयधुवत्तेहिं**) उत्पादव्ययध्रौव्यरूपांनी (**दव्वस्स**) द्रव्याचा (**सव्वकालं**) सर्वकाळ (**सब्भावो**) जो सद्भाव आहे (**हि सहावो**) वास्तविक द्रव्याचा तो स्वभावच आहे.

तात्पर्य – आपल्या गुणरूपाने, पर्यायरूपाने आणि उत्पादव्यय-ध्रौव्यरूपाने जे द्रव्याचे अस्तित्व आहे, तोच द्रव्याचा स्वभाव आहे.

वस्तूचा स्वभाव : अस्तित्व

वस्तू म्हणजे काय ? वस्तूचा स्वभाव काय आहे ? असा जेव्हा प्रश्न उत्पन्न होतो तेव्हा त्याचे एकच उत्तर आहे. वस्तू ज्यारूपाने सदैव विद्यमान आहे तोच त्या वस्तूचा स्वभाव आहे. सोने म्हणजे काय असे विचारले तर आपण सांगतो. जे पिवळे, स्निग्ध, जड असते. ज्याचे कुण्डल, अंगठी इत्यादी दागिने बनविले जातात ते सोने होय. साखर काय? तर जी गोड, पांढरी व चौकोन असते ती साखर. कोणत्याही वस्तूचे वर्णन करताना ती ज्या स्वरूपात आढळते तोच त्या वस्तूचा स्वभाव सांगितला जातो. येथे प्रश्न आहे की वस्तूचाच

स्वभाव काय? तर आपल्या गुणपर्यायरूपाने व उत्पादव्ययध्रौव्यरूपाने जे वस्तूचे अस्तित्व आहे तोच त्याचा स्वभाव आहे. वस्तू सदैव गुणांनी परिपूर्ण असते. कोणत्या ना कोणत्या अवस्थारूपाने ती आढळते. व वस्तूमध्ये अवस्था निरन्तर बदलत असतात. पूर्व अवस्था नष्ट होते. नवीन अवस्था उत्पन्न होते. व कोणत्या तरी रूपाने ती ध्रुव असते. सोन्याच्या रिंगा मोडून झुबे केले. तेव्हा सोन्याच्या रिंगा अवस्थेचा नाश झाला व झुबे अवस्थेचा उत्पाद झाला. परंतु दोन्हीमध्ये सोनेपणा ध्रुव आहे. अशाप्रकरे द्रव्याचे अस्तित्व उत्पादव्ययध्रौव्यरूपाने आढळते.

अस्तित्व द्रव्याचा स्वभाव आहे, हे सिद्ध करण्यासाठी अमृतचन्द्र आचार्यांनी चार हेतू दिले आहेत. १) अस्तित्व अन्य साधनांहून निरपेक्ष असल्यामुळे २) अनादि-अनन्त असल्याने अहेतुक एकरूप वृत्तीने सदा प्रवृत्तपणा असल्यामुळे ३) विभावधर्माहून विलक्षण असल्यामुळे ४) भाव भाववानपणाच्या अपेक्षेने अनेकत्व असले तरी प्रदेश भेद नसल्यामुळे द्रव्याबरोबर एकत्वाला धारण करणारे ते द्रव्याचा स्वभावच का होणार नाही.

१) अस्तित्व अन्यसाधन निरपेक्ष –

प्रत्येक वस्तूचे अस्तित्व स्वयंसिद्ध आहे. त्या वस्तूला होण्याकरिता कोणत्या साधनाची काय आवश्यकता आहे? अस्तित्वासाठी दुसऱ्या कोणाचीही अपेक्षा लागत नाही. ज्याप्रमाणे साखर गोड होण्यासाठी त्याला कशाची आवश्यकता आहे? कुणाचीही आवश्यकता नाही. साखर स्वयं स्वभावाने गोड आहे. अग्नीला उष्ण होण्यासाठी कुणाची अपेक्षा आहे? अग्नी स्वयं उष्ण आहे. त्याप्रमाणे द्रव्याच्या अस्तित्वासाठी दुसऱ्या कुणावर विसंबून राहण्याची गरज नाही. आपल्या अस्तित्वासाठी माता, पिता, देव, शास्त्र, गुरु इ. कुणाचीही आवश्यकता नाही. वस्तूचा स्वभाव अन्य साधननिरपेक्ष असतो. अस्तित्व अन्य साधनांहून निरपेक्ष आहे म्हणून तो द्रव्याचा स्वभाव आहे.

२) अस्तित्व अनादि-अनन्त अहेतुक एकरूपवृत्तीने नित्यप्रवृत्त-

या एका हेतुमध्ये तीन हेतू दडलेले आहेत. पहिला हेतू अस्तित्व अनादि-अनन्त आहे. द्रव्य कधीपासून आहे व किती काळापर्यंत राहणार आहे याला मर्यादा नाही. द्रव्य अनादिकाळापासून आहे. जसे कोण्या जीवाला विचारले, तू कधीपासून आहेस. त्या पर्यायाच्या अपेक्षेने तो उत्तर देतो की मी ५० वर्षापासून आहे, परंतु विचार केला तर त्यापूर्वीही तो दुसऱ्या भवात कुठेतरी

होताच. त्या भवापूर्वी ही तो होताच. अशाप्रकारे कितीही पूर्वी गेलो तरी सुरवात सापडत नाही. म्हणून द्रव्य अनादी आहे. केवळ जीवच नव्हे तर पुद्गलपरमाणु, धर्म, अधर्म, काल, आकाश सर्वद्रव्ये अनादि आहेत. द्रव्याचा अन्तही नाही. ज्याप्रमाणे या भवात जीव मरण पावला तरी नष्ट होत नाही, तो पुढच्या भवात जातो. तेथून पुन्हा पुढच्या भवात जातो. संसारात तो अनंतकाळ राहिला तरी किंवा पुढे मोक्षाला गेला तरी त्याचा नाश होत नाही. तेथेही तो जीवंतच असतो. त्याप्रमाणे कोणत्याही द्रव्याच्या अस्तित्वाचा नाश होत नाही. त्याच्या अवस्था बदलत राहतात. परंतु मूळद्रव्याचा नाश होत नाही. स्वभावाला आदि व अंत असत नाही. अग्नी केव्हापासून गरम आहे व कधी त्याच्या उष्णतेचा नाश होणार ? अग्नी अनादि-अनन्त गरम आहे. अस्तित्वपण अनादि-अनन्त आहे म्हणून द्रव्याचा तो स्वभाव आहे.

दुसरा हेतू जी वस्तू अनादी असते त्याला काही कारण असत नाही. द्रव्याचे अस्तित्व अनादी आहे म्हणून ते अहेतुक आहे. अग्नीला उष्ण कोणी केले ? साखरेला गोड कोणी केले ? जीवाला ज्ञानरूप कोणी केले ? स्वभाव हा कोणाकडून केला जात नाही. स्वभाव स्वयंसिद्ध असतो म्हणून अकारण आहे. द्रव्याचे अस्तित्व ही अकारण आहे म्हणून तो द्रव्याचा स्वभाव आहे. तिसरा हेतू हे द्रव्याचे अनादिअनन्त अहेतुक अस्तित्व एकरूप वृत्तीने नित्य प्रवृत्त आहे. द्रव्याचे अस्तित्व सारखे बदलत नाही. कधी कोणत्या रूपात तर कधी कोणत्या रूपात असे असत नाही. जसे अनादिकाळापासून आहे तसेच ते अनन्तकाळापर्यंत राहते. ज्या वस्तूचा जो स्वभाव असतो तो एकरूपाने नित्य प्रवृत्त असतो. अग्नी उष्णरूपाने नित्य प्रवृत्त असते. कधी उष्ण तर कधी थंड असे असत नाही. साखर कधी गोड तर कधी कडू असत नाही. जीवाचे चैतन्य अस्तित्व सदैव चैतन्यरूपानेच राहते. त्याप्रमाणे द्रव्याचे अस्तित्व सदैव एकरूपाने राहते. म्हणून अस्तित्व द्रव्याचा स्वभाव आहे.

३) अस्तित्व विभावधर्मापासून विलक्षण-

स्वभाव नेहमी विभावापासून भिन्न असतो. द्रव्याचे अस्तित्व विभावधर्माहून भिन्न असते म्हणून अस्तित्व द्रव्याचा स्वभाव का होणार नाही. अस्तित्व हे अस्तित्व आहे त्यामध्ये विभाव कसा ? अस्तित्व नास्तित्व धर्माहून भिन्न आहे अर्थात द्रव्याचे अस्तित्व त्या त्या द्रव्याच्या गुण, पर्याय, उत्पाद, व्यय, ध्रौव्यरूपाने आहे. परन्तु परद्रव्याच्या गुण पर्याय, उत्पाद, व्यय, ध्रौव्यरूपाने त्याचे अस्तित्व नाही.

अस्तित्व भाव अर्थात गुण आहे व द्रव्य भाववान् अर्थात गुणी आहे याप्रमाणे दोघांमध्ये भाव भाववान् या अपेक्षेने भेद आहे, परंतु त्यांच्यामध्ये प्रदेश भेद नाही. जे अस्तित्वाचे प्रदेश तेच द्रव्याचे प्रदेश व जे द्रव्याचे प्रदेश तेच अस्तित्वाचे प्रदेश आहेत. जे अग्नीचे प्रदेश तेच उष्णतेचे प्रदेश व जे उष्णतेचे प्रदेश तेच अग्नीचे प्रदेश असतात. ज्याप्रमाणे अग्नी व उष्णता वेगवेगळ्या ठिकाणी राहत नाहीत त्याप्रमाणे अस्तित्व व द्रव्य वेगवेगळ्या ठिकाणी राहत नाहीत.

आम्ही आमचे अस्तित्व आपल्यामध्ये ठेवले आहे की अन्य कोठे ठेवले आहे हे तपासून पहा. विचार केला तर लक्षात येईल की किती वस्तूंच्या अधीन आम्ही आमचे अस्तित्व ठेवले आहे. जेवणात मीठ नसेल तर आमचे अस्तित्व नसल्यासारखे वाटते. धन चोरीला गेले तर माझा सर्वनाश झाला असे म्हणतो. पुत्राचा किंवा पतीचा वियोग झाला की आता माझे अस्तित्वच संपले. आता मी कोणासाठी जगू? त्यावेळी आपण स्वतःला विसरतो.

शेखचिल्ली नावाचा मूर्ख नोकर होता. गावाच्या बाजाराचा दिवस होता. मालकांनी सांगितले, 'जा, बाजारात जाऊन तेलाचा डबा घेऊन ये.' तो म्हणाला, 'मालक, मला नाही जमणार. मी त्या बाजारात हरवलो तर काय करणार ?' मालकाला माहीत होते हा मूर्ख आहे, त्यामुळे त्यांनी एक युक्ती केली. त्याच्या गळ्यात एक पातळ दोरा बांधला व ते म्हणाले, 'जा , हा दोरा तुझ्या गळ्यात आहे तोपर्यंत तू कुठेही हरवत नाहीस'. मूर्खच तो. त्यामुळे त्याला पटले. तो बाजारात जातो. बाजारात गर्दी होती. धक्काबुक्कीमुळे त्याच्या गळ्यातील तो दोरा तुटून कुठेतरी पडला. त्याने पाहिले गळ्यात दोरा नाही. तो त्या भर बाजारात रडू लागला. सर्वांनी विचारले काय झाले ? तो म्हणतो 'मी हरवलो, मी मेलो'. लोक म्हणतात हा वेडा आहे, त्याला त्याच्या घरी पोहचवूया. त्यांनी त्याला मालकाच्या घरी आणून सोडले. मालकाला पाहून त्याला आणखीनच रडू आले. मालकांनी विचारले काय झाले ? 'मालक मी हरवलो. मी मेलो. माझ्या गळ्यातील दोरा तुटून कुठे पडला'. मालकाला परिस्थिती लक्षात आली. त्यांनी दुसरा एक दोरा आणला व त्याच्या गळ्यात बांधला. शेखचिल्ली आनंदाने उडी मारून नाचू लागला व टाळी वाजवून म्हणू लागला. 'आता मी सापडलो. आता मी मिळालो'. त्याला पाहून सर्वजण हसू लागले व म्हणू लागले काय महामूर्ख आहे. त्या शेखचिल्लीपेक्षा सुद्धा आपण किती महामूर्ख आहोत. प्रत्यक्ष भिन्न दिसणाऱ्या धनाचा नाश झाला की आम्ही

म्हणतो की माझे सर्वस्व नष्ट झाले, मी आता मेलो, मी तर प्रत्यक्ष दिसत आहे. तरी म्हणतो मी नष्ट झालो. आपले अस्तित्व आपल्यामध्ये आहे. पराचा वियोग झाला तरी मी आहेच. मी त्या परद्रव्याबरोबर नष्ट झालो नाही. याचा अर्थ त्याचे अस्तित्व भिन्न आहे व माझे अस्तित्व भिन्न आहे. स्त्रीपुत्रमित्रादिकांवर माझे अस्तित्व अवलंबून नाही. अस्तित्व पूर्ण स्वाधीन आहे, परंतु आम्ही त्याला मान्यतेत पराधीन करून ठेवले आहे. जोपर्यंत स्वरूप अस्तित्वाचे ज्ञान होत नाही तोपर्यंत दुःख आहे. मुलगा शाळेतून घरी आला नाही तर शोधाशोध सुरू होते. ज्यावेळी कळते की तो अमुक ठिकाणी आहे त्यावेळी शांती होते. अर्थात ज्यावेळी अस्तित्वाचा बोध होतो त्यावेळी दुःख, अशांती संपते.

द्रव्यगुणपर्यायाची परस्परसाधित सिद्धी–

ज्याप्रमाणे भिन्न भिन्न द्रव्यांचे अस्तित्व आपापल्यामध्येच समाप्त होते. अर्थात एका द्रव्याचे अस्तित्व अन्य द्रव्यामध्ये जात नाही. त्याप्रमाणे ते अस्तित्व द्रव्यगुणपर्यायांमध्ये प्रत्येकामध्ये समाप्त होत नाही. द्रव्यगुणपर्याय या तिन्हींचे अस्तित्व एकच आहे. दोन भिन्न द्रव्याप्रमाणे त्यांचे अस्तित्व भिन्न भिन्न नाही. द्रव्य स्वतंत्र, गुण स्वतंत्र व पर्याय स्वतंत्र आहे असे नाही. तिन्ही मिळून एकच वस्तू आहे. द्रव्य वेगळीकडे, गुण वेगळीकडे व पर्याय वेगळीकडे राहतात असे नाही. त्यांच्या प्रदेशांमध्ये भेद नाही. एकच द्रव्य असल्यामुळे त्या तिघांचे अस्तित्व स्वप्रदेशांमध्ये सर्वत्र एकरूपाने व्यापून असते. सोन्याचे प्रदेश वेगळे, पिवळेपणाचे प्रदेश वेगळे व कुण्डलाचे (रिंगा) प्रदेश वेगळे आहेत असे आपण मानत नाही. जेथे सोने आहे तेथेच पिवळेपणा व तेथेच रींगा इ. अवस्था आहेत. त्याप्रमाणे द्रव्य, गुण व पर्यायाचे प्रदेश वेगळे नाहीत. त्यांचे अस्तित्व एक आहे. कारण त्यांची सिद्धी परस्पर साधित आहे अर्थात एकाची सिद्धी झाली तर अन्य दोघांची सिद्धी होते. एकाची सिद्धी झाली नाही तर अन्य दोघांची सिद्धी होत नाही. द्रव्याला वेगळे केले तर गुणपर्याय कोणाच्या आधाराने राहणार? गुणाला वेगळे केले तर द्रव्य व पर्याय कोणत्यारूपाने राहणार, पर्यायाला वेगळे केले तर द्रव्य, गुण दिसणारच नाहीत. म्हणून त्या तिघांचे अस्तित्व एकच आहे. सोन्याचा दृष्टान्त देऊन ही गोष्ट अमृतचंद्र आचार्यांनी विस्ताराने सांगितली आहे. ती याप्रमाणे–

द्रव्याद्वारे गुणपर्यायांची सिद्धी –

ज्याप्रमाणे द्रव्य, क्षेत्र, काल व भावाच्या अपेक्षेने पिवळेपणादी गुण व कुंडलादी अवस्था सुवर्णद्रव्यापासून भिन्न नाहीत. अर्थात जे सोन्याचे द्रव्य आहे तेच पिवळेपणादींचे व कुंडलादींचे द्रव्य आहे. जे सोन्याचे प्रदेश (क्षेत्र) आहेत तेच पिवळेपणादी गुणांचे व कुंडलादी अवस्थांचे प्रदेश आहेत. सोन्याचा जो काळ आहे तोच पिवळेपणादी व कुंडलादींचा काळ आहे. सोन्याचा जो सुवर्णत्वभाव आहे तोच पिवळेपणादी व कुंडलादींचा भाव आहे. पिवळेपणादी व कुंडलादींचा कर्ता, करण, अधिकरण सोनेच आहे. सोनेच पिवळेपणादी रूपाने व कुंडलादीरूपाने परिणमते म्हणून ते स्वतः कर्ता आहे. पिवळेपणादी कुंडलादी सुवर्णाद्वारेच बनलेले आहे. म्हणून स्वयं करण आहे. पिवळेपणा व कुंडलादींचा आधार सुवर्णद्रव्यच आहे म्हणून स्वयं सोने अधिकरण आहे. या कर्ता, करण व अधिकरणरूपाने पिवळेपणादी व कुंडलादी पर्यायांच्या स्वरूपाचे ग्रहण करून प्रवर्तमान सुवर्णाच्या अस्तित्वाने त्यांचे अस्तित्व सिद्ध आहे. अशा त्या पिवळेपणादी गुण व कुंडलादी पर्यायांद्वारे जे सोन्याचे अस्तित्व आहे तो सोन्याचा स्वभावच आहे. त्याप्रमाणे गुण व पर्याय द्रव्य, क्षेत्र, काल व भाव या चतुष्टयाच्या अपेक्षेने द्रव्यापासून भिन्न नाहीत. जे द्रव्याचे द्रव्य आहे तेच गुणपर्यायांचे द्रव्य आहे, जे द्रव्याचे क्षेत्र तेच गुणपर्यायांचे क्षेत्र आहे. जो द्रव्याचा काल तोच गुणपर्यायांचा काळ आहे. जो द्रव्याचा भाव तोच गुणपर्यायांचा भाव आहे. द्रव्य गुणपर्यायांचा कर्ता, करण व अधिकरण आहे. गुणपर्यायांच्या स्वरूपाचा स्वीकार करून प्रवृत्त होणाऱ्या द्रव्याच्या सत्तेने त्यांची सत्ता आहे. जर द्रव्य नसेल तर गुणपर्यायांची ही सिद्धी होत नाही. अशा त्या गुण व पर्यायांद्वारे जे द्रव्याचे अस्तित्व आहे तोच द्रव्याचा स्वभाव आहे. उपर्युक्त कथनाने द्रव्याच्याद्वारे गुणपर्यायांची सिद्धी होते हे सिद्ध केले.

गुणपर्यायांद्वारे द्रव्याची सिद्धी–

ज्याप्रमाणे सोने पिवळेपणा आदी गुण व कुंडलादी पर्यायापासून वेगळे नाही. पिवळेपणा आदी गुण व कुंडलादी पर्याय कर्ता, करण, अधिकरण रूपाने सुवर्णाच्या स्वभावाचा अंगीकार करून प्रवर्तमान आहेत. जर पिवळेपणादी गुण व कुंडलादी अवस्था नसतील तर सोन्याचे अस्तित्वच सिद्ध होत नाही. म्हणून त्या गुणपर्यायांपासून निष्पन्न होणारे सोन्याचे अस्तित्व हा सोन्याचा स्वभाव आहे. त्याप्रमाणे कोणतेही द्रव्य, द्रव्य क्षेत्र, काल व भावाने त्याच्या गुणपर्यायांपासून वेगळे नाही. गुण व पर्याय कर्ता, करण व अधिकरणरूपाने

द्रव्यस्वभावाचा स्वीकार करून प्रवर्तमान आहेत. जर गुणपर्याय नसतील तर द्रव्याचे अस्तित्वच सिद्ध होत नाही. त्या गुणपर्यायांपासून सिद्ध होणारे द्रव्याचे अस्तित्व हा द्रव्याचा स्वभावच आहे.

उपर्युक्त सिद्धान्त समजला तर आपले जीवन सुखमय होईल. आजपर्यंत आम्ही आपले अस्तित्व बाहेरच शोधले आहे व त्यामुळे अनंत दुःख आहे. आपल्या गुणपर्यायांद्वारे आपले अस्तित्व अनुभवले तर सुखाची गुरुकिल्ली सापडली म्हणून समजा. स्वतःला स्वतःच्या गुणपर्यायरूपाने पहावे. व दुसऱ्याला पहायचे असेल तर त्याला त्याच्या गुणपर्यायरूपाने पहावे. शरीररूपाने स्वतःला पाहिले तर स्वद्रव्याचे खरे ज्ञान नाही. शरीर आपल्या स्पर्शरसगंधरूपानेच स्वतःच्या आकाररूपाने आहे. मी माझ्या अनंतगुणांमध्येच स्थित आहे. मी माझ्या पर्यायरूपानेच परिणमतो. अन्य द्रव्याच्या गुणांमध्ये माझे अस्तित्व नाही किंवा परद्रव्याच्या पर्यायरूपाने मी परिणमत नाही. दुसऱ्याच्या सुखाने मी सुखी होऊ शकत नाही. मी माझ्या गुणपर्यायापासून भिन्न नाही व माझे गुण पर्याय माझ्यापासून भिन्न नाहीत ते कळाले तर ज्ञान, सुख आनंद दुसऱ्यामध्ये किंवा दुसऱ्याकडून प्राप्त करण्याची आशा करण्याचे कारण नाही. हे सर्व सिद्धान्त आपण कोळून प्यालो तर खरोखरच जिनवचन हे परम अमृत आहे याचा अनुभव होईल.

द्रव्याद्वारे उत्पाद–व्यय–ध्रौव्याची सिद्धी–

ज्याप्रमाणे कोणी सोन्याची अंगठी मोडून कुंडल तयार केले तेथे कुंडलपर्यायाचा उत्पाद, अंगठी पर्यायाचा नाश (व्यय) व पिवळेपणारूप ध्रौव्य सुवर्णद्रव्यापासून द्रव्यक्षेत्रकालभावाने वेगळे नाहीत. सुवर्णद्रव्याशी ते तन्मयच आहेत. कुंडल, अंगठी व पिवळेपणा यांच्या उत्पादव्ययध्रौव्य स्वरूपाचा अंगीकार करणाऱ्या सुवर्णद्रव्याच्या अस्तित्वानेच त्या उत्पादादिकांची सिद्धी आहे. कारण जर आधारभूत सुवर्णद्रव्य नसेल तर आधेयभूत कुंडलादिकांचे उत्पादादिकही असणार नाहीत. म्हणून त्या उत्पादव्ययध्रौव्यरूपाने सोन्याचे अस्तित्व हा सोन्याचा स्वभाव आहे. त्याप्रमाणे उत्पाद व्यय ध्रौव्य द्रव्य, क्षेत्र, काल व भावाने द्रव्यापासून वेगळे आढळून येत नाही. जेथे सोने आहे तेथेच कुंडलाचा उत्पाद आहे. तेथेच अंगठीचा व्यय आहे व तेथेच पिवळेपणाचे ध्रौव्य आहे. त्याप्रमाणे जेथे द्रव्य आहे तेथेच पूर्वपर्यायाचा नाश होतो व उत्तर पर्यायाचा उत्पाद होतो व गुणरूपाने ध्रौव्य असते. म्हणून उत्पादव्ययध्रौव्य

द्रव्याशी तन्मय आहेत. उत्पादव्ययध्रौव्याच्या स्वरूपाचा अंगीकार करणाऱ्या द्रव्याच्या अस्तित्वाने त्या उत्पादादिकांचे अस्तित्व आहे. जर आधारभूत द्रव्य नसेल तर उत्पादादिक ही सिद्ध होत नाहीत. म्हणून उत्पादव्ययध्रौव्यरूपाने असणारे अस्तित्व हा द्रव्याचा स्वभाव आहे.

उत्पाद–व्यय–ध्रौव्याद्वारे द्रव्याची सिद्धी–

ज्याप्रमाणे सुवर्णद्रव्य कुंडलाचा उत्पाद, अंगठी पर्यायाचा नाश व पिवळेपणारूप ध्रौव्यापासून वेगळे आढळून येत नाही. सुवर्णद्रव्याच्या स्वरूपाचा स्वीकार करून प्रवर्तमान कुंडलाचा उत्पाद, अंगठीचा व्यय व पिवळेपणारूप ध्रौव्य यांच्या अस्तित्वाने सुवर्णद्रव्याचे अस्तित्व आहे. जर अंगठी, कुंडल पिवळेपणा इत्यादी नसतील तर सोने कोणत्या रूपात सापडणार? दागिन्यांच्या उत्पादव्ययाच्या अस्तित्वाने सोन्याचे अस्तित्व सिद्ध होते. त्यांनी निष्पन्न सुवर्णाचे अस्तित्व हाच सुवर्णाचा स्वभावच आहे. त्याप्रमाणे कोणतेही द्रव्य आपल्या उत्पादव्ययध्रौव्यापासून वेगळे आढळून येत नाही. उत्पादादिक द्रव्याच्या स्वरूपाला धारण करून प्रवर्तमान आहेत. म्हणून उत्पादव्ययध्रौव्याच्या अस्तित्वाने द्रव्याचे अस्तित्व सिद्ध होते. अर्थात जेथे कोणतीही नवीन अवस्था (कार्य) उत्पन्न होते व जुनी अवस्था नष्ट होते तेथे द्रव्य आहे हे सिद्ध होते. ज्याप्रमाणे कापड असल्याशिवाय शर्ट इत्यादी होऊ शकत नाही त्याप्रमाणे द्रव्य असल्याशिवाय उत्पादादिक होत नाहीत. म्हणून उत्पादादिकांच्या अस्तित्वाने द्रव्याचे अस्तित्व सिद्ध होते. जर उत्पादव्ययध्रौव्य नाहीत असे मानले तर द्रव्यही असू शकणार नाही. उत्पादव्ययध्रौव्यांनी निष्पन्न द्रव्याचे अस्तित्व हा द्रव्याचा स्वभावच आहे.

जेथे द्रव्याचे अस्तित्व आहे तेथेच त्याचे गुणपर्याय आहेत व तेथेच त्याचे उत्पादव्ययध्रौव्य आहेत. उत्पादव्ययध्रौव्य हीच वस्तूची पूर्णता आहे. स्वतःचे अस्तित्व स्वतःच्या उत्पादव्ययध्रौव्यरूपाने पहावे. शरीराच्या बालकपर्यायाचा नाश झाला व तरूण पर्यायाचा उत्पाद झाला. मनुष्यरूपाने ध्रौव्य आहे. त्यामध्ये पुद्‌गलद्रव्य आहे, मी नाही. जीव चैतन्यस्वभावी आहे तर माझा उत्पादव्ययध्रौव्य चैतन्यस्वभावानुसारच होणार. मिथ्यात्वपरिणामाचा नाश, सम्यक्त्वपर्यायाचा उत्पाद व श्रद्धागुणाचे ध्रौव्य हे माझ्यापासून वेगळे नाही. मी त्यापासून वेगळा नाही.

दोन द्रव्याचे स्वतन्त्र स्वरूपास्तित्व जाणत नाही म्हणून चिन्ता व

आकुलता उत्पन्न होते. स्वतःची चिन्ता करीत नाही सतत पराची चिन्ता करतो. चिन्ता काल्पनिक असतात. स्वरूपास्तित्वाचा निर्णय केला तर चिन्ता संपेल. '**उत्तमा स्वात्मचिन्ता स्यात्**' आपल्या आत्म्याची चिन्ता उत्तम आहे. पराची चिन्ता करून काय उपयोग ? कारण सर्वांचे स्वरूपास्तित्व भिन्न आहे.

या गाथेच्या माध्यमातून स्वपरद्रव्याचे त्रिलक्षण समजून प्रत्येकाची सत्ता भिन्न-भिन्न निश्चित करावी. आपल्या आत्म्याला सर्व रागादी व पुद्गल विकारांपासून भिन्न आपल्या शुद्ध सत्तेमध्ये सदैव विराजमान जाणून सर्व विकल्पांचा त्याग करून निज आत्म्याचा अनुभव करावा. द्रव्याचे लक्षण जाणण्याचे हे तात्पर्य आहे.

अस्तित्व हे द्रव्याचे स्वरूप आहे. ते अस्तित्व दोन प्रकाराने सांगितले आहे. १) सामान्य अस्तित्व व २) विशेष अस्तित्व अर्थात् प्रत्येक पदार्थाचे स्वतन्त्र अस्तित्व. मागील गाथेत प्रत्येक पदार्थाच्या स्वरूपअस्तित्वाचे वर्णन केले. आता या गाथेत सर्व पदार्थांमध्ये सदृशरूपाने असणाऱ्या सामान्य अस्तित्वाचे वर्णन करतात. व्यवहारात सुद्धा कोणत्याही व्यक्तीला किंवा वस्तूला जाणताना त्याला दोन पद्धतीने आपण जाणतो. १) सामान्यरूपाने २) विशेषरूपाने. जसे कोणी अनोळखी व्यक्ती भेटली तर आपण प्रथम विचारतो. आपण कोण आहात, जैन आहात की ब्राह्मण, तो म्हणतो मी जैन आहे. सर्व जिनानुयायींमध्ये जैनपणा हा सामान्य धर्म आहे. म्हणून हे सामान्य जाणणे झाले. पुढे आपण प्रश्न विचारतो, तुम्ही काय करता? तुम्ही काय शिकता ? इत्यादि. ह्या प्रश्नांचे उत्तर म्हणजे त्या व्यक्तीची विशेष ओळख होय. त्याचप्रमाणे द्रव्याचे स्वरूप समजताना द्रव्याचे अस्तित्व दोन प्रकाराने समजून घेतले असता पूर्ण द्रव्याची ओळख होते. या गाथेत सादृश्यास्तित्वाचे (सामान्य अस्तित्वाचे) स्वरूप सांगतात.-

इह विविहलक्खणाणं लक्खणमेगं सदिति सव्वगयं ।
उवदिसदा खलु धम्मं जिणवरवसहेण पण्णत्तं ।।९७।।

अन्वयार्थ -(**खलु**) खरोखर (**धम्मं उवदिसदा**) धर्माचा उपदेश करणाऱ्या (**जिणवरवसहेण**) जिनेंद्र वृषभांनी (**इह**) या विश्वामध्ये (**विविहलक्खणाणं**) विविध लक्षणे असणाऱ्या द्रव्यांचे (**सदिति**) 'सत्' असे (**सव्वगयं**) सर्वांमध्ये आढळणारे (**एगं लक्खणं**) एक लक्षण (**पण्णत्तं**) सांगितले आहे.

तात्पर्य -धर्माचा उपदेश करणाऱ्या जिनेंद्र देवांनी सांगितले आहे की या सर्व सामान्य लक्षणांमध्ये 'सत्' हे एक लक्षण सर्वगत आहे.

द्रव्याच्या लक्षणांचा प्रतिनिधी 'सत्' लक्षण–

आतापर्यंत कुन्दकुन्द आचार्यांनी द्रव्याची अनेक लक्षणे सांगितली. जे गुणवान आहे, पर्यायवान आहे किंवा उत्पाद, व्यय, ध्रौव्यवान आहे, जे स्वभावाला सोडत नाही ते द्रव्य होय. जितकी लक्षणे सांगितली आहेत, त्या सर्वांमध्ये जाणारे कोणते लक्षण आहे ? जिनेंद्र देवांनी सर्वांमध्ये एक मुख्य लक्षण 'सत्' सांगितले आहे. जेवढ्या विशेषता आहेत त्या सर्व 'आहे' या धर्मावर अवलंबून आहेत. वस्तू आहे तर ती गुणवाली, पर्यायवाली, उत्पाद व्यय ध्रौव्यवाली असू शकते. त्यामध्ये जर अस्तित्वच नसेल तर कोणत्याही विशेषता घटित होत नाहीत. आहेपणा गुणामध्ये आहे, पर्यायामध्ये आहे. सामान्य लक्षण आहे. शुद्ध संग्रह नयाने सर्व पदार्थांमध्ये व्यापक एक सत् रूप लक्षण आहे. जीव असो, पुद्गल असो, धर्मद्रव्य असो की अधर्मद्रव्य असो आहेपणा सर्वांमध्ये आहे. म्हणून सादृश्यास्तित्व एकच आहे.

अशाप्रकारे 'सत्' असे कथन व 'सत्' असे ज्ञान सर्व पदार्थांना विषय करते. जर 'सत्' सर्व पदार्थांना विषय करणारे नसेल तर कोणी पदार्थ सत्, कोणी पदार्थ असत्, कोणी सत्–असत् आणि कोणी अवाच्य होऊन जाईल. परंतु असे नाही.

जसे वृक्ष अनेक प्रकारचे आहेत. कोणते वृक्ष आंब्याचे आहे, तर कोणते लिंबाचे, तर कोणते पेरूचे आहे. त्यांचे आपापले लक्षणभूत अस्तित्व वेगवेगळे आहे. १० आंब्याची झाडे असली तरी ती स्वतंत्र–स्वतंत्र आहेत, एक नाहीत, त्यामुळे त्यांच्यामध्ये अनेकत्व आहे; जेव्हा सर्वांमध्ये असणारे सादृश्यदर्शक वृक्षत्व मुख्य होते तेव्हा भिन्न भिन्न वृक्षामध्ये असलेले अनेकत्व गौण होते. सर्व वृक्ष आहेत ही दृष्टी मुख्य होते तसेच विश्वामध्ये अनेक आणि अनेकविध द्रव्ये आहेत. त्यांचे आपआपले विशेष लक्षणभूत अस्तित्व वेगवेगळे आहे. जेव्हा सर्व पदार्थांमध्ये सत् या सामान्यदृष्टीने पाहिले जाते. तेव्हा सादृश्य दाखविणारा सत् भाव मुख्य होतो, त्यामुळे द्रव्यांची अनेकता गौण होते. गौण झाली तरी वस्तूमध्ये स्वरूपास्तित्व विद्यमान असतेच.

जेव्हा सादृश्यास्तित्वावर दृष्टी असते तेव्हा अनेकपणा बुद्धीत राहत नाही आणि जेव्हा स्वरूपास्तित्वावर दृष्टी असते तेव्हा एकपणा दिसत नाही, विविधता दिसते. जेव्हा राजाची सेना चालली आहे असे म्हटले जाते तेव्हा त्या सेनेमध्ये हत्ती, घोडे, रथ अशाप्रकारे विविधता असताना ही त्याला गौण करून एक सेनारूपाने सर्वांना पाहिले जाते, हत्ती पण सेना आहे, घोडा पण सेना आहे, पायदळही सेना आहे. सर्वत्र सेनापणाच दिसतो. जेव्हा त्या सेनेतील एकेकाची

माहिती पाहिली जाते तेव्हा विविधता लक्षात येते. हा हत्ती आहे, हा घोडा आहे इत्यादि.

जेव्हा लग्नामध्ये सर्व पाहुण्यांना जेवायला बोलावले जाते. जेवणाची पंगत बसल्यावर सर्वांच्याकडे समान दृष्टीने पाहिले जाते. कोण गरीब आहे, कोण श्रीमंत आहे, कोण काळा आहे, कोण गोरा आहे अशाप्रकारे विशेषता न पाहता सर्वांना समान वाढले जाते. सर्वांना एक निमन्त्रित पाहुणे या दृष्टीने पाहिले जाते. तेथे विविधता गौण होते. सर्व सिद्धांना नमस्कार, असे म्हटले असता सिद्धालयामध्ये असणाऱ्या अनंत सिद्धांना एकाचवेळी नमस्कार केला जातो. प्रत्येक सिद्ध आपापल्या शुद्ध असख्यात प्रदेशात आहेत, प्रत्येक सिद्ध परमानंद स्वरूप सुखामृताचा रसास्वाद स्वतः स्वतःमध्ये घेत आहेत, आपापल्या अंतिम शरीराहून काही कमी आकाराने विराजमान आहेत म्हणून भिन्न भिन्न आहेत.परंतु सिद्धत्व दृष्टीने सर्व सिद्ध एक आहेत. सर्व सिद्धांचे एकावेळी ग्रहण होते. त्याचप्रमाणे सर्व विश्वाकडे सत् अर्थात् आहे त्या दृष्टीने पाहिले जाते तेव्हा तेथे एक सत्चेच ग्रहण होते. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, इत्यादी भेद वस्तूमध्ये असले तरी ते गौण होतात. सत् या अपेक्षेने सर्वांमध्ये एकत्व आहे.

अन्य मतावलंबी सुद्धा पदार्थ सर्वगत आहे असे मानतात व जैनसुद्धा सत् सर्वगत मानतात तर दोघांमध्ये काय अन्तर आहे? अन्य लोक एका व्यक्तीला सर्वगत मानतात व जैन एक सत् जातीला सर्वगत मानतात, हे अन्तर आहे. व्यक्ती तर भिन्न भिन्न आहे. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रवेश करू शकत नाही, अनेक व्यक्तींमध्ये जातीच्या अपेक्षेने समानता पाहून एकतेचा आरोप केला आहे.

हे विश्व सत्रूप असूनसुद्धा अनेक विचित्ररूप आहे. हे एक ब्रह्मस्वरूप नाही किंवा एक जड स्वरूप ही नाही, परन्तु हे विश्व एक असूनही अनन्त जीव, अनन्तानन्त पुद्गल, एक धर्म, एक अधर्म, एक आकाश, असंख्यात कालाणुरूप आहे.

प्रत्येक वस्तू स्वरूपास्तित्व व सादृश्यास्तित्वाने संपन्न आहे म्हणून वस्तूला परिपूर्ण ओळखण्यासाठी दोन्ही अस्तित्वांना जाणणे आवश्यक आहे. जेव्हा स्वरूपास्तित्वाला जाणतो. तेव्हा परद्रव्याबरोबर असणारी एकत्वाची भ्रान्ती दूर होते. त्यामुळे परद्रव्यांसंबंधीचा मोह नष्ट होतो. भेदविज्ञानाची सिद्धी होते. भेदविज्ञानामुळे सम्यग्दर्शनाची उपलब्धी होते.

सादृश्यास्तित्व जाणल्यामुळे सर्वांमध्ये समभाव उत्पन्न होतो. पदार्थांमधील विषमतेकडे दृष्टी असली की रागद्वेष उत्पन्न होतात. हा श्रीमंत, हा

गरीब हा कषाययुक्त, हा अकषायी, हा माझा, हा परका या रूपाने पाहिले तर विषमभाव उत्पन्न होऊन रागद्वेष होतात. तेव्हा श्रीमंत असो की गरीब असो, संसारी असो की मुक्त असो, सर्व जीवांमध्ये जीवत्व समान आहे. सर्वांमध्ये सत्पणा समान आहे अशी समदृष्टी उत्पन्न होते तेव्हा समता येते. स्वरूपास्तित्वाला जाणल्याने भेदविज्ञानाची सिद्धी होते व सादृश्यास्तित्वाला जाणल्याने समताभावाची सिद्धी होते.

भेदविज्ञान व समताभाव हाच धर्म आहे. या धर्माच्या प्राप्तीसाठी स्वरूपास्तित्व व सादृश्यास्तित्वाला यथार्थ समजून घेण्याची आवश्यकता आहे.

मी सुद्धा एक सत् पदार्थ आहे. माझ्यामध्ये सादृश्यास्तित्व व स्वरूपास्तित्व आहे. सादृश्यास्तित्व जाणल्यामुळे मी दुसऱ्यांपेक्षा कोणीतरी विशेष आहे असा अहंकार होत नाही. जसा दुसरा जीव आहे तसाच मी पण आहे. जसा मी आहे तसाच दुसरा जीव आहे. एक परमाणूचे सुद्धा अस्तित्व आहे. अस्तित्व दृष्टीने सर्व समान आहेत. असे असूनही मी पराशी कधी एकरूप झालो नाही. माझे स्वतन्त्र अस्तित्व आहे. माझी स्वरूपसंपदा माझ्यामध्ये प्रतापवंत आहे. माझ्यामध्ये काहीही कमी नाही. हे जाणल्यामुळे दीनहीन भाव नष्ट होऊन स्वभावाचा महिमा येऊन स्वरूपामध्ये लीन होता येते.

स्वतःचे सादृश्यास्तित्व जाणल्यामुळे पर्यायासंबंधीचा अहंकार गळून पडतो व स्वरूपास्तित्व जाणल्यामुळे शाश्वत द्रव्यामध्ये अहंपणा होऊन स्वरूपगुप्तता येते. यथार्थ ज्ञानामुळे सर्वत्र लाभच लाभ आहे. आबादी आबाद आहे. आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे.

सत् (अस्तित्व) हे द्रव्याचे लक्षण आहे व ते अस्तित्व स्वरूपास्तित्व व सादृश्यास्तित्व या भेदाने दोन प्रकारचे आहे. हे मागील दोन गाथेत सिद्ध केले. आता प्रश्न असा होतो की द्रव्याचे अस्तित्व कोणी निर्माण केले ? अस्तित्व द्रव्यापासून भिन्न आहे का ?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जगामध्ये अनेक दार्शनिक झाले त्यांनी आपापल्या तर्कबुद्धीने द्रव्यांची उत्पत्ती वेगवेगळ्या प्रकाराने सांगितली. वैज्ञानिक म्हणतात. मनुष्य प्रथम वानर होता, तो विकास करीत या रूपात पोहोचला आहे. कोणी म्हणतात पूर्वी काही नव्हते, एक आदिम होता. ईश्वराने म्हटले 'कुण' अर्थात उत्पन्न कर, मग त्याने पदार्थांना निर्माण केले. इत्यादी अनेक कल्पना करतात. परंतु सर्वज्ञ देव सांगतात, की कोणत्याही एका द्रव्याच्या द्वारे अन्य द्रव्य उत्पन्न केले जात नाही व द्रव्याचे अस्तित्व द्रव्यापासून

भिन्न नाही. हाच जिनेंद्रप्रणीत सिद्धांत पुढील गाथेत व्यक्त करतात–

दव्वं सहावसिद्धं सदिति जिणा तच्चदो समक्खादा ।
सिद्धं तध आगमदो णेच्छदि जो सो हि परसमओ ।।९८ ।।

अन्वयार्थ :– (**दव्वं**) द्रव्य (**सहावसिद्धं**) स्वभावाने सिद्ध आणि (**सदिति**) सत् आहे असे (**जिणा**) जिनेन्द्र भगवंतांनी (**तच्चदो**) यथार्थरूपाने (**समक्खादा**) सांगितले आहे (**तध**) तशाप्रकारे (**आगमदो**) आगमाने (**सिद्धं**) सिद्ध तत्त्वाला (**जो**) जो जीव (**णेच्छदि**) मानत नाही (**सो**) तो (**हि**) वास्तविक (**परसमओ**) परसमय आहे.

तात्पर्य – द्रव्य सहजसिद्ध व सहज सत् आहे असे न मानणारा मिथ्यादृष्टी आहे.

समस्त द्रव्य स्वभावसिद्ध –

या विश्वामध्ये प्रत्येक द्रव्य स्वभावानेच सिद्ध आहे. एक द्रव्य अन्य कोणत्याही द्रव्यापासून उत्पन्न झाले नाही. अनन्तानन्त जीवद्रव्य, अनन्तानन्त पुद्गलद्रव्य, एक धर्मद्रव्य, एक अधर्मद्रव्य, एक आकाशद्रव्य व असंख्यात कालद्रव्य अनादिकाळापासून स्वत:च सिद्ध आहेत. जर एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला उत्पन्न करील तर नवीन – नवीन द्रव्ये उत्पन्न होत राहतील . परंतु विश्वात जेवढी द्रव्ये आहेत तेवढीच कायम आहेत.

सर्व द्रव्य स्वभावसिद्ध आहेत हे कशावरून जाणले ? सर्व द्रव्य अनादि अनन्त आहेत म्हणून स्वभाव सिद्ध आहेत. द्रव्य पूर्वी नव्हते आणि नंतर त्याला कोणी उत्पन्न केले असे नाही. जे अनादिनिधन आहे, ते अन्य कोणापासून बनू शकत नाही. जे अनादिनिधन असते त्याला अन्य साधनाची अपेक्षा नसते. जर अनादिनिधन नाही तर कोणत्या तरी काळापासून त्याच्या उत्पत्तीची सुरूवात मानावी लागेल. त्यामुळे असत्ची उत्पत्ती होईल. विश्वात कोणतीही असत् वस्तू उत्पन्न होताना दिसत नाही.

एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा उत्पादक, कर्ता, अधिकारी व स्वामी नाही. मी परद्रव्याला उत्पन्न करतो हा अज्ञानी जीवाचा खोटा अहंकार आहे. फॅक्टरीच्या मालकाला वाटते मी या वस्तूंचा उत्पादक आहे. आमचे हे नवीन उत्पादन आहे असे मोठ्या फुशारकीने सांगत असतो. वस्तूस्वरूपाचा विचार केला तर हा अहंकार खोटा आहे. परद्रव्यामध्ये आपण काही करू शकत नाही. कर्तृत्वाच्या मिथ्या अहंकाराने हा जीव दु:खी आहे.

एकदा एक कापूस धुनणारा व्यक्ती दिल्लीहून रेल्वेने नागपुरात येऊन उतरला. तेथे त्यांने पाहिले की खूप मोठा कापसाचा ढीग स्टेशनवर येऊन पडला आहे. घरात गेल्यावर त्याला खूप ताप चढला. ताप उतरण्यासाठी पुष्कळ उपाय केले तरी ३-४ दिवस ताप काही उतरेना. मोठमोठ्या डॉक्टरांना बोलाविले. डॉक्टरांनी तपासले तर शारीरिक कोणतेही कारण दिसेना. तेव्हा डॉक्टरांनी सांगितले, मानसोपचार तज्ज्ञांना दाखवा. तेव्हा मानसोपचार तज्ज्ञांना बोलाविले. त्यांनी त्या कापूस धुनणाऱ्याला विचारले, 'आपण कोठे गेला होता का ? तेथे तुम्ही काही पाहिले का ?' तेव्हा त्याने उत्तर दिले. 'हो, चार दिवसांपूर्वीच मी दिल्लीहून नागपूरला आलो आणि तेथे मालगाडीतून खूप मोठा कापसाचा ढीग येऊन पडलेला पाहिला. एवढा मोठा कापूस मी एकटा कधी धुनणार ?' डॉक्टरांना निदान लागले. एवढे सगळे काम मी एकटा कधी करणार या चिंतेनेच याला ताप चढला आहे. याप्रमाणे या जीवाने सर्व परद्रव्याचे कर्तृत्वाचे ओझे आपल्या शिरावर घेतले आहे म्हणून दु:खी आहे.

मी मुलाबाळांना उत्पन्न करणारा, मी त्यांचे पालन पोषण करणारा, माझ्यावरच त्यांची जबाबदारी आहे. या चिंतेनेच हा सदैव जळत आहे.

द्रव्य सदैव, पर्याय कादाचित्क –

वास्तविक द्रव्य उत्पन्न केले जात नाही. जो उत्पन्न होतो तो पर्याय आहे, अवस्था आहे. अवस्था उत्पन्न होतात व नष्ट होतात. परंतु ज्यामध्ये अवस्था उत्पन्न होतात ते द्रव्य उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही. द्रव्य अमर्याद तिन्ही काळामध्ये स्थिर आहे. जीवद्रव्य उत्पन्न होत नाही. परंतु जीवामध्ये मनुष्य पर्याय उत्पन्न होतो, देवपर्याय नष्ट होतो. मनुष्यशरीरामध्ये जीव येतो तेव्हा त्या जीवाला मनुष्य म्हटले जाते. तोच जीव देवपर्यायामध्ये जातो तेव्हा त्याला देव म्हटले जाते. मातापित्यांनी मुलाला जन्म दिला म्हणणे व्यवहार आहे. वास्तविक तो मुलगा अन्य पर्याय सोडून या पर्यायात आला तेव्हा त्या मनुष्य पर्यायाच्या उत्पत्तीमध्ये माता-पिता फक्त निमित्त आहेत. ते उत्पादक नाहीत. जीव नवीन उत्पन्न झाला नाही. तो दुसरीकडे होताच. त्या पूर्व पर्यायाच्या पूर्वीही तो होताच. विचार केला तर त्याचा कधी कोठे अभाव होतो असे सिद्ध होत नाही. यावरून वस्तू अनादि-अनन्त आहे हे सिद्ध होते.

अनादिनिधन वस्तू साधनान्तराची अपेक्षा करीत नाही. ती आपल्या स्वभावाला मूल साधन रूपाने ग्रहण करून स्वत: सिद्ध सिद्धिमत् आहे.

चोवीस तीर्थंकर सिद्ध झाले ते सुद्धा स्वभावसिद्ध अनादी आहेत. जरी

त्यांची सिद्ध अवस्था सादी आहे, परंतु त्यांचा जीव अनादी आहे. जीवामध्ये सर्व ज्ञानादी गुण सदैव आहेत व त्यांचे असंख्यात प्रदेश पण सदैव आहेत. जेव्हा त्यांच्यावर आवरण होते तेव्हा ते अशुद्ध होते. जेव्हा आवरण निघून गेले तेव्हा ते शुद्ध झाले. ही शुद्धता सुद्धा आपल्याच उपादान कारणरूप निश्चय रत्नत्रयमय निर्विकल्प समाधीपासून उत्पन्न झाली आहे. प्रत्येक द्रव्य परिणामी असल्यामुळे प्रत्येक समयाला त्याचा कोणता ना कोणता तरी परिणाम होतो. त्या परिणामाचे उपादान कारण ते द्रव्य स्वयं आहे. त्या परिणामासाठी अनुकूल व्यापार असणारा परद्रव्याचा परिणाम निमित्तरूप आहे. ज्याप्रमाणे ज्वारीच्या पीठाची भाकरी झाली. त्यामध्ये ज्वारीच्या पीठरूप असणाऱ्या पुद्गल परमाणूंची ती अवस्था आहे. म्हणून ते उपादान कारण आहेत. त्यामध्ये स्वयंपाकीण बाईचा विचार व हातादिकांचा व्यापार त्यामध्ये निमित्त आहे.

द्रव्य स्वभावाने सत् –

ज्याप्रमाणे द्रव्य स्वभावसिद्ध आहे त्याप्रमाणे त्याचे अस्तित्वसुद्धा स्वभावसिद्ध आहे. द्रव्य व द्रव्याची सत्ता वेगवेगळे नाहीत. द्रव्याहून भिन्न सत्ता नाही. कोणी असे म्हणतात की द्रव्य वेगळे आहे व सत्ता नावाचा पदार्थ वेगळा आहे. त्या दोघांचा समवाय संबंध झाल्यामुळे द्रव्य सत्तावान् आहे, परंतु असे नाही. द्रव्यापासून सत्ता वेगळी नाही. सत्ता हा द्रव्याचाच गुण आहे. संबंध दोन प्रकारचा आहे १) युतसिद्ध २) अयुतसिद्ध. ज्याचे प्रदेश वेगळे आहेत अशा वेगळ्या वस्तूंचा संबंध युतसिद्धत्व होय. जसे दंडदंडी संबंध, टोपी व टोपीवाल्याचा संबंध. जसा काठीचा पुरुषांशी संयोग झाल्यावर पुरुषाला काठीवाला म्हणतात. तसा द्रव्याशी सत्तेचा संयोग झाल्यावर द्रव्याला सत् म्हणतात, असे म्हणणे योग्य नाही. कारण ज्याप्रमाणे काठी व पुरुष भिन्न असल्यामुळे त्यांच्यामध्ये युतसिद्धपणा आहे त्याप्रमाणे द्रव्य व सत्ता भिन्न नाहीत ते एकच आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये युतसिद्धपणा नाही. जे पृथक् आहेत परंतु त्यांना पृथक् करता येत नाही अशा अवयव–अवयवी, गुण–गुणी, क्रिया–क्रियावान् यांच्यामधील संबंधाला अयुतसिद्ध संबंध म्हणतात. जसे नैयायिक मतवादी गुण व द्रव्य यांचा संबंध अयुतसिद्ध मानतात. गुण–गुणी, भिन्न पदार्थ नाहीत त्यामुळे त्यांच्यामध्ये अयुतसिद्ध मानणे योग्य नाही. त्यांच्यामध्ये तादात्म्य संबंध आहे. पूर्वी वेगळे होते नंतर ते जोडले गेले असे नाही.

'यामध्ये हे आहे' या प्रतीतीमुळे द्रव्य आणि सत्ता या दोहोंमध्ये

भिन्नपदार्थपणा सिद्ध होतो, जसे डब्यामध्ये तेल आहे, टोपलीमध्ये आंबे आहेत अशी जेथे प्रतीती होते तेथे डबा व तेल, टोपली व आंबे भिन्न भिन्न सिद्ध होतात. तसे येथे द्रव्यामध्ये सत्ता आहे अशी प्रतीती होत असल्यामुळे द्रव्य व सत्ता भिन्न सिद्ध होतात. असे कोणी मानत असेल तर आचार्य त्यांना प्रश्न विचारतात की 'यामध्ये हे आहे' अशी प्रतीती कोणत्या कारणामुळे होते. भेदामुळे अशी प्रतीती होते असे म्हणाल तर भेद कोणता? तो भेद प्रादेशिक आहे की अताद्भाविक आहे ? ज्या दोन वस्तूमध्ये प्रदेश भेद असतो त्याला प्रादेशिक भेद म्हणतात. जसे टोपी व टोपीवाला यामध्ये प्रादेशिक भेद आहे. टोपीचे प्रदेश भिन्न आहेत व टोपीवाल्याचे प्रदेश भिन्न आहेत म्हणून त्यामध्ये प्रादेशिक भेद आहे. त्याप्रमाणे द्रव्य व सत्तागुण या दोघांचे प्रदेश भिन्न नाहीत ज्या प्रदेशात द्रव्य आहे त्या प्रदेशातच त्याची सत्ता पण आहे म्हणून त्या दोघांमध्ये प्रादेशिक भेद नाही.

प्रदेश भेद नसताना 'ते हे नाही' अशी जेथे प्रतीती होते तेथे अताद्भाविक भेद असतो. जसे आंबा व त्याचा रस यामध्ये प्रदेशभेद नाही, परंतु जो आंबा आहे तो रसगुण नाही व जो रसगुण आहे तो आंबा नाही असा त्यामध्ये स्वरूपभेद प्रतीतीला येतो म्हणून त्या दोहोमध्ये अताद्भाविक भेद आहे, सुवर्ण व सुवर्णत्व, पांढरा वर्ण व पांढरेपणा, समुद्र व लाटा यामध्ये अताद्भाविक भेद आहे. परंतु अताद्भाविक भेद एकान्ताने 'यामध्ये हे आहे' या प्रतीतीला कारण नाही. कारण तो स्वयं उन्मग्न (प्रगट होणे) व निमग्न (प्रगट न होणे, गौण होणे) होतो.

जशी दृष्टी तशी सृष्टी–

पदार्थांकडे पाहणाऱ्या दोन दृष्टी आहेत – १) भेददृष्टी व २) अभेददृष्टी, यालाच पर्यायदृष्टी व द्रव्यदृष्टी म्हणतात. जेव्हा द्रव्य व सत्ता याकडे भेददृष्टीने (पर्यायदृष्टीने) पाहतो तेव्हा द्रव्य व पर्याय यामध्ये भेद दिसतो. द्रव्यामध्ये सत्ता आहे, हा पदार्थ गुणवान आहे, हा याचा गुण आहे. असा भेद प्रगट होतो.परंतु जेव्हा अभेददृष्टीने (द्रव्यरूपाने) वस्तूकडे पाहिले जाते तेव्हा भेद गौण होतो. एक द्रव्यच प्रतीतीला येते. द्रव्य स्वयं सत्रूप दिसते. पांढऱ्या वस्त्राकडे भेददृष्टीने पाहिले जाते. तेव्हा हे वस्त्र आहे व त्याचा हा पांढरा गुण आहे असा भेद दिसतो. जेव्हा त्याकडे अभेददृष्टीने पाहतो तेव्हा स्वयं वस्त्रच पांढरे किंवा पांढरे वस्त्र दिसते. त्यातला भेद गौण होऊन जातो. आपण समुद्राच्या किनाऱ्याला बसतो तेव्हा समुद्राला दोन दृष्टीने पाहू शकतो.

समुद्रामध्ये मोठमोठ्या लाटा उठतात. त्या लाटांकडे पाहतो तेव्हा समुद्रामध्ये किती उंचउंच लाटा उठत आहेत. अशाप्रकारे समुद्र व लाटा यामध्ये भेद दिसतो. जेव्हा एक विशाल समुद्राकडे पाहतो तेव्हा त्यामध्ये लाटा असल्या तरी त्या गौण होतात व एक समुद्रच दिसतो. समुद्र व लाटा यामध्ये एका अपेक्षेने भेद आहे व एका अपेक्षेने अभेद आहे. समुद्र व लाटा यांच्यामध्ये प्रदेश अपेक्षेने भेद नाही. परंतु समुद्र शब्दाचा अर्थ वेगळा आहे व लाटा या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. एक विशाल पाण्याचा साठा म्हणजेच समुद्र आहे व लाटा त्यामध्ये उठणारे क्षणिक तरंग आहेत.

त्याप्रमाणे द्रव्य व सत्ता याकडे भेददृष्टीने पाहिले तर द्रव्यामध्ये सत्ता आहे असा भेद दिसतो व अभेददृष्टीने पाहिले तर भेद गौण होऊन एक द्रव्यच दिसते. द्रव्य व सत्ता यामध्ये प्रदेश अपेक्षेने भेद नाही, परंतु जे द्रव्य आहे ती सत्ता नाही, जी सत्ता आहे ते द्रव्य नाही. द्रव्य गुणी आहे व सत्ता त्याचा गुण आहे.

जेव्हा भेद गौण होतो तेव्हा त्यानिमित्ताने होणारी भेदप्रतीती सुद्धा गौण होते. ती प्रतीती गौण होते तेव्हा भिन्न द्रव्यपणाही गौण होतो, तेव्हा ते सर्व संपूर्णरूपाने एक द्रव्यच दृष्टीमध्ये येते. हे द्रव्य आहे हा गुण आहे असा भेद दृष्टीत येत नाही. तेव्हा गुण, पर्याय सर्व एक द्रव्यरूपानेच भासित होतात.

ज्यावेळी आपण वस्त्र खरेदी करायला जातो तेव्हा त्या वस्त्राची परीक्षा करताना भेदाकडे दृष्टी असते. हे वस्त्र पांढरे आहे, जाड आहे किंवा पातळ आहे, सूती आहे इत्यादी भेद प्रतीतीला येतो. ते वस्त्र खरेदी करून जेव्हा ते परिधान करतो तेव्हा त्या एका वस्त्राकडे दृष्टी जाते तेव्हा सर्व भेद गौण होतात व एक वस्त्रपणाचा अनुभव होतो. त्याप्रमाणे जेव्हा द्रव्याचे स्वरूप समजून घेतो तेव्हा हे द्रव्य आहे, हे त्याचे गुण आहेत असा भेद प्रतीतीला येतो. पण जेव्हा एका द्रव्याकडे दृष्टी असते तेव्हा गुण गौण होतात व सर्व एक अभेद द्रव्यरूपानेच प्रतीती होते. अखंड रूपाने एका द्रव्याचा अनुभव होतो. जशी दृष्टी तशी सृष्टी.

एकदा अकबर बादशहाने बीरबलाला विचारले 'या शहरात सज्जन किती आहेत व दुर्जन किती आहेत' ? तेव्हा बीरबलाने उत्तर दिले 'जेवढे सज्जन आहेत तेवढेच दुर्जन आहेत.' बादशहाने विचारले 'हे कसे काय शक्य आहे' तेव्हा बीरबल म्हणाला, 'मी सिद्ध करून दाखवतो.' त्याने एकसारखे दोन चित्र बनविले. एक चित्र प्रथम चौकामध्ये लावले व त्या चित्राच्याखाली एक सूचना लिहिली की यातील जो भाग खराब वाटेल तेथे खूण करा. जे पाहायला येतील

त्यातील कोणी हातावर खूण केली, कोणी पायावर तर कोणी मानेवर, कोणी कमरेवर खूण केली अशाप्रकारे सर्व चित्र खूणांनी भरले. दुसऱ्या दिवशी तशाच प्रकारचे दुसरे चित्र चौकामध्ये टांगले व त्याच्या खाली सूचना लिहिली, ज्याला जे चांगले वाटेल तेथे खूण करा. जे पाहायला येतील त्यातील कोणी हातावर, कोणी पायावर खूण केली अशाप्रकारे सर्व चित्र खूणांनी भरले. बीरबल अकबराकडे ती दोन्ही चित्रे घेऊन गेला व म्हणाला, 'महाराज! पहा येथे सर्वजण दोष पाहणारे ही आहेत व गुण पाहणारेही आहेत. ज्यावेळी ज्या दृष्टीने वस्तूकडे पाहतो तेव्हा तशी वस्तू दिसते. वस्तूमध्ये भेद व अभेद दोन्ही धर्म आहेत. भेददृष्टीने पाहिले तर भेद दिसतो. अभेद दृष्टीने पाहिले तर अभेद दिसतो.

या सर्वाचे तात्पर्य हे की द्रव्य व सत्ता यामध्ये स्वरूपभेद असला तरी प्रदेशभेद नाही. द्रव्य स्वयं सत् आहे. सत्तागुणाच्या समवायाने द्रव्य सत्‌रूप झाले असे नाही. द्रव्य स्वभावाने सत् आहे. सत् कोणत्या दुसऱ्या साधनाने उत्पन्न झाले नाही. द्रव्यामध्ये उत्पाद, व्यय व ध्रौव्यसुद्धा दुसऱ्या साधनाच्या अपेक्षेने झाले नाहीत. द्रव्याचा हा स्वभावच आहे. यालाच स्वतंत्रता म्हणतात. वस्तूमध्ये असणारे सामान्य व विशेष गुण स्वयं परिणमन करतात. ही स्वतंत्रता वस्तूचा स्वयंसिद्ध अधिकार आहे.

मिथ्यात्व महारोगला दूर करण्याचे उत्कृष्ट औषध –

जो वस्तूच्या स्वयंसिद्ध स्वरूपाला जाणत नाही, मानत नाही तो अज्ञानी मिथ्यादृष्टी आहे. सत्तेच्या समवायाने सत् मानणारे वैशेषिक परमतवादी फक्त मिथ्यादृष्टी आहेत असे नाही. जर स्वत:ला जैन म्हणवून घेऊन सुद्धा जर वैशेषिकासारखी मान्यता असेल तर तो सुद्धा वैशेषिक आहे. आपली अंतरंगातील मान्यता तपासून पहा. मातापिता आहेत म्हणून माझी सत्ता आहे. माझ्यामुळे मुलाबाळांची सत्ता आहे. स्त्री, पुत्र, मित्र, घर, धन, ऐश्वर्य यांच्या संयोगाने आम्ही आपले अस्तित्व मानत असू व यांचा नाश झाला की माझा नाश झाला असे जर वाटत असेल तर निश्चितपणे आपल्यामध्ये अज्ञान आहे. मिथ्यात्व आहे. काही जीवांमध्ये एवढा गहन अज्ञान अंधार व्याप्त असतो की परवस्तूंचा वियोग झाला की स्वत:चा आत्मघात करून घेतात. मिथ्यात्व हा सगळ्यात मोठा रोग आहे. आगमाच्या अभ्यासाने जर आपल्यामध्ये हा रोग आहे हे लक्षात आले तर याचा लवकर उपाय करणे योग्य आहे नाहीतर पुन्हा

अनंतकाळापर्यंत या रोगातून मुक्त होणे शक्य नाही. जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेले '**द्रव्य स्वभावसिद्ध आहे, द्रव्याचे अस्तित्व सुद्धा स्वभावसिद्ध आहे.**' **हे औषध जर आपण श्रद्धापूर्वक सेवन केले तर हा मिथ्यात्व रूपी महारोग दूर व्हायला वेळ लागणार नाही.** या महारोगाला दूर करून निरोग होण्याची संधी या भवात सहज मिळाली आहे ती व्यर्थ दवडू नये.

जगातील सर्व द्रव्ये स्वयंसिद्ध आहेत. मी सुद्धा एक जीवद्रव्य आहे म्हणून मी स्वयंसिद्ध आहे. परद्रव्यामुळे माझे अस्तित्व नाही. माझ्यामुळे परद्रव्याचे अस्तित्व नाही. मी स्वतंत्र आहे व परद्रव्य स्वतंत्र आहे. अशी जीवनस्वातंत्र्याची कला या गाथेमध्ये आचार्यांनी शिकविली आहे. ही कला ज्याला समजली तोच सम्यग्दृष्टी आहे, स्वसमय आहे तोच खरा जैन आहे. म्हणून स्वत:ला स्वयंसिद्ध ज्ञाता-द्रष्टा जीवद्रव्य जाणून त्याचाच अनुभव करण्यामध्ये लीन व्हावे.

सामान्य द्रव्याची सिद्धी करताना सत् हे द्रव्याचे लक्षण सांगितले आहे. द्रव्य सत् का आहे ? दुसऱ्या कोणाच्या अपेक्षेने द्रव्य सत् आहे का ? कारण अज्ञानी प्रत्येक वस्तूच्या स्वतन्त्र अस्तित्वाला न जाणता वस्तूला पराधीन मानतो. परवस्तूवर आपले अस्तित्व मानतो व आपल्यामुळे दुसऱ्याचे अस्तित्व मानतो. शरीर आहे म्हणून मी आहे. मी आहे म्हणून शरीर आहे. या अज्ञानीच्या मान्यतेचे निराकरण करण्यासाठी आचार्य येथे सांगतात की द्रव्य स्वभावामध्ये स्थित आहे म्हणून त्याचे अस्तित्व आहे. ते अस्तित्व उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूपाने आहे. द्रव्यामध्ये उत्पाद-व्यय झाला तरी द्रव्य सत् आहे.-

सदवट्ठिदं सहावे दव्वं दव्वस्स जो हि परिणामो ।
अत्थेसु सो सहावो ठिदिसंभवणाससंबद्धो ।।९९।।

अन्वयार्थ- (सहावे अवट्ठिदं दव्वं सद्) स्वभावामध्ये अवस्थित द्रव्य सत् आहे. **(हि)** निश्चयाने **(दव्वस्स)** द्रव्याचा **(ठिदिसंभवणाससंबद्धो जो परिणामो)** स्थिती, उत्पाद व नाश याने युक्त जो परिणाम आहे, **(सो)** तो **(अत्थेसु)** पदार्थांचा **(सहावो)** स्वभाव आहे.

तात्पर्य – द्रव्य स्वयं स्वभावामध्ये अवस्थित असल्यामुळे 'सत्' आहे आणि उत्पादव्ययध्रौव्यामधील एकतारूप परिणाम हा द्रव्याचा स्वभाव आहे.

स्वभावामध्ये अवस्थित द्रव्य सत्-

स्वभावामध्ये अवस्थित जे द्रव्य आहे ते सत् आहे. सत् असल्यामुळे

स्वभावामध्ये स्थित आहे आणि स्वभावामध्ये स्थित असल्यामुळे सत् आहे. प्रत्येक वस्तू आपल्या स्वभावामध्ये स्थित आहे म्हणून तिचे अस्तित्व टिकून आहे. जर ती स्वभावामध्ये राहिली नाही तर तिचे अस्तित्व कोणत्या रूपाने राहणार. जर साखर गोड राहिली नाही तर साखरेचे अस्तित्वच राहणार नाही, जर अग्नी उष्ण राहिली नाही तर तिला अग्नी कोण म्हणणार ? जीव ज्ञानस्वरूप राहिला नाही तर जीवरूपाने त्याचे अस्तित्व राहणार नाही. साखर गोड आहे म्हणून त्याचे अस्तित्व आहे, अग्नी उष्ण आहे म्हणून ती आहे. जीव ज्ञानस्वरूप आहे म्हणून तो जीव आहे. भलेही अज्ञानी वस्तूला स्वभावामध्ये स्थित जाणत नाही. तरीपण वस्तू स्वभावामध्ये राहणे सोडत नाही. अज्ञानी जीवाला शरीर, धन, स्त्री, पुत्र, मित्रादिकांमध्ये स्थित मानतो व शरीर, स्त्री, पुत्रादिकांना आपल्यामध्ये स्थित मानतो. जीवाला पुद्गलाच्या स्पर्शरसगंधवर्ण स्वभावामध्ये स्थित मानतो पण जीव शरीरादिकामध्ये किंवा त्याच्या स्पर्शादिस्वभावामध्ये नाही. जीव त्यामध्ये स्थित होईल तर त्या जीवाचे अस्तित्वच राहणार नाही. ज्याअर्थी जीव आहे त्या अर्थी तो आपल्या चैतन्य स्वभावामध्येच स्थित आहे.

द्रव्याचा स्वभाव उत्पादव्ययध्रौव्यात्मक परिणाम–

द्रव्य परिणामस्वभावी आहे म्हणून द्रव्य निरन्तर परिणमनशील आहे. द्रव्याचा प्रत्येक परिणाम उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप आहे. नवीन अवस्था उत्पन्न होणे. जुनी अवस्था नष्ट होणे व त्यामध्ये अन्वयरूपाने राहणे हा वस्तूचा परिणाम स्वभाव आहे. जेथे परिणाम तेथे उत्पादव्ययध्रौव्य आहेच, व जेथे उत्पादव्ययध्रौव्य तेथे परिणाम आहेच. द्रव्य सदैव परिणमन करीत कधीही थकत नाही. एखादा क्षणसुद्धा परिणाम थांबत नाही. वस्तूमध्ये प्रवाहरूपाने परिणमन नित्य घडते. जसा घडाळ्याचा सेकंद काटा सदैव फिरत असतो. काटा थांबला की ते घड्याळ राहत नाही. तशी वस्तू परिणमायची थांबली तर ती वस्तूच संपली. वस्तूचे अस्तित्व परिणाम स्वभावामुळे टिकून आहे. वस्तू थांबत पण नाही व दुसऱ्या रूपाने सुद्धा परिणमत नाही. आपल्या स्वभावरूपानेच राहते आणि ध्रौव्यरूप राहून सुद्धा परिणमन होते. वस्तू उत्पादव्ययध्रौव्यरूप त्रिलक्षणात्मक आहे.

वस्तुविभाग–

वस्तूमध्ये दोन विभाग केले आहेत. १) विस्तार (प्रदेश) २) लांबी (प्रवाह). वस्तूचा एकाचवेळी असणारा प्रदेशसमूह हा वस्तूचा विस्तार आहे.

व कालक्रमाने होणारी परिणाममालिका हा प्रवाह (लांबी) आहे. विस्तारातील सूक्ष्मातिसूक्ष्म अविभागी अंश म्हणजे प्रदेश व प्रवाहक्रमातील सूक्ष्मातिसूक्ष्म अविभागी अंश म्हणजे परिणाम होय.

ज्याप्रमाणे वस्तू एक अखंड प्रदेशात्मक असताना ही त्यामध्ये विस्तारक्रम आहे. अर्थात् अनेक प्रदेश आहेत. त्या विस्तारक्रमातील सर्वात लहान अंशाला प्रदेश म्हणतात. त्याप्रमाणे वस्तू एक अखंड प्रवाहात्मक असूनही त्यामध्ये प्रवाहक्रम आहे. त्यातील लहान अंशाला परिणाम (पर्याय) म्हणतात. ज्याप्रमाणे प्रदेशांच्या परस्पर भेदाला कारण विस्तारक्रम आहे अर्थात् पहिला प्रदेश दुसरा प्रदेश नाही. दुसरा प्रदेश पहिला प्रदेश नाही. त्याप्रमाणे परिणामांच्या परस्पर भेदाला कारण प्रवाहक्रम आहे. जेथे क्रम असतो तेथे परस्पर भेद असतोच. ज्याप्रमाणे तिकिट काढण्यासाठी माणसांची रांग उभी असते तेथे क्रम असतो. एका ओळीत क्रमाने मनुष्य उभे असतात. त्यांच्यामध्ये परस्पर भेद आहे. त्याप्रमाणे अभिन्न एका वस्तूमध्ये सुद्धा विवक्षेने जो क्रम स्थापित केला जातो तेथे सुद्धा कथंचित् भेद आहे. प्रदेशांमधील परस्पर भेदामुळे विस्तारक्रम झाला आणि परिणामामधील परस्पर भेदामुळे प्रवाहक्रम झाला. कोणताही पदार्थ विस्तारूप व प्रवाहरूप असतोच. ज्याप्रमाणे मूळ बुंधा, फांद्या, डहाळ्या , पाने, फुले हा झाडाचा एकावेळी असणारा विस्तार आहे व बीज, अंकुर, वृक्ष हा कालक्रमाने होणारा प्रवाह आहे. आत्म्याचे लोकाकाशाइतके असंख्यात प्रदेश हा त्याचा विस्तार आहे व नारक, तिर्यंच, मनुष्य, देव पर्याय हा प्रवाह आहे.

प्रत्येक द्रव्य प्रदेशात्मक व गुणात्मक आहे. प्रदेश नित्य आहेत आणि गुणसुद्धा नित्य आहेत. येथे आचार्यांनी वस्तूला (वास्तूची) घराची उपमा देऊन वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे घराची जागा ५०/५० फूट असते. त्याप्रमाणे वस्तूचे प्रदेश हेच त्याचे क्षेत्र आहे. घर एक असूनही घरामध्ये जे स्वयंपाक घर आहे, ती झोपण्याची खोली नाही. जी झोपण्याची खोली आहे, ते स्वयंपाकघर नाही. एका स्वयंपाकघरात सुद्धा जी उजव्या कोपऱ्यातील जागा आहे ती डाव्या कोपऱ्यातील जागा नाही. त्याप्रमाणे द्रव्यामध्ये एकत्व असूनही त्यामध्ये कथंचित् प्रदेशभेद आहे. जीवाचे डोक्याजवळ असणारे प्रदेश हाताजवळचे नाहीत. हाताजवळचे प्रदेश पायाजवळचे नाहीत अशाप्रकारे त्यामध्ये परस्पर भेद आहे. जसा वस्तूमध्ये प्रदेशभेद आहे तसा त्यामध्ये परिणामभेद पण आहे.

जसे १ वर्षापूर्वी घर नवीन होते. एका वर्षानंतर ते थोडे जुने झाले. तशी द्रव्याची कालची अवस्था आज नाही. त्यामध्ये बदल घडला अशाप्रकारे परिणामामध्ये परस्परभेद आहे.

परिणाम उत्पादव्ययध्रौव्यात्मक–

ज्याप्रमाणे वस्तूच्या कोणत्याही एका प्रदेशाला सोडून दुसऱ्या प्रदेशावर आलो तेथे तो दुसरा प्रदेश. आपल्या स्थानी पूर्व प्रदेशाचा अभाव झाला म्हणून व्ययरूप आहे, दुसऱ्या प्रदेशाचा उत्पाद झाला म्हणून उत्पादरूप आहे. दोन्हीमध्ये अन्वयरूपाने एकच द्रव्य आहे, त्या अपेक्षेने ध्रौव्यरूप आहे. त्याप्रमाणे वस्तूच्या परिणाम मालिकेतील कोणताही एक परिणाम आपल्या पूर्व परिणामाच्या अपेक्षेने व्ययरूप आहे. स्वरूपाने तो उत्पादरूप आहे व सर्व परिणामांमध्ये व्यापून असणाऱ्या अन्वयामुळे (तोच तोचपणा) ध्रौव्यरूप आहे. ज्याप्रमाणे सोन्याची अंगठी मोडून कानातील रिंग केली तर तो रिंगरूप परिणाम अंगठीचा नाश होऊन झालेला आहे, म्हणून त्या अपेक्षेन तो व्ययरूप आहे. रिंग उत्पन्न झाली या अपेक्षेने उत्पादरूप आहे व सुवर्णपणा त्यामध्ये आहेच म्हणून ध्रुवरूप आहे. गोरसाचा दहीरूप परिणाम दूध अपेक्षेने नाशरूप आहे, दही अपेक्षेने उत्पादरूप आहे व गोरस अपेक्षेने ध्रुवरूप आहे. जीवाचा अरिहंत पर्याय बाराव्या गुणस्थानातील स्वसंवेदन पर्यायाचा नाश झाला म्हणून व्ययरूप आहे. अनन्तचतुष्टयरूप अरिहंत पर्यायाचा उत्पाद झाला म्हणून उत्पादरूप आहे व जीवत्व आहे म्हणून ध्रौव्य आहे. अशाप्रकारे पर्यायार्थिक नयाने द्रव्याचा प्रत्येक परिणाम स्वरूपाने उत्पाद, पूर्वरूपाने व्यय आणि द्रव्यरूपाने ध्रौव्यरूप आहे. विस्तारामध्ये स्थानाच्या अपेक्षेने उत्तर प्रदेश, पूर्व प्रदेश व अन्वयरूप द्रव्य या अपेक्षेने प्रत्येक प्रदेश उत्पादव्ययध्रौव्यस्वरूपाचा आहे तर प्रवाहक्रमात आपल्या काळात उत्तर परिणाम, पूर्वपरिणाम व अन्वयरूप द्रव्य या अपेक्षेने प्रत्येक परिणाम उत्पादव्ययध्रौव्यरूप आहे.

उत्पादव्ययध्रौव्याची एकात्मकता–

उत्पाद, व्यय व ध्रौव्य असे तीन परिणाम भिन्न–भिन्न नाहीत. एकच परिणाम तीन स्वरूप आहे. ज्याप्रमाणे विस्तारामध्ये वस्तूचा जो प्रदेश पूर्वप्रदेशाच्या नाशरूप आहे, तोच प्रदेश स्व अपेक्षेने उत्पादाचा आहे आणि तोच परस्पर अन्वयरूप एक वस्तूरूपाने ध्रौव्यरूप आहे. उत्पादरूप प्रदेश वेगळा, व्ययरूप प्रदेश वेगळा व ध्रौव्यरूप प्रदेश वेगळा असे नाही. त्याप्रमाणे

प्रवाह क्रमातील वस्तूचा जो परिणाम पूर्व परिणामाच्या नाशरूप आहे तोच उत्तर परिणामाच्या अपेक्षेने उत्पादरूप आहे व तोच एक अन्वयरूपाने ध्रौव्यरूप आहे. उत्पादरूप परिणाम वेगळा, व्ययरूप परिणाम वेगळा व ध्रौव्यरूप परिणाम वेगळा असे नाही. जो अंगठीचा नाश आहे. तोच रिंगाचा उत्पाद आहे व तोच सोन्याचा ध्रौव्य आहे. अंगठीचा नाश वेगळीकडे, रिंगाचा उत्पाद वेगळीकडे झाला असे नाही. जो दुधाचा नाश आहे तोच दह्याचा उत्पाद आहे. तोच गोरसरूपाने ध्रौव्य आहे. मनुष्य मरून देव झाला तेथे जो मनुष्यपर्यायाचा नाश तोच देवपर्यायाचा उत्पाद आहे व तेच जीवाचे ध्रौव्य आहे.

अशाप्रकारे प्रत्येक वस्तू त्रिलक्षणात्मक परिणाम स्वभावाचे उल्लंघन करीत नसल्यामुळे त्रिलक्षणस्वरूप स्वीकारणे योग्य आहे. अमृतचन्द्र आचार्यांनी यासाठी मोत्याच्या माळेचे उदाहरण दिले आहे. ज्याप्रमाणे लटकणाऱ्या लांब मोत्याच्या माळेमध्ये सर्व मोती आपल्या स्थानी चमकत आहेत. त्यातील प्रत्येक मोती पूर्व मोत्याच्या अनुदयामुळे, उत्तरोत्तर मोत्यांच्या उदयामुळे आणि सर्वत्र अन्वयरूपाने राहणाऱ्या दोऱ्याच्या स्थितीमुळे त्रिलक्षणस्वरूप आहे. माळेमध्ये मोती क्रमाक्रमाने एका नंतर एक आहेत. प्रत्येक मोत्याचे स्थान निश्चित आहे. जर त्यांचे स्थान निश्चित नसेल तर हारच राहत नाही. मोत्याच्या माळेची चमक व शुभ्रपणा सर्वत्र व सर्वदा आहे. पण मोती मात्र एकानंतर एक क्रमाने आहेत. उत्तरोत्तर मोत्यांचा उदय व पूर्वपूर्व मोत्यांचा अनुदय व एक हारपणा यामुळे मोत्यांच्या माळेमध्ये उत्पादव्ययध्रौव्य हे लक्षण प्रगट होते. त्याप्रमाणे नित्य परिवर्तनशील द्रव्यामध्ये सर्वच परिणाम आपआपल्या स्थानी प्रगट आहेत. द्रव्यसुद्धा एक परिणामांची माळाच आहे. प्रत्येक परिणाम स्वकाळी आहे. एका परिणामाच्या जागी दुसरा परिणाम असत नाही. तेथे उत्तरोत्तर पर्यायाचा उत्पाद होतो. पूर्व-पूर्व पर्यायाचा व्यय होतो व सर्व पर्यायांमध्ये एक अन्वयरूप ध्रौव्य आहे. म्हणून सत् उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. पूर्वपर्यायाचा नाश म्हणजेच उत्तर पर्यायाचा उत्पाद आहे व उत्तर पर्यायाचा उत्पाद म्हणजेच पूर्वपर्यायाचा नाश आहे. जसे अंधकाराचा अभाव म्हणजेच प्रकाश आहे व प्रकाशाचा सद्भाव म्हणजेच अंधकाराचा अभाव आहे.

जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेला हा उत्पादव्ययध्रौव्याचा सिद्धान्त त्यांच्या सर्वज्ञतेला व्यक्त करतो असे आचार्य समन्तभद्र स्वामींनी

स्वयंभूस्तोत्रातील मुनिसुव्रत तीर्थंकरांच्या स्तुतीतील ४थ्या श्लोकात म्हटले आहे –

स्थितिजननिरोधलक्षणं चरमचरं च जगत्प्रतिक्षणम् ।
इति जिनसकलज्ञलाञ्छनं वचनमिदं वदतांवरस्य ते ।।१४।।

हे मुनिसुव्रत जिनेन्द्र , चेतन व अचेतनरूप संसार प्रत्येक क्षणी स्थिती (ध्रौव्य), जनन (उत्पाद) व निरोध (व्यय) रूप लक्षणाने युक्त आहे. अशाप्रकारचे वक्त्यांमध्ये श्रेष्ठ तुझे हे वचन तुझ्या सर्वज्ञतेचे चिन्ह आहे.

जो पदार्थ जसा सांगितला तो तसाच असणे हे ज्ञानाच्या प्रामाणिकतेचे लक्षण आहे. **पदार्थाचे यथार्थ कथन वक्त्याची श्रेष्ठता व ज्ञानसंपन्नता सूचित करते.** भगवंतांनी जे सांगितले की 'हे चराचर विश्व प्रत्येकक्षणी उत्पाद, व्यय व ध्रौव्याने युक्त आहे ते प्रत्यक्ष अनुभवात येते. म्हणून विसंवाद रहित भगवंतांचे वचन त्यांच्या श्रेष्ठ वक्तृत्वाला व सर्वज्ञतेला सूचित करते.

अभेदनयाने सत्ता एकरूप आहे व भेदनयाने तीच तीनरूप आहे. या कथनाने सुद्धा आचार्यांनी अनेकान्तमताचा गौरव सांगितला आहे. उत्पत्ती, विनाश, ध्रौव्य या तीन अवस्था पदार्थामध्ये एकाच समयात नित्यत्व आणि अनित्यला प्रकाशित करतात. पर्यायाचा नाश होणे व उत्पाद होणे अनित्यपणाला प्रकाशित करते व द्रव्याचे ध्रौव्यपण नित्यत्वाला प्रकाशित करते.

वस्तू सर्वथा नित्यच आहे असे मानले तर वस्तूमध्ये एक अवस्था नष्ट होऊन दुसरी अवस्था उत्पन्न होणार नाही. वस्तू सदा एकरूपच राहील. त्यामध्ये कोणताही विकार होणार नाही. वस्तूला सर्वथा अनित्य मानले तर पदार्थ क्षणाक्षणामध्ये पूर्ण नष्ट होईल. पदार्थ सर्वथा नष्ट झाला तर तीच ही वस्तू आहे. ज्याला पूर्वी पाहिले होते असे प्रत्यभिज्ञान उत्पन्न होणार नाही.

अकलंक नाटकामध्ये एक प्रसंग आहे. बौद्धांच्या नगरामध्ये एक सेठजी राहत होते. ते वस्तू सर्वथा क्षणिक मानत होते. एक गुराखी सेठजींच्या गायी रानात चारायला घेऊन जात असे. महिना पूर्ण झाल्यावर त्या गुराख्याने सेठजींना आपला पगार मागितला. अनित्यवादी सेठजी म्हणाले, 'ज्या गायी तू चारायला नेत होतास त्या गायी कुठे आहेत ? या गायी दुसऱ्या आहेत. व गायी चारायला नेणारा तू कोठे आहेस ? तू ही दुसरा आहेस.' गुराख्याला लक्षात आले की सेठजी आपला पगार चुकविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आता

यांनासुद्धा चालाकीनेच धडा शिकविला पाहिजे. त्यांनी सुद्धा युक्ती शोधून काढली व त्याने सर्व गायींना आपल्या घरात नेऊन बांधले. संध्याकाळी सेठजींच्या घरी गायी पोहचल्या नाहीत तर सेठजी चौकशी करण्यासाठी गुराख्याच्या घरी गेले व आपल्या गायी मागू लागले. गुराखी म्हणाला, 'ज्या गायी तुम्ही मला सोपविल्या होत्या त्या आता नाहीत. त्या तर संपल्या. या दुसऱ्या गायी आहेत. जो गुराखी होता तो सुद्धा संपला मी दुसरा गुराखी आहे.' हे ऐकून सेठजींनी विचार केला हजारो रूपयांच्या गायी हातच्या निघून चालल्या आहेत तेव्हा ते हात जोडून म्हणू लागले, 'नाही बाबा ! माझे चुकले. त्याच माझ्या गायी आहेत व तू सुद्धा तोच गुराखी आहेस, ज्यांना मी गायी सोपविल्या होत्या. म्हणून माझ्या गायी परत दे.' यावर गुराखी म्हणाला 'हो, या गायी त्याच आहेत व गुराखी ही मीच आहे तेव्हा माझा पगार येथे ठेवा तरच गायी मिळतील'. सेठजीनी विवश होऊन पगार देऊ केला व आपल्या गायी परत घेऊन गेले. तेव्हा त्यांना पदार्थ सर्वथा क्षणिक न मानण्याचा धडा मिळाला. म्हणून अनेकांत सिद्धान्तच योग्य आहे.

याद्वारेच प्रत्येक सत्तारूप पदार्थ पर्याय अपेक्षेने उत्पादव्ययरूप व गुण अपेक्षेने ध्रौव्यरूप सिद्ध होतो असाच सत्तेचा स्वभाव आहे. द्रव्य सत्‌रूप आहे व सत् उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप आहे.

ही गाथा जाणून जीवनात उपयोग–

द्रव्य स्वभावामध्ये अवस्थित आहे. म्हणून त्याची सत्ता आहे. मी सुद्धा एक जीवद्रव्य आहे. मी माझ्या चैतन्य स्वभावामध्ये अवस्थित आहे. म्हणून माझे अस्तित्व टिकून आहे. शरीरामध्ये मी अवस्थित आहे म्हणून माझी सत्ता नाही. कारण शरीर माझा स्वभाव नाही. स्त्री, पुत्र–मित्रामुळे माझी सत्ता नाही. धनामुळे माझी सत्ता नाही. शरीरादिकांचा नाश झाला तरी चैतन्यस्वभावामध्ये स्थित असल्यामुळे माझे अस्तित्व टिकून राहते. हे जाणल्यामुळे मरणभय संपते. पराधीनता नष्ट होते व स्वतन्त्रतेने जीवन जगण्याची कला अवगत होते.

आपली स्वसत्ता जाणून त्यामध्ये राहणे हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आहे.

प्रत्येक सत् उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप आहे. मी पण एक सत् आहे व शरीर, स्त्री, पुत्र, धनादिक स्वतंत्र सत् आहे त्यामुळे माझ्यात ही उत्पादव्यय ध्रौव्य आहे व त्या परवस्तूंमध्ये ही उत्पादव्ययध्रौव्य आहे. माझी अवस्था किंवा त्यांची अवस्था बदलली तर दुःखी होण्याचे कारण नाही. कारण नवीनचा

उत्पाद व जुन्याचा नाश हा सत्‌चा स्वभावच आहे तो होणारच. उत्पाद नाश झाला तरी मी टिकून आहे व त्या परवस्तू माझ्यापासून वियुक्त झाल्या तरी त्या कुठे ना कुठे तरी सुरक्षित आहेत त्यामुळे दुःख मानण्याचे कारण नाही.

उत्पादव्ययध्रौव्य सिद्धान्त जाणल्यामुळे विकारपर्यायाचा नाश होऊन अविकार पर्यायाचा उत्पाद माझ्यामध्ये होऊ शकतो अशी प्रेरणा मिळते. म्हणून स्वतःचा विकास करण्यासाठी ध्रुव चैतन्यस्वभावाकडे दृष्टी ठेवावी व सदैव त्याचे स्मरण, चिंतन व ध्यान करावे.

मागील गाथेमध्ये उत्पादव्ययध्रौव्यात्मक परिणाम पदार्थाचा स्वभाव आहे हे सांगितले आहे. अर्थात् प्रत्येक पदार्थ परिणामस्वभावी आहे व परिणाम उत्पादव्ययध्रौव्यरूप असतो. प्रत्येक वस्तू कायम असून बदलत आहे. आता या उत्पाद-व्यय-ध्रौव्यामध्ये परस्पर अविनाभाव दृढ करतात. अविनाभाव म्हणजे एकाशिवाय दुसरा नसणे. दोनपैकी एकाच्या अस्तित्वामुळे दुसऱ्याची सत्ता निश्चित होते व एकाच्या अभावामध्ये दुसऱ्याचा अभाव सुनिश्चित असतो. जसे धूर व अग्नी. जेथे धूर असेल तेथे अग्नीचे अस्तित्व निश्चित असते व अग्नीच्या अभावामध्ये धूराचा अभाव सुनिश्चित असतो. म्हणून धूराचा अग्नीबरोबर अविनाभाव संबंध आहे अर्थात अग्नी शिवाय धूर असत नाही म्हणून जेथे धूर आहे तेथे नियमाने अग्नी आहे, हे निश्चित होते. तसे उत्पाद, व्यय व ध्रौव्य यांचा परस्पर अविनाभाव आहे, हे पुढील गाथेत सिद्ध करतात.-

ण भवो भंगविहीणो भंगो व णत्थि संभवविहीणो ।
उप्पादो वि य भंगो ण विणा धोव्वेण अत्थेण ।।१००।।

अन्वयार्थ- (**भंगविहीणो भवो ण**) व्ययरहित उत्पाद नाही (**वा संभवविहीणो**) वा उत्पादरहित (**भंगो णत्थि**) व्यय नाही. (**धोव्वेण अत्थेण विणा**) ध्रुव अर्थाशिवाय (**उप्पादो विय भंगो ण**) उत्पाद आणि व्यय ही नाही.

तात्पर्य - वस्तूमध्ये उत्पाद व्यय ध्रौव्य परस्पर अविनाभावी आहे.

पदार्थामध्ये प्रत्येक समयात कोणती ना कोणती अवस्था होत राहते. एका अवस्थेकडे दृष्टी देऊन जर विचार केला तरी लक्षात येते की तेथे तिन्ही आहेतच. ज्या अवस्थेचा नाश होऊन दुसरी कोणती अवस्था झाली त्याचा तर नाश झाला. जी अवस्था उत्पन्न झाली त्याचा उत्पाद आहे आणि दोन्ही अवस्थांचा आधारभूत पदार्थ विद्यमान आहे तेच ध्रौव्य आहे. उत्पाद, व्यय

ध्रौव्याचाच येथे सृष्टी (निर्माण) संहार आणि स्थिती या शब्दाद्वारे उल्लेख केला आहे.

परमार्थाने संहाराशिवाय निर्माण नाही. निर्माणाशिवाय संहार नाही. स्थितिशिवाय निर्माण आणि संहार नाही. निर्माण व संहाराशिवाय स्थिती नाही. १) जी सृष्टी आहे तोच संहार आहे. जो संहार आहे तीच सृष्टी आहे. जो संहार व सृष्टी आहे तीच स्थिती आहे व जी स्थिती आहे तोच संहार व सृष्टी आहे.

संहाराशिवाय निर्माण नाही (उत्पादाशिवाय व्यय नाही)–

पूर्वपर्यायाचा नाश झाल्याशिवाय उत्तर पर्यायाची उत्पत्ती होत नाही. जो घटपर्यायाचा उत्पाद आहे तोच मातीच्या गोळ्याचा नाश आहे. कारण एकाचा सद्‌भाव दुसऱ्या भावाच्या अभावरूपाने प्रतीतीला येतो. मातीच्या गोळ्याचा नाश झाल्याशिवाय घटाची उत्पत्ती होऊ शकत नाही. घटपर्याय उत्पन्न झाला म्हणजे मातीचा गोळा आता राहिला नाही. कोणी इच्छा करेल की मातीची घागर फुटू नये आणि खापऱ्या मिळाव्यात हे होऊ शकत नाही. मातीची घागर फुटल्याशिवाय खापऱ्या उत्पन्न होऊ शकत नाहीत. घागर फुटल्यावर खापऱ्या नियमाने मिळतात. सम्यक्त्वाची उत्पत्ती म्हणजेच मिथ्यात्वाचा नाश आहे. प्रकाशाचा प्रादुर्भाव म्हणजेच अंधकाराचा अभाव आहे. कापड स्वच्छ झाले म्हणजेच त्याच्या मलिन अवस्थेचा नाश झाला. कारण मलिनतेचा नाश झाल्याशिवाय कापड स्वच्छ होऊ शकत नाही. ज्वारीच्या पीठाची भाकरी केली म्हणजेच आता ते पीठ राहिले नाही. पीठाचा अभाव झाल्याशिवाय भाकरी उत्पन्न होऊ शकत नाही. नवीन अवस्थेचा उत्पाद म्हणजेच जुन्या अवस्थेचा व्यय आहे. बोट वाकडे आहे म्हटले तर ते सरळ नाही हे सिद्ध होते. बोट सरळ आहे म्हटले तर ते वाकडे नाही हे सिद्ध होते, कारण एक भाव दुसऱ्या भावाच्या अभावरूपाने प्रतिभासित होतो. मुलगा तरूण झाला म्हणजेच तो आता बालक राहिला नाही. त्याच्या बालक अवस्थेचा अभाव झाला.

निर्माणाशिवाय संहार नाही–

जो मातीच्या गोळ्याचा नाश आहे तोच घटाचा उत्पाद आहे. कारण कोणताही अभाव दुसऱ्याच्या सद्‌भावरूपाने प्रतीतीला येतो. मिथ्यात्वभावाचा अभाव म्हणजेच सम्यक्त्वाचा उत्पाद आहे. मिथ्यात्व पर्यायाचा नाश तर झाला, पण जीवाला सम्यक्त्वच झाले नाही असे होऊ शकत नाही. वस्त्र स्वच्छ झाल्याशिवाय त्याच्या मलिनतेचा नाश होऊ शकत नाही. म्हणून

वस्त्राला स्वच्छ करण्याचा प्रयत्न करतो. आमच्यातले दोष नष्ट व्हावेत अशी सर्वांना इच्छा असते. परंतु गुणांचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय दोषांचा नाश कसा होणार ? त्यासाठी गुणी बनले पाहिजे. गुण उत्पन्न झाले की दोष राहूच शकत नाहीत. बालक अवस्थेचा अभाव झाला म्हणजेच तरूण अवस्थेचा सद्भाव झाला. गृहस्थ अवस्थेचा त्याग केला म्हणजेच तो मुनी झाला. मुनी अवस्था उत्पन्न झाल्याशिवाय गृहस्थ अवस्थेचा अभाव होऊ शकत नाही. संसार अवस्थेचा नाश म्हणजेच सिद्ध अवस्थेचा उत्पाद आहे. कारण सिद्ध पर्याय उत्पन्न झाल्याशिवाय संसार अवस्थेचा नाश म्हटला जात नाही. याप्रमाणे उत्पादाशिवाय व्यय नाही व व्ययाशिवाय उत्पाद नाही. दोघे परस्पर अविनाभावी आहेत.

स्थितीशिवाय निर्माण व संहार नाही–

जो निर्माण किंवा संहार होतो तो स्थिर पदार्थाच्या आश्रयानेच होतो. मातीच्या घागरीचा जो उत्पाद झाला व मातीच्या गोळ्याचा नाश झाला तीच मातीची स्थिती आहे. कारण व्यतिरेक मुखानेच अन्वय प्रकाशित होत असतो. जे स्थायी तत्त्व आहे अथवा जो सर्वांमध्ये व्यापून असतो तो अन्वय, व जो सर्वांमध्ये न राहता भिन्न भिन्न एकामध्येच असतो तो व्यतिरेक होय. घागर व पिण्ड हे पर्याय व्यतिरेक रूप, सर्वांमध्ये व्यापून असणारी माती अन्वयरूप आहे. पर्यायांमध्ये द्रव्य आहे व द्रव्यामध्ये पर्याय आहेत. अन्वय व्यतिरेकाला सोडून नाही व व्यतिरेक अन्वयाला सोडून नाही. व्यतिरेकाद्वारेच अन्वय लक्षात येतो. अन्वय कोणत्या ना कोणत्या पर्यायरूपामध्ये विद्यमान असतो. जी माती पिण्डरूपाने होती तीच माती घागररूपाने होते. मातीपणाची स्थिती असल्याशिवाय पिण्डपर्यायाचा नाश व घटपर्यायाचा उत्पाद होऊ शकत नाही.

जीवत्वाच्या स्थितीशिवाय संसारपर्यायाचा नाश व मोक्षपर्यायाचा उत्पाद होऊ शकत नाही. वस्त्रपणाच्या अन्वयाशिवाय मलिनपर्यायाचा नाश व स्वच्छ पर्यायाचा उत्पाद होऊ शकत नाही.

मिथ्यादर्शनपर्यायाचा नाश व सम्यग्दर्शनपर्यायाचा उत्पाद यामध्ये श्रद्धा गुण अन्वयरूपाने विद्यमान आहे. श्रद्धागुण या दोन पर्यायरूपाने प्रकाशित होतो. जी मातीची स्थिती आहे तोच घटपर्यायाचा उत्पाद व पिण्डपर्यायाचा नाश आहे. कारण व्यतिरेक अन्वयाचे उल्लंघन करीत नाही. जेथे अन्वय आहे तेथेच व्यतिरेक असतो. पर्याय ध्रौव्याला सोडून राहत नाहीत.

उत्पादव्ययाशिवाय स्थिती नाही.–

व्यतिरेकामध्येच अन्वय अनुस्यूत असतो. ज्याप्रमाणे दोऱ्यामध्ये सर्व मणी ओवलेले असतात. दोरा त्या सर्व मण्यांमध्ये अन्वयरूपाने स्थित आहे. अन्वया(ध्रौव्या)मध्ये सर्व व्यतिरेक स्थित आहेत व सर्व व्यतिरेकांमध्ये अन्वय स्थित आहे.

संसारपर्याय व मोक्षपर्यायामध्ये जीवत्व अवस्थित आहे. मलिनपर्याय व स्वच्छपर्यायामध्ये वस्त्रपणा अवस्थित आहे. दोन्ही पर्यायांनी वस्त्रपणाचे उल्लंघन केले नाही.

स्वतंत्र उत्पाद मानण्याने दोषोद्भव–

उत्पादव्ययध्रौव्यामध्ये परस्पर अविनाभाव स्वीकारला नाही तर उत्पाद वेगळा, व्यय वेगळा व ध्रौव्य वेगळे असे मानावे लागेल. तसे मानले तर केवळ उत्पाद मानणाऱ्याला दोन दोष उत्पन्न होतात.

प्रथम दोष – घटाच्या उपादान कारणाचा अभाव झाल्यामुळे घटाची उत्पत्ती होणार नाही. कारण पूर्वपर्यायाचा नाश उत्तर पर्यायाच्या उत्पत्तीचे कारण आहे. समन्तभद्र आचार्यांनी आप्तमीमांसा ग्रंथामध्ये म्हटले आहे.–

कार्योत्पादः क्षयो हेतोर्नियमाल्लक्षणात्पृथक् ।
न तौ जात्याद्यवस्थानादनपेक्षाः खपुष्पवत् ।।

जो कार्याचा उत्पाद होतो तो नियमाने आपल्या उपादान कारणाचा क्षय करूनच होतो. नाश आणि उत्पाद आपापल्या लक्षणाने भिन्न-भिन्न आहेत परंतु जाती अर्थात् सत्तारूप द्रव्याच्या अपेक्षेने दोन्हीं भिन्न नाहीत. एका रूपाचे रूपान्तर झाले आहे. जर यांना एक दुसऱ्याच्या अपेक्षेशिवाय स्वतंत्र मानले तर हे उत्पादव्ययध्रौव्य तिन्हीं आकाशफुलांप्रमाणे होतील अर्थात् काहीच राहणार नाही.

पूर्वपर्याय विशिष्ट द्रव्य उपादान कारण आहे व उत्तरपर्यायविशिष्ट द्रव्य कार्य आहे. जर उत्पाद व्यय स्वतंत्र मानले तर उत्पादाच्या कारणाचा अभाव झाल्यामुळे उत्पादच होणार नाही.

घटाची उत्पत्ती झाली नाही तर सर्वच भावांची उत्पत्ती होऊ शकणार नाही. फुलांची, फळांची उत्पत्ती होणार नाही. स्वयंपाकच तयार होऊ शकणार नाही. असे झाले तर आपल्याला उपाशीच रहावे लागेल. सुखाची पण उत्पत्ती

होऊ शकणार नाही. जगामध्ये कोणतेच कार्य घडू शकणार नाही.

दुसरा दोष– केवळ उत्पाद स्वतंत्र मानला तर असत्‌चा उत्पाद मानावा लागेल.अस्तित्वात नसलेल्या वस्तूसुद्धा नवीन उत्पन्न व्हायला लागतील. आकाशफूल, गाढवाला शिंग, माणसाला शिंग, वांझेला मुलगा इ. उत्पन्न होतील. जो ज्याची इच्छा करेल त्याची उत्पत्ती होऊ लागेल. कारण उत्पाद निरपेक्ष मानला. असे होताना तर दिसत नाही व्ययसापेक्ष उत्पाद होताना दिसतो म्हणून स्वतंत्र उत्पाद मानणे योग्य नाही.

स्वतंत्र व्यय मानण्यामध्ये दोष–

प्रथम दोष – उत्पाद निरपेक्ष केवळ व्ययच मानला तर व्ययाच्या कारणाचा अभाव झाल्यामुळे व्ययच होणार नाही. उत्तर पर्यायाचा उत्पाद पूर्वपर्यायाच्या नाशाचे कारण आहे. घट बनलाच नाही तर मातीच्या गोळ्याचा नाश होऊच शकणार नाही. कपडा स्वच्छ झाला नाही तर मलिन अवस्थेचा नाश होऊ शकणार नाही. अशाप्रकारे कोणत्याच पर्यायाचा नाश होऊ शकणार नाही. संसारपर्यायाचा नाश होऊ शकणार नाही. सर्वद्रव्याच्या सर्व परिणामांचा नाश होणार नाही.

दुसरा दोष– अथवा सत्‌चा उच्छेद मानावा लागेल. विद्यमान एकेका वस्तूंचा नाश होत जाईल. ज्ञानादिकांचा पण नाश होईल अशाप्रकारे संपूर्ण पदार्थांचा नाश होऊन विश्वाचाच नाश मानावा लागेल. परंतु प्रत्यक्ष कोणत्याही वस्तूचा पूर्णतः नाश झालेले दिसत नाही. त्याची फक्त अवस्थाच बदललेली आढळते. म्हणून उत्पादसापेक्ष व्यय मानणे योग्य आहे.

केवळ ध्रौव्य मानले तर दोष–

प्रथम दोष – उत्पाद-व्यय निरपेक्ष केवळ ध्रौव्य मानले तर स्थितीच राहणार नाही. मातीच्या गोळ्याचा नाश व घटपर्यायाचा उत्पादच नाही मानला तर माती कुठे राहणार ? मातीची स्थिती राहणार नाही. ज्याप्रमाणे माती राहणार नाही त्याप्रमाणे कोणत्याच पदार्थाची ध्रुवता राहणार नाही. कारण पर्यायांमध्येच ध्रौव्य राहते. उत्पादव्ययरूप पर्यायच मानली नाही तर ध्रुवाचा नाश होईल. संसारपर्यायाचा नाश व मोक्षपर्यायाचा उत्पाद मानला नाही तर जीवत्व कोठे राहणार ? जीवत्वाचाच अभाव मानावा लागेल.

दुसरा दोष – क्षणिकालाच नित्यपणा मानावा लागेल. बौद्धांनी मानलेल्या चित्तक्षणांना पण नित्यता प्राप्त होईल. उत्पादव्ययरहित सर्वथा

नित्यत्व आढळून येत नसल्यामुळे क्षणिकालाच नित्यत्व मानावे लागेल.

अशाप्रकारे तिघांमध्ये परस्पर अविनाभाव नाही मानला तर या तिघांपैकी कोणाचीच सिद्धी होऊ शकत नाही. तिघांचाही अभाव होतो. म्हणून उत्तरोत्तर पर्यायांचा उत्पाद व पूर्व-पूर्व पर्यायांचा व्यय व सर्वत्र अन्वयाच्या स्थितीद्वारे त्रिलक्षणस्वरूप द्रव्य स्वीकारावे.

समन्तभद्र आचार्यांनी आप्तमीमांसेमध्ये लौकिक दृष्टान्ताने या उत्पादव्ययध्रौव्याची सिद्धी केली आहे.-

घटमौलिसुवर्णार्थी नाशोत्पादस्थितिष्वयम् ।
शोकप्रमोदमाध्यस्थ्यं जनो याति सहेतुकम् ।।

एका सेठजींच्या जवळ एक सोन्याचा कळस होता. सेठजींना एक मुलगा व एक मुलगी होती. मुलीला कळस खूप आवडायचा. सेठजीपुत्राला सोन्याचा मुकुट घालण्याची इच्छा झाली. म्हणून त्यांनी हट्ट करून वडिलांना मुकुट बनवायला सांगितले. सेठजींनी सोन्याचा कळस मोडून त्याचा मुकुट बनवून आणला. मुकुट पाहून मुलाला खूप हर्ष झाला. मुलीला दुःख झाले. सेठजींना मध्यस्थ भाव झाला. एकाच वस्तूला पाहून तिघांना वेगवेगळे परिणाम का व्हावेत ? विनाकारण झाले नाहीत. याचे काही ना काही कारण असले पाहिजे. एकावेळी त्या सोन्याच्या मुकुटामध्ये तीन धर्म आहेत. कळसाचा व्यय, मुकुटाचा उत्पाद व सोनेपणाचे ध्रौव्य. मुलीची दृष्टी कळसाच्या नाशाकडे आहे म्हणून तिला शोक झाला. मुलाची दृष्टी मुकुटाच्या उत्पादाकडे आहे म्हणून त्याला हर्ष (प्रमोद) झाला. सेठजींची दृष्टी सुवर्णरूप ध्रुवाकडे आहे. कळस असो अथवा मुकुट, त्यातले सोने तर नष्ट झाले नाही, ते जसेच्या तसेच आहे. म्हणून त्यांना हर्षविषाद नाही. मध्यस्थ भाव आहे. हे तीन परिणाम सहेतुक आहेत. यावरून वस्तूच्या उत्पादव्ययध्रौव्यत्वाची सापेक्ष सिद्धी होते. कळसाचा नाश म्हणजेच मुकुटाचा उत्पाद आहे. कळस व मुकुटाचा नाशोत्पाद म्हणजेच सोन्याची ध्रुवता आहे.

उत्पादव्ययध्रौव्याची परस्परसापेक्षता जाणून जीवनात लाभ-

माझ्या वर्तमान पर्यायात आकुलता, अशांती, दुःख आहे ती अशांती मिटवून मला पर्यायात शांती मिळवायची आहे. यासाठी काय पुरुषार्थ करावा लागेल हे कळाले. अशांतीचा नाश झाल्याशिवाय शांती उत्पन्न होऊ शकत नाही. व शांती उत्पन्न झाल्याशिवाय अशांतीचा नाश होऊ शकत नाही. अशांती

व शांती पर्यायामध्ये अन्वयरूपाने व्यापून असणाऱ्या ध्रुवाकडे जर दृष्टी दिली तर सहजच शांती प्राप्त होणार आहे. अशांती पर्यायाचा नाश होऊन शांतीपर्याय उत्पन्न होण्याचा माझा परिणामस्वभाव आहे. त्यामुळे माझी शांती माझ्यामध्ये आहे. बाहेर नाही. मी शांतस्वरूप आत्म्याला लक्ष करून शांतरूपाने परिणमलो तर शांतीच आहे.

विकारी पर्यायाचा नाश करून अविकारी सिद्धपर्याय उत्पन्न होण्यासाठी अविकारी ध्रुवस्वभावाची आराधना कार्यकारी आहे.

दररोजच्या जीवनामध्ये उत्पादव्ययध्रुव-स्वभावाचा खूप फायदा होतो म्हणून हे तत्त्व जाणावे. एखाद्या वस्तूचा नाश झाला की आम्ही दुःखी होतो. तेव्हा जाणा की केवळ येथे नाश नाही. उत्पाद देखील आहे. केवळ उत्पादव्यय नाही तर ध्रुवपण आहे. वस्तू पूर्णतः नष्ट झालेलीच नाही तेथे नवीन उत्पादही झाला आहे व ध्रुवसुद्धा आहे. ध्रुवाकडे पाहून धैर्य ठेवावे.

मागील गाथेमध्ये उत्पाद, व्यय, ध्रौव्य परस्पर सापेक्ष आहेत, एकमेकाला सोडत नाहीत हे सांगितले. आता या गाथेमध्ये उत्पाद, व्यय, ध्रौव्य द्रव्यापासून भिन्न नाहीत ही गोष्ट सिद्ध करतात.-

उप्पादट्ठिदिभंगा विज्जंते पज्जयेसु पज्जाया।
दव्वे हि संति णियदं तम्हा दव्वं हवदि सव्वं ।।१०१।।

अन्वयार्थ- (उप्पादट्ठिदिभंगा) उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य **(पज्जयेसु)** पर्यायामध्ये **(विज्जंते)** होतात **(पज्जाया)** पर्याय **(णियदं)** नियमाने **(दव्वे हि संति)** द्रव्यामध्ये होतात **(तम्हा सव्वं)** म्हणून ते सर्व **(दव्वं हवदि)** द्रव्य आहेत.

तात्पर्य - उत्पाद, व्यय, ध्रौव्याचे आधारभूत अंश द्रव्यामध्येच असल्यामुळे ते तिन्ही द्रव्यरूप आहेत.

उत्पाद, व्यय, ध्रौव्य पर्यायाचे अवलंबन घेतात. पर्याय द्रव्याचे अवलंबन घेतात म्हणून हे सर्व एकच द्रव्य आहे, भिन्न भिन्न द्रव्य नाहीत. उत्पाद, व्यय, ध्रौव्याशिवाय द्रव्य नाही व द्रव्याशिवाय उत्पाद, व्यय, ध्रौव्य नाही. ज्याप्रमाणे बीचा नाश, अंकुर उगवणे आणि वृक्षत्वाचे ध्रौव्य वृक्षाशिवाय नाही व वृक्ष यांच्याशिवाय नाही.

पर्यायांचा आधार द्रव्य-

पर्याय द्रव्याचा आधार घेतात अर्थात द्रव्याच्याच आधाराने पर्याय होतात. कारण झाडाप्रमाणे समुदायी समुदायस्वरूप असतो. पर्यायांच्या

समूहाला द्रव्य म्हणतात. ज्याप्रमाणे समुदायी झाड, बुंधा, मूळ आणि फांद्यांचा समूहस्वरूप असल्यामुळे बुंधा, मूळ आणि फांद्याकडून आश्रितच दिसते. त्याप्रमाणे समुदायी द्रव्य पर्यायांचा समूहस्वरूप असल्यामुळे पर्यायांद्वारे आश्रितच दिसते.

मातीचा गोळा, स्थास, कोश, कुशूल, घट इत्यादि पर्याय मातीच्याच आश्रयाने होतात. मातीच क्रमाने सर्व पर्यायरूपाने परिणमते. माती आणि त्याच्या अवस्था सर्वथा भिन्न नाहीत. त्यामध्ये प्रदेशांच्या अपेक्षेने अभेद आहे. भेदनयाने त्यामध्ये आधार आधेय भेद आहे. माती आधार व मातीच्या अवस्था आधेय आहेत. सोने आधार व सोन्याचे दागिने आधेय आहेत. अंगठी, रिंगा, चेन सोन्याच्या आश्रयाने होतात. पर्याय निराधार राहू शकत नाहीत. पर्याय द्रव्याचा आधार घेतात. पर्याय क्रमाक्रमाने द्रव्याच्या आश्रित उत्पन्न होतात.

एका द्रव्यामध्ये एकावेळी एकच द्रव्यपर्याय असतो. द्रव्यामध्ये एकावेळी अनंत गुण असतात. त्या अनंत गुणांच्या अनंत पर्याय द्रव्यामध्ये एकावेळी असतात; परंतु एका गुणाचा एकावेळी एकच पर्याय असतो. एकेक गुणाचा एकेक पर्याय अशाप्रकारे अनंत गुणांच्या अनंत पर्याय द्रव्यामध्ये एकावेळी असतात. ज्याप्रमाणे आंबा एक द्रव्यपर्याय आहे. त्यामध्ये वर्ण गुणाचा पिवळा पर्याय, रस गुणाचा गोड पर्याय, स्पर्श गुणाचा मऊ पर्याय, गंध गुणाचा सुगंध पर्याय एका वेळी प्रकट आहेत. जीवद्रव्याचा मनुष्य हा द्रव्य पर्याय एक आहे; परंतु त्याच जीवाच्या ज्ञान गुणाचा मतिज्ञानपर्याय, श्रद्धा गुणाचा सम्यग्दर्शन पर्याय, चारित्र गुणाचा देशचारित्र पर्याय, वीर्य गुणाचा क्षायोपशमिक वीर्य पर्याय एकावेळी आहेत. या सर्व द्रव्यपर्याय व गुण पर्यायांचा समूह म्हणजेच एक जीवद्रव्य आहे. म्हणून पर्यायाद्वारे द्रव्य अवलंबिले आहे असे म्हटले जाते.

उत्पाद, व्यय, ध्रौव्यांचा आधार पर्याय–

पर्याय उत्पाद, व्यय, ध्रौव्याद्वारे अवलंबिले जातात. कारण उत्पाद, व्यय, ध्रौव्य अंशांचे धर्म आहेत. बी, अंकुर व वृक्षत्वाप्रमाणे. ज्याप्रमाणे अंशी झाडाचे बी, अंकुर व वृक्षत्व हे तीन अंश आहेत. बीचा नाश होऊन अंकुराची उत्पत्ती झाली. दोन्ही अवस्थेत वृक्षत्व कायम आहे. त्यावेळी नाशधर्माने बीचा आधार घेतला, उत्पाद धर्माने अंकुराचा आधार घेतला व ध्रौव्य धर्माने वृक्षत्वाचा आधार घेतला त्याप्रमाणे द्रव्याचे नष्ट होणारा भाव, उत्पन्न होणारा

भाव व स्थिर राहणारा भाव असे तीन अंश आहेत. हे तीन अंश उत्पाद, व्यय, ध्रौव्यस्वरूप आपल्या धर्माद्वारे आश्रित एकावेळेस जाणले जातात. उत्पाद उत्पद्यमान भावाच्या आश्रयाने आहे, व्यय नष्ट होणाऱ्या भावाच्या आश्रयाने आहे व ध्रौव्य स्थिर राहणाऱ्या भावाच्या आश्रयाने आहे. सोन्याची अंगठी मोडून रिंगा केल्या. तेथे रिंगाचा उत्पाद, अंगठीचा व्यय व सुवर्णत्वाचे ध्रौव्य आहे. उत्पादाने रिंगाचा आश्रय घेतला, व्ययाने अंगठीचा आधार घेतला, ध्रौव्याने सुवर्णत्वाचा आधार घेतला व सुवर्णत्व रिंगा व अंगठी हे तिन्ही सोन्याच्या आश्रयाने आहेत. म्हणून सर्व सोन्यापासून अभिन्न आहेत. यावरून निश्चित होते की जेथे उत्पाद, व्यय, ध्रौव्य दिसतात तेथे पर्याय नियमाने आहेत व जेथे पर्याय आहेत तेथे द्रव्य नियमाने आहे. कारण द्रव्याशिवाय पर्याय नाहीत व पर्यायांशिवाय उत्पाद, व्यय, ध्रौव्य नाहीत.

जर उत्पाद, व्यय, ध्रौव्य पर्यायाचा न मानता द्रव्याचाच मानला तर सर्व गडबड होऊन जाईल.

द्रव्याचा व्यय मानला तर अनिष्टापत्ती–

प्रत्येक समयात द्रव्याच्या पूर्व पर्यायाचा व्यय होतो व उत्तर पर्यायाचा उत्पाद होतो. द्रव्यामध्ये पूर्व पर्याय विलीन होत असतात व नवीन पर्याय प्रकट होतात, द्रव्याचा नाश होत नाही. असे न मानता द्रव्याचाच व्यय मानला तर विनाशशील सर्व द्रव्यांचा एका क्षणामध्ये व्यय झाल्यामुळे द्रव्यशून्यतेचा प्रसंग येईल किंवा सत्‌चाच नाश होईल. सोन्याच्या अंगठीचा नाश झाल्यावर जर सोन्याचा सुद्धा नाश झाला तर सोन्याचा अभाव होऊन जाईल. पुन्हा सोन्याचे दागिने कशापासून बनवणार? सोन्याचा धंदा ठप्प होऊन जाईल. सोन्याचाच नाश झाला असता तर कोणी दागिने मोडलेच नसते. सर्वांना माहीत आहे, सोन्याचा एखादा दागिना मोडला म्हणून त्यातील सोने नष्ट होत नाही. म्हणून तर बिनधास्तपणे सोन्याचे जुने दागिने मोडून नवीन डिझाईनचे दागिने करून घेतात. जीवाचा मनुष्य पर्याय नष्ट झाला तरी जीवाचा नाश होत नाही. जीवाचा नाश झाला तर सर्व जग जीवरहित होईल. त्याचप्रमाणे पुद्गल, धर्म, अधर्म, काल द्रव्याचा नाश झाला तर सर्व जग शून्य होऊन जाईल. सत्‌चा कधी नाश होत नाही.

द्रव्याचा उत्पाद मानला तर अनिष्टापत्ती–

द्रव्याचाच उत्पाद होतो असे मानले तर उत्पादापूर्वी द्रव्य नव्हतेच. तर

असत्चा उत्पाद मानावा लागेल. जेवढे उत्पाद आहेत तेवढे द्रव्य मानावे लागतील. अर्थात द्रव्यामध्ये अनंतपणा प्राप्त होईल. कारण प्रत्येक समयात एकेक उत्पाद तर प्रत्येक समयात एकेक नवीन द्रव्य उत्पन्न होईल. अनंत समयात अनंत द्रव्य नवीन उत्पन्न होतील. एका द्रव्यामध्ये भूत-वर्तमान-भविष्य सर्व पर्याय अनंत आहेत. त्या एका द्रव्याच्या अनंत पर्यायांपैकी प्रत्येक पर्यायाला एकेक द्रव्य मानावे लागेल. जगामध्ये द्रव्यांची संख्या अनंतपट होईल. रिंगाचा उत्पाद झाला तेथे जे सोने पूर्वी नव्हते ते नवीन रिंगारूपाने उत्पन्न झाले असे मानावे लागेल. असे झाले तर सोनाऱ्याजवळ भरपूर सोने जमा होईल. ज्या वस्तूची इच्छा केली ती लगेच प्रकट झाली पाहिजे. अशारीतीने सर्व जगामध्ये अंधाधुंधी माजेल. मुलगा उत्पन्न झाला तेथे नवीनच जीव उत्पन्न झाला असे मानावे लागेल. प्रत्येक पर्यायाबरोबर जीव नवीन उत्पन्न झाला तर जीवांची संख्या अनंतानंत पट होईल. सर्वत्र मनुष्यच मनुष्य, पशूच पशू दिसायला लागतील. लोकामध्ये सर्व जीव मावणारही नाहीत. म्हणून द्रव्याचा उत्पाद होत नाही, पर्यायाचा उत्पाद होतो हे मानणे योग्य आहे.

द्रव्याचेच ध्रौव्य मानले तर अनिष्टापत्ती-

जर ध्रौव्य द्रव्याचेच मानले तर क्रमाने होणाऱ्या भावांचा अभाव मानावा लागेल. क्रमभावी भावांचा अभाव झाला तर द्रव्याचाच अभाव होईल किंवा त्यामध्ये अर्थक्रियाच होणार नाही. क्रमाने होणाऱ्या पर्यायामध्ये जशी क्षणिकता आहे तशी द्रव्यामध्ये क्षणिकता येईल. ज्याप्रमाणे सुवर्णत्व अंशाने ध्रौव्य न मानता सोन्याचेच ध्रौव्य मानले तर सोन्यामध्ये उत्पाद, व्यय होणार नाही. सोन्यामध्ये क्रमाने होणाऱ्या अंगठी, रिंगा इत्यादि पर्यायांचाच अभाव होईल. पर्यायांचा अभाव मानला तर सोनेच क्षणिक मानावे लागेल, ते तर प्रत्यक्ष दिसत नाही. म्हणून द्रव्याचा उत्पाद, व्यय, ध्रौव्य आहे ही गोष्ट सिद्ध होत नाही. पर्यायामध्येच उत्पाद, व्यय, ध्रौव्य घटित होते. परंतु पर्याय द्रव्यापासून भिन्न नाहीत म्हणून अभेदनयाने द्रव्याचे उत्पाद व्यय ध्रौव्य म्हटले जाते.

आत्मा एक पदार्थ आहे. तो प्रत्येक समयात नवीन नवीन पर्याय धारण करतो. हा आत्मा पूर्वीही होता, आताही आहे आणि पुढेही राहणारच. त्यामध्ये उत्पाद, व्यय, ध्रौव्य होतच राहतो. अन्य मती लोकसुद्धा कोणत्या ना कोणत्या रूपाने उत्पाद, व्यय, ध्रौव्य मानतातच. काही जण मानतात ज्ञानाने मोक्ष होतो.

तेथे अज्ञानाचा नाश झाला, ज्ञानाचा उत्पाद झाला, दोन्ही अवस्थेमध्ये जीवत्व आहेच. अशाप्रकारे उत्पाद, व्यय, ध्रौव्य सिद्ध होते. उत्पाद, व्यय, ध्रौव्याशिवाय कोणतेही कार्य होऊ शकत नाही.

वस्तुस्वरूपाचा जयवाद–

शेवटी अमृतचंद्र आचार्य म्हणतात, हे उत्पाद, व्यय, ध्रौव्यांनो तुम्ही पर्यायांचे अवलंबन घ्या. हे पर्यायांनो, तुम्ही द्रव्याचे अवलंबन घ्या. काय आचार्य त्यांना आदेश देत आहेत किंवा आशीर्वाद देत आहेत? सत्य तर हे आहे की वस्तुसिद्धीच्या सफलतेने संतुष्ट होऊन आचार्य जयवाद करीत आहेत. कधी कधी भगवंतांना सुद्धा म्हणतात की तुम्ही जयवंत रहा. आमच्या म्हणण्याने भगवान जयवंत होतात का? येथे आचार्य म्हणतात– उत्पाद, व्यय, ध्रौव्य पर्यायाचे अवलंबन घेवोत, पर्याय द्रव्याचे अवलंबन घेवोत; कारण हे सर्व एकच द्रव्य आहे. जी खरी गोष्ट आहे ती सिद्ध करण्याचा संतोष होत आहे. जेव्हा आजी नातवावर खूष होते तेव्हा म्हणते, बाळ, आयुष्यवंत हो, चिरंजीवी हो, दीर्घायु हो, तुझे जीवन फूलो फलो, युगायुगापर्यंत जीवंत रहा इत्यादी. ती सदैव त्याचे चांगलेच इच्छिते, थोडेही कष्ट पाहू इच्छित नाही. म्हणून मनातील आंतरिक भावना सहज व्यक्त केल्या जातात. त्याचप्रमाणे द्रव्याच्या लक्षणासंबंधी लोकांच्या मनात विकार उत्पन्न होऊ नयेत. अशी मनोभावना आचार्यांनी प्रकट केली आहे. द्रव्याचे लक्षण विपरीत जाणणे हेच अनिष्ट आहे. हे अनिष्ट घडू नये अशी ज्ञानीची इच्छा असते. पर्याय उत्पाद, व्यय, ध्रौव्यस्वरूप आहे व द्रव्य पर्यायस्वरूप आहे म्हणून द्रव्य उत्पाद, व्यय, ध्रौव्यस्वरूप आहे. हे तीन विशेषणे आहेत व द्रव्य विशेष्य आहे.

वस्तूचे स्वरूप जाणून पर्यायांच्या उत्पाद व विनाशामध्ये हर्ष, शोक करू नये. संसाराच्या अवस्थांमध्ये साम्यभाव ठेवावा. उत्पाद, व्यय, ध्रौव्यरूप अंशधर्माद्वारे आत्मद्रव्याची ओळख करून सर्व भेदकल्पना सोडून स्वत:ला चैतन्यस्वभावमात्र अनुभवावे. स्वत:ला द्रव्यदृष्टीने जाणून सहा द्रव्यांना स्वत:पासून भिन्न जाणावे. स्वत:च्या आत्मद्रव्याला स्वाभाविक शुद्धस्वरूपामध्ये तन्मय पाहून त्याचाच अनुभव करून तृप्त व्हावे यातच आपले हित आहे.

येथे कोणी शंकाकार म्हणतो की उत्पाद, व्यय व ध्रौव्य हे तिन्ही धर्म वस्तूमध्ये आहेत; परंतु ते एकावेळी असू शकत नाहीत. कारण जेव्हा वस्तू

उत्पन्न होते तेव्हा ती उत्पन्नच आहे, तेव्हा ती नष्ट होऊ शकत नाही. उत्पत्तीनंतर वस्तू स्थिर राहते. त्या वस्तूचे जे स्थितिक्षण आहेत ते जन्मक्षण किंवा नाशक्षण होऊ शकत नाहीत. त्यानंतर वस्तू नष्ट होते तेव्हा तिचा तो नाशक्षणच आहे तो जन्मक्षण किंवा स्थितिक्षण होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे घट प्रथम उत्पन्न होतो नंतर स्थिर राहतो, त्यानंतर तो नष्ट होतो त्याप्रमाणे प्रत्येक वस्तूमध्ये उत्पाद, व्यय व ध्रौव्य क्रमानेच होताना दिसतात. त्यामुळे उत्पाद, व्यय ध्रौव्यामध्ये समयभेद आहे. तिन्ही एकावेळी होऊ शकत नाहीत. असा पूर्व पक्ष उपस्थित झाला असता आचार्य समयभेदाचे निराकरण करून उत्पाद, व्यय, ध्रौव्याचा द्रव्याबरोबर अभेद दाखवितात–

समवेदं खलु दव्वं संभवठिदिणाससण्णिदट्ठेहिं ।
एक्कम्मि चेव समये तम्हा दव्वं खु तत्तिदयं ।।१०२।।

अन्वयार्थ– (दव्वं खलु) द्रव्य निश्चयाने **(एक्कम्मि चेव समये)** एकाच समयात **(संभवठिदि–णाससण्णिदट्ठेहिं)** उत्पाद, ध्रौव्य, नाश नावाच्या अर्थांशी **(समवेदं)** एकरूप आहे **(तम्हा)** म्हणून **(दव्वं)** द्रव्य **(खु)** वास्तविक **(तत्तिदयं)** त्या तीनमय आहे.

तात्पर्य – द्रव्य एका समयातच उत्पादव्ययध्रौव्यमय आहे. म्हणून ते त्रितय द्रव्यरूपच आहे.

उत्पादव्ययध्रौव्यांमध्ये समयभेदाचा अभाव –

सत् द्रव्य एकाच समयात उत्पाद, व्यय, ध्रौव्य स्वरूप आहे. सम्+अव+इ धातूपासून समवेत शब्द बनला आहे. उत्पाद, व्यय, ध्रौव्य सम्यक्प्रकारे सर्व बाजूंनी वस्तूमध्ये व्याप्त आहेत. अर्थात द्रव्यांशी त्यांचा तादात्म्य संबंध आहे हे सिद्ध होते. द्रव्य उत्पाद, व्यय, ध्रौव्याने समवेत आहे. जे द्रव्याचे प्रदेश तेच उत्पाद, व्यय, ध्रौव्यांचे प्रदेश आहेत. त्यामुळे द्रव्याबरोबर यांचे एकत्व आहे. एकत्व असून यांच्यामध्ये समयभेद नाही. उत्पाद, व्यय, ध्रौव्य तिन्ही एकाच वेळेस आहेत.

शंका – वस्तुस्वरूपाच्या ज्ञानाने रहित वरकरणी बुद्धीला असे भासित होते की उत्पादाच्या वेळी उत्पादच सांगायला पाहिजे, जन्माच्या वेळी मरणाची चर्चा शोभा देत नाही. जो जन्माचा समय आहे तो मरणाचा नाही. जो नाशाचा समय आहे तो जन्माचा होऊ शकत नाही व जो स्थितीचा समय आहे तो

स्थितिरूपच असल्यामुळे तो जन्माचा व मरणाचा समय नाही. तिन्ही एकावेळी कसे काय होऊ शकतील?

समाधान – असा प्रसंग तेव्हा येईल जेव्हा असे मानले की द्रव्य स्वत:द्वारे उत्पन्न होते, स्वयंच ध्रुव राहते व स्वत:द्वारे नाशाला प्राप्त होते; परंतु असे मानलेले नाही. पर्यायांचे उत्पादादिक आहेत तेथे क्षणभेद कसा होऊ शकतो? द्रव्य ज्यावेळी पूर्व पर्यायरूपाने नष्ट होते त्याच वेळी उत्तर पर्यायरूपाने उत्पन्न होते व तेव्हा स्थिर अंशाने ध्रुव राहते. ज्याप्रमाणे अभ्यंतर व बाह्य साधनसामुग्री उपस्थित असताना जो कलशाचा जन्मक्षण आहे तोच मातीच्या पिंडाचा नाशक्षण आहे आणि तोच दोन्ही अवस्थेत राहणाऱ्या मातीपणाचा स्थितिक्षण आहे. त्याप्रमाणे अंतरंग व बहिरंग साधनांची उपस्थिती असताना जो उत्तर पर्यायाचा जन्मक्षण आहे तोच पूर्व पर्यायाचा नाशक्षण आहे व तोच दोन्ही पर्यायांना स्पर्श करणाऱ्या द्रव्यत्वाचा स्थितिक्षण आहे.

द्रव्याचे ध्रौव्य असताना कोणत्या तरी पर्यायाचा नाशच अन्य कोणत्या तरी पर्यायाचा उत्पाद असतो. अथवा कोणत्या तरी पर्यायाचा उत्पादच अन्य कोणत्या तरी पर्यायाचा नाश असतो. सूर्योदय होणे म्हणजेच रात्रीचा नाश आहे अथवा रात्रीचा नाशच सूर्योदय आहे. दिशा ध्रुव आहेच. गव्हाच्या दाण्यांचा नाशच पिठाची उत्पत्ती व पिठाची उत्पत्तीच गव्हाच्या दाण्यांचा नाश आहे. तेथेच गव्हाच्या परमाणूंचे ध्रौव्य आहे. जेव्हा मिथ्यादर्शन पर्यायाचा व्यय झाला तेव्हाच सम्यग्दर्शन पर्यायाचा उत्पाद झाला. तेव्हाच जीवत्वाचे ध्रौव्य आहे. प्रथम मिथ्यादर्शन पर्याय नष्ट झाली. नंतर दुसऱ्या समयात सम्यग्दर्शन पर्याय उत्पन्न झाली असे नाही. असे मानले तर मध्ये एक क्षण द्रव्य पर्यायरहित होईल, तसे तर होत नाही.

ज्या क्षणी पंचम गुणस्थानाचा नाश झाला त्याच क्षणी सप्तम गुणस्थानाचा उत्पाद झाला, जीवत्व दोन्हीमध्ये ध्रुव आहे. दहाव्या गुणस्थानाच्या अंतिमक्षणी मोहाचा क्षय झाला असे म्हटले जाते. वास्तविक बाराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयात मोहाचा नाश व क्षीणमोह अवस्थेचा उत्पाद दोन्ही एकावेळी होतात. बाराव्या गुणस्थानाच्या अंतिम समयात अथवा तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयात केवलज्ञानाची उत्पत्ती होते तेव्हाच अज्ञान पर्यायाचा नाश होतो तेथे आत्म्याची स्थिती आहेच. त्याचप्रमाणे अयोगी केवलीच्या अंतसमयी मोक्ष होतो. तेव्हा ज्या समयी मोक्ष पर्यायाचा उत्पाद

होतो त्याच समयी अयोगकेवली पर्यायाचा नाश होतो; तथा दोन्ही अवस्थेमध्ये आत्मा ध्रुवरूप आहेच. जेव्हा बोट वाकडे केले तेव्हा एकाच समयात वाकड्या अवस्थेची उत्पत्ती, सरळ अवस्थेचा नाश व बोटपणाचे ध्रौव्य आहे. मनुष्यपर्यायाचा नाश व देवपर्यायाचा उत्पाद व जीवपणाचे ध्रौव्य तिन्ही एकाच समयात आहेत.

पर्यायमात्र द्रव्य नाही–

ज्याप्रमाणे कलशामध्ये उत्पाद, मातीच्या गोळ्यामध्ये व्यय व मातीपणामध्ये ध्रौव्य हे एकेकामध्येच आहेत; परंतु तीन स्वभावाला स्पर्श करणाऱ्या मातीमध्ये मात्र ते तिन्ही संपूर्णरूपाने एकाच समयात पाहिले जातात त्याप्रमाणे उत्तर पर्यायामध्ये उत्पाद, पूर्व पर्यायामध्ये व्यय व द्रव्यत्वामध्ये ध्रौव्य एकेकामध्ये प्रवर्तमान असतानाही त्रिस्वभावस्पर्शी द्रव्यामध्ये मात्र ते तिन्ही संपूर्णरूपाने एकाच समयात आढळतात. उत्पाद उत्तर पर्यायाच्या आधाराने आहे, व्यय पूर्व पर्यायाच्या आधाराने आहे व ध्रौव्य स्थिर अंशाच्या आधाराने आहे. सर्व पर्याय द्रव्याच्या आधाराने आहेत. पर्यायालाच द्रव्य मानल्यामुळे तिन्हींना एका समयात मानण्यामध्ये बाधा वाटते. जी पर्याय उत्पन्न झाली तीच पर्याय नाश झाली असे मानले तर विरोध होतो. परंतु उत्पाद व्ययाचा आधारभूत पर्याय भिन्न आहेत त्यामुळे उत्पाद व्यय एका समयात राहण्यात विरोध नाही. घटाचाच उत्पाद व घटाचाच नाश एका समयात होऊ शकत नाही; पण माती द्रव्यामध्ये मातीच्या गोळ्याचा नाश व घटाचा उत्पाद एका समयात होऊ शकतो. अशाप्रकारे उत्पादव्ययध्रौव्य एका द्रव्यात एका समयात होतात.

ज्याप्रमाणे घट, मातीचा गोळा व मातीपणामध्ये असणारा उत्पाद, व्यय व ध्रौव्य मातीच आहे, अन्य वस्तू नाही. त्याचप्रमाणे उत्तरपर्याय, पूर्वपर्याय आणि द्रव्यत्वामध्ये प्रवर्तमान उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य द्रव्यच आहे अन्य पदार्थ नाही. द्रव्याचे स्वरूप चांगल्या रीतीने समजले तर द्रव्याची स्वतंत्रता समजते आणि द्रव्याची स्वतंत्रता समजली तर मोह राहू शकत नाही. वस्तुस्वरूपाच्या अज्ञानामुळेच मोह जीवाला नाचवतो व त्या मोहाच्या तालावर जीव व्यर्थ नाचतो. मोह पर्यायाचा व्यय होऊन माझ्यामध्ये सम्यक्त्व पर्यायाचा उत्पाद व्हावा, अज्ञान पर्यायाचा व्यय होऊन केवलज्ञान पर्यायाचा उत्पाद व्हावा. या विकासाचा उपाय सहजज्ञानस्वभावी अंतस्तत्त्वामध्ये आत्मपणाचा अनुभव आहे हे जाणून निजज्ञानदर्शनआनंदस्वरूप चैतन्यतत्त्वाचे आत्मरूपाने

अनुभवन करावे.

पूर्वीच्या चार गाथांमध्ये उत्पाद, व्यय, ध्रौव्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आता त्या उत्पाद, व्यय, ध्रौव्याचा अनेक द्रव्यपर्यायाद्वारे विचार करतात.-

पाडुब्भवदि य अण्णो पज्जाओ पज्जओ वयदि अण्णो ।
दव्वस्स तं पि दव्वं णेव पणट्ठं ण उप्पण्णं ।।१०३।।

अन्वयार्थ- (दव्वस्स) द्रव्याचा **(अण्णो पज्जाओ)** अन्य पर्याय **(पाडुब्भवदि)** उत्पन्न होतो **(य)** आणि **(अण्णो पज्जओ)** अन्य पर्याय **(वयदि)** नष्ट होतो **(तं पि)** तरी सुद्धा **(दव्वं)** द्रव्य **(पणट्ठं णेव)** नष्ट होत नाही व **(उप्पण्णं ण)** उत्पन्न होत नाही.

तात्पर्य – द्रव्याचे पर्याय उत्पन्न व नष्ट होतात. द्रव्य उत्पन्न व नष्ट होत नाही.

पर्याय विनश्वर व द्रव्य अविनश्वर-

द्रव्याचे पर्याय उत्पन्न व नष्ट होतात, द्रव्य उत्पन्न व नष्ट होत नाही. जगामध्ये नवीन द्रव्य उत्पन्न करण्याचे कोठे ही कारखाने नाहीत, नवीन परमाणू किंवा नवीन जीव कोणी उत्पन्न करू शकत नाहीत. कारखान्यामध्ये जो माल तयार होतो तो जगामध्ये असणाऱ्या परमाणूंचेच परिणमन आहे. कच्चा माल वापरून त्यापासून पक्का माल तयार केला जातो. नवीन उत्पादन पर्यायाचे आहे, द्रव्याचे नाही. माता मुलाला जन्म देते म्हणजे ती मुलाला उत्पन्न करीत नाही. पूर्व दुसऱ्या पर्यायामध्ये असणारा जीव तो पर्याय सोडून मातेच्या गर्भात येऊन नवीन शरीर धारण करतो ही वस्तुस्थिती आहे.

द्रव्यपर्यायाचे भेद –

पूर्वी ९३ नंबरच्या गाथेमध्ये पर्यायाचे दोन भेद केले आहेत- १. द्रव्य पर्याय व २. गुणपर्याय. अनेक द्रव्यामध्ये एकतेचे ज्ञान ज्याच्या निमित्ताने होते तो द्रव्यपर्याय होय. द्रव्यपर्याय अनेक द्रव्यांच्या संयोगाने उत्पन्न होतो म्हणून त्यास येथे अनेक द्रव्य पर्याय असे म्हटले आहे. एका पुद्गलाचा दुसऱ्या पुद्गलाशी संयोग होतो व जीवद्रव्याचा पुद्गल द्रव्याशी संयोग होतो, अन्य कोणत्याही द्रव्यांचा संयोग होत नाही. म्हणून द्रव्यपर्यायाचे दोन भेद केले आहेत- १. समानजातीय द्रव्यपर्याय व २. असमानजातीय द्रव्यपर्याय. अनेक

पुद्गल परमाणूंनी मिळून बनलेल्या स्कंधपर्यायालाच समानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात. एका जीवाचा दुसऱ्या जीवाशी संयोग होऊन दोघांची मिळून एक पर्याय होत नाही. भलेही निगोद शरीरामध्ये एकत्र अनंत जीव राहतात. अनंत जीवांचा आहार, श्वासोच्छ्वास एकच आहे, जन्म-मरण एकाच वेळेस आहे तरीसुद्धा त्या अनंत जीवांची पर्याय स्वतंत्र आहे. त्यास समानजातीय द्रव्यपर्याय म्हणत नाहीत. समानजातीय द्रव्यपर्याय फक्त पुद्गलामध्येच आढळतो. कालाणू असंख्यात असले तरी त्यांचा संयोग होत नाही. जो काही बाह्य जगामध्ये पुद्गलांचा पर्याय दिसतो तो सर्व समानजातीय द्रव्यपर्याय आहे. उदा. पुस्तक, चटई, पेन, घर, घट, वस्त्र, लाडू, पेढा इत्यादी समानजातीय द्रव्यपर्याय आहेत.

समानजातीय द्रव्यपर्यायापेक्षेने उत्पादव्ययध्रौव्य-

ज्याप्रमाणे तीन परमाणूंचा संयोगरूप त्र्यणुक स्कंधामध्ये एक परमाणू येऊन मिळाला तेथे त्र्यणुक पर्याय नष्ट झाला व चतुरणुक पर्याय उत्पन्न झाला. त्यामध्ये असणारे तीन परमाणू किंवा चार परमाणू उत्पन्न झाले नाहीत व नष्ट झाले नाहीत. त्याप्रमाणे सर्व समान जातीय द्रव्यपर्याय नष्ट होतात व उत्पन्न होतात; परंतु समानजातीय द्रव्ये नष्ट होत नाहीत व उत्पन्न होत नाहीत.

दररोजच्या व्यावहारिक जीवनामध्ये प्रत्यक्ष आपण पाहतो की, पीठाचा नाश होतो व कणिक उत्पन्न होते. कणिकेचा नाश होतो व चपाती उत्पन्न होते. त्यामध्ये असणारे गव्हाचे कण उत्पन्न व नष्ट होत नाहीत. कोळशाचा नाश होतो व राख उत्पन्न होते; परंतु त्यामध्ये असणारे पुद्गल परमाणू नष्ट होत नाहीत व उत्पन्न होत नाहीत.

द्रव्य परिणमनशील आहे म्हणून द्रव्याच्या अवस्था बदलतात. पूर्व अवस्था नष्ट होते व उत्तर अवस्था उत्पन्न होते. द्रव्य मात्र कायम राहते. शरीराची तरुण अवस्था नष्ट होते व वृद्धावस्था उत्पन्न होते. शरीररूप असणारे पुद्गल परमाणू कायम राहतात. दुधाचा खवा करतो तेव्हा दुधाचा नाश होतो व खव्याची उत्पत्ती होते; परंतु त्यामध्ये असणारे गोरस उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही.

पावसाळ्यामध्ये ढग येतात. त्या ढगामध्ये मंदिर, झाड, पर्वत इत्यादी निरनिराळे आकार दिसतात आणि पाहता पाहता विलीन होतात. एक राजा होता. तो आपल्या महालावर बसून ढग पाहत होता. त्यामध्ये त्याला एक मंदिराचे दृश्य दिसले. त्याला ते खूप आवडले. त्याने विचार केला की असे

मंदिर मी बनवीन. म्हणून तो खाली उतरून कागद व रंग घेऊन चित्रकाराला बोलवायला गेला. चित्रकार येत नाही तोपर्यंत मंदिर तेथून अदृश्य झाले. ते पाहून राजाला विचार आला की आपला देहसुद्धा असाच पाहता पाहता नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. त्याला एकदम वैराग्य झाले व त्याने दिगंबर दीक्षा धारण केली. पर्यायाच्या क्षणभंगुरतेची प्रत्यक्ष प्रतीती येत असतानाही अज्ञानामुळे हा जीव शरीर, स्त्री, पुत्र, घर, सोने, चांदी, शेतीवाडी यांवर ममत्व करतो व त्यांचा वियोग झाला की दु:खी होतो. म्हणून पर्यायाला पर्यायरूप क्षणभंगुर व द्रव्याला द्रव्यरूप अविनाशी जाणणे सुखाचे कारण आहे.

असमानजातीय द्रव्यपर्यायाच्या अपेक्षेने उत्पादव्ययध्रौव्य–

जीव व पुद्गलाच्या संयोगाने बनलेल्या पर्यायांना असमानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात. कारण जीवाची जात (स्वभाव) भिन्न आहे व पुद्गलाची जात भिन्न आहे. जीव चैतन्यस्वभावी व पुद्गल जडस्वभावी आहे. उदा. मनुष्य, देव, तिर्यंच, नारक इत्यादी असमानजातीय द्रव्यपर्याय आहेत. हा पर्याय पुद्गलाच्या संयोगाने रहित केवळ जीवामध्ये होऊ शकत नाही. म्हणून हा सांयोगिक पर्याय आहे.

ज्याप्रमाणे एक मनुष्यरूप द्रव्यपर्याय नष्ट होतो व दुसरा देवत्वरूप द्रव्यपर्याय उत्पन्न होतो; परंतु तो जीव आणि शरीररूप झालेले पुद्गल परमाणू नष्ट होत नाहीत व उत्पन्न होत नाहीत. त्याप्रमाणे सर्व असमानजातीय द्रव्यपर्याय नष्ट होतात व उत्पन्न होतात; परंतु असमानजातीय द्रव्ये नष्ट व उत्पन्न होत नाहीत.

देवांना त्रिदश म्हणतात; कारण देवांच्या बालक, तरुण, वृद्ध या तिन्ही अवस्था समान असतात. देव उत्पन्न होताच अंतर्मुहूर्तात युवावस्थेला प्राप्त होतात. त्यांची ती युवावस्था मरेपर्यंत तशीच राहते. मार्गणेमध्ये काही मार्गणा द्रव्यपर्यायरूप आहेत व काही गुणपर्यायरूप आहेत. मनुष्य, देव, तिर्यंच, नारकरूप गतिमार्गणा जीव पुद्गलांच्या संयोग संबंधाने आहे म्हणून त्या द्रव्यपर्याय आहेत. एकेंद्रिय, द्वींद्रियादि इंद्रियमार्गणा जीव पुद्गलाच्या संयोगरूप आहे म्हणून ती सुद्धा द्रव्यपर्याय आहे. त्रस व स्थावररूप कायमार्गणा, संज्ञी–असंज्ञीरूप संज्ञीमार्गणा, बादर एकेंद्रिय पर्याप्त, सूक्ष्म एकेंद्रिय पर्याप्त आदि चौदा जीवसमास सुद्धा द्रव्यपर्याय आहेत; कारण जीव पुद्गलांच्या संयोगाशिवाय हे पर्याय होत नाहीत.

योग, वेद, कषाय, ज्ञान, दर्शन, संयम, लेश्या, सम्यक्त्व इत्यादि मार्गणा गुणपर्यायरूप आहेत. कारण जीवाच्या ज्ञान, दर्शन, चारित्र गुणांच्या

त्या अवस्था आहेत.

या गाथेत द्रव्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे की द्रव्य कधी उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही. जो आत्मा निगोद अवस्थेमध्ये होता तोच आत्मा मनुष्य, देव इत्यादी पर्यायांमध्ये जातो व तोच आत्मा उन्नती करीत सिद्ध अवस्थेमध्ये पोहोचतो. आत्मद्रव्याचा न कधी उत्पाद आहे, न कधी नाश आहे. द्रव्याची अवस्था बदलत राहते. म्हणून नवीन पर्याय उत्पन्न होतो व पूर्व पर्याय नष्ट होतो. एक द्रव्य एकावेळी दोन पर्यायांमध्ये राहत नाही. द्रव्य क्रमाने एक एक पर्यायाला उत्पन्न करते. जेव्हा मनुष्य पर्याय आहे तेव्हा देवपर्याय नाही. मनुष्य मरून देव होतो. देवपर्यायाचा उत्पाद म्हणजेच मनुष्य पर्यायाचा नाश आहे. मनुष्य अवस्था नष्ट झाल्याशिवाय देवपर्याय उत्पन्न होऊ शकत नाही. जेव्हा साधू सर्व कर्मबंधनाचा नाश करून मुक्त होतो तेव्हा सिद्ध पर्याय प्रकट होतो व पूर्व संसारपर्याय नष्ट होतो. सिद्ध पर्यायाचा जन्म व संसार पर्यायाचा नाश एकाच समयात होतो.

जीवन स्वातंत्र्याची गुरुकिल्ली–

हा अज्ञानी जीव अनादिकाळापासून मनुष्य, देव, तिर्यंच इत्यादी अनेक द्रव्यपर्यायांना आपले स्वरूप समजून संसारामध्ये भटकत आहे. मी मनुष्य, मी तिर्यंच, मी देव, मी स्त्री, मी पुरुष असे मानून प्राप्त पर्यायामध्येच तन्मय आहे. त्यालाच आपले सर्वस्व मानून त्या पर्यायाच्या लाभ–हानीमध्ये हर्ष–विषाद मानत आहे. पर्याय टिकविण्यासाठी, त्याच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील आहे. हा क्षणिक पर्याय आहे हे विसरून त्यालाच शाश्वत मानून बसला आहे. या पर्यायाव्यतिरिक्त शाश्वत आत्मतत्त्व मी आहे याचे भान नाही. या द्रव्यपर्यायाचे स्वरूप जाणून द्रव्यपर्यायासंबंधी ममता सोडावी. हा द्रव्यपर्याय नाशवंत आहे. मी शाश्वत जीवतत्त्व आहे, हे जाणून अविनाशी स्वभावाचे ध्यान करावे. त्यामध्येच तन्मय होऊन परम स्वाधीनतेची प्राप्ती करावी व कर्मबंधनातून मुक्त होऊन स्वतंत्र व्हावे. हीच जीवनस्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.

आता पुढील गाथेत उत्पादव्ययध्रौव्यरूपाला एकद्रव्यपर्यायाच्या द्वारे स्पष्ट करतात. येथे गुणपर्यायालाच एकद्रव्यपर्याय म्हटले आहे. कारण गुणपर्याय एकाच द्रव्याच्या आश्रयाने होते.–

परिणमदि सयं दव्वं गुणदो य गुणंतरं सदविसिट्ठं ।
तम्हा गुणपज्जाया भणिया पुण दव्वमेव त्ति ।।१०४।।

अन्वयार्थ– (सदविसिट्ठं) आपल्या सत्तेपासून अभिन्न **(दव्वं)** द्रव्य **(गुणदो)** एका गुणापासून **(गुणंतरं)** अन्य गुणरूप **(सयं)** स्वतःच **(परिणमदि)** परिणमते **(तम्हा पुण)** म्हणूनच **(गुणपज्जाया)** गुणपर्याय **(दव्वमेव त्ति)** द्रव्यच असे **(भणिया)** म्हटले जातात.

तात्पर्य – आपल्या स्वरूपास्तित्वापासून अभिन्न द्रव्य एका गुणपर्यायाहून दुसऱ्या गुणपर्यायरूपाने स्वयं परिणमते म्हणून ते गुणपर्याय द्रव्यच आहे.

गुणपर्याय–

येथे गुणांच्या पर्यायालाच गुण म्हटले आहे. द्रव्य एका गुणाहून दुसऱ्या गुणरूपाने परिणमते याचा अर्थ विवक्षित गुणाच्या एका पर्यायाहून त्याच गुणाच्या दुसऱ्या पर्यायरूपाने परिणमते. कारण जसे एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यरूप होत नाही. तसेच एक गुण दुसऱ्या गुणरूपाने कधीही होत नाही. गुणांच्या विकासाला अथवा गुणांच्या विकाराला सुद्धा गुण म्हटले आहे. कारण गुणपर्यायापासून गुण भिन्न नाही. द्रव्यामध्ये जेवढे गुण आहेत ते प्रत्येक समयाला भिन्न भिन्न परिणमन करतात. त्या गुणांच्या ज्या अवस्था होतात त्यांना गुणपर्याय म्हणतात. ज्याप्रमाणे द्रव्याचे गुण द्रव्यापासून अभिन्न आहेत त्याचप्रमाणे गुणांचे पर्यायसुद्धा द्रव्यापासून अभिन्न एकरूप आहेत.ज्याप्रमाणे द्रव्याचा पर्याय द्रव्यापासून अभिन्न आहे त्याप्रमाणे गुणांचे पर्याय सुद्धा द्रव्यापासून अभिन्न आहेत.

द्रव्याची गुणपर्यायांपासून अभिन्नता–

जसा आंबा स्वयं हिरव्या रंगाहून पिवळ्या रंगरूपाने परिणमतो. त्या हिरव्या किंवा पिवळ्या रंगापासून आंब्याची सत्ता भिन्न नाही. एकच आंबा हिरव्या रूपाने परिणमला तोच आंबा पिवळ्या रूपाने परिणमला. त्या दोन्ही भावांमध्ये आंबा वेगळा नाही, एकच आंबा आहे. आंब्याची सत्ता त्या हिरव्या व पिवळ्या रंगरूपाने अनुभवात येते. द्रव्य अनेक गुणांचा समुदाय आहे. एका समयात ज्याप्रमाणे द्रव्यामध्ये अनेक गुण असतात त्याप्रमाणे अनेक पर्यायसुद्धा द्रव्यामध्ये एका समयात होतात. ज्याप्रमाणे आंबा हिरव्याचा पिवळा झाला, त्याचवेळी आंबट रस बदलून गोड झाला. पूर्वीचा गंध बदलून सुगंधरूप झाला. कडक स्पर्श बदलून मऊ स्पर्श झाला. वर्ण, गंध, रस, स्पर्श गुणांचे परिणमन एकाच वेळी होते. त्या अनेक पर्यायांचा आधार आंबा आहे. आंबाच त्या सर्व

पर्यायरूपाने परिणमतो.

कोणी मिथ्यादृष्टी जीव सम्यग्दृष्टी झाला तेव्हा त्याच्या सर्व गुणांचे सम्यक् परिणमन होते. जीव मिथ्यादर्शन पर्यायाचा अभाव करून सम्यग्दर्शन पर्यायरूपाने परिणमतो, मिथ्याज्ञानाचा नाश करून मतिज्ञान, श्रुतज्ञानादि सम्यग्ज्ञान पर्यायरूपाने परिणमतो, मिथ्या चारित्राचा व्यय करून सम्यक्चारित्र पर्यायरूपाने परिणमतो. अशा प्रकारे एका गुणाचे परिणमन होते तेव्हा अनेक गुणांचे परिणमन होते. छद्मस्थ अल्पज्ञानी जीव सर्वज्ञ होतो तेव्हा जीवद्रव्याचा अंतरात्मा पर्याय बदलून परमात्मा पर्याय उत्पन्न होतो. अंतरात्म्याचे गुण बदलून परमात्म्याचे गुण प्रकट झाले. जसे ज्ञानगुणाचा मतिज्ञान, श्रुतज्ञान पर्याय बदलून केवलज्ञान पर्याय उत्पन्न होतो. दर्शन गुणाचा चक्षू, अचक्षुदर्शन आदि पर्याय नष्ट होऊन केवलदर्शन पर्याय उत्पन्न होतो. वीर्य गुणामध्ये अल्पवीर्य पर्याय नष्ट होऊन अनंतवीर्य प्रकट होते. सुख गुणांमध्ये परोक्ष सुख नष्ट होऊन प्रत्यक्ष अनंत सुख पर्याय उत्पन्न होते. अशा प्रकारे अनंतगुणांच्या पर्यायांचे परिणमन एकाच वेळेस होते. ज्याप्रमाणे परमात्मा पर्याय जीवद्रव्यापासून अभिन्न आहे त्याचप्रमाणे अनंतगुणांचे पर्यायसुद्धा परमात्मरूप जीवद्रव्यापासून अभिन्न आहेत.

उत्पाद–व्यय–ध्रौव्य स्वत:मध्ये पहा.–

ज्याप्रमाणे पिवळ्या भावरूपाने उत्पन्न, हिरव्या भावरूपाने नष्ट आम्रफलरूपाने ध्रुव आंबा एक द्रव्यपर्यायाद्वारे उत्पादव्ययध्रौव्यरूप आहे त्याचप्रमाणे उत्तर अवस्थारूपाने उत्पन्न पूर्वावस्थारूपाने नष्ट द्रव्यत्वरूपाने ध्रुव द्रव्यच एकद्रव्यपर्यायाद्वारे उत्पादव्ययध्रौव्यरूप आहे.

उत्पादव्ययध्रौव्य हे द्रव्याचे लक्षण आहे. लक्षण लक्ष्याची प्रसिद्धी करते. उत्पादव्ययध्रौव्य द्रव्याला प्रसिद्ध करते. अनेक द्रव्यपर्यायरूपाने व एकद्रव्यपर्यायरूपाने द्रव्यच उत्पादव्ययध्रौव्यरूप आहे. प्रत्येक द्रव्य स्वतंत्र स्वतंत्र परिणमन करीत आपल्या उत्पादव्ययध्रौव्यापासून भिन्न होत नाही. एखादे कार्य अनेक द्रव्यांच्या सहयोगातून उत्पन्न झाले तरी प्रत्येकाचे परिणमन आपापल्या मध्येच होते. सर्वांचे अनुकूल परिणमन त्या कार्याचे निमित्तकारण आहे. जसे पाच महिलांनी मिळून पुरणाच्या पोळ्या केल्या. एक स्त्रींनी कणिक तिंबली, एकांनी डाळ शिजविली, तिसऱ्या महिलेनी पोळी लाटली व एकांनी पोळी शेकली. सर्व महिलांचे आपापल्या भावरूपाने उत्पादव्ययध्रौव्यरूप परिणमन होत आहे. आणि डाळीमध्ये स्वतंत्ररूपाने उत्पादव्ययध्रौव्यरूप

परिणमन होत आहे. त्यांच्यामध्ये परस्पर निमित्तनैमित्तिकपणा आहे; परंतु एकाचे उत्पादव्ययध्रौव्यरूप परिणमन दुसऱ्या द्रव्यरूपाने होत नाही.

यावरून हे सिद्ध होते की आपण स्वत:मध्ये विकास करण्याचा जेवढा प्रयत्न करू तेवढा स्वत:चा फायदा होणार आहे. दुधामध्ये जेवढी साखर घालू तेवढे दूध गोड होते. गुणांचे पर्याय द्रव्यच आहेत, ते द्रव्याला सोडून भिन्न होऊ शकत नाहीत. आमच्या श्रद्धा, ज्ञान, चारित्र गुणांचा जेवढा विकास होईल तेवढे आपले जीवद्रव्य चमकणार आहे. सोने जेवढे शुद्ध होते तेवढे त्या सोन्याला चकाकी अधिक येते. रत्नाला जेवढे पैलू पाडू तेवढे ते रत्न दैदीप्यमान होते. द्रव्याचा अद्‌भुत महिमा जाणून द्रव्यस्वभावाचे चिंतन-मनन करावे. विभावाचा त्याग करून स्वभावरूप परिणमण्याची शक्ती आपल्याच द्रव्यामध्ये आहे; कारण गुणांच्या पर्यायरूपाने द्रव्य स्वयं परिणमते.

म्हणून मोह, राग-द्वेषरूपी विभावांचा त्याग करावा व स्वभावभाव प्रकट करावा. त्यासाठी टंकोत्कीर्ण ज्ञायकस्वभावी ध्रुवद्रव्याचा आश्रय घ्यावा. आत्मा स्वत:च्या स्वभावानुसार स्वत: परिणमतो हे जाणून सहजज्ञान स्वभावामध्ये तन्मय होऊन आत्मपणाचा अनुभव घ्यावा. ज्याद्वारे विभावरूप किट्टकालिमा नष्ट होऊन स्वभावरूप शुद्ध आत्मा प्रकट होतो.

द्रव्याचे सत् हे लक्षण पूर्वी सांगितले आहे. सत् म्हणजेच अस्तित्व. अस्तित्व हा द्रव्याचा गुण आहे. द्रव्यापासून त्याची सत्ता भिन्न नाही. अज्ञानी जीव परामुळे आपली सत्ता जाणतो. सर्व लोक मला मान देतील तर माझी सत्ता राहील. स्त्री-पुत्रादी असतील तर माझे अस्तित्व आहे. धन असेल तर माझे अस्तित्व आहे. शरीर असेल तर मी टिकू शकतो. आपल्या मुलाने प्रशंसनीय काम केले तर माझी प्रतिष्ठा वाढते व मुलाने निंद्यकर्म केले तर माझी प्रतिष्ठा धुळीला मिळते अशी मूढ जीवांची कल्पना आहे. म्हणून आचार्य येथे द्रव्य व सत्ता यामध्ये अभेद युक्तीने सिद्ध करतात. -

ण हवदि जदि सद्दवं असद्‌धुव्वं हवदि तं कहं दव्वं ।
हवदि पुणो अण्णं वा तम्हा दव्वं सयं सत्ता ।।१०५।।

अन्वयार्थ- (**जदि**) जर (**दव्वं**) द्रव्य (**सद् ण हवदि**) स्वरूपाने सत् नाही तर (**धुव्वं असद् हवदि**) निश्चितपणे ते असत् होईल. (**तं कहं दव्वं**) जे असत् आहे ते द्रव्य कसे असू शकेल ? (**वा पुणो**) किंवा ते द्रव्य (**अण्णं हवदि**) सत्तेपासून भिन्न होईल. (ज्याअर्थी ह्या दोन्ही गोष्टी होऊ शकत नाहीत)

(**तम्हा**) त्याअर्थी (**दव्वं**) द्रव्य (**सयं**) स्वयं (**सत्ता**) सत्तास्वरूप आहे.

तात्पर्य – द्रव्य स्वयं सत्तामय आहे.

द्रव्य स्वरूपाने सत् –

प्रत्येक द्रव्य स्वरूपाने सत् आहे. कोणाच्या कृपेने नाही. त्याला आपल्या अस्तित्वासाठी परावर अवलंबून राहण्याची गरज नाही. प्रत्येक द्रव्याची सत्ता स्वतःपासून अभिन्न आहे. अस्तित्व गुणामुळे सर्व द्रव्ये टिकून आहेत. अस्तित्व व अस्तित्ववान कधीच वेगळे होऊ शकत नाहीत. ज्याप्रमाणे सुवर्णाचे सुवर्णत्व सुवर्णापासून वेगळे नाही. त्याप्रमाणे द्रव्याचे अस्तित्व द्रव्यापासून वेगळे नाही. चेतन जीव स्वयं आपल्या अस्तित्वाचा अनुभव करतो. शेष अचेतन द्रव्ये आपल्या अस्तित्वाचा अनुभव करू शकत नाहीत, परंतु जीव त्यांचे अस्तित्व जाणतो. ते द्रव्य दिसत आहेत. याचा अर्थ त्यांचे अस्तित्व आहे. परंतु या अज्ञानी जीवाने पराचे अस्तित्व जाणण्याबरोबर एक घोर अपराध केला की त्या परपदार्थाच्या अस्तित्वाला आपले अस्तित्व मानून बसला आहे. पराचे अस्तित्व कधी स्व जीवरूपाने होऊ शकत नाही व अज्ञानी त्याला आपले मानल्याशिवाय राहत नाही. येथूनच संसाराची विपदा सुरू झाली, जर जीवाने पराचे अस्तित्व स्वतःचे मानले नाही तर विपदे पासून सुरक्षा होईल. चार गतीच्या दुर्घटना घडणार नाहीत. यासाठी प्रत्येक द्रव्याचे अस्तित्व त्या द्रव्यापासून अभिन्न जाणण्याची गरज आहे. या ग्रंथामध्ये पूर्वी द्रव्याचे स्वरूपास्तित्व व सादृश्यास्तित्व सिद्ध केले आहे.

द्रव्याला स्वरूपाने सत् न मानल्याने दोषप्रसंग–

प्रथम दोष – जर द्रव्य स्वरूपाने सत् मानले नाही तर द्रव्य असत् होईल. व जे असत् आहे ते द्रव्यच राहू शकत नाही. कारण ज्यामध्ये अस्तित्व नाही ती कोणतीही वस्तूच होऊ शकत नाही. द्रव्याचे ध्रौव्य संभवणार नाही. सोन्याचे अस्तित्वच नाही तर सोने तर सोने कसे राहू शकणार? साखरेचे अस्तित्वच नाही तर साखर कशी असू शकणार. जीवाचे अस्तित्व नाही तर जीवच राहू शकणार नाही. असे झाले तर द्रव्याचाच नाश होईल. सर्व शून्यपणाचा दोष येईल.

जर द्रव्य सर्वथा असत् मानले तर त्या द्रव्यापासून कोणतेही कार्य होऊ शकणार नाही. तेच देवागमस्तोत्रामध्ये समन्तभद्र आचार्य म्हणतात.–

यद्यसत्सर्वथा कार्यं तन्माजनि खपुष्पवत् ।
मोपादाननियामो भून्माऽश्वासः कार्यजन्मनि ।।

जर द्रव्याची सत्ता ध्रुव मानली नाही अर्थात् सर्वथा असत् मानली तर द्रव्य कार्याला उत्पन्न करू शकणार नाही. असत् द्रव्य आकाशफुलाप्रमाणे होऊन जाईल. सोन्याचे अस्तित्व कायम टिकून असल्यामुळेच त्यापासून अनेक दागिने उत्पन्न होऊ शकतात. जर द्रव्य टिकून राहिले नाही तर उपादान कारणाचा नियम राहणार नाही अर्थात् सोन्यापासूनच सोन्याचे दागिने बनतात. घागर मातीपासून बनते इत्यादी नियम राहणार नाही. जर सोने आपले अस्तित्व टिकवून ठेऊ शकले नाही तर त्यापासून दागिने बनतील असा नियम राहू शकणार नाही आणि मनामध्ये असा विश्वासच होऊ शकणार नाही की अमुक कार्य अमुक कारणापासून उत्पन्न होईल.

ज्वारीपासून भाकरी बनते. गव्हापासून चपाती बनते असा विश्वास झाल्यावरच लोक ज्वारी, गहू खरेदी करतात. या विश्वासाचे कारण ज्वारीची, गव्हाची सत्ता आहे. म्हणून स्वरूपाने सत् टिकून असल्यामुळे स्वतः स्वतःला धारण करीत ते द्रव्याला प्रसिद्ध करते.

दुसरा दोष – जर द्रव्य स्वरूपाने सत् नाही तर द्रव्य सत्तेपासून भिन्न मानावे लागेल जर द्रव्य व सत्ता दोघांना भिन्न-भिन्न मानले तर दोघांचा अभाव होऊन जाईल. कारण द्रव्याशिवाय सत्ता कोठे राहील व सत्तेशिवाय द्रव्य कसे राहू शकेल. ज्याप्रमाणे साखरेपासून त्याची गोडी वेगळी मानली तर दोन्ही भिन्न होतील. दोघांना वेगळे मानले तर दोघांचा अभाव होईल. कारण साखरेशिवाय गोडी कोठे राहणार व गोडीशिवाय साखर ही साखर कशी राहू शकेल ? त्याप्रमाणे द्रव्याशिवाय सत्ता राहू शकत नाही व सत्तेशिवाय द्रव्य राहू शकत नाही. द्रव्य सत्तेपासून भिन्न आहे तर सत्तेशिवायसुद्धा द्रव्याने स्वतःला कायम ठेवले. व असे झाले तर सत्तेचे एवढेच काम होते की द्रव्य कायम टिकावे. ते काम सत्तेशिवाय जर होत असेल तर सत्तेची गरजच राहणार नाही. सत्ताच अस्ताला प्राप्त होईल.

म्हणून द्रव्य सत्तेपासून अभिन्न आहे. त्यामुळे द्रव्य स्वतःला धारण करते व स्वद्रव्याला टिकवून ठेवणाऱ्या सत्तेला ते प्रकट करते. एखादी वस्तू हरवते तेव्हा आपण म्हणतो वस्तू गेली. एखाद्या व्यक्तीचा वियोग झाला की शोक करतो की अमुक व्यक्ती मला सोडून गेली. विचार केला तर लक्षात येईल की वस्तू गेली म्हणजे कोठे गेली ? त्या वस्तूचे जेथे अस्तित्व आहे तेथे ती वस्तू आहेच. ती आहे तेथेच तिचे अस्तित्व आहे. तिचे अस्तित्व आमच्या

ज्ञानाच्या आड झाले आहे म्हणून आपल्याला वाटते की वस्तू गेली. नष्ट झाली. वस्तू कधीही नष्ट होत नाही. कारण वस्तूचे अस्तित्व सदैव आहे. वस्तूपासून अस्तित्व कधी बाजूला ही होत नाही.

व्यक्तीचा आपल्यापासून वियोग झाला तरी ती व्यक्ती कुठेतरी आहे. कारण जीवद्रव्याचा ही सर्वथा नाश होत नाही. आपल्यामध्ये ती व्यक्ती नसली तरी स्वर्गामध्ये किंवा अन्य कोणत्यातरी गतीमध्ये तिचे अस्तित्व आहे. तेथे ती आपल्या स्वरूपाने सत् आहे. आपल्यातून निघून गेली तेव्हा ती आपल्या अस्तित्वाला घेऊनच गेली. कारण व्यक्तीपासून तिचे अस्तित्व वेगळे होऊ शकत नाही म्हणून स्वतःचे अस्तित्व स्वतःपासून अभिन्न व पराचे अस्तित्व परापासून अभिन्न जाणावे.

एक विसराळू मुलगा होता. त्याची आई त्याला म्हणाली, 'बाजारात जाऊन भाजीपाला घेऊन ये.' तेव्हा तो विसराळू म्हणतो, 'आई, मी जर बाजारात गेलो तर तेथे विसरून जाईन. म्हणून मी जात नाही'. आईने उपाय शोधला व ती म्हणाली'. ' मी तुझ्या हाताच्या मनगटाला एक कापड बनते. तो कपडा सतत पाहत राहायचे व म्हणायचे की मी विसरलो नाही. तो बाजारात गेला. भाजी घेऊन घरी येऊ लागला. तेवढ्यात कच्च्या दोऱ्याने बांधलेले कापड कोठे निसटून पडले. ते गर्दीमध्ये लक्षात आले नाही. तेव्हा तो रडत ओरडत घरी आला व आईला म्हणू लागला की आई, मी हरवलो, मी विसरलो'. तेव्हा आईने विचार केला की हा माझा मुलगा जशाच्या तसा आहे आणि असे का ओरडत आहे. तिला लक्षात आले. तिने त्याला झोपवले आणि हळूच त्याच्या हातामध्ये कापड बांधले. तो झोपून उठल्यावर हातात पाहतो तर कापड बांधलेले आहे. तो लगेच ओरडू लागला. 'मी आहे, मी विसरलो नाही, मी हरवलो नाही'. त्या मुलाप्रमाणेच आम्ही आमचे अस्तित्व परामध्ये मानून बसलो आहोत. घर आहे तर मी आहे, धन आहे तर मी आहे, स्त्री-पुत्रादी आहेत तर मी आहे. त्यांचे अस्तित्व संपले की माझे अस्तित्व नष्ट झाले. धन चोरीला गेले की गळफास लावून घेतो. प्रिय स्त्री गेली की स्वतः विषभक्षण करून आत्महत्या करतो. खिशातले पैसे खर्च झाले की बेचैन होतो. या सर्व परवस्तूंमध्येच अज्ञानीने आपले अस्तित्व ठेवले आहे. स्वतःमध्ये स्वतःचे अस्तित्व पाहत नाही, जाणत नाही. अनुभवत नाही. अज्ञानी शरीरामध्ये स्वतःचे अस्तित्व मानतो. त्यामुळे शरीरामध्ये रोग झाला. शरीर नष्ट होण्याचा प्रसंग आला की बेचैन होतो. शरीरामध्ये पुद्गलपरमाणूंचे अस्तित्व आहे. माझे

नाही. शरीरामुळे माझे अस्तित्व नाही. माझे चैतन्यरूप अस्तित्व माझ्यापासून अभिन्न आहे असे ज्ञानी जाणतो. त्यामुळे तो आपल्या स्वरूपास्तित्वामध्ये संतुष्ट होतो, तृप्त होतो. आपले स्वरूपास्तित्व लक्षात आले की जीवन सफल झाले असे समजा. **आपल्या स्वरूपास्तित्वामध्ये येणे हेच धर्माचे मूळ आहे. हीच धर्माची सुरुवात आहे. स्वरूपास्तित्व सर्वश्रेष्ठ आहे व ते सत् द्वारे जाणले जाते.** म्हणून सतत स्वरूपास्तित्वाचा अनुभव करण्याचा प्रयत्न करावा.

मागील गाथेमध्ये द्रव्य स्वयं सत्स्वरूप आहे हे सांगितले. यावरून अनेक गोष्टी सिद्ध झाल्या. द्रव्य सत्तेपासून वेगळे नाही, द्रव्य सत्तेच्या समवायाने सत् नाही, द्रव्य उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे, द्रव्य प्रदेशात्मक व गुणपर्यायात्मक आहे, इत्यादी. द्रव्य व सत्तेमध्ये अभिन्नपणा आहे ही गोष्ट पूर्व गाथेमध्ये युक्तीने सिद्ध केली. सत्ता गुण आहे व द्रव्य गुणी आहे. गुण व गुणीमध्ये सर्वथा अभेद नाही. कथंचित् भेद व कथंचित् अभेद आहे ही गोष्ट प्रकट करण्यासाठी आचार्य पुढील गाथेत पृथक्त्व व अन्यत्वाचे लक्षण सांगतात–

पविभत्तपदेसत्तं पुधत्तमिदि सासणं हि वीरस्स ।
अण्णत्तमतब्भावो ण तब्भवं हवदि कधमेगं ।।१०६।।

अन्वयार्थ – (पविभत्तपदेसत्तं) भिन्न-भिन्न प्रदेशपणा **(पुधत्त)** पृथक्त्व आहे **(इदि हि)** असाच **(वीरस्स सासणं)** वीर भगवंतांचा उपदेश आहे. **(अतब्भावो)** त्यारूप न होणे **(अण्णत्तं)** अन्यत्व आहे **(ण तब्भवं)** जे त्यारूप नाही ते **(कधमेगं)** एकरूप कसे **(हवदि)** होऊ शकते ?

तात्पर्य – प्रदेशभेद असणे पृथक्त्वाचे लक्षण आहे व तद्भाव नसणे हे अन्यत्वाचे लक्षण आहे.

पृथक्त्व व अन्यत्वामध्ये विलक्षणता –

या गाथेमध्ये आचार्यांनी भेद दोन प्रकारचा सांगितला आहे. १) एक पृथक्त्व २) दुसरा अन्यत्व. प्रदेशभेद असणे अर्थात् जेथे एका द्रव्याचे प्रदेश दुसऱ्या द्रव्याच्या प्रदेशापासून भिन्न असतात तेथे पृथक्त्व नावाचा भेद असतो. जसे काठी व काठीवाला पुरुष. जेथे प्रदेश एक असताना ही संज्ञा-लक्षण-प्रयोजनादींच्या अपेक्षेने भेद असतो तेथे अन्यत्व नावाचा भेद असतो. दोन द्रव्यामध्ये पृथक्त्व नावाचा भेद आहे. गुण व गुणीमध्ये तसेच पर्याय व पर्यायवानामध्ये अन्यत्व नावाचा भेद आहे.

या विश्वात अनंतानंत जीव आहेत त्या सर्वांमध्ये पृथक्त्व आहे. प्रत्येक जीव आपापल्या प्रदेशांनी भिन्न-भिन्न राहतात. परस्परांमध्ये मिसळत नाहीत. पुद्‌गलाचे परमाणू बंधरूप स्कन्धदशेमध्ये सुद्धा एक दुसऱ्यापासून प्रदेशांच्या अपेक्षेने भिन्न भिन्नच आहेत. स्कन्धातील अनंतानंत परमाणू एकत्र राहतात, परंतु प्रत्येकाचे प्रदेश पृथक् पृथक् आहेत. त्यांच्यामध्ये प्रदेशभेद नसता तर अनंतानंत परमाणू एकप्रदेशी झाले असते. त्यांना अनंतानंत प्रदेशीच म्हटले जाते. कालाणुद्रव्ये असंख्यात आहेत. त्यांच्यामध्ये ही परस्पर प्रदेशभेद आहे म्हणून ते रत्नाच्या राशीप्रमाणे भिन्न भिन्न आहेत. धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय, आकाशास्तिकाय एकेक अखण्ड द्रव्य आहेत. सहाही द्रव्यांमध्ये पृथक्त्व आहे. जीव व शरीर एकत्र आहेत, परंतु त्यांच्यामध्ये प्रदेशभेद आहे म्हणून पृथक्त्व आहे. जीवाचे प्रदेश भिन्न आहेत व पुद्‌गल परमाणू प्रदेश भिन्न आहेत. हे प्रत्यक्ष प्रतीतीला येते. ज्यावेळी जीव मरण पावतो तेव्हा आपण प्रत्यक्ष पाहतो की जीव निघून जातो व प्रेतरूप शरीर येथेच राहते. त्या जीवाचे जेवढे गुणपर्यायरूप अस्तित्व होते ते बाजूला झाले व शरीररूप परमाणूंचे अस्तित्व बाजूला झाले. दोन अस्तित्व भिन्न होते म्हणून ते वेगळे झाले. ज्याप्रमाणे पिंजऱ्यातील पोपट पिंजरा सोडून उडून जातो. पिंजरा तेथेच राहतो. यावरून पिंजरा व पोपट भिन्न आहेत हे लक्षात येते. त्याप्रमाणे शरीर व आत्म्याचे प्रदेश भिन्न आहेत.

ज्या गुणांना द्रव्य आश्रय देते त्यांच्याबरोबर द्रव्याचे कधीही पृथक्त्व नव्हते, नाही व पुढेही होणार नाही. कारण गुणांच्या समूहाला द्रव्य म्हणतात. गुणांचा द्रव्याशी तादात्म्य संबंध आहे. ते कधीही एकमेकांपासून पृथक् होत नाहीत. परंतु तरीसुद्धा त्यांच्यामध्ये स्वरूपभेद आहे म्हणून अन्यत्व आहे. (पांढऱ्या वस्त्राप्रमाणे) जे पांढऱ्या रंगाचे प्रदेश आहेत तेच वस्त्राचे प्रदेश आहेत व जे वस्त्राचे प्रदेश आहेत तेच पांढऱ्या रंगाचे प्रदेश आहेत. त्यांच्यामध्ये प्रदेश भेद नाही त्याचप्रमाणे जे सत्ता गुणाचे प्रदेश आहेत तेच गुणी द्रव्याचे प्रदेश आहेत. जे द्रव्याचे प्रदेश आहेत तेच सत्ता गुणाचे आहेत. परंतु असे असूनसुद्धा त्यांच्यामध्ये अन्यत्व आहे. कारण त्यांच्यामध्ये अन्यत्वाचे लक्षण संभवते. अतद्भाव हे अन्यत्वाचे लक्षण आहे. गुण व गुणीमध्ये स्वरूपभेद आहे. संज्ञा, लक्षण व प्रयोजन या अपेक्षेने गुण व गुणीमध्ये भेद आहे. पांढऱ्या वस्त्रामध्ये, वस्त्राचे नाव वस्त्र आहे. पांढऱ्या रंगाचे नाव पांढरा रंग आहे. दोघांची संज्ञा

भिन्न आहे. वस्त्र अनेक धाग्यांचा समूहस्वरूप आहे. पांढरा रंग एक गुण स्वरूप आहे. पांढरा रंग एक केवल डोळ्याचा विषय आहे. वस्त्र पाचही इन्द्रियांचा विषय आहे. वस्त्र वाऱ्याने फडफडताना त्यांचा कानाने आवाज ऐकू येतो. वस्त्र डोळ्याने दिसते. हाताने त्याचा मऊ किंवा कठीण स्पर्श लक्षात येतो. नाकाने त्याचा वास येतो. तोंडाने वस्त्राचा स्वाद येतो. अशाप्रकारे वस्त्र पाचही इन्द्रियांचा विषय होऊ शकते, परंतु पांढरा रंग केवळ डोळ्याने दिसतो, त्याचे अन्य इन्द्रियाने ज्ञान होत नाही. वस्त्राचे प्रयोजन शरीर झाकणे आहे व पांढऱ्या रंगाचे प्रयोजन उज्ज्वलता ठेऊन मलिनता दूर करणे आहे. अशाप्रकारे वस्त्र व पांढऱ्या रंगामध्ये प्रदेशाच्या अपेक्षेने भेद नसताना ही संज्ञा-लक्षण प्रयोजनाच्या अपेक्षेने भेद आहे म्हणून अतद्भावरूप अन्यत्व आहे. त्याप्रमाणे सत्ता गुण व द्रव्यामध्ये प्रदेश भेद नाही तरीसुद्धा संज्ञालक्षण प्रयोजनाच्या अपेक्षेने भेद आहे. सत्ता गुणाचे नाव सत्ता आहे. द्रव्याचे नाव द्रव्य आहे. सत्तेचे लक्षण अस्तित्वरूप आहे. द्रव्याचे लक्षण गुणांचा समूह आहे. द्रव्याचे प्रयोजन विशिष्ट अर्थक्रियाकारीपणा आहे. सत्ता गुणाचे प्रयोजन पदार्थाला टिकवून ठेवणे आहे. म्हणून द्रव्य व सत्तेमध्ये पृथक्त्व नसताना ही अन्यत्व आहे.

गुणलक्षण –

अमृतचन्द्र आचार्यांनी सत्तागुणाचे लक्षण सांगताना त्याच्या ५ विशेषता सांगितल्या आहेत. १) कुणाच्या तरी आश्रयाने राहणारा, २) निर्गुण ३) एक गुणरूप ४) विशेषण विधायक व ५) वृत्तिस्वरूप

१) आश्रित्यवर्तिनी– १) सत्ता गुण द्रव्याच्या आश्रयाने राहतो. गुण निराधार राहू शकत नाहीत. तत्त्वार्थसूत्रामध्ये गुणाची व्याख्या करताना गृद्धपिच्छाचार्य म्हणतात- 'द्रव्याश्रया निर्गुणा गुणाः।' गुणांचा आधार द्रव्य आहे. ज्याप्रमाणे पांढरा रंग वस्त्राच्या आश्रयाने राहतो. गुण आधेय आहेत. द्रव्य आधार आहे. आंबा आधार आहे, त्यामध्ये गोड रस, पिवळा वर्ण, सुगंध, स्पर्श हे गुण आधेयरूपाने आहेत. गुण आधाराशिवाय राहू शकत नाही. कारण गुणाला स्वतंत्र प्रदेश नाहीत. जे द्रव्याचे प्रदेश तेच गुणांचे प्रदेश. ज्याप्रमाणे साखरेच्या आश्रयाने गोडी राहते. अग्नीच्या आधाराने उष्णता राहते. त्याप्रमाणे द्रव्याच्या आधाराने गुण राहतात.

२) निर्गुण – सत्ता गुण गुणरहित आहे कारण गुणांमध्ये गुण राहत नाहीत. एक गुण दुसऱ्या गुणाच्या आश्रयाने असत नाही. द्रव्य गुणवान असते

पण गुण गुणवान असत नाही. गुणामध्ये पुनः दुसरे गुण नसतात. जसे आंब्यामध्ये पिवळा रंग आहे. पिवळ्या रंगामध्ये पुनः दुसरा रंग नाही. आत्म्यामध्ये ज्ञान आहे. पुनः ज्ञानामध्ये दुसरे ज्ञान नाही. गुणामध्ये गुण राहू लागले तर एकेक गुण म्हणजे स्वतंत्र द्रव्य होईल. म्हणून एका गुणामध्ये अन्य गुणांचा अभाव असल्यामुळे तो निर्गुण आहे.

३) एक गुण समुदित – सत्ता एकाच गुणाचा समूहस्वरूप आहे. गुणामध्ये अन्य गुण नसल्यामुळे तेथे अनेक गुणांचा समूह नाही. प्रत्येक गुण एक-एकटेच आहेत.

४) विशेषण विधायिक– सत्ता द्रव्याचे विशेषण आहे. गुण हे विशेषण असतात. गुणामुळेच द्रव्यांमध्ये भिन्नता होते. उष्णता व शीतलता या गुणामुळेच अग्नी व पाणी यामध्ये भेद होतो. गुण द्रव्यांची विशेषता सांगतात म्हणून गुण हे विशेषण आहेत. वस्तूला अवस्तूपासून पृथक् करणारी आहे.

५) वृत्तिस्वरूप – वृत्ति म्हणजे असणे, विद्यमानता सत्तागुणामुळेच उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप अस्तित्व आहे.

याउलट द्रव्याची ५ विशेषणे सांगितली आहेत. १) आश्रयाने न राहणारे, २) गुणवान् ३) अनेक गुणांचा समूह स्वरूप ४) विशेष्यरूप असणारे ५) वृत्तिमान असे द्रव्य आहे.

१) अनाश्रित्यवर्ति – द्रव्य गुणांना आधार देते पण द्रव्याला कुणाच्या आधाराची गरज नाही. कारण ते स्वयं आधारवान आहे. गुणांचा आश्रय द्रव्य, परंतु द्रव्याचा आश्रय दुसरा कोणी नसतो. कुटुंबातील मुख्य सर्व कुटुंबियांना आधार देते पण त्याचा कोणी आधार नसतो. तो स्वयं स्वतःच्या बळावर राहतो. त्याप्रमाणे द्रव्य सर्व गुणांना आधार देण्याचे काम करते पण द्रव्य स्वतःच्या आधाराने राहते, कारण ते स्वयं प्रदेशवान आहे. स्वयं सामर्थ्यशाली आहे.

२) गुणवत्– द्रव्य गुणांनी युक्त आहे. गुणसंपन्न आहे. आंबा स्पर्शरसगंधवर्णवाला आहे. जीव ज्ञानदर्शन-सुखवीर्यसंपन्न आहे. द्रव्यांनी गुणांना आपल्यामध्ये थारा दिल्यामुळे ते गुणवान आहे.

३) अनेकगुणसमुदित – द्रव्य गुणांना आधार देत असल्यामुळे त्यामध्ये अनंत गुणांचा साठा आहे. ज्याप्रमाणे सागर आपल्यामध्ये अगणित रत्नांना घेऊन असतो म्हणून तो रत्नाकर आहे. त्याप्रमाणे द्रव्य आपल्यामध्ये

अनंतगुणरत्नांना समाविष्ट करते, म्हणून अनेक गुणांचा ते आकर आहे. गुणाकर आहे. एका गुणांनी द्रव्य बनत नाही. अनंत गुणांचा समूह म्हणजे द्रव्य आहे.

४) विशेष्य विधीयमान – गुण ज्याचे विशेषण आहेत असे द्रव्य विशेष्य आहेत. गुण द्रव्याबद्दल माहिती सांगतात म्हणून द्रव्य विशेष्य आहे व गुण विशेषण आहेत. जसे सोने विशेष्य आहे व पिवळेपणा हे त्या सोन्याचे विशेषण आहे. द्रव्य विशेष्य व सत्तागुण त्याचे विशेषण आहे.

५) वृत्तिमत्स्वरूप – सत्तागुण उत्पादव्ययध्रौव्य अस्तित्व स्वरूप आहे तर द्रव्य त्या उत्पादव्यय-ध्रौव्यस्वरूप अस्तित्वाला धारण करणारे वृत्तिमान् आहे.

अशाप्रकारे सत्ता व द्रव्य यामध्ये स्वरूपभेद आहे. म्हणून तद्भावाचा अभाव आहे म्हणजेच सत्ता शब्दाचे वाच्य एक सत्तागुण आहे व द्रव्य शब्दाचे वाच्य अनेकगुणांचा समूहात्मक वस्तू आहे म्हणून जी सत्ता आहे ते द्रव्य नाही व जे द्रव्य आहे तो सत्तागुण नाही. ज्याप्रमाणे जे वस्त्र आहे तो पांढरा रंग नाही व पांढरा रंग आहे ते वस्त्र नाही. पांढऱ्या रंगाचे वाच्य एक पांढरा रंगच आहे, वस्त्र शब्दाचे वाच्य पाच इन्द्रियांचा विषयभूत पदार्थ आहे. जो आंबा आहे तो गोड गुण नाही, जो गोड गुण आहे तो आंबा नाही. आंबा रसनेन्द्रियाने चाखता येतो, स्पर्शनेन्द्रियाने त्याचा मऊ स्पर्श जाणला जातो, घ्राणेन्द्रियाने त्याचा सुगंध घेता येतो. डोळ्याने त्याचा वर्ण पाहता येतो. आंबा चोखून खाताना त्याचा आवाज ऐकू येतो. तो पाचही इन्द्रियांचा विषय आहे. परंतु आंब्याचा गोड रस फक्त रसनेन्द्रियानेच चाखता येतो अन्य इन्द्रियाने त्याचे ज्ञान होत नाही, म्हणून आंबा व त्याचा गोड रस यामध्ये प्रदेशांच्या अपेक्षेने अभिन्नता असली तरी स्वरूपाच्या अपेक्षेने भिन्नता आहे. त्याप्रमाणे द्रव्य व सत्तागुण यांच्यामध्ये प्रदेशभेद नसला तरी सर्वथा एकरूपता मानू नये. तद्भाव हे एकत्वाचे लक्षण आहे. 'तेच हे आहे' असे आढळून येत नाही ते एक कसे असू शकेल ? भाव आहे की सत्ता व द्रव्यामध्ये गुणगुणीरूपाने नानापणा आहे, भेद आहे. प्रदेशभेद नसल्यामुळे अनन्यपणा, अभेद आहे.

सर्वथा अभेद मानला तर भिन्न भिन्न नाव व काम असू शकत नाही. तसेच सर्वथा भेद मानला तर दोघांचा ही अभाव होऊन जाईल. म्हणून सत्ता व द्रव्यामध्ये कथंचित् भेद व कथंचित् अभेद मानणे उचित आहे. हीच **स्याद्वादशैली विरोधदोष दूर करणारी समन्वयसाधिका आहे. एकान्तविषाचा**

नाश करणारी, अमृताचे सिंचन करणारी आहे. स्याद्वादशैली ही जिनेंद्र भगवंतांची देन आहे. हे अंतिम तीर्थंकर वीरांचे शासन आहे.

पृथक्त्व व अन्यत्व लक्षण जाणल्यामुळे होणारा लाभ –

पृथक्त्वलक्षण जाणल्यामुळे भेदविज्ञानाची उपलब्धी होते. आत्मा व शरीर यांचे प्रदेश भिन्न असल्यामुळे यांच्यामध्ये पृथक्त्व आहे. अज्ञानी जीव शरीरामध्ये आत्मबुद्धी करून शरीरापासून स्वतःला अभिन्न मानतो. मी शरीरापासून भिन्न आहे ही गोष्ट गळी उतरत नाही. पृथक्त्व लक्षण जाणल्यामुळे शरीर व आत्मा यामध्ये भेद लक्षात येतो. अज्ञानी जीवाला लवकर पटत नाही, म्हणून कुंदकुंदाचार्य वीर भगवंतांच्या नावाने हा माल खपवतात. जेव्हा सामान्य व्यक्तीचे कोणी ऐकत नाही तेव्हा विशेष व्यक्तींचे नाव घेऊन आज्ञा सुनावली जाते तेव्हा ती लोकांना मान्य होते. त्याप्रमाणे कुंदकुंदाचार्यांना ही गोष्ट ज्ञात होती की ही भेदविज्ञानाची प्रक्रिया वीर भगवंतांचा हवाला दिल्याशिवाय अनादिमूढ मिथ्यादृष्टी मान्य करणार नाही. वीर प्रभूंचा हा आदेश आहे की दोन द्रव्यामध्ये सर्वथा प्रदेशभेद असल्यामुळे भिन्नपणा आहे. अज्ञानी तर प्रत्यक्ष भिन्न दिसणाऱ्या दोन वस्तूंमध्ये ही अभेद मानतो. स्त्री माझी आहे, मुलगा माझा आहे, धन, रत्न, हिरे, माणिक मोती, सोने चांदी, गाडी–बंगला, नोकर–चाकर माझे आहेत अशा अज्ञानीच्या मान्यतेला येथे तडा जातो. ज्यांचे प्रदेश प्रत्यक्ष भिन्न दिसत आहेत ते एक कसे होतील ? म्हणून ज्याचे प्रदेश आपल्या प्रदेशांपासून भिन्न आहेत, त्यापासून स्वतःला वेगळे जाणावे व मानावे.

लक्षण भेद जाणल्यामुळे दुसरा लाभ स्वतःच्या गुणसंपत्तीची ओळख होते. माझे गुण माझ्यापासून कधीही भिन्न होऊ शकत नाहीत. कारण त्यामध्ये व माझ्यामध्ये प्रदेशभेद नाही. माझे गुणरूपी वैभव माझ्यापासून कधीही वेगळे होऊ शकत नाही, ते सदैव माझ्यापासून अनन्य आहे अभिन्न आहे. माझ्या गुणांना कोणी वेगळे करण्याचा प्रयत्न केला तरी वेगळे करू शकत नाही. माझे ज्ञान, माझे सुख कोणी हिसकावून घेऊ शकत नाही.

द्रव्य व गुणामध्ये कथंचित् अन्यत्व असल्यामुळे दोन्हीही टिकून आहेत जर सर्वथा अभेद असता तर दोघांचा अभाव झाला असता. प्रत्येक गुण आपापल्या लक्षणाने आपापले स्वतन्त्र अस्तित्व टिकवून आहे. प्रत्येक गुणाचे भिन्न–भिन्न स्वरूपास्तित्व आहे म्हणून तर अनंत गुणांचा समूह स्वरूप मी आत्मा अनंतगुण संपन्न होऊ शकतो. ज्याचे गुण त्याला लखलाभ. गुण–गुणी

अशी भेदकल्पना सोडून स्वतःला अखण्ड एक ज्ञानानन्द स्वभावमात्र अनुभवावे.

सामान्य द्रव्याच्या सिद्धीचा अधिकार आहे. द्रव्याची सत्ता द्रव्यापासून भिन्न आहे की अभिन्न आहे हा एक प्रश्न आहे. काही दार्शनिकांनी द्रव्यापासून सत्तेला सर्वथा भिन्न मानले आहे. द्रव्य भिन्न पदार्थ आहे व सत्ता भिन्न पदार्थ आहे. ज्यावेळी सत्तेचा द्रव्याशी समवाय संबंध होतो तेव्हा द्रव्य सत्तावान् होते असे मानतात. काहीजण द्रव्य व सत्तेला सर्वथा अभिन्न अद्वैत मानतात. काही अज्ञानी एका द्रव्यामध्ये तोडफोड करून अनेकता स्थापित करतात व काही अज्ञानी अनेक वस्तूंना जोडून एकता (अद्वैत) स्थापित करतात. परंतु **वस्तू बेतोड व बेजोड आहे. एका वस्तूमध्ये सर्वथा भेद होऊ शकत नाही व अनेक वस्तूमध्ये सर्वथा अभेद होऊ शकत नाही.** जिनेन्द्र भगवंतांनी द्रव्याचे प्रत्यक्ष दर्शन केले आहे. ते म्हणतात द्रव्य सत्तेपासून कथंचित् अभिन्न आहे, कथंचित् भिन्न आहे. त्यालाच आचार्यांनी येथे पृथक्त्व व अन्यत्व या दोन भेदांचे लक्षण सांगून स्पष्ट केले आहे. द्रव्य व सत्ता गुण यामध्ये प्रदेशभेद नाही म्हणून त्यामध्ये पृथक्त्व नाही अभेद आहे, पण त्यामध्ये स्वरूपभेद असल्यामुळे अन्यत्व आहे. त्या अन्यत्वाचेच येथे विस्ताराने कथन करतात. –

सद्दव्वं सच्च गुणो सच्चेव य पज्जओ त्ति वित्थारो ।
जो खलु तस्स अभावो सो तदभावो अतब्भावो ।।१०७।।

अन्वयार्थ : (सद्दव्वं) सत् द्रव्य, **(सच्च गुणो)** सत् गुण **(य)** आणि **(सच्चेव पज्जओ)** सत्च पर्याय **(त्ति वित्थारो)** अशाप्रकारे सत्तागुणाचा विस्तार आहे. **(जो खलु)** निश्चयाने जो **(तस्स अभावो)** त्यांच्यामध्ये परस्पर अभाव आहे. **(सो)** तो **(तदभाव)** त्याचा अभावरूप **(अतब्भावो)** अतद्भाव आहे अर्थात अन्यत्व आहे.

तात्पर्य – सत्लाच द्रव्य गुण पर्यायरूपाने समजावले जाते ते स्वतंत्र सत् नाही.

द्रव्य, गुण व पर्यायामध्ये अन्यत्व

सत् द्रव्य आहे, सत् गुण आहे आणि सत्च पर्याय आहे हा एका सत्तागुणाचा विस्तार आहे. जे प्रदेश द्रव्याच्या सत्तेचे आहेत तेच प्रदेश गुण आणि पर्यायाच्या सत्तेचे आहेत. अशाप्रकारे सत्तेची एकता द्रव्यगुण पर्यायाबरोबर आहे परन्तु जेव्हा गुण आणि गुणी यांच्या स्वरूपाचा विचार केला

जातो तेव्हा सत्तेचा द्रव्यगुणपर्यायाबरोबर भेद आहे. सत्ता या शब्दाने अस्तित्वाचा (आहेपणाचा) बोध होतो, द्रव्यगुणपर्यायाचा बोध होत नाही. त्याचप्रमाणे द्रव्यगुणपर्याय शब्दाने द्रव्यगुणपर्यायाचा बोध होतो, सत्तेचा बोध होत नाही. म्हणून सत्ता आणि द्रव्य यांच्यामध्ये स्वरूपाच्या अपेक्षेने अन्यपणा आहे.

येथे टीकाकारांनी मोत्याच्या माळेचा दृष्टांत दिला आहे. ज्याप्रमाणे मोत्याची माळा, दोरा आणि मोती या तिन्हींमध्ये शुभ्र (पांढरा) गुण व्यापक आहे. माळा शुभ्र आहे, दोरा शुभ्र आहे, मोती शुभ्र आहेत.

प्रदेशांच्या अपेक्षेने पांढरा गुण व मोत्याची माळा यामध्ये एकत्व आहे. जेथे माळा आहे, दोरा आहे, मोती आहेत, तेथेच पांढरा रंग आहे. जेथे पांढरा रंग आहे तेथेच माळा, दोरा व मोती आहेत; परंतु संज्ञालक्षणादीच्या अपेक्षेने त्यांच्यामध्ये भेद आहे. पांढरेपणा पांढरेपणालाच सांगतो. तो हे सांगत नाही की हार, दोरा व मोती आहे. त्याचप्रमाणे हार, दोरा व मोती आपापल्या स्वरूपालाच सांगतात, पांढरेपणाला सांगत नाहीत. अशाप्रकारे पांढरेपणा आणि हार, दोरा व मोत्यांमध्ये अन्यपणा आहे. त्याचप्रमाणे सत्तेचा विस्तार केला तर द्रव्याची सत्ता, गुणाची सत्ता व पर्यायाची सत्ता अशाप्रकारे तीन प्रकाराने त्याचा विस्तार होतो. या तिन्ही सत्ता परस्पर आपापल्या स्वरूपाने भिन्न आहेत. त्यांच्यामध्ये प्रदेश भेद नाही. जेथे द्रव्याची सत्ता आहे तेथेच गुणाची सत्ता आहे, तेथेच पर्यायाची सत्ता आहे तरीसुद्दा स्वरूपाच्या अपेक्षेने जी द्रव्याची सत्ता आहे ती गुणाची सत्ता नाही, ती पर्यायाची सत्ता नाही. जी गुणाची सत्ता आहे ती द्रव्याची सत्ता नाही, पर्यायाची सत्ता नाही. जी पर्यायाची सत्ता आहे ती द्रव्याची सत्ता नाही, गुणाची सत्ता नाही.

अन्यत्वाचे लक्षण अतद्भाव –

किंवा जो सत्तागुण आहे तो द्रव्य नाही, अन्य गुण नाही व पर्याय नाही, जो द्रव्य, अन्य गुण व पर्याय आहे तो सत्ता गुण नाही. अशाप्रकारे एकाचा दुसऱ्यामध्ये जो अभाव तो तदभाव म्हणजेच अतद्भाव आहे.

द्रव्य गुणांचा समूहस्वरूप अखंड पदार्थ आहे, गुण द्रव्याच्या आश्रयाने राहणारा अन्यगुणरहित नित्य आहे, पर्याय गुणाचा विकार एक क्षणमात्र राहणारा आहे अशाप्रकारे तिघांच्या स्वरूपामध्ये भेद आहे. प्रदेशभेद नाही म्हणून या तिघांमध्ये एकत्व व अन्यत्व आहे.

जे ज्ञानगुणाचे स्वरूप आहे ते आत्म्याचे स्वरूप नाही व जे आत्म्याचे

स्वरूप आहे ते ज्ञानगुणाचे स्वरूप नाही. जो ज्ञानगुण आहे तो दर्शनगुण नाही, चारित्र गुण नाही, जो दर्शन गुण आहे तो ज्ञान गुण नाही, चारित्रगुण होत नाही. जो चारित्रगुण आहे तो ज्ञान नाही, दर्शन नाही. प्रत्येक गुण आपापले काम करतो. एक दुसऱ्याचे काम करीत नाहीत. अग्नीमध्ये अनेक गुण आहेत. – दाहक, प्रकाशक, पाचक, शोषक, इ. जो गुण जाळण्याचे काम करतो तो प्रकाश करण्याचे काम करीत नाही, जो प्रकाश करण्याचे काम करतो तो जाळण्याचे काम करीत नाही. प्रत्येक गुण स्वतन्त्र स्वतन्त्र काम करतात. सर्वांच्यामध्ये एकता असूनही ते स्वतन्त्र आहेत. वस्तुस्वरूपाची वस्तूमध्ये एकता आहे. कसलाही मालक असो, तो आपल्या अधीन असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अधिकार हिसकावून घेऊ शकत नाही, जर असे केले तर दंगल होईल. प्रत्येकजण आपापले अधिकार सुरक्षित ठेऊ इच्छितो. द्रव्यातील प्रत्येक गुण स्वतन्त्र आहे. प्रत्येक गुणाचे स्वतन्त्र कार्य चालू आहे. कोणी कोणाचे परिणमन करीत नाही. आपल्या योग्यतेनुसार परिणमन होत आहे. वस्तुस्वरूपामध्ये कोठेही बेईमानी नाही. सर्व जग आपल्या परिणतीने परिणमित आहे. याचा कोणी सुधारक किंवा नाश करणारा नाही.

एकाच द्रव्यामध्ये जेथे सत्तागुण आहे तेथेच त्याचे द्रव्यस्वरूप आहे. द्रव्य सत्तेला सोडून नाही. सत्ता द्रव्याला सोडून नाही तरीसुद्दा दोन्ही एकस्वरूप नाहीत.

सत् द्रव्याचे लक्षण आहे. अस्तित्व समजल्याशिवाय वस्तुस्वरूपाच्या ज्ञानाविषयी आपण तिळाएवढेसुद्धा पुढे सरकू शकत नाही. 'आहे'चे मर्म जाणल्याशिवाय आत्म्याचे स्वरूप समजणे असंभव आहे. जगातील पदार्थ भिन्न भिन्न आहेत हे सत् द्वारे जाणले जाऊ शकते. सत्चे ज्ञान झाले तर अज्ञानाचे आवरण दूर होते. वस्तूचा परिचय करून घेण्यासाठी द्रव्य व गुणामधील अतद्भावाचे वर्णन केले आहे. त्याला जाणून अतद्भावाला गौण करून केवळ अखंड स्वरूपाचा अनुभव करावा व भेदविकल्प दूर करावा.

अतद्भाव या शब्दाचा अर्थ तद्भावाचा अभाव असा होतो. एकाचा दुसऱ्यामध्ये अभाव हे अतद्भावाचे लक्षण आहे. यावरून कोणी त्याचा अर्थ सर्वथा अभाव ग्रहण करील म्हणून आचार्य पुढील गाथेमध्ये त्याला सावध करतात. –

जं दव्वं तण्ण गुणो जो वि गुणो सो ण तच्चमत्थादो ।
एसो हि अतब्भावो णेव अभावोत्ति णिद्दिट्ठो ।।१०८।।

अन्वयार्थ :– (जं दव्वं) जे द्रव्य आहे **(तण्ण गुणो)** ते गुण नाही. **(जो वि गुणो)** आणि जो गुण आहे **(सो ण तच्चं)** तो द्रव्य नाही. **(अत्थादो)** वास्तविक **(एसो हि अतब्भावो)** हाच अतद्भाव आहे. **(णेव अभावो त्ति)** निश्चयाने सर्वथा अभाव अतद्भाव नाही. **(त्ति णिद्दिट्ठो)** असे सर्वज्ञांनी सांगितले आहे.

तात्पर्य – द्रव्य, गुण, पर्यायामध्ये शब्दार्थाच्या अपेक्षेने अतद्भाव आहे, सर्वथा अभावरूप अतद्भाव नाही.

एका द्रव्यामध्ये जे द्रव्य आहे तो गुण नाही, जो गुण आहे ते द्रव्य नाही अशाप्रकारे द्रव्याचे गुणरूपाने न होणे अथवा गुणाचे द्रव्यरूपाने न होणे हाच अतद्भाव आहे. एवढ्यावरून द्रव्य व गुणामध्ये अन्यत्वरूप व्यवहार सिद्ध होतो. ज्याप्रमाणे आंब्यामध्ये जो आंबा आहे ती गोड चव नाही.जी गोड चव आहे तो आंबा नाही. जे आंब्याचे प्रदेश तेच गोड गुणाचे प्रदेश आहेत पण आंबा शब्दाचे वाच्य पिवळा, गोड, सुगंध, मऊ इ. गुणांचा समूहात्मक पुद्गलपरमाणूंचा पिण्ड आहे व गोड शब्दाचा वाच्य रसनेन्द्रियाच्या द्वारे चाखला जाणारा एक रसगुणाचा पर्याय आहे. म्हणून आंबा व गोडचव यामध्ये स्वरूपाच्या अपेक्षेने भेद आहे यालाच अतद्भाव म्हणतात. त्याप्रमाणे द्रव्य व गुणामध्ये स्वरूपभेद आहे, प्रदेश भेद नाही. ज्याप्रमाणे एका द्रव्याचे प्रदेश दुसऱ्या द्रव्याच्या प्रदेशाहून बिल्कुल भिन्न आहेत त्याप्रमाणे प्रदेशांची भिन्नता द्रव्य आणि गुणामध्ये नाही. जेवढे प्रदेश द्रव्याचे आहेत तेवढेच प्रदेश गुणाचे आहेत. जेवढ्या भागात आंबा राहतो तेवढ्याच भागात त्याचा गोड गुण राहतो. परंतु दोघांच्या संज्ञा, लक्षण, प्रयोजनामध्ये भेद आहे. या अपेक्षेने द्रव्य व गुणामध्ये अन्यत्व आहे.

द्रव्याचा अभाव गुण आहे व गुणाचा अभाव द्रव्य आहे असा सर्वथा अभाव अतद्भाव शब्दाचा अर्थ ग्रहण करू नये. जर अतद्भाव शब्दाचा अर्थ असा ग्रहण केला तर तीन दोष येतात. १) एका द्रव्याच्या ठिकाणी अनेकता, २) उभयशून्यता व ३) अपोहरूपता. याचे स्पष्टीकरण–

१) अनेकत्वरूप प्रथम दोष – ज्याप्रमाणे चेतनद्रव्याचा अभाव अचेतनद्रव्य आहे व अचेतन द्रव्याचा अभाव चेतन द्रव्य आहे. याप्रमाणे चेतन व अचेतन असे भिन्न दोन द्रव्य सिद्ध होतात त्याप्रमाणे जर द्रव्याचा अभाव म्हणजे गुण व गुणाचा अभाव म्हणजे द्रव्य असे मानले तर द्रव्य व गुण असे दोन

भिन्न द्रव्य सिद्ध होतील. एका द्रव्याच्या ठिकाणी अनेक द्रव्यपणाचा प्रसंग येईल. सोन्याचा अभाव चांदीमध्ये आहे व चांदीचा अभाव सोन्यामध्ये आहे, म्हणून सोने व चांदी हे दोन भिन्न धातू आहेत. त्याप्रमाणे द्रव्याचा अभाव गुण व गुणाचा अभाव द्रव्यामध्ये मानला तर द्रव्य व गुण भिन्न द्रव्य मानावे लागतील व द्रव्यामध्ये जेवढे गुण आहेत त्या प्रत्येकाचा अभाव म्हणजे द्रव्य मानले तर जेवढे गुण तेवढे द्रव्य सिद्ध होतील. परंतु प्रत्यक्ष तर असे दिसत नाही. अनंत गुणांचा समूह मिळून एक अखंड द्रव्य आहे. आंबा व त्याचा गोड गुण दोन भिन्न वस्तू नाहीत, गोड आंब्याचाच एक अंश आहे.

२) उभयशून्यत्वरूप दूसरा दोष – ज्याप्रमाणे सोन्याचा अभाव झाला तर सुवर्णपणाचा ही अभाव होतो व सुवर्णपणाचा अभाव झाला तर सोन्याचा पण अभाव होतो, उभयशून्यत्व येते. त्याप्रमाणे द्रव्याचा अभाव झाला तर गुणाचा अभाव व गुणाचा अभाव झाला तर द्रव्याचा अभाव होतो. अशाप्रकारे परस्परांच्या अभावामध्ये दोघेही शून्य होतात. आत्म्याचा अभाव मानला तर ज्ञान कोणाच्या आश्रयाने राहणार, म्हणून आश्रयरहित ज्ञानाचा पण अभाव होतो. ज्ञानाचा अभाव मानला तर आत्म्याचा पण अभाव होतो. कारण गुणरहित वस्तू असत नाही. अग्नीचा अभाव मानला तर उष्णतेचा अभाव होतो. उष्णतेचा अभाव मानला तर अग्नीचा अभाव होतो. त्याप्रमाणे द्रव्याचा अभाव झाला तर निराधार गुणांचा पण अभाव होतो व गुणांचा अभाव मानला तर गुणसमूहात्मक द्रव्याचा अभाव होतो. कारण द्रव्याशिवाय गुण नाही व गुणाशिवाय द्रव्य नाही, म्हणून द्रव्याचा अभाव म्हणजे गुण व गुणांचा अभाव म्हणजे द्रव्य असा अतद्भाव शब्दाचा अर्थ केला तर द्रव्य व गुण दोन्हींचा नाश होतो व उभयशून्यत्व दोष येतो, असे मानले तर शून्यैकान्तवांदामध्ये प्रवेश होईल.

३) अपोहरूपत्व तिसरा दोष –ज्याप्रमाणे पटाचा (वस्त्राचा) अभावमात्रच घट आहे व घटाचा अभावमात्रच पट आहे असे मानले तर दोघांच्या ठिकाणी अपोहरूपता येते. त्याप्रमाणे द्रव्याचा अभावमात्रच गुण आहे व गुणाचा अभावमात्रच द्रव्य आहे, असे मानले तर दोघांमध्ये अपोहरूपता येते. बौद्धमतवादी वस्तूचे वाच्य अपोह मानतात. घट दिसतो पण बौद्ध म्हणतात घट काही वस्तू नाही, अन्य सर्वाचा अभाव म्हणजेच घट आहे. गो शब्दाचा वाच्य 'अगोव्यावृत्तिः' असे मानतात. गाय नसलेल्या शेष सर्व वस्तूंची

व्यावृत्ति म्हणजेच गाय आहे. गायीचा सद्भावच नाही, ती तर अन्यापोहरूप आहे. त्यांनी मानलेली वस्तू तर निर्विकल्प शुद्ध स्वरूप आहे. ती शब्दात सांगता येत नाहीच. म्हणून शब्दांचे वाच्य अन्य वस्तूंची निवृत्ती (अपोहरूपता) मानतात. जर द्रव्याचा अभावमात्र गुण व गुणांचा अभावमात्र द्रव्य मानले तर द्रव्य व गुणाला अपोहरूप मानण्याचा प्रसंग येईल व बौद्धमतामध्ये प्रवेश होईल.

म्हणून द्रव्य व गुणामध्ये वरील दोष टाळून एकत्व, अशून्यत्व व अनपोहत्व इच्छिणाऱ्यांनी अतद्भावशब्दाचा अर्थ सर्वथा अभाव न करता लक्षणाच्या अपेक्षेने अन्यत्व हा करावा. द्रव्य व गुणाचे जसे स्वरूप जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे तेच सत्य आहे. गुणगुणी, धर्मधर्मी व अंशअंशीमध्ये सर्वथा एकत्व नाही व सर्वथा अन्यत्व नाही. प्रदेश अपेक्षेने त्यामध्ये एकत्व आहे व स्वरूपाच्या अपेक्षेने भेद आहे.

वस्तूचे स्वरूप समजण्यासाठी अतद्भावरूप अन्यत्व समजणे अत्यंत आवश्यक आहे. हे जर नाही समजले तर वस्तूमध्ये जेवढे अंश आहेत त्या सर्व अंशांना वेगवेगळे करून स्वतंत्र वस्तूच मानले तर वस्तूचाच नाश होईल. वस्तूमध्ये गुणरूप अनंत अंश असूनसुद्धा वस्तू एक अविभागी आहे. प्रत्येक गुणाचे स्वरूप स्वतंत्र नाही मानले तर वस्तूमध्ये अनंत गुणपना सिद्ध होत नाही. अनंत गुणांना सर्वथा भिन्न मानले तर एक अखंड वस्तू सिद्ध होत नाही. म्हणून वस्तूमध्ये अनंत गुण असूनही ती अखंड एक गुणात्मक आहे, असंख्यात प्रदेशी असूनही अखंड प्रदेशात्मक आहे. ज्यामध्ये खंडांचे निराकरण नाही अशी एक अखंड वस्तू आहे. जोपर्यंत भेदाभेदात्मक अनेकान्तस्वरूप वस्तू आमच्या ज्ञानात येणार नाही तोपर्यंत सम्यग्दर्शन अतिदूर समजावे. द्रव्यगुणपर्यायात्मक अखंड आत्मवस्तूचे ज्ञान सम्यग्ज्ञान आहे व श्रद्धान सम्यग्दर्शन आहे. या सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाच्या विषयभूत वस्तूचे निरूपण करण्यासाठीच ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन अधिकाराची रचना झाली आहे. वस्तूचे निराबाध स्वरूप समजणे हीच जीवनस्वातन्त्र्याची कला आहे.

प्रथम वस्तूचे यथार्थ ज्ञान करून नंतर जे पाहिजे ते करा. एक जावई होता. तो काही लिहायला वाचायला शिकला नव्हता. एकदा तो आपल्या सासरी गेला होता. सासरी सर्वजण त्याचा आदर करीत होते. जावयाचे वडील काही दिवसापासून आजारी होते. सासरी सर्वांना माहित होते. एकदा सासरी

असतानाच वडीलांची चिठ्ठी आली. त्यामध्ये लिहले होते आता तब्बेत ठीक आहे. चिन्ता करू नये. सर्वांच्याजवळ पत्र गेले. महिलांना पत्र वाचता येत नव्हते. तेव्हा एकीने म्हटले जावयांच्या जवळ पत्र वाचून घ्या. एका स्त्रीने जावयांना पत्र वाचायला दिले. पत्र हातात घेऊन वाचायला येत नसल्यामुळे जावयाला पश्चात्ताप झाला म्हणून डोळ्यातून पाणी येऊ लागले. त्या स्त्रीने पाहिले व ती ओरडत गेली व म्हणाली की बिचाऱ्याचे वडील वारले. आजारी तर होतेच. सर्व महिलांमध्ये रडणे पडणे सुरू झाले. शेजाऱ्यांनी येऊन विचारले 'काय झाले ? का रडू लागला ?' तेव्हा त्यांनी सांगितले. 'यांचे वडील वारले पत्र आले आहे.' तेव्हा तो म्हणाला, 'पाहू चिठ्ठी.' त्याने पत्र घेतले व वाचले. पत्र वाचून तो म्हणतो, 'तुम्ही असे रडता का ? वडीलांची तब्बेत सुधारली आहे.' तेव्हा सर्वांना अज्ञानपूर्ण कार्याचा पश्चात्ताप झाला. याचप्रमाणे प्रथम पदार्थाचे स्वरूप जसे आहे तसे जाणा. नंतर रडा, हसा, काही पण करा. वस्तूस्वरूप जाणल्याशिवाय तरणोपाय नाही.

द्रव्य व गुणामध्ये कथंचित् अन्यत्व असल्यामुळे दोन्हीही टिकून आहेत. जर सर्वथा अभेद असता तर दोघांचा अभाव झाला असता. प्रत्येक गुण आपापल्या लक्षणाने आपापले स्वतन्त्र अस्तित्व टिकवून आहे. प्रत्येक गुणांचे भिन्न-भिन्न स्वरूपास्तित्व आहे म्हणून तर अनंत गुणांचा समूह स्वरूप मी आत्मा अनंतगुण संपन्न होऊ शकतो. ज्याचे गुण त्याला लखलाभ. गुण-गुणी अशी भेदकल्पना सोडून स्वतःला अखण्ड एक ज्ञानानन्द स्वभावमात्र अनुभवावे.

द्रव्य आणि गुणामध्ये जो पूर्वी अतद्भाव सांगितला तो सर्वथा अभावरूप नाही हे मागील गाथेत सिद्ध केले. आता या गाथेमध्ये सत्ता व द्रव्य सर्वथा भिन्न नाहीत. सत्ता व द्रव्यामध्ये गुणगुणीभाव आहे ही गोष्ट सिद्ध करतात. -

जो खलु दव्वसहावो परिणामो सो गुणो सदविसिट्ठो ।
सदवट्ठिदं सहावे दव्व त्ति जिणोवदेसोयं ।। १०९।।

अन्वयार्थ-(खलु) वास्तविक **(जो)** जो **(दव्वसहावो परिणामो)** द्रव्याचा स्वभावभूत (उत्पादव्ययध्रौव्यरूप) परिणाम आहे **(सो सदविसिट्ठो गुणो)** तो सत्तेपासून अभिन्न गुण आहे. **(सहावे)** स्वभावामध्ये **(अवट्ठिदं)** अवस्थित **(द्रव्वं)** द्रव्य **(सद्)** सत् आहे. **(ति जिणोवदेसोयं)** असा हा जिनेन्द्र देवांचा उपदेश आहे.

तात्पर्य – द्रव्य उत्पादव्ययध्रौव्यात्मक सत्तेमध्ये शाश्वत अवस्थित आहे.

द्रव्यपरिणामस्वभावी –

स्वभावामध्ये नित्य अवस्थित असल्यामुळे द्रव्य सत् आहे हे पूर्वी ९९ नंबरच्या गाथेमध्ये सांगितले होते आणि द्रव्याचा स्वभाव उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप परिणाम आहे ही गोष्टसुद्धा त्याच गाथेमध्ये सांगितली होती. आता येथे ही गोष्ट सिद्ध करतात की जो द्रव्याचा स्वभावभूत परिणाम आहे, तोच सत्तेपासून अभिन्न गुण आहे.

प्रत्येक वस्तू आपापल्या स्वभावामध्येच स्थित आहे. स्वभावामध्ये राहण्यातच वस्तूची शोभा आहे. वस्तू आपला स्वभाव सोडेल तर ती वस्तूच राहणार नाही. केवळ ध्रुव राहणे वस्तूचा स्वभाव नाही तर उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप परिणाम वस्तूचा स्वभाव आहे. जेथे परिणमन आहे तेथे तिन्ही गोष्टी स्वयं सिद्ध आहेत. पूर्वीची पर्याय जर नष्टच झाली नाही व नवीन पर्याय उत्पन्नच झाली नाही तर परिणमन होऊच शकणार नाही. दोन्ही पर्यायांचे आधारभूत ध्रौव्य नसेल तर परिणमन कोणाच्या आश्रयाने होऊ शकणार, म्हणून परिणमनामध्ये ध्रौव्य पण अंतर्भूत आहे म्हणून जेथे उत्पादव्यय ध्रौव्य आहे तोच परिणाम आहे.

ज्याप्रमाणे एका जीवामध्ये मिथ्याभिप्रायाचा नाश झाला, समीचीन अभिप्रायाचा उत्पाद झाला व, या दोन्ही अभिप्रायांचा आधारभूत जीवत्वाचे ध्रौव्य आहे. असा प्रत्येक क्षणाला जीवादी द्रव्यांमध्ये परिणाम घडत आहे. त्यामुळेच वस्तूचे अस्तित्व जाणले जाते. परिणामच घडला नाही तर तेथे वस्तूचे अस्तित्व नाही असे लक्षात येते. जेव्हा शरीरातून जीव निघून जातो तेव्हा तेथे जाणण्याचा परिणाम दिसून येत नाही त्यावरून ओळखले जाते की येथे जीव नाही, जीव निघून गेला. जीव अमूर्तिक असल्यामुळे इंद्रियांनी दिसत नाही तर त्याला पकडण्याचा एकच उपाय आहे परिणामस्वभाव. जेथे चैतन्यरूप उत्पादव्ययध्रौव्यात्मक परिणाम होताना दिसून येतो तेथेच जीव आहे हे जाणले जाते.

द्रव्य स्वभावामध्ये सदैव राहते व स्वभाव द्रव्यामध्ये सदैव राहतो.

सत्ता व द्रव्यामध्ये गुणगुणिभाव –

द्रव्यार्थिक नयाच्या मुख्यतेने या वस्तूच्या उत्पादव्यय-ध्रौव्यात्मक

स्वभावभूत परिणामाला 'सत्' या शब्दाने सांगितले जाते. जो परिणाम आहे तोच सद्विशिष्ट गुण आहे. द्रव्यामध्ये त्रिकाल राहणारा आणि द्रव्याच्या गुणपर्याय आदी सर्व विस्तारामध्ये अविशेष रूपाने राहणारा तो एक गुण आहे. अर्थात सत्ता गुण द्रव्याच्या सर्व गुणांमध्ये व पर्यायामध्ये व्यापक आहे. कारण द्रव्याची वृत्ती भूत, भविष्य व वर्तमान तिन्ही काळामध्ये आहे. प्रत्येक क्षणामध्ये ती वृत्ती त्याच स्वभावरूपाने परिणमते, म्हणून तो परिणाम द्रव्याचा स्वभावभूत गुण आहे. पर्यायार्थिक नयाच्या मुख्यतेने त्या अस्तित्वापासून अभिन्न गुणालाच द्रव्याचा परिणाम म्हटला जातो. याप्रमाणे सत्ता व द्रव्यामध्ये गुणगुणीभाव सिद्ध होतो. यामध्ये प्रदेशभेद नाही. ज्यांच्यामध्ये प्रदेशाच्या अपेक्षेने भेद आहे ते स्वतंत्र – स्वतंत्र परिपूर्ण द्रव्यच आहेत. ज्याप्रमाणे सोने व चांदी हे धातू एकत्र दिसत असले तरी त्यांच्यामध्ये प्रदेशभेद आहे म्हणून सोनार त्यांना वेगळे-वेगळे करतो, परंतु सोनार सोने व त्याचा पिवळा गुण याला वेगळे करू शकत नाही. त्याप्रमाणे शरीर व आत्मा एकत्र राहत असले तरी वेगवेगळे होऊ शकतात. परंतु जीव व त्याचा अस्तित्वगुण (सत्ता) वेगळे होऊ शकत नाहीत. कारण अस्तित्व जीवाचा स्वभाव आहे.

प्रत्येक वस्तू स्वयं परिणमनशील आहे. परिणामस्वभाव वस्तूचा गुणच आहे. हे न जाणल्यामुळे अज्ञानी मिथ्यादृष्टी जीव परवस्तूच्या परिणामाचा कर्ता होतो. त्याचे परिणमन आपल्या इच्छानुकूल झाले की सुखी होतो व ते परिणमन इच्छानुरूप झाले नाही की दु:खी होतो. दुसऱ्यामध्ये परिणमन घडविण्यासाठी सदैव आकुल-व्याकुल होतो. त्याच्या आकुलतेचे कारण त्याचे वस्तूस्वभावासंबंधीचे अज्ञान आहे, परद्रव्य नाही. अज्ञानी वस्तुस्वभावानुसार स्वयं परिणमन करीत नाही, दुसऱ्यामध्ये मात्र परिवर्तनाचा विकल्प करतो.

एका कावळ्याला आपल्या आवाजाचा खूप अहंकार होता. तो पूर्व दिशेला जाऊन 'काव काव' करीत ओरडत गाणे म्हणतो आणि इच्छा करतो की लोकांनी माझी स्तुती करावी. परंतु त्याची कोणी स्तुती करीत नाही. पश्चिमेकडे जाऊन गाणे गातो तेथेही कोणी त्याची स्तुती करीत नाही. सर्व दिशा व विदिशेला फिरतो आणि गाणे गातो तरीसुद्धा त्याला कोणी चांगल म्हणत नाही. दुसऱ्या पक्ष्यांजवळ तो तक्रार करतो की तेथील लोक चांगले नाहीत. तो पक्षी म्हणतो की तू आपला आवाज बदल म्हणजे लोक तुला चांगले म्हणतील. तुझी स्तुती करतील. तो म्हणतो, नाही बाबा, मी तर आपला

आवाज कधीच बदलणार नाही.

हीच अवस्था आमची पण आहे. हा जीव स्वयं बदलू इच्छित नाही, दुसऱ्याला बदलण्याची इच्छा करतो.

आपापल्यामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्यरूप परिणाम होणे हेच वस्तूचे अस्तित्व आहे. द्रव्यामध्ये अर्थक्रिया तेव्हाच संभवू शकते जेव्हा द्रव्य परिणमन करील. पूर्व पर्याय सोडून उत्तर पर्यायाला प्राप्त झाले तरी वस्तूमध्ये ध्रौव्य राहते. जेव्हा आत्म्यामध्ये पंचेन्द्रिय विषयांच्या अनुभवरूप मनाच्या व्यापाराने उत्पन्न होणाऱ्या विकल्पजालांचा अभाव होतो तेव्हा चिदानंद स्वरूप आत्म्याची अनुभूती उत्पन्न होते. येथे अनुभूतीचा उत्पाद झाला, विकल्पाचा व्यय झाला, उत्पाद आणि व्यय दोन्हींचा आधारभूत जीवपणाचे ध्रौव्य आहे. अशाप्रकारे उत्पादादी तीनरूप परिणाम आहे तोच जीवाचा सत्‌गुण आहे. म्हणून तत्त्वार्थसूत्रामध्ये म्हटले आहे की '**उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत्**' असे स्वरूप मानले तरच संसार अवस्थेचा नाश होऊन सिद्धपर्याय होणे, व दोन्ही अवस्थेत जीवत्वाचे नित्य राहणे संभव आहे. हे स्वीकारले तरच एक तत्त्वज्ञानी सविकल्प अवस्थेचा नाश करून निर्विकल्प अवस्थेपर्यंत पोहचू शकतो.

गुणगुणिभेदाच्या द्वारे आत्मवस्तूचा परिचय प्राप्त करून अभेद आत्मवस्तूमध्ये विश्राम करण्यासाठी भेदकल्पना सोडून चैतन्यमात्र आत्मवस्तूचा अनुभवन करण्याचा पुरुषार्थ करावा.

द्रव्य गुणी आहे, सत्ता गुण आहे असा गुणगुणीभावसिद्ध करून आता दोघांच्यामधील भेद नष्ट करतात. दोघांची एकता आहे हे सिद्ध करतात. दोघेही परस्पराला सोडून नाहीत अर्थात सत्तेशिवाय द्रव्य नाही व द्रव्याशिवाय सत्ता नाही. सत्ता गुण द्रव्यामध्ये मुख्य आहे हे सांगतात.

णत्थि गुणो त्ति व कोई पज्जाओ त्तीह वा विणा दव्वं ।
दव्वत्तं पुण भावो तह्मा दव्वं सयं सत्ता ।। ११० ।।

अन्वयार्थ – (इह) या जगामध्ये **(दव्वं विणा)** द्रव्याशिवाय **(गुणोत्तिव कोई)** गुण असा कोणी **(पज्जाओ त्तिवा)** किंवा पर्याय असा कोणी **(णत्थि)** नाही. **(पुण दव्वत्तं भावो)** पुन्हा द्रव्यत्व उत्पादव्ययध्रौव्यात्मक सद्‌भाव आहे **(तम्हा)** म्हणून **(दव्वं सयं सत्ता)** द्रव्य स्वयं सत्ता आहे.

तात्पर्य – गुणपर्यायवान व उत्पादव्यय-ध्रौव्यात्मक असल्यामुळे द्रव्य स्वयं सत्स्वरूप आहे.

गुण द्रव्याशिवाय नाहीत –

द्रव्य गुणपर्यायमय आहे. द्रव्यामध्येच गुण असतात व द्रव्यामध्येच पर्याय असतात. गुण आणि पर्याय द्रव्याला सोडून स्वतंत्र असत नाहीत. अनन्त गुणांच्या अखंड समूहालाच द्रव्य म्हणतात. द्रव्यामध्ये जेवढे गुण आहेत ते द्रव्याच्या सर्व प्रदेशांमध्ये व्यापक आहेत. द्रव्याला सोडून गुण नावाचा स्वतंत्र पदार्थ नाही. ज्याप्रमाणे आंब्यामध्ये स्पर्श, रस, गंध वर्ण आहेत. आंब्याला सोडून स्पर्श नावाची स्वतंत्र वस्तू नाही. रस नावाची स्वतंत्र वस्तू नाही. द्रव्याच्या विशेषता म्हणजेच गुण आहेत. सोन्याला सोडून त्याचा पिवळेपणा वेगळा नाही, साखरेला सोडून त्याची गोडी वेगळी नाही त्याप्रमाणे द्रव्याला सोडून गुण वेगळे नाहीत. द्रव्याच्या सर्व भागामध्ये व सर्व अवस्थांमध्ये गुण व्यापून असतात. सत्ता(अस्तित्व) हा द्रव्याचा गुण आहे म्हणून ती सत्ता द्रव्याला सोडून अन्यत्र नाही.

आम्ही आमची सत्ता कोठे ठेवली आहे ते तपासून पाहिले पाहिजे. वास्तविक आपली सत्ता आपल्यामध्ये आहे व आपण आपल्या सत्तेमध्ये आहोत. परंतु अज्ञानीने आपली सत्ता परवस्तूमध्ये ठेवली आहे. सर्व कुटुंबावर माझी सत्ता आहे. सर्व संपत्तीमध्ये माझे अस्तित्व आहे. शरीरामध्ये माझे अस्तित्व आहे असे अज्ञानी मानतो. त्यामुळे कुटुंब, संपत्ती व शरीराला वाचवण्याचा प्रयत्न करतो. पराचे अस्तित्व आपल्या अधीन नाही. त्यामुळे त्याच्या रक्षणाचा मी कर्ता नाही. कुटुंब आपापल्या अस्तित्वाने संपन्न आहे, त्याचे अस्तित्व आपण हिरावून घेऊ शकत नाही. त्याच्या अस्तित्वाच्या रक्षणाने आपले अस्तित्व टिकणार नाही. कारण दुसऱ्याचा सत्तागुण दुसऱ्यामध्ये व माझा सत्तागुण माझ्यामध्ये आहे. माझे अस्तित्व मला सोडून इतरामध्ये जाऊ शकत नाही व माझ्यापासून ते वेगळे होऊ शकत नाही.

पर्याय द्रव्याशिवाय नाही –

ज्याअर्थी गुण द्रव्यामध्येच आहेत त्याअर्थी ह्या गुणांचे पर्याय सुद्धा द्रव्यामध्येच आहेत. जे द्रव्याचे व गुणांचे प्रदेश आहेत तेच पर्यायांचे सुद्धा प्रदेश आहेत. ज्याप्रमाणे आंब्यामध्येच स्पर्श, रस, गंध, वर्ण हे गुण आहेत त्याप्रमाणे मऊ, गोड, सुगंधी व पिवळी अवस्थासुद्धा आंब्याच्या प्रदेशांमध्येच आहे. मऊ, गोड इ. अवस्था आंब्याला सोडून स्वतंत्र नाहीत. ज्याप्रमाणे सोन्यामध्ये पिवळा, भारीपणा, स्निग्धता गुण सोन्यापासून वेगळे नाहीत त्याप्रमाणे रिंगा,

अंगठी, बांगडी इत्यादी अवस्था सोन्याला सोडून वेगळ्या नाहीत. जे सोन्याचे प्रदेश आहेत तेच रींगा, अंगठी, बांगडी इत्यादींचे प्रदेश आहेत.

ज्याप्रमाणे चेतना, ज्ञान, दर्शन, आनंद, वीर्य, श्रद्धा इत्यादी गुण आत्मद्रव्याला सोडून नाहीत. त्याप्रमाणे मिथ्यादर्शन, सम्यग्दर्शन, सुख-दु:ख मतिज्ञान आदि पर्यायसुद्धा आत्मद्रव्याला सोडून इतरत्र नाहीत. जीवाची बहिरात्मा, अन्तरात्मा, परमात्मा या अवस्था सुद्धा जीवाला सोडून नाहीत. जे जीवाचे प्रदेश आहेत तेच ज्ञान-दर्शनादी गुणांचे प्रदेश आहेत व तेच बहिरात्मा, अन्तरात्मादी अवस्थांचे प्रदेश आहेत.

अशाप्रकारे ही गोष्ट सिद्ध आहे की प्रत्येक द्रव्य आपल्या गुण आणि पर्यायापासून अभिन्न आहे. गुणपर्यायवान द्रव्यच उत्पाद-व्ययध्रौव्यरूप आहे. कारण पर्याय क्षणा-क्षणामध्ये नष्ट होऊन नवीन उत्पन्न होतात व गुण सहभावी आहेत. द्रव्यामध्ये नित्य व ध्रुव राहतात. ज्यामध्ये उत्पादव्ययध्रौव्य होतात त्यालाच सत् किंवा सत्तारूप म्हणतात, म्हणून द्रव्य स्वयं सत्ता आहे. द्रव्य गुणी आहे व सत्ता त्याचा गुण आहे. द्रव्याचा आपल्या सत्तेशी अभेद आहे. गुणांचा व द्रव्याचा सदैव एकरूप तादात्म्य संबंध आहे. द्रव्यामध्ये जी अवस्था होते तीच पर्याय आहे. गुणांशिवाय द्रव्य नाही व द्रव्याशिवाय गुण नाहीत म्हणून द्रव्य व गुणांमध्ये एकत्व आहे. पर्यायाशिवाय द्रव्य नाही व द्रव्याशिवाय पर्याय नाही म्हणून पर्याय द्रव्याशी क्षणिक तादात्म्यरूप आहे, सत्रूप पदार्थाचा कधी नाश होत नाही व असत्रूप पदार्थाचा जन्म होत नाही. सत्रूप पदार्थच आपल्या गुणपर्यायांमध्ये उत्पादव्यय करतात. अशाप्रकारे नि:संदेह होऊन द्रव्याचे स्वरूप समजून आपल्या आत्म्याकडे लक्ष दिले पाहिजे.

आपल्या आत्म्याचा जो अशुद्ध संसार पर्याय आहे त्याला सोडण्यायोग्य निश्चित करून शुद्ध पर्यायाच्या प्राप्तीचा स्वत:मध्येच प्रयत्न केला पाहिजे. आपल्या शुद्ध स्वभावाकडे लक्ष देऊन संसारामध्ये राग, द्वेष न करता समता भावाचे सेवन करणे हाच शुद्ध पर्याय होण्याचा मंत्र आहे. त्यामुळे आत्म्याचे सर्व गुण शुद्ध स्वभावरूपाने परिणमन करतील.

आपल्या आत्म्याची शुद्ध सत्ता हेच आपले स्वत्व आहे. स्वत्वाची जाणीव होणे हीच आपल्या विकासाची पहिली पायरी आहे. आपल्या केवळ स्वरूपाकडे दृष्टी असणे हाच स्वत:च्या रक्षणाचा सर्वात मोठा दृढ किल्ला आहे. ज्याप्रमाणे मोठ्या मजबूत किल्ल्यामध्ये राजे लोक स्वत:ला सुरक्षित

अनुभवतात त्याप्रमाणे आपल्या सहज स्वरूपामध्येच 'हा मी आहे' असा अनुभव करणारा ज्ञानी आपल्याला सुरक्षित अनुभवतो.

स्वत:चे असली स्वरूप समजले की नकली स्वरूपाविषयी अहंकार आपोआप गळतो.

एक मोठा हिऱ्याचा व्यापारी होता. त्याचे सगळीकडे खूप नाव होते. परंतु कर्माचा संयोग असा की, अखेरच्यावेळी त्याच्याजवळ काही पैसा शिल्लक राहिला नाही. त्याचा अंतिम क्षण जेव्हा जवळ आला तेव्हा नकली चार रत्न मुलाला देऊन म्हणाला, बाळ ही सांभाळून ठेव. हे तुझ्या कामी येतील. याच्याद्वारे मोठा झाल्यावर तू व्यापार कर. व्यापारी मरण पावला.

थोडा मोठा झाल्यावर तो मुलगा चार रत्ने घेऊन आपल्या काकांच्या दुकानावर गेला आणि म्हणाला, ''मला व्यापार करावयाचा आहे. माझे वडील ही चार रत्ने देऊन गेले आहेत. याच्या मोबदल्यात मला पैसे द्या'' काकांनी रत्ने हातात घेऊन पाहिले तर ती रत्ने नकली दिसली. परंतु ते काही बोलले नाहीत. कारण जर त्यांनी ती रत्ने नकली आहेत असे सांगितले तर मुलाला वाटेल, काका मला फसवत आहेत. म्हणून त्यांनी सांगितले, 'ही रत्ने तोपर्यंत तुझ्या आईजवळ ठेव व पहिला येथे दुकानावर येऊन रत्नाची पारख करायला शिक'. मुलगा काकांच्या दुकानावर येऊ लागला. थोड्याच दिवसात नकली व असलीची त्याला ओळख झाली. तेव्हा एक दिवस काका त्याला म्हणाले, ''आता तू तुझा स्वतंत्र धंदा कर.'' तो आपल्या आईजवळ गेला आणि त्याने आपल्या वडिलांनी दिलेले रत्न मागितले. रत्नाची डबी उघडताच त्यांनी ओळखले की ही रत्ने नकली आहेत आणि त्याबरोबरच त्याचा रत्नाच्या प्रती असणारा स्वामिपणाचा अहंकार पण नष्ट झाला.

हीच गोष्ट शरीरादिक व धनादिकांच्या प्रती आहे. आपले खरे स्वरूप समजण्यापूर्वी शरीरादिक व धनादिकाच्या प्रती अहंकार होता की 'मी सुंदर आहे, मी करोडपती आहे, मी सेठ आहे.' जेथे आत्मज्ञान होते तेथे शरीरादिक व धनादिकाचे असली स्वरूप समजते व त्याच बरोबर त्या शरीरादिक व धनादिकासंबंधी अहंकार नष्ट होतो.

जेव्हा असली (खरी) वस्तू समोर येते तेव्हा नकली वस्तू स्वयंच नकली दिसू लागते. आपल्या एकत्वस्वरूपाला शरण न गेल्यामुळेच एवढे मोठे संसाराचे जाळे पसरले आहे, त्यामुळे शेकडो आपत्ती ओढवल्या आहेत. परंतु

जो जीव आपल्या स्वरूपकिल्ल्यामध्ये प्रवेश करून शांत बसतो त्याच्या सर्व आपत्ती दूर पळतात. जर आपल्या शुद्ध स्वरूपाचे महत्त्व समजेल व तेथेच रममाण होऊ, लीन होऊ तर सर्व बंधन तुटेल, शांतीचा मार्ग मिळेल आणि भविष्यामध्ये जोपर्यंत संसार आहे तोपर्यंत उत्तम उत्तम भव प्राप्त होतील आणि लवकरच मुक्ती प्राप्त होईल. आत्मस्वरूपाला ओळखण्यासाठी केलेला गुणगुणी भेद दूर करून आपल्याला शुद्ध चैतन्य सत्तास्वरूप अनुभवावे.

विश्वामध्ये अनेक प्रकारची नव-नवीन उत्पादने होताना दिसतात. त्यावर असा प्रश्न होतो की जगात नव्हत्या त्या नवीन वस्तू उत्पन्न झाल्या की पूर्वी ज्या वस्तू होत्या त्यांचेच हे रूपांतर झाले. जी वस्तू आहे,तिचा उत्पाद कसा ? तसेच जी वस्तू नाही तिचा पण उत्पाद कसा ? उत्पादकाला वाटते मी जे पूर्वी नव्हते असे उत्पादन तयार केले. वैज्ञानिक, संशोधकांना वाटते आम्ही हे नवीन शोध लावले. रेडिओ, टेपरेकॉर्ड, मोबाईल, कॉम्प्युटर, इन्टरनेट, लॅब इत्यादी वस्तू पूर्वी नव्हत्याच. हे सर्व नवीन अविष्कार आहेत. यावर अनेकान्तात्मक वस्तूचे प्रतिपादन करणारे सर्वज्ञ भगवान सांगतात उत्पाद दोन प्रकारचा आहे. सदुत्पाद व असदुत्पाद अर्थात एका अपेक्षेने जी वस्तू पूर्वी होती तीच उत्पन्न झाली आहे व एका अपेक्षेने जी वस्तू पूर्वी नव्हती ती उत्पन्न झाली आहे. या दोन्ही कथनामध्ये विरोध नाही हेच नयविभागाने पुढील गाथेत सांगतात. -

एवंविहं सहावे दव्वं, दव्वत्थपज्जयत्थेहिं ।
सदसब्भावणिबद्धं पादुब्भावं सदा लभदि ।। १११ ।।

अन्वयार्थ - (एवंविहं) अशा प्रकारच्या **(सहावे)** स्वभावामध्ये अवस्थित **(दव्वं)** द्रव्य **(दव्वत्थपज्जयत्थेहिं)** द्रव्यार्थिक आणि पर्यायार्थिक नयांच्या द्वारे **(सदसब्भावणिबद्धं)** सद्भावनिबद्ध व असद्भावनिबद्ध **(पादुब्भावं)** उत्पादाला **(सदा लभदि)** सदा प्राप्त करतात.

तात्पर्य - द्रव्याचा द्रव्यार्थिकनयाने सदुत्पाद व पर्यायार्थिकनयाने असदुत्पाद आहे.

'एवंविहं' 'अशा प्रकारच्या' हा शब्द पाठीमागे सिद्ध करून आलेल्या द्रव्यस्वभावाला प्रकाशित करतो. ९३ गाथेपासून ते ११० गाथेपर्यंत द्रव्य सत्स्वरूप आहे, द्रव्य उत्पादव्ययध्रौव्यस्वरूप आहे व द्रव्य गुणपर्यायात्मक आहे असे द्रव्यस्वभावाचे वर्णन केले आहे. तसेच द्रव्य व सत्तागुण यामध्ये

कथंचित् भेद व कथंचित अभेद आहे ही गोष्ट सिद्ध केली आहे. अशाप्रकारे द्रव्याचे लक्षण अकलंक अर्थात निर्दोष आहे. त्यामध्ये कोणताही दोष नाही; कारण युक्तीने आगम व स्वानुभवाने ते सिद्ध आहे. द्रव्य अनादि अनिधन आहे. द्रव्याची रचना कोणीही केली नाही. ते स्वयं सिद्ध आहे म्हणून त्याला आदी (सुरवात) नाही. ते कधीही नष्ट होणार नाही म्हणून त्याला अंतही नाही. अनादिनिधन द्रव्य आपल्या सत्स्वभावामध्येच उत्पादाला (उत्पत्तीला) प्राप्त होते. प्रत्येक वस्तू अनन्तधर्मात्मक आहे. त्यामध्ये सामान्य धर्म व विशेष धर्म यामध्ये सर्व धर्म गर्भित आहेत. म्हणून वस्तूला सामान्यविशेषात्मक म्हटले आहे. सामान्य धर्म अन्वयरूप आहे. वस्तूमध्ये जो तोच तोचपणा आहे त्याला अन्वय म्हणतात. अन्वयशक्ती उत्पत्ती व नाशाने रहित असतात.जेव्हापासून द्रव्य आहे तेव्हापासून व जोपर्यंत द्रव्य आहे तोपर्यंत जीवंत राहतात. द्रव्य अनादिनिधन आहे म्हणून अन्वयशक्ती ही अनादिनिधन आहेत. एकाचवेळी प्रवृत्त असतात व द्रव्याची रचना करतात. ज्याप्रमाणे सोन्यामध्ये सुवर्णपणा, पिवळेपणा, स्निग्धपणा प्रत्येक पर्यायामध्ये अन्वयरूपाने आहे. सोन्याच्या बांगड्या मोडून बाजूबंद केले तरी त्यामध्ये सुवर्णपणा आहेच. जीवाची मनुष्यपर्याय संपून देवपर्याय झाली तरी जीवत्वशक्ती कायम आहे, त्यालाच अन्वय म्हणतात. विशेषधर्म व्यतिरेकरूप आहे. व्यतिरेक म्हणजे तो हा नाही. पर्यायांना व्यतिरेक म्हणतात. ज्या बांगड्या आहेत ते बाजूबंद नाहीत. व्यतिरेकव्यक्ती उत्पाद व नाशाने सहित असतात अर्थात पर्याय उत्पन्न होतात व नष्ट होतात. पर्याय क्रमाने व्यक्त होतात.

अशाप्रकारे वस्तू सामान्य व विशेष उभयधर्मात्मक आहे. त्याकडे पाहणाऱ्या दृष्टी सुद्धा दोन आहेत. सामान्यधर्माकडून वस्तूला पाहणारी एक दृष्टी व विशेषधर्माकडून पाहणारी दूसरी दृष्टी. पहिल्या दृष्टीचे नाव आहे द्रव्यार्थिक दृष्टी व दुसऱ्या दृष्टीचे नाव आहे पर्यायार्थिक दृष्टी.

आपण द्रव्याला ज्या दृष्टीने पाहतो त्यावेळी पूर्ण वस्तू तशीच दिसते. ज्याप्रमाणे शिल्पकलेमध्ये एक प्राणी लाकडामध्ये कोरलेला आहे. एका बाजूला घोड्याचे तोंड आहे व दुसऱ्या बाजूला हत्तीचे सोंड आहे. एका बाजूने पाहिला तर तो घोडा दिसतो व दुसऱ्या बाजूने पाहिले तर तोच हत्ती दिसतो. कारण तशी त्यामध्ये उभयात्मक रचना आहे. त्याचप्रमाणे द्रव्याची रचना

सामान्यविशेषात्मक आहे. सामान्य धर्माकडून द्रव्याला पाहिले तर द्रव्य नित्य आहे, अन्वयरूप आहे, अभिन्न आहे. पर्यायधर्माकडून द्रव्याला पाहिले तर द्रव्य अनित्य आहे. व्यतिरेकरूप आहे. भिन्नभिन्न आहे.

द्रव्यदृष्टीने सदुत्पाद –

येथे द्रव्यामध्ये होणाऱ्या उत्पादाला दोन दृष्टीने पाहिले आहे म्हणून या उत्पादाचे दोन भेद झाले १) सदुत्पाद व २) असदुत्पाद. जे होते तेच उत्पन्न झाले यास सत् उत्पाद म्हणतात व जे नव्हते ते उत्पन्न झाले त्यास असत् उत्पाद म्हणतात. ज्याप्रमाणे सोन्याच्या बांगड्या मोडून बाजूबंद बनविले. त्यामध्ये जे बांगड्यामध्ये सोने होते तेच बाजूबंद पर्यायरूपाने परिणमले आहे. तेथे सोने नवीन उत्पन्न झाले नाही म्हणून बाजूबंद पर्यायाचा सदुत्पाद आहे. पूर्वी बाजूबंद नव्हते व आता नवीन उत्पन्न झाले म्हणून त्याचा असद्–उत्पाद आहे.

द्रव्यामध्ये जेवढे पर्याय संभव आहेत तेवढे सर्व त्यामध्ये सत्तारूपाने किंवा शक्तीरूपाने विद्यमान आहेत. त्याच पर्यायांमधून क्रमाक्रमाने एकेक पर्याय प्रगट होते. शेष पर्याय शक्तिरूपाने राहतात. म्हणून समस्त पर्यायांचा समूह द्रव्य आहे. द्रव्य आपल्या कोणत्याही पर्यायामध्ये असो ते द्रव्यच आहे, आपल्या द्रव्यपणाला ते सोडत नाही. द्रव्याने स्वयंच आपल्या पर्यायाला धारण केले आहे त्यामुळे ते द्रव्यच आहे. वास्तविक उत्पाद दोन प्रकारचा नाही. उत्पाद एकच आहे. त्या उत्पादाकडे दोन दृष्टीने पाहिले आहे. जेव्हा दृष्टीमध्ये द्रव्य मुख्य व पर्याय गौण आहे तेव्हा उत्पाद सत्रूपच भासित होतो, कारण ज्या अन्वय शक्ती आहेत त्या सर्व पर्यायांना प्राप्त होतात. ज्याप्रमाणे ज्याची दृष्टी सोन्यावर आहे त्याला बांगड्या मोडून बाजूबंद केले तरी त्यामध्ये सोनेच दिसते. जे पूर्वी बांगडीरूप सोने होते तेच आता बाजूबंदरूप झाले आहे. सोने काही नवीन उत्पन्न झाले नाही म्हणून हा सोन्याचा सदुत्पादच आहे. कोणी पुरुष गृहस्थ अवस्थेत होता तोच दीक्षा घेऊन मुनी होतो. तोच तपश्चरणादी द्वारा कर्माचा क्षय करून केवलज्ञानी बनतो. तेथे नवीन पुरुष उत्पन्न झाला नाही. तोच तो पुरुष आहे. तो स्वतःही अनुभव करतो की पूर्वी मी गृहस्थ होतो, तोच मी आता मुनी झालो आहे.

एखादी बालपणीची घटना आठवून आपण म्हणतो की लहानपणी मी खूप खोडकर होतो तोच आता मी शान्त झालो आहे. एकाच पुरुषाकडे दृष्टी असल्यामुळे जो पूर्वी पुरुष होता, तोच आता या शांत पर्यायरूपाने परिणमला

आहे म्हणून सदुत्पाद आहे.

पर्यायदृष्टीने असदुत्पाद–

जेव्हा त्या उत्पादाकडे पर्यायदृष्टीने पाहिले जाते तेव्हा पर्याय मुख्य होऊन द्रव्य गौण होते. तेव्हा त्याला असत् उत्पाद म्हणतात. ज्याप्रमाणे ज्याची दृष्टी बाजूबंद पर्यायावर आहे त्याला सोने न दिसता बाजूबंदच दिसते. बाजूबंद पूर्वी नव्हते आता उत्पन्न झाले म्हणून त्याचा असत् उत्पाद झाला असे म्हणतात. जो जीव गृहस्थ अवस्था सोडून मुनी होतो तेथे मुनी अवस्था पूर्वी नव्हती आता नवीन उत्पन्न झाली म्हणून त्याला नवदीक्षित मुनी म्हणतात. त्याचा तो असदुत्पाद आहे. मुनी अवस्थेचा व्यय होऊन केवलज्ञानी बनतो तेव्हा ती अरिहंत अवस्था पूर्वी नव्हती, आता नवीन उत्पन्न झाली म्हणून त्याचा असत् उत्पाद म्हटला जातो.

एखाद्या व्यक्तीच्या स्वभावामध्ये बदल झाला की त्याला सर्वजण म्हणतात की 'आता तू पूर्वीचा राहिला नाहीस. तुझ्यात खूप बदल झाला आहे.'

पर्यायामध्ये बदल होणे हा द्रव्याचाच परिणामस्वभाव आहे. द्रव्य परिणमनशील असल्यामुळे द्रव्यामध्ये उत्पादव्यय संभवते. द्रव्यामध्ये एकावेळी एक पर्याय प्रगट होतो व दुसरे पर्याय अप्रगट असतात. जो पर्याय जेव्हा प्रगट झाला तो तेव्हाच प्रगट झाला त्यापूर्वी तो प्रगट नव्हता आणि जेव्हा तो प्रगट झाला तेव्हा पूर्वपर्याय नष्ट झाला अर्थात अप्रगट झाला, म्हणून पर्यायार्थिक नयाने पर्यायाचा असत् उत्पाद म्हणतात. जसे मातीच्या गोळ्यापासून मडके बनले. तेथे मातीच्या अपेक्षेने सदुत्पाद आहे. कारण मातीच घटरूप बनली आहे. मातीच्या गोळ्यामध्ये मडके नव्हते ते मडके उत्पन्न झाले. म्हणून मडक्याच्या अपेक्षेने असदुत्पाद आहे.

पुरुरवा भिल्लाचा जीव मरून स्वर्गामध्ये देव झाला. त्यानंतर मरीचीकुमार झाला. त्रिपृष्ठनारारण झाला, त्यानंतर सिंह बनला त्यानंतर दहाव्या भवात महावीर तीर्थंकर झाला. या सर्व पर्यायांमध्ये जीव तोच तो आहे म्हणून या सर्व पर्यायांचा सदुत्पाद आहे. देव, मरीची इत्यादी पर्याय नवीन-नवीन झाले त्या अपेक्षेने असदुत्पाद आहे.

पदार्थ आहे आणि तो परिणमन करीत राहतो. जे परिणमन होते ते पूर्वी नव्हते, परन्तु जो पदार्थ पूर्वी कोणत्यातरी रूपाने परिणत होता तोच आता या

रूपाने परिणमित आहे.

सदुत्पाद व असदुत्पादामधील विरोधाचा परिहार –

सदुत्पाद व असदुत्पादामध्ये परस्पर विरोध नाही, कारण व्यतिरेक व्यक्ती अन्वयशक्तीला प्राप्त होत पर्यायांना द्रव्यरूप करतात. पर्यायार्थिक नयाने जरी असत्‌ची उत्पत्ती झाली असली तरी सर्वथा ती द्रव्याला सोडून होत नाही. उत्पाद सर्वथा द्रव्यापासून भिन्न नाही. असदुत्पाद झाला म्हणजे द्रव्य सर्वथा नष्ट झाले असे नाही तर त्या पर्यायाने द्रव्यच प्राप्त केले. बाजूबंदाने सुवर्णाला केले आहे. पर्याय द्रव्याला करणार नाही तर द्रव्य अनन्त होतील. ध्रुवता पर्यायाला सोडून नाही.

पर्यायाची दृष्टी मुख्य करून जेथे वर्णन केले जाते तेथे जेवढे व्यतिरेक विकास आहेत त्यांनी अन्वय शक्तींचा आश्रय सोडला नाही. जी पर्यायांची उत्पादिका आहे त्या व्यतिरेक व्यक्तींमध्ये अन्वय शक्ती प्राप्त होतात. म्हणून त्या व्यतिरेक व्यक्ती पर्यायांना द्रव्यरूप करतात. ज्याप्रमाणे जे सोन्याचे दागिने आहेत त्यांनी सोन्याच्या शक्तींनाच प्राप्त केले आहे. काय बाजूबंद पर्याय पिवळेपणा, स्निग्धपणा, सुवर्णत्व इत्यादी गुणांना प्राप्त करीत नाही ? अर्थात्‌ बाजूबंद पर्याय या गुणांना सोडून प्राप्त होत नाही. म्हणून त्या सोन्याच्या विकासांनी बाजूबंद आदी पर्यायांना सुवर्णरूप केले. पर्याय गुणाला प्राप्त होते, गुण द्रव्याला प्राप्त होते, म्हणून दागिन्यांना सोनेरूप केले आहे. जर त्या दागिन्यांमध्ये सोने राहिले नसते तर त्यांना कोण बनविले असते ? पर्याय द्रव्यरूप होतील तर दुसर काही करायची गरज राहणार नाही.

द्रव्यदृष्टीने जेथे सत्‌ची उत्पत्ती झाली तेथे द्रव्याला उत्पन्न करणाऱ्या अन्वयशक्ती क्रमाने आपल्या व्यतिरेक व्यक्तींना प्राप्त होतात. द्रव्याने आपल्या व्यतिरेक व्यक्तींना सोडून अन्य काय प्राप्त केले ? अन्य काहीच प्राप्त केले नाही. म्हणून अन्वय शक्तींनी द्रव्याला पर्यायरूप केले आहे. सोन्याला उत्पन्न करणाऱ्या सुवर्णत्व, पिवळेपणा इ. अन्वयशक्तींनी परिणमन करीत सोन्याच्या दागिन्यांनाच प्राप्त केले आहे. दुसरे काही प्राप्त केले नाही म्हणून त्यांनी सोन्याला बाजूबंद, इत्यादी पर्यायरूप केले. द्रव्यदृष्टीने सत्‌चा उत्पाद आहे, पर्यायदृष्टीने असत्‌चा उत्पाद आहे.

येथे आचार्यांनी पर्यायाला द्रव्याशी तन्मय करून व द्रव्याला पर्यायाशी तन्मय करून प्रमाणदृष्टी प्राप्त करून दिली आहे. प्रमाणदृष्टीने वस्तूकडे

पाहिले असता परस्पर विरुद्ध दोन नयातील विरोध दूर होतो.

द्रव्य किती पण पर्यायांना धारण करू देत ते आपल्या स्वभाव किंवा गुणांना सोडत नाही. यालाच सांगणारा सदुत्पाद आहे. जीवाच्या प्रत्येक पर्यायामध्ये चेतनपणा कायम राहतो. पुद्‌गलाच्या प्रत्येक पर्यायामध्ये मूर्तिकपणा कायम राहतो. अवस्था क्षणभंगुर आहेत. समया-समयाला भिन्न भिन्न होतात याला सांगणारा असदुत्पाद आहे.

सांख्यमतवादी सर्वथा सदुत्पादच मानतो, असदुत्पाद स्वीकारत नाही, कारण तो पुरुषाला सर्वथा नित्यच स्वीकारतो व बौद्ध सर्वथा असदुत्पादच मानतो, तो सदुत्पाद स्वीकारतच नाही. कारण त्याचे मत आहे की प्रत्येक समयाला वस्तू नवीनच उत्पन्न होते. प्रत्येक क्षणाला द्रव्याची पर्याय उत्पन्न होते. त्याला त्यांनी स्वलक्षण नावाची वस्तूच मानली आहे.

दोन्ही एकान्ताचे निराकरण करण्यासाठी येथे आचार्यांनी उत्पादाला दोन प्रकाराने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. सदुत्पाद समजला तर बौद्धांच्या मताचे निराकरण आपोआप होते व असदुत्पाद जाणला तर सांख्यमताचे निराकारण होते.

सदुत्पाद जाणून जीवनात लाभ

१) निर्भयता – अज्ञानी जीवाला भविष्यकाळामध्ये काहीतरी आकस्मिक घडेल याची भीती असते. शरीरात नवीन रोग होईल का ? मला मरण येईल का ? संयोगाचा वियोग होईल का ? इत्यादी. सदुत्पाद जाणल्यामुळे ही भीती नष्ट होऊन निर्भयता येते.

जेथे पर्याय बदलली व नवीन उत्पन्न झाली तेथे पूर्वीचेच द्रव्य आहे त्यामुळे मरणभय संपते, कारण जी नवीन पर्याय उत्पन्न होणार त्यात मी असणारच आहे. नवीन जन्म झाला तेथे पूर्वीचाच मी असणार. जे आहे तेच उत्पन्न होणार आहे. नवीन काही उत्पन्न होणार नाही. कोणत्याही रूपाने असली तरी ती तीच वस्तू आहे.

२) समताभाव – दुसऱ्याचे पूर्वी नसणारे परिणमन पाहून त्यासंबंधी शत्रुभाव उत्पन्न होतो. पूर्वी एखाद्या व्यक्तीबरोबर खूप मित्रता असेल, कालांतराने त्याचे प्रतिकूल परिणमन घडले की द्वेषभाव निर्माण होतो. सदुत्पाद जाणला तर लक्षात येईल की जे प्रतिकूल परिणमन घडले आहे तो पूर्वीच्याच व्यक्तीचा उत्पाद आहे. जी व्यक्ती प्रिय होती तीच ही आहे. नवीन नाही.

परिणमन बदलले म्हणून जीव बदलला नाही. म्हणून समता भाव ठेवणेच योग्य आहे.

३) कर्तृत्वाचा अहंकार नष्ट होतो – मी दुसऱ्यामध्ये बदल केला, मी दुसऱ्याचे काम केले, मी दुसऱ्यांचे पालनपोषण केले इत्यादींचा अज्ञानीला अहंकार असतो. दुसऱ्यामध्ये जे परिणमन घडले, तो त्या द्रव्याचाच सदुत्पाद आहे. मी त्यामध्ये काय केले ? जे द्रव्य पूर्वी होते त्याचाच उत्पाद झाला आहे. या जगामध्ये नवीन वस्तू कोणीही निर्माण करू शकत नाही. काहीतरी नवीन करून दाखविण्याची उमेद नष्ट होते. मी अकर्ता आहे म्हणजेच ज्ञाता द्रष्टा आहे. मी फक्त जाणणारा आहे, करणारा नाही.

जर वडिलांनी मुलाकडे लक्ष दिले नाही तर त्यामध्ये काही कमतरता राहणार आहे का ? मुलाच्या पुण्योदयाने बाप आपोआप त्याच्या सेवेमध्ये तत्पर राहतो. त्याच्या स्वास्थ्याची काळजी करतो. सर्वांचे अस्तित्व आपापले काम करते. चिन्ता, विकल्प व्यर्थ आहेत. जंगलातील झाडे पाणी न देतासुद्धा टवटवीत असतात. बागेतील झाडे थोड्याशा पाण्याच्या कमतरतेने सुद्धा कोमेजून जातात. माझ्या चांगल्या वाईट विचाराने कोणीही सुधारू शकत नाही, आणि कोणीही बिघडू शकत नाही.

हत्तीवर मुंगी बसून चालली होती. मध्ये नदीचा पूल आला. मुंगी हत्तीला म्हणते, तू थांब बाबा, मी उतरते. नंतर तू पूल ओलांड. हत्तीच्या मागे मागे मुंगी जाते, पूल ओलांडल्यानंतर मुंगी म्हणते, बघ, मी उतरले म्हणून पूल तुटला नाही. हीच कथा आमची आहे.

आम्हाला वाटते, 'माझ्यामुळेच हे काम झाले, नाहीतर दुसरे कोणीही करू शकले नसते.' पाल म्हणते, 'मी छताला धरून ठेवले आहे म्हणून छत राहिले आहे, मी जर बाजूला झाले तर छत पडणार.' कुत्रा मालाने भरलेल्या बैलगाडीच्या खालून चालतो. गाडी थांबली की स्वतः थांबतो, चालू लागली की स्वतः चालतो. त्याला वाटते मीच गाडीचा भार वहन करत आहे. मी चालल्यामुळेच गाडी चालत आहे, मी थांबल्यामुळेच गाडी थांबली आहे. हीच गत अज्ञानीची आहे. सर्व कार्यांचे कर्तृत्व स्वतःवर घेतो, कारण सदुत्पाद जाणत नाही.

४) सिद्धत्वाचा विश्वास – जो मी आज संसारी अशुद्ध जीव आहे तोच मी साधु अवस्थारूप परिणमणार, तोच मी अरिहंत अवस्थेला प्राप्त होणार.

तोच मी सिद्धावस्थेला प्राप्त होणार, कारण सत्‌चाच उत्पाद आहे. जी वस्तु आहे तीच उत्पन्न होते. जी वस्तू नाहीच ती कशी अरिहंतादि अवस्थारूप होईल.

आमच्या आत्म्यामध्ये सुद्धा मोक्षपर्याय शक्तिरूपाने विद्यमान आहे म्हणून त्या शक्तीच्या व्यक्ततेसाठी पुरुषार्थ केला पाहिजे व साम्यभावाच्या अभ्यासामध्ये सदैव लीन झाले पाहिजे.

५) सदुत्पादावरून आपल्या अस्तित्वाची जाणीव होते. माझ्यामध्ये उत्पाद होत आहे म्हणजे मी आहेच. मी सत्तावान पदार्थ आहे. हे लक्षात येते.

असदुत्पाद जाणल्यामुळे लाभ –

१) पुरुषार्थाने सिद्धी – 'केल्याने होत आहे, आधी केलेच पाहिजे.' आज मी संसारी अज्ञानी आहे म्हणून सदैव असाच राहणार नाही. जो पर्याय नाही तो उत्पन्न होऊ शकतो. मी माझ्या अंतर्मुख पुरुषार्थाने मिथ्याज्ञानाचा नाश करून सम्यग्ज्ञानाचा उत्पाद करू शकतो. मिथ्यादर्शनाचा अभाव होऊन नवीन सम्यग्दर्शनाचा उत्पाद होऊ शकतो. आज जी आकुलता आहे, दुःख आहे ते नष्ट होऊन सुखमय अवस्था उत्पन्न होऊ शकते. ही निराकुल सुखमय अवस्था प्रगट करण्यासाठी निराकुल सुखस्वभावी निज शुद्ध आत्म्याला जाणून त्यामध्येच लीन होण्याचा पुरुषार्थ करावा.

मागील गाथेमध्ये सदुत्पाद व असदुत्पाद अशाप्रकारे उत्पाद दोन प्रकारचा सांगून नयविभागाने त्यामधील विरोध दूर केला. कोणताही सिद्धान्त दृष्टान्ताच्या माध्यमातून चांगला समजतो. म्हणून आचार्य दृष्टान्त देऊन सदुत्पाद द्रव्यापासून अभिन्न आहे ही गोष्ट पुढील गाथेत स्पष्ट करतात –

जीवो भवं भविस्सदि णरोऽमरो वा परो भवीय पुणो ।
किं दव्वत्तं पजहदि ण जहं अण्णो कहं होदि ।।११२।।

अन्वयार्थ – (जीवो) जीव **(भवं)** परिणमन करीत **(णरो)** मनुष्य **(अमरो)** देव **(वा परो)** अथवा अन्य काही **(भविस्सदि)** होईल **(पुणो)** पुन्हा **(भवीय)** मनुष्य देवादी होऊन **(किं)** काय तो **(दव्वत्तं)** द्रव्यत्वाला **(पजहदि)** सोडतो ? **(ण जहं)** जर तो द्रव्यत्वाला सोडत नाही तर **(अण्णो)** अन्य **(कहं होदि)** कसा होऊ शकेल ?

तात्पर्य – आपल्या अनेक पर्यायांमध्ये परिणमन न करणारे द्रव्य कधीही द्रव्यत्वाला सोडत नाही म्हणून ते तेच राहते, अन्य होत नाही.

द्रव्य सदैव सत्–

विश्वामध्ये जीव असो की पुद्‌गल कोणतेही द्रव्य असो ते सदैव सत् आहे. कारण ते द्रव्यत्वभूत अन्वयशक्तीला कधीही सोडत नाही. द्रव्याची अवस्था बदलली तरी त्यातील द्रव्यत्व नष्ट होत नाही. ऊसाला घाणीमध्ये पिळून त्याचा रस काढला तरी त्या रसामध्ये ऊसपणा नष्ट होत नाही. तो ऊसाचाच रस म्हटला जातो. ऊस आणि ऊसाचा रस भिन्न नाहीत. सोनार सोन्याला अग्नीमध्ये तापवतो, हातोड्याने बडवतो, तरी त्याला सोने नष्ट होण्याची भिती वाटत नाही. त्याला माहीत आहे सोने अग्नीत तापवले तरी त्यातील सुवर्णत्व गुण नष्ट होत नाही. त्या सोन्याचे मोडून निरनिराळे दागिने बनविले तरी सुवर्णद्रव्याचा अभाव होत नाही.

आज भौतिक विज्ञान सुद्धा हा सिद्धान्त मान्य करते की मूळ द्रव्याचा नाश होत नाही त्याची फक्त अवस्था बदलते. मनुष्य जीव मरून देव झाला तरी तेथे जीवत्वाचा नाश होत नाही. जो मनुष्य होता तोच आता देवरूपाने उत्पन्न होतो म्हणून हा सत्‌चाच उत्पाद आहे.

ज्ञानीला मरणाचे भय असत नाही. त्याला माहीत आहे, माझे मरण जरी झाले तरी माझा नाश होत नाही. ज्ञानीला मृत्यूची चाहूल लागली तर तो आपला मृत्युमहोत्सव साजरा करतो.

यशोधर राजाच्या राजामध्ये एक सत्यनिष्ठ स्पष्टवादी ज्ञानी लेखक राहत होता. तो नेहमी राजाच्या चुकीच्या कार्याविरूद्ध टिप्पणी करीत असे त्यामुळे राजा त्याच्यावर चिढून होता. संयोगवश एका प्रकरणात तो राजाच्या चावडीत सापडला. राजाच्या समोर त्याला सुनावणीसाठी बोलावण्यात आले राजाला माहीत होते तो या प्रकरणात निर्दोष आहे. परंतु पूर्वीचा त्याच्यावरील राग काढण्यासाठी राजाने त्याला मृत्यूची शिक्षा ठोठावली ती ही सहा महिन्यानंतर जेणेकरून तोपर्यंत तो झुरुन मरावा.

राजाला दुसऱ्या दिवशी बातमी कळाली की त्या व्यक्तीजवळ जो कोणी संवेदना प्रगट करण्यासाठी जातो तो त्यांच्याशी हसत–हसत वार्तालाप करतो. तो म्हणतो, 'तुम्हाला आपल्या मृत्यूचा दिवस माहीत आहे का?' सर्वजण म्हणतात, 'नाही,' तेव्हा तो मोठ्याने हसत म्हणतो पहा, 'तुम्हाला तुमच्या मृत्यूचा दिवस माहीत नाही, परंतु मी किती भाग्यशाली आहे आणि राजाने माझ्यावर किती उपकार केलेत. माझ्या मृत्यूचा दिवस निश्चित केला

आहे. तुम्ही सर्वजण गाढ निद्रेमध्ये झोपले आहात. मी सुद्धा गाफिल होतो, गाढनिद्रेमध्ये झोपलो होतो. परंतु राजा धन्य आहे. त्यांनी माझ्या मृत्यूचा दिवस निश्चित करून मला जागे केले. अरे, मृत्यू तर सर्वांना येणार आहे, परंतु मी त्या सर्वाहून भिन्न आहे. राजाहून सुद्धा मी वेगळा आहे. कारण कुणाला मृत्यूचा दिवस माहीत नाही, परंतु मला माहीत आहे.'

अशाप्रकारे मृत्यूच्या जवळ चाललेल्या दिवसांना तो अधिक आनंदात व खुशीमध्ये व्यतीत करीत होता. हळूहळू मृत्यूचा दिवस जवळ-जवळ येत होता तस तसा तो अधिक आनंदी व उत्साही दिसत होता. तीन दिवस त्यांनी मृत्युमहोत्सव साजरा करण्याची घोषणा केली. त्या दिवसांमध्ये तो उत्साहित होऊन आपल्या रचना लोकांना ऐकवत होता व त्यामध्ये राजाचे आभार प्रकट करणे कधी विसरत नव्हता. मृत्युदंडापूर्वी राजा त्याच्याजवळ गेला व डोळ्यात पाणी आणून म्हणाला खरच, 'तू मृत्युंजय आहेस, धन्य आहेस, तू एका राजाला पराभूत केलेस, आमच्या अहंकाराला ही पराभूत केलेस. एवढेच नव्हे, तू तर मृत्यूला ही पराभूत केलेस'. राजाने आपल्या चुकीचा पश्चात्ताप करीत त्याला मृत्युदंडातून मुक्त केले. ज्ञानी तत्त्वज्ञान आपल्या जीवनात उतरवतो म्हणूनच तो ज्ञानी म्हटला जातो.

जर द्रव्य आपल्या द्रव्यत्वाला सोडत नाही तर नारक आदी पर्यायांमध्ये जो जीव आहे तो अन्य आहे आणि मनुष्य आदी पर्यायांमध्ये जो जीव आहे तो अन्य आहे असे कसे होऊ शकते ? कारण सर्व पर्यायांमध्ये द्रव्यरूपाने त्याच जीवद्रव्याचा अन्वयरूप सद्भाव प्राप्त होतो.

मरणावस्थापन्न कुत्र्याच्या कानामध्ये जीवंधरकुमाराने णमोकार मंत्र सांगितला, ते ऐकून शांतपरिणामाने कुत्रा मेला व स्वर्गात देव होऊन जन्मला. त्या कुत्र्याच्या शरीरामध्ये असणारा तोच जीव देवपर्यायामध्ये गेला. तेथे जीवपणाचा अभाव झाला नाही. सेठजींचा जीव सामायिकात पाण्याचे ध्यान करून मरण पावला व जवळच्याच विहीरीमध्ये बेडूक म्हणून जन्माला आला. पत्नी पाणी भरण्यासाठी गेली की मोहाच्या संस्कारवश तिच्या अंगावर उडी मारत असे. तोच बेडकाचा जीव तोंडामध्ये फूल घेऊन भगवान महावीरांच्या समवसरणात उड्या मारीत जात होता. तेवढ्यात श्रेणिक राजाच्या हत्तीच्या पायाखाली चिरडून तो मेला व भगवंतांच्या पूजेच्या शुभपरिणामात मरून स्वर्गात देव झाला व श्रेणिक राजा येण्यापूर्वी समवशरणात भगवंतासमोर नृत्य

करू लागला. हा सर्व प्रथमानुयोग दाखवून देतो की पर्याय बदलली तरी जीव तोच तो आहे. जीवत्वाचा कधी अभाव होत नाही.

पुरुरवा भिल्ल मरून देव झाला. तेथून भरतचक्रवर्तीचा पुत्र मरीचिकुमार झाला. मिथ्यामतांची स्थापना केली. मरून पुन्हा देव झाला. त्यानंतर कितीतरी भवानंतर विश्वभूती राजा, त्रिपृष्ठनारायण, सिंह, महावीर इत्यादी पर्यायांमध्ये गेला, आता सिद्धपर्यायात आहे. या सर्व पर्यायांमध्ये तोच तो जीव आहे, भिन्न भिन्न नाही.

द्रव्य नित्य आहे, सत्‌रूप आहे, कधी आपल्या सत्तेला सोडत नाही. आपल्या त्रिकालवर्ती अनंत पर्यायांमध्ये द्रव्य तेच ते आहे, अन्य कधी होत नाही. बौद्धमताप्रमाणे क्षणिक नाही. द्रव्यपणाच्या अपेक्षेने नित्य आहे. हाच जीव आपल्या अशुद्ध उपयोगाने चार गतीचे कर्म बांधून त्या कर्माच्या उदयाने कधी मनुष्य, कधी देव, कधी पशू तर कधी नारकी होतो. तोच जीव आपल्या शुद्धोपयोगाच्या बलाने कर्माचा नाश करून सिद्ध होतो. या अनेक अवस्थांमध्ये तोच तो जीव प्रगट झाला आहे. हा सदुत्पाद आहे. जीवाने आपल्या गुणांना कोणत्याही पर्यायामध्ये सोडले नाही. याचप्रमाणे पुद्‌गलसुद्धा अनेक पर्यायांमध्ये गेले तरी आपल्या पुद्‌गलपणाला सोडत नाही. पुद्‌गलाचे परमाणू परस्पर मिसळतात पुन्हा वेगळे होतात. कधी आहारवर्गणारूप तर कधी तेजोवर्गणारूप तर कधी भाषावर्गणारूप होतात तरी ते पुद्‌गलरूपच राहतात. ते परमाणू आपल्या स्पर्श, रस, वर्ण, गंध गुणांना कधी सोडत नाही. त्यांचा प्रत्येक पर्यायामध्ये सदुत्पाद होतो.

सदुत्पाद समजून जीवनात लाभ–

हा सदुत्पाद न समजल्यामुळेच आम्ही दुःखी आहोत. गृहस्थावस्थेमध्ये सर्वांना आपल्या इच्छेनुसार घरातल्या वस्तूंचे परिणमन हवे असते. सोन्याचे दागिने आपल्या इच्छेनुसार, चांदीची भांडी आपल्या आवडीनुसार, फर्नीचर आपल्या इच्छेनुसार हवे असते. कोणत्याही आकाराचे, प्रकाराचे पुद्‌गलाचे परिणमन होवो, त्यामध्ये पुद्‌गलपणा आहेच ना. सोन्याचा दागिना कसाही असो, त्यामध्ये सुवर्णपणा नष्ट झाला नाही ना? सर्व वस्तू यथावस्थित मूळरूपात आहेत. त्यामुळे त्याच्या सदुत्पादाला जाणून सुखी व्हावे.

यावरून हे ही स्पष्ट होते की जीवाचे सर्व पर्याय जीवरूप व पुद्‌गलाचे सर्व पर्याय पुद्‌गलरूप आहेत. एका द्रव्याचे पर्याय अन्य द्रव्यरूप होऊ शकत

नाहीत. कुटुंबातील आपल्या प्रियव्यक्तीचा वियोग झाला तरी दुःख मानण्याचे कारण नाही. कारण त्याचे सुद्धा जीवत्व नष्ट झाले नाहीच. त्याचा जीव दुसऱ्या पर्यायात आहेच. पर्याय कोणताही झाला तरी भीतीचे कारण नाही. चुकून नरकात जरी हा जीव गेला तरी माझ्या द्रव्यस्वभावाचा नाश होणार नाही. तेथेसुद्धा माझा सदुत्पादच आहे. संसार अवस्थेमध्ये व मुक्तावस्थेमध्ये मीच आहे, अन्य कोणी नाही म्हणून संसार अवस्थेपासून निवृत्त होऊन केवल आपल्या शुद्ध स्वरूपाला प्राप्त होण्यासाठी केवळ चैतन्यस्वरूपाची उपासना करावी.

अशाप्रकारे सदुत्पाद द्रव्यापासून अभिन्न आहे हे निश्चित करून आता असदुत्पाद अन्यरूप आहे हे दृष्टान्ताने निश्चित करतात.

मणुवो ण होदि देवो देवो वा माणुसो व सिद्धो वा ।
एवं अहोज्जमाणो अणण्णभावं कधं लहदि ॥११३॥

अन्वयार्थ–(**मणुवो**) मनुष्य (**देवो**) देव (**ण होदि**) नाही (**वा**) किंवा (**देवो**) देव (**माणुसो व सिद्धो वा**) मनुष्य अथवा सिद्ध नाही (**एवं अहोज्जमाणो**) अशाप्रकारे न होणारा तो (**अणण्णभावं**) अनन्यभावाला (**कधं लहदि**) कसा प्राप्त होऊ शकतो ?

तात्पर्य – एक पर्याय दुसऱ्या पर्यायरूप नाही. म्हणून पर्याय भिन्नभिन्नच आहेत. एक नाहीत.

स्वकाळामध्ये पर्यायाचे अस्तित्व–

पर्याय आपल्या परिणमनकाळामध्येच उत्पन्न होतो. त्या काळातच त्याचे अस्तित्व आहे. पूर्व किंवा पश्चात् काळामध्ये त्याचे अस्तित्व नाही. म्हणून पर्यायाचा उत्पाद पर्यायदृष्टीने असत्चा उत्पाद म्हटला जातो. मोत्याच्या माळेमध्ये प्रत्येक मोती आपल्या स्थानी आहे तो पूर्व मोत्याच्या किंवा पुढच्या मोत्याच्या स्थानी नाही म्हणून माळेतील प्रत्येक मोती वेगवेगळाच आहे. यद्यपि द्रव्यामध्ये शक्तीरूपाने होण्यायोग्य अनंत पर्याय वास करतात. परन्तु त्यापैकी एकावेळी एकच पर्याय प्रगट होतो. जेव्हा एक पर्याय प्रगट होतो तेव्हाच पूर्व पर्याय नष्ट होतो व दुसरा नवीन पर्यायच उत्पन्न होतो. म्हणून पर्यायदृष्टीने त्याला असदुत्पाद म्हणतात. जो मनुष्य पर्यायामध्ये जीव आहे, तो पर्यायापेक्षेने मनुष्य आहे, तो देव, नारकी व तिर्यंच नाही. त्याचप्रमाणे जो देव पर्यायामध्ये आहे तो देव आहे, तो मनुष्य, नारक किंवा सिद्ध नाही. कारण देवगतीमध्ये जी

शरीराची अवस्था व बाह्यविभूती असते ती अन्य गतीमध्ये नसते. सिद्ध पर्यायामध्ये जी शुद्ध अवस्था आहे, ती संसार पर्यायामध्ये नाही.

जेव्हा महावीरांचा जीव मरीचिकुमार होता तेव्हा तो पुरुरवा भिल्ल नव्हता, तो देव नव्हता, जेव्हा तो देव पर्यायात होता तेव्हा तो मरीचिकुमार नव्हता. जेव्हा तो त्रिपृष्ठनारायण पर्यायामध्ये होता तेव्हा तो विश्वभूती राजा नव्हता किंवा सिंह नव्हता म्हणून पुरुरवा भिल्ल, मारीच, देव, विश्वभूती, त्रिपृष्ठनारायण, नारकी, सिंह हे सर्व पर्याय भिन्न भिन्न आहेत. आता महावीरांचा जीव सिद्धपर्यायात आहे. आता तो महावीर नाही. त्या त्या पर्यायात त्या द्रव्याचा असदुत्पाद आहे.

एका द्रव्यामध्ये होणारे अनेक पर्यायसुद्धा एकमेकापासून अन्य अन्यच आहेत. आपण मोठे झाल्यावर आपल्याला कोणी बालभाषेत काहीतरी म्हटले तर आपण लगेच उत्तर देतो, मी काही आता बालक नाही. मी मोठा झालो आहे. ज्ञानी जीव जाणतो, की मी पूर्वी अज्ञान अवस्थेमध्ये किती चुका केल्या, विपरीत मान्यतेमुळे शरीरालाच मी समजत होतो. आता त्या माझ्या चेष्टा भ्रमरूप लक्षात येतात. पूर्वीपेक्षा आता माझी मान्यता बदलली आहे. पुढे भविष्यकाळात ही आपली अवस्था राहणार नाही. पुढे मी परमात्म अवस्थेत असेन.

पूर्व पर्यायात आपल्याला प्रिय असणारी व्यक्ती जर व्यंतर, भूत, पिशाच होऊन आपल्याजवळ राहू लागली तर आपण त्याचा स्वीकार करू का? यावरूनच लक्षात येते की पर्याय बदलला की त्याच्या संबंधीचे भावसुद्धा बदलतात. म्हणून पर्याय अपेक्षेने अन्यत्व आहे.

पर्याय द्रव्याहून अभिन्न आहे, म्हणून पर्यायाचा असदुत्पाद होतो तेव्हा द्रव्याचासुद्धा असदुत्पादच म्हटला जातो. पर्याय भिन्न वस्तू नाही. त्या पर्यायरूपाने परिणत द्रव्यच वस्तू आहे. असदुत्पादाच्या दृष्टीने ते द्रव्यसुद्धा अन्य अन्यच आहे. ज्या मनुष्य पर्यायामध्ये आमचा आत्मा आहे तो मनुष्य पर्याय अवश्य नष्ट होणार आहे. तरीसुद्धा आपण नष्ट होणार नाही म्हणून या पर्यायामध्ये जेवढे व्रत, तप, संयम होऊ शकते तेवढे चांगल्याप्रकारे केले पाहिजे. त्यामुळे भविष्यामध्ये योग्य पर्यायाची प्राप्ती होईल.

विभावपर्याय दुःखरूप आहे, म्हणून हेय आहे. स्वाभाविक पर्याय सुखरूप आहे म्हणून प्रगट करण्यायोग्य उपादेय आहे, हे जाणून स्वाभाविक

पर्याय ज्या ध्रुव स्वभावाच्या आश्रयाने प्रगट होते. त्या ध्रुव चैतन्यस्वभावाची उपासना करून सिद्धपर्यायाचा असदुत्पाद करावा.

सदुत्पादाच्या अपेक्षेने द्रव्यामध्ये अनन्यपणा आहे. असत् उत्पादाच्या अपेक्षेने अन्य अन्यपणा आहे. ही गोष्ट पूर्वीच्या दोन गाथांमध्ये सिद्ध केली. यावरून कोणी अशी शंका करेल की जी वस्तू अनन्य आहे ती अन्य कशी असू शकते व जी अन्य अन्य रूप आहे ती अनन्य कशी असू शकते. अनन्यपणा व अन्यपणा हे परस्पर विरोधी धर्म आहेत, ते एका द्रव्यांमध्ये कसे काय राहू शकतात ? या शंकेचे निरसन करण्यासाठी आचार्य पुढील गाथेमध्ये नयदृष्टीने अन्यत्व व अनन्यत्त्व यामध्ये विरोध नाही हे सिद्ध करतात –

दव्वट्ठिएण सव्वं दव्वं तं पज्जयट्ठिएण पुणो।
हवदि य अण्णमणण्णं तक्काले तम्मयत्तादो।।११४।।

अन्वयार्थ – **(दव्वट्ठिएण)** द्रव्यार्थिक नयाने **(तं सव्वं दव्वं)** ते सर्व द्रव्य **(अणण्णं)** अनन्य **(अभिन्न)** आहे. **(पुणो य)** आणि पुन्हा **(पज्जयट्ठिएण)** पर्यायार्थिक नयाने ते सर्व द्रव्य **(अण्णं)** अन्य-अन्य **(हवदि)** आहे. **(तक्काले तम्मयत्तादो)** कारण त्याकाळी द्रव्य पर्यायाशी तन्मय आहे.

तात्पर्य – प्रत्येक द्रव्य आपल्या अनेक पर्यायांना क्रमाने करते. म्हणून द्रव्यदृष्टीने अनेक पर्यायांमध्ये ते एकच आहे व त्या त्या पर्यायांच्या परिणमन काळामध्ये पर्यायांशी तन्मय असते, म्हणून पर्यायदृष्टीने ते अन्य अन्य आहे.

प्रत्येक पदार्थ सामान्य विशेषात्मक–

प्रत्येक पदार्थामध्ये सामान्य व विशेष दोन्ही धर्म आहेत. वस्तूमध्ये हे दोन्ही धर्म सर्वांना प्रतीतीला येतात. प्रत्येक वस्तू अनुवृत्त व व्यावृत्त प्रत्ययाचा विषय आहे. अर्थात प्रत्येक वस्तूमध्ये तोच-तोचपणा व वेगवेगळेपणा दोन्ही धर्म जाणले जात आहेत. आपला मुलगा आहे त्याला आपण कसे जाणतो ? जो गर्भावस्थेमध्ये होता तोच जन्माला आला, जो लहान होता तोच आता मोठा झाला आहे, त्याचाच विवाह झाला, तोच प्रौढ झाला अशाप्रकारे त्यामध्ये तोच-तोचपणाची प्रतीती होते. त्याचबरोबर त्याची गर्भावस्था, बाल्यावस्था, कुमारावस्था वेगवेगळी आहे हे पण आपण जाणतो. अशी प्रतीती का झाली? कारण त्यामध्ये दोन्ही धर्म आहेत. तोच तोच पणा व वेगवेगळेपणा यालाच सामान्य धर्म व विशेष धर्म म्हणतात. अशाप्रकारे प्रत्येक वस्तूच्या बाबतीत

आपल्याला दोन प्रकारचे ज्ञान होते यावरून वस्तूमध्ये अनन्यत्व ऊर्ध्वता सामान्य व अन्यत्व ऊर्ध्वता विशेष धर्म आहे हे सिद्ध होते. तसेच अनेक वस्तूंमध्ये सुद्धा अनुगताकार व व्यावृत्ताकार ज्ञान होते. जसे अनेक मनुष्य जमले आहेत त्यामध्ये वकील, डॉक्टर, शिक्षक, सावकार, शेतकरी, विद्वान, त्यागी आहेत. त्या सर्वांना मनुष्यरूपाने ग्रहण केले. कारण त्या सर्वांमध्ये मनुष्यपणाचा अन्वय आहे. त्या सर्वांना समान भावाने ग्रहण करणे हा अनुवृत्त प्रत्यय आहे. जेव्हा त्या सर्वांची ओळख करून दिली जाते तेव्हा केवळ मनुष्य आहे हे न जाणता हा वकील आहे, हा डॉक्टर आहे, हा शिक्षक आहे असे वेगवेगळेपण जाणले जाते. हाच व्यावृत्त प्रत्यय आहे. सर्व मनुष्यांमध्ये मनुष्यत्व सामान्य धर्म आहे त्यालाच तिर्यक् सामान्य म्हणतात व त्यामध्ये प्रत्येकाची व्यक्तिगत विशेषता त्याला तिर्यक् विशेष म्हणतात.

अशाप्रकारे वस्तूमध्ये ऊर्ध्वता सामान्य, ऊर्ध्वता विशेष, तिर्यक सामान्य व तिर्यक विशेष असे चार भेद आहेत. अर्थात प्रत्येक वस्तू या चार रूपाने प्रतीतीला येते म्हणून वस्तूमध्ये हे धर्म आहेत हे सिद्ध होते.

आपल्या कालक्रमाने होणाऱ्या सर्व पर्यायांमध्ये जो अन्वय (समानता) त्यास ऊर्ध्वता सामान्य म्हणतात. जसे मनुष्य, देव, तिर्यंच पर्यायांमध्ये जीवत्व. प्रत्येक पर्याय भिन्नभिन्न आहे त्यास उर्ध्वता विशेष म्हणतात. जसे काळी गाय, पांढरी गाय इत्यादी.

पदार्थाचे सामान्य स्वरूप तीनही काळांमध्ये एक असते. पदार्थाचे विशेष स्वरूप क्षणाक्षणामध्ये नवीन-नवीन असते.

वस्तूला पाहणारे दोन डोळे-

वस्तू सामान्य-विशेषात्मक आहे म्हणून त्याला पाहणारे डोळे सुद्धा दोन आहेत. १. सामान्य स्वरूपाला पाहणारा डोळा व २. दुसरा विशेष स्वरूपाला पाहणारा डोळा.

१. पहिल्या डोळ्याचे नाव द्रव्यार्थिक चक्षू आहे. दुसऱ्या डोळ्याचे नाव पर्यायार्थिक चक्षू आहे. जसे आपल्या शरीरामध्ये दोन डोळे आहेत. एक उजवा डोळा व दुसरा डावा डोळा.

द्रव्यार्थिक हा उजवा डोळा आहे व पर्यायार्थिक हा डावा डोळा आहे. उजव्या डोळ्याने पाहिले तर उजव्या बाजूचे सर्व दिसते. डाव्या बाजूचे दिसत नाही व डाव्या डोळ्याने पाहिले तर डाव्या बाजूचे सर्व दिसते उजव्या बाजूचे

दिसत नाही. त्याप्रमाणे द्रव्यार्थिक चक्षूने वस्तूकडे पाहिले तर वस्तू सामान्य स्वरूप एक अखंड नित्य प्रतिभासित होते, पर्याय स्वरूप प्रतिभासित होत नाही व पर्यायार्थिक चक्षूने पाहिले तर वस्तू विशेष स्वरूप प्रतिभासित होते, सामान्य स्वरूप प्रतिभासित होत नाही.

द्रव्यार्थिक चक्षू –

पर्यायार्थिक डोळा सर्वथा बंद करून केवळ उघड्या द्रव्यार्थिक डोळ्याने जीवाकडे पाहिले तर नारक, तिर्यंच, मनुष्य, देव, सिद्ध पर्यायविशेषांमध्ये एक जीवद्रव्यच प्रतिभासित होते. कारण येथे सामान्यकडेच दृष्टी आहे. विशेषाकडे दृष्टी नाही. ज्याप्रमाणे एक आग आहे. ती शेणकुटांची असते, गवताची, पानांची, लाकडांची, गॅसची अशाप्रकारे अनेक प्रकारची आहे. परंतु जेव्हा केवळ आगीशी प्रयोजन असते तेव्हा ती शेणकुटाची आहे की गवताची आहे की पानाची आहे की लाकडाची आहे हे पाहिले जात नाही. सर्वांमध्ये एक आग आहे असे ग्रहण केले जाते. तेथे शेणकूट, गवत, लाकूड सर्व गौण आहेत. आग मुख्य आहे. त्याप्रमाणे जेव्हा एका द्रव्याशी प्रयोजन असते तेव्हा सर्व पर्यायांमध्ये सामान्यस्वरूप एक द्रव्य पाहिले जाते. पर्याय गौण केले जातात. ज्याप्रमाणे ज्याला सोने पाहिजे त्याची दृष्टी सोन्याकडे असते. सोने विविध दागिन्यांमध्येच आहे, परंतु तेव्हा दागिन्यांकडे दृष्टी नाही. एक तोळे सोने पाहिजे. मग त्या रिंगा आहेत की अंगठी आहे की कडे आहेत, त्याला गौण केले जाते. सोने तेवढे ग्रहण केले जाते. व्यवहारामध्येही दृष्टिगोचर होते की जेव्हा सामान्याचे प्रयोजन असते तेव्हा सामान्याला मुख्य केले जाते व विशेषास गौण केले जाते.

पर्यायार्थिक चक्षू–

जेव्हा द्रव्यार्थिक डोळा सर्वथा बंद करून केवळ उघड्या पर्यायार्थिक डोळ्याने पाहिले जाते तेव्हा जीवद्रव्यामध्ये व्यवस्थित नारक, तिर्यंच, मनुष्य, देव सिद्धत्व पर्यायस्वरूप विशेष प्रतिभासित होतात. एक सामान्य प्रतिभासित होत नाही. पर्यायस्वरूप द्रव्य अन्य अन्य प्रतिभासित होते. कारण त्या त्या पर्यायकाळामध्ये त्या त्या पर्यायाशी द्रव्य तन्मय असते. ज्याप्रमाणे एकच आग विशेषस्वरूपाने पाहिली जाते. तेव्हा ती शेणकूटाची आग, गवताची आग किंवा लाकडाची आग अशी भिन्न–भिन्न स्वरूपाने भासित होते. कारण जेव्हा अग्नी ज्या स्वरूपाने असते तेव्हा ती त्याच्याशी अभिन्न असते. शेणकूटास लागलेली

अग्नी शेणकूटाशी तन्मय होते म्हणून ती शेणकूटाची अग्नी म्हटली जाते. लाकडाची अग्नी लाकडाशी तन्मय होते म्हणून ती लाकडाची अग्नी म्हटली जाते. त्याप्रमाणे द्रव्य ज्यावेळी ज्या पर्यायरूपाने परिणमते तेव्हा त्या त्या पर्यायाशी तन्मय असते. म्हणून त्या त्या पर्यायरूपाने ते भिन्न भिन्न दिसते. जेव्हा जीव मनुष्यपर्यायरूपाने परिणमतो तेव्हा तो मनुष्य, जेव्हा देवपर्यायरूपाने परिणमतो तेव्हा तो देवच प्रतिभासित होतो. जेव्हा सोन्याच्या दागिन्याशी प्रयोजन असते तेव्हा सोने गौण केले जाते व दागिने मुख्य केले जातात. जेव्हा सोने ज्या दागिन्यारूपाने परिणमते तेव्हा ते त्या दागिन्याशी तन्मय होते. तेव्हा ते सोने अंगठी, रिंगा, कडे या पर्यायरूपाने प्रतिभासित होते.

प्रमाणदृष्टी सर्वावलोकन–

जेव्हा द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक दोन्ही डोळ्यांना एकावेळी उघडून पाहिले असता नारकादी पर्यायांमध्ये व्यवस्थित जीवद्रव्य व जीवद्रव्यामध्ये व्यवस्थित नारकादी पर्याय एकावेळी दिसतात. जेव्हा सोनार सोन्याच्या दागिन्याकडे पाहतो त्यावेळी त्याला दागिन्यामध्ये असणारे सुवर्णत्व व सोन्यामध्ये असणारे निरनिराळे दागिने एकाचवेळी दिसतात. एका डोळ्याने पाहणे एकदेश अवलोकन आहे आणि दोन्ही डोळ्याने पाहणे सर्वदेश अवलोकन आहे.

समोर भिंतीवर एक फोटो टांगलेला आहे. त्याकडे एक डावा डोळा बंद करून उजव्या डोळ्याने पाहिले असता त्याचे एक रूप दिसते व उजवा डोळा बंद करून डाव्या डोळ्याने पाहिले असता काही सरकल्यासारखे त्याचे दुसरे रूप दिसते. दोन्ही डोळ्यांनी पाहिले असता त्याचे पूर्ण रूप दिसते.

ज्याप्रमाणे मोटारगाडीला दोन लाईट असतात. त्यातील एक लाईट बंद केली तर त्याचा तिरपा प्रकाश पडतो. काही भागातच पसरतो. जर दोन्ही लाईट चालू केल्या तर प्रकाश अधिक पडतो व पुष्कळ जागेमध्ये पसरतो. त्याप्रमाणे द्रव्यार्थिक नयाने किंवा पर्यायार्थिक नयाने वस्तूकडे पाहिले तर त्या वस्तूचा काही भाग प्रगट होतो. पूर्ण वस्तू प्रगट होत नाही. जर प्रमाणदृष्टीने वस्तूकडे पाहिले तर त्याचा द्रव्य व पर्यायस्वभाव एकावेळेस प्रगट होतो. अखंड वस्तू प्रतिभासित होते.

द्रव्यार्थिक नयाने पर्यायमालिकेमध्ये द्रव्य एक अनन्य भासित होते. पर्यायार्थिकनयाने द्रव्य पर्यायरूपामध्ये अन्य अन्य भासित होते. सापेक्षरूपाने

दोन्ही नयाने एकावेळी जाणले तर द्रव्याचे एकत्व व अनेकत्व, अन्यत्व व अनन्यत्व एकाचवेळेस लक्षात येते.

जो मी संसार अवस्थेमध्ये आकुलित आहे, हाच मी मुक्त अवस्थेमध्ये शाश्वत अनाकुल राहणार असा निर्णय करून मुक्ती प्राप्तीसाठी अविकार चैतन्य स्वभावमय अद्वैत अन्तस्तत्त्वाची भावना करावी.

नयातीत अनुभव दृष्टी–

सामान्यस्वरूपाने पाहणाऱ्या डोळ्याचे नाव द्रव्यार्थिक नय आहे. विशेषस्वरूपाने पाहणाऱ्या डोळ्याचे नाव पर्यायार्थिक नय आहे. सामान्य–विशेष स्वरूपाने एकावेळी दोन्ही डोळ्याने पाहणाऱ्या दृष्टीचे नाव प्रमाणदृष्टी आहे. दोन्ही डोळे बंद करून पाहणाऱ्या दृष्टीचे नाव आहे अनुभवकला. जे पूर्वी पाहिले ते सर्व वस्तूचे स्वरूप आहे; परंतु एक एक नयाने पाहण्यामध्ये विकल्प उत्पन्न होतात. निर्विकल्प अनुभव होत नाही. म्हणून सर्व नय वस्तूला जाणण्यामध्ये सहायभूत आहेत. म्हणून प्रथम नयाद्वारे वस्तूचे स्वरूप समजणे प्रयोजनभूत आहे. प्रमाणदृष्टीने सर्व धर्मांना एकत्र जाणणे ही प्रयोजनभूत आहे. वस्तूचा अनुभव करण्यासाठी नयातीत व प्रमाणविकल्परहित होण्याची आवश्यकता आहे. सर्व नय समजून घ्या आणि नंतर नयवाद हटवा.

राजाच्या राजमहालाच्या दारात द्वारपाल उभा असतो. तेथे राजाला भेटण्यासाठी कोणी येतो तेव्हा द्वारपालाकडून राजाला भेटण्याची आज्ञा मागितली जाते. आज्ञा मिळाल्यावर भेटणारी व्यक्ती द्वारपालाबरोबर जाते. द्वारपाल तिला राजाच्या दरवाजापर्यंत नेऊन पोहचवतो. व परत आपल्या जागी जाऊन उभा राहतो. त्यानंतर जर भेटणारी व्यक्ती आपल्या धाडसाने राजाजवळ जाते तर त्याला राजाचे दर्शन होते व त्याच्या कार्याची सिद्धी होते. जर त्याचे धाडस झाले नाही तर लाजून तेथेच उभा राहते. मनातील धाकधुकी कमी झाली तर धाडस करू शकते. त्याच विकल्पामध्ये राहिली तर काही लाभ होत नाही. हा सर्व नयवाद वस्तूस्वरूप राजाला भेटविण्यासाठी द्वारपालासमान आहे. या द्वारपालाचे काम वस्तुस्वरूपाच्या अंगणापर्यंत पोहचविण्याचे आहे. पुढचे काम अनुभवाचे आहे. नयाचे काम वस्तूपर्यंत पोहचविण्याचे आहे. पुढे जर आम्ही नयाचे अवलंबन सोडून स्वयं वस्तूला अनुभवण्याचा पुरुषार्थ केला तर वस्तूचे सत्यदर्शन होते. सम्यग्दर्शनाची प्राप्ती होऊन अतीन्द्रिय आनन्दाची प्राप्ती होते. जर हा पुरुषार्थ केला नाही तर नयचक्रामध्ये स्वतःला अडकवून घेतो व

वादविवाद करण्यामध्येच इतिश्री मानतो.

ही तत्त्वज्ञानदृष्टी प्राप्त झाली तर वास्तविक मोक्षमार्गाची प्राप्ती होऊ शकते. आम्ही मोक्षाच्या इच्छेने धर्म करतो की कोणत्या व्यक्तिविशेषाकडे आकृष्ट होऊन धर्म करतो की संसारसुखाच्या इच्छेने धर्म करतो हे स्वतःच तपासून पाहिले पाहिजे.

एक फार मोठा ज्ञानी पुरुष होता. गावोगावी जाऊन धर्माचा उपदेश करीत होता. त्यांचा उपदेश ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने लोक येत होते. त्यांची खूप प्रसिद्धी पसरली होती.

एकदा एक व्यक्ती त्याच्याजवळ आली व ती म्हणू लागली– मी सुद्धा आपली शरण घेऊ इच्छितो, परंतु प्रथम मला एक जिज्ञासा आहे त्याचे समाधान करावे. ज्ञानी म्हणाले, 'सांग, तुझी काय जिज्ञासा आहे?' तो विचारतो, 'आपला उपदेश ऐकून आजपर्यंत किती जीव तत्त्वज्ञानाला प्राप्त झाले आहेत?'

आगन्तुकाचा मर्मभेदी प्रश्न ऐकून ज्ञानी म्हणाला, 'तू संध्याकाळी माझ्याकडे ये, तोपर्यंत तुझ्या प्रश्नाचे उत्तर विचार करून ठेवतो. कारण माझ्याजवळ अशाप्रकारचा लिखित हिशोब नाही. तू संध्याकाळी येण्यापूर्वी या गावामध्ये ४०–५० घर आहेत. त्यांना विचारून ये की धर्म करून ते काय इच्छितात ? तत्त्वज्ञानाची प्राप्ती किंवा दुसरे काही?' या प्रश्नाचे उत्तर विचारण्यासाठी तो जवळ–जवळ सर्व ४०–५० घरांमध्ये जाऊन आला. कोणी सांगितले मला धन नाही. धन पाहिजे म्हणून मी धर्म करतो. कोण म्हणतो, मला पुत्रप्राप्तीची इच्छा आहे. कोण म्हणतो, लोकामध्ये मान सन्मान मिळावा. कुणाला पद प्रतिष्ठा पाहिजे. मी धर्मात्मा आहे हे लोकांना समजावे. अशाप्रकारे अनेक अभिप्राय त्याला ऐकायला मिळाले, परन्तु एकाला सुद्धा तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीची गरज नव्हती.

आगन्तुकाला लक्षात आले की महात्माजींनी माझ्या प्रश्नाचे उत्तर स्वतःच दिले आहे. तरीसुद्धा संध्याकाळी त्यांच्याजवळ तो गेला आणि म्हणाला, 'कुणालाही सम्यग्दर्शन अथवा मोक्षमार्ग नको आहे. सर्वांना संसार, शरीर, भोग पाहिजेत. समाजामध्ये मान प्रतिष्ठा पाहिजे की मी धर्मात्मा–तत्त्वज्ञानी आहे.'

तेव्हा ते विद्वान म्हणाले, ' आता तू सांग की तुला काय पाहिजे? जर तू

तत्त्वज्ञान इच्छीत नसशील तर सम्यग्दर्शन किंवा मोक्षमार्गाची प्राप्ती तुला कशी होईल ?' तो म्हणाला 'पंडितजी, अजून तर माझे वय लहान आहे. काही वर्षांनी तुमच्याजवळ येण्याचा विचार करेन.'

बहुतेक हीच गोष्ट आपल्या सर्वांची आहे. अधिकांश लोक संसार-शरीर-भोगाच्या मागे लागले आहेत. काही तरी करून काही चमत्कार व्हावा व दीर्घकाळाची आमची इच्छा पूर्ण व्हावी किंवा धन-पैसा परिवार प्राप्त व्हावा, हाच आमचा मोक्ष आहे. आम्हाला अन्य मोक्ष किंवा मोक्षमार्गाची गरजच नाही. अधिकतर अभिप्राय हा आहे की आमची समाजात प्रतिष्ठा व्हावी की इतका मोठा धनवान असून सुद्धा तत्त्वज्ञानी-धर्मात्मा आहे आणि म्हणूनच शास्त्रसभा, तत्त्वचर्चा इत्यादी मध्ये भाग घेतात. त्यागी व्रती विद्वानांची संगती याच अभिप्रायाने करतात. वास्तविक तत्त्वजिज्ञासू विरळच आहेत.

अनेकान्तात्मक वस्तूचे स्वरूप ऐकल्यावर श्रोत्याच्या मनामध्ये संशय उत्पन्न होतो. जी वस्तू सत् आहे तीच असत् कशी ? जी नित्य आहे तीच अनित्य कशी? जी अभिन्न आहे तीच भिन्न कशी ? अशाप्रकारे विरोधाभास निर्माण होतो. त्या शिष्याच्या मनातील विरोधाला दूर करण्यासाठी आता या गाथेत सप्तभंगींचे वर्णन करतात.

अत्थि त्ति य णत्थि त्ति य हवदि अवत्तव्वमिदि पुणो दव्वं ।
पज्जायेण दु केण वि तदुभयमादिट्ठमण्णं वा ।। ११५ ।।

अन्वायर्थ -(दव्वं) द्रव्य **(केण वि)** कोणत्या तरी **(पज्जायेण)** पर्यायाने **(अत्थि त्ति य)** अस्ति व **(णत्थि त्ति य)** कोणत्या तरी पर्यायाने नास्ति **(पुणो)** आणि **(अव्वत्तव्वमिदि)** कोणत्यातरी पर्यायाने अवक्तव्य आहे **(तदुभयं)** आणि कोणत्यातरी पर्यायाने अस्तिनास्ति **(वा)** अथवा **(अण्णं आदिट्ठं)** कोणत्यातरी पर्यायाने अन्य तीन भंगरूप सांगितली गेली आहे.

वस्तु अनेकान्त स्वरूप -

स्याद्वाद सर्व वस्तूंच्या स्वरूपाला सिद्ध करणारे अर्हंत सर्वज्ञप्रभूंचे एक अस्खलित (निर्बाध) शासन आहे. ते शासन 'सर्व अनेकान्तात्मक आहे' अशाप्रकारे उपदेश करते; कारण सर्व वस्तु अनेकान्तस्वभावी आहेत.

जे तत् आहे तेच अतत् आहे, जे एक आहे तेच अनेक आहे, जे सत् आहे, तेच असत् आहे, जे नित्य आहे तेच अनित्य आहे अशाप्रकारे एका

वस्तूमध्ये वस्तुत्वाला उत्पन्न करणाऱ्या परस्पर विरुद्ध दोन शक्ती प्रकाशित होणे अनेकान्त आहे.

त्या अनेकान्तात्मक वस्तूचे सापेक्ष कथन करणे त्यास अनेकान्तवाद अथवा स्याद्वाद म्हणतात. स्याद्वादाचे कथन करण्याची शैली म्हणजेच सप्तभंगी होय.

अनेकान्तात्मक वस्तूची कथनशैली 'सप्तभंगी' –

लौकिक किंवा अलौकिक कोणत्याही विषयाचे ज्ञान करताना किंवा करविताना हे सात भंग स्वत: उत्पन्न होतात. लोकांमध्ये कोणताही विषय या सात भंगापासून निरपेक्ष नाही. परन्तु इन्द्रिय प्रत्यक्ष व सुलभ असल्यामुळे त्या ज्ञानामध्ये या सात गोष्टी स्थूलदृष्टीने लक्षात येत नाहीत. सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर ह्या सात गोष्टी दररोजच्या साधारण ज्ञानामध्ये सुद्धा अवश्य दिसतात. ते सात भंग पुढीलप्रमाणे आहेत –

१) अस्ति २) नास्ति ३) अवक्तव्य ४) अस्तिनास्ति ५) अस्ति अवक्तव्य ६)नास्ति अवक्तव्य ७) अस्ति नास्ति अवक्तव्य.

एका वस्तूमध्ये हे सात भंग का उत्पन्न होतात ? सात प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात म्हणून सात प्रकारचे उत्तर स्वरूप सात भंग उत्पन्न होतात. सातच प्रश्न का होतात ? सात प्रकारच्या जिज्ञासा होतात म्हणून सात प्रकारचे प्रश्न होतात. सातच जिज्ञासा का होतात ? तर वस्तूमध्ये सात प्रकारचे धर्म आहेत.

शिष्याने प्रश्न केला की १) द्रव्य आहे का ? त्याचे उत्तर स्वरूप सांगितले गेले की हो द्रव्य आपल्यास्वरूपाने आहे.

२) द्रव्य नाही का ? द्रव्य परस्वरूपाने नाही.

३) आहे किंवा नाही ते एकावेळी सांगा ? तेव्हा सांगितले एकावेळी सांगता येत नाही म्हणून अवक्तव्य स्वरूप आहे.

४) काय द्रव्य अस्ति व नास्ति दोन्हीस्वरूप आहे ? द्रव्य स्वरूपाने आहे व पररूपाने नाही या अपेक्षेने दोन्ही रूप एकावेळी आहे, परंतु क्रमाने त्याचे वर्णन होऊ शकते म्हणून अस्ति नास्ति स्वरूप आहे.

५) द्रव्य अवक्तव्य असून सुद्धा आहे का ? द्रव्य अवक्तव्य असून स्वरूपाने आहे म्हणून अस्ति अवक्तव्य आहे.

६) द्रव्य अवक्तव्य असून सुद्धा नाही का ? द्रव्य अवक्तव्य असून परस्वरूपाने नाही म्हणून नास्ति अवक्तव्यस्वरूप आहे.

७) द्रव्य अवक्तव्य असून दोन्ही स्वभावांना स्वत:मध्ये काय ठेवत नाही? द्रव्य दोन्ही स्वभावांना ठेवते परंतु एकावेळी सांगू शकत नाही म्हणून अवक्तव्य आहे. म्हणून द्रव्य अस्तिनास्ति अवक्तव्य आहे.

कोणतीही गोष्ट सांगायची असेल तर एकावेळी एक गोष्ट सांगणार ना ? जे काही सांगू त्याच्या विरुद्ध सुद्धा तत्त्व प्राप्त होते. अशा प्रकारे दोन गोष्टी झाल्या. १) सांगितली जाणारी गोष्ट व २) त्याच्या विरुद्ध गोष्ट. दोन गोष्टी झाल्या तर दोन गोष्टींच्या दृष्टी भिन्नभिन्न झाल्या. एका दृष्टीने सरळ गोष्ट व दुसऱ्या दृष्टीने उलटी गोष्ट. दोन बाबी झाल्या ह्या दोन्ही गोष्टींना एकावेळी सांगण्याचा प्रयत्न केला तर सांगितल्या जाऊ शकत नाहीत, ही तिसरी बाब झाली. तीन स्वतंत्र बाबी झाल्या. या तीन गोष्टींचा संयोग करून सांगितले तर आणखीन चार गोष्टी होतात. ज्याप्रमाणे तीन वस्तू आहेत – १) मीठ २) मिरची व ३) चिंच. आपण तीन वस्तूंचा स्वतंत्र स्वाद घेऊ शकतो म्हणून स्वतंत्र वस्तूंचे तीन स्वाद झाले. या तीन वस्तूंचा संयोग करून स्वाद घेतला तर आणखीन चार स्वाद होतात. १) मीठ व मिरचीचा संयोगरूप स्वाद २) मीठ व चिंचेचा संयोग रूप स्वाद ३) मिरची व चिंचेचा संयोगरूप स्वाद ४) मीठ, मिरची व चिंचेचा संयोगरूप स्वाद. अशा प्रकारे स्वतंत्र तीन स्वाद व संयोगरूप चार स्वाद असे सात स्वाद उत्पन्न झाले.

अशाप्रकारे कोणतीही एक गोष्ट जनतेसमोर ठेवली तर त्याच्या विरुध्द एक गोष्ट असणार. त्या दोघांना मिळून एकावेळी एक गोष्ट असणार आणि या तिन्हींचा संयोग करून चार गोष्टी होणार.

जसे म्हटले की जीव नित्य आहे तर याच्याविरूद्ध एक गोष्ट येणार की जीव अनित्य सुद्धा आहे. दोन्ही धर्म एकावेळी सांगा म्हटले तर अवक्तव्य धर्म सिद्ध होतो. तीन धर्म झाले १) नित्य २) अनित्य व ३) अवक्तव्य. या तिन्हींचा यथायोग्य संयोग करून सांगितले तर आणखीन चार गोष्टी सिद्ध होतात. १) नित्यानित्य २) नित्य अवक्तव्य ३) अनित्य अवक्तव्य ४) नित्य अनित्य अवक्तव्य.

कोणतीही एक बाब समोर ठेवली तर त्याच्या सात अपेक्षा प्रगट होतात. या सर्व अपेक्षांचे वर्णन करणे हेच सर्वदेश वर्णन आहे. यालाच सप्तभंगी म्हणतात. याचेच नाव स्याद्वाद आहे.

सप्तभंगीच्या अपेक्षा – आता याच्या अपेक्षा काय आहेत याचा विचार

करू. जसे जीव नित्य आहे कोणत्या दृष्टीने ? द्रव्यार्थिक दृष्टीने. कारण द्रव्यार्थिक दृष्टीने जीवाकडे पाहिले तर एक सामान्य तत्त्व दिसले. ते रूप नष्ट होत नाही, अनादि अनन्त राहते म्हणून जीव नित्य आहे. जीव अनित्य आहे कोणत्या दृष्टीने ? पर्यायदृष्टीने. प्रत्येक समयाला पर्याय नवनवीन होतात. त्या पर्यायाकडे पाहून विचार केला तर जे होते ते राहत नाही, अन्य होत राहते, बदलत राहते म्हणून जीव अनित्य आहे. द्रव्यार्थिकदृष्टीने जीव नित्य आहे आणि पर्यायार्थिकदृष्टीने जीव अनित्य आहे. जर कोणी म्हणेल की तुम्ही नित्य पण म्हणता व अनित्य पण म्हणता, खर सांगा हा जीव कसा आहे. एका शब्दात सांगा तर सांगू शकत नाही म्हणून अवक्तव्य आहे.

वस्तूमध्ये अवक्तव्यता दोन प्रकारांनी पाहिली जाते १) वस्तूच्या एकरसरूप अखंड अनुभवाच्या दृष्टीने व २) एकावेळी कथनाच्या असमर्थतेच्या दृष्टीने. वस्तूचे अखंड स्वरूप अनेकान्तात्मक आहे म्हणून जाणले जाऊ शकते परंतु सांगितले जाऊ शकत नाही. ज्याप्रमाणे सरबताचा अखंड स्वाद.

दुसरी अवक्तव्यता युगपत कथनाच्या असमर्थतेमुळे आहे. हे दोन्ही विरोधी धर्म वस्तूमध्ये एकावेळी राहू शकतात, परंतु एकावेळी सांगितले जाऊ शकत नाहीत.

क्रमपूर्वक सांगितले जाऊ शकतात. परंतु वस्तूमध्ये क्रमाने नसतात. असा कोणताही एक शब्द नाही जो या दोन विरोधी धर्मांना व्यक्त करू शकेल. कोणताही शब्द पूर्णरूपाने वस्तू स्वरूपाचे प्रतिपादन करण्यामध्ये समर्थ नाही म्हणून वस्तू अवक्तव्य आहे.

४) क्रमाने कथनाच्या अपेक्षेने नित्यानित्य आहे. ५) अवक्तव्य असून ही नित्य आहे. ६) अवक्तव्य असूनही अनित्य आहे. ७) अवक्तव्य असून ही नित्यानित्य आहे.

१) अस्ति २) नास्ति – वस्तु स्वरूपचतुष्टयाच्या अपेक्षेने आहे. सामान्य विशेषात्मक वस्तूचे कथन करताना वस्तूच्या द्रव्यक्षेत्रकालभावस्वरूप स्वचतुष्टयाचा आश्रय घेणे पर्याप्त आहे. गुणपर्यायांचा आधार द्रव्य आहे, त्या द्रव्याचे प्रदेश स्वक्षेत्र आहे, त्या द्रव्याची वर्तमान पर्याय स्वकाल आहे, त्याचे गुण त्याचा स्वभाव आहे. वस्तू या चतुष्टयाने गुम्फित एकरस अखंड पिण्ड आहे. सांगण्यासाठी हे चार आहेत. वास्तविक एक आहेत. कारण तीन

काळामध्ये हे कधीही वस्तूपासून पृथक् होऊ शकत नाहीत. सर्व वस्तू आपापल्या गुणपर्यायामध्ये अवस्थित असल्यामुळे आपापल्या चतुष्टयाचे स्वामी आहेत, दुसऱ्या वस्तूच्या चतुष्टयाचे स्वामी नाहीत. म्हणून वस्तूचा आपला एक चतुष्टय त्याचा स्वचतुष्टय आहे व आपल्यापासून भिन्न सर्व वस्तूंचे चतुष्टय त्याकरिता परचतुष्टय आहेत. ज्याप्रमाणे जीव आणि शरीर, एकत्र राहतात. परंतु जीव स्वद्रव्यामध्ये आहे. आपल्या लोकप्रमाण असंख्यात प्रदेशांमध्ये आहे, आपल्या रागादि पर्यायामध्ये किंवा मनुष्यादि पर्यायामध्ये आहे, आपल्या ज्ञानादी गुणांमध्ये विद्यमान आहे. शरीर अनंत परमाणू स्वरूप स्वद्रव्यामध्ये आहे, त्या परमाणूंच्या प्रदेशांमध्ये आहे, आपल्या बालक-तरुण-वृद्ध पर्यायामध्ये आहे व आपल्या स्पर्शरसगंधवर्णरूप भावामध्ये आहे. जीव आपल्या चतुष्टयामध्ये आहे व शरीर आपल्या चतुष्टयामध्ये आहे. जीवाचे चतुष्टय स्वत:करिता स्वचतुष्टय आहे. परंतु शरीराकरिता परचतुष्टय आहे. शरीराचे चतुष्टय त्याच्याकरिता स्वचतुष्टय आहे. परंतु जीवाकरिता परचतुष्टय आहे.

प्रत्येक पदार्थाची सत्ता तेव्हाच सिद्ध होते, जेव्हा त्या पदार्थाला चारी अपेक्षेने अन्य पदार्थापासून व्यावृत्त केले जाईल. नाहीतर सर्व पदार्थांचे परस्परामध्ये मिश्रण झाल्यामुळे सर्व संकर होऊन जाईल. जर पदार्थाला आपल्याच चतुष्टयामध्ये राहण्याचा नियम नसेल तर दुसऱ्याच्या चतुष्टयाला ग्रहण करेल व आपले चतुष्टय दुसऱ्याला देऊ शकेल. जर असे झाले तर जीव जड होऊन जाईल व शरीर जीव होऊन जाईल. प्रत्येक पदार्थ स्वचतुष्टयामध्येच अवस्थित आहे, परचतुष्टयामध्ये नाही अथवा स्वचतुष्टयच त्याच्याकरिता सत् स्वरूप आहे, परचतुष्टय नाही. वस्तूमध्ये दोन विरोधी धर्म विद्यमान आहेत - वस्तु सर्वथा अस्तिरूपच आहे असे नाही.

ती कोणत्यातरी अपेक्षेने नास्तिरूप सुद्धा आहे.एकाच वस्तूमध्ये दोन विरोधी धर्म राहण्यामध्ये विरोध नाही. कारण त्या दोघांच्या अपेक्षा भिन्नभिन्न आहेत. अस्तित्व स्वचतुष्टयाच्या अपेक्षेने आहे व नास्तित्व परचतुष्टयाच्या अपेक्षेने आहे. जर अस्तित्व व नास्तित्व दोन्ही स्वचतुष्टयाच्या अपेक्षेने सांगितले असते तर विरोध झाला असता.

पुस्तक पुस्तकच आहे, वस्त्र नाही. 'पुस्तक' स्वचतुष्टयाच्या अपेक्षेने अस्तित्वरूप आहे. वस्त्राच्या अपेक्षेने नाही. वस्त्राच्या अपेक्षेने ते नास्तित्व

रूपच आहे, अस्तित्वरूप नाही. यावरून असा प्रश्न होतो की केवळ पुस्तकाचे अस्तित्वच सांगावे, नास्तित्व सांगण्याची काय आवश्यकता आहे ? येथे प्रकाश आहे असे म्हटल्यावर अन्धकाराचा अभाव आपोआप सिद्ध होतो. पुन्हा नास्तीचे कथन करणे म्हणजे वचनगौरवच आहे.

अशी शंका करणे योग्य नाही. कारण क्षेत्र व भावाच्या अपेक्षेने भिन्न असणाऱ्या पुस्तक व वस्त्रादींमध्ये त्याची आवश्यकता नाही, परंतु क्षेत्र व भावाच्या अपेक्षेने समान दिसणाऱ्या जीव व शरीरादी विषयांमध्ये त्याची आवश्यकता अवश्य आहे.

ज्याप्रमाणे पुस्तक व वस्त्रादी पदार्थांमध्ये स्वभावाची भिन्नता लक्षात येते त्याप्रमाणे दूध व पाण्यामध्ये, एकमेक झालेल्या जीव शरीरादी पदार्थांमध्ये भिन्नता लक्षात येत नाही.

एकाच जातीच्या अनेक गुणांमध्ये तसेच मिश्रित पदार्थांच्या भिन्नभिन्न गुणांमध्ये परस्पर भेद सांगितल्याशिवाय विवक्षित पदार्थाचे अविवक्षित पदार्थापासून पृथक्करण करणे दु:साध्य आहे. असे केले नाही तर पितळ व सोने किंवा शुद्ध व अशुद्ध सोने यांच्यामध्ये भेद पाहणे कठीण होईल. म्हणून कोणत्याही पदार्थाच्या स्पष्ट सत्तेचे भान तेव्हाच होते जेव्हा त्यामध्ये विधिनिषेध किंवा अस्तित्व नास्तित्व दोन्ही धर्म स्वीकारले जातील.

सामान्यरूपाने ऐकल्यावर या युगलांमध्ये विरोध वाटतो. परंतु भिन्नभिन्न दृष्टींनी पाहिल्यावर हे सर्व धर्म वस्तूमध्ये एकाच समयात दिसून येतात.

वस्तूमध्ये हे सर्व धर्म एकरस रूपाने राहतात, परंतु वचनांच्या द्वारे क्रमपूर्वकच सांगितले जाऊ शकतात. एकावेळी नाही. ज्याप्रमाणे अद्वैतरूपाने वस्तूमध्ये आहेत. त्याप्रमाणे वचनामध्ये येत नाहीत. ज्याप्रमाणे वचनामध्ये येतात त्याप्रमाणे वस्तूमध्ये नाहीत.

मूळ तीन अंग आहेत. – १) एक विधिरूप अंग – जसे एक, नित्य, नियति आदि २) दुसरे निषेध रूप अंग जसे अनेक, अनित्य, अनियति आदि, ३) तिसरे अवक्तव्य अंग. हे तिन्ही भंग सप्तभंगीचे मूळ आहेत, कारण शेष चार यांचेच संयोगी भंग आहेत.

'अस्ति' चा अर्थ केवळ अस्तित्व गुण नाही, परंतु वस्तूमध्ये दिसणारे विधिस्वरूप सर्व धर्म आणि 'नास्ति'चा अर्थ निषेधात्मक सर्व धर्म. स्वचतुष्टयाने 'अस्ति'च आहे, नास्ति नाही. परचतुष्टयाने नास्तिच आहे, अस्ति

नाही. सामान्यरूपाने नित्यच आहे, अनित्य नाही आणि विशेषरूपाने अनित्यच आहे, नित्य नाही. सामान्यरूपाने अभेदच आहे, भेद नाही आणि विशेषरूपाने भेदच आहे, अभेद नाही. अशाप्रकारे प्रत्येक एक-एक धर्मावर विधिनिषेधाचा विकल्प केला जाऊ शकतो. कोणताही धर्म दाखविण्यासाठी केवळ विधी दाखविणे पुरेसे नाही, तर त्यामध्ये दृढता आणण्यासाठी त्याच्या विरोधी धर्माचा निषेध करणेसुद्धा आवश्यक आहे. नाहीतर संशय व अनध्यवसायाचे निराकरण होऊ शकत नाही. यावरून सात भंगांचे लक्षण याप्रमाणे होतात. -

१) कोण्या धर्माला दाखविण्यासाठी 'या अपेक्षेने असेच आहे' अशाप्रकारे सांगणे प्रथम अस्ति भंग आहे.

२) त्याच धर्माला दृढ करण्यासाठी त्याच्याविरोधी धर्माचा निषेध करीत 'असे नाहीच' अशाप्रकारे सांगणे दूसरा नास्ति भंग आहे.

३) एकावेळी दोघांना एकरसरूपाने सांगण्याची असमर्थता तिसरा अवक्तव्य भंग आहे.

४) दोघांना मागेपुढे 'असेच आहे, असे नाही' अशाप्रकारे सांगणे चौथा अस्तिनास्ति भंग आहे.

५) अवक्तव्य सांगितल्यामुळे कोणी सर्वथा अवक्तव्य मानू नये म्हणून अवक्तव्य असून सुद्धा आपापल्या धर्माचे त्या अपेक्षेने अस्तित्व अवश्य आहे असे सांगणे पाचवा 'अस्ति अवक्तव्य' भंग आहे.

६) अशाच प्रकारे 'अवक्तव्य असून सुद्धा आपापल्या विरोधी धर्मांचे नास्तित्व अवश्य आहे' अशाप्रकारे सांगणे सहावा 'नास्ति अवक्तव्य' भंग आहे.

७) यद्यपि एकावेळी सांगितले जाणे अशक्य आहे. परंतु क्रमाने विधिनिषेधाद्वारे सांगितले जाऊ शकते, सर्वथा अवक्तव्य नाही. अशाप्रकारे सांगणे सातवा अस्तिनास्ति अवक्तव्य भंग आहे.

कोणत्याही गोष्टीला सांगण्याची ही एक न्यायपूर्ण शैली आहे. व्यवहारामध्ये सुद्धा याचा आपण प्रयोग करतो. कोणाला तरी सोन्याची ओळख सांगताना 'हे सोने आहे' एवढे सांगून गप्प बसत नाही. पुढे सांगतो हे पितळ नाही. हा आहे अस्ति व नास्ति भंगांचा लौकिक प्रयोग. याचेच सात भंग होतात. भिन्नभिन्न प्रसंगी प्रयोगात अवश्य येतात. विशेषरूपाने कोण्या अनिष्णात व्यक्तीला वस्तूचा परिचय देतांना याचा उपयोग होतो.

यद्यपि आस्ति आणि नास्ति यामध्ये परस्पर विरोध आहे. परंतु वस्तुत: असे नाही. जर ज्या धर्माची अस्ति सांगितली जाते त्याच धर्माची नास्ति सांगितली तर विरोध अवश्य होईल, परंतु येथे त्याच धर्माचा निषेध न करता त्याच्याविरोधी धर्माचा निषेध केला जात आहे. म्हणून विरोध संभवत नाही. जसे अग्नी उष्णच आहे आणि उष्ण नाहीच, असे सांगणे विरोधाला प्राप्त होईल. परंतु अग्नी उष्णच आहे, थंड नाही, असे सांगणे विरोधाला प्राप्त होऊ शकत नाही. उलट ज्ञानाला दृढ करणारे सिद्ध होते.

यद्यपि 'अवक्तव्य' सांगितल्यामुळे 'वचनाद्वारे सांगणे असम्भव आहे' हे घोषित होते. परंतु या सिद्धान्तामध्ये तसे नाही. कारण अस्ति अवक्तव्य व नास्ति अवक्तव्य असा पाचवा व सहावा भंग त्याला कोणत्यातरी प्रकाराने 'वक्तव्य' बनवितात. अशाप्रकारे वक्तव्य पण आहे व अवक्तव्य पण आहे असा सातवा भंग सांगतो. अशाप्रकारे अनन्त धर्मांवर पृथक् पृथक् सप्तभंगी लागू केली जाऊ शकते. म्हणून वस्तूमध्ये अनन्त सप्तभंगींची सिद्धी होते.

वस्तूमध्ये दिसणारे परस्पर विरोधी अनेक धर्म या सिद्धांताच्या उत्पत्तीचे कारण आहेत. कारण जर धर्मांमध्ये परस्पर विरोध नसता तर या सिद्धांताचा जन्म सुद्धा झाला नसता. वस्तूच्या स्वरूपाचा सरळतेने परिचय देणे व संशय आदींचे निराकरण करून ज्ञानामध्ये दृढता आणणे हे या सिद्धांताचे प्रयोजन आहे.

विविध नयांच्याद्वारे आपला परिचय प्राप्त करून घेऊन सर्व नयांच्या अतीत सहज अन्तस्तत्त्वाचा अनुभव करण्याचा पुरुषार्थ करावा.

या ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन अधिकारामध्ये सामान्य द्रव्याच्या सिद्धीचे प्रकरण आहे. सामान्य द्रव्याच्या सिद्धीसाठी प्रथमत: द्रव्यगुणपर्यायाचे विस्ताराने निरूपण केले. द्रव्य गुणपर्यायवान व उत्पाद-व्यय-ध्रौव्यस्वरूप आहे. द्रव्यगुणपर्यायाचे स्वरूप शिकण्यापाठीमागचे प्रयोजन काय ? कशासाठी सर्व शिकायचे ? तर भेदविज्ञानाच्या प्राप्तीसाठी. द्रव्यगुण पर्यायाच्या व्याख्या शिकल्या, उत्पाद-व्यय-ध्रौव्याचे लक्षण जाणून घेतले, परंतु प्रत्यक्षात द्रव्याला द्रव्य जाणले नाही. पर्यायाला पर्याय, गुणाला गुणरूपाने ग्रहण केले नाही तर शिकणे निरर्थक आहे.

शास्त्र वाचताना ऐकताना फक्त शब्द शिकतो त्याच्या वाच्यभूत वस्तूपर्यंत जाऊन पोहचत नाही. व्यवहारात साडी म्हटल्यावर साडी शब्द ग्रहण

करीत नाही तर साडीरूप वस्तू ग्रहण करतो. शास्त्रामध्ये द्रव्य म्हटल्यावर द्रव्य शब्द ग्रहण करतो. त्याच्या वाच्यभूत अर्थरूप द्रव्याला ग्रहण करीत नाही. म्हणूनच अनेक वेळा शास्त्र ऐकून ही जेथल्या तेथेच आहोत. मुले लहान असताना बालवाडीत त्यांना पदार्थांची ओळख करून दिली जाते. ही ज्वारी आहे, हे गहू आहेत, ही मुगाची डाळ, ही तुरीची डाळ इत्यादी. मोसंबी अशी असते, संत्री अशी असते, इत्यादी. या सर्व लक्षणांचा अभ्यास करून जेव्हा बाजारात जातो तेव्हा ज्या पाहिजे त्या वस्तूंना लक्षणांद्वारे ओळखून बरोबर ग्रहण करतो आणि जर त्याला त्या वस्तू लक्षात आल्या नाहीत तर त्याचे शिकणे निरर्थक आहे त्याप्रमाणे शास्त्रामध्ये वस्तूचे स्वरूप शिकून जर प्रत्यक्षात वस्तूचे स्वरूप जाणले नाही तर शिकणे व्यर्थ आहे.

जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेल्या वस्तूचे स्वरूप जसे आहे तसे जाणले तर भेदविज्ञान प्रगट होते. वस्तूचे स्वरूप न जाणता भेदविज्ञानाचा प्रयोग करीत राहिलो तर ते भेदविज्ञान निराधार आहे. असत्य आहे. पाया मजबूत असेल तर त्यावर उभारलेली बिल्डिंग टिकून राहते. नाहीतर ती ढासळते. वस्तूस्वरूप जाणून त्याचा प्रयोग केला तर धर्म जीवंत असतो. नाहीतर धर्म प्रेताचा शृंगार होतो. म्हणून या ठिकाणी सामान्य द्रव्य-गुण-पर्यायाचे स्वरूप सांगितल्यानंतर आता ११ गाथांद्वारे सामान्य भेदभावना भातात. द्रव्य-गुण-पर्यायाचे वर्णन करताना जीवाचे उदाहरण देऊन स्पष्ट केले होते. कारण संपूर्ण जिनागम जीवतत्त्वाच्या सिद्धीसाठीच आहे. जीवाच्या हितमार्गासाठी सर्व उपदेश आहे. जीवाचे मनुष्यादी पर्याय मोहक्रियेचे फळ आहेत म्हणून ते सर्व जीवस्वभावाहून अन्य आहेत हे पुढील गाथेत सांगतात.

एसोत्ति णत्थि कोई ण णत्थि किरिया सहावणिव्वत्ता।
किरिया हि णत्थि अफला धम्मो जदि णिप्फलो परमो ।।११६।।

अन्वयार्थ – (एसोत्ति णत्थि कोई) सदा हाच आहे असा कोणताही मनुष्यादी पर्याय नाही. **(सहावणिव्वत्ता किरिया णत्थि ण)** विभाव स्वभावाने होणारी क्रिया नाही असे नाही अर्थात रागादिरूप क्रिया अवश्य आहे. **(किरिया हि अफला णत्थि)** विभावक्रिया निश्चयाने फलरहित नाही अर्थात मनुष्यादी पर्यायरूप फल देते. **(जदि परमो धम्मो णिप्फलो)** उत्कृष्ट वीतराग धर्म मनुष्यादी पर्यायरूप फल देण्याने रहित आहे.

तात्पर्य – विभावरूप क्रिया नाना सांसारिक पर्यायरूप फलांना देते व ते पर्याय अन्य अन्य आहेत.

या गाथेमध्ये मौलिक सिद्धान्त सांगितला आहे. यामध्ये चार वाक्य आहेत. १) कोणताही पर्याय शाश्वत नाही. २) रागादी विभावरूप स्वभावक्रियेचा अभाव नाही. ३) रागादी क्रिया अफल नाही अर्थात् सफल आहे. ४) वीतराग धर्म निष्फळ आहे. हे चार वाक्य म्हणजे चार गतीतून सुटण्याचा मार्ग आहेत.

१) प्रथम वाक्य 'कोणताही पर्याय शाश्वत नाही – 'हा' असे या जगात कोणताही पर्याय नित्य नाही. हा जीव निरंतर कोणत्यातरी रूपाने 'मी'चे वेदन करतो. मी मनुष्य, मी स्त्री, मी पुरुष, मी पंडित, मी व्रती इत्यादी प्रत्यक्ष वेदन करतो. जन्मल्यापासून 'मी मनुष्य, 'मी मनुष्य' असे वेदन करीत आला, परंतु हे वेदन कुठपर्यंत आयुष्य संपेपर्यंत. मनुष्य मरून देव झाला की 'हा मी मनुष्य' असे राहिले नाही. त्यानंतर हा मी देव असे वेदन सुरू झाले. देवपर्याय दीर्घकाळ असला तरी नाशवंत आहे. देव पर्याय नष्ट झाल्यावर 'हा मी देव' असे वेदन संपले. संसारातील कोणतीही अवस्था कायम राहत नाही. राजा-महाराजा-चक्रवर्तीची पर्याय सद्धा टिकत नाही. म्हणून बारा भावनेमध्ये म्हटले आहे –

राजा राणा छत्रपति, हाथिन के असवार।
मरना सबको एक दिन, अपनी अपनी बार।।

बारा भावना दररोज म्हणतो परंतु त्याचे भाव भासन करीत नाही. पर्यायाचे स्वरूप शिकलो की पर्याय उत्पादव्ययस्वरूप आहे. क्रमभावी आहे एक समयवर्ती आहे. क्षणभंगुर आहे. परंतु प्रत्यक्षात पर्यायाकडे पाहताना हे स्वरूप भासित न होता तो ध्रुव, कायम टिकणारा वाटतो. त्या पर्यायाला कायम ठेवण्यासाठी रात्रंदिवस धडपड चालू आहे. पर्यायाच्या नाशाची चाहूल लागताच छातीचे ठोके वाढतात. हातपाय गळतात. डोळ्यातून अश्रू येतात.

'हा मी असाच नाही' असे पर्यायाचे चिंतन केले तर कोणतेही पाप आपल्या हातून होणार नाही. अज्ञानी जीव या पर्यायाच्या यशासाठी पाप करतो, खोटे बोलतो, मायाचार करतो. कोणत्याही पदावर आरूढ झाला की त्यामध्ये महान बनण्याचा प्रयत्न करतो. मी सर्वात मोठा आचार्य व्हावा, सर्वात मोठी आर्यिका व्हावी, सर्वात मोठा व्रती व्हावा, सर्वात मोठा पंडित व्हावा

म्हणून अज्ञानीची धडपड चालू असते, परंतु हे विसरून जातो की माझे हे पद, हा पर्याय, हे यश कायम टिकणार नाही.

लौकिकामध्ये मोठा धनिक होण्यासाठी चढाओढ चालू आहे. जीवाचे हाल करून धनसंचय करतो आहे. गाडी, बंगला, नोकरचाकर, फॅक्टरी, सोने चांदी इत्यादी परिग्रहाच्या ग्रहाने ग्रसित झाला आहे. ज्या पर्यायाला टिकविण्यासाठी रात्रंदिवस झटत आहे तो पर्यायच राहणार नाही तर कुणासाठी गाडी, बंगला, धनसंपदा? ओंजळीतील पाण्याप्रमाणे आयूचा एकेक निषेक गळून जात आहे व याची आयू कमीकमी होत चालली आहे. मरणाच्या शय्येवर चढून सुद्धा आशातृष्णा कमी होत नाही. हा सर्व तत्त्वज्ञानरहित जीवन जगण्याचाच परिणाम आहे.

शरीरामध्ये रोग झाला की त्या शरीराची क्षणभंगुरता न जाणता त्याच्या पोषणाकडेच अधिक लक्ष आहे; डॉक्टरांनी जे उपाय सांगितले ते सर्व करण्याचा प्रयत्न आहे. डॉक्टरांनी अभक्ष्य भक्षण करायला सांगितले तर सर्व व्रतनियम वेशीला टांगून ते अभक्ष्य भक्षण करायला मागेपुढे पाहत नाही. विचारले तर म्हणतो, की डॉक्टरांनी सांगितले आहे म्हणून भक्षण करतो. परंतु आत्म्याचे डॉक्टर सर्वज्ञ भगवान जे सांगतात त्यांची आज्ञा मानत नाही. सर्वज्ञ भगवंतापेक्षा ही डॉक्टरवर श्रद्धा अधिक आहे हे त्याचे द्योतक आहे.

सर्वज्ञ जिनेंद्र भगवान भवरोगातून वाचवणारे आहेत. त्यांच्याजवळ दु:ख रोगाचे अचूक औषध आहे. त्यांनी सांगितलेल्या रत्नत्रय औषधीचे योग्य सेवन केले तर शाश्वत निरामय पद प्राप्त व्हायला वेळ लागणार नाही. हा जीव आपल्यासमोर इतरांना मरताना प्रत्यक्ष पाहतो तरी आंधळा झाला आहे. मरण निश्चित आहे हे जाणून सुद्धा त्याचा विचार करीत नाही.

समंतभद्र महाराज पत्रामध्ये लिहतात. – की 'दररोज सकाळी उठल्यावर असा विचार करावा की आज व्याधि, मरण, संकट यापैकी कोणी माझ्यावर घाव घालणार नाही ना.'

'मी आज मरणार आहे याची जाणीव असेल तर हा जीव आपला वेळ पापात घालवणार नाही. एका गावात एक भालू नावाचा दरोडेखोर होता. तो लोकांची संपत्ती लुटून त्यांची मारहाण करायचा, लोक त्याच्या त्रासाला कंटाळून गेले होते. त्या गावात एक साधु महाराज आले. साधू तपस्वी होते. त्यांच्या तपाचे तेज चेहऱ्यावर झळकत होते. गावातील लोक साधूंना शरण गेले

व म्हणू लागले,' साधू महाराज, आमचे रक्षण करा. हा भालू आम्हाला खूप छळतो आहे. सर्वांच्या डोक्यावर सतत दरोड्याची टांगती तलवार आहे. कधी कोणाला तो गिळंकृत करेल सांगता येत नाही. सतत भय आहे.'

साधू महाराज म्हणाले, 'तुम्ही अजिबात घाबरू नका, सर्व काही ठीक होईल. मी त्याला पाहून घेतो. साधूंचा प्रभाव ऐकून भालू ही त्यांच्या दर्शनास गेला. साधूंनी त्याला सांगितले. 'आता तुझे आयुष्य सात दिवसाचे राहिले आहे.' कितीही दुष्ट व्यक्ती असला तरी साधूंच्या वचनावर त्याला विश्वास असतो. साधूंचे वचन असत्य असत नाही असे अंतरंगात भासित होते. त्याला वाटले, आता आपण मरणार तर दरोडा घालून काय उपयोग? कुणासाठी पैसा मिळवायचा, लोकांना कशाला त्रास देऊ ? त्याने दरोडा घालणे सोडले व शांत परिणाम ठेऊन देवाचे नामस्मरण करू लागला. त्याच्यामध्ये आमूलाग्र बदल झाला. सर्व लोक निर्भय झाले. सर्वांना आश्चर्य वाटू लागले. असा कसा एकदम बदल झाला. सातवा दिवस उजाडला. तो शांत परिणामाने मरणाची वाट पाहू लागला. साधूंनी त्याला सांगितले. तुझा आज मृत्यू येईल असे नाही. पण मृत्यू येणार म्हणून समजताच तू सर्व पाप सोडलेस. जर माणसांनी सतत आपल्या पर्यायाच्या क्षणभंगुरतेचा विचार केला तर त्याला पाप करण्याची भावनाच उत्पन्न होत नाही. आपण सुद्धा अशाप्रकारे प्रयोग करून पहा. मी आज मरणार आहे असा विचार करा तर काय काय करण्याचे भाव होतात पहा. डॉक्टरानी सांगितले 'कॅन्सर झाला आहे.' तर लगेच आपल्या जीवनाची अशाश्वतता लक्षात येते व जन्मभर धर्म न जाणणारी व्यक्ती सुद्धा समाधिमरणाची तयारी करू लागते. फक्त आपल्या पर्यायाची विनश्वरता लक्षात आली पाहिजे. आम्ही विचार करतो की मला अजून २०-२५ वर्षे मरण येणार नाही. त्यामुळे निश्चिंत आहोत.

पर्यायाचा सम्यक् विचार सुद्धा धर्ममार्गावर स्थापित करण्यासाठी उपयोगी पडतो. म्हणूनच बारा भावनेमध्ये प्रथम अनित्यभावना ठेवली आहे.

२) दूसरे वाक्य- रागादी विभावरूप स्वभावक्रियेचा अभाव नाही -

या जीवाचा अनादिकाळापासून कर्मपुद्गलाबरोबर निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. जीवाची चेतनक्रिया कर्माच्या उदयानुसार प्रवृत्ती केल्यामुळे मोह मिश्रित झाली आहे. ती मोहमिश्रित क्रिया संसारामध्ये स्वाभाविक झाली आहे. कषायाचे निमित्त मिळाले असता कषाय बिना प्रयत्न सहज उत्पन्न होतो. कोणी

शिवी दिली किंवा आपल्या मनाविरुद्ध घडले की क्रोध सहजपणे येतो. यश मिळाले की मानकषाय सहज होताना दिसतो. मान दुखावला गेला की क्रोध उत्पन्न होतो. मनासारखे घडले की तेथे सहजपणे अनुराग उत्पन्न होतो. आपले दोष लपविण्यासाठी मायाचार सहजपणे घडतो.

ज्याप्रमाणे लोकामध्ये अग्नीचा संयोग प्राप्त करून भांड्यामधील खिचडी आपोआप शिजते. अग्नी आपल्या ठिकाणी आहे. खिचडी भांड्यातून बाहेर शिजत नाही. ती स्वयंच भांड्याच्या आतमध्ये शिजते. त्याप्रमाणे पुद्गल कर्माच्या उदयाचा संयोग झाला असता जीव स्वयं क्रोधादी रूपाने परिणमतो. पुद्गलकर्म जीवामध्ये काही करत नाही तरीसुद्धा असा सहज निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. प्रकाश असताना मनुष्याचे निमित्त प्राप्त करून पृथ्वी स्वयं छायारूप बनते. मनुष्य आपल्यापासून निघून त्या जमिनीला छायारूप बनवित नाही. परन्तु असा निमित्तनैमित्तिक संबंध आहे. योग्य निमित्त मिळाले असता अशुद्ध उपादानवाला जीव स्वयं विकाररूप परिणमतो.

३) तिसरे वाक्य– रागादी क्रिया अफल नाही अर्थात् सफल आहे –

मोहमिश्रित क्रिया मनुष्यादी पर्यायांना उत्पन्न करीत असल्यामुळे निष्फळ नाही. ज्याप्रमाणे एका परमाणूचा दुसऱ्या परमाणूशी संबंध झाला असता द्व्यणुक कार्याची निष्पत्ती होते. त्याप्रमाणे रागादि क्रिया झाली की तेथे मनुष्यादी पर्याय नियमाने निष्पन्न होतात. या मनुष्यादी पर्याय दुसऱ्यांनी दिलेली देणगी नाही. ही स्वत:ची मिळकत आहे. जशाप्रकारची रागादि क्रिया करतो तशा प्रकारचे फळ उत्पन्न होते. विकारामध्ये नाना प्रकार आहेत म्हणून त्याचे फळसुद्धा नानारूप मिळते. आम्ही म्हणतो, आम्हाला असा कसा संयोग प्राप्त झाला ? त्या संयोगाला आमंत्रण आम्हीच दिले आहे. तशाप्रकारचे भाव केले म्हणून तशा प्रकारचा संयोग प्राप्त झाला. जशी कृती तसे त्याचे फळ.

जोपर्यंत रागादि परिणती करणार तोपर्यंत त्याचे फळ प्राप्त होणार. ज्याप्रमाणे एखाद्या मुलाचा शिव्या देणे हा स्वभाव बनतो. तो एका मोठ्या मुलाला शिवी देतो. मोठा मुलगा शिवी सहन करीत नाही तर तो त्या छोट्या मुलाला मारतो. पुन्हा छोटा मुलगा शिवी देतो पुन्हा मोठा मुलगा मारतो. परत छोटा मुलगा जोराने शिवी देतो. पुन्हा पूर्वीपेक्षा जोरात मारतो. छोटा मुलगा शिवी देणे सोडत नाही, मोठा मुलगा त्याला मारणे सोडत नाही. छोटा मुलगा रडतो, दु:खी होतो. आता सांगा त्या छोट्या मुलाला मार न बसण्याचा उपाय

काय आहे ? बस उपाय सोपा आहे, शिवी देणे बंद केला तर मार बसणार नाही, जोपर्यंत शिवी देणे सोडणार नाही तोपर्यंत मार सहन करावा लागणार. त्याप्रमाणे जोपर्यंत रागादियुक्त क्रिया करणार तोपर्यंत कर्माचा मार सहन करावा लागणार.

या जीवाने भावसंकटाचे ओझे आपल्यावर लादले आहे आणि या कर्माचे सुद्धा ओझे लादले आहे. त्यामुळे नाना योनींमध्ये नाना शरीरांमध्ये बद्ध होऊन फिरत आहे. या संसारी जीवाने, भ्रमामुळे रागद्वेष वाढवून स्वयंच स्वत:ची दुर्गती करून घेतली आहे. कर्माच्या उदयाला निमित्त करून जीव स्वयंच विकाररूप परिणमतो व त्या विकाराच्या निमित्ताने कार्मणवर्गणा स्वयं कर्मरूप परिणमते. पुन्हा ते कर्म नाना असमान-जातीय पर्यायरूप कार्यांना उत्पन्न करते.

मनुष्यादि पर्याय विभावक्रियेचे फल असल्यामुळे यातील कोणताही पर्याय टंकोत्कीर्णवत् स्थिर नाही. निश्चित नाही. क्रिया बदलत असल्यामुळे त्याचे फळ सुद्धा बदलत राहते. पूर्व पूर्व पर्यायाचा नाश करून हा मनुष्यादी पर्याय उत्पन्न होतो व उत्तरोत्तर पर्यायाकडून हा पर्याय नष्ट केला जातो. म्हणून कोणताही पर्याय कायम राहत नाही. शेतकरी शेतामध्ये बी पेरतो, त्यापासून धान्य उगवते, पुन्हा नवीन बी पेरतो तर त्यापासून नवनवीन धान्य उगवत राहते. जोपर्यंत पेरत राहणार तोपर्यंत उगवत राहणार. त्याप्रमाणे या जीवाची नवनवीन विभावक्रिया करणे चालू आहे म्हणून नवनवीन पर्याय उत्पन्न होत राहतात. जोपर्यंत विभावक्रिया करीत राहणार तोपर्यंत मनुष्यादी पर्याय उत्पन्न होत राहणार. **मनुष्यादी पर्यायांचे पीक नको असेल तर पेरणे बंद केले पाहिजे.**

जीवाचे काम भावात्मक आहे. सुखी व्हावयाचे असेल तर सुखी होऊ शकतो. दु:खी व्हावयाचे असेल तर दु:खी होऊ शकतो. भावाशिवाय जीव दुसरे काही करीत नाही. जीवाचे स्वरूप चैतन्य आहे, त्याची जी काही परिणती आहे ती सर्व चैतन्यात्मक आहे. चैतन्यात्मक कार्य होत राहिले तर तेवढ्याने हानी नाही, परंतु या जीवाच्या मागे मोहाचे भूत लागले आहे. त्यामुळे हानी आहे. जोपर्यंत तो पाठ सोडणार नाही, तोपर्यंत त्याला आपल्या करामतीचे फळ मिळत राहणार. जर मोह राहिला नाही तर संसाराचे कोणतेही फळ मिळत नाही.

४) चौथे वाक्य– वीतराग धर्म निष्फळ आहे –

जेव्हा हा जीव वीतराग धर्मरूपाने परिणमन करतो तेव्हा हा जीव मनुष्यादि पर्यायांना कारणभूत कर्मांना बांधत नाही. उलट परमधर्मस्वरूप

वीतराग भावाने अरिहंत व सिद्धपरमात्मा होतो. वीतराग भावाचे संसाररूपी फळ प्राप्त होत नाही, म्हणून वीतराग धर्म निष्फळ आहे असे म्हटले आहे. वीतराग भावाचे संवर-निर्जरारूप महाफल आहे. आपल्या फळाच्या अपेक्षेने वीतराग धर्म सफल आहे, परंतु संसाररूप फळाला देत नाही म्हणून त्याला निष्फळ म्हटले आहे. ज्याअर्थी वीतराग धर्माचे फळ मनुष्यादी पर्याय नाहीत त्याअर्थी मिथ्यात्व रागादि भावाचे फळ मनुष्यादी पर्याय आहेत ही गोष्ट सिद्ध होते.

जी वस्तू आपल्याला पाहिजे त्या वस्तूची बाजारात जेवढी किंमत असेल तेवढी किंमत देऊनच ती वस्तू आपल्याला मिळते. जर कर्मबंधनरूप वस्तू पाहिजे, तर रागादी भाव त्याची किंमत आहे. त्यामध्ये पण जेवढे रागादी भाव तीव्र असतील तेवढे कर्मबंधन तीव्र होते. जेवढे रागादी भाव मंद असतील तेवढे कर्मबंधन मंद होते. मोक्षरूपी फळ पाहिजे तर वीतराग भाव त्याची किंमत आहे. जेवढ्या अंशाने वीतराग भाव तेवढ्या अंशाने कर्मबंधापासून सुटका. पूर्ण वीतराग झाला तर कर्मबंधापासून पूर्णत: सुटका होते.

खरोखर आपल्याला स्वत:चे आत्मकल्याण करायचे असेल तर आत्म्याचे खरे स्वरूप समजून त्यावर श्रद्धा ठेवून त्यामध्येच लीन झाले पाहिजे. कारण शुद्ध आत्म्याचे श्रद्धान-ज्ञान-चारित्रच वीतराग धर्म आहे. धर्माचा प्रारंभ याच पुरुषार्थाने होतो व धर्माची पूर्णता पण याच पुरुषार्थाने होते. **शुद्ध स्वात्मानुभवरूप ज्ञानपर्यायच मोक्षयात्रेच्या सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत सोबती आहे.** वीतरागनिर्विकल्प स्वसंवेदन पर्याय मोक्षाची यात्रा करवितो. म्हणून आतापासूनच त्याला आपल्याकडे बोलवा. तर ही यात्रा प्रारंभ होऊ शकणार, नाही तर संसाराचीच यात्रा करावी लागणार. जोपर्यंत हा जीव मिथ्यात्व रागादी भावांनी जखडलेला आहे तोपर्यंत याची दुर्गती आहे व चौऱ्यांशी लाख योनीमध्ये परिभ्रमण आहे. जेव्हा हा जीव आपल्या आत्म्याच्या ज्ञान-श्रद्धान व चारित्रामध्ये तन्मय होईल तेव्हा शुद्धभावाने कर्मबंधाचा अभाव करून मुक्त होईल. जर जीवामध्ये विभाव व स्वभावरूप परिणमण्याची शक्ती नसती तर हा कधी न संसारी राहिला असता, न कधी सिद्ध झाला असता. म्हणून दु:खातून मुक्त व्हावयाचे असेल तर परम वीतराग धर्मच शरण आहे.

मागील गाथेमध्ये ४ गोष्टी सांगितल्या १) कोणताही पर्याय कायम

राहत नाही. २) संसारामध्ये रागादिक्रिया स्वाभाविकपणे घडते. ३) त्या क्रियेचे फळ मिळते. ४) वीतराग धर्माचे फळ संसार नाही.

संसारातील प्रत्येक पर्याय अध्रुव आहे. परंतु सिद्धपर्याय ध्रुव आहे. नष्ट होणे हा पर्यायाचा स्वभाव आहे. सिद्ध हा सुद्धा पर्याय असल्यामुळे तो सुद्धा नष्ट झाला पाहिजे. पूर्वसिद्धपर्याय नष्ट होतो व नवीन सिद्ध पर्यायच उत्पन्न होतो. परंतु सिद्धपर्याय नष्ट होऊन दुसरा संसारपर्याय उत्पन्न होत नाही. सिद्ध सिद्ध रूपाने तो पर्याय ध्रुव आहे. सिद्धपर्याय ध्रुव आहे व संसारातील कोणताही पर्याय ध्रुव नाही याचे कारण काय आहे ? सिद्धांनी ध्रुवस्वभावाचा आश्रय घेतला आहे, म्हणून तो पर्याय ध्रुव आहे. संसारी जीव अध्रुवपर्यायाचा आश्रय घेतो म्हणून तो पर्याय अध्रुव आहे. टिकत नाही. सर्वांना आपला पर्याय टिकावा. नष्ट होऊ नये असे वाटत असते. जर ध्रुवपर्याय पाहिजे असेल तर सिद्धपर्याय प्रगट करण्यायोग्य आहे. संसारात कोणताही पर्याय प्राप्त केला तर तेथून आपल्याला 'चले जाव'चा आदेश मिळणार. भाड्याचे घर सोडावेच लागते. करार पूर्ण झाला की घराचा मालक आपल्याला आज्ञा करतो की घर खाली करा. त्याचप्रमाणे हे मनुष्यादी शरीरसुद्धा कर्मांनी १०० वर्षे, ७५ वर्षे, ५० वर्षाचा करार करून भाड्याने दिले आहे. त्याचा करार पूर्ण झाला की घर खाली करावे लागणार. तक्रार करता येणार नाही.

जर सिद्धपर्याय प्राप्त केला तर मात्र तेथून कोणीही हकलणार नाही. संसारातील प्रत्येक पर्यायातून हकालपट्टी होणार. सिद्धपर्यायातून हकालपट्टी होणार नाही. ज्याप्रमाणे ध्रुवबाळाला सावत्र आईने वडिलांच्या मांडीवरून उठवले तर त्याने 'पण' केला की मी अशा जागेवर जाऊन बसणार की जेथून मला कोणीही 'उठ' म्हणणार नाही. तो आकाशात एका जागेत जाऊन स्थिर बसला म्हणून त्याचे नाव ध्रुवतारा पडले. त्याप्रमाणे आपणसुद्धा असा 'पण' करायचा की मी अशा पर्यायात जाऊन बसणार की जेथून आपल्याला परतावे लागणार नाही. मी ध्रुवस्थान प्राप्त करून घेणारच. सिद्ध पर्याय हेच खरे ध्रुवस्थान आहे. म्हणून सिद्धपर्यायासाठी पुरुषार्थ करणे उचित आहे.

संसारामध्ये रागादी क्रिया स्वाभाविक आहेत व त्या क्रियेचे फळ निश्चित प्राप्त होते. त्या क्रियेचे फळ काय आहे अथवा ते फळ कसे प्राप्त होते याचे उत्तर पुढील गाथेत देतात. अथवा संसारामध्ये विचित्रता दिसते. नानाप्रकारचे जीव दिसतात. कोणी मनुष्य आहे तर कोणी पशू आहे. कोणी पक्षी आहे तर कोणी जलचर प्राणी आहे. त्यामध्ये कोणी दरिद्री, कोणी श्रीमंत,

कोणी सुरूप, कोणी कुरुप, कोणी कुत्रा आहे तर कोणी मांजर या सर्व जीव जातीची विचित्रता कोणी निर्माण केल्या. ईश्वरांनी ही सर्व सृष्टी निर्माण केली असे कोणी म्हणतात. निसर्गाने ही विचित्रता केली आहे असे कोणी मानतात, कोणी कर्मकृत मानतात. वास्तविक, या विचित्रतेचे काय कारण आहे ? अशी जिज्ञासा झाली असता त्याचे समाधान पुढील गाथेत करतात.–

कम्मं णामसमक्खं सहावमध अप्पणो सहावेण ।
अभिभूय णरं तिरियं णेरइयं वा सुरं कुणदि ।।११७।।

न्वयार्थ – (अध) तेथे **(णामसमक्खं कम्मं)** 'नाम' नावाचे कर्म **(सहावेण)** आपल्या कर्मस्वभावाने (**अप्पणो सहावं)** आत्म्याच्या स्वभावाला **(अभिभूय)** तिरस्कृत करून **(झाकून)** जीवाला **(णरं तिरियं णेरइयं वा सुरं)** मनुष्य, तिर्यंच, नारकी व देव **(कुणदि)** करते.

तात्पर्य – नामकर्माच्या उदयाने जीव मनुष्य तिर्यंचादी पर्यायरूप होतो.

जीवाचा परिणामच जीवाचे कर्म–

कर्त्याकडून जे प्राप्त केल जाते त्यास कर्म म्हणतात. जीवरूप कर्त्याकडून आपले परिणामच प्राप्त केले जातात म्हणून शुभ, अशुभ, शुद्ध परिणाम हेच जीवाचे कर्म आहे. कर्म हे नाव जीवाच्या कार्याचे आहे. जीव काय काम करतो ? जीव ज्या रूपाने परिणमतो ते त्याचे काम. जो परिणमतो तो कर्ता, व जो परिणाम ते त्याचे कर्म होय. कुणी विचारले तुम्ही सकाळपासून काय काम केले ? तर आम्ही काय उत्तर देतो. मी स्वयंपाक केला, लोटून काढले, भांडी धुतली, कपडे धुतले, व्यापार केला, शेतीमध्ये धान्य पेरले इ. हे काम कुणाचे ? जो त्या रूपाने परिणमला त्याचे. स्वयंपाकरूपाने ज्वारी, डाळ, तांदूळ, भाजी परिणमली आहे. मी त्यारूपाने परिणमलो नाही. घर स्वच्छरूपाने परिणमले. मी त्यारूपाने परिणमलो नाही. हे कार्य करीत असताना जीवाने जे रागद्वेषरूप भाव केले ते त्याचे कार्य आहे. हे सुद्धा अशुद्धनयाचे कथन आहे. वास्तविक शुद्धनयाने जीव जाणण्याचेच काम करतो. कोणत्याही द्रव्याचे कार्य त्यापासून भिन्न असत नाही. कामाची लिस्ट करताना त्यामध्ये मला शुभ व शुद्ध भाव करायचे आहेत किंवा मला जाणायचे आहे या कामाची नोंद कुठे ही असत नाही. कारण अज्ञानी जीवाला बाहेर परद्रव्याचे काम आपले काम वाटते. मी ज्ञायक आहे. जाणणे माझे काम आहे याची जाणीव नसते.

आत्मा ज्ञानं, स्वयं ज्ञानं ज्ञानादन्यत् करोति किम्।
परभावस्य कर्तात्मा मोहोऽयं व्यवहारिणाम् ।।

आत्मा ज्ञान आहे, स्वयं ज्ञान आहे, ज्ञानाला सोडून तो दुसरे काय काम करतो ? मी परभावाचा कर्ता आहे हा व्यवहारिजीवाचा मोह आहे. जीवाचे कार्य भावात्मक आहे.

जीवाच्या विकार भावाला निमित्त करून कार्माणवर्गणांचे कर्मरूपाने परिणमन होते. त्याला सुद्धा कर्म म्हणतात. जीवाचे विकारी भाव व पौद्गलिक कर्म यामध्ये अनादिकालापासून निमित्त नैमित्तिक संबंध आहे. ज्याप्रमाणे पिता-पुत्र संबंध अथवा बीज-वृक्षसंबंध अनादिकाळापासून चालत आला आहे. जीवाच्या विकार परिणामाच्या निमित्ताने पुद्गल कर्मरूप परिणमते व कर्माच्या उदयाला निमित्त करून जीव विभावरूप परिणमतो. जीव जशाप्रकारचे परिणाम करतो तशाप्रकारचेच कर्म बांधले जाते. तीव्र, मध्यम, मन्दभावानुसार तीव्र, मध्यम, मन्द अनुभाग बांधला जातो. व त्यानुसारच स्थितीसुद्धा पडते. जीवाने कसे परिणाम केले हे दुसरा कोणी ओळखत नसेल, परंतु कर्म बरोबर ओळखते. कर्म जीवाचे परिणाम टिपण्यामध्ये सजग प्रहरी आहे. कर्मरूपी पोलिस २४ तास जीवाचा पहारा देत आहे. जीवाने अपराध केला की लगेच कर्म पोलीस त्याला पकडतात व बंधनात टाकतात. जसा अपराध तशी सजा. कर्म न्याय देण्यामध्ये प्रामाणिक आहे. तेथे लाच लुचपत चालत नाही. श्रीमंत असो गरीब असो, पंडित असो मूर्ख असो, मुनी असो व्रती असो, अथवा गृहस्थ असो. जो जशाप्रकारचा अपराध करेल त्याला तशा प्रकारचा दण्ड देण्यासाठी कर्म न्यायाधीशाचे काम करते. कर्म अचेतन असल्यामुळे जाणत नाही. परंतु तसा सहज निमित्त नैमित्तिक संबंध आहे. जीव पुद्गल कर्मांना करीत नाही, परंतु जीवाच्या विभावाशिवाय कर्मपण होत नाही.

मनुष्यादी पर्याय रागादी क्रियेचे फळ-

पुद्गल कर्माच्या उदयात मनुष्यादी पर्याय प्राप्त होतात. आठ कर्मांमध्ये एक नामकर्म आहे. ते इंजिनिअरचे काम करते. बिल्डिंग बनविण्यापूर्वी इंजिनिअर बिल्डिंगचा नकाशा काढतो. ज्याप्रमाणे प्रथम स्वयंपाकघर, विश्रांतिगृह, हॉल, डायनिंग हॉल, व्हरांडा, शौचगृह इत्यादींचे स्थान निश्चित करून त्यांचे प्रमाणसुद्धा निश्चित केले जाते. त्याप्रमाणे जेव्हा जीव परिणाम करतो तेव्हाच त्याच्या पुढील शरीररूपी इमारतीचा नकाशा नामकर्म काढते. प्रथम गती निश्चित होते. गती अनुसार शरीर, शरीरातील

डोळे, कान, नाक यांचे स्थान, त्याचे प्रमाण, शरीराचा आकार (संस्थान), शक्ती (संहनन) रंग, रूप, रस, गंध हे सर्व काही पूर्वीच ठरविले जाते. पूर्व शरीररूपी इमारत पाडून नवीन शरीररूपी इमारत उभा करण्याचे कार्य नामकर्म करते. कर्माचे अनेक कारागिर झटपट हे सर्व काम करतात. हळूहळू ९ महिन्यात ही इमारत पूर्ण होते व ९ महिन्यांनी त्याचा उद्घाटन समारंभ (जन्म) होतो. इमारतीला कोणता रंग, कोणता आकार, कोणती डिझाईन काढायची हे जीवरूपी मालकाच्या परिणामानुसार ठरते.

हा जीव मनुष्यादिक कसा बनला ? हा जीव कीडा भुंगा इ. कसा बनला ? हा जीव स्थावर निगोदी कसा झाला? यामध्ये दुसऱ्या कोणाचा हात नाही. आपल्या चुकीमुळे कीडा भुंगा झाला. म्हणून लोकांमध्ये जेवढ्या जीवांच्या जाती दिसतात त्या जीवांच्या परिणामांचे फळ आहेत. या सृष्टीचा निर्माण करणारा हा जीव स्वयं ईश्वर आहे.

कर्म कुठून आले?. जीवाच्या मोह राग द्वेष परिणामामुळेच तर त्याची उत्पत्ती झाली म्हणून वास्तविक मनुष्यादी पर्याय जीवाच्या रागादी क्रियेंचे फल आहे. कारण रागादी क्रियेच्या अभावात पुदगलामध्ये कर्मपणाचा अभाव होतो. कर्माचा अभाव झाल्यावर कर्माचे कार्यभूत मनुष्यादी पर्यायांचा अभाव होतो.

कर्म तर दूत आहे. त्याला आज्ञा कोणी दिली तर आपल्या परिणामांनी दिली. म्हणून म्हटले आहे. **कर्म बिचारे कौन, भूल मेरी अधिकाई ।**

कर्माचा अनादि संबंध सोडायचा असेल तर प्रथम मोह राग द्वेष परिणामांचा घटस्फोट घेतला पाहिजे. जोपर्यंत जीव मोहरागद्वेष करणार तोपर्यंत त्याला कर्म येऊन चिकटणार. शरीर तेलाने लिप्त असेल तर त्याला धूळ येऊन चिकटते.

मनुष्यादी पर्याय कर्माचे कार्य कसे ?–

ते पर्याय कर्मस्वभावाच्या द्वारे जीव स्वभावाचा पराभव करून प्राप्त केले जातात म्हणून ते कर्माचे कार्य आहेत. ज्याप्रमाणे ज्योति स्वभावाच्या द्वारे तेलाच्या स्वभावाचा पराभव करून दीपक कार्य उत्पन्न होते. म्हणून दीपक ज्योतीचे कार्य आहे. दीपक ज्योतीच्या स्वभावाने जळत आहे. आणि तेलाच्या स्वभावाला दाबून जळत आहे. म्हणून दीपक ज्योतीचे कार्य आहे. तेलाचा एक–एक थेंब वातीमध्ये पोहचून दिवा बनला आहे. तेल नसेल तर दीवा कसा जळेल? तेल आपल्या स्वभावाला बदलून दीवा बनले आहे. तेल आपल्या स्वभावरूप राहिले नाही.

ज्याप्रमाणे अग्नीच्या स्वभावाने तेल स्वभावाचा पराभव करून वातीच्या आधाराने दीपकरूप कार्य उत्पन्न होते. म्हणून दीपक अग्नीचे कार्य म्हटले जाते त्याप्रमाणे कर्माच्या स्वभावाने आत्म स्वभावाचा पराभव करून शरीराच्या आधाराने जीव मनुष्यादी रूपाने परिणमतो म्हणून मनुष्यादी पर्याय कर्माचे कार्य म्हटले जाते. हे पर्याय कर्माचे कार्य आणि पुद्गल कर्म जीवाच्या विभावक्रियेचे कार्य. आम्ही दुःखी होऊ शकत नाही. जो या जीवाला क्लेश आहे तो त्याच्या चुकीमुळेच आहे. ती चूक आहे ज्ञानामध्ये वस्तुसंबंधी विपरीत ग्रहण.

मनुष्यादी पर्याय अर्थात संसार परिभ्रमण नको असेल तर कुठे घावा घालायचा ? तर आपल्या मोहरागद्वेषावर. स्वभावाला जाणल्याशिवाय मोहरागद्वेषाचा अभाव होऊ शकत नाही.

ज्याप्रमाणे देश स्वतंत्र करण्यासाठी गांधीजीनी असहकारतेची चळवळ चालवली व परदेशी मालाची होळी केली. 'आम्हाला तुमचा माल नको. आम्ही स्वदेशी मालाचाच वापर करू' अशा लोकांनी प्रतिज्ञा घेतल्या. तेव्हा देश स्वतंत्र झाला. त्याप्रमाणे आत्म्याला कर्माच्या परतंत्रतेतून सोडवायचे असेल तर कर्माबरोबर असहकारतेची चळवळ करावी लागेल. 'मी कर्माला मदत करणार नाही. मी माझ्या आत्म्याचे काम करणार. कर्माने दिलेला माल आम्हाला नको.' हे मनुष्य शरीर, सुंदर शरीर, रंगरूप, स्त्री पुत्र, गाडी-बंगला इत्यादी संयोग ही कर्माची देणगी आहे. हा आपला माल नाही. ज्याप्रमाणे इंग्रजांची नोकरी करून त्यांनी दिलेल्या मोबदल्यावर खुश होऊन स्वतःला साहेब मानत असेल तर तो स्वतःलाच पारतन्त्र्यामध्ये ठेवू इच्छितो. त्याप्रमाणे कर्माची सेवा करून त्या कर्माच्या उदयामुळे प्राप्त झालेल्या संयोगामध्ये स्वतःला भाग्यवान समजत असेल तर तो स्वतःचे स्वातन्त्र्य गमावत आहे. कर्माने आत्म्याच्या स्वभावाचा पराभव करून त्याला भुरळ घालण्यासाठी हा संयोग दिला आहे. अज्ञानी या संयोगामध्ये आपल्या स्वभावाला विसरून जातो.

आता कर्माशी असहयोग करून त्यांने दिलेल्या मालाचा अस्वीकार करून त्याची होळी करूया. हे कर्म 'तू दिलेले हे मनुष्य, देव, तिर्यंच शरीर मला नको. मला माझे ज्ञान शरीर पाहिजे. मला इंद्रियज्ञान-सुख नको, मला अतींद्रिय ज्ञान-सुख हवे.'

एका शेठजींना एकुलता एक मुलगा होता. सेठानीजी अगोदरच इहलोकाची यात्रा संपवून स्वर्गवासी झाली होती. शेठजींना ही दुर्धर रोगाने घेरले. काही दिवसातच आपले जीवन क्षणभंगुर जाणून मुलगा इस्टेटीचा मालक होण्यासाठी अजून लायक नसल्यामुळे त्यांनी ती आपली सर्व इस्टेट सरकार दरबारी जमा केली. परत मुलगा संपत्तीचा मालक होण्यासाठी पात्र झाल्यावर त्याला संपत्ती परत दिली जावी असा ठराव करून ठेवला व त्याला आपल्या मित्राच्या सुपुर्द केले. शेठजींची करोडो रूपयांची संपत्ती सरकारकडे होती. त्याचा मोबदला म्हणून त्या मुलाच्या पालनपोषणासाठी ५०० रू. सरकार देत असे. हळूहळू मुलगा मोठा होतो. सरकारकडून फुकट पैसे मिळत असल्यामुळे तो सर्वांच्या समोर सरकारचे गीत गायचा.

एकदा त्याला वडिलांच्या मित्राने सांगितले, तू सरकारचे काय गीत गातोस ? सरकारजवळ तुझी करोडो रूपयांची संपत्ती जमा आहे. त्यातील फक्त ५०० रू. तुला मिळतात. त्याला ते पटत नाही. तो म्हणतो, ' माझी कुठली संपत्ती ? मी तर गरीब आहे. सरकारच मला मदत करते. पुन्हा २-३ विश्वस्त त्याला ही गोष्ट सांगतात. तेव्हा त्याला शंका वाटू लागते. तेव्हा तो सरकारच्या कचेरीमध्ये जाऊन कागदपत्र पाहतो तर त्याची करोडोंची संपत्ती सरकार दरबारी जमा दिसते. आता त्याला विश्वास वाटतो. मी तर करोडपती आहे. सरकार माझी करोडो रूपयांची संपत्ती जमा करून त्या मोबदल्यात मला फक्त ५०० रू. देते. विश्वास बसल्यावर तो सरकारवर दावा करतो. 'आता मला तुमचे ५०० रू. नकोत. मला माझी सर्व संपत्ती परत मिळावी.

त्याचप्रमाणे जीव आपली अनंतगुणरूपी संपत्ती सांभाळण्यास समर्थ नाही म्हणून कर्मरूपी सरकारने ती सर्व संपत्ती आपल्या ताब्यात घेतली आहे व त्याच्या मोबदल्यात हे मनुष्यशरीर त्याचा आकार, रंग रूप इ. तसेच क्षायोपशमिक दर्शन, ज्ञान, वीर्य व राग, द्वेष, मोह देऊन जीवाला भुरळ पाडत आहे. अज्ञानी जीव यालाच आपली संपत्ती मानून कर्म सरकारचे गोडवे गात आहे. पुण्यकर्माच्या उदयाने मला सुंदर शरीर, धनसंपत्ती, स्त्री पुत्रमित्रादी प्राप्त झाले असे मानून त्या कर्माचे अभिनंदन करतो. आचार्यरूपी विश्वस्तांनी या जीवाला जागे करून सांगितले. तुझी अनंतज्ञानादी अनंतगुणरूपी संपत्ती कर्मरूपी सरकारच्या ताब्यात आहे. तू या थोड्याशा संपत्तीवर काय भुलला आहेस? एकदा, दोनदा ऐकून आम्हाला त्यावर विश्वास बसत नाही. पुन्हा

पुन्हा श्रीगुरूंच्या मुखातून आपल्या वैभवाचे वर्णन ऐकून कदाचित ज्या जीवाला विश्वास बसतो तो कर्मावर दावा करतो की माझी अनंतगुणरूपी निजसंपत्ती मला हवी आहे. कर्माने दिलेली जड संपत्ती मला नको. तेव्हा कर्म आमच्या संपत्तीवरचा हक्क सोडून देते व जीवाला स्वयं स्वभावसंपत्ती प्राप्त होते. कर्म व कर्माचे कार्य सहज परमात्मतत्त्वाहून विपरीत आहे. म्हणून कर्मजनित पर्यायांना कष्टरूप जाणून त्याची उपेक्षा करून चैतन्य स्वरूप सहज शुद्धात्मतत्त्वामध्ये लीन व्हावे.

तात्पर्य हे आहे की संसारी जीव आपल्या परिणामांनी बांधलेल्या कर्मांमुळे चार गतींमध्ये भ्रमण करतात. म्हणून संसार भ्रमणापासून वाचण्यासाठी कर्मबंधाला कारणभूत मोह, राग, द्वेषादी विकारी भावांना दूर करावे. आपल्या स्वभावाला जाणून त्यामध्ये रममाण झाल्यावर विकारीभाव सहज दूर होतात म्हणून ज्ञानदर्शनस्वरूप निज आत्म्यामध्ये रमण्याचा पुरुषार्थ करावा.

कर्माने जीवाच्या स्वभावाचा पराभव करून जीवाला मनुष्य, तिर्यंच देव नारकरूपाने केले आहे. ज्याप्रमाणे अग्नीने तेलस्वभावाचा पराभव करून वातीच्या आधाराने दीवा रूप कार्य उत्पन्न केले आहे. वातीने तेलाला शोषून घेतले. अग्नीने तेलाला तेल राहू दिले नाही. त्याला आपलस करून घेतल. त्यामुळे प्रकाशरूप कार्य उत्पन्न झाले आहे. त्याप्रमाणे कर्माने जीवाला जीवरूप न ठेवता त्याला आपलसं करून घेतले. शरीराने जीवाचे शोषून करून घेतले त्यामुळे मनुष्यादी पर्यायरूप कार्य उत्पन्न झाले आहे. म्हणून कर्मापासून सावध झाले पाहिजे. कारण कर्म आपल्यावर विजय मिळवायला टपून बसले आहेत. ज्याप्रमाणे कोणी राजकारणी नेता काम करीत नसेल तर त्याला लाच देऊन त्याच्याकडून काम करून घेतले जाते. त्याप्रमाणे जीवाला जरा फूस दिली की जीव आपल्या वश होतो हे कर्माला चांगले माहित आहे म्हणून कर्म शरीर, संपत्ती, क्षायोपशमिक ज्ञान, इंद्रियसुख, अनुकूलता देऊन जीवाला आपल्या वश करते. इष्टोपदेशमध्ये पूज्यपाद आचार्य सांगतात.-

कर्म कर्महिताबन्धी जीवो जीवहितस्पृहः ।
स्वस्वप्रभावभूयस्त्वे स्वार्थं को वा न वांछति ।।३१ ।।

कर्म कर्माच्या हिताशी संलग्न आहे. जीव जीवाच्या हिताची इच्छा करतो. कारण आपापला प्रभाव वाढला असता कोण स्वार्थाची इच्छा करीत नाही. आजपर्यंत कर्माने आपले बळ वाढविले आहे त्याने आपले घर भरले व

जीवाचे घर रिकामे केले. म्हणून आपण दुःखी आहोत. आता लक्षात आले आहे तर आपण आपले बळ वाढविले पाहिजे. संयमी मुनी आत्मसाधना करून आपले बळ वाढवतात व कर्मावर विजय प्राप्त करतात.

जीवाचा पराभव करण्यासाठी कर्माची फौज तयार आहे. प्रत्येकाला एकेक काम वाटून दिले आहे. ज्ञानावरण कर्माला आज्ञा मिळाली आहे की तू जीवाचा मंत्री असणाऱ्या ज्ञानावर घाला घालायचा. तोच योग्य सल्ला देऊन जीवाची शक्ती वाढवण्याचा प्रयत्न करतो. दर्शनावरण कर्माला सांगितले 'जीवाचा उपमुख्यमंत्री असणाऱ्या दर्शन गुणाचा घात करायचा. वेदनीय कर्माला ऑर्डर मिळाली 'तू जीवाचा आनंदाचा खजिना लुटायचा.' व त्याला तुच्छ इंद्रियसुख व दुःख प्रदान करायचे. मोहनीय कर्मांचा राजा आहे. तो जीवाच्या मुख्य सम्यक्त्व व चारित्ररूपी सेनापतीवर हल्ला करतो. आयुकर्माला सांगितले 'जीवाला बेड्या घालून भवरूपी तुरुंगात अडकवून ठेवायचे. नामकर्मावर जबाबदारी सोपविली की तू अमूर्तिक जीवाला मूर्तिक शरीरादी देऊन त्याचे योग्य पालन पोषण करायचे जेणे करून तो तुरुंगातून पळून जाणार नाही. गोत्रकर्माला सांगितले तू लहान मोठ्या कुलरूपी तुरुंगात त्याला घेऊन जायचे. अंतराय कर्माला आज्ञा मिळाली की तू त्याचा अनंतगुणरूपी भांडागार लुटून त्याला दानादी देण्यामध्ये विघ्न करायचे. कर्माची फौज सुव्यवस्थित सुसज्ज आहे, भक्कम आहे. आता त्याला नेस्तनाबूत कसे करायचे? त्याच्या सैन्यामध्ये दुफळी कशी निर्माण करायची? व त्याच्या चक्रव्यूहातून कसे बाहेर पडायचे? हे आपणच ठरवायचे आहे.

विभाव भाव करून कर्मरूपी शत्रूच्या फौजेला आमंत्रण आम्हीच दिले आहे. शत्रूला आमंत्रण दिले की ते घरात घुसणार, हक्क गाजवणार व घरातून आपल्याला हाकलून काढणार हे निश्चित. आमंत्रणच दिले नाही तर ते कशाला आले असते व त्यांनी त्रास कशाला दिला असता व आमचा खजिना कसा लुटला असता?

मनुष्यादी पर्यायांमध्ये जीवाच्या स्वभावाचा पराभव का झाला? जीवाच्या विभाव क्रियेच्या निमित्ताने बांधल्या गेलेल्या कर्माच्या उदयाच्या निमित्ताने प्राप्त झालेल्या मनुष्यादी पर्यायांमध्ये जो जीवाचा स्वभाव तिरोभूत झाला आहे त्याला कारण कर्म आहे. हे निमित्ताच्या मुख्यतेने पूर्व गाथेमध्ये सांगितले. कारण कर्माच्या उदयाशिवाय जीवाच्या स्वभावाचा घात होत नाही.

आता तटस्थ बुद्धीने दोन्ही पक्षांचा विचार करून निश्चित करतात की या मनुष्यादिक पर्यायांमध्ये जीवाच्या स्वभावाचा पराभव कोणत्या कारणाने होतो आहे–

णरणारयतिरियसुरा जीवा खलु णामकम्मणिव्वत्ता ।
णहि ते लद्धसहावा परिणममाणा सकम्माणि ।।११८।।

अन्वयार्थ– (णरणारयतिरियसुरा) मनुष्य, नारक, तिर्यंच आणि देवरूप जीव **(खलु)** वास्तविक **(णामकम्मणिव्वत्ता)** नामकर्माने उत्पन्न झाले आहेत. **(हि)** निश्चयाने **(सकम्माणि)** आपल्या कर्मरूपाने **(परिणममाणा ते)** परिणमणारे ते **(लद्धसहावा ण)** आपल्या स्वभावाला प्राप्त नाहीत.

तात्पर्य – जीव आपल्या स्वभावाला प्राप्त होत नाही म्हणून या मनुष्यादी पर्यायामध्ये त्याच्या स्वभावाचा पराभव होत आहे.

मनुष्यादी पर्याय नामकर्माचे कार्य –

जो अपराध करतो त्याला शिक्षा झाल्याशिवाय राहत नाही. मनुष्यादी पर्यायामध्ये अंहबुद्धी/ एकत्वबुद्धी/तन्मयता हाच मोठा अपराध आहे. त्या अपराधांची शिक्षास्वरूप (दण्ड) मनुष्यादी पर्यायांमध्ये परिभ्रमण आहे. शिक्षा मिळते म्हटले की मुले व्यवस्थित वागतात. चूक करीत नाहीत. मनुष्यादी पर्याय प्राप्त होणे ही शिक्षा आहे हे समजले तर शिक्षा होऊ नये म्हणून जीव प्रयत्न करील.

४ घातिकर्मे जीवाच्या ज्ञानादीगुणांचा घात करतात. ४ अघातिकर्मे प्रत्यक्ष गुणांचा घात करीत नाहीत परंतु अप्रत्यक्षरित्या घात करतात. काही शत्रू स्वतः मारत नाहीत. दुसऱ्यांच्या कडून मार द्यायला लावतात. त्याप्रमाणे अघातिकर्म स्वतः घात करीत नाही. परंतु मनुष्यादी पर्याय उत्पन्न करून मोहनीयाच्याद्वारे त्यामध्ये मोह उत्पन्न करवून जीवाला त्रास देते.

मनुष्य तिर्यंचादी शरीराची रचना नामकर्मामुळे झाली. मनुष्य तिर्यंच पशुपक्षी इत्यादीकांचे निरनिराळे मॉडेल कोणी बनविले ? नाम कर्मरूपी चित्रकार ही विविध चित्रे काढतो म्हणून त्याची ही रचना आहे असे म्हटले जाते.

कोणतीही रचना पाहिल्यानंतर आपल्या मनात प्रश्न उत्पन्न होतो ही रचना कोणाची ? ज्यांनी केली त्याची ती रचना. जो त्या कार्यरूपाने परिणमला त्याचे ते कार्य म्हटले जाते. भाकरी ही रचना कोणाची ? पीठ भाकरी रूपाने

परिणमते म्हणून पीठाचीच ती रचना आहे. स्वयंपाकीण त्यामध्ये फक्त निमित्त आहे. फॅक्टरीमध्ये जो पक्का माल तयार होतो त्याची रचना कच्च्या मालापासून झाली. मशिनरी व मालक त्यामध्ये निमित्त आहे.

ज्याप्रमाणे इमारतीची रचना कोणी केली ? दगड, माती, विटा, वाळू, सिमेंट पासून इमारत बनली म्हणून त्यांची ती रचना आहे व इंजिनिअरने त्याची योजना केली म्हणून उपचाराने त्याची रचना म्हटली जाते. त्याप्रमाणे शरीराची रचना नोकर्मवर्गणांपासून झाली म्हणून त्या नोकर्मपरमाणूंची ती रचना म्हटली जाते. या जीवाला कशा प्रकारचे, कोणत्या रंगाचे, कोणत्या आकाराचे शरीर द्यायचे याची योजना नामकर्माने केली म्हणून नामकर्माची रचना म्हटली जाते.

जीवाच्या स्वभावाच्या पराभवाचे कारण–

मनुष्यादी पर्याय नामकर्माने उत्पन्न केले आहेत. पण एवढ्यावरून त्यामध्ये जीवाच्या स्वभावाचा पराभव होण्याचे काय कारण ? केवळ नामकर्माच्या उदयाने हे पर्याय उत्पन्न झाले म्हणून स्वभावाचा घात होत नाही. ह्या पर्यायांमध्ये उत्पन्न झालेला जीव आपल्या स्वभावाला जाणत नाही कर्माच्या उदयाच्या अधीन होतो. स्वकर्मरूपाने परिणमतो म्हणून त्याचा स्वभाव तिरोभूत होतो. कर्म दिसत नाही. कर्माचा उदय दिसत नाही. पण कर्माच्या उदयानुसार झालेली अवस्था अथवा प्राप्त झालेला संयोग दृष्टिगोचर होतो. त्याला लक्ष्य करून जीव परिणाम करतो. स्वभावानुसार परिणमत नाही यालाच कर्माधीन म्हटले जाते.

आम्ही आमचा रिमोट कर्माच्या हातात दिला आहे. ज्याप्रमाणे रिमोटचे बटण दाबले असता टी.व्ही. वरचे चित्र बदलत असते, गाणे बदलत असते. जे बटण दाबू ते चित्र दिसते. त्याप्रमाणे कर्माचा जसा उदय येईल त्याला अनुसरून हा जीव परिणाम करतो. पापकर्माचा उदय आला की प्रतिकूल सामग्री प्राप्त होते त्यामुळे हा जीव खेदखिन्न होऊन दुःखी होतो. पुण्यकर्माचा उदय आला की अनुकूल सामग्री प्राप्त होते की त्यामध्ये हर्षित होऊन सुखी होतो. अनुकूलता व प्रतिकूलता हे कर्माचे कार्य आहे. तो माझा स्वभाव नाही हे हा जीव जाणत नाही. त्यामुळे याचा स्वभाव झाकला गेला आहे.

शरीरात त्रास होऊ लागला, रोग उत्पन्न झाला की तो मलाच झाला आहे असे मानून त्याला दूर करण्याच्या मागे लागतो. त्यापासून भेदभावना करीत नाही, शरीर नोकर आहे. पण शरीराला आपला मालक बनवून त्याच्या

ऑर्डरी पूर्ण करीत राहतो. आपले सर्व जीवन एक तर शरीराच्या ताब्यात, नाहीतर कर्माच्या ताब्यात देऊन टाकले आहे. त्याहून मी एक स्वतंत्र द्रव्य आहे हे जाणत नाही.

शेजारी दुष्ट असेल तर त्याची आपण संगती करीत नाही. त्याच्याबरोबर बोलणं, त्यांच्या घरी जाणे येणे, कोणताच व्यवहार करीत नाही. कारण जो आपलं नुकसान करतो तर त्याच्याशी आपण संबंध कशाला ठेवायचा ? हा विचार करतो. परंतु येथे मात्र विपरीत वागतो, शरीर व कर्म या जीवाच्या शेजारी आहेत व रात्रदिवस जीवाला पीडा देतात, त्याचे गुणरूपी धन लुटतात. तरीसुद्धा हा जीव त्यांचीच संगती करतो. ते म्हणतील तसे वागतो. हेच मला त्रास देत आहेत हे या अज्ञानी जीवाला समजत नाही. यांनाच उपकारी मानून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागतो. शेजारी आहेत म्हणून त्यांची संगती करायला पाहिजे असे नाही. संगती सोडून आपण आपल्या घरात निवांत राहू शकतो. जर असे केले तर शेजाऱ्याचा उपद्रव कमी होईल. या जीवाने कर्माची संगती सोडली तर जीव सुखी होईल. म्हणून कवी देवस्तुतीमध्ये म्हणतो की. –

अष्ट कर्म जो दुःखहेतु है, तिनके क्षय का करे उपाय ।

पराभवाचे कारण स्वभावानुपलब्धी –

मनुष्यादी पर्याय कर्माचे कार्य आहे एवढ्यावरून जीवाच्या स्वभावाचा घात होत नाही.सोन्यापेक्षा रत्नाची किंमत कितीतरी पटीने जास्त आहे. सोन्याच्या बांगडीत मध्ये-मध्ये रत्न लावले तर त्या रत्नाची किंमत कमी होत नाही. सोन्याच्या बांगडीमध्ये सुद्धा तो आपल्या तेजाने चमकतच राहतो. किंवा जयसेनाचार्यांनी हा दृष्टान्त वेगळ्या पद्धतीने घटविला आहे. ज्याप्रमाणे सोन्याच्या बांगडीमध्ये छोटा रत्नाचा खडा असला तरी त्या बांगडीला सोन्याची बांगडी म्हटले जाते. त्या रत्नाने सोन्याची संगती केली. म्हणून त्याच्या स्वभावाचा पराभव झाला त्याप्रमाणे मनुष्यादी पर्यायामध्ये जीवाच्या स्वभावाचा घात होत आहे. मनुष्यादी पर्याय सोन्याच्या बांगडीप्रमाणे आहे व जीव म्हणजे रत्न (हिरा) आहे. जीव मनुष्यपर्यायामध्ये आहे म्हणून त्याच्या स्वभावाचा पराभव होतो आहे असे नाही तर तेथे जीव आपल्या स्वभावाला जाणत नाही, स्वकर्मरूपाने परिणमतो त्यामुळे त्याच्या स्वभावाचा घात होत आहे.

ज्याप्रमाणे पाण्याचा पाट शेतामधून वाहत असतो. मध्ये-मध्ये

केळाचे, चंदनाचे, कडूनिबांचे झाड येते. पाण्याचा पाट त्या झाडामध्ये जाऊन त्या त्या झाडरूपाने परिणमतो, केळाच्या झाडामध्ये गेलेले पाणी गोडरूपाने परिणमते, कडुनिंबाच्या झाडामध्ये गेलेले पााणी कडूरूपाने परिणमते. चंदनाच्या झाडामध्ये गेलेले पाणी त्या स्वादरूपाने व सुगंधरूपाने परिणमते. ते पाणी आपल्या द्रवत्व स्वभावाला सोडते व पाण्याच्या मूळ स्वाद रूपाने राहत नाही. द्रवपणा व पाण्याची चव हा पाण्याचा स्वभाव आहे. त्या त्या झाडरूपाने परिणमल्यामुळे पाण्याच्या द्रवत्व व स्वादत्व स्वभावाचा तिरस्कार झाला.

त्याप्रमाणे जीवाचे प्रदेश अमूर्तिक आहेत व निरुपराग विशुद्धिमानपणा हा जीवाचा स्वभाव आहे परंतु जेव्हा हा जीव प्रदेश व भावाच्या द्वारे कर्मरूपाने परिणमतो तेव्हा तो आपल्या अमूर्तिक व विशुद्ध स्वभावाला प्राप्त होत नाही. कर्माच्या उदयाने प्राप्त झालेल्या शरीरामध्ये जातो तेव्हा त्याचा अमूर्तिक स्वभाव झाकला जातो. शरीराच्या स्पर्श, रस, गंध, वर्ण स्वभावांचा जीवावर आरोप केला जातो. आत्मा जर अमूर्तिक आहे तर तो पकडला जाऊ शकत नाही परंतु जेव्हा मूर्तिक शरीरामध्ये जातो तेव्हा तो पकडला जातो. कर्माच्या उदयानुसार परिणमल्यामुळे क्रोध, मान, माया, लोभ रूप भाव करतो तेव्हा त्याचा निरुपराग विशुद्ध स्वभाव तिरस्कृत होतो. ज्ञानावरणाच्या उदयाने अज्ञानरूप परिणमतो, चारित्र मोहनीयाच्या उदयामुळे असंयम भावरूपाने परिणमतो म्हणून संयमस्वभावाचा घात होतो.

भेदविज्ञान संस्काराद्वारे स्वभावोपलब्धी–

कर्माचा उदय निरन्तर असणारच, त्यामुळे जीवाच्या स्वभावाचा घात सतत होत राहणार तर जीव आपल्या स्वभावाला कसा प्राप्त होणार ? हा मोठा प्रश्न आहे. कर्माचा उदय आल्यावर त्यारूपाने परिणमलेच पाहिजे असा काही नियम नाही. कर्म जबरदस्तीने जीवाला विकाररूप परिणमवित नाही. ज्याप्रमाणे पाण्याचा प्रवाह वाहत असताना जे पाणी झाडरूपाने परिणमते त्याच्या स्वभावाचा घात होतो पण त्यातील काही पाणी झाडाला सोडून बाजूने वाहत जाऊन नदीला मिळते त्याच्या स्वभावााचा घात होत नाही. त्याप्रमाणे कर्माच्या उदयामध्ये सुद्धा काही ज्ञानी पुरुष त्या उदयानुसार न परिणमता आपल्या स्वभावाला जाणून त्यामध्ये स्थित होतात ते आपल्या स्वभावाला प्राप्त करतात. स्वपरभेदविज्ञानी जीव कर्माच्या उदयामध्ये ज्ञानदृष्टी जागृत ठेवतात. कर्म व कर्माच्या फळाला आपल्यापासून भिन्न जाणतात. विभावक्रियारूप न परिणमता

अविकार स्वच्छ स्वभावाचे वेदन करतात त्यांचा विशुद्ध स्वभाव प्रगट होतो. अशुद्ध आत्म्यावर पुन्हपुन्हा ज्ञानाचे संस्कार केले तर पर्यायामध्ये शुद्धत्व व प्रभुत्व प्रगट व्हायला वेळ लागणार नाही. पर्यायाने आपले अस्तित्व द्रव्याला समर्पित केले तर पर्यायाची सुरक्षा आहे. त्यातील विकार दूर होऊन निर्मलता येते. पर्यायाला आता धडा शिकवण्याचा निर्धार करायचा की मी मनुष्य नाही, स्त्री नाही, पंडित नाही. मी एक शुद्ध जीव आहे, ज्ञानदर्शनस्वरूप आहे. आपल्या पर्यायाने आपली वरमाला द्रव्याच्या गळ्यात घातली तर त्याची खरी शोभा आहे. सिद्धपर्याय सुंदर आहे कारण तिने आपले अस्तित्व द्रव्याला समर्पित केले आहे. आपल्याला आपली पर्याय सुंदर बनवायची असेल तर आपल्या ज्ञानपर्यायाला शिकवायच की तू शुद्ध बुद्ध एक स्वभावी जीव आहेस. आपण ठरविले तर हे कार्य होऊ शकते.

जसे जपानमध्ये तेजपाल नावाचा मुलगा होता. त्याच्या शाळेमध्ये सांगितले होते की प्रत्येकाने एकाला तरी साक्षर बनवायचे. त्या मुलाच्या घरी दुसरे कोणी नव्हते. एकटी आजी होती. तर त्या मुलाने निर्धार केला की आपल्या आजीला आपण साक्षर बनवायचे. घरी जाऊन आजीला म्हणतो 'आजी, इकडे ये मी तुला लिहायला शिकवितो. आजी म्हणते, 'माझं सगळं आयुष्य गेलं, केस पांढरे झाले, आतापर्यंत मी शिकले नाही आणि आता काय शिकणार. तो मुलगा वरचेवर आजीला सांगतो पण ती आजी ऐकत नाही. परंतु त्याने निर्धार केला होता की काही पण करून आजीला साक्षर बनवायचे. तो आजीला विचारतो, हे आजी, तुला कुठे जायचे आहे, ती म्हणते 'मला स्वर्गात जायचे आहे, तेव्हा तो म्हणतो 'हे बघ आजी, तुला जर स्वर्गात जायचे तर तेथे दरवाज्यामध्ये शिपाई बसलेला असतो. तो सही करून घेतल्याशिवाय आत सोडत नाही. मग तू कशी काय स्वर्गात जाणार? तेव्हा ही आजी म्हणते बर बाबा, मी माझी सही करायला तरी शिकते आणि ती साक्षर बनते. त्यांनी निर्धार केला होता म्हणून त्यांनी आजीला साक्षर बनविले.

त्याप्रमाणे आपणसुद्धा निर्धार केला पाहिजे की काही पण करून मी माझ्या पर्यायाला शिकवणार की 'मी ध्रुव आहे' पुन्ह पुन्हा हे पर्यायाला म्हणायला शिकवायचे की 'मी झाडणारा नाही, मी जाणणारा आहे, मी स्वयंपाक करणारा नाही, मी जाणणारा ध्रुव आत्मा आहे. सामायिक, स्वाध्याय, देवपूजा हे सर्व कशासाठी सांगितले आहे तर पर्यायाला संस्कारित

करण्यासाठीच ही सर्व आवश्यके सांगितली आहेत. म्हणून स्वभाव घातापासून वाचण्यासाठी भेद विज्ञानाच्या संस्काराद्वारे स्वभावदर्शनाचा पुरुषार्थ करीत जावा.

मनुष्यादी पर्याय कर्माचे कार्य आहे. कर्माने जीवस्वभावावर विजय प्राप्त करून हे कार्य उत्पन्न केले आहे.

चक्रवर्तीचा कोणी पराभव करू शकत नाही. कारण त्याच्यापुढे चक्ररत्न असते. तसे आपल्यापुढे धर्मचक्र असेल तर आपला पण पराभव होणार नाही. आम्ही आमच्यापुढे धर्मचक्रच ठेवत नाही त्यामुळे पराभव होत आला आहे. धर्म आपल्याबरोबर पाहिजे.

योद्धा आपल्या घरातून बाहेर पडत असताना सर्व तयारीनिशी निघतो. अंगात चिलखत घलातो. खांद्यावर धनुष्य, पाठीवर बाणाचा भाता, एका हातात तलवार व एका हातात भाला इत्यादी. कोणी शत्रू अचानक वार करण्यासाठी आला तर त्याच्यावर विजय मिळविता आला पाहिजे. कोणी राजकर्ता बाहेर निघाला की पुढे मागे पोलिसांची गाडी व आजुबाजूला अंगरक्षक असतात. आत्म्यातून बाहेर पडताना कोणती तयारी आपल्या जवळ असते.

आपण शास्त्र स्वाध्यायातून बाहेर पडताना हत्यार घेऊन बाहेर पडतो का? कर्मरूपी शत्रू आपल्यावर सतत वार करण्यासाठी सज्ज आहेत. जिनवाणी मातेने समताभाव, क्षमाभाव रूपी शस्त्र आपल्याला दिली आहेत. त्यांना जवळ बाळगले पाहिजे. क्रोध, मान, माया, लोभरूपी शत्रू येतात व आपले गुणरूपी 'धन' लुटून नेतात.

जो जेवढा स्वभावाकडे झुकलेला आहे. तेवढा त्याच्या स्वभावाचा घात नाही व जो जेवढा स्वभावाच्या बाहेर आहे तेवढा त्याचा घात होत आहे. स्वभावाचा घात नको असेल तर वस्तुस्वरूपाला जाणणे आवश्यक आहे. स्वतःला ओळखून स्वतःचा अनुभव करणे आवश्यक आहे.

जेवढा परद्रव्याचा सांभाळ केला तेवढा स्वद्रव्याचा सांभाळ करीत नाही. सतत शरीराची सेवा चालू आहे. जो आपला आत्मा आहे त्याच्याकडे पहायला वेळ नाही. राजमहालामध्ये राजा राजसिंहासनावर बसला आहे तेथे गेलो आणि राजाकडे थोडेही पाहिले नाही, दुर्लक्ष केले आणि राजाचा शिपाई बसला आहे. त्याच्याकडे पाहतो त्याचा आदर सत्कार करतो राजाला ते सहन

होते का ? राजा लगेच चिडतो व त्याला शिक्षा करतो. अनादिकाळापासून आम्ही हेच केले आहे. येथे जीवरूपी राजा देहरूपी मंदिरात विराजमान आहे त्याच्याकडे कधी ढुंकूनही पाहत नाही. या जीवराजाच्या शेजारी नोकर शरीर आहे. त्याचीच विचारपूस केली, त्याच्याकडेच लक्ष दिले. त्यामुळे आत बसलेल्या जीवराजाला दुःख होणार नाही का ? उलट मनुष्यादी पर्यायरूपी जेलमध्ये त्यानेच आपल्याला बंदिस्त केले. तू माझी सेवा करीत नाहीत तर मी तुला कस बक्षीस देणार ? स्वभावाचा पराभव होण्याचे हेच मुख्य कारण आहे की आम्ही स्वतःला जाणले नाही. एकदा तरी दिवसातून आठवण होते का की 'मी जीव आहे' असे विकल्परूपाने का होईना हे जाणायला शिकले पाहिजे की मी जीव आहे. पुन्हपुन्हा संस्कार केले तर एक दिवस खरोखर आपल्याला सुद्धा स्वभावाचा अनुभव येईल.

नयांचे ज्ञान असल्याशिवाय वस्तुस्वरूपाचे ज्ञान होऊ शकत नाही. यामुळेच तत्त्वासंबंधी अनेक विवाद उत्पन्न होतात. हे आत्मतत्त्व कूटस्थ अपरिणामी आहे की क्षणाक्षणामध्ये नष्ट होते ? असा प्रश्न उत्पन्न झाल्यावर आचार्य सांगतात की जीव द्रव्यरूपाने अवस्थित असूनही पर्यायरूपाने अनवस्थित आहे –

जायदि णेव ण णस्सदि खणभंगसमुब्भवे जणे कोई ।
जो हि भवो सो विलओ संभवविलयत्ति ते णाणा ।।११९ ।।

अन्वयार्थ –(खणभंगसमुब्भवे जणे) प्रतिक्षण विनाश व उत्पादशील जीवलोकामध्ये **(कोई)** कोणी **(णेव जायदे)** उत्पन्न होत नाही आणि **(ण णस्सदि)** नष्ट होत नाही. **(हि)** कारण **(जो भवो सो विलओ)** जो उत्पादरूप आहे तोच विनाशरूप आहे. तरीपण **(संभवविलयत्ति ते णाणा)** उत्पाद अणि व्यय नाना आहेत अर्थात भिन्न भिन्न आहेत.

तात्पर्य – द्रव्यदृष्टीने जीव अवस्थित आहे व पर्यायदृष्टीने अनवस्थित आहे.

क्षणभंगुर जगामध्ये उत्पाद व्ययाचा अभाव –

या गाथेमध्ये विरोधाभास अलंकाराचा प्रयोग केला आहे.

१) क्षणभंगसमुद्भव व २) कोणीही उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही यामध्ये विरोध भासित होतो. क्षणाक्षणाला उत्पन्न होणाऱ्या आणि नष्ट होणाऱ्या लोकामध्ये कोणी उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही हे कसे काय

शक्य आहे ? एकीकडे क्षणभंगुर व एकीकडे उत्पादनाशरहित या दोन गोष्टी विरोधी आहेत.

दुसऱ्या ओळीत जे सांगितले - १) जो उत्पाद आहे तोच व्यय आहे, त्यामध्ये भेद नाही व २) उत्पाद व्यय भिन्न आहेत यामध्ये ही विरोध भासित होतो.

विरोधाभास अलंकार म्हणजे वरवर शाब्दिक विरोध दिसतो परंतु अर्थ वेगळा असल्यामुळे विरोध नसतो.

वस्तूमध्ये दोन घटक आहेत १) द्रव्य (सामान्य) २) पर्याय (विशेष)

सर्व गुणपर्यायांमध्ये व्यापक सामान्य अंशाला द्रव्य म्हणतात व क्रमरूप व अक्रमरूप विशेष अंशाला पर्याय म्हणतात.

द्रव्यापेक्षेने वस्तूचा कधी उत्पाद व नाश होत नाही. पर्याय अपेक्षेने वस्तू उत्पन्न होते व नष्ट होते.

दृष्टीभेदामुळे विरोधाचा अभाव –

जेव्हा आचार्यांनी संसार क्षणभंगुर आहे असे म्हटले तेथे पर्यायाला लक्ष करून सांगितले की कोणताही पर्याय टिकणारा नाही. क्षणाक्षणाला पर्याय बदलत आहे. म्हणून संसार परिवर्तनशील आहे. अशा क्षणभंगुर जगामध्ये सुद्धा जे द्रव्य आहे ते उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही.

आपण वाढदिवस साजरा करतो तो कुणाचा ? जीव कधी उत्पन्न झाला त्याची तारीख कोणती ते सांगा ? जो उत्पन्न झाला नाही तर त्याचा वाढदिवस कसा ? जीवद्रव्य अनादि अनन्त आहे. म्हणून वाढदिवस जीवाचा होऊ शकत नाही. तो उत्पन्न झालेल्या उत्पादनाशशील पर्यायाचा साजरा केला जातो. पर्यायाचा पण क्षणाक्षणाला ऱ्हास होत आहे तर त्याचासुद्धा वाढदिवस कसा? त्याचा तर घटदिवस म्हटला पाहिजे. मनुष्य पर्यायातले तेवढे क्षण आपले संपले.

प्रत्येक द्रव्य द्रव्यदृष्टीने उत्पन्न होत नाही व नष्ट होत नाही. जो उत्पन्न होताना व नष्ट होताना दिसतो तो पर्याय आहे. प्रत्येक द्रव्यामध्ये क्षणभंगुरता व शाश्वतता दोन्ही विशेषता आहेत. जीवसुद्धा क्षणिक व नित्य आहे. जीवाचा कोणताही मनुष्यादी पर्याय कायम राहत नाही. पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे क्षणभंगुर आहे. मनुष्य पर्याय क्षणाक्षणाला नष्ट होत आहे.

उत्पादव्ययामध्ये एकत्व–

उत्पादव्ययामध्ये एकत्व व नानात्व असल्यामुळे प्रत्येक क्षणाला विनश्वर अशा या जगामध्ये कोणी जन्मत नाही व कोणी मरत नाही. यामध्ये विरोध नाही. जो उत्पाद आहे तोच नाश आहे. असे जाणताना दृष्टी ध्रुवाकडे आहे. कारण उत्पाद व नाशाचे स्वरूप भिन्न आहेत ते एक कसे काय होऊ शकतात? जेव्हा त्यामध्ये अन्वयरूपाने राहणाऱ्या ध्रुवाकडे दृष्टी जाते तेव्हा त्यामध्ये भेद दिसत नाही. जसे व्यवहारात जो घट आहे तोच कुण्ड आहे असे म्हणताना मातीकडे दृष्टी आहे कारण घटाचे स्वरूप वेगळे आहे व कुण्डाचे स्वरूप वेगळे आहे. परंतु जी माती घटरूपाने झाली होती तीच माती घट फुटल्यावर कुण्डरूपाने परिणमली. प्रथम ज्या घटामध्ये पाणी भरत होतो, घट फुटल्यावर त्याच कुण्डामध्ये पक्ष्यांसाठी पाणी भरले जाते. त्या दोघांमध्ये अभिन्न माती पाहून लोक म्हणतो की, जो घट होता तोच हा कुण्ड आहे. त्याप्रमाणे देवादि पर्याय उत्पन्न झाला असता व मनुष्यादी पर्याय नष्ट झाला असता जो देव आहे तोच मनुष्य होता असे जाणणे ध्रुवदृष्टीचे द्योतक आहे. कारण त्या दोन पर्यायांमध्ये जीवद्रव्य एकच आहे. जो जीव मनुष्य पर्यायामध्ये होता तोच देवपर्यायामध्ये आहे, वेगळा जीव नाही. देवपर्याय व मनुष्यपर्यायाचे स्वरूप भिन्न असताना त्यामध्ये एकत्व कसे? तर त्यामध्ये जीवद्रव्य ध्रुव आहे, त्याअपेक्षेने एकत्व आहे. ध्रुवाकडे दृष्टी जाते तेव्हा पर्यायामध्ये भेद दिसत नाही. म्हणून अंगठी मोडून रिंगा केल्या तर त्यामध्ये असणाऱ्या सोन्याकडे ज्याची दृष्टी आहे तो म्हणतो जी अंगठी आहे त्याच रिंगा आहेत. द्रव्यरूपाने जीव सर्वदा टंकोत्कीर्ण (स्थिर) आहे.

उत्पादव्ययामध्ये नानात्व–

जो उत्पाद आहे तो नाश नाही, उत्पाद भिन्न आहे व नाश भिन्न आहे असे म्हटले असता उत्पादव्ययाचे स्वरूप प्रगट होते. कारण उत्पादव्ययाच्या आधारभूत ध्रौव्यामध्ये अन्यत्व संभवत नाही. ज्याप्रमाणे घट वेगळा आहे व कुण्ड वेगळा आहे असे म्हटले असता घट व कुंडाचे भिन्न स्वरूप प्रगट होते. कारण त्या दोघांच्या आधारभूत मातीच्या अपेक्षेने अन्यत्व संभवत नाही. त्याप्रमाणे मनुष्य पर्यायाचा अभाव होऊन देवपर्याय उत्पन्न झाली असता देवपर्याय भिन्न आहे व मनुष्य पर्याय भिन्न आहे असे म्हटले असता उत्पादशील देवपर्याय व नाशशील मनुष्य पर्यायाकडे दृष्टी आहे. पर्यायदृष्टीने पाहिले असता

दोन पर्यायांमध्ये भेद लक्षात येतो म्हणून पर्यायापेक्षेने जीव प्रतिक्षण स्थिर नाही.

पदार्थ द्रव्यरूपाने अवस्थित आहे व पर्यायरूपाने अनवस्थित आहे. अवस्थित म्हणजे तोच तो राहणे व अनवस्थित म्हणजे तोच तो न राहणे. जेव्हा पदार्थाच्या अस्तित्वावर, त्याच्या स्वभावावर आपण दृष्टी देतो तेव्हा तो पदार्थ अवस्थित भासित होतो. जेव्हा त्याच्या परिवर्तनस्वरूप पर्यायाकडे दृष्टी देतो तेव्हा तो पदार्थ अनवस्थित भासित होतो. लहानपणी मी वेगळा होतो. तरूणपणी वेगळाच झालो व आता म्हातारपणी माझे वेगळेच रूप झाले. अशाप्रकारे क्षणोक्षणी रूप बदलत आहे. जेथे मोक्षपर्यायाचा उत्पाद आहे आणि संसारपर्यायाचा विनाश आहे. तेथे उत्पाद विनाश भिन्न आहेत. परंतु त्या दोघांचा आधारभूत सहज परमात्मद्रव्य तेच ते एक आहे.

विभिन्न दृष्टीचे विभिन्न परिणाम –

तीन मनुष्य बाजारात गेले. त्यापैकी एकाला भगवंतांचा अभिषेक करण्यासाठी सोन्याचा कळस पाहिजे होता. एकाला सोन्याचा मुकुट पाहिजे होता. तो मुकुट घालून पूजा करू इच्छित होता. एकाला फक्त सोने खरेदी करायचे होते. तिघे एका दुकानात पोहोचले. तेथे सोन्याचा कळस तोडून मुकुट तयार केले जात होते. सोनाराने विचार केला होता खूप दिवसापासून कळस पडून आहेत. मोडून मुकुट बनविले तर पूजेच्या दिवसात मुकुट विकले जातील. त्या तिघांपैकी ज्याला कळस हवा होता, तो दु:खी होतो व विचार करतो 'मी एक तास अगोदर आलो असतो तर मला कळस मिळाला असता.' ज्याला मुकुट पाहिजे होता तो आनंदी होतो की 'मला १० मिनिटात मुकुट तयार मिळणार आहे.' ज्याला सोने पाहिजे होते तो आनंदी पण होत नाही व दु:खी पण होत नाही. तो विचार करतो 'कोणत्याही रूपाने असो मला तर सोनेच पाहिजे आहे.' हे तीन प्रकारचे भाव वस्तूमध्ये उप्पाद-व्यय-ध्रौव्याची सिद्धी करतात. एकजण कळसाचा नाश पाहून दु:खी होतो, दुसरा मुकुटाचा उत्पाद पाहून सुखी होतो, तिसरा सर्वामध्ये सोनेपणा पाहून मध्यस्थ भाव धारण करतो.

द्रव्यदृष्टी व पर्यायदृष्टी या दोन दृष्टी आहेत. द्रव्यार्थिक नयाने जीव नित्य आहे व पर्यायार्थिक नयाने जीव अनित्य आहे. पर्यायदृष्टी ठेवली असता हर्षविषाद उत्पन्न होतो. ध्रुवदृष्टी ठेवली असता समताभाव उत्पन्न होतो. जीव द्रव्यदृष्टीने सदा टंकोत्कीर्ण आहे. पर्यायरूपाने अस्थिर आहे. पर्याय पदार्थाचा एक अंश असल्यामुळे पदार्थाचे स्वरूप समजण्यासाठी त्याला जाणणे

आवश्यक आहे. पण जर पर्यायाकडेच दृष्टी ठेवली तर विषमभाव उत्पन्न होतो. पर्यायामध्ये अहंबुद्धी न करता ध्रुव द्रव्यामध्येच अहंबुद्धी ठेवली तर शान्ती मिळते.

नदी पार करण्यासाठी दोन नाव आहेत. एक फुटकी नाव व एक भक्कम नाव. त्यापैकी आपण कोणत्या नावेचा आधार निवडतो? फुटक्या नावेत कोणी बसत नाही. कारण सर्वांना विश्वास आहे की याचा आधार घेतला की, आपण बुडणार. संसारसागरातून तरून जाण्यासाठी दोन नाव आहेत. एक द्रव्य व पर्याय. पर्यायाची नाव फुटकी आहे. त्याचा जो आधार घेतो तो भवसागर तरून जाऊ शकत नाही. ध्रुव अशा द्रव्याचा आश्रय घेतला तर हा भवसागर सहज तरून जाऊ शकतो. अध्रुव पर्यायाशी आपला संबंध जोडल्यामळे हा जीव दु:खी आहे.

एक तरूण मुलगी होती. तिच्या शेजारी एक म्हातारा राहत होता. रोजच्या सहवासामुळे तिचे त्याच्यावर प्रेम जडले. ती त्याच्याशी लग्न करायला तयार झाली. आई-वडील, नातलग, शेजारी-पाजारी सर्वजण तिला खूप समजावतात. 'अगं, तू अशी वेड्यासारखी काय करतेस ? तो सत्तर वर्षाचा म्हातारा. तू सतरा वर्षाची तरूण मुलगी. त्याचे जीवन क्षणभंगुर आहे. तो आजारी पण आहे. तो तुला किती दिवस आधार देणार? म्हणून हा हट्ट सोडून दे. दुसऱ्या तरूण मुलाशी तुझं लग्न लाऊन देतो. तो तुला दीर्घकाळ आधार देऊ शकेल.' सर्वांनी सांगूनही ती ऐकत नाही; कारण प्रेम हे आंधळे असते. कुणी काही सांगितले तरी ते पटत नाही. आईवडीलांना सोडायला लागले तरी सोडण्याची तयारी असते. ती पण हट्ट करून त्याच्याशी लग्न करते. लग्न झाल्यावर वर्ष ६ महिने गेले की तो आजारी पडला व अचानक मरण पावला. ती विधवा झाली. सर्वजण तिला सान्त्वना करण्यासाठी येतात. ती जोरजोराने रडायला लागते. सर्वजण तिला म्हणतात, आता तू रडून उपयोग काय? त्यावेळी आम्ही तुला सांगितले होते. त्याचे जीवन क्षणभंगुर आहे. त्याचा आश्रय घेऊ नकोस. तू ऐकले नाहीस. निराधार वस्तूशी संबंध स्थापित करून तू स्वत: दु:ख ओढवून घेतले आहेस. आता त्याचे फळ तुला एकटीलाच भोगावे लागणार.

आपल्याला पण आचार्य वारंवार सांगतात की, या क्षणिक पर्यायाशी आपले नाते जोडू नकोस. याच्याशी संबंध जोडूनच तू दु:खी झाला आहेस.

आता ध्रुव द्रव्याशी आपला संबंध स्थापित कर म्हणजे सुखी होशील पण आम्ही पर्यायाशी संबंध जोडण्याचा आमचा हट्ट सोडत नाही म्हणून दु:खाचा अंत होत नाही. म्हणून सुखी व्हायचे असेल तर आचार्यांचे म्हणणे ऐकले पाहिजे व पर्यायांचा आधारभूत असणाऱ्या आत्मद्रव्यावर दृष्टी केंद्रित करून त्याच्याशी तन्मय होण्याचा पुरुषार्थ करावा.

मागील गाथेमध्ये हे सिद्ध केले की, जीव द्रव्यरूपाने अवस्थित आहे आणि पर्यायरूपाने अनवस्थित आहे. जेव्हा द्रव्यत्वावर आपण दृष्टी देतो. तेव्हा प्रतीतीला येते की तोच जीव आहे आणि जेव्हा अवस्थेवर दृष्टी देतो तेव्हा भिन्न भिन्नता प्रतीतीला येते. जो सकाळी होता तो दुपारी नाही. जो दुपारी आहे तो संध्याकाळी नाही. जो ह्या भवामध्ये आहे तो पुढच्या भवात रहात नाही. जो पूर्व भवामध्ये होता तो या भवात नाही. अशा प्रकारे जीवाचा अस्थिरपणा प्रगट आहे. या जीवनामध्ये अस्थिरपणा का आहे? या अस्थिरतेमध्ये जे कारण रूप आहे, तेच या पुढील गाथेत सांगतात –

तह्मा दु णत्थि कोई सहावसमवट्ठिदो त्ति संसारे।
संसारो पुण किरिया संसरमाणस्स दव्वस्स ।।१२०।।

अन्वयार्थ –(तह्मा दु) त्यामुळे **(संसारे)** या संसारामध्ये **(सहावसमवट्ठिदो)** स्वभावाने अवस्थित असे **(कोई)** कोणी ही **(णत्थि)** नाही. **(पुण)** आणि **(संसरमाणस्स)** संसरण अर्थात गतीमध्ये परिभ्रमण करणाऱ्या **(दव्वस्स)** द्रव्याची **(किरिया)** क्रिया हाच तर **(संसारो)** संसार आहे.

तात्पर्य – सांसारिक पर्यायामध्ये भ्रमण करणारा जीव स्थिर एकरूप राहूच शकत नाही.

संसारामध्ये स्वाभाविक अनवस्थितपणा –

संसारामध्ये कोणताही जीव स्वभावाने अवस्थित नाही. संसारात कोणताही एक स्वभाव कायम रहात नाही. येथे स्वभाव म्हणजे विभावरूप स्वभाव ग्रहण करावा.मनुष्यादी विभाव पर्यायरूपाने परिणमने हाच संसार आहे.

मनुष्य, देव, नारक, तिर्यंच इत्यादी पर्यायस्वभाव बदलत राहतो. यातील कोणताही एक पर्याय कायम राहत नाही. मनुष्यादी पर्याय कर्मकृत आहे. कर्माचा उदय निरंतर समान असत नाही. बदलत असतो. म्हणून कोणताही एक पर्याय शाश्वत नाही. पर्याय बदलला की स्वभाव बदलतो. प्रत्येक पर्यायाचा स्वभाव भिन्नभिन्न आहे. मनुष्य मरून कुत्रा झाला की एका क्षणात

स्वभाव बदलतो. तेथे भो भो करायला लागतो. कुत्रा मरून मांजर झाला की लगेच म्याँव म्याँव करायला लागतो. सिंह झाला की लगेच क्रूर स्वभावी होतो. ज्या ज्या पर्यायात जातो त्या त्या पर्यायाचा जो स्वभाव आहे, तसा तो होतो. जर नरकात गेला की लगेच मारकाट, वैर धारण करणे इत्यादी अशुभ लेश्यावाला होतो. एका मनुष्य पर्यायात सुद्धा बालपणीचा स्वभाव वेगळा व म्हातारपणी वेगळाच स्वभाव होतो. बालपणी खेळकरपणा, निरागसपणा इ. स्वभाव असतो. तरूणपणी पैसा मिळविण्यामध्ये व विषय भोगण्यामध्ये लीन होतो. म्हातारपणी हट्टीपणा, पुन्हा पुन्हा प्रश्न विचारणे, सगळ्या कामात लुडबुड करणे इत्यादी स्वभाव होतो. तरूणपणी तारूण्याचा गर्व करतो. वृद्धांना कसे वाटेल तसे बोलतो. तेव्हा हा सिद्धांत लक्षात ठेवावा की ही अवस्था आमची कायम राहणार नाही. हे तरूणपण नष्ट होऊन आपण पण म्हातारे होणार व त्यावेळी आपली पण या वृद्धांसमानच अवस्था होणार.

एका दिवसात एका जीवाचा स्वभाव किती वेळा बदलत असतो ते पहा. घरात कर्तृत्वाचा अहंकार असतो की मी या घराचा मालक आहे, शाळेत शिक्षक म्हणून जातो तेथे सर्व विद्यार्थ्यांचा गुरू होतो, तेथे स्वभाव वेगळाच असतो. दुकानात माल खरेदी करायला जातो तर तेथे ग्राहक म्हणून वेगळाच स्वभाव असतो. दवाखान्यात डॉक्टरला दाखवायला जातो तर तेथे पेशंट म्हणून वेगळ्याच स्वभावाचा अनुभव करतो. अशाप्रकारे क्षणाक्षणात संसारामध्ये रूप बदलत आहे.

गाथेमध्ये 'तह्मा' शब्द आला आहे. तह्मा या शब्दाचा अर्थ आहे 'म्हणून' हा शब्द मागचा संदर्भ घेऊन असतो. मागच्या चार गाथांमध्ये जे सांगितले त्यावरून हे सिद्ध होते की संसारामध्ये कोणीही स्वभावाने अवस्थित नाही. कोणतीही गोष्ट युक्तीने सिद्ध करायची असेल तर न्यायशास्त्रात याचे पाच अवयव मानले आहेत. १) प्रतिज्ञा २) हेतू ३) उदाहरण ४) उपनय ५) निगमन. एकशे सोळा नंबरच्या गाथेत आचार्यांनी प्रतिज्ञा केली की 'एसो त्ति णत्थि कोई' हाच असा कोणीही नाही व ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी ११७, ११८ गाथेत युक्ती व उदाहरणाने मनुष्यादी पर्याय नामकर्माचे कार्य आहे हे पटवून दिले. ११९ गाथेमध्ये उपनय सांगितला की संसारामध्ये द्रव्यार्थिकनयाने नित्यत्व आहे व पर्यायरूपाने उत्पाद-नाश आहे. या १२० गाथेमध्ये निगमन सांगतात, अर्थात जी ११६ व्या गाथेमध्ये प्रतिज्ञा घेतली

त्याचा उपसंहार करतात की संसारामध्ये कोणीही स्वभावाने अवस्थित नाही.

जीवाच्या अस्थिरतेचे कारण संसारच –

संसरणच संसार आहे अर्थात परिभ्रमण करणाऱ्या जीवाची करणरूप क्रिया म्हणजे संसार आहे. फक्त मुलेबाळे उत्पन्न करणे, घरगृहस्थी म्हणजे संसार नव्हे. आयुकर्माने सहित अवस्था संसार आहे. संसार पाच प्रकारचा सांगितला आहे. १) द्रव्यसंसार २) क्षेत्रसंसार ३) कालसंसार ४) भवसंसार ५) भावसंसार. १)कर्म-नोकर्मरूप पुद्गलवर्गणांना ग्रहण करणे द्रव्यसंसार २) वेगवेगळ्या स्थानांमध्ये उत्पन्न होणे क्षेत्रसंसार, ३) वेगवेगळ्या कालामध्ये उत्पन्न होणे कालसंसार आहे ४) वेगवेगळे भव धारण करणे भवसंसार आहे. ५) बंधाला कारण वेगवेगळे भाव करणे हा भावसंसार आहे. यापैकी भावसंसारच खरा संसार आहे. त्यामुळेच बाकीचे सर्व संसार आहेत. जीव रागद्वेष मोहादी भाव करतो. त्यामुळे कर्माचा बंध करतो. त्या कर्माचा उदय झाला की नवीन भव धारण करतो. तेथे नवीन शरीर ग्रहण करतो असा संसार अनादिकाळापासून सुरू आहे. संसाराचे स्वरूपच विनाशशील आहे. म्हणून संसारामध्ये अनवस्थित पणाचे कारण संसारच आहे. संसार पर्याय स्थिर असता तर धर्म करण्याची आवश्यकताच राहिली नसती. चक्रवर्तीसारख्या अतिशय पुण्यशील जीवाचा पर्यायसुद्धा स्थिर नाही तर दुसऱ्या पर्यायाची काय गती? म्हणूनच बारा भावनेमध्ये म्हटले आहे –

राजा राणा छत्रपती हथियन के असवार।
मरना सबको एक दिन अपनी अपनी बार।।

संसरण म्हणजे फिरणे. फिरणे हेच अस्थिरतेचे लक्षण आहे. प्रवास करताना प्रवासात दु:ख अनुभवून असे वाटते की आता परत कुठे जायचे नाही. आता प्रवास बंद करायचा. परंतु अनादिकाळापासून या संसारात प्रवास करूनसुद्धा अजून या जीवाला संसाराचा प्रवास बंद करावा असे वाटत नाही, याचे कारण मोह आहे.

संसाराचे स्वरूप –

बदलणे हा संसाराचा स्वभाव आहे. म्हणून संसारात बदल घडला तर आश्चर्य मानायचे काय कारण? काहीही कारण नाही. पण संसाराच्या विनाशिक स्वभावाला न स्वीकारल्यामुळे काही बदल घडला की आम्ही हाय-हाय करतो व म्हणतो असे कसे झाले? हा संसाराचा स्वभावच आहे. संसारात

बदल झाला नाही तर आश्चर्य. डोळे मिटल्यावर एका क्षणात सर्व संयोग, ऐश्वर्य, धनसंपदा, राज्य, क्षायोपशमिक ज्ञान सर्व नष्ट होते. ६ व्या , ७ व्या गुणस्थानवर्ती भावलिंगी, संयमी मुनी एकाक्षणात असंयमी देव होतो. परिणमणाऱ्या द्रव्याची क्रिया म्हणजे पूर्व पर्यायाचा त्याग व उत्तर पर्यायाचे ग्रहण होय. जीव पूर्व पर्याय सोडतो व नवीन पर्याय ग्रहण करतो. आपण कुठून आलो, हे माहीत नाही व पुढे कुठे जाणार हे माहीत नाही. जसे परिणाम करतो तसा जन्म प्राप्त होतो. जेवढी किंमत देतो त्यानुसार भाड्याचे घर प्राप्त होते. भाड्याच्या घरात काही पडझड झाली तर वाईट वाटत नाही. कारण हे घर आपले नाही, भाड्याचे आहे, सोडून जायचे आहे हे भाव आहेत. त्याप्रमाणे आपण दिलेल्या भावाच्या किंमतीनुसार मनुष्यादी पर्याय प्राप्त होतात. मनुष्य शरीर भाड्याचे घेतलेले घर आहे, याची जाणीव असते का? आपल्याला हे शरीर सोडून जायचे आहे याची जाणीव आहे का? या शरीरात सुरकुत्या पडल्या, तोंडावर फोड्या उठल्या, रंग काळा पडला, कानाला ऐकू येत नाही. तोंडातून लाळ गळते, पाय मोडला, हात मोडला तर काळजी करण्याचे कारण नाही. कारण हे भाड्याचे घर आहे. माझ्या आत्म्याचे यात काही नुकसान नाही. पण मरायला टेकला तरी अज्ञानी या लोकाचीच चिंता करीत बसतो.

एक करोडपती शेठजी आजारी पडले होते. अंथरूणावर खिळून होते. मृत्यूचे अन्तिम क्षण जवळ येत चालले होते. आजूबाजूला सर्व परिवार. अन्तिम मृत्यू पाहण्यासाठी जमले होते. पत्नी उशाशीच बसली होती. तीन मुले व सुना ही हातापायाशी बसले होते. शेठजी मधून मधून डोळे उघडून पाहत होते. शेठजीनी डोळे उघडले व विचारले की पत्नी कोठे आहे ? लगेच शेठानीजी म्हणते, पतिराज, मी तुमच्याजवळच आहे. तुम्हाला काय पाहिजे ते सांगा ? मी तुमच्याच सेवेत आहे. शेठजींनी डोळे बंद केले. पुन्हा काही क्षणांनी डोळे उघडले व विचारले, 'मोठे चिरंजीव कोठे आहेत' , लगेच तो पुढे आला व त्याने हात जोडून विचारले, पिताजी मी तुमच्या सेवेत आहे. तुम्ही काहीच काळजी करू नका. मी सर्व सांभाळतो. पुन्हा शेठजींनी डोळे बंद केले. शेठजी कुठल्या तरी चिंतेत दिसत होते. पुन्हा काही वेळांनी डोळे उघडले व विचारले. मधला मुलगा कोठे आहे? तो ही पिताजींच्या अंगावर हात फिरवीत म्हणाला, मी येथेच आहे. तुम्ही निश्चिंत रहा. सर्व व्यवस्थित होईल. पुन्हा शेठजींनी डोळे बंद केले. काहीतरी चिंतनात गूढ झाल्यासारखे वाटले. पुन्हा शेठजींनी थोड्या वेळानी डोळे उघडले व विचारले, छोटा मुलगा कोठे आहे? तो

वडिलांच्या पायाजवळ होता. पायावर हात फिरवत म्हणाला, पिताजी मी कोठेही गेलो नाही. तुमच्याजवळ आहे. तुम्ही शांत व्हा. चिंता करू नका. शेठजी एकदम ओरडले, नालायकानो ! सर्वजण येथेच बसला आहात. तर दुकानाचे दार कोणी उघडले आहे. दुकानात कोण बसले आहे?

पहा, मरणाच्या दारात असतानाही शेठजींना दुकानाची चिंता आहे, काही क्षणातच येथील सर्व वैभव सोडून जाणार, तरी त्याची चिंता. पुढे कुठे जाणार. मला तेथे कशी जागा मिळणार ? त्यासाठी मला काय केले पाहिजे? याचा विचार सुद्धा या जीवाला शिवत नाही. एक दिवस प्रवासाला जायचे असेल तर त्याची किती तयारी असते. आणि दीर्घ काळासाठी प्रवासाला जात आहोत त्याची किती तयारी करतो? याचा रोज विचार करावा. सतत याच पर्यायाची चिंता आहे. दररोज रात्री झोपताना विचार करावा. हा पर्याय सुटल्यानंतर माझे काय होणार? कोठे जाणार? परलोकाच्या प्रवासाची मी काय तयारी केली आहे? आयुष्यभर आपण जे कमावले आहे त्याचेच फळ आपल्याला मिळणार. आपण काय कमावले आहे ते आपल्यालाच माहीत आहे. त्यामुळे ज्यांनी चांगले काम केले आहे त्याला चिंता नाही. पण ज्यांनी आयुष्यभर वाईट काम केले आहे. त्याला चिंता होते. आता माझं कसं होणार? म्हणून वेळ निघून जाण्यापूर्वी सावध झालेले चांगले. पुढच्या भवाची शिदोरी बांधून घ्यावी म्हणजेच आपले आत्मकल्याण करून घ्यावे.

स्वामी समन्तभद्र स्वयंभूस्तोत्रामध्ये संसाराचे स्वरूप सांगतात. –

अनित्यमत्राणमहंक्रियाभि:
प्रसक्तामिथ्याध्यवसायदोषम् ।
इदं जगज्जन्मजरान्तकार्तं
निरंजनां शान्तिमजीगमस्त्वम् ।।

हे संभवनाथ भगवान, हा संसार अनित्य आहे या अहंकाराने मिथ्या अभिप्रायाच्या दोषाने भरलेला आहे. अर्थात संसारी जीव अनित्य, अशरण असूनसुद्धा रात्रंदिवस धनादींचे अर्जन व रक्षण आदीच्या अहंकाराने व्यस्त आहे. म्हणूनच जगातील प्राणी जन्म–जरा–मरणाने पीडित आहेत. परंतु आपण त्यांना निरंजन शांतीला प्राप्त करविले. अर्थात आपला उपदेश ऐकून अनेक संसारी प्राणी भवसागराच्या पार होऊन परम शांतीला प्राप्त झाले.

गुणभद्राचार्य आत्मानुशासनग्रंथात संसाराचे स्वरूप सांगतात.–

तादात्म्यं तनुभि: सदानुभवनं पाकस्य दु:कर्मणो
व्यापारं समयं प्रति प्रकृतिभिर्गाढं स्वयं बंधनम्।
निद्राविश्रमणं मृते प्रतिभयं शश्वन्मृतिश्च ध्रुवं
जन्मिन् जन्मनि ते तथापि रमसे तत्रैव चित्रं महत्।।

हे संसारी प्राणी, हा संसार आहे की जेथे तू शरीराशी एकमेक होत आहेस. पापकर्माचे फळ भोगत आहेस. प्रत्येक समयाला कर्माच्या प्रकृतीशी चांगल्यारीतीने बंधनात पडणे हाच तुझा व्यापार आहे. झोपेने विश्रांती घेतोस. मरणापासून सदा घाबरतोस तरीसुद्धा जेथे सदा जन्म मरण होत राहते अशा संसारात तू रमतोस हेच मोठे आश्चर्य आहे? संसाराला कष्टाचे मूळ जाणून त्यापासून उदासीन होणे योग्य आहे.

शुद्धात्म्याहून भिन्न कर्मापासून उत्पन्न मनुष्यादी पर्याय नाशवंत आहे हे जाणून आपल्या अविनाशी ज्ञानानंदमय स्वभावाच्या प्राप्तीसाठी मोह रागद्वेष सोडून वीतराग समताभावामध्ये वर्तन करणे योग्य आहे. हाच संसारनाशाचा उपाय आहे.

मागील गाथेमध्ये संसारामध्ये कोणताही पर्याय अवस्थित नाही व संसार हा भ्रमण करणाऱ्या जीवाचा परिणाम आहे ही गोष्ट सिद्ध केली. अज्ञानी जीव संसाराला बाहेर पाहतो. परंतु संसार आपल्यामध्येच आहे, बाहेर नाही. जीव रागादी परिणाम करतो तोच वास्तविक संसार आहे अशा या परिणामात्मक संसारामध्ये पुद्गल आत्म्याला येऊन कसे काय चिकटतात ? अर्थात पुदगलाचा बंध कसा होतो ? ज्या नामकर्माच्या उदयात मनुष्यादी पर्याय उत्पन्न होतात असे मागे सांगितले त्या कर्मबंधाचे कारण काय आहे ? असा प्रश्न विचारला असता आचार्य पुढील गाथेत याचे उत्तर सांगतात –

आदा कम्ममलीमसो परिणामं लहदि कम्मसजुत्तं।
तत्तो सिलिसदि कम्मं तम्हा कम्मं तु परिणामो ।।१२१ ।।

अन्वयार्थ – (कम्ममलीमसो आदा) कर्माने मलिन आत्मा **(कम्मसंजुत्तं परिणामं)** कर्मसंयुक्त परिणामाला (द्रव्यकर्माच्या संयोगाने होणाऱ्या अशुद्ध परिणामाला) **(लहदि)** प्राप्त करतो. **(तत्तो)** त्यामुळे **(कम्मं सिलिसदि)** कर्म चिकटते. **(तम्हा)** म्हणून **(परिणामो तु कम्मं)** परिणामच कर्म आहे.

तात्पर्य – द्रव्यकर्माच्या बन्धाचे निमित्त असल्यामुळे अशुद्ध परिणामच कर्म आहे.

कर्म आत्म्याचा मळ –

आत्मा कर्माने मलिन आहे. व्यवहारी जीव शरीर स्वच्छ असेल तर स्वत:ला स्वच्छ मानतो व शरीर अस्वच्छ असेल तर स्वत:ला अस्वच्छ (मलिन) मानतो. परंतु शरीर हाच आत्म्याचा मल आहे व कर्म हाच आत्म्याचा मल आहे हे जाणत नाही. मल दोन प्रकारचा सांगितला आहे. १) द्रव्यमल २) भावमल. द्रव्यमल पण दोन प्रकारचा आहे १) अन्तरंगमल व २) बाह्यमल. शरीर व कर्म अन्तरंग द्रव्यमल आहे व घाम इत्यादी बाह्यद्रव्यमल आहे. मिथ्यादर्शन, अज्ञान, कषायादी परिणाम भावमल आहेत. परद्रव्याच्या संबंधाचा अभाव हीच आत्म्याची निर्मलता आत्म्याची आहे व परद्रव्याचा संबंध हीच मलिनता आहे. शरीराला किंवा वस्त्राला मल लागला तर अज्ञानी जीव लगेच मलिनतेचा अनुभव करतो व त्या मलाची लाज वाटते. अशा मलीन वस्त्राने मी लोकांच्या समोर कसे जाऊ ? असे वाटते. म्हणून लोकांसमोर स्वच्छ कपडे परिधान करून जातो. वस्त्राला लागलेला मल हटविण्याचा पुरुषार्थ करतो, साबण व व्हाईटनर इत्यादी लावून वस्त्र धुतो. परंतु आत्म्याला चिकटलेल्या मलाची अज्ञानीला चिन्ता नाही. माझा आत्मा कर्माने मलिन आहे या मलाचा तो अनुभव करीत नाही त्या मलाची लाज वाटत नाही. असे कर्म घेऊन मी लोकांच्या समोर कसे जाऊ ? असे वाटत नाही. म्हणून नि:शंकपणे रागादिभाव करीत विचरण करतो. मलाचा अनुभव करीत नसल्यामुळे त्याला स्वच्छ करण्याचा विचारसुद्धा येत नाही. रागद्वेष भाव करणे आत्म्याला अंगवळणी पडले आहे. त्याशिवाय त्याला करमतच नाही.

एका माकडाला मार खाऊनच जेवायची सवय लागली होती. त्याला मार खाल्ल्याशिवाय जेवण जात नव्हते. एकदा मालकाने त्याला अन्न वाढले. माकड त्याला काही केल्या तोंड लावायला तयार होईना. तेव्हा मालकाला लक्षात आले. जेव्हा त्याने मारायला सुरवात केली की त्याने लगेच अन्नाचा घास तोंडात टाकला. त्याप्रमाणे संसारी जीवाला रागादी भाव करण्याची सवय लागली आहे. ते केल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. मळके कपडे घातले असतील तर जीव अंतरंगामध्ये अनुभव करतो की वस्त्र मलिन आहे ते धुवायचे आहे. त्याप्रमाणे द्रव्यकर्म व भावकर्माने सहित आत्मा मलिन आहे असा जर अनुभव करेल तर आत्म्याला धुवायचे आहे अशी भावना होईल. मल ज्यावेळी दूर व्हायचा असेल त्यावेळी होईल, पण मी कर्माने मलिन आहे याचे भान झाले तरी पुष्कळ आहे. अज्ञानी नेहमी स्वत:ला निर्दोष व दुसऱ्याला दोषी

घोषित करण्याचा प्रयत्न करतो. रागादी भावकर्म हेच मोठे दोष आहेत हे जाणत नाही.

कर्मश्लेषाचे कारण भावकर्म –

जशाप्रकारच्या पूर्वकर्माचा उदय येतो तशाप्रकारचे भाव करतो. असाताचा उदय आला की इष्टवस्तूचा वियोग होतो त्यावेळी जीव शोककरतो. नोकषायाच्या साहय्याने पुन्हा शोक करतो. त्यामुळे पुन्हा तशाप्रकारच्या कर्माचा तो बंध करतो. पूर्व कर्माचा उदय येतो त्यामध्ये आपला उपयोग जोडून जीव नवीन परिणाम करतो. त्या परिणामामुळे पुन्हा कर्माचा बंध करतो. पूर्व कर्माचा उदय, त्यामुळे रागादी भावकर्म, त्यामुळे पुन्हा कर्मबंध हे संसार चक्र अनादिकाळापासून फिरत आहे. त्याची गती कशी थांबणार ? ही कहानी अनादिकाळापासून सुरू आहे, या कहानीचा शेवट कधी होणार ?

आत्म्याचा संसार नावाचा जो परिणाम आहे तोच द्रव्यकर्माच्या बंधाला कारण आहे. जीव रात्रंदिवस जे भाव करत आहे तोच संसार आहे. मिथ्यादर्शन अज्ञान, असंयम, गती, लेश्या, असिद्ध इत्यादी भाव संसाररूप आहेत. तशा प्रकारच्या परिणामांना कोण कारण आहे ? त्याला कारण द्रव्यकर्म आहे. कारण द्रव्यकर्माने संयुक्त असतानाच तशा प्रकारचा परिणाम दिसून येतो. द्रव्यघातिकर्माने रहित अरिहंतांना मिथ्यादर्शन, अज्ञान, कषाय, लेश्या इत्यादी भावकर्म उत्पन्न होत नाहीत. आठ कर्माने रहित सिद्धांना पूर्वोक्त भाव व असिद्धत्व भाव होत नाहीत. म्हणून द्रव्यकर्माच्या उदयाने परिणाम होतो व परिणामामुळे कर्म बांधले जाते.

प्रश्न :– जर द्रव्यकर्मामुळे परिणाम होतो व परिणामामुळे द्रव्यकर्म येते तर दोघे परस्पर आश्रित झाले त्यामुळे इतरेतराश्रय दोष येतो.

ज्याप्रमाणे खटक्याचे कुलुप खोलीला लावले व त्याची किल्ली खोलीमध्ये राहिली. आता कुलुप कसे निघणार? तर किल्ली मिळाल्यावर व किल्ली कशी मिळणार तर कुलुप निघाल्यावर. कुलुप किल्लीच्या अधीन आहे व किल्ली कुलपाच्या अधीन आहे. येथे इतरेतराश्रय आहे त्याप्रमाणे द्रव्यकर्माचा उदय झाला तर जीवाचा परिणाम होतो व परिणाम झाले तर द्रव्यकर्म येते दोघांमध्ये इतरेतराश्रय दोष येतो ?

उत्तर :– येथे इतरेतराश्रय दोष येत नाही. कारण येथे जुने कर्म परिणाम होण्यासाठी निमित्त आहेत व परिणाम नवीन कर्म येण्याला निमित्त आहेत. ज्या

द्रव्यकर्माने भावकर्म झाले त्याच भावकर्माने तेच द्रव्यकर्म येत नाहीत. दुसऱ्या कार्माणवर्गणा नवीन कर्मरूप होतात. ज्याप्रमाणे बीजामुळे वृक्ष व वृक्षामुळे बीज होते. अशी संतान परंपरा सुरू आहे. तेथे इतरेतराश्रय दोष येत नाही. पूर्व बीजामुळे नवीन झाड उत्पन्न होते व त्या झाडामुळे नवीन बीज निर्माण होते. त्याप्रमाणे पूर्व द्रव्यकर्माचा उदय जीवाच्या वर्तमान परिणामांना निमित्त आहे व वर्तमान परिणाम नवीन द्रव्यकर्माला निमित्त आहे. जुने कर्म निमित्त कारण व नवीन परिणाम नैमित्तिक कार्य, परिणाम निमित्त कारण व नवीन द्रव्यकर्म नैमित्तिक कार्य. अशा प्रकारे नवीन द्रव्यकर्म ज्याचे कार्य आहे, व जुने द्रव्यकर्म ज्याचे कारण आहे असा आत्म्याचा परिणामच उपचाराने द्रव्यकर्म आहे व आत्मा आपल्या परिणामाचा कर्ता असल्यामुळे द्रव्यकर्माचा कर्ता आहे.

भावकर्मावर विजय हाच सम्यक् पुरुषार्थ –

अज्ञानी जीव दुसऱ्याला दोष देतो. त्याने शिवी दिली म्हणून मला क्रोध आला. दुसऱ्यांनी माझा अहंभाव दुखविला म्हणून माझा स्वाभिमान जागृत झाला. त्यांनी मला फसवले म्हणून मला मायाचार करावा लागला. सगळे खापर दुसऱ्यावर फोडतो. तेथे हे समजत नाही की माझ्या कर्माचा उदय आला आहे दुसरा जीव फक्त निमित्तमात्र आहे. तो कर्मरूपी राजाचा दूत आहे. त्याचा दोष नाही. एक राजा दुसऱ्या राजाकडे युद्धाचा संदेश घेऊन दूत पाठवतो. दूत दुसऱ्या राजा जवळ जाऊन संदेश देतो तेव्हा विवेकशील राजा त्या दूताला दोष देत नाही. त्याचा रोष त्या दूताला पाठवणाऱ्या प्रतिपक्षी राजावर असतो. दूताबरोबर त्या राजाला फक्त प्रतिसंदेश देतो. जा तुझ्या राजाला सांग, याचे उत्तर युद्धभूमीवर मिळेल. आपली भेट युद्धभूमीवर होईल आणि तो युद्धासाठी सज्ज होतो. जर तो दूताला दोष देऊन त्याला दंड करेल तर तो राजा अपराधी मानला जातो. तो राजा अन्यायी आहे. राजनीतीमध्ये अनिपुण आहे. त्याप्रमाणे दुसऱ्यांने कोणी शिवी दिली, निंदा केली, त्रास दिला तर ज्ञानी त्याला कर्माचा दूत समजतो. कर्मरूपी राजाने पाठविलेला हा दूत आहे. या बिचाऱ्याचा काही दोष नाही. त्यांनी फक्त संदेश पोहचविण्याचे काम केले आहे. वास्तविक कर्म दोषी आहे. ज्ञानी कर्माला प्रत्युत्तर पाठवतो. तुझी माझी भेट युद्धभूमीवर. कर्माबरोबर युद्ध करण्यासाठी सज्ज होतो. जो निमित्ताला दोष देतो व त्याच्याबरोबर युद्ध करतो तो अज्ञानी आहे.

वास्तविक कर्माचा पण दोष नाही. त्या कर्मांना आमंत्रण कोणी दिले.

माझ्या दुष्ट परिणामांनी तर त्या कर्माला बोलाविले. जर मी पूर्वी तशाप्रकारचे परिणामच केले नसते तर कर्म कोठून आले असते ? म्हणून **वर्तमान संयोग आपला भूतकाळ सांगतो व वर्तमान परिणाम आपले भविष्य सांगतो.** जसे पूर्वी परिणाम केले तसे कर्म बांधले व त्याच्या उदयात वर्तमान बाह्य संयोग प्राप्त झाला आहे व आता जसे परिणाम करतो तसे कर्म बांधले जाते व भविष्यकाळामध्ये तशा प्रकारचा संयोग प्राप्त होतो.

वर्तमान परिस्थिती कर्माधीन आहे. परंतु त्यामध्ये मन:स्थिती कशी ठेवायची हे आपल्या अधीन आहे. म्हणून परिस्थिती बदलण्यापेक्षा मन:स्थिती बदलण्याचा पुरुषार्थ करणे श्रेयस्कर आहे.

द्रव्यकर्मामुळे भावकर्म व भावकर्मामुळे द्रव्यकर्म ही साखळी कशी तुटायची ? तोडणे शक्य आहे किंवा नाही ? हो, ही साखळी तोडणे शक्य आहे. संसाररूपी दोर अनेक दोऱ्यांनी बनलेला आहे. तो एकदम तुटणार नाही पण भेदज्ञान रूपी करवतीच्या द्वारे त्यातील एकेक दोरी तोडत गेलो तर अवश्य एक दिवस संसारदोर तुटणार आहे. स्वभाव व विभावामध्ये भेद जाणून आत्मस्वभावामध्ये आत्मपणाचा अनुभव करावा. स्वभावामध्ये राहण्याचा पुरुषार्थ केला तर विभाव आपल्याजवळ फटकणार नाही. विभाव दूर झाला की द्रव्यकर्मापासून सहज मुक्ती प्राप्त होते.

मागील गाथेत सांगितले की आत्म्याच्या रागादि भावांच्या निमित्ताने द्रव्यकर्म येऊन आत्म्याशी बद्ध होतात. या जगामध्ये आत्म्याबरोबर सर्वात घनिष्ट संबंधरूप पदार्थ कोणता असेल तर ते द्रव्यकर्म अर्थात ज्ञानावरणादि ८ कर्मे. लोक म्हणतात हा घराशी चिकटला आहे, हा कुटुंबाशी चिकटला आहे, कोणी धनाशी चिकटला आहे, वास्तविक या तर सर्व दूरच्या वस्तू आहेत, सर्वात जास्त तर हा आत्मा कर्माशी व शरीराशी चिकटला आहे. या गाथेत सांगतात की हा आत्मा घराचा, कुटुंबाचा, परिवाराचा कर्ता तर दूर राहो आपल्या द्रव्यकर्माचा सुद्धा कर्ता नाही.

दुसरी उत्थानिका – शुद्ध पारिणामिक परमभावाला ग्रहण करणाऱ्या शुद्धनयाने ज्याप्रमाणे जीव अकर्ता आहे त्याप्रमाणे अशुद्ध निश्चयनयाने सुद्धा अकर्ता आहे. परंतु जर आत्म्याला सर्वथा अकर्ता मानले तर बंध व मोक्ष या दोन्हीची सिद्धी होत नाही. कदाचित् परिणामीपणा मानला तर बंध व मोक्षरूपाने परिणमन संभवते. व आत्म्यामध्ये बंध व मोक्षाचे कर्तृत्व सिद्ध होते म्हणून या

गाथेत हे सिद्ध करतात की आत्मा आपल्या भावाचा कर्ता आहे, द्रव्यकर्माचा कर्ता नाही.–

परिणामो सयमादा सा पुण किरिय त्ति होदि जीवमया।
किरिया कम्म त्ति मदा तम्हा कम्मस्स ण दु कत्ता।।१२२।।

अन्वयार्थ– (परिणामो) परिणाम **(समयादा)** स्वयं आत्मा आहे. **(पुण सा)** आणि ती **(किरिय)** क्रिया **(जीवमया त्ति होदि)** जीवाकडून रचली गेली असल्यामुळे जीवमयी आहे. **(किरिया)** क्रियेला **(कम्म त्ति)** कर्म असे **(मदा)** मानले आहे. **(तम्हा)** म्हणून आत्मा **(कम्मस्स)** द्रव्य कर्माचा **(कत्ता ण)** कर्ता नाही.

तात्पर्य – जीवाकडून जे केले जाते ते कर्म होय. जीवाकडून स्वतःचा भावच केला जातो म्हणून जीवाचे कर्म द्रव्यकर्म नाही अर्थात् द्रव्यकर्माचा कर्ता जीव नाही.

आत्म्याचा परिणाम आत्माच –

आत्मा स्वयं परिणमन स्वरूप आहे, आत्माच काय, जगात जितके पदार्थ आहेत ते सर्व निरन्तर परिणमन करतात. आत्म्याचा जो परिणाम आहे तो आत्माच आहे. कारण परिणामी परिणामाच्या स्वरूपाचा कर्ता असल्यामुळे परिणामाहून अभिन्न आहे. जे परिणमन घडते ते त्या द्रव्यापासून भिन्न नाही. हात वाकडा तिकडा केला तर वाकडी तिकडी अवस्था हातामध्येच घडली म्हणून वाकडा तिकडा हातच आहे, अन्य काही नाही. एक आजी सूत कातत होती. सूत कातता कातता तिची सूई वाकडी झाली. तिने विचार केला, लोहाराजवळ ती सरळ करावी. लोहाराजवळ जाऊन ती म्हणाली, माझ्या सुईचा वाकडेपणा काढून टाका. तुम्हाला त्याचे दोन रूपये देईन. लोहाराने वाकडेपणा काढला. सुई पूर्वीप्रमाणे सरळ झाली. तो म्हणाला, आता दोन रूपये द्या. आजीबाई म्हणते, जो वाकडेपणा काढला, तो मला दे म्हणजे मी तुझे पैसे देते. लोहाराने डोक्याला हात लावला व म्हणाला, अहो आजीबाई, सुईचा वाकडेपणा काढला म्हणून सुई सरळ झाली. सुईच वाकडी झाली होती व सुईच सरळ झाली. वाकडेपणा व सरळपणा हा सुईचाच परिणाम आहे. त्या दोन्ही अवस्था सुईपासून भिन्न नाहीत. त्याप्रमाणे आत्म्याचा परिणाम, तो शुभ असो अथवा अशुभ असो तो परिणाम आत्माच आहे. पूर्व पर्याय त्या द्रव्यातून बाहेर निघून जात नाही. ती द्रव्यातच लीन होते व नवीन पर्याय प्रकट होते. जे काही घडते ते

त्या द्रव्यामध्येच घडते त्यापासून भिन्न नाही. म्हणून परिणाम द्रव्यच आहे. आत्म्याचा परिणाम आत्माच आहे.

आपले परिणमनच आपले कर्म (काम) –

जे परिणमन आहे ते त्या द्रव्याचे कार्य आहे. जे जीवाचे परिणमन आहे ते जीवाचेच कार्य अर्थात क्रिया आहे आणि ती क्रिया जीवमय आहे. अन्य नाही. कारण सर्व पदार्थ आपल्या परिणमनरूपाने परिणमतात. आत्म्याचे काम काय ? आत्म्याचे काम भाव करणे आहे. आपण सर्वजण काय काम करतो ? केवळ आपले विचार, केवळ आपली परिणती आपण करतो. बाहेर जे काही होते ते आपले काम नाही. ती बाह्य पदार्थाची परिणती आहे. स्वयंपाक करणे, लोटून काढणे, भांडी घासणे, व्यापारधंदा करणे हे काम आत्म्याचे नव्हे. हे काम करताना जे रागद्वेषमोह भाव होतात ते आत्म्याचे काम आहे. म्हणून सहजानंद वर्णी म्हणतात–

होता स्वयं जगत परिणाम, तू जग का करता क्या काम ?
दूर हटो परकृत परिणाम, सहजानन्द रहूँ अभिराम ।।

जगाची परिणती स्वयमेव होते. मी त्या परिणतीचा करणारा नाही. अन्य द्रव्याचे परिणमन त्याच्या त्याच्या परिणमनाने होते. आपल्या मुलाला सांगितले की 'जरा पाणी घेऊन ये' तो जर खेळत असेल तर तो खेळात रमून जातो. तो पाणी आणत नाही. आपल्या मुलावर सुद्धा आपला अधिकार नाही. कारण त्याची परिणती त्याच्यामध्येच स्वतंत्ररूपाने होत आहे. मालकाला वाटते की नोकरांवर माझा अधिकार आहे. पण तसे नाही. नोकर आपल्या स्वार्थवश आपल्या हितासाठी काम करीत असतात. ते मालकाच्या सांगण्याने काम करीत नाहीत. काम करायचे मनात नसेल तर लगेच उत्तर देतात. 'आमचा हिशोब करा ! ' परपदार्थावर माझा अधिकार आहे, मी त्याला बदलू शकतो. हा आपला भ्रमच आपल्याला संसारात रूळवितो.

जी जीवमय क्रिया आहे ती आत्म्याकडून स्वतंत्रपणे प्राप्य असल्यामुळे आत्म्याचे कर्म आहे. म्हणून आत्मा आपल्या परिणामस्वरूप भावकर्माचा कर्ता आहे. परन्तु पुद्गलपरिणामस्वरूप द्रव्यकर्माचा कर्ता नाही. भलेही द्रव्यकर्म आत्म्याबरोबर आहे परंतु ते परद्रव्य आहे. पराची परिणती पर पदार्थ करू शकत नाही. आत्म केवळ आपल्या परिणामांना करतो. परिणाम चांगला असो अथवा वाईट असो. हेच आत्म्याचे कर्तृत्व आहे. या व्यतिरिक्त

आत्म्याचे कर्तृत्व नाही. परमार्थाने पाहिले तर आत्मा आपल्या परिणामाला करतो. कोणी बालक असो, वृद्ध असो, तरूण असो, जितके म्हणून जीव आहेत. सर्वजण आपल्यामध्ये आपल्या भावांची कंपनी चालवत आहेत. प्रत्येकजण आपल्या भावांना सोडून अन्य काही करीत नाही. प्रत्येक पदार्थ स्वतःमध्ये परिणामांची रचना करण्याचे काम करीत आहे. आत्मा एक ज्ञानानन्द भावाचा पिण्ड आहे. त्यामध्ये रूप, रस, गंध, स्पर्श आदिक मूर्तिपणा नाही. केवळ भावात्मक पदार्थ आहे. जाणणे, विकाररूप होणे, सुखदुःखाचे अनुभवन करणे, निराकुलतेचा अनुभव करणे ह्या सर्व भावात्मक वस्तू आहेत. हा आत्मा केवळ भाव करतो. भावाशिवाय काही करू शकत नाही.

दुसऱ्याला दुःखी करण्याचा परिणाम केला तर फक्त परिणामच केला, दुसऱ्याला दुःखी तर करू शकत नाही. दुसऱ्याला दुःखी करण्याचा परिणाम हा संक्लेशभाव आहे. त्या संक्लेश परिणामामुळे हा जीव स्वयं दुःखी होतो. दुसरा जीव दुःखी होणे अथवा न होणे हे ज्याच्या त्याच्या परिणामावर अवलंबून आहे. दुसऱ्याला सुखी करण्याचा परिणाम विशुद्ध परिणाम आहे. त्या विशुद्ध परिणामामुळे स्वतः सुखी होतो. दुसरा जीव सुखी होणे, न होणे हे त्याच्या स्वतःच्या परिणामावर अवलंबून आहे. जो परिणाम आहे तो त्या परिणामीहून अभिन्न असतो व अन्य द्रव्याहून भिन्न असतो. तो परिणामी परिणामस्वरूप आपल्या भावांचा कर्ता आहे. जीवाचे जेवढे काम आहे ते जीवमयी आहे. पुद्गलमयी नाही. म्हणून जीव पुद्गलपरिणामाचा कर्ता नाही. तर मग द्रव्यकर्माचा कर्ता कोण आहे हा प्रश्न शिल्लक राहतो. त्याचे उत्तर आचार्य देतात.–

पुद्गल परिणाम पुद्गलमयी क्रिया–

पुद्गलकर्माचा परिणाम स्वयं पुद्गल द्रव्य आहे. कारण परिणामी आपल्या परिणामस्वरूपाचा कर्ता असतो आणि परिणामी परिणामाहून अभिन्न असतो. ज्याप्रमाणे माती घटाचा कर्ता आहे आणि माती घटाहून अभिन्न आहे. कुंभार घटाचा कर्ता नाही. कारण घटाहून कुंभार भिन्न आहे. सोने दागिन्यांचा कर्ता आहे कारण दागिन्यांहून सोने अभिन्न आहे. सोनार दागिन्यांचा कर्ता नाही कारण सोनार दागिन्यांहून भिन्न आहे. सर्व पदार्थ आपल्या अस्तित्वामध्येच उत्पन्न होतात आणि आपल्या अस्तित्वामध्येच व्ययाला प्राप्त होतात.

पुद्गलाचा परिणाम पुद्गलमयी क्रिया आहे. कारण प्रत्येक द्रव्याची

परिणामस्वरूप क्रिया त्याच द्रव्यमय असते. घट मातीची क्रिया आहे. कारण घटरूप क्रिया मातीमय आहे. तो मातीचाच परिणाम आहे. दागिने सोनेमय आहेत म्हणून ती सुवर्णमयी क्रिया आहे.

पुद्‌गलाचा कर्मपरिणामरूप क्रिया मात्र पुद्‌गलाकडून प्राप्य असल्यामुळे पुद्‌गलाचे कर्म आहे. निश्चयाने पुद्‌गलात्मक कर्मवर्गणा स्कंध आपल्या कर्मत्वपरिणामाचा कर्ता आहे. कारण ज्ञानावरणादि द्रव्यकर्म त्या कर्म स्कंधाहून अभिन्न आहे. कार्मणवर्गणा द्रव्यकर्मरूपाने परिणमत आहे. पुद्‌गल कार्मणवर्गणास्कंध जीवविकारात्मक भावकर्माचा कर्ता नाही. कारण कोणत्याही द्रव्याचा अन्य द्रव्यामध्ये अत्यन्ताभाव असल्यामुळे कर्तृ-कर्मभाव नाही. परमार्थाने आत्मा आत्मपरिणामात्मक क्रियेला करतो आणि पुद्‌गल पुद्‌गलात्मक आपल्या परिणाम क्रियेला करतो.

निश्चयाने जीव जीवस्वरूपाने परिणमतो, पुद्‌गलस्वरूपाने परिणमत नाही म्हणून परमार्थाने जीव द्रव्यकर्माचा अकर्ता आहे.

प्रयोग-

मी आपल्या परिणामाचा कर्ता आहे. अन्य कर्मादिकाचा कर्ता नाही असे जाणून परविषयक विकल्प सोडून द्यावेत. कोणाच्या अधीन कोणी दुसरा पदार्थ नाही. कोण्या दुसऱ्याच्या अधीन दुसरा जीव नाही. प्रत्येक जीव आपल्या परिणामरूपाने परिणमतो. मी माझ्या रूपाने परिणमतो. आपल्यामध्ये आपले स्वरूप पहावे. सर्व द्रव्यांना स्वतंत्र स्वतंत्र पहात रहावे. सर्व पदार्थच या गोष्टीचे साक्षी आहेत की प्रत्येक पदार्थ आपापल्या अस्तित्वामध्येच राहतात. माझा मीच आहे. माझे काम माझ्यामध्येच आहे. काय काम ? तर परिणमणे. ज्ञानरूपाने, चैतन्यरूपाने परिणमणे हेच माझे काम आहे.

एकाला दुसऱ्याचा अधिकारी समजणे, एकाला दुसऱ्याचा कर्ता भोक्ता समजणे हा मोह आहे. जेथे वस्तु स्वातन्त्र्य समजले तेथे ही मोह दृष्टी राहत नाही की माझे कोणी आहे, मी कुणाचा कर्ता आहे, मी कुणाचा भोक्ता आहे. मोह दूर करण्यासाठी यथार्थ वस्तुस्वरूप लक्षात घ्यावे लागेल. वस्तुस्वातन्त्र्य ध्यानात घेतल्यावर मोह नष्ट होतो. मोह नष्ट झाल्यावरच रागद्वेष दूर होतात. ज्ञानी पुन्हापुन्हा ज्ञानस्वरूप आत्मतत्त्वाच्या भावनेच्या अभ्यासाने मोहाला नष्ट करतो.

मोह संपला की सर्व संकटे संपतात-

एक कोल्हा होता, त्याची कोल्हीण पण होती. कोल्हीणीला गर्भ

राहिला होता. कोल्ह्याला कोल्हीणीने विचारले, 'मुले कुठे उत्पन्न करायची ?' तर कोल्ह्याने सांगितले वाघाच्या गुहेत. कोल्हीणीला मुले उत्पन्न झाली. कोल्ह्याने कोल्हीणीला काही समजावले व कोल्हा भिंतीवर चढून बसला. कोल्हीणीने जेव्हा सिंहाला पाहिले तेव्हा मुलांना रडविले. कोल्ह्याने विचारले मुले का रडतात ? कोल्हीण म्हणते मुले वाघाचे मांस खाऊ इच्छितात. अशाप्रकारे एक, दोन, चार जितके म्हणून वाघ येतात ते सर्वजण भिऊन पळून जातात. कारण त्यांना असे वाटे की आपल्यापेक्षा कोणी बलवान प्राणी आहे. सर्व वाघांनी मिळून विचार केला तेव्हा लक्षात आले की ही या कोल्ह्याची धूर्तता आहे. चला, सर्वजण मिळून त्याच्याजवळ जाऊ आणि त्याला मारून टाकू. मोठे-मोठे वाघ सर्वजण मिळून आले व विचार केला की एकावर एक चढून त्याच्याजवळ जाऊ व त्याला पकडून खाली पाडू. सर्वांनी म्हटले ठीक आहे, पण विचार सुरू झाला की सर्वात खाली कोण राहणार. त्यांच्यामध्ये एक लंगडा वाघ होता. त्यालाच खाली उभा करायचे ठरवले. कारण तो वर चढू शकणार नाही. सर्वात खाली लंगडा वाघ उभा राहिला. त्याच्यावर दुसरा, पुन्हा त्यावर तिसरा, चौथा आदी चढू लागले. इतक्यात कोल्हिणीने मुलांना रडविले. कोल्हा विचारतो, मुले का रडतात? कोल्हीण उत्तर देते, मुले लंगड्या वाघाचे मांस खाऊ इच्छितात. हे ऐकताच लंगडा वाघ खिसकला आणि वरचे सर्व वाघ खाली पडले. तेथून सर्वांनी पलायन केले. पुन्हा तेथे ते फिरकले नाहीत. ज्याप्रमाणे एक खिसकल्यावर सर्व खिसकले आणि पळून गेले त्याप्रमाणे मोहरूपी वाघ खिसकला तर सर्व संकटे खिसकून एकदम समाप्त होतात. सर्व संकटांना मोहाने पाळले आहे. सर्व संकटे मोहराजाची प्रजा आहे. राजा पळाला की सर्व प्रजा पळून जाते.

मागील गाथेत सांगितले की आत्मा आत्मस्वरूपाने परिणमतो यावर प्रश्न उत्पन्न होतो की ते स्वरूप काय आहे ? की ज्या स्वरूपाने आत्मा परिणमतो याचे उत्तर पुढील गाथेत सांगतात-

परिणमदि चेदणाए आदा पुण चेदणा तिधाभिमदा ।
सा पुण णाणे कम्मे फलम्मि वा कम्मणो भणिदा ।।१२३।।

अन्वयार्थ- (आदा) आत्मा **(चेदणाए)** चेतनारूपाने **(परिणमदि)** परिणमतो. **(पुण)** आणि **(चेदणा)** चेतना **(तिधा अभिमदा)** तीन प्रकाराने मानलेली आहे. **(पुण)** पुन्हा **(सा)** ती चेतना **(णाणे)** ज्ञानामध्ये **(कम्मे)**

कर्मामध्ये **(वा)** अथवा **(कम्मणो फलम्मि)** कर्माच्या फलामध्ये **(भणिदा)** सांगितली आहे.

तात्पर्य – आत्मा ज्ञानचेतना, कर्मचेतना व कर्मफलचेतनारूपाने परिणमतो.

आत्म्याचा असाधारण गुण चैतन्य–

आत्म्याचे स्वरूप चैतन्यच आहे, कारण ते चैतन्य आत्म्याच्या सर्व निजधर्मांमध्ये व्यापक आहे. आत्म्याचे चैतन्यस्वरूप अनादिकाळापासून अनंतकाळापर्यंत निरंतर असणारे सर्वस्व आहे. आत्म्याच्या विषयी जाणायचे असेल की हा आत्मा कोणत्या स्वरूपाने आहे ? हे समजून घेण्यासाठी जोपर्यंत चैतन्य स्वरूपाची दृष्टी येणार नाही तोपर्यंत आत्मस्वरूप समजणार नाही. चैतन्य आत्म्याचा असाधारण गुण आहे. आत्म्यामध्ये जितके म्हणून सामान्य व विशेष धर्म मानलेले आहेत. उदा. अस्तित्व, वस्तुत्व, चारित्र, आनन्द आदि हे सर्व जणू चैतन्यस्वरूपाच्या रक्षेसाठी, अस्तित्वासाठी, सेवेसाठी आहेत. जर आत्म्यामध्ये चैतन्य गुण मानला नाही, बाकी सर्व गुण मानले तर त्या सर्व गुणांची काय किंमत? चैतन्यच आत्म्याचा असा असाधारण गुण आहे ज्यास्वरूपाने आत्मा परिणमत राहतो. जे काही यामध्ये गुणांचे परिणमन आहे ते चैतन्यात्मकच आहे. कोणतेही आत्म्याचे परिणमन असो ते चेतनेचे उल्लंघन करीत नाही.

चेतनेचे तीन प्रकार– १) ज्ञानचेतना २) कर्मचेतना ३) कर्मफलचेतना.

येथे चेतनेचे तीन प्रकार निश्चयदृष्टीने सांगितले आहेत म्हणून ते आत्म्याच्या शुद्ध अशुद्ध सर्व अवस्थांमध्ये घटित होतात.

ज्ञानाची परिणती ज्ञानचेतना आहे. कार्याची परिणती कर्मचेतना आहे आणि कार्याच्या फलाची परिणती कर्मफल चेतना आहे. चेतनेचे हे साधारण परिणमन संसारी आणि मुक्त दोन्ही प्रकारच्या जीवामध्ये तसेच मिथ्यादृष्टी आणि सम्यग्दृष्टीमध्ये घटित होते. आचार्य स्वयं पुढील गाथेत या तिन्हीचे स्वरूप स्पष्ट करतात.

णाणं अट्ठवियप्पो कम्मं जीवेण जं समारद्धं ।
तमणेगविधं भणिदं फलं ति सोक्खं व दुक्खं वा ।।१२४।।

अन्वयार्थ – (अट्ठवियप्पो) अर्थविकल्प स्वपरपदार्थाचे अवभासन

(णाणं) ज्ञान आहे. **(जीवेण)** जीवाकडून **(जं)** जे **(समारद्ध)** प्रारंभ केले गेले **(तं कम्मं)** ते कर्म आणि **(अणेगविधं)** अनेक प्रकारचे **(सोक्खं)** सुख **(दुक्खं वा)** अथवा दुख **(फलं)** कर्म फल **(भणिदं)** सांगितले आहे.

तात्पर्य– अर्थप्रतिभास ज्ञान आहे, शुद्ध, शुभ व अशुभ भाव कर्म आहे. आणि निराकुलता अथवा सुखदुःख कर्मफल आहे.

१) ज्ञान

अर्थविकल्पाला ज्ञान म्हणतात. स्वपर विभागाने अवस्थित विश्व अर्थ आहे. एक स्व आणि अनन्त पर पदार्थ अर्थ म्हटले जातात. पदार्थांच्या आकाराचे अवभासन अर्थात जाणणे याला विकल्प म्हणतात. ज्याप्रमाणे आरशामध्ये आरशाचा स्वतःचा आकारपण झळकतो व अन्य वस्तूंचा आकार ही झळकतो. त्याप्रमाणे ज्ञानामध्ये एकावेळी स्वतःचा ही प्रतिभास होतो व अन्य वस्तूंचा ही प्रतिभास होतो. आरसा केवळ उदाहरण मात्र आहे. दृष्टान्त सर्वथा लावायचा नसतो. म्हणून येथे असे समजू नये की ज्याप्रमाणे आरशामध्ये वस्तूंचे त्रिकोण, चौकोन, गोल आकार उमटतात त्याप्रमाणे ज्ञानामध्ये वस्तूंचे आकार उमटतात. पदार्थांचे अवभासन होणे म्हणजेच आकारग्रहण आहे. आकारग्रहणाचा हा अर्थ नाही की या आत्मप्रदेशांमध्ये काही स्थानामध्ये लांबरूंद वस्तूंचे आकार ज्ञानामध्ये आले किंवा ज्ञान त्या आकाराने परिणमले. जर ज्ञान वस्तूच्या आकाररूपाने परिणमेल तर ज्ञान मूर्तिक मानावे लागेल. मूर्तिक वस्तूच स्पर्शरसगंधवर्णरूपाने परिणमते. म्हणून पदार्थाचे ग्रहण ज्ञान आहे. पदार्थाला जाणणे ज्ञान आहे.

कर्म चेतना –

जे आत्म्याकडून केले जाते ते कर्म होय. प्रत्येकक्षण त्या त्या भावरूपाने आत्म्याकडून केला जाणारा जो त्याचा भाव आत्म्याकडून प्राप्य असल्यामुळे कर्म आहे.

ते कर्म एक प्रकारचे असूनसुद्धा द्रव्य कर्माच्या उपाधीच्या सद्भाव आणि असद्भावामुळे अनेक प्रकारचे आहे. प्रत्येक द्रव्य प्रत्येक समयाला आपापले काम करीत असते. द्रव्याचे परिणमन हेच त्याचे काम आहे. आत्मा चेतन स्वभावी आहे म्हणून प्रत्येक समयाला चैतन्य परिणामरूप काम करीत असतो. जेव्हा संसार अवस्थेमध्ये द्रव्य कर्माच्या उदयाला निमित्त करून परिणमतो तेव्हा तो रागद्वेषमोह रूप अशुभ कर्मरूपाने परिणमतो. शुद्ध

अवस्थेमध्ये द्रव्यकर्माचा अभाव झाल्यामुळे शुद्धकर्म चेतनारूपाने परिणमतो. कोणत्याही अवस्थेत आत्मा आपल्याच भावाला करतो, पण अशुद्ध अवस्थेत सोपाधी भावाचा कर्ता होतो.म्हणून एकच कर्मचेतना शुद्ध व अशुद्ध भेदाने दोन प्रकारची सांगितली आहे. ज्याप्रमाणे पाणी सदैव पाणी रूपानेच परिणमते. अग्नीच्या संयोगात उष्ण रूपाने परिणमते व अग्नीच्या संयोगाच्या अभावात ते शीतल रूपाने परिणमते त्याप्रमाणे आत्मा कर्माच्या संयोगात विकार रूपाने परिणमतो व द्रव्य कर्माच्या अभावात निर्विकार भावरूपाने परिणमतो म्हणून एकच कर्म सोपाधी व निरुपाधी दोन प्रकारचे होते.

कर्मफलचेतना

कर्माच्या फळाचे अनुभवन करणे कर्मफलचेतना आहे. प्रत्येक समयाला जीव कर्म करतो त्याचक्षणी त्या कर्माचे फळ भोगतो. आता कर्म करायचे आणि त्याचे फळ पुढच्या भवात भोगायचे असा उधारीचा धंदा येथे नाही. ज्याक्षणी जशा प्रकारचे कर्म करतो तशा प्रकारचे त्याचे फळ भोगतो. द्रव्य कर्माच्या उदयाच्या सान्निध्यात जीव राग द्वेष मोह आदि विकारी भावरूप कर्म करतो तेव्हा त्याचे फळ इंद्रिय सुख किंवा दुःख आहे म्हणून त्या क्षणी तो दुःखाचा अनुभव करतो. कारण इंद्रिय सुख हे दुःखच आहे. कारण तेथेही आकुलतेचा प्रादुर्भाव आहे.

जेव्हा जीवाला इष्ट इंद्रिय विषयाची प्राप्ती होते तेव्हा राग भाव उत्पन्न झाल्यामुळे सुखी झाल्याप्रमाणे वाटतो; परंतु येथे निराकुलतेचा अनुभव न करता आकुलतेचा अनुभव करतो.जेव्हा द्रव्यकर्माच्या अभावात शुद्ध कर्म चेतनारूपाने परिणमतो तेव्हा अनाकुलता लक्षण वास्तविक सुखाचा अनुभव करतो.

जशाप्रकारचे कर्म करतो तशा प्रकारचे फळ भोगतो. लौकीकामध्येही आपण पाहतो की जो चांगले काम करतो त्याला चांगले फळ मिळते व जो वाईट काम करतो त्याला वाईट फळ मिळते. जशा प्रकारचे भोजन बनवू तशा प्रकारचे भोजन खावे लागते. जर कष्टाने चांगले पदार्थ तयार केले तर खाताना आनंद मिळतो व कंटाळा करून कसातरी स्वयंपाक बनवला की खाताना तोंड वाकडे करीत खावे लागते. जैसी करनी वैसी भरणी, जसे करावे तसे भरावे. जे पेरू ते उगवते. गोड फळाचे बी पेरले तर गोड फळ चाखायला मिळते व कडू फळाचे बी पेरले तर कडू फळ चाखायला मिळते. आपल्याला कोणते फळ

चाखायचे आहे ते आपणच ठरवावे व त्याप्रमाणे कार्य करावे. विकारभावांचे कार्य केले तर दुःख चाखायला मिळणार व निर्विकार शुद्ध स्वरूप राहण्याचे कार्य केले तर सुख चाखायला मिळणार.

मी दुसऱ्याला करीत नाही, मी दुसऱ्याला भोगूही शकत नाही. जे काही होते ते माझे माझ्यामध्येच. मी माझेच काम करतो, मी माझ्याच परिणामांना भोगतो असे जो जाणतो तो पराचे कर्तृत्व सोडून अशुद्ध कर्मचेतनेचा त्याग करतो व शुद्ध चेतनेचा अनुभव करतो व अतींद्रिय सुखाचा उपभोग घेतो हाच चेतनेचा सदुपयोग आहे.

कर्ता, कर्म व कर्मफल निश्चयाने एका आत्मवस्तूमध्येच आहे असे जाणून अन्य पदार्थांचा विकल्प सोडावा पर्यायदृष्टी सोडून द्रव्यदृष्टीचा आश्रय घ्यावा.

एकदा बिरबल व अकबरामध्ये वाद-विवाद झाला की जगामध्ये डोळस व्यक्ती अधिक आहेत की अंध व्यक्ती? बिरबलाने उत्तर दिले, कोण अधिक आहेत याचे उत्तर प्रत्यक्षच मिळेल. त्याने आपल्या डोक्यावर एक कापड लपेटले व दरबारामध्ये जवळ बसलेल्या व्यक्तीला विचारले 'माझ्या डोक्यावर काय आहे ? ' तेव्हा त्या माणसाने उत्तर दिले फेटा.

बिरबलने ते कापड डोक्यावरून काढून अंगावर घेतले व दुसऱ्याला विचारले, 'हे काय आहे ?' त्याने सांगितले 'उपरणे', थोड्यावेळाने तेच कापड कमरेखाली नेसून दरबारात गेला व एका व्यक्तीला विचारले, 'हे काय आहे?' त्याने सांगितले 'धोतर'. हे ऐकल्यावर बिरबल म्हणाला, 'आंधळे, सर्वजण आंधळे आहेत, हे कापड आहे.' त्याला एक जण फेटा, दुसऱ्याने उपरणे व तिसऱ्याने धोतर समजले.

याचप्रमाणे तिर्यंच, मनुष्य, देव हा भेद जडबुद्धीमध्ये आहे. विवेक बुद्धीमध्ये हे सर्व कारण परमात्मा आहेत. एकच जीव नाना वेष धारण करतो. जीव अन्य अन्य नाही. सर्व पर्यायांमध्ये एक जीवच व्यापून आहे. पर्याय दृष्टीवाले सर्वजण आंधळे आहेत, द्रव्यदृष्टी असणारा जीव डोळस आहे.

मागील गाथेत सांगितलेले ज्ञान, कर्म व कर्मफल वेगवेगळे आहेत का असा प्रश्न झाला असता आचार्य सांगतात की नाही. ते तिन्ही आत्मरूपच आहेत. ते ज्ञान पण आत्मा आहे, कर्मपण आत्मा आहे व कर्मफलसुद्धा आत्मा आहे. याचा निश्चय करण्यासाठी कुन्दकुन्दाचार्य पुढील गाथा सांगतात-

अप्पा परिणामप्पा परिणामो णाणकम्मफलभावी
तम्हा णाणं कम्मं फलं च आदा मुणेयव्वो ।।१२५।।

अन्वयार्थ–(अप्पा) आत्मा **(परिणामप्पा)** परिणामस्वभावी आहे. **(परिणामो)** परिणाम **(णाणकम्मफलभावी)** ज्ञानरूप, कर्मरूप आणि कर्मफलरूप होतो. **(तम्हा)** म्हणून **(णाणं)** ज्ञान, **(कम्मं)** कर्म **(चं)** आणि **(फलं)** कर्मफल **(आदा)** आत्मा आहे असे **(मुणेयव्वो)**जाणावे.

तात्पर्य– आत्मा परिणामस्वभावी आहे. परिणाम ज्ञानरूप, कर्मरूप व कर्मफलस्वरूप होण्यायोग्य आहे म्हणून आत्माच ज्ञान, कर्म व कर्मफलरूप आहे.

१) द्रव्य असल्यामुळे आत्मा परिणामस्वभावी आहे–

'द्रु द्रवति गच्छति तांस्तान् पर्यायान् इति द्रव्यम्' द्रु धातूपासून द्रव्य शब्द बनला आहे. द्रु म्हणजे द्रवणे, प्राप्त होणे. त्या त्या पर्यायांना जे प्राप्त होते ते द्रव्य. आत्मा सुद्धा एक द्रव्य आहे. तो प्रतिसमय आपल्या पर्यायांना प्राप्त होत आहे. परिणमनाशिवाय पर्याय होऊ शकत नाही म्हणून आत्मा परिणामस्वभावी आहे. परिणमनाच्या अभावात द्रव्यच सिद्ध होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे नदी निरन्तर वाहत असते त्याप्रमाणे द्रव्य अनादिकाळापासून निरन्तर प्रवाहरूपाने वाहत आहे अर्थात् परिणमत आहे. १२२ गाथेमध्ये ही सांगितले आहे की 'परिणामो सयमादा' परिणाम स्वयं आत्मा आहे. परिणाम आत्म्याहून वेगळा नाही. आत्म्याचा परिणाम अनात्मा नाही. आत्म्याचा परिणाम आत्माच आहे. ज्याप्रमाणे सोन्याचा अंगठी, रिंगा, बांगड्या कोणताही परिणाम केला तरी तो परिणाम सोनेच आहे. त्याप्रमाणे आत्म्याचे जितके परिणाम आहेत ते सर्व आत्माच आहेत.

२) आत्म्याचा परिणाम चेतनात्मक–

आत्म्याचा जो कोणता पण परिणाम झाला , होतो किंवा होईल तो सर्व चैतन्यात्मकच झाला, होत आहे व होणार. प्रत्येक वस्तूमध्ये स्वभावानुसारच परिणाम होतो. स्वभावानुसार अर्थक्रियाकारीपणा हेच वस्तूचे वस्तुत्व आहे. सोन्याचे परिणमन सुवर्णरूप, चांदीचे परिणमन चांदीरूप होते, ज्याप्रमाणे पुद्गलाचे परिणमन स्पर्शरसगंधवर्णात्मक अचेतनरूप होते त्याप्रमाणे आत्म्याचे परिणमन चेतनात्मकच होते. आत्म्याचा जो कोणता स्वभाव अथवा विभावरूप परिणाम असो तो चेतनेचे उल्लंघन करीत नाही म्हणून तो

चैतन्यात्मकच असतो.

आत्म्याचा परिणाम चैतन्यात्मक असल्यामुळे ज्ञान, कर्म व कर्मफलरूप आहे. कारण चेतना ज्ञान, चेतनारूप कर्म व चेतनारूप कर्मफलांशी तन्मय आहे. आत्म्याचे जे परिणमन आहे ते ज्ञान, कर्म व कर्मफल या तीन रूपांमध्ये आहे. कर्मफलामध्ये आनन्द गुणाची पर्याय येते व कर्मामध्ये अन्य सर्व परिणमन येते. ज्ञानामध्ये ज्ञानाचे परिणमन, कर्मामध्ये अन्य चारित्रादी गुणांचे परिणमन व कर्मफलामध्ये आनन्दाचे परिणमन येते.

शुद्धदृष्टि–

शुद्ध शब्दाचा अर्थ आहे केवळ एक द्रव्य. द्रव्यदृष्टीमध्ये एक वस्तुमात्राशी प्रयोजन आहे. यामध्ये अन्य वस्तूचा तिळाएवढा ही संपर्क नाही. केवळ एका द्रव्याला पाहणे शुद्ध द्रव्यदृष्टी आहे. आत्म्याचे परिणमन भले रागरूप असू दे किंवा विरागरूप असू दे, निर्मल असो किंवा मलिन असो शुद्धदृष्टीमध्ये वस्तुमात्राचे अवलोकन आहे. या शुद्धदृष्टीचे तीन भेद आहेत. १) परमशुद्धद्रव्यदृष्टी २) शुद्धनिश्चयनय दृष्टी ३) अशुद्ध निश्चयनय दृष्टी. परमशुद्धद्रव्यदृष्टीमध्ये परद्रव्यपरभावांपासून भिन्न, पर्यायभेदांपासून भिन्न गुणभेदरहित एक शुद्ध द्रव्य ग्रहण केले जाते. शुद्धनिश्चयनय दृष्टीमध्ये शुद्धपर्यायपरिणत द्रव्य जाणले जाते व अशुद्ध निश्चयनय दृष्टीमध्ये अशुद्धपर्यायपरिणत वस्तू जाणली जाते.

दोन द्रव्यांचा संबंध सांगणे अशुद्धदृष्टी अर्थात व्यवहार दृष्टी आहे. केवळ एका द्रव्याचे निरूपण शुद्धनिरूपण आहे व दोन आणि दोघांच्या संबंधांचे निरूपण अशुद्ध निरूपण आहे.

शुद्धदृष्टीमध्ये पराला पर व स्वतःला स्व पाहणे. वस्तु जशी आहे तशीच आहे. वस्तू स्वस्वरूपामध्येच आहे व स्वस्वरूपामध्येच परिणमते. कोणी कुणाला आपले द्रव्यगुणपर्याय देत नाही. व कोणीही आपल्या अगुरुलघुगुणाचे उल्लंघन करीत नाही असे जाणणे ही निश्चयदृष्टी आहे.

निश्चय शब्दाचा अर्थ आहे **निष्क्रान्तः चयः यस्मात् स निश्चयः** ज्याच्यातून संचय निघून गेला आहे अर्थात जेथे केवळ एक पदार्थाची दृष्टी आहे त्याला निश्चय म्हणतात.

व्यवहार दोन प्रकाराने प्रवृत्त होतो. १) जोडून व २)तोडून. आपल्या स्वरूपाने असणाऱ्या वस्तूमध्ये दुसऱ्या तत्त्वाला जोडणे हा व्यवहार आहे. जसे

जीव शरीराने सहित आहे. कर्माशी बांधलेला आहे. शरीराचा व कर्माचा कर्ता भोक्ता आहे हा सर्व जोड आहे. दुसरा व्यवहार- पदार्थाचे स्वरूप समजाविण्यासाठी गुणभेद करून अखण्ड वस्तूला तोडणे अर्थात भेद करून सांगणे हा सुद्धा व्यवहार आहे. जसे आत्मा ज्ञानगुणवाला, दर्शनगुणवाला, चारित्रगुणवाला आहे. अशाप्रकारे गुणभेद करून सांगणे. अखंड पदार्थाला खंडखंडरूप करणे अर्थात तोडणे हा व्यवहार आहे. अशाप्रकारे व्यवहार तोडरूप किंवा जोडरूप दोन प्रकाराने होतो.

व्यवहारामध्ये व्यवहाराचा विषय चुकीचा नाही. परन्तु आत्मकल्याणासाठी जी विशेष तयारी आहे त्यामध्ये व्यवहारदृष्टी बाधक आहे म्हणून अध्यात्मसाधनेमध्ये निश्चयदृष्टी अर्थात परमार्थाचे अवलम्बन घ्यायला सांगितले आहे.

शुद्धद्रव्याच्या निरूपणामध्ये परद्रव्याच्या संपर्काचा अभाव झाल्यामुळे व पर्यायांचा द्रव्यामध्ये अन्तर्भाव असल्यामुळे आत्मा शुद्ध द्रव्य आहे.

समयसारच्या ६ व्या गाथेपूर्वी प्रश्न केला आहे की शुद्ध आत्मा काय आहे ? तेव्हा आचार्य उत्तर देतात.-

णवि होदि अपमत्तो ण णमत्तो जाणओ दु जो भावो।
एवं भणंति शुद्धं णादो जो सो दु सो चेव।।

आत्मा न प्रमत्त आहे, न अप्रमत्त, अप्रमत्त असणे चांगली गोष्ट आहे त्याचा का निषेध केला. आत्मा न कषायसहित आहे, न कषायरहित. आत्मा न बद्ध आहे, न मुक्त आहे. कषायरहित मुक्त असणे चांगली गोष्ट आहे त्याचा का निषेध केला हा एक प्रश्न आहे.

त्याचे उत्तर असे की कषाय जीवाचे स्वरूप नाही व कषायरहित हे पण जीवाचे स्वरूप नाही. जीवाचे स्वरूप तर ज्ञानमय आहे. आत्मा ज्ञाता द्रष्टा आहे. कषायरहित सांगण्यामध्ये प्रथम कषायाचा स्वीकार होतो. नंतर त्याचा निषेध होतो. निश्चयाने आत्मा अनादि अनन्त एक ज्ञानमात्र आहे.

जर आपण कोणाला म्हणालो की तुझे वडील कैदेतून मुक्त झालेत. हे ऐकल्यावर त्याला राग येतो. कैदेतून मुक्त आहेत म्हटल्यावर राग येण्याचे कारण काय? त्याचा अर्थ असा होतो की वडील पहिला कैदेमध्ये होते. आता तेथून मुक्त झाले. ते जेलमध्ये कोठे होते? त्याप्रमाणे कषायरहित म्हटल्यावर आत्म्याचे सहजस्वरूप आले नाही त्याचा अर्थ असा होतो की आत्मा प्रथम

कषायरहित होता आता तो कषायसहित झाला. वास्तविक शुद्धदृष्टीने आत्मा असाधारण गुणमय आहे. शुद्धदृष्टीच्या निरूपणामध्ये परद्रव्याचा संपर्क असंभव आहे.

हाच शुद्धदृष्टीचा चमत्कार आहे की या दृष्टीमध्ये आत्मा केवळ एक आहे. द्वैत नाही. पदार्थाजवळ संयोग, संयोगीभाव, गुण, पर्याय सर्व काही आहे पण शुद्धदृष्टी केवळ शुद्धद्रव्यालाच ग्रहण करते. ज्याप्रमाणे हाडाचा फोटो घेणारे यन्त्र अर्थात् एक्स रे मशीन. व्यक्तीला टेबलावर झोपवून त्या व्यक्तीच्या हाडाचाच फोटो घेते. त्या व्यक्तीच्या अंगावर कपडे पण आहेत, त्या कपड्याच्या खाली चमडे आहे. त्याच्याखाली मांस आहे, चर्बी आहे पण ते मशीन त्या सर्वांना पार करून त्यांना ग्रहण न करता केवळ हाडाचाच फोटो घेते. त्याचप्रमाणे शुद्धनयाची दृष्टी शरीराला पार करून कर्मांना पार करून, रागात्मक विभावाला पार करून त्याच्या पर्यायांना पण पार करून एक अनादि अनन्त अहेतुक असाधारण स्वभावाला ग्रहण करते. अशा एकत्वाची दृष्टी ज्यांना झाली ते सम्यग्दृष्टी जीव आहेत.

प्रयोग– मी पराला करीत नाही व पराला भोगत नाही. जे काही माझ्यामध्ये होते ते माझ्यामध्ये माझ्यापासूनच होते. जे काही अनुभवन आहे ते माझ्यामध्ये माझेच आहे. एकत्वदृष्टीने ज्ञान, कर्म व कर्मफल आत्म्यामध्ये आहे.

द्वितीय अध्यायामध्ये ज्ञेयतत्त्वाचे वर्णन चालू आहे. त्यामध्ये प्रथम द्रव्याचे सामान्य वर्णन करून सामान्य भेदभावना भावली आहे. त्यामध्ये आत्म्याला ज्ञेयपणाला प्राप्त करून त्यामध्ये शुद्ध द्रव्यपणाचा निश्चय केला. शुद्ध आत्म्याचा निश्चय झाला तर ज्ञानतत्त्वाची प्रसिद्धी होते. ज्ञानतत्त्वाची प्रसिद्धी झाली तर शुद्ध आत्मतत्त्वाची उपलब्धी होते. शुद्ध आत्मतत्त्वाची उपलब्धी होणे हे अभिनंदनीय कार्य आहे. आजपर्यंत या जीवाला अशुद्ध आत्मतत्त्वाचीच प्राप्ती झाली आहे. त्यामुळे तो अपयशाला पात्र ठरला आहे. जर त्याला ज्ञानतत्त्वाची प्रसिद्धी होऊन शुद्ध आत्मत्वाची प्राप्ती होईल तर त्याचे सर्वज्ञ प्रभूसुद्धा अभिनन्दन करतात. अशाप्रकारे शुद्धात्मोपलब्धीचे अभिनंदन करीत आचार्य द्रव्यसामान्य वर्णनाचा उपसंहार करतात.

कत्ता करणं कम्मं फलं च अप्प त्ति णिच्छिदो समणो।
परिणमदि णेव अण्णं जदि अप्पाणं लहदि सुद्धं ।।१२६।।

अन्वयार्थ–(जदि) जर **(कत्ता करणं कम्मं फलं च)** कर्ता, करण, कर्म आणि कर्मफल **(अप्प त्ति णिच्छिदो)** आत्मा आहे असा ज्याने निश्चय केला तो **(समणो)** श्रमण **(अण्णं)** अन्यरूप **(णेव परिणमदि)** परिणमत नाही तर तो **(सुद्धं अप्पाणं)** शुद्ध आत्म्याला **(लहदि)** प्राप्त करतो.

तात्पर्य– आत्माच माझे सर्वस्व आहे, अन्य काही नाही. असे मानणारा शुद्ध आत्म्याला प्राप्त करतो.

आत्मतत्त्वाच्या प्राप्तीचा अधिकारी–

कर्ता, कर्म, करण आणि कर्मफल हे सर्व आत्माच आहे असा जो निश्चय करतो आणि अन्य द्रव्यरूप परिणमन करीत नाही तो परद्रव्याच्या संबंधाची दृष्टी नष्ट झाल्यामुळे शुद्ध आत्मतत्त्वाला प्राप्त करतो. जो आपल्या सर्व कारकांमध्ये स्वतःलाच पाहतो. विकल्पामध्येसुद्धा परद्रव्यरूप परिणमत नाही तो परद्रव्यसंपर्क रहित आणि ज्यामध्ये सर्वपर्याय लीन आहेत अशा शुद्ध आत्म्याला प्राप्त होतो. परद्रव्यापासून स्वतःला जो भिन्न जाणतो व स्वतःमध्येच सीमित होतो. सर्व पर्यायतरंग सुद्धा ज्याच्या दृष्टीमध्ये नाहीत केवळ एक ध्रुवस्वभाव आत्म्यामध्येच ज्याची दृष्टी आहे तोच शुद्ध आत्मतत्त्वाला प्राप्त करतो.

परपरिणमनामध्ये असमर्थता–

वास्तविक कोणतेही द्रव्य कुण्या अन्य द्रव्याला परिणमन करविण्यामध्ये असमर्थ आहे. '**न हि स्वतः असती शक्तिः कर्तुमन्येन पार्यते**' वस्तूमध्ये स्वयं जी शक्ती नाही त्यारूपाने दुसऱ्याकडून परिणमन करविले जाऊ शकत नाही. ज्याप्रमाणे अग्नीला थंडरूपाने परिणमविले जाऊ शकत नाही. साखरेला खारटरूपाने परिणमविले जाऊ शकत नाही. सिद्ध जीवांमध्ये कोणी क्रोध उत्पन्न करवू शकत नाही. आणि ज्या शक्ती वस्तूमध्ये स्वयं आहेत त्याला दुसऱ्याची अपेक्षा नसते '**न हि वस्तुशक्तयः परमपेक्षन्ते**' साखरेला गोडरूपाने परिणमविण्यासाठी दुसऱ्याची अपेक्षा नाही. सूर्य स्वयं प्रकाशमान आहे त्याला प्रकाशित करण्यासाठी दुसऱ्या प्रकाशमान द्रव्याची अपेक्षा नाही. आत्मा स्वयं ज्ञायक आहे. त्याला जाणण्यासाठी दुसऱ्या द्रव्याची अपेक्षा नाही.

एका कार्यामध्ये कर्ता, करण, कर्म व कर्मफळ या चार गोष्टी असतात. भेदाच्या अपेक्षेने विचार केला तर देवदत्ताने आपल्या तोंडाने आंबा खाल्ला त्यामुळे तो संतुष्ट झाला. येथे कर्ता देवदत्त, तोंड करण, आंबा कर्म व

संतोष फळ आहे. जर याचा अभेददृष्टीने विचार केला तर देवदत्ताने आपल्याच शरीराच्या अंगरूप तोंडाचा व्यापार केला त्यामुळे तो संतुष्ट झाला. येथे निश्चयाने देवदत्तच कर्ता, करण, कर्म व कर्मफल झाला. त्याचप्रमाणे भेददृष्टीने आत्मा अशुद्ध परिणामाने कर्म बांधून दुःख भोगतो. येथे आत्मा कर्ता, अशुद्धपरिणाम करण, कर्मबंधन हे कर्म व दुःख हे फळ आहे. अभेददृष्टीने विचार केला तर आत्म्याने आपल्याच अशुद्ध परिणामाने रागादी भावकर्म केले व दुःखी झाला. अशाप्रकारे अशुद्ध निश्चयनयाने आत्माच कर्ता, करण, कर्म व कर्मफळरूप होतो.

जो कर्ता, करण, कर्म व कर्मफल सर्व आत्माच आहे हे निश्चित करतो तो परद्रव्याला परिणमविण्याचे विकल्पच करीत नाही. ज्ञानी जाणतो की प्रत्येक वस्तू स्वयं परिणमनशील आहे. माझी त्याला काय आवश्यकता ? जे चाक स्वयं फिरत आहे त्याला फिरविण्याची काय गरज ? ज्याप्रमाणे वाऱ्याच्या निमित्ताने पवनचक्की स्वयं फिरत असते त्याला फिरविणे व्यर्थ आहे त्याप्रमाणे वस्तू स्वंय परिणमत आहे. मला त्यास परिणमविण्याची काय गरज ? पराला परिणमविण्याचा विकल्पसुद्धा आकुलता उत्पन्न करविणारा आहे. एका कविने म्हटले आहे.–

स्वतः परिणमती वस्तू के क्यों करता बनते जाते हो ।
कुछ समझ नहीं आती तुमको
निःसत्त्व बने ही जाते हो ।
वस्तु की मालिक वस्तू है, मालिक है वहीं करता है
फिर मालिक के मालिक बनकर,
क्यों नीति न्याय गमाते हो ।

अशुद्ध परिणतीमध्ये कर्ता, करण, कर्म व कर्मफलरूपता–

ज्ञानीच्या चिंतवनामध्ये आत्माच सर्व कारकरूप होतो. ज्ञानी जाणतो की जेव्हा संसार अवस्थेमध्ये कर्माच्या उदयाच्या सान्निध्यात विकाररूप परिणमलो तेव्हा मी एकटाच विकारी होतो. संसारी होतो. तेव्हा अज्ञानदशेमध्ये सुद्धा वास्तविक माझे कोणी नव्हते. तेव्हा ही मी एकटाच उपरक्तचित्स्वभाव–रूपाने परिणमन करीत स्वतंत्र कर्ता होतो. अर्थात् अज्ञानदशेमध्ये ही मला कोणी रागादिरूपाने परिणमविले नाही. मीच माझ्या अज्ञानामुळे विकाररूपाने परिणमलो होतो. स्त्री, पुत्र, शत्रू, मित्रादिक माझ्या विकारपरिणतीचे कर्ता

नव्हते. अज्ञानी आपल्या विकाराचे खापर दुसऱ्यावर फोडतो, त्यामुळे दुःखी होतो. जो आपली चूक जाणतो तो दुसऱ्यामध्ये सुधार करण्याचा विफल प्रयत्न करीत नाही. स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करतो. ज्याप्रमाणे कधी कोणते संकट आले, दुःख कष्ट प्राप्त झाले त्यामध्ये जर असा विचार केला की यामध्ये माझीच चूक आहे तर त्यामध्ये कष्टाचा अनुभव होत नाही. ज्या पुरुषाच्या निमित्ताने दुःख होते त्यावर जर विरोधी दृष्टी राहिली नाही तर कोणतेही शल्य मनात राहत नाही. जर हे समजले की माझ्या विरोधी दृष्टीमुळेच हे दुःख आहे तर त्यामुळे आकुलता राहत नाही. अशाप्रकारे जो स्वतः मध्ये निर्णय करतो त्याच्या अंतरंगात विरोधाची आग भडकत नाही. त्याला दुःख वाटत नाही. शान्त होतो. कारण तो पराला परिणमविण्याची इच्छा करीत नाही. दुसऱ्याचे वाईट करण्याची इच्छा करीत नाही.

ज्ञानी जाणतो की विकारी परिणमनाच्या वेळी मीच एकटा रंजायमान चैतन्यस्वभावाने साधकतम साधन होतो. दुसऱ्या कोणाकडून मला विकार उत्पन्न करविला नव्हता. अपशब्द, शस्त्र, विष, काटा, दगड इत्यादी कोणत्याही साधनाद्वारे मला विकार झाला नाही. माझ्याद्वारेच मला विकार उत्पन्न झाला होता.

विकारपरिणमणाच्या वेळी मीच विकाररूप परिणमन करीत एकटा आपल्याद्वारे कर्म होतो. राग, द्वेष, मोहरूप कर्म मी स्वयंच होतो. कारण विकारी परिणमणाच्या द्वारे दुसरी वस्तू मला प्राप्त झाली नाही. मी स्वयं मलाच विकाररूपाने प्राप्त केले.

विकारपरिणमणामुळे उत्पन्न होणारे क्लेशरूप कर्मफळ मी स्वयंच होतो. त्या रागद्वेषादी विकारी भावांचे फळ मलाच भोगावे लागले. त्याचे फळ अन्य कोणी भोगू शकत नाही.

अशाप्रकारे अनादि संसारामध्ये विभावात रंगलो तेव्हासुद्धा मीच कर्ता होतो, कर्म होतो, करण होतो आणि कर्मफल होतो. असा जो ज्ञानी निश्चय करतो तो अन्यरूप परिणमत नाही.

उपाधीच्या सान्निध्यात विकृतिभाव–

ज्याप्रमाणे स्फटिकमणी लाल निळ्या हिरव्या रंगयुक्त जास्वंदी फूल, तमालपत्र व केळीच्या पानाच्या सान्निध्यात येतो तेव्हा आपल्या शुद्धस्वभावाला सोडून लाल, निळ्या, हिरव्या विकाररूपाने परिणमतो. त्या

उपाधीच्या आश्रयाने विकाररूप परिणमण्याची त्याची स्वतःची उपादान योग्यता आहे. त्या उपाधीने त्याला जबरदस्तीने विकाररूप परिणमविले नाही. परंतु उपाधीशिवाय ही तो विकाररूप परिणमला नाही. त्याचप्रमाणे आत्मा कर्मोपाधीचे सान्निध्य असतानाच रागद्वेषमोहादी विकाररूपाने परिणमतो. कर्म त्याला जबरदस्तीने विकाररूप करीत नाही. हा स्वयं स्वतःच्या अशुद्ध उपादान योग्यतेमुळे विकाररूप परिणमतो. पण कर्मोपाधी शिवाय तो विकाररूप होत नाही. जेव्हा लाल निळ्या, हिरव्या उपाधीचे सान्निध्य दूर झाले तेव्हा स्फटिक लाल, निळा, हिरवा इत्यादी विकाररूपाने परिणमत नाही. शुद्धरूपाने परिणमतो. त्याप्रमाणे जीवसुद्धा कर्माची उपाधी दूर झाली की रागद्वेषमोहरूप विकाररूपाने परिणमत नाही. तेव्हा तो सहज सुविशुद्ध चैतन्यस्वभावरूपाने परिणमतो. जो उपाधीच्या सान्निध्यात प्रकट होतो त्याचा उपाधीच्या अभावात पूर्ण अभाव होतो. उपाधीच्या अभावात विशुद्ध चैतन्यस्वभावाचा पूर्ण विकास होतो.

शुद्ध परिणतीमध्ये षट्कारकता–

ज्ञानी जाणतो की आता मी उपाधीचा नाश झाल्यामुळे सहज आत्मवृत्तीरूप होऊन विकाराने अस्पर्शित मोक्षाभिलाषी झालो आहे. आता या विकाररहित अवस्थेमध्ये मी एकटाच विशुद्ध चित्स्वभावाने परिणमणारा स्वतंत्र कर्ता आहे. या विशुद्धस्वभावाने दुसरा कोणी परिणमला नाही. मीच विशुद्धपरिणामरूपाने परिणमलो आहे. विशुद्ध स्वभाव परिणामाचा कर्ता मी स्वयं आहे. त्यासाठी दुसऱ्या कर्त्याची मला गरज नाही. विकारशमनाच्या वेळी मीच एकटा विशुद्धचित्स्वभावाने साधकतम करण आहे. अर्थात् विशुद्ध परिणामाचे साधन अन्य कोणी देव, शास्त्र, गुरु नाही. मी स्वयं स्वतःद्वारेच विशुद्ध झालो आहे. विशुद्धभावाचे दान अन्य कोणी करू शकत नाही. स्वतःला स्वतःमध्ये डुबकी मारून ती विशुद्धता प्रकट करावी लागते.

विकारप्रशमनाच्या वेळी मीच एकटा विशुद्ध चित्स्वभावरूप परिणमाच्या द्वारे प्राप्य कर्म आहे. विशुद्ध चित्स्वभावाद्वारे अन्य कोणती वस्तू प्राप्त झाली नाही. स्वतःच्या आत्म्याचीच तेथे उपलब्धी झाली आहे म्हणून मी स्वयंच कर्म आहे.

विकार शान्त झाल्यावर मी स्वयंच एकटा विशुद्धचित्स्वभावाच्या द्वारे निष्पाद्य अनाकुल स्वरूप सहज आनन्दरूप कर्मफळ आहे. अर्थात विशुद्ध

चैतन्यस्वभावरूपाने परिणमल्यावर स्वाभाविक आनन्दरूप फळ प्राप्त झाले त्या आनंदरूपाने मीच आहे. निरुपाधी स्वभावाच्या सान्निध्यात आत्मा परमानन्दरूप फळाला प्राप्त करतो अर्थात् त्या आनन्दरूपाने आत्माच स्वयं परिणमतो.

अशाप्रकारे ज्यावेळी मी मुमुक्षू झालो तेव्हा ही माझे कोणी नाही. मी आपल्या विशुद्धचैतन्यस्वभावाने स्वतन्त्र असून कर्ता आहे आणि एक तो मी साधकतम आहे, आणि आत्म्याने आत्म्याला प्राप्त केले म्हणून मीच कर्म आहे. शुद्ध चित्परिणतीने उत्पन्न झालेले निराकुलता सुखरूप फळ मीच आहे म्हणून मीच कर्मफल आहे.अशा प्रकारे सर्वत्र एक अद्वैत शुद्ध दृष्टीने स्वतःला जाणावे. अशा प्रवृत्तीने शुद्ध आत्म्याची प्राप्ती होते.

बंधमार्गामध्ये व मोक्षमार्गामध्ये एकत्वदृष्टी–

बन्धमार्गात असो अथवा मोक्षमार्गात असो हा एक आत्माच आपले अस्तित्व घेऊन आहे. दोन्ही मार्गात कारकभूत हा मी एकटाच आत्मा आहे. त्या सर्व प्रवृत्तींमध्ये जो आपल्याला एकच पाहतो. एकत्वाची भावना करतो अशा ज्ञानीला परद्रव्याची परिणती होत नाही. मोह होत नाही. एकत्वनिश्चयगत जीवाला परद्रव्यसंपर्क होत नाही. ज्याप्रमाणे एक परमाणू आपल्या एकत्वाच्या प्रभावनेमध्ये सन्मुख आहे अर्थात् जो परमाणू जघन्य गुणाकडे झुकलेला आहे अशा परमाणूमध्ये परद्रव्याची परिणती होत नाही अर्थात स्कन्धरूप परिणमन होत नाही. त्याप्रमाणे जो जीव आपल्या आत्म्याच्या एकत्वामध्ये उपयोग लावतो अर्थात शरीरापासून, द्रव्यकर्मापासून, विकल्पापासून हटवून आणि क्षणाक्षणामध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या आत्मपरिस्थितीपासून उपयोग हटवून एकत्वाच्या प्रभावनेमध्ये सन्मुख आहे अशा ज्ञानी जीवाची परपरिणती होत नाही. परमाणू प्रमाणे जेव्हा हे आत्मतत्त्व एकत्वरूपाने भावले जाते. तेव्हा पराशी सम्पृक्त होत नाही आणि जेव्हा परद्रव्याशी संपर्कता राहत नाही तेव्हा आत्मा विशुद्ध होतो.

स्वयं आपल्या सृष्टीचे निर्मापक–

स्वतःच्या हितासाठी उच्च गोष्टींचा विचार करतो, मोठमोठे उद्यम करतो. पण हे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत. वास्तविक आपली सृष्टी तर आपल्या परिणामांच्या अनुकूल होते.

ज्याप्रमाणे हा आत्मा स्वयंच सरागभावाने परिणमन करून कर्मबंधाचे कारण होतो. त्याचप्रमाणे जर तो अभेदरत्नत्रयरूप स्वात्मानुभवरूपाने आपल्या

शुद्धपरिणतीला करेल तर स्वयं परमात्मस्वरूप होईल. ज्याप्रमाणे सराग अवस्थेमध्ये स्वयंच कर्ता, कर्म, करण आहे. त्याप्रमाणे वीतराग अवस्थेमध्ये सुद्धा स्वयंच कर्ता-करण कर्मरूप आहे. जर आम्हाला निजानंदाचा भोग करायचा असेल तर आम्हाला पुरुषार्थ करून आपल्या अभेद रत्नत्रयस्वरूपाने परिणमन केले पाहिजे. आमचेच परिणमन शुद्धतेकडे वाढत वाढत एक दिवस पूर्ण शुद्धरूप परिणमनरूपी फलाला उत्पन्न करेल. ज्ञानमात्र आत्म्याच्या जवळ राहू तर सर्व संसार संकटापासून मुक्त होऊ.

शुद्धदृष्टी-

शुद्धदृष्टीचा अर्थ शुद्ध परिणती नाही, परन्तु केवळ एक द्रव्याची दृष्टी शुद्धदृष्टी आहे. आम्ही एकाला पाहत आहोत, विभाव चाललेत तरी एकाला पाहत आहोत. स्वभावामध्ये आहे तरी एकालाच पाहत आहोत. एकाला पाहण्याची दृष्टी शुद्धदृष्टी आहे. जगातील जीव स्वतंत्रदृष्टी सोडून संयोगदृष्टी, संबंधदृष्टी परस्पर स्वस्वामित्वदृष्टीनेच सर्व काही जाणतात आणि ह्याच विकल्पांमुळे चारी गतींमध्ये भटकतात. दृष्टीदोषामुळे परिस्थिती अशी कठीण झाली आहे की शरीरात अडकून क्षणामध्ये कीड्या, मुंग्यामध्ये जाऊन जन्मतो.

संकटाचे मूळ कारण भ्रम आहे. अज्ञान, दृष्टिदोष आहे. पराच्या प्रती हा माझा, हे मी अशा प्रकारच्या कल्पना आहेत. कल्पना भ्रमच तर आहे. या भ्रमामुळेच सर्व संकटे उभी राहिली आहेत.

एका सेठजींच्या घरी धोबीण त्यांचे धुतलेले कपडे घेऊन आली. त्याच्या आदल्या दिवशी धोबिणीच्या गाढविणीचे पिल्लू मेले होते. त्यामुळे ती रडत होती. तिने त्या पिल्लाचे नाव गंधर्वसेन ठेवले होते. सेठजींनी विचारले, 'तू का रडतेस?' धोबीण म्हणते, 'तुम्हाला माहित नाही, मी मोठ्या संकटात आहे. गंधर्वसेनजी मेले.' सेठजी म्हणाले, 'काय गंधर्वसेन मेले?' तिने 'हो' म्हटले. पूर्वीच्या काळी केवळ आपल्या घरचाच नव्हे तर गावातील कोणी प्रतिष्ठित व्यक्ती मेला तर दाढी व केस काढत होते. सेठजींनी मुंडन केले. एका शिपायाने सेठजींना विचारले, 'काय झाले ? मुंडन का केले ?' सेठजी म्हणाले, 'तुला माहीत नाही? गंधर्वसेनजी मेले.' शिपायांने ही मुंडण केले. त्याचप्रमाणे ठाणेदाराने शिपायाला विचारले. त्याच्या सांगण्यावरून ठाणेदारांने ही मुंडण केले. कोतवालाने ठाणेदारास विचारले व त्यानेही मुंडण केले. त्याचप्रमाणे देखादेखी तहसीलदार, कलेक्टर, मंत्री आदी सर्वांनी मुंडन केले. राजसभेमध्ये

राजांनी पाहिले की सर्वांनी मुंडण केले आहे. काय झाले आहे? तेव्हा लोकांनी सांगितले, 'महाराज, गंधर्वसेनजी महाराज मरण पावलेत.' तेव्हा राजाने विचारले, 'गंधर्वसेन महाराज कोण होते ?' सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले. राजांनी विचारले ही गोष्ट कोणी सांगितली की गंधर्वसेनजी मरण पावले ? कोतवाल म्हणाला ठाणेदाराने सांगितले, ठाणेदार म्हणाला शिपायाने सांगितले, शिपाई म्हणाला सेठजींनी, सेठजी म्हणाले धोबिणीने सांगितले. धोबिणीला सभेत बोलावले व विचारले 'गंधर्वसेनजी कोण होते?' धोबिण हात जोडून म्हणाली, 'महाराज, आपल्याला माहीत नाही तेच आमचा एक सहारा होते, ज्याच्यामुळे आमचे काम चालत होते, ते आमच्या गाढविणीचे पिल्लू होते. त्याचे नाव गंधर्वसेन होते ते मरण पावले.'

एका मूढतेमुळे सर्व गावात मूढता पसरली. सर्वांचे मुंडण झाले. त्याचप्रमाणे चारी गतीमध्ये आमच्यावर संकट ओढवले, त्याचे कारण केवळ भ्रम आहे. तथ्य काही नाही. मात्र भ्रमाचेच संकट आहे.

सर्व संकटातून मुक्त होण्याचा उपाय भ्रम दूर करून आपल्या एकत्वस्वभावाचे दर्शन आहे. श्रद्धान आहे, अवलम्बन आहे, दुसरा कोणता उपाय नाही.

मी अद्वैत पुरुष स्वतःमध्ये सुरक्षित आहे अशाप्रकारे एकत्वाच्या भावनेमध्ये जो उपयोग लावतो तो सर्व संकटापासून दूर होतो.

आपल्या पर्यायांचा आत्माच कर्ता आहे. ते पर्याय आपल्याद्वारेच केले जातात. आपल्यासाठीच केले जातात. आपल्यालाच केले जाते अशाप्रकारे निश्चय करणारे, भावना करणारे ज्ञानीजन पर्यायांमध्ये संकीर्ण होत नाहीत. परिणतीमध्ये आत्मबुद्धी करीत नाहीत. त्यांची दृष्टी एकमात्र आत्म्यावर पोहचली आहे. त्यामुळे ते कोणत्या पराबरोबर आणि पर पर्यायांमध्ये अनुरक्त न होता एकमात्र स्वतत्त्वावर दृष्टी लावतात. ते या संकटातून तरतात व सुविशुद्ध होतात.

गेल्या ३४ गाथांमध्ये आचार्यांनी सामान्यद्रव्याचे वर्णन करून त्यासंबंधी भेदभावना भावली आहे. कारण वस्तूस्वरूपाचे अध्ययन याच एका प्रयोजनाने केले जाते की शुद्ध वस्तू आपल्याला प्राप्त व्हावी. बाजारात सामान आणायला गेल्यावर असली वस्तूचाच आपण शोध घेत असतो. रस्त्यावर बसणारे विक्रेते माल दाखवित असले तरी तिकडे आपण पाहतसुद्धा नाही.

कारण आपल्याला माहीत आहे की रस्त्यावर सर्व नकली माल विकला जातो. उत्तम वस्तू उत्तम दुकानात प्राप्त होते म्हणून चांगले दुकान पाहून तेथे प्रवेश करतो.

त्याप्रमाणे वस्तूचे असली स्वरूप काय आहे ते ओळखून नकली वस्तू अर्थात् परसंयोगजनित भाव आहे. असमानजातीय मनुष्यादी द्रव्यपर्याय म्हणजे वस्तूचे नकली रूप. वास्तविक वस्तूतर पर संयोग विरहित, पर्यायभेद, रहित एक अखंड द्रव्य आहे. त्या शुद्ध द्रव्याचे स्वरूप सांगून या प्रकरणाचा उपसंहार केला. आता हाच भाव आचार्य अमृतचन्द्र आपल्या कलशामध्ये भरतात.–

द्रव्यान्तरव्यतिकरादपसारितात्मा –
सामान्यमज्जितसमस्तविशेषजातः।
इत्येष शुद्धनय उद्धतमोहलक्ष्मी –
लुण्टाक उत्कटविवेकविविक्ततत्त्वः।।७।।

अन्वयार्थ– (द्रव्यान्तरव्यतिकरात्) अन्य द्रव्याच्या मिश्रणापासून **(अपसारितात्मा)** ज्यांनी आत्म्याला दूर केले व **(सामान्यमज्जित–समस्तविशेषजातः)** सर्व विशेषांच्या समूहाला सामान्यामध्ये मग्न केले **(इति एषः)** असा जो हा **(उद्धतमोहलक्ष्मीलुण्टाकः)** उद्धत मोहाच्या लक्ष्मीला लुटणारा **(शुद्धनयः)** शुद्धनय आहे त्याने **(उत्कटविवेकविविक्ततत्त्वः)** उत्कट भेदज्ञानाच्या द्वारे आत्मतत्त्वाला वेगळे केले.

अन्यद्रव्यापासून भिन्नत्व–

शुद्धनय हे एका ज्ञानाचे नाव आहे. ज्या पर्यायाद्वारे वस्तूचे शुद्धस्वरूप जाणले जाते त्या ज्ञानपर्यायालाच शुद्धनय म्हटले आहे. या दृष्टीने वस्तू बेजोड व बेतोड आहे. यामध्ये अन्य काही मिसळले जाऊ शकत नाही व एका वस्तूतील काही वेगळे केले जाऊ शकत नाही.

प्रत्येक वस्तू स्वयंच आपल्या पर्यायाचा कर्ता आहे. कर्म आहे. कारण आहे. एका वस्तूची दुसरी वस्तू नाही. एका वस्तूच्या पर्यायाचा कर्ता अन्यद्रव्य नाही. अन्यद्रव्य पर्याय त्याचे कर्म नाही. एका वस्तूच्या क्रियेचे साधन

अन्य द्रव्य नाही. हे शुद्धनय दाखवून देतो. शुद्धनयदृष्टीने जेव्हा अन्य वस्तूला जाणतो तेव्हा हे ज्ञान होते की ही सुद्धा एक वस्तू आहे. पण ही माझ्यापासून भिन्न आहे. ती वस्तू स्वयं स्वतःचा कर्ता, कर्म, करण आहे. मी त्याचा कर्ता नाही, कर्म नाही, करण पण नाही. मी आपल्या पर्यायांचा कर्ता आहे. कारण त्या माझ्याकडूनच केल्या गेल्या आहेत. आपल्याकरिताच केल्या गेल्या आहेत. आपल्यामध्येच केल्या गेल्या आहेत. अशा प्रकारे निश्चय करणारे ज्ञानी लोक परपरिणतीमध्ये आत्मबुद्धी करीत नाहीत. कारण त्या भावनांमध्ये दृष्टिमात्र एक आत्मस्वरूपामध्ये पोहचली आहे. या शुद्धनयदृष्टीमध्ये दुसऱ्या पदार्थाच्या कोणत्याही परिणतीला पाहून अंतरंगामध्ये आकुलता उत्पन्न होत नाही. जे झाले ते ठीक आहे, जे होते ते ठीक होत आहे. याचे परिणमन आहे त्यात माझे काय ? आम्ही स्वतःला समजदार बनविले. सावधान केले तर आम्ही शांती प्राप्त करू शकतो. बाह्यदृष्टी करून जर त्यामध्ये वाहत गेलो तर आम्ही शांती प्राप्त करू शकत नाही. म्हणून वास्तविक आपली आपल्यावर मोठी जबाबदारी आहे. दुसऱ्याची जबाबदारी आपल्यावर नाही. दुसरा कोणी सहायक नाही. आपण आपल्या हिताचा विचार करणे, चिंतन करणे ही सर्वात मोठी गोष्ट आहे.

मोहाची उद्धतता–

दुसऱ्या द्रव्याशी संबंध मानणे अर्थात् आपल्यापासून भिन्न दुसऱ्या वस्तूला आपले मानणे हाच मोह आहे. संबंध मानल्यामुळेच आकुलता आहे. परवस्तूशी आपला संबंध मानणे, पराला आपला अधिकारी मानणे, यालाच मोह अथवा अज्ञान म्हणतात. हा मोहभाव उद्धत आहे, उद्दण्ड आहे तो या प्रभूवर सवार झाला आहे. हे आत्मन्, कोठे तुझे सहज ज्ञानस्वरूप, कुठे तुझी प्रभुता, किती तुझे स्वतःचे मोठेपण, कसा तुझा ज्ञायकभाव. जो सर्व विश्वाला जाणतच राहो, कुठे तुझे परमात्मस्वरूप, व आज कशी तुझी अवस्था झाली, कोणी प्रभू झाड झाला आहे. तर कोणी प्रभू कीटपतंग, तर कोणी गाढव, डुक्कर, कोणी माकड तर कोणी मानव, कोणी देव तर कोणी दानव बनला आहे. कोणी कापला जात आहे तर कोणी खाल्ला जात आहे. कशी ही प्रभूची विडंबना ? कोणी केली ? ही दुसऱ्या कोणी केली नाही. या मोहाचीच ही

करतूत आहे. कोणी परद्रव्यामध्ये काही करीत नाही. प्रत्येकजण आपल्या स्वतःमध्येच आपल्या कषायानुसार विकल्प करीत राहतो. एक मुलगा दुसऱ्या मुलाला वेडवाण दाखवितो. आपले तोंड वाकडे तिकडे करतो. ते पाहून दुसरा मुलगा आपल्यामध्ये विकल्प करतो. त्याने मला वेडवाण दाखविले, त्याचे मी पाहून घेतो. ज्यांनी तोंड वाकडे केले त्यांनी आपल्यामध्ये परिणती केली. पण समजतो की मी त्या दुसऱ्यामध्ये परिणती केली. त्या दुसऱ्याला दुःख देतो. दुसरा मुलगा स्वतःमध्येच विकल्प करून दुःखी होतो, पण मोहाने मानतो की त्याच्यामुळे मी दुःखी झालो. त्यांनी मलाच वेडवाण दाखविले. सर्वजण आपापल्या मोहाने अर्थात अज्ञानाने दुःखी आहेत.

मोहलक्ष्मीलुण्टाक शुद्धनय–

अशा या उद्धत मोहाच्या वैभवाला लुटणारा शुद्धनय आहे. शुद्धनय वस्तुस्वरूप दाखवून देतो की बाबांनो, कोणी कुणाला बदलू शकत नाही. प्रत्येक द्रव्य आपापल्या मध्येच परिणत होत आहे. शुद्धनयाच्या दृष्टीमध्ये परपरिणतीचा उच्छेद होतो. कारण तेथे पराश्रय राहत नाही. जे पराच्या प्रभावाने विकल्प उत्पन्न होतात त्यांचा उच्छेद होतो. परपरिणतीचा उच्छेद झाल्यामुळे कर्ता कर्म आदि भेदांच्या भ्रांतीचा नाश होतो. परस्परांमध्ये एक दुसऱ्या पदार्थाबरोबर कर्ताकर्म बुद्धी झाली आहे त्याचा ध्वंस होतो. मी परद्रव्याचा कर्ता होतो, मी दुकान चालवतो, मी मुलाला असे करतो, तसे करतो या कर्तृत्वबुद्धीचा नाश झाला की आपोआप हा शोध लागतो की मी स्वयं स्वतःचा कर्ता आहे, मीच माझ्या परिणतीचे साधन आहे. माझ्या परिणतीद्वारे मीच प्राप्य आहे. अर्थात मीच कर्ता, कर्म, करण व कर्मफल आहे. हा शोध लावणारा शुद्धनयच आहे.

शुद्धनयाचा प्रताप–

शुद्धनय केवळ परद्रव्यापासूनच वस्तूला पृथक करतो असे नाही. तर तो वस्तूच्या सर्व विशेषांना सामान्यामध्ये अंतर्लीन करतो. शुद्धनयदृष्टीने सामान्यामध्ये संपूर्ण विशेषांचा समूह मग्न आहे अर्थात वस्तूमध्ये गुणभेद अथवा पर्यायभेद नाही. यद्यपि वस्तूमध्ये अनंत सामान्यगुण व अनंत विशेष गुण आहेत व अनादि अनंत पर्यायांचा समूह म्हणजेच द्रव्य आहे. परंतु ते गुण किंवा पर्याय वस्तूला खंडित करीत नाहीत. ते सदैव अभेदरूपाने वस्तूमध्ये गुण्यागोविंदाने राहतात. त्यांना माहीत आहे आपण जर वस्तूशी फुटीर वृत्ती केली तर आपली

काही धडगत नाही. अर्थात त्या सर्व गुणांनी व पर्यायांनी आपले अस्तित्त्व वेगळे न ठेवता वस्तूला सर्वस्व समर्पण केले आहे. आम्ही एकवटून राहण्यातच आपली शान आहे. शुद्धनय त्या सर्वांना एक सामान्य अस्तित्वामध्ये अंतर्भूत करतो. अनंत गुण व अनंत पर्यायांवर एक अखंड वस्तू राज्य करीत आहे. ज्याप्रमाणे अनेक राण्या एका राजाशी एकरूप होऊन राहतात तर त्यांचे सौभाग्य टिकून राहते. जर त्यामध्ये कोणी तक्रार करून वेगळी झाली तर तिची दुर्दशा झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून सर्वजणी एकाधिपत्य स्वीकारून राजाला समर्पित होतात स्वतःचे वेगळे अस्तित्व ठेवत नाहीत तर त्या सुखी राहतात. त्याप्रमाणे एका द्रव्याचे अनंत पर्याय द्रव्यामध्ये अंतर्लीन होतात, द्रव्याला आपले समर्पण करतात त्यातच त्यांची शोभा आहे. द्रव्य अनंत गुण व अनंतपर्यायांचा अखण्ड पिंड आहे. हे शुद्धनय दाखवून देतो.

शुद्धनयदृष्टीमुळे जीवाला परद्रव्याचा संपर्क होत नाही व पर्यायाने संकुचित होत नाही. त्यामुळे जीव सुविशुद्ध होतो.

आता शुद्धनयाद्वारे शुद्ध आत्मस्वरूप प्राप्त करण्याऱ्या आत्म्याची महिमा सांगण्यासाठी अमृतचन्द्र आचार्य कलशाची रचना करतात–

इत्युच्छेदात्परपरिणतेःकर्तृकर्मादिभेद –
भ्रान्तिध्वंसादपि च सुचिराल्लब्धशुद्धात्मतत्त्वः
सञ्चिन्मात्रे महसि विशदे मूर्च्छितश्चेतनोयं
स्थास्यत्युद्यत्सहजमहिमा सर्वदा मुक्त एव।।८।।

अन्वयार्थ – (इति) अशाप्रकारे **(परपरिणतेः उच्छेदात्)** पर परिणतीच्या उच्छेदामुळे **(च)** आणि **(कर्तृकर्मादिभेदभ्रान्तिध्वंसात्)** कर्ता कर्म इत्यादी भेदांच्या भ्रांतीचा नाश झाल्यामुळे **(सुचिरात्)** दीर्घकाळानंतर **(लब्धशुद्धात्मतत्त्वः)** ज्याने शुद्ध आत्मतत्त्वाला प्राप्त केले आहे, असा **(उद्यत्सहजमहिमा)** विकासमान सहज महिमायुक्त **(अयं चेतनः)** हा चेतन आत्मा **(सञ्चिन्मात्रे)** चैतन्यमात्ररूप **(विशदे)** निर्मल **(महसि)** तेजामध्ये **(मूर्च्छित)** लीन होत **(सर्वदा मुक्त एव)** सर्वदा मुक्तच राहतो.

परपरिणतीचा उच्छेद–

शुद्धनयाच्या बोधामुळे वस्तुस्वातंत्र्याची प्रतीती झाली. त्यामुळे पराच्या निमित्ताने होणारी मोहरागद्वेषरूप विभावपरिणती नष्ट झाली. परद्रव्य माझ्यामध्ये परिणमन करू शकत नाही. मीच माझ्या अज्ञानामुळे विभाव

परिणामरूपाने परिणमतो. ही आपली चूक कळाली. त्यामुळे आत्मा पराचा प्रभाव आपल्यावर करून न घेता स्वस्वरूपावर दृष्टी ठेवतो. परपरिणतीला रोखण्यासाठी पुन्हापुन्हा आपल्या पौरुषाला जागृत करतो. त्यासाठी ज्ञानभावना करतो. राग, द्वेष, मोह, क्रोध, मान, माया व लोभापासून वाचण्याचा उपाय ज्ञानभावनेशिवाय अन्य काही नाही.

आम्ही खूप अभ्यास करतो, पूजा करतो, स्वाध्याय करतो, व्रत आदि करतो, दृष्टीसुद्धा ठीक करण्याचा प्रयत्न करतो तरी पण परपरिणतीला प्राप्त होतो ही खेदाची गोष्ट आहे. त्यासाठी ज्ञानभावना महत्त्वाची आहे. 'मी ज्ञानमात्र तत्त्व आहे, जेवढ जाणणे आहे तेवढेच माझे काम आहे, यापुढे माझे काहीही कार्य नाही. हा ज्ञानमात्र आत्मा आपल्या ज्ञानप्रदेशांमध्ये आनन्दाचा अनुभव करतो. एवढाच मी आहे. हीच वस्तू माझी आहे. त्याच्या बाहेर मी नाही अशाप्रकारे ज्ञानभावनेचे पोषण झाले तर सर्व रागादी विपत्ती दूर होतात. समाधिशतकामध्ये पूज्यपाद आचार्य सुद्धा हाच उपाय सांगतात.

यदा मोहात्प्रजायेते रागद्वेषौ तपस्विनः ।
तदैव भावयेत्स्वस्थमात्मानं शाम्यतः क्षणात्।।

जेव्हा तपस्वीला सुद्धा मोहामुळे रागद्वेष उत्पन्न होतात तेव्हा त्याने स्वस्थ आत्म्याची भावना करावी. त्यामुळे एका क्षणात रागद्वेष शांत होतात. अशाप्रकारे ज्ञानाभ्यासाने परपरिणतीचा उच्छेद होतो.

भ्रमबुद्धीचा अभाव –

तसेच शुद्धनयदृष्टीमुळे कर्ताकर्माची जी भ्रमबुद्धी आहे ती नष्ट होते. अज्ञानामुळे पराला आपले मानले होते त्यामुळे त्याचे सर्व कर्तृत्व स्वतःच्या शिरावर घेतो. मी कुटुंबाचे पालनपोषण करतो. मुलाबाळांचे संवर्धन करतो. मी दुकान चालवतो. मी कोणत्याही परवस्तूची अमुक क्रिया करतो. प्रथम या मिथ्यामान्यतांचा नाश करून स्वतःमध्ये हा शोध लावायचा आहे की मी स्वयं स्वतःच्या परिणतीला करतो. माझ्या द्वारेच करतो, माझ्या परिणतीद्वारे मीच प्राप्य आहे. म्हणून मीच कर्ता आहे, मीच करण आहे, मीच कर्म आहे व मीच कर्मफल आहे. ती क्रिया कोणती की ज्या क्रियेचा मीच कर्ता, कर्म, करण आहे ? ती क्रिया आहे जाणणेरूप क्रिया. मी कुणाला जाणतो ? तर जाणणाऱ्यालाच जाणतो. जाणणे क्रियेचा प्रयोग ज्ञानगुणावरच होतो. ज्याप्रमाणे समोर आरसा आहे आणि पाठीमागे दोनचार मुले उभी आहेत. कोणी हात उचलतो, कोणी

वेडवान दाखवितो, कोणी पाय उचलतो. अन्य अन्य क्रिया करतो, परंतु आम्ही आरशालाच पाहत आहोत, आणि सांगतो की तो मुलगा हात उचलतो, वेडवान दाखवितो इत्यादी. आम्ही त्यांना पाहत नाही, केवळ आरशालाच पाहतो. त्या आरशाला पाहताना ते सर्व स्वयं दिसतात. त्याप्रमाणे आम्ही केवळ जाणणाऱ्या या आत्म्यालाच जाणतो. परपदार्थांना जाणत नाही. आत्म्याला जाणत असतानाच या परपदार्थांचे ज्ञान होते. त्यामुळे निश्चयाने परपदार्थांना जाणण्याचे कर्तृत्व ही आत्म्यामध्ये नाही. शुद्धदृष्टीमुळे परामध्ये कर्तृकर्मत्वाचा भ्रम दूर होतो.

चिरप्रतीक्षित शुद्धात्मोपलब्धी–

परकर्तृत्वबुद्धीचा नाश झाल्यामुळे दीर्घकाळापासून ज्याची आम्ही प्रतीक्षा करीत होतो त्या शुद्धात्मतत्त्वाची प्राप्ती होते. प्रवासाने थकलेला जीव कोठेतरी विसाव्याचे स्थान शोधत असतो. असे स्थान शोधतो की जेथे मला कोणी अडथळा करणार नाही, कोणी उठवणार नाही. जेथे कोणतीही बाधा नाही. व जे स्थान पराधीन नाही. असे स्थान सापडले की तो तेथे निश्चित होऊन पहुडतो व सर्व दुःख विसरून जातो. शांत होतो. त्याप्रमाणे अनादिकाळापासून चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये फिरून थकलेला हा जीव विश्रान्तीचे स्थान शोधत राहतो. कोठेतरी असे स्थान मला मिळावे की जेथे मी शांत विश्रांती घेऊ शकतो. जेथे कोठे विश्रान्त होण्याचा प्रयत्न करतो तेथे सर्व अडथळा, बाधा, संकटे उपस्थित होतात जेव्हा त्याला आपले शुद्धात्मस्वरूप प्राप्त होते तेव्हा निराबाध निराकुल शान्त स्थान प्राप्त झाल्यामुळे तेथेच विश्रान्ती घेतो. ज्याप्रमाणे वाऱ्याचे निमित्त प्राप्त करून पताका स्वतःमध्येच गुंतते व स्वयं स्वतःच त्यातून सुटते त्याप्रमाणे हा जीव विकाररूप झाल्यामुळे संसारात गुंततो ज्ञान झाल्यामुळे स्वतःच त्यातून मुक्त होतो.

जेव्हा शुद्धनयाची दृष्टी होते तेव्हा त्याच्या प्रतापाने परपरिणतीपासून मुक्त होतो, कर्तृकर्मभावरूप भ्रमबुद्धीपासून दूर होतो व आपल्या शुद्धात्मतत्त्वाची प्राप्ती करतो. त्याच आपल्या चैतन्याच्या निर्मल तेजामध्ये लीन होतो त्यामुळे सर्व संकटांपासून मुक्त होतो. आपल्या एकत्वाच्या भावनेमध्ये जे व्यस्त होतात ते सर्व संकटांपासून दूर होतात.

सर्वापासून मुक्त होण्याचा उपाय आपल्या एकत्वस्वभावाचे दर्शन श्रद्धान व अवलम्बन आहे, दुसरा कोणताही उपाय नाही.

१२६ गाथेपर्यंत द्रव्यसामान्याचे वर्णन केले. जयसेन आचार्यांनी दुसऱ्या अधिकाराला चार महाधिकारामध्ये विभक्त केले आहे. १) द्रव्यसामान्यवर्णन २) सामान्य भेदभावना ३) द्रव्यविशेषवर्णन ४) विशेष भेदभावना. आतापर्यंत यातील दोन अधिकारांचे वर्णन झाले. आता पुढे द्रव्यविशेषाचे वर्णन प्रारम्भ करणार आहेत. या मधल्या संधीला अमृतचन्द्र आचार्यांनी अत्यंत सुंदरशैलीमध्ये प्रस्तुत केले आहे ते याप्रमाणे

द्रव्यसामान्यविज्ञाननिम्नं कृत्वेति मानसम् ।
तद्विशेषपरिज्ञानप्राग्भारः क्रियतेऽधुना ।।९।।

अन्वयार्थ –(इति) अशाप्रकारे **(द्रव्यसामान्यविज्ञाननिम्नं मानसं कृत्वा)** द्रव्य सामान्याचे विज्ञान ज्याच्या मूळामध्ये आहे असा मनोभाव करून **(अधुना)** आता **(तद्विशेषपरिज्ञानप्राग्भारः)** द्रव्यविशेषाच्या विज्ञानाचा विस्तार **(क्रियते)** केला जातो.

आतापर्यंत जे द्रव्य सामान्याचे वर्णन केले त्यासंबंधीचे ज्ञान मनामध्ये धारण करावे कारण जोपर्यंत सामान्याचे ज्ञान होत नाही तोपर्यंत विशेषाचे ज्ञान कार्यकारी नाही. ज्याला सामान्य वस्त्र माहीत नाही त्याला हे पॉलीस्टरचे आहे की कॉटन आहे की नायलॉन आहे याचे विशेष ज्ञान होत नाही. पॉलीस्टरपणा, कॉटनपणा, नायलॉनपणा कोठे पाहणार ?

असे मन बनवा की ज्या मनावार विशेषस्वरूपाची गोष्ट बिंबवली जात आहे त्या मनाच्या खाली द्रव्यसामान्याचे ज्ञान असले पाहिजे. प्रथम सामान्य चित्र काढून नंतर त्यावर सजावट केली जाते. त्याप्रमाणे आता द्रव्यविशेषाच्या वर्णनाद्वारे द्रव्य सामान्य ज्ञानाचा शृंगार केला जात आहे. द्रव्यविशेषाला समजत असताना द्रव्यसामान्याची नीति विसरू नये. द्रव्यसामान्याच्या नीती ६ सामान्य गुणांमध्ये अन्तर्निहित आहेत. अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, अगुरुलघुत्व. प्रदेशवत्त्व आणि प्रमेयत्व हे द्रव्याचे मूलधन आहे.

ज्याप्रमाणे कोणी व्यापारी बाहेर व्यापार करायला जातो. मोठा व्यापार करतो. परंतु आपल्या गाठीमध्ये मूळधन लपवून ठेवतो. अन्य सर्व व्यापार करीत असताना सुद्धा मूळधनाला धक्का लावत नाही. त्या मूळ भांडवलावरच मोठा व्यापार करून श्रीमंत बनतो. त्याप्रमाणे वस्तूस्वरूपाचा ज्ञाता द्रव्यसामान्याच्या ज्ञानाला आपल्या गाठीशी बांधून द्रव्यविशेषाच्या ज्ञानाचा व्यापार करतो. त्या ज्ञानामुळे तो वस्तूच्या स्वतंत्रतेला व त्याच्या स्वरूपसंपदेला

जाणून विशेष मर्मज्ञ होतो. सर्वज्ञ होतो.

ज्याप्रमाणे बिल्डिंगचा पाया तळाशी मजबूत झाल्याशिवाय बिल्डिंग उभारू शकत नाही, उभारली तरी ती तग धरू शकत नाही. 'पाया भरीव ज्याचा, प्रासाद भव्य त्याचा' त्याप्रमाणे द्रव्यसामान्याचे ज्ञान हे वस्तूविज्ञानाचा मूळ पाया आहे व द्रव्यविशेषाचे ज्ञान ही त्यावर उभारलेली डौलदार बिल्डिंग आहे. द्रव्यसामान्याच्या आधारावर ती डगमगत नाही, ती आनंदाने उभी राहते. ज्याला द्रव्यसामान्याचे यथार्थ ज्ञान नाही त्याला द्रव्यविशेषाचे यथार्थ ज्ञान होऊ शकत नाही. म्हणून प्रथम द्रव्यसामान्याचे वर्णन करून आता त्यानंतर द्रव्यविशेषाचे वर्णन करतात. याला हृदयंगम करून आता पुढील गोष्ट ऐका.

आता द्रव्यविशेषाचे वर्णन करतात. प्रथम द्रव्यसामान्याचे जीव-अजीव असे विशेष भेद करून विवरण करतात.

दव्वं जीवमजीवं जीवो पुण चेदणोवओगमओ ।
पोग्गलदव्वप्पमुहं अचेदणं हवदि य अज्जीवं ।।१२७।।

अन्वयार्थ-(दव्वं) द्रव्य **(जीवमजीवं)** जीव आणि अजीव आहे. **(पुण)** पुन्हा त्यापैकी **(चेदणोवओगमओ)** चेतनास्वरूप ज्ञानदर्शन उपयोगमय **(जीवो)** जीव आहे. **(च)** आणि **(पोग्गलदव्वप्पमुहं)** पुद्गलद्रव्य ज्यामध्ये प्रमुख आहे असे **(अचेदणं)** अचेतन द्रव्य **(अज्जीवं)** अजीव **(हवदि)** आहे.

तात्पर्य – द्रव्याचे दोन प्रकार आहेत. जीव आणि अजीव. त्यामध्ये चेतनस्वरूप जीव आहे आणि अचेतनस्वरूप पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल अजीव आहेत.

एकत्वाला कारणभूत द्रव्यत्वसामान्य-

जगामध्ये जितके पदार्थ आहेत त्या पदार्थांमध्ये एकता आहे. या एकत्वाचे कारण आहे द्रव्यत्वसामान्य. द्रव्याचे सामान्य वर्णन १) वस्तू आहे २) आपल्या वस्तुरूपाने आहे ३) निरन्तर आपल्या परिणमन शक्तीने परिणमते ४) आपल्यामध्येच परिणमते, परामध्ये नाही ५) ती आपल्या प्रदेशांना घेऊन आहे व ६) कोणत्या ना कोणत्या ज्ञानाचा विषय आहे. वस्तू द्रव्यगुणपर्यायस्वरूप व उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे हे सर्व वस्तूमध्ये साधारण स्वरूप आहे. कोणी या जगामध्ये व्यापक एक ब्रह्म आहे असे म्हणतात. सत्त्व, द्रव्यत्व सर्वत्र एक आहे. व्यापक आहे. यालाच ब्रह्माचे रूप देऊन टाकले. द्रव्यत्वाच्या दृष्टीने, अस्तित्वाच्या दृष्टीने सर्व काही एक आहे. म्हणून

एकत्वाचे कारणभूत तत्त्व आहे द्रव्यत्वसामान्य. या द्रव्यत्वसामान्याला न सोडता द्रव्याच्या विशेष लक्षणाचा पण सद्भाव आहे. जेव्हा द्रव्यत्वसामान्य सांगितले जाते तेव्हा एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यापासून वेगळे होत नाही. जेव्हा विशेषगुण सांगतो तेव्हा एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यापासून भिन्न होते.

अन्योन्यव्यवच्छेदाचे कारण विशेष गुण –

जेव्हा द्रव्याचे विशेष गुण जाणले जातात तेव्हा एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यापासून वेगळे होते. द्रव्यांच्या विभक्तिकरणाला कारण त्याचे विशेष गुण आहेत. द्रव्यसामान्याला न सोडता त्यामध्ये विशेषगुण पाहिले तर द्रव्याचे दोन भेद आहेत. १) जीव व अजीव. द्रव्य दोन नाहीत. त्याचे प्रकार दोन आहेत. जीवद्रव्याची आत्मद्रव्य ही एकच व्यक्ती आहे. अजीवाचे पुन्हा पुद्गलद्रव्य, धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, कालद्रव्य व आकाशद्रव्य हे पाच भेद आहेत. वास्तविक द्रव्याच्या सहा जाती आहेत. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल यामध्ये अजीवाचे कोठे स्थान दिसत नाही. मग येथे द्रव्याचे जीव अजीव असे भेद कसे केले ?

ज्याप्रमाणे जैन व अजैन अशा दोन जाती आहेत. एक सदभावात्मक, दुसरी निषेधात्मक. अजैन नावाची कोणतीही जात नाही. पण जो जैन नाही त्या ब्राह्मण, ख्रिश्चन, लिंगायत, मुसलमान सर्वांना एका कोट्यात टाकले व त्याला 'अजैन' हे नाव दिले. कारण येथे प्रयोजन जैनांना ग्रहण करण्याचे आहे. म्हणून जो जिनांना मानतो तो जैन व शेष सर्व अजैन असे भेद केले. दुसरा कोणत्या जातीचा आहे हे जाणणे प्रयोजनभूत नाही. तो जैन नाही एवढेच येथे प्रयोजन पाहून सर्व जातींना दोनमध्ये विभागले. त्याप्रमाणे येथे जीवाला ग्रहण करणे प्रयोजनभूत आहे म्हणून जो चेतनात्मक आहे, ज्ञानदर्शनस्वरूप आहे तो जीव व ज्यामध्ये चेतना नाही, ज्ञान दर्शन नाही ते सर्व अजीव आहेत असा विभाग केला. अजीव नावाचे कोणते एक स्वतंत्र द्रव्य नाही.

जीव अजीवाचा विभाग करणारे विशेषलक्षण–

जीवाचे लक्षण चेतना उपयोगमयत्व हे आहे. अजीवाचे अचेतनत्व चेतनारहितपणा हे लक्षण आहे. जीवाच्या सर्व धर्मामध्ये चेतना व्याप्त असल्यामुळे ती स्वरूपत्वाने प्रकाशित होते. चेतना अविनाशी आहे. भगवती अर्थात पूज्य आहे. या चेतनागुणामुळे जीव सर्वश्रेष्ठ पूज्य आहे. चेतना संवेदनस्वरूप आहे. चेतना जीवाचा प्राण आहे. चेतनेमुळेच जीव सदैव जीवंत

आहे. तीच चेतना शुद्ध जीवामध्ये शुद्ध आहे व अशुद्धजीवामध्ये अशुद्ध आहे. उपयोग हा चेतनेचाच परिणाम आहे. तीच चेतना निश्चयनयाने केवलज्ञान केवलदर्शनमयी शुद्धउपयोगाने वर्तन करीत स्वतःला व सर्व लोकालोकातील तीन कालवर्ती द्रव्यांना त्यांच्या गुणपर्यायसहित जाणते व व्यवहाराने मतिज्ञान, श्रुतज्ञान आदिरूप चक्षुअचक्षु दर्शनउपयोगरूपाने परिणमन करीत द्रव्यांना परोक्षरूपाने त्यांच्या काही पर्यायासहित जाणते. याच चेतना व उपयोग गुणाद्वारे जीवद्रव्याची सत्ता भिन्नरूपाने झळकते.

ज्यामध्ये चेतना नाही व त्याचे ज्ञानदर्शन उपयोगाचे शुद्ध अशुद्ध व्यापार नाहीत ते अजीव आहेत. ते अजीव द्रव्य पाच प्रकारचे आहेत. स्पर्श-रस-गंध-वर्ण-रूप पुद्गलद्रव्य, गतिसहकारी धर्मद्रव्य, स्थितिसहकारी अधर्मद्रव्य, अवकाशसहकारी आकाशद्रव्य, परिणमनसहकारी कालद्रव्य. ही पाचही द्रव्ये चेतना व उपयोगाने शून्य आहेत.

द्रव्यामध्ये भेद करण्याचे प्रयोजन-

या जगामध्ये आपला आत्मा पुद्गलाबरोबर संबद्ध होत आहे. त्याची भिन्न सत्ता असतानासुद्धा अज्ञानीला तो भेद लक्षात येत नाही, त्या दोन्हींना एक मानून स्वतःला रागी द्वेषी व मोही व मनुष्यशरीररूपाने मानून बसतो. म्हणून आचार्य त्याला जीव भिन्न रूपाने प्रतिभासित होण्यासाठी सांगतात, 'तू जीव आहेस व जीवाचे लक्षण चेतना आहे म्हणून तू चेतनस्वरूप आहेस. हे स्पर्शरसगंधवर्णमय अचेतन शरीर तू नाहीस.' अज्ञानी जीव शरीराला स्व मानून व्यर्थ दुःखी होत आहे. प्रत्यक्ष व्यवहारात यांची भिन्नता लक्षात येते. एका सजीव प्राण्यामध्ये इंद्रियाने जाणण्याचा व्यापार होत आहे. जेव्हा तो जीवरहित होतो व केवळ शरीर राहते तेव्हा जीवासारखी सर्व इंद्रियादी रचना असतानासुद्धा जाणण्याचे कार्य होत नाही. यावरून सिद्ध होते की जाणणारा जीव आहे व ज्यामध्ये जाणणक्रिया होत नाही ते हे शरीर जडपुद्गलमय आहे. आपल्यामध्ये चैतन्यलक्षण पाहून स्वतःचा जीवरूपाने अनुभव करावा व चैतन्यलक्षणरहित अन्यपदार्थापासून स्वतःला भिन्न अनुभवावे. हा अनुभवच या जीवाला एक दिवस अजीवापासून भिन्न करून स्वाधीनता स्वतंत्रता प्राप्त करून देईल.

मागील गाथेत द्रव्याचे जीव-अजीव असे दोन भेद केले आता या गाथेमध्ये द्रव्याचा लोक अलोक असा विभाग करतात.

पोग्गलजीवणिबद्धो धम्माधम्मत्थिकायकालड्ढो ।
वट्टदि आगासे जो लोगो सो सव्वकाले दु ।।१२८।।

अन्वयार्थ– (आगासे) आकाशामध्ये **(जो)** जो भाग **(पोग्गलजीव–णिबद्धो)** पुद्गल आणि जीवानी निबद्ध आहे. तसेच **(धम्माधम्मत्थिकाय–कालड्ढो)** धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय आणि कालद्रव्याने युक्त आहे. **(सो)** तो **(सव्वकाले)** सर्वकाळामध्ये **(लोगो)** लोक **(वट्टदि)** आहे.

तात्पर्य – आकाशाच्या जेवढ्या क्षेत्रामध्ये जीव, पुद्गल, धर्म, अधर्म व कालद्रव्य आहे तो लोक आहे.

लोक अलोक विशेषाचा निश्चय–

द्रव्यामध्ये लोकत्व व अलोकत्व अशी विशेषता आहे. कारण आपापल्या लक्षणाचा सद्भाव आहे. सहा द्रव्यांचा समूहात्मक लोक आहे केवळ आकाशस्वरूपता अलोक आहे. इतरठिकाणी आकाशाचे दोन भेद केले जातात. लोकाकाश व अलोकाकाश. येथे द्रव्याचे विशेष लोकत्व व अलोकत्व केले आहे. समस्तद्रव्य लोक आहे व केवळ आकाश अलोक आहे.

अद्वैतपद्धतीच्या दृष्टीने जगातील सर्व पदार्थ एक आहेत ज्याला द्रव्य नावाने सांगितले आहे. सर्व साधारणवृत्तिस्वरूप द्रव्यत्व स्वरूपतः एक आहे. त्याच द्रव्याचे दोन प्रकार केले. लोकत्वविशिष्ट व अलोकत्वविशिष्ट. सहा द्रव्यांच्या समवायात्मकतेला घेऊन जो पिण्ड आहे त्याला लोकत्वविशिष्ट द्रव्य म्हणतात. केवळ आकाशात्मकपणाला अलोकविशिष्ट द्रव्य म्हणतात.

सर्व द्रव्यांमध्ये व्यापणारे परम महान आकाशद्रव्य आहे. त्या आकाशामध्ये जेथे जेवढ्या भागात जीव व पुद्गल गमन व स्थिती करतात. ते जेथे आहेत तेथे त्याग स्थितीला कारणभूत धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य आहेत. सर्व द्रव्यांच्या परिणमनाला निमित्तभूत कालद्रव्य नित्य दुर्ललित (निश्चितरूपाने) आहे. तेवढ्या आकाशाला व या सर्व द्रव्यांना ज्यांनी आत्मरूप केले आहे हे ज्याचे लक्षण आहे तो लोक आहे. लोक म्हटले की सर्व द्रव्यांचा समूह दृष्टीमध्ये आला पाहिजे न कि फक्त एवढे आकाश की ज्यामध्ये जीव राहतो, पुद्गल राहतो इत्यादि.

काय जीव आकाशात आहे ? पुद्गल, धर्म, अधर्म काल काय आकाशात आहेत ? जर पुद्गलादि आकाशाला सोडून अन्यत्र असतील व तेथून उचलून आकाशात आणले असतील तर असे म्हणणे योग्य आहे की

पुद्गलादी आकाशामध्ये आहेत. एकाला महान म्हणावे आधार म्हणावे व शेष द्रव्यांना आधेय म्हणावे अशी अनुदारता येथे नाही. स्वतन्त्रता आहे. ६ द्रव्यांचा समुदाय मात्र लोक आहे. केवळ जागेला लोक म्हटले नाही. धर्म, अधर्म अनादिकाळापासून आहेत, आकाशसुद्धा अनादिकाळापासून आहे. सर्व द्रव्य आपल्या क्षेत्रात आहेत. आकाशसुद्धा आपल्याक्षेत्रात आहे. म्हणून त्यामध्ये परमार्थदृष्टीने आधार आधेय भाव नाही. स्वरूपच आधार आहे व स्वरूपच आधेय आहे.

जेवढ्या आकाशामध्ये जीव पुद्गलांची गती व स्थिती संभव नाही. जेथे धर्म, अधर्म, कालद्रव्य अवस्थित नाही. तेवढ्या केवळ आकाशाला अलोक म्हणतात. येथे काळाला दुर्ललित म्हटले आहे. कोणी भयानक साप किंवा आणखीन काही जे आसपासच्या लोकामध्ये खळबळ माजवते त्यास दुर्ललित (हट्टी) म्हणतात. त्याचप्रमाणे कालद्रव्याचे निमित्त प्राप्त करून सहा द्रव्ये निरन्तर प्रतिक्षण परिणमन करतात. एक क्षणसुद्धा कोणी विश्राम करू इच्छितो तर करू शकत नाही.

सहा द्रव्यांचा समूहात्मक लोक आहे तर मी सुद्धा लोकाचा एक घटक आहे. लोकस्वरूप आहे. या सर्व लोकातील चैतन्य लोकच माझा लोक आहे. चिल्लोकामध्येच मी निवास करतो हा माझा चैतन्यलोक शाश्वत आहे. इतर लोकापासून माझा चैतन्यलोक भिन्न आहे. स्वपासून एकत्व व परापासून विभक्त अशा चैतन्यलोकामध्येच तू रहा. येथे तू विहार कर अन्य लोकामध्ये विहार करू नकोस. तेथे तुझे काही नाही. तुझे सर्वस्व तुझे चैतन्यच आहे असा अनुभव करणे हेच लोक अलोकाला जाणण्याचे फळ आहे.

द्रव्यविशेषप्रज्ञापन अधिकार चालू असल्यामुळे विविध गुणधर्मांच्या अपेक्षेने द्रव्यामध्ये भेद करतात. पूर्वी द्रव्यामध्ये जीव अजीव व लोक अलोक असा विभाग केला. आता द्रव्यामध्ये क्रियावती व भाववती शक्तीच्या निमित्ताने क्रियावान् व भाववान् असा भेद करतात –

उप्पादट्ठिदिभंगा पोग्गलजीवप्पगस्स लोगस्स ।
परिणामादो जायंते संघादादो व भेदादो ।।१२९।।

अन्वयार्थ – (पोग्गलजीवप्पगस्स लोगस्स) पुद्गल जीवात्मक लोकाचे **(परिणामादो)** परिणमनामुळे तसेच **(संघादादो व भेदादो)** संघातामुळे व भेदामुळे **(उप्पादट्ठिदिभंगा)** उत्पाद, ध्रौव्य आणि व्यय **(जायन्ते)** होतात.

तात्पर्य – प्रत्येक समयात द्रव्याचे परिणमन सुरू आहे. काही परिणमन क्रियात्मक आहेत तर काही परिणमन भावात्मक आहेत.

क्रियेचा अर्थ आहे– एका क्षेत्राहून दुसऱ्या क्षेत्राकडे जाणे किंवा येणे. तसेच त्यामध्ये काही हलनचलन होणे. या सर्व क्रियांना परिस्पंदरूप क्रिया म्हणतात.

भावाचा अर्थ आहे– द्रव्यामध्ये थोडेसुद्धा परिस्पंदन न होता आणि गमन न होता परिणमन होणे. भवनं भावः. परिणमन म्हणजे भाव.

क्रिया व भाव या दोन्हीमध्ये अन्तर हे आहे की क्रियेचे परिणमन गतिपूर्वक आहे व भावाचे परिणमन गतिपूर्वक नाही. परिणमन सर्व द्रव्यांमध्ये आहे. परिणमन द्रव्यांच्या द्रव्यत्व गुणामुळे आहे. द्रव्यत्व हा एक सामान्य गुण आहे, म्हणून तो सर्व द्रव्यांमध्ये आहे. त्या गुणाचे कार्य हे आहे की वस्तू स्थिर राहून प्रत्येक समयाला परिणमन करते.

जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश, काल या सर्व द्रव्यांमध्ये परिणमन प्राप्त होते. हे त्यांच्या भाववती शक्तीचे द्योतक आहे. म्हणून सहाही द्रव्ये भाववान् आहेत. परंतु क्रियावती शक्ती फक्त जीव व पुद्‌गल द्रव्यामध्येच आहे. म्हणून जीव व पुद्‌गल क्रियावान पण आहेत व भाववान ही आहेत. कारण या द्रव्यांमध्ये परिस्पंदन ही आहे व परिणामही आहे.

धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य संपूर्ण लोकाकाशामध्ये व्यापून आहेत व अवस्थित आहेत. त्यामुळे त्यांचे एका क्षेत्राहून दुसऱ्या क्षेत्राकडे गमन करणे संभवत नाही व एका जागी राहूनही त्यांच्यामध्ये प्रदेशांचे परिस्पंदन होत नाही. आकाशद्रव्य महाव्यापकच आहे, व निष्क्रिय आहे. धर्मअधर्म द्रव्याला अंत आहे; पण आकाश क्षेत्राला अंत नाही. कितीही पुढे गेले तरी तेथे जागा आहेच. म्हणून आकाशाला मर्यादा नाही. आकाशसुद्धा व्यापक आहे. तेथे क्रियेला अवकाश नाही. आता राहिले कालद्रव्य. कालद्रव्य एकप्रदेशी आहे. लोकाकाशाच्या एकेक प्रदेशावर एकेक कालाणू स्थित आहेत. जो ज्या प्रदेशावर अवस्थित आहे तो तेथेच अवस्थित आहे. त्यामध्ये अदलाबदल नाही. परिस्पंद नाही, क्रिया नाही. म्हणून धर्म, अधर्म, आकाश व काल द्रव्य क्रियावान नाहीत; पण भाववान् आहेत कारण त्यांच्यामध्ये केवळ परिणमनच आहे.

पुद्‌गल आणि जीवामध्ये क्रियेची सिद्धी–

पुद्‌गल आणि जीवामध्ये क्रिया अनैमित्तिक नाही. जर क्रिया स्वाभाविक

असेल तर जीव व पुद्‌गल निरन्तर चालतच राहिले पाहिजेत. जर त्यांची स्थिती झालीच नाही तर अधर्म द्रव्य बेकार होईल.

पुद्‌गल व जीवामध्ये क्रियाशीलपणाचे कारण आहे भेद व संघात. जसे आंबा एका जागेवर राहूनच काळ्याचा हिरवा होतो, हिरव्याचा पिवळा व पुन्हा काळा इत्यादी रंगरूप होतो अर्थात् भावपरिणमन होते. तसेच तुरट, आंबट, गोड इत्यादि रसरूपाने परिणमन करतो. हे भावपरिणमन होय.

आंबा फांदीपासून तुटला, पडला, चगाळ्यात घातला, तेथून काढून बाजारात नेला हे जे झाले ते क्रियारूप परिणमन आहे. पुद्‌गल परिस्पंदस्वभावी असल्यामुळे परिस्पंदाने वेगळे झालेले परमाणू संघाताने एकत्रित होत उत्पन्न होतात, नष्ट होतात व टिकतात. आणि एकत्रित पुद्‌गल वेगळे होत उत्पन्न होतात, नष्ट होतात व टिकतात.

झाडापासून कापूस वेगळा होतो. पुन्हा त्या कापसाच्या संघाताने सूत तयार होते. सूताच्या संघाताने कापड उत्पन्न होते. सूत नष्ट होते व त्यातील परमाणू कायम राहतात. ज्वारीमध्ये भेद होऊन पीठ बनते. पुन्हा पीठाचा संघात होऊन भाकरी बनते. भाकरी पुन्हा नष्ट होऊन सप्तधातू रूपाने परिणमते. पुद्‌गल परमाणू ध्रुव राहतात. अशा प्रकारे भेद व संघाताने पुद्‌गलामध्ये उत्पाद व्यय ध्रौव्य होतात.

जीवसुद्धा क्रियावान आहे. जीवामध्ये मनवचन कायेच्या निमित्ताने प्रदेश परिस्पन्दन होते तेव्हा कर्म नोकर्म वर्गणेपासून भिन्न जीवाचा त्या कर्मनोकर्म परमाणूंशी संघात होतो. पुन्हा जीवाशी एकत्रित झालेले कर्म नोकर्म परमाणू निर्जरित होऊन जीवापासून वेगळे होतात. अशाप्रकारे भेद व संघाताने उत्पन्न होतात, नष्ट होतात व स्थिर राहतात. जेव्हा जीव एक शरीर सोडतो तेव्हा दुसरे शरीर धारण करण्यासाठी दुसऱ्या गतीमध्ये गमन करतो व शरीर सहित असतानाही एका क्षेत्रावरून दुसऱ्या क्षेत्राकडे गमन करतो. अशाप्रकारे जीवामध्ये क्रियाशीलपणा दिसून येतो.

या दोन द्रव्याशिवाय अन्य द्रव्याचा भेद संघात नाही. ज्याप्रमाणे जीव व कर्माचे बन्धन आहे, पुद्‌गल पुद्‌गलाचे बन्धन आहे तशाप्रकारे धर्म अधर्म द्रव्याबरोबर बन्धन नाही. आकाश व काल द्रव्याचा ही भेद व संघात नाही. चार द्रव्ये क्रियावान नाहीत. क्रियावान द्रव्य जीव व पुद्‌गल हे दोनच आहेत. म्हणून त्या दोघांमध्येच समानजातीय व असमानजातीय द्रव्यपर्याय होतात.

अनेक द्रव्यांच्या संबंधाने होणाऱ्या पर्यायाला द्रव्यपर्याय म्हणतात. एक जीव आणि अनन्त कर्मवर्गणा व नोकर्मवर्गणा यांच्या बंधनामुळे जो व्यंजनपर्याय होतो त्यास असमानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात. जसे मनुष्य, देव, तिर्यंच इ. यामध्ये एक चेतन व दुसरा अचेतन आहे. भिन्नजाती आहे म्हणून यास असमानजातीय म्हणतात. अनेक पुद्गल परमाणू मिळून जो स्कंध तयार होतो त्यास समानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात. जसे घट, पट, लाडू इत्यादी. समानजातीय व असमानजातीय द्रव्यपर्यायामध्ये क्रिया होते, अन्यामध्ये क्रिया होत नाही म्हणून क्रियेचे कारण भेद व संघात सांगितला आहे.

सर्व जीव व पुद्गलामध्ये उत्पाद व्यय ध्रौव्य होते ते भेद व संघाताने होते. परिणमनामुळे भाववती परिणती झाली व भेद संघातामुळे क्रियावती परिणती झाली. अन्य द्रव्यांमध्ये उत्पाद व्यय ध्रौव्य केवळ परिणमनाने होते. म्हणून ते केवळ भाववान् आहेत, क्रियावान नाहीत.

द्रव्य सामान्य अपेक्षेने पाहिले तर सर्व द्रव्य आहेत. सर्वामध्ये अस्तित्व आहे. वस्तुत्व आहे. द्रव्यत्व, अगुरुलघुत्व, प्रदेशत्व, प्रमेयत्व आहे. याप्रमाणे सामान्य गुण अपेक्षेने सर्व द्रव्य समान आहेत. परन्तु या द्रव्यांमध्ये भिन्नता व भेद कसा जाणला जातो ? द्रव्यांमध्ये विशेषता कशी येते ? या प्रश्नाचे उत्तर पुढील गाथेत देतात.–

लिंगेहि जेहिं दव्वं जीवमजीवं हवदि विण्णादं।
ते तब्भावविसिट्ठा मुत्तममुत्ता मुणेयव्वा।।१३०।।

अन्वयार्थ–(जेहिं लिंगेहि) ज्या चिन्हांनी **(दव्वं)** द्रव्य **(जीवमजीव)** जीव आणि अजीव रूपाने **(विण्णादं हवदि)** ज्ञात होते **(ते)** ते **(तब्भावविसिट्ठा)** तद्भावाने विशिष्ट अर्थात त्या त्या स्वरूपाने युक्त **(मुत्तममुत्तां)** मूर्त व अमूर्त गुण **(मुणेयव्वा)** जाणावेत.

तात्पर्य– ज्या ज्या लक्षणांनी जीवादिक पदार्थ जाणले जातात त्या त्या लक्षण स्वरूप ते गुण सांगितले जातात.

लिंग/लक्षणाचे स्वरूप –

ज्या चिन्हांच्या द्वारे द्रव्य जीव आणि अजीव यारूपाने जाणले जातात ते चिन्ह विशेष मूर्त व अमूर्त गुण आहेत. निज द्रव्याचा आश्रय करून राहणाऱ्या ज्या चिन्हांने द्रव्य जाणले जाते त्या चिन्हाला लिंग म्हणतात. असाधारण गुण, लक्षण आणि लिंग या तिन्हींचा एकच अर्थ आहे. तेच लक्षण आहे की जे

आपल्या लक्ष्यामध्ये तर पूर्णरूपाने राहते आणि अलक्ष्यामध्ये बिलकुल जात नाही. तेच चिन्ह लक्षण म्हटले जाते. लक्षण अव्याप्ती, अतिव्याप्ती, असम्भव दोषाने रहित असते. जे लक्षण पूर्ण लक्ष्यामध्ये राहत नाही अर्थात लक्ष्याच्या एका देशामध्ये राहते ते लक्षण अव्याप्ती दोषाने युक्त आहे. जसे पशूचे लक्षण शिंग आहे. सर्व पशूंमध्ये शिंग आढळत नाही. गाय, म्हैस, बकरा इ. काही पशूंमध्ये शिंग असते व काही गाढव, ससा इ. मध्ये शिंग नसते. म्हणून शिंग हे पशूचे अव्याप्त लक्षण आहे. जीवाचे राग, द्वेष, मोह हे अव्याप्त लक्षण आहे. हे लक्षण संसारी जीवांमध्ये सापडते, मुक्त जीवांमध्ये रागादी भाव नाहीत म्हणून हे अव्याप्त लक्षण आहे.

जे लक्षण लक्ष्य व अलक्ष्य दोन्हींमध्ये जाते ते अतिव्याप्ती दोषाने युक्त असते. गायीचे लक्षण शिंग हे अतिव्याप्ती दोषयुक्त आहे. कारण शिंग लक्ष्यभूत गायीमध्ये पण आढळते. व अलक्ष्यस्वरूप म्हैस, बैल इत्यादिक पशूंमध्ये सुद्धा आढळते. जीवाचे लक्षण अमूर्तिक केले तर हे लक्षण अतिव्याप्त आहे. कारण ते लक्ष्यभूत जीवांमध्ये पण आहे व अलक्ष्यभूत धर्म अधर्म इत्यादी जीव अजीव द्रव्यांमध्ये सुद्धा आहे.

तेच लिंग आहे की जे निजद्रव्याचा आश्रय करून तर राहते आणि पराचा आश्रय करून राहत नाही. अशा गुणांच्याद्वारे द्रव्य जाणले जाते. जे गुण स्वद्रव्यामध्ये तर राहतात आणि दुसऱ्या द्रव्यामध्ये राहत नाहीत.

द्रव्य व गुणामध्ये अतद्भाव–

जे द्रव्य आहे ते गुण नाहीत व जे गुण आहेत ते द्रव्य नाही. द्रव्य गुणाशी तन्मय आहे, कारण गुणांच्या समूहालाच द्रव्य म्हणतात. साखर व साखरेची गोडी वेगळी नाही. असे असूनही द्रव्य व गुणामध्ये अतद्भाव आहे अर्थात् द्रव्य व गुणामध्ये प्रदेशभेद नाही पण संज्ञा, लक्षण प्रयोजनादिकांच्या अपेक्षेने भेद आहे. द्रव्य अनंत गुणांचा पिंड आहे. द्रव्य गुणांचा आधार आहे व गुण द्रव्याच्या आधाराने राहतात म्हणून ते आधेय आहेत. द्रव्य लक्ष्य आहे. गुण त्याचे लक्षण आहे. जसे साखर हे लक्ष्य आहे, गोडपणा त्याचे लक्षण आहे.

गुण द्रव्याशी अतद्भावस्वरूप आहेत म्हणून तर ते त्याचे लक्षण होऊ शकतात. जर गुण द्रव्याशी सर्वथा अभिन्न असतील तर ते लक्षण होऊ शकणार नाहीत. अतद्भाव विशिष्ट गुण द्रव्याचे लक्षण होतात.

गुणविशेषामुळे द्रव्यविशेषता–

ज्या ज्या द्रव्याचा जो जो स्वभाव आहे त्या त्या द्रव्याची त्या त्या भावाने

विशेषरूपता आहे. जसे अग्नीचा स्वभाव उष्णता आहे म्हणून उष्णस्वरूपाने अग्नीमध्ये विशेषरूपता आहे. पाण्याचा स्वभाव शीतलता आहे, म्हणून पाणी शीतलस्वभावाने विशिष्ट आहे.

भावविशिष्टतेमुळे द्रव्यांमध्ये भेद जाणला जातो. जीवाचे लक्षण चैतन्य आहे. चैतन्यभावविशेषाने जीव विशिष्ट आहे, स्पर्शरसगंधवर्ण विशेषाने पुद्‌गल विशिष्ट आहे. या भावभेदामुळेच द्रव्यामध्ये भेद जाणला जातो म्हणून वस्तूला ओळखण्यासाठी त्याचा स्वभाव जाणणे आवश्यक आहे.

व्यक्तींची ओळख जशी त्यांच्या स्वभावावरून होते. हा दुर्जन आहे. हा सज्जन आहे, हा उदार आहे, हा कंजूस आहे, हे त्यांच्या स्वभावविशेषाने जाणले जाते.

ज्याप्रमाणे एक आंधळा भिकारी राजमार्गावर उभा होता, राजाची पालखी निघणार होती. सर्वात प्रथम शिपाई आला. त्याला राजेसाहेब येण्याच्या अगोदर रस्त्याची स्वच्छता करायची होती. त्याने आंधळ्याला धक्का देऊन सांगितले, 'मार्गातून दूर हो. दिसत नाही का? राजाची पालखी येऊ लागली आहे.' म्हातारा हसला व म्हणाला, 'हो शिपाईसाहेब बाजूला होतो.'

पुन्हा काही वेळाने कलेक्टर आला. त्याने वृद्धाला म्हटले 'राजाची पालखी येत आहे, आपल्याला मार्गातून बाजूला झाले पाहिजे.' म्हातारा हसला व म्हणाला, 'कलेक्टर साहेब मी बाजूला होतो.'

काही वेळाने राजाचा मंत्री आला. तो म्हाताऱ्याला काही न बोलता बाजूनी आपला घोडा घेऊन निघून गेला. म्हाताऱ्याने म्हटले, 'मंत्री महोदय चालले आहेत.' एवढ्यात राजाची पालखी आली. म्हाताऱ्याला आंधळा समजून राजा पालखीतून उतरला आणि म्हाताऱ्याचा हात पकडून त्याला बाजूला उभे केले, म्हातारा हसला व म्हणाला, 'राजेसाहेब नमस्कार'

सर्वांना आश्चर्य वाटले. हा आंधळा असताना यांनी प्रत्येक व्यक्तीला कसे ओळखले? तर स्वभावभेदाने. त्याच्या त्याच्या स्वभावावरून त्या व्यक्तीची ओळख होते.

मूर्त द्रव्यांमध्ये मूर्तपणामुळे विशेषता आहे म्हणून हे मूर्त गुण आहेत हे जाणले जाते. अमूर्त द्रव्यांमध्ये विशिष्टता आहे. म्हणून हे अमूर्त गुण आहेत असे जाणले.

गुणविशेषाच्या ज्ञानाने भेदविज्ञानाची सुलभता–

जे मूर्तिक द्रव्य आहेत त्यांचे विशेष गुण मूर्तिक आहेत तसेच जे अमूर्तिक द्रव्य आहेत त्यांचे विशेष गुण अमूर्तिक आहेत. सहा द्रव्यांमध्ये पुद्गल द्रव्य मूर्तिक आहे म्हणून त्याचे विशेष गुण स्पर्श रस गंध वर्णसुद्धा मूर्तिक आहेत. जीव, धर्म, अधर्म, आकाश, काल अमूर्तिक आहेत म्हणून त्यांचे विशेष गुणचैतन्यादी सुद्धा अमूर्तिक आहेत.

ही सहा द्रव्ये आपापल्या विशेषगुणांमुळेच भिन्न भिन्न ओळखली जातात. स्वपर भेदविज्ञान होणे हाच सहा द्रव्यांना जाणण्याचा लाभ आहे. शरीर स्पर्शरसगंधवर्णयुक्त प्रत्यक्ष दिसत आहे. जे स्पर्शरसगंधवर्णयुक्त आहे ते मूर्तिक आहे. पुद्गलद्रव्य मूर्तिक आहे म्हणून दिसणारे शरीर पुद्गलमय आहे व त्यापासून भिन्न चेतनस्वरूप जीव अमूर्तिक आहे हे स्वानुभव प्रत्यक्षाने जाणले जाते. मूर्तिक पुद्गलमय शरीर भिन्न आहे. व त्यापासून हा मी बिनमूरति, चिन्मूरति आत्मा भिन्न आहे असे भेदविज्ञान गुणविशेष जाणल्यामुळे सुकर होते.

धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्य अमूर्तिक असले तरी चेतनतेचा अभाव असल्यामुळे जीवापासून अत्यंत भिन्न आहेत. अशाप्रकारे मूर्त द्रव्यांपासून व अमूर्त परद्रव्यांपासून आपला उपयोग हटवून निज अमूर्त चैतन्यस्वरूपामध्ये उपयोग लावावा.

मागील गाथेमध्ये मूर्त व अमूर्त असे दोन प्रकारचे गुण सांगितले. आता मूर्त व अमूर्त गुणांचे लक्षण सांगतात.–

मुत्ता इंदियगेज्झा पोग्गलदव्वप्पगा अणेगविहा ।
दव्वाणममुत्ताणं गुणा अमुत्ता मुणेयव्वा ।।१३१।।

अन्वयार्थ – (इंदियगेज्झा) इन्द्रियग्राह्य **(पोग्गलदव्वप्पगा)** अनेक प्रकारचे **(गुणा मुत्ता मुणेयव्वो)** गुण मूर्तिक जाणावेत आणि **(अमुत्ताणं दव्वाणं)** अमूर्त द्रव्यांचे **(गुणा)** गुण **(अमुत्ता मुणेयव्वा)** अमूर्तिक जाणावेत.

तात्पर्य – पुद्गल द्रव्याचे गुण मूर्त आणि शेष सर्व द्रव्यांचे गुण अमूर्त जाणावेत.

मूर्त अमूर्ताची ओळख–

जे इन्द्रियांच्या द्वारे ग्रहण करण्यायोग्य आहेत ते मूर्तिक गुण आहेत व जे इन्द्रियांच्याद्वारे ग्रहण करण्यायोग्य नाहीत ते अमूर्तिक गुण आहेत. मूर्तिक गुण इन्द्रियांचे विषय होतात व अमूर्तिक गुण इन्द्रियांचे विषय होत नाहीत.

प्रश्न– परमाणू द्व्यणुकादि सूक्ष्म स्कंधामध्ये असणारे गुण इन्द्रियांच्या द्वारे ग्राह्य होत नाहीत. म्हणून मूर्तिकाचे हे लक्षण अव्याप्त लक्षणाभास होईल ?

उत्तर– असे नाही. परमाणू व द्व्यणुकादि सूक्ष्म स्कंधाचे गुण वर्तमान अवस्थेमध्ये इन्द्रिय ग्राह्य नाहीत. पण त्यांच्यामध्ये इन्द्रियग्राह्य होण्याची शक्ती आहे. म्हणून त्यामध्येही मूर्तिकपणा आहे. जेव्हा भेद व संघाताच्या द्वारे सूक्ष्म स्कंध स्थूल होतात तेव्हा इन्द्रियांच्याद्वारे जाणले जातात. ज्याप्रमाणे आहारवर्गणा इन्द्रियग्राह्य नाही पण आहारवर्गणेपासून बनलेले औदारिक शरीर इन्द्रियांचा विषय होते. भाषावर्गणेला आपण ऐकू शकत नाही पण त्या भाषावर्गणेपासून बनलेले शब्द ऐकू येतात.

शक्ती इन्द्रियगम्य नाहीत, व्यक्ती इन्द्रियगम्य–

येथे गुण शब्दाने गुणपर्याय ग्रहण करावेत. कारण मूलशक्ती इन्द्रियांच्याद्वारे गम्य नाहीत. त्या ज्ञानाद्वारे ग्राह्य आहेत. काळा, पिवळा, निळा, लाल, पांढरा हे वर्णगुणांचे पर्याय इन्द्रियांच्याद्वारे जाणले जातात.परन्तु या पर्यायांच्या स्रोतस्वरूप रूपादि शक्ती आहेत त्या शक्ती इन्द्रियांच्या द्वारे जाणल्या जात नाहीत. मूर्त पर्यायांचा स्रोत मूर्त व अमूर्त पर्यायांचा स्रोत अमूर्त आहे. गुण नेहमी कोणत्या ना कोणत्या पर्यायरूपानेच व्यक्त होतात.

स्पर्श, रस, गंध, वर्ण हे चार मूर्तिक गुण आहेत. कारण ते क्रमशः स्पर्शनेन्द्रिय, रसनेन्द्रिय व चक्षुरिन्द्रियाद्वारे ग्रहण केले जातात. सहा द्रव्यांपैकी केवळ एक पुद्गलद्रव्य मूर्तिक आहे. कारण त्यामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण गुण आहेत. पुद्गलाशिवाय शेष जीव, धर्म, अधर्म, आकाश व काल ही पाच द्रव्ये अमूर्तिक आहेत. कारण जीवाचे ज्ञानादि गुण, धर्मद्रव्याचा गतिहेतुत्व, कालद्रव्याचा परिणमनहेतुत्व गुण इन्द्रियांच्या द्वारे ग्राह्य नाहीत. मूर्तिक द्रव्यांचे गुण मूर्तिक व अमूर्तिक द्रव्यांचे गुण अमूर्तिक आहेत.

पुद्गलाचे लक्षण पूरण आणि गलन आहे. जे गळते व मिळते ते पुद्गल परमाणू–परमाणू मिळून पिंड बनतो. परंतु अमूर्त द्रव्यांचा मिळून पिण्ड बनत नाही. परमाणूसुद्धा मिळून एक होत नाहीत. अनेक परमाणूंची मिळून एक व्यंजनरूप स्कंधपर्याय उत्पन्न होते. जीव, पुद्गलकर्म व नोकर्म हे तिन्ही मिळून व्यंजनपर्याय उत्पन्न होते. परंतु परमार्थाने ते तिन्ही भिन्न भिन्न आहेत.

मूर्त व अमूर्त गुणांना जाणून भेदविज्ञान करावे. शरीरामध्ये स्पर्श, रस,

गंध, वर्ण गुण इन्द्रियांचे विषय आहेत. म्हणून शरीर इन्द्रियग्राह्य आहे, पुद्गल आहे. त्यापासून मी भिन्न जीव आहे. कारण जीवाचे गुण अमूर्तिक आहेत, इन्द्रियग्राह्य नाहीत. जे दिसते तो मी नाही.

यन्मया दृश्यते रूपं तन्न जानाति सर्वथा ।
जानन् न दृश्यते रूपं तत्स्वसंवेद्यमस्म्यहम्।।

जे दिसते ते सर्वथा जाणत नाही. जे जाणते ते दिसत नाही. मी सर्वथा स्वसंवेद्य आहे. म्हणून स्वतःला जाणण्यासाठी इन्द्रियज्ञानाचा वापर न करता अतीन्द्रिय ज्ञानाचा वापर करावा. आत्मा अतीन्द्रिय स्वसंवेदनज्ञानाने जाणण्यायोग्य आहे. मी आत्मा एक ज्ञानस्वरूप आहे, सर्व पुद्गलापासून भिन्न आहे. जेव्हा ज्ञान व आनन्दाची अनुभूती होते तेव्हा भावात्मक साधनाने भावात्मक आत्म्याची अनुभूती होते. त्याचा कोणत्याही पुद्गलस्कंधाशी संबंध नाही. आत्मा ज्ञानाद्वारे ज्ञानाचेच वेदन करतो.

आता पुढे मूर्त पुद्गलद्रव्याच्या गुणांचे विवरण करतात.–

वण्णरसगंधफासा विज्जंते पुग्गलस्स सुहुमादो ।
पुढवीपरियंतस्स य सद्दो सो पोग्गलो चित्तो ।।१३२।।

अन्वयार्थ– **(सुहुमादो)** सूक्ष्मापासून **(पुढवीपरियंतस्स)** पृथ्वीपर्यंतच्या **(पुग्गलस्स)** पुद्गलाचे **(वण्णरसगंधफासा)** वर्ण, रस, गंध, स्पर्श गुण **(विज्जंते)** आहेत. **(य)** आणि **(चित्तो सद्दो)** अनेक प्रकारचा शब्द आहे **(सो)** तो **(पोग्गलो)** पुद्गल आहे.

तात्पर्य – पुद्गलाचे वर्ण गन्ध, रस, स्पर्श हे गुण आहेत व शब्द पुद्गलाचा द्रव्यव्यंजन पर्याय आहे.

इन्द्रियांचे विषयभूत असल्यामुळे वर्ण गन्ध, रस, स्पर्श इन्द्रियग्राह्य म्हटले जातात. काही पुद्गलांच्या स्पर्शादी गुणांमध्ये इन्द्रियग्राह्यपणाची अभिव्यक्ती झाली आहे म्हणून ते गृह्यमाण आहेत. काही पुद्गलांच्या स्पर्शादी गुणांमध्ये इन्द्रियग्राह्यत्वाची अभिव्यक्ती झालेली नाही. शक्तिमात्र आहेत म्हणून ते अगृह्यमाण आहेत. स्पर्शादी गुण भले इन्द्रियग्राह्य असोत अथवा अग्राह्य असोत. ते एक द्रव्यात्मक परमाणूपासून मोठ्यात मोठ्या पुद्गलस्कंधापर्यंत सर्व पुद्गलांमध्ये आहेत. स्पर्शादिक गुण पुद्गलाशिवाय इतर द्रव्यांमध्ये नाहीत.

येथे सूक्ष्मापासून पृथ्वीपर्यंतच्या पुद्गलामध्ये स्पर्शरसगंधवर्ण असतात

असे म्हटले आहे. सूक्ष्मापासून पृथ्वीपर्यंत पुद्‌गलाचे सहा भेद केले जातात. १) सूक्ष्मसूक्ष्म- अविभागी पुद्‌गलपरमाणु २) सूक्ष्म स्कंध, पाचही इन्द्रियाने जाणले जाऊ शकत नाहीत. ते सूक्ष्म होत. जसे कार्माण वर्गणा आदि. ३) सूक्ष्म स्थूल- जे डोळ्याने दिसत नाहीत पण अन्य चार इन्द्रियांपैकी कोणत्यातरी इन्द्रियाद्वारे जाणले जाऊ शकतात ते सूक्ष्मस्थूल स्कंध आहेत. जसे शब्द, रस, गंध, स्पर्श.(फुलांचा सुवास, वारा) ४) स्थूल सूक्ष्म-जे डोळ्याने जाणले जातात पण ज्यांना आम्ही पकडू शकत नाही ते स्थूलसूक्ष्म स्कंध आहेत. जसे छाया, आतप, उद्योत इ. ५) स्थूल- जे छेदले असता पुन्हा स्वयमेव जुळतात ते स्थूल स्कंध होत. जसे पाणी, दूध इत्यादी द्रव पदार्थ. ६) स्थूलस्थूल- जे भेदले असता पुन्हा स्वंय जोडणे शक्य नाही ते स्थूल स्थूल स्कंध आहेत. जसे- लाकूड, कापड, दगड इत्यादी.

या सर्व पुद्‌गलांमध्ये स्पर्शरसगंधवर्ण असतात. परमाणूमध्ये ८ स्पर्शांपैकी स्निग्धरूक्षांपैकी एक स्पर्श व शीत उष्णापैकी एक स्पर्श असे दोन स्पर्श, एक रस, एक गंध, एक वर्ण असे ५ गुण असतात. स्कंधामध्ये ७ गुण असतात. हलका भारी स्पर्श व कठीण मृदुपैकी एक स्पर्श असे परमाणूपेक्षा दोन स्पर्श जास्त असतात.

शब्दाच्या गुणपणाचा निषेध –

ज्याप्रमाणे पुद्‌गलामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण आहेत तसा शब्द काही गुण नाही. शब्द इन्द्रियग्राह्य आहे, पण गुण नाही, शब्द अनेकद्रव्यात्मक पुद्‌गलपर्याय आहे. कोणी शब्दाला जबरदस्तीने गुण मानले तरी शब्द अमूर्तद्रव्याचा गुण सिद्ध होत नाही. नैयायिक शब्दाला अमूर्तिक आकाशाचा गुण मानतात. ते म्हणतात, 'आकाश सर्व व्यापक आहे आणि त्याचा गुण आहे शब्द. तो शब्द सर्वत्र भरलेला आहे. आम्ही बोलल्यावर शब्दाची उत्पत्ती होत नाही. शब्द नित्य आहे, गुण आहे, सर्व व्यापक आहे. ओठ इत्यादिकाने शब्दाचा आविर्भाव होतो. त्यांचे हे म्हणणे युक्ती व आगमाने सिद्ध होत नाही. कारण शब्द कर्णेन्द्रियांच्या द्वारे ग्रहण होतो तर त्यापासून अभिन्न असणारे आकाशद्रव्यसुद्धा कर्णेन्द्रियाचा विषय झाला पाहिजे. कारण गुण व गुणी अभिन्न असल्यामुळे एका ज्ञानाने जाणले गेले पाहिजेत. ज्यारूपामध्ये शब्दाचा बोध होतो त्याच रूपामध्ये आकाशाचा बोध होऊ लागला तर आकाशामध्ये व शब्दामध्ये अंतर रहायला नको. अंतर तर दिसते. शब्द कर्णेन्द्रियाने जाणला

जातो. पण आकाश कर्णेन्द्रियाने जाणले जात नाही. आकाश अमूर्तिक असल्यामुळे इन्द्रियांचा विषय नाही.'

जर शब्दाला गुण मानले तर सर्व पुद्गलांमध्ये शब्द असायला पाहिजे. तसे मानले तर शब्दमय विश्व होऊन जाईल. तसेच पुद्गलाचा गुण मानला तर शब्द सदा असला पाहिजे. शब्द सदा राहिला तर कान फुटून जातील. तसे तर दिसत नाही म्हणून शब्द गुण नाही, तर पुद्गलाचा स्कंध पर्याय आहे.

शब्दाच्या पुद्गलपर्यायपणाचे समर्थन–

शब्द कादाचित्क आहे. कधी कधी असणे हे पर्यायाचे लक्षण आहे. गुणाचे लक्षण नित्यपणा आहे. गुण सदा असतो. शब्दांचा उत्पाद आहे म्हणून शब्द पर्याय आहे. भाषा वर्गणेपासून शब्दांची उत्पत्ती होते. भाषावर्गणा सर्व लोकामध्ये भरल्या आहेत. परस्पर आघाताने भाषावर्गणा शब्दरूप परिणमतात. म्हणून शब्द पुद्गलद्रव्यांची अनेक द्रव्यात्मक व्यंजनपर्याय आहे.

शब्द अनित्य आहे, शब्द इन्द्रियग्राह्य आहे. परंतु पाची इन्द्रियांचा विषय नाही. केवळ कर्णेन्द्रियाचा विषय आहे.

शब्द कधी–कधी उत्पन्न होत असल्यामुळे त्याच्या नित्यपणाचे खण्डन होते व नित्य नसल्यामुळे शब्द गुण नाही. शब्दाच्या ठिकाणी जो नित्यपणा आहे तो त्याच्या उत्पादक पुद्गलपरमाणूंचा व स्पर्शादी गुणांचा आहे, शब्द पर्यायाचा नाही. शब्द ज्या पुद्गल परमाणूंपासून बनले आहेत ते पुद्गल परमाणू नष्ट होत नाहीत व त्या परमाणू मधील स्पर्शादी गुण नष्ट होत नाहीत.

जर पृथ्वी आदिकाप्रमाणे शब्द पुद्गलांची पर्याय आहे तर त्यामध्ये स्पर्शरसगंधवर्ण चारी गुण असले पाहिजेत व शब्द स्पर्शनादी इन्द्रियांच्याद्वारेही ग्रहण झाला पाहिजे. परंतु शब्द फक्त कर्णेन्द्रियाचाच विषय होतो अशी कोणी शंका करेल तर आचार्य सांगतात.– असे नाही.ही पदार्थांची विचित्रता आहे. पुद्गलाचा पर्याय असूनसुद्धा पाणी घ्राणेन्द्रियाचा विषय नाही, अग्नी घ्राणेन्द्रिय व रसनेन्द्रियाचा विषय नाही. तसेच वायु घ्राणेन्द्रिय, रसनेन्द्रिय व चक्षुरिन्द्रियाचा विषय नाही. त्याचप्रमाणे शब्द अन्य कोणत्याही इन्द्रियाचा विषय नाही फक्त कर्णेन्द्रियाचा विषय आहे.

सर्व पुद्गलांमध्ये चारी गुणांची अनिवार्यता–

कित्येक लोक ही इन्द्रियग्राह्यता पाहून असे म्हणतात की वायूमध्ये फक्त स्पर्शगुण आहे. अग्नीमध्ये फक्त रूप व स्पर्शगुण आहे, पाण्यामध्ये स्पर्श,

रस, वर्ण आहे. व पृथ्वीमध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण चारी गुण आहेत. परंतु असे नाही. सर्व पुद्‌गल स्पर्शादी चतुष्कयुक्त आहेत. पृथ्वी, जल, अग्नी व वायु यांचे परमाणू वेगवेगळे नाहीत. हे चारही परस्पर बदलत असतात. पृथ्वीरूप परमाणू जलरूप होतात व जलरूप असलेले परमाणू कधी पृथ्वीरूप होतात. ज्याप्रमाणे चंद्रकांत मणी पृथ्वीकाय आहे त्याचा चंद्रमाच्या किरणाशी संबंध झाल्यावर त्यापासून पाणी झरू लागते. सूर्यकांत मणी पृथ्वीकाय आहे. सूर्य किरणांचा संबंध झाल्यावर त्यातून अग्नी प्रकट होते. पाण्यापासून शिंपल्यामध्ये पृथ्वीकाय मोती तयार होतो. अग्नीपासून धूर उत्पन्न होतो त्याला वायू म्हणतात. वायूच्या मिश्रणाने पाणी बनते. पाणी जमा होऊन बर्फाचा दगड होतो. जर पृथ्वी जल आदींचे भिन्न भिन्न परमाणू असते तर त्यांचे परिवर्तन झाले नसते.

गुणांमध्ये व्यक्ती अव्यक्तीचा भेद–

पुद्‌गल स्पर्शरसगंधवर्णांनी रहित असत नाही. परंतु अनेक प्रकारच्या स्कंधापैकी कोणी स्कंध काही गुणांना प्रकटरूपाने दाखवितो व काही गुणांना अप्रकटरूपाने आपल्यामध्ये ठेवतो. गुण गुणीपासून कधी वेगळे होऊ शकत नाहीत. पृथ्वीरूप पुद्‌गलामध्ये चारी गुण व्यक्त असतात. पाण्यामध्ये गंध अव्यक्त आहे. स्पर्श, रस व रूप व्यक्त आहे. अग्नीमध्ये स्पर्श व रूप व्यक्त आहेत. गंध व रस अव्यक्त आहेत. वायूमध्ये फक्त स्पर्श व्यक्त आहे, शेष तीन गुण अव्यक्त आहेत.

जर सूक्ष्मतेने पाहिले तर या पाणी आदींमध्ये गंध आदी गुणसुद्धा प्रकट होतात. जेव्हा पाण्याचा वास घेतो तेव्हा त्याचा गंध स्पर्श लक्षात येत नाही. एखादी वस्तू पाण्याच्या संयोगाशिवाय वेगळा वास धारण करते. तीच वस्तू पाण्याचा संयोग झाल्यावर वेगळा वास धारण करते. ज्याप्रमाणे वाळे पीठ व बांधलेले कणीक वेगवेगळ्या वासाला धारण करतात. जर पाण्यात गंध नसता तर असे झाले नसते. अग्नीवर शिजविलेल्या अन्नामध्ये भिन्न प्रकारचा रस व गंध येतो. जर अग्नीमध्ये रस व गंधगुण नसता तर असे झाले नसते. वायूच्या संबंधाने झाड इत्यादीमध्ये भिन्न प्रकारचा रस, गंध व वर्ण होतो. जर वायूमध्ये रस, गंध, वर्ण नसता तर याच्या संयोगाने ही भिन्नता आली नसती.

पाणी इत्यादींमध्ये चारी गुण आहेत यासाठी दुसरी युक्ती ही आहे की 'उपादानकारण सदृशं हि कार्यं भवति' कार्ये उपादान कारणानुसार होतात. कारणामध्ये चार गुण आहेत तर कार्यामध्ये पण चार गुण असले पाहिजेत. चंद्रकांत मण्यापासून पाणी उत्पन्न होते. चंद्रकांत मणी पृथ्वीकायिक आहे

त्यामध्ये स्पर्श, रस, गंध वर्ण चारी गुण आहेत तर त्यापासून उत्पन्न झालेल्या पाण्यामध्ये चारी गुण असले पाहिजेत. ज्याप्रमाणे मातीपासून घट बनला. कारणरूप मातीमध्ये जे चार गुण आहेत ते घटरूप कार्यामध्ये ही आहेत.

लाकडापासून अग्नी बनते. लाकडामध्ये स्पर्शरसगंधवर्ण आहेत तर त्यापासून उत्पन्न झालेल्या अग्नीमध्ये ही चारी गुण असणार. अन्न खाल्ल्यानंतर पोटामध्ये गॅस (वायू) तयार होतो. अन्नामध्ये चार गुण आहेत तर त्यापासून उत्पन्न झालेल्या वायूमध्ये ही चार गुण असले पाहिजेत.

अल्पज्ञानी एखाद्या स्कंधाला चारी इंद्रियांनी ग्रहण करू शकत नाही, परंतु सूक्ष्मज्ञानी प्रत्येक परमाणूमध्ये चारी गुणांना स्पष्ट पाहतात. अल्पज्ञाला शक्तीच्या अभावामध्ये ज्ञान झाले नाही म्हणून गुणांचा अभाव होतो का ? कदापि नाही.

पर्यायविचित्रता स्वभाव वैचित्र्याचा अहेतु–

पर्यायविचित्रता स्वभाववैचित्र्याचे कारण नाही. जर पर्यायाच्या विचित्रतेमुळे नित्य द्रव्याच्या स्वभावामध्ये घात होऊ लागला तर सर्वाचा अभाव होईल. परन्तु असे होऊ शकत नाही. वायूमध्ये तीन गुण अव्यक्त झाले तर वायू ज्या पुद्‌गल परमाणूपासून बनली आहे त्या परमाणूंमध्ये सुद्धा गुणांचा अभाव झाला असे कधी होत नाही. पर्यायाची विभिन्नता झाल्यामुळे द्रव्यस्वभावामध्ये अन्तर पडत नाही.

आत्म्यामध्ये पहा, पर्यायांचे किती अन्तर आहे? रागद्वेष वाढतात, मोहाचा नाश होतो, आनन्दाचे परिणमन कधी सुखरूप तर कधी दुःखरूप, कधी आनन्दरूप. किती मलिन परिणमन होत आहे. पण आत्म्याच्या स्वभावामध्ये काय अन्तर पडते ? काही अंतर नाही. जो पदार्थ सत् आहे. ज्या स्वभावरूप आहे, सर्व पर्यायांमध्ये त्याच स्वभावरूप राहतो. कितीही विचित्र, विरुद्ध विभाव होतो, द्रव्यामध्ये संबंध होतो तरी तोच जीव आहे, तेच पुद्‌गल आहे. तेच धर्म, अधर्म, आकाश, काल द्रव्य आहे. कोणत्याही द्रव्याच्या स्वभावामध्ये परिवर्तन होत नाही.

जर द्रव्याच्या स्वभावाचा घात झाला तर द्रव्य टिकू शकत नाही. आज काहीच दिसले नसते. सर्व विप्लव झाला असता. कोणाचा कोणता गुण व्यक्त आहे व कोणता गुण अव्यक्त आहे यावरून मूलभूत द्रव्याच्या स्वभावाचा घात होत नाही.

ज्याप्रमाणे जीवामध्ये ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य हा स्वभावचतुष्टय सर्व जीवांमध्ये साधारण आहे त्याप्रमाणे स्पर्शादिचतुष्टय यथासंभव पर्यायरूपाने सर्व पुदगलांमध्ये साधारण आहे. ज्याप्रमाणे जीव शुद्ध व अशुद्ध होतो त्याप्रमाणे पुद्गलाचे पण शुद्ध अशुद्ध भेद समजावेत. जो परमाणू बंधरूप नाही तो शुद्ध आहे व जो बंधरूप आहे तो अशुद्ध आहे. ज्याप्रमाणे स्निग्ध व रूक्षगुण पुद्गलाच्या बंधाचे कारण आहे त्याप्रमाणे राग, द्वेष, मोह संसारी जीवाच्या बंधाचे कारण आहे म्हणून जे जीव बंध अवस्थेपासून सुटून अबंध होऊ इच्छितात त्यांनी रागद्वेष मोहाचा त्याग करून साम्यभाव रूपी चारित्राचा अंगीकार करावा.

स्थिर, शांत निश्चल उपयोग ठेवण्यासाठी दृश्य व अदृश्य सर्व पुद्गल व पुद्गलांच्या पर्यायापासून हटवून ध्रुव शुद्ध चिद्ब्रह्मामध्ये उपयोग लावावा.

पुद्गलद्रव्याच्या गुणांचे व पर्यायांचे वर्णन पूर्व गाथेमध्ये केले. आता शेष राहिलेल्या अमूर्त द्रव्यांच्या गुणांचे वर्णन करतात. मूर्तिक द्रव्य इन्द्रियाने लक्षात येतात, परंतु अमूर्तिक द्रव्य इन्द्रियांद्वारे जाणले जाऊ शकत नाहीत. त्याचे स्वरूप आगमाच्या द्वारे जाणून अनुमानाने जाणता येते. म्हणून आचार्य दोन गाथांद्वारे अमूर्तिक द्रव्यांचे गुण सांगतात –

आगासस्सवगाहो धम्मदव्वस्स गमणहेदुत्तं।
धम्मेदरदव्वस्स य गुणो पुणो ठाणकारणदा।।१३३।।
कालस्स वट्टणा से गुणोवओगोत्ति अप्पणो भणिदो।
णेया संखेवादो गुणा हि मुत्तिप्पहीणाणं ।।१३४।।

अन्वयार्थ – (आगासस्सवगाहो) आकाशद्रव्याचा अवगाह (जागा देणे) **(धम्मेदरदव्वस्स गमणहेदुत्तं)** धर्म द्रव्याचा गमनहेतुत्व **(धम्मेदरदव्वस्स)** अधर्मद्रव्याचा **(ठाणकारणदा)** स्थितिहेतुत्व **(कालस्स)** कालद्रव्याचा **(वट्टणा)** वर्तना **(गुणो से)** गुण आहे. **(अप्पणो गुणो)** आत्म्याचा गुण **(उवओगो भणिदो)** उपयोग सांगितला आहे. **(त्ति)** अशाप्रकारे **(मुत्तिप्पहीणाणं)** मूर्तीने रहित अमूर्तिक द्रव्यांचे **(गुणा)** गुण **(संखेवादो)** संक्षेपाने **(णेया)** जाणावेत.

तात्पर्य – अमूर्त द्रव्यांमध्ये आकाशाचा गुण अवगाह, धर्मद्रव्याचा गुण गतिहेतुत्व, अधर्मद्रव्याचा गुण स्थितिहेतुत्व, कालद्रव्याचा गुण वर्तना व जीवद्रव्याचा गुण उपयोग आहे.

पाच अमूर्तिक द्रव्यांचे गुण–

१) आकाशद्रव्य – अवगाहन हेतुत्व

सर्व द्रव्यांना एकाच वेळेस सामान्य अवगाह देणे आकाशाचा विशेष गुण आहे. प्रासाद घर, गुंफा इत्यादीसुद्धा जागा देण्यासाठी निमित्त आहेत तर आकाशाचा गुण अवगाह देणे कसा काय होऊ शकतो. आकाशाला सोडून अन्य द्रव्ये ठराविक द्रव्यांना जागा देण्यामध्ये विशेष निमित्त आहेत. ते सर्व द्रव्यांना एका वेळी जागा देण्यासाठी साधारण निमित्त बनू शकत नाहीत. हा गुण आकाशामध्येच आहे. म्हणून येथे आकाशद्रव्याचे लक्षण सांगताना सर्व द्रव्यांना व एकाचवेळेस ही दोन विशेषण घातली आहेत. सर्वांना आपल्यामध्ये जागा देण्यासाठी तेच द्रव्य समर्थ होऊ शकते जे सर्वांपेक्षा मोठे आहे. सहा द्रव्यांपैकी आकाशद्रव्य सर्वात मोठे विशाल द्रव्य आहे. सर्वगत अनंत आहे. शेष द्रव्ये असर्वगत आहेत म्हणून ते सर्वांना जागा देऊ शकत नाहीत. धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य व असंख्यात कालाणू क्रिया अर्थात हलनचलनरहित आहेत. अनादिकाळापासून सर्व लोकाकाशामध्ये व्यापून आहेत. जीव पुद्गलच क्रियावान अर्थात हलनचलन करतात. लोकाकाशामध्ये जेथे जीव पुद्गलांना जागेची जरूरी असते त्यांना जागा देण्याला उदासीन कारणरूप आकाशाचा अवगाह गुण आहे. प्रत्येक कार्यासाठी उपादान व निमित्त कारणाची आवश्यकता असते. प्रत्येक द्रव्य स्वतःच्या प्रदेशामध्ये राहतो. म्हणून ते स्वयं अवगाहामध्ये उपादान कारण आहे. पण त्या सर्व द्रव्यांना एकावेळी अवगाह देण्यासाठी निमित्त आकाशद्रव्य आहे. म्हणून त्याला साधारण उदासीन निमित्त म्हटले आहे.

२) धर्मद्रव्य – गति हेतुत्व

एकावेळेस गतिरूप परिणमन करणाऱ्या सर्व जीवपुद्गलांना गमनास सामान्यनिमित्त होणे हा धर्मद्रव्याचा गुण आहे. जीव पुद्गल या दोन द्रव्यांमध्येच गमन करण्याची शक्ती आहे. म्हणून ही दोन द्रव्ये गतिशील आहेत. म्हणून या दोन द्रव्यांनाच धर्मद्रव्य निमित्त आहे. ज्या द्रव्यामध्ये जे स्वयं सामर्थ्य नाही त्यामध्ये ते सामर्थ्य अन्य द्रव्याद्वारे येऊ शकत नाही. जीव पुद्गलामध्ये गमन करण्याची शक्ती असली तरी जेव्हा ही दोन द्रव्ये गतिपरिणामाने परिणत होतात तेव्हाच धर्मद्रव्य त्यांना निमित्त होऊ शकते म्हणून त्याला पण उदासीन निमित्त म्हटले आहे. न चालणाऱ्याला धर्मद्रव्य जबरदस्तीने घेऊन जात नाही.

रस्ता, पाणी, गाडी, सायकल हे सुद्धा गमनासाठी निमित्त आहेत तर मग गतिहेतुत्व धर्मद्रव्याचाच विशेष गुण कसा होऊ शकेल ? अशी शंका झाली असता सांगतात सर्व गतिपरिणत जीवपुद्गलांना एकावेळेस सामान्य निमित्त होणे हा गुण धर्मद्रव्यामध्येच आहे. शेष रस्ता इत्यादी ठराविक द्रव्यांनाच गमनास निमित्त होऊ शकतात. धर्मद्रव्य संपूर्ण लोकाकाशात व्यापक आहे म्हणून ते प्रसररूप निमित्त आहे.

कालद्रव्य व पुद्गलपरमाणू एकप्रदेशी असल्यामुळे त्यांच्यामध्ये गमनहेतुपणा संभवत नाही. जीव समुद्घाताशिवाय इतरवेळी लोकाच्या असंख्याताव्या भागात राहतो म्हणून तो सर्वांच्या गमनाला निमित्त होऊ शकत नाही. आकाशद्रव्य गमनास निमित्त होऊ शकत नाही कारण आकाशद्रव्य गमनाला निमित्त मानले तर जीव पुद्गल लोकाकाशाच्या बाहेर ही गमन करू लागतील. असे झाले तर लोक व अलोकाची निश्चित सीमा राहणार नाही. लोक व अलोकाची सीमा अचल आहे म्हणून आकाशामध्ये गतिहेतुपणा संभवत नाही. अधर्मद्रव्यही गतीला निमित्त होऊ शकत नाही. कारण अधर्मद्रव्य स्थितीला निमित्त आहे. ते स्थितीच्या विरूद्ध गतिक्रयेला निमित्त कसे होऊ शकेल? म्हणून अन्य द्रव्यामध्ये न संभवणारा गतिहेतुपणा धर्मद्रव्याचे ज्ञान करून देतो. अशाप्रकारे एकाचवेळी गतिपरिणत सर्व जीव पुद्गलांचे लोकान्तापर्यंत गतिहेतुत्व धर्मद्रव्याचे लक्षण आहे.

३) अधर्मद्रव्य – स्थितिहेतुत्व

एकाचवेळेस सर्व स्थितिरूप परिणमन करणाऱ्या जीवपुद्गलांना स्थिर होण्यासाठी निमित्त होणे अधर्मद्रव्याचा विशेष गुण आहे. झाडाची सावली, रेल्वेचे सिग्नल, स्पीड ब्रेकर इत्यादी द्रव्ये गमन करणाऱ्या जीव पुद्गलांच्या स्थितीला निमित्त झाले तरी ते सर्वांच्या स्थितीला निमित्त होऊ शकत नाहीत. कालाणू व परमाणू अप्रदेशी असल्यामुळे ते लोकान्तापर्यंतच्या सर्व जीव पुद्गलांच्या स्थितीला निमित्त कसे काय होऊ शकतील ? जीव लोकप्रमाण असला तरी समुद्घाताला सोडून इतरवेळी लोकाच्या असंख्याताव्या भागामध्ये राहतो म्हणूत तो सर्व लोकातील जीव पुद्गलांच्या स्थितीला निमित्त होऊ शकत नाही. लोक व अलोकाची सीमा निश्चित असल्यामुळे आकाशद्रव्य स्थितीला निमित्त नाही. धर्मद्रव्य गतीला निमित्त आहे म्हणून ते त्याच्या विरूद्ध स्थितीला निमित्त होऊ शकत नाही. एकच द्रव्य विरूद्ध कार्यांचे कारण होऊ

शकत नाही. म्हणून अन्य द्रव्यामध्ये न संभविणारा स्थितिहेतुत्व गुण अधर्मद्रव्याचे ज्ञान करून देतो. लोकामध्ये एक अधर्म नावाचे द्रव्य आहे. कारण गतिपरिणत द्रव्यांची स्थिती अन्यथा होऊ शकत नाही. जीव पुद्गलामध्ये स्वयं गमन करण्याची व स्थित होण्याची शक्ती आहे म्हणून जीव व पुद्गल स्वयं गती व स्थितीचे उपादान कारण आहेत आणि धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य निमित्त कारण आहेत. अधर्मद्रव्यसुद्धा चालणाऱ्याला जबरदस्तीने रोकत नाही. थांबणाऱ्याला ते सहज उदासीन निमित्त आहे.

४) कालद्रव्य – परिणमनहेतुत्व

शेष सर्व द्रव्यांच्या समया समयाला होणाऱ्या परिणमनामध्ये निमित्त होणे कालद्रव्याचा विशेष गुण आहे. सर्व द्रव्य स्वयं परिणामस्वभावी आहेत. द्रव्यत्व गुणाच्या निमित्ताने प्रत्येक द्रव्यामध्ये परिवर्तन होत आहे. म्हणून ते स्वयं परिणमनाचे उपादान कारण आहेत. कोणतेही कार्य निमित्ताशिवाय होत नाही. म्हणून सर्व द्रव्यांच्या परिणमनाचे निमित्त कालद्रव्य आहे.

कालद्रव्याचा समय हाच परिणाम आहे. कालद्रव्य स्वयं त्याचे उपादान कारण आहे. व इतर द्रव्यांच्या त्या समयात होणाऱ्या परिणमनाचे निमित्त आहे. अन्य द्रव्यामध्ये हा गुण संभवत नाही.

५) जीवद्रव्य – चैतन्य

चैतन्यपरिणाम हा जीवाचा विशेष गुण आहे. हा अन्य द्रव्यामध्ये संभवत नाही. कारण जीवाला सोडून सर्व द्रव्ये अचेतन आहेत. आत्मा ज्ञाताहीआहे व ज्ञेयही आहे. परंतु शेष सर्वद्रव्ये केवळ ज्ञेय आहेत. स्पर्श, रस, गंध व वर्णरहित असल्यामुळे जीव अमूर्तिक आहे. पण अमूर्तिक हे जीवाचे लक्षण होऊ शकत नाही किंवा हा जीवाचा विशेष गुण नाही. कारण धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्यसुद्धा अमूर्तिक आहेत. म्हणून हा जीवाचा सामान्य गुण आहे. जर अमूर्तिक जीवाचे लक्षण मानले तर त्यामध्ये अतिव्याप्ति दोष येतो. कारण ते जीवामध्ये व इतर धर्मादी द्रव्यांमध्ये ही आहे. म्हणून चैतन्य हेच जीवाचे लक्षण आहे. चैतन्य म्हणजेच ज्ञान दर्शन. चैतन्य म्हणजे अनुभव, जाणीव, संवेदना. ही जीवाला मिळालेली निसर्गाची देणगी आहे. जीवामध्ये चैतन्य आहे म्हणून तो स्वतःला व इतरांना जाणू शकतो. इतर सर्व द्रव्ये सुंदर असली तरी ते स्वतःच्या सौन्दर्याला पाहू शकत नाहीत. जीवच स्वतःच्या सौन्दर्याला व इतरांच्या सुन्दरतेला पाहू शकतो. जर जीवामध्ये ज्ञान नसते तर विश्वाचा शोध

कोणी लावला असता ? **विश्वाचा संशोधक जीवच आहे.**

विशेष गुण सांगण्याचे प्रयोजन–

पुद्गलादी पाच द्रव्ये जीवापासून भिन्न आहेत व जीव या पाच द्रव्यांपासून भिन्न आहे. याचे ज्ञान विशेषगुणांमुळेच होते. स्वपराचा भेदक विशेष गुण आहे. 'विशेष्यन्ते पृथक्क्रियन्ते द्रव्यं द्रव्यान्तरात् यैः ते विशेषगुणाः' दुसऱ्या द्रव्यापासून विशिष्ट एक द्रव्य ज्याच्याद्वारे वेगळे केले जाते त्यांना विशेषगुण म्हणतात.

ज्याप्रमाणे एका बरणीत मीठ आहे व एका बरणीत पीठी साखर आहे. दोघांचा रंग पांढरा दिसत आहे. त्यामुळे ओळखणे कठीण जाते. तेव्हा त्यांच्यामध्ये भेद जाणण्यासाठी तोंडात टाकून पाहतो. खारट लागेल ते मीठ आहे व गोड लागेल ती साखर आहे असे जाणतो. त्या दोघांमधला स्वादविशेष त्यांच्यामध्ये भेद जाणण्यासाठी कारणीभूत ठरला. खारट स्वाद हा मीठाचा विशेष गुण आहे. व गोड स्वाद हा साखरेचा विशेष गुण आहे. साधारण गतिहेतुत्व धर्मद्रव्याचा विशेषगुण, साधारणस्थितिहेतुत्व अधर्मद्रव्याचा विशेषगुण आहे. साधारण अवगाहनहेतुत्व आकाशद्रव्याचा विशेष गुण आहे. परिणमनहेतुत्व कालद्रव्याचा विशेष गुण आहे व चैतन्य जीवाचा विशेष गुण आहे. स्पर्शरसगंधवर्ण पुद्गलाचा विशेष गुण आहे. हे जाणल्यामुळे भेदविज्ञान करणे सोपे झाले.

विशेष गुणांच्या अपरिचयामुळे भेदविज्ञानाचा अभाव –

विशेष गुणांचा परिचय नसल्यामुळे अज्ञानी स्वपरामध्ये भेद न जाणता पराला ही स्व मानतो. पुद्गल इन्द्रियांद्वारे दिसत असल्यामुळे त्यामध्ये जीवाची अंहबुद्धी स्पष्ट दिसत आहे. दिसणारे शरीर मी आहे आणि घर, शेत, सोने, चांदी, स्त्री, पुत्र मित्रादी माझे आहेत अशी पुद्गलामध्ये मिथ्याबुद्धी करतो. परंतु जीव धर्म अधर्म द्रव्यामध्ये अहंबुद्धी करताना दिसत नाही. मी धर्मद्रव्य आहे, मी अधर्म द्रव्य आहे, असे अज्ञानी जीव ही मानत नाही तर मग या अमूर्तिक द्रव्यांना जाणण्याचे प्रयोजन ते काय ?

जरी जीव धर्म अधर्मादी द्रव्यांना मी आहे असे जाणत नसला तरी त्या द्रव्यांच्या स्वरूपाचे अज्ञान असल्यामुळे जीवामध्ये सूक्ष्म भ्रम राहतो. धर्मादिक द्रव्यांचे लक्षण न जाणल्यामुळे त्यांचे अस्तित्व स्वीकारत नाही ही मोठी चूक आहे.

धर्मादिक द्रव्यांच्या कार्यविशेषाला स्वतःचे कार्यविशेष मानतो ही दुसरी चूक. मी दुसऱ्या जीवांची यात्रा घडविली, मी पांगळ्या माणसाला पाठीवरून नेले. मी ओझे वाहिले. इत्यादी जीव पुद्गलांच्या गतीला मी निमित्त आहे असे मानून अहंकार करतो. तेथे अज्ञानी हे जाणत नाही की येथे धर्मद्रव्य आहे ते या सर्वांच्या गतीला निमित्त आहे. मी पळणाऱ्या माणसाला थांबविले, मी रेल्वेला थांबविले. मी जर त्याला पकडले नसते तर तो गाडीमध्ये सापडला असता. असा अज्ञानी अहंकार करतो. पण गतिपूर्वक स्थितीला निमित्त अधर्मद्रव्य आहे हे जाणत नाही. अधर्मद्रव्याचे अस्तित्व स्वीकारत नाही.

दुसऱ्यांना राहायला मी जागा दिली. मी एवढ्या जीवांना आश्रय दिला असे मानून अंहकार करतो. पण जागा देण्याला निमित्त आकाशद्रव्य आहे हे स्वीकारत नाही. जागा माझी आहे असे अज्ञानी भ्रमबुद्धी करतो. अज्ञानी जागेला आपली संपत्ती मानतो. आकाशद्रव्याचे अस्तित्व जाणत नाही. मी दुसऱ्यांमध्ये बदल घडविला. मी मुलांना मोठे केले, शिष्यांचे भवितव्य बदलविले असे अज्ञानी मानतो. परिणमनामध्ये निमित्त कालद्रव्य आहे हे जाणत नाही. त्यासाठी धर्मादी द्रव्यांचे विशेष गुण जाणून त्यांचे अस्तित्व स्वीकारले तर भ्रम दूर होईल.

अथवा धर्मादी द्रव्यांचा विकल्प केला. त्याला अज्ञानी आपले स्वरूप मानतो. त्यामध्ये मोह करतो. धर्मादी द्रव्यांचा विकल्प करणे हा जीवाचा स्वभाव नाही. जीव ज्ञानाकार स्वरूप आहे. विविध ज्ञेयाकार स्वरूप मी नाही. हा भेद जाणत नाही. हेच धर्मादिकांना आपले मानणे आहे.

म्हणून पराद्रव्यामधील अहंबुद्धी नष्ट करण्यासाठी सहा द्रव्यांचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. या विश्वामध्ये पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल व इतर जीवांपासून मी भिन्न आहे. मी एक निजध्रुवशुद्धचिदानन्द स्वरूप आहे. अन्य परमाणू एवढे सुद्धा माझे काही नाही हे स्वीकारणेच सहा द्रव्यांना जाणण्याचे फळ आहे.

प्रत्येक पदार्थ स्वतःच्या अनन्त गुणांशी तन्मय आहे. आपल्या प्रदेशांमध्येच त्यांचे परिणमन त्याची स्वतःची क्रिया होते. त्यांची स्वतःची परिणती त्यांच्यामध्येच आहे, त्यांच्या बाहेर नाही. म्हणून प्रत्येक द्रव्य स्वतंत्र आहे. आपल्या पूर्ण सत्तेला घेऊनच आहे. प्रत्येक समयी द्रव्य परिपूर्ण आहे, अपूर्ण नाही. सामान्यगुण, विशेषगुण त्याच प्रत्येक द्रव्यामध्ये आहेत. जेव्हा

जीव रागी होतो, द्वेषी होतो त्यावेळी ही पर्याय पूर्ण आहे, अर्धी नाही, द्रव्यपण पूर्ण आहे. कोणताही पर्याय असा नाही की जो आधी अर्धा होता व नंतर दुसऱ्या समयात अर्धा होता. प्रत्येक समयात पर्याय पूर्ण आहे. अशाप्रकारे वस्तूस्वरूपाला जेव्हा यथार्थ जाणतो तेव्हा मोह राहत नाही.

आतापर्यंत अमूर्त द्रव्यांचे वर्णन करून आता एकप्रदेशी व बहुप्रदेशी रूपाने द्रव्यांचे वर्णन करतात.

जीवा पोग्गलकाया धम्माधम्मा पुणो य आगासं।
सपदेसेहि असंखादा णत्थि पदेसत्ति कालस्स।।१३५।।

अन्वयार्थ – (जीवा) जीव **(पोग्गलकाया)** पुद्गलकाय **(धम्माधम्मा)** धर्म, अधर्म **(पुणो य)** आणि **(आगासं)** आकाश **(सपदेसेहि)** आपल्या प्रदेशांनी **(असंखादा)** असंख्यात अर्थात् अनेक आहेत.**(कालस्स)** कालाचे **(पदेसत्ति)** प्रदेश **(णत्थि)** नाहीत.

तात्पर्य – जीव, पुद्गल, धर्म, अधर्म आणि आकाश हे प्रदेशवान् पदार्थ आहेत. कारण ते अनेक प्रदेशी आहेत. कालाणू अप्रदेशी आहे. कारण तो एकप्रदेशी आहे.

वास्तविक प्रत्येक पदार्थ अखण्ड प्रदेशी आहे. परन्तु परमाणु आकाशाच्या जेवढ्या भागाला व्यापतो त्याला एक प्रदेश म्हणतात. या प्रदेशाच्या मापाने द्रव्यांचे क्षेत्र मोजले तर ते असंख्यात व अनंत प्रदेश होतात म्हणून त्यांना असंख्यात प्रदेशी व अनंतप्रदेशी म्हटले आहे. परमाणूने अवगाहित प्रदेशाच्या मापाने मोजल्यामुळे प्रदेशांमध्ये खण्डकल्पना उपचरित आहे.

जीवांचा असख्यात प्रदेशपणा–

जीव प्रदेशवान आहे. त्याचे लोकाकाशाच्या प्रदेशासमान असंख्यात प्रदेश आहेत. संसार अवस्थेमध्ये संकोचविस्तार शक्तीमुळे नामकर्माच्या उदयाने प्राप्त झालेल्या लहान मोठ्या शरीर प्रमाण तो होतो. जीव मुंगीच्या शरीरात गेला तर संकुचित होऊन त्या मुंगीच्या शरीराएवढा होतो व हत्तीच्या शरीरात गेला तर विस्तृत होऊन हत्ती एवढा होतो. जीवाचे प्रदेश संकुचित व विस्तृत झाले तरी ते कमी जास्त होत नाहीत. लोकाकाशाच्या प्रदेशप्रमाण अवस्थित राहतात. ज्याप्रमाणे रबर ताणले तर विस्तृत होते व सोडले तर संकुचित होते त्याचे प्रदेश कमी जास्त होत नाहीत. ज्याप्रमाणे दिव्याचा प्रकाश

छोट्या भांड्यात ठेवला तर तेवढ्या भांड्याला व्यापतो मोठ्या भांड्यात ठेवला तर मोठ्या भांड्यात पसरतो. खोलीत ठेवला तर खोलीभर पसरतो. त्याप्रमाणे जीवाचे प्रदेश अवस्थित असूनही लहान मोठ्या शरीरानुसार संकुचित व विस्तृत होतात. मनुष्य जन्मतो तेव्हा त्याचे शरीर एक दीड फुटाचे असते जसजसा मोठा होईल तसे त्याचे शरीर वाढत जाते. त्याचबरोबर जीवाचे प्रदेशसुद्धा पसरत जातात. सिद्ध झाल्यावर जीव अंतिम शरीराकार राहतो त्यामध्ये नाक इत्यादी पोकळींचा आकार कमी होतो. नामकर्माचा अभाव झाल्यामुळे शरीराचाच अभाव झाला. आता त्यामध्ये संकोच विस्तार होण्याचे काही कारण नाही. म्हणून काही कमी अंतिम शरीराकार राहतो.

३४३ घनराजूप्रमाण संपूर्ण लोकामध्ये सुद्धा असंख्यात प्रदेश आहेत व सुईच्या अग्रभागाएवढ्या स्थानामध्ये सुद्धा असंख्यात प्रदेश आहेत. सर्व जग असंख्यातप्रदेशी आहे व पाण्याचा एक थेंब जेवढी जागा व्यापतो ती जागासुद्धा असंख्यातप्रदेशी आहे. असंख्यात सुद्धा असंख्यात प्रकारचे आहे. व प्रदेश अत्यंत सूक्ष्म आहे. कोणताही जीव असो, तो संसारी असो अथवा मुक्त असो, असंख्यात प्रदेशातच राहतो. निगोद लब्ध्यपर्याप्त जीवाची सर्वात छोटी अवगाहना अंगुलाचा असंख्यातावा भाग आहे. ती सुद्धा असंख्यातप्रदेशीच आहे. कोणताही जीव असंख्यात प्रदेशांहून कमी प्रदेशांमध्ये राहत नाही. लहानात लहान जीवाचे क्षेत्रसुद्धा असंख्यात प्रदेशामध्ये आहे. व सर्वात मोठे महामत्स्याचे १२,५०,००००० योजन क्षेत्रसुद्धा असंख्यात प्रदेशीच आहे.

पुद्गलांचे प्रदेश –

पुद्गलद्रव्य जेव्हा एक अविभागी परमाणूरूप असते तेव्हा ते एक प्रदेशी आहे. परन्तु त्यामध्ये स्निग्ध, रूक्ष गुण असल्यामुळे स्कंधरूप होण्याची शक्ती आहे. म्हणून बहुप्रदेशी आहे. स्कंधाच्या अपेक्षेने पुद्गलाचे दोन, तीन, संख्यात, असंख्यात व अनंत प्रदेश होतात. दोन अणूंचा स्कंध झाला तर तो दोन प्रदेशी, तीन अणूंचा स्कंध बनला तर तीन प्रदेशी, संख्यात अणूंचा स्कंध बनला तर तो संख्यात प्रदेशी, असंख्यात परमाणूंचा स्कंध बनला तर तो असंख्यात प्रदेशी व अनंत अणूंचा स्कंध बनला तर पुद्गल अनंतप्रदेशी म्हटले जाते. जेवढी परमाणूंची संख्या असेल तेवढे स्कंधाचे प्रदेश म्हटले जातात.

शेषद्रव्यांचे प्रदेश –

धर्मद्रव्य संपूर्ण लोकामध्ये व्यापक असंख्यात प्रदेशी आहे. अधर्मद्रव्य सुद्धा लोकव्यापक असंख्यातप्रदेशी आहे. आकाशद्रव्य लोक व अलोकामध्ये

व्यापून असीम अनन्तप्रदेशी आहे. लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एकेक कालाणू रत्नाच्या राशीप्रमाणे स्वतन्त्र स्थित आहे. एक कालाणू दुसऱ्या कालाणूंशी कधी बंधाला प्राप्त होत नाही. अर्थात् त्यामध्ये स्कंधरूक्षगुणांचा अभाव असल्यामुळे स्कंधरूप होण्याची शक्ती नाही. जेवढे लोकाकाशाचे प्रदेश तेवढे कालाणू आहेत.

जीव, धर्म, अधर्म, आकाशद्रव्य वास्तविक अस्तिकाय आहेत. कारण ते बहुप्रदेशी आहेत. पुद्गलद्रव्य व्यवहाराने अस्तिकाय आहे. कारण ते द्रव्याच्या अपेक्षेने एक प्रदेशी आहे; पण स्कंधरूप होण्याची शक्ती असल्यामुळे उपचाराने बहुप्रदेशी आहे. कालद्रव्य उपचाराने पण अस्तिकाय नाही. कारण ते शक्ती व व्यक्ती अपेक्षेने एकप्रदेशीच आहे.

येथे जयसेन आचार्यांच्या वृत्तीमध्ये एक अधिक गाथा आहे त्यामध्ये हाच भाव दृढ करतात.–

एदाणि पंचदव्वाणि उज्झियकालं तु अत्थिकायत्ति।
भण्णंते काया पुण बहुप्पदेसाण पचयत्तं ।।११।।

अन्वयार्थ – (**उज्झियकालं**) कालद्रव्याला सोडून (**एदाणि पंचदव्वाणि**) ही पाच द्रव्ये (**अत्थिकायत्ति**) अस्तिकाय आहेत असे (**भण्णंते**) म्हटले जाते (**पुण**) तसेच (**बहुप्पदेसाण पचयत्तं**) पुष्कळ प्रदेशांच्या समूहाला (**काया**) काय म्हणतात.

द्रव्ये सहा आहेत. त्यापैकी कालद्रव्याला सोडून शेष पाच द्रव्यांना अस्तिकाय म्हणतात. बहुप्रदेशी द्रव्यांना अस्तिकाय म्हणतात. कालद्रव्य एकप्रदेशी आहे म्हणून ते अस्ति आहे; पण कायवान नाही. जीव, पुद्गल, धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य व आकाशद्रव्य बहुप्रदेशी असल्यामुळे अस्तिकाय आहेत.

या पाच अस्तिकायांमध्ये एक जीवास्तिकायच ग्रहण करण्यायोग्य आहे. जीवास्तिकायाला ओळखण्यासाठीच शेष अस्तिकायांचे वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे एखाद्या घराचा पत्ता सांगताना त्याच्या आजूबाजूच्या घरांचे पण वर्णन केले जाते. त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या प्रसिद्ध स्थानांचा निर्देश केला जातो. त्या सर्वांचे वर्णन करण्याचे प्रयोजन ते विवक्षित घर प्राप्त होणे हेच असते. त्याप्रमाणे जीवास्तिकायाचे वर्णन करण्यासाठी इतर द्रव्यांचे ही वर्णन करणे आवश्यक आहे. कारण त्याशिवाय त्या सर्वाहून भिन्न जीवाची ओळख होऊ शकत नाही. इतर सर्वांचे वर्णन करण्याचे प्रयोजन जीवाचा शोध घेणे हाच

आहे. जीवास्तिकायामध्ये सुद्धा अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, साधू ही पंचपरमेष्ठी अवस्था सारभूत ग्रहण करण्यायोग्य आहे. कारण शेष अवस्था दुःखरूप व दुःखाला कारण आहेत. पंचपरमेष्ठीमध्ये सुद्धा अरिहंत व सिद्ध अवस्था उपादेय आहे. कारण ह्या शुद्ध अवस्था आहेत. सुखरूप आहेत. आचार्य उपाध्याय अवस्था उपायभूत आहेत. सर्वात श्रेष्ठ अष्टकर्मरहित सिद्ध अवस्था आहे म्हणून सर्वथा प्रगट करण्यायोग्य उपादेय सिद्ध अवस्था आहे. वास्तविक शुद्धनिश्चयनयाने रागद्वेषादी सर्व विकल्पजालाचा त्याग करण्याच्या वेळी निर्विकल्प अवस्थेमध्ये सिद्ध जीवासमान आपला शुद्धात्मा ग्रहण करण्यायोग्य आहे. निज शुद्धात्म्याच्या आश्रयानेच सिद्ध अवस्था प्रगट होते म्हणून ज्ञेय,ध्येय, श्रद्धेय, आचरणीय निज ध्रुवशुद्ध चिदानन्द आत्मा आहे.

आता पुढे हे सांगतात की या बहुप्रदेशी व अप्रदेशी सर्व द्रव्यांचे अवस्थान कोठे आहे अर्थात सर्व द्रव्ये कोठे राहतात –

लोगालोगेसु णभो धम्माधम्मेहि आददो लोगो ।
सेसे पडुच्च कालो जीवा पुण पोग्गला सेसा ।।१३६।।

अन्वयार्थ – (**णभो**) आकाशद्रव्य (**लोगालोगेसु**) लोक व अलोकामध्ये आहे. (**लोगो**) लोक (**धम्माधम्मेहि**) धर्म व अधर्मद्रव्याने (**आददो**) व्याप्त आहे. (**सेसे पडुच्च**) शेष द्रव्यांचा आश्रय घेऊन (**कालो**) कालद्रव्य आहे. ते (**सेसा**) शेष द्रव्य (**जीवा**) जीव (**पुण**) व (**पोग्गला**) पुद्गल आहेत.

तात्पर्य – अस्तिकाय व कायरहित सर्व द्रव्ये लोकामध्येच राहतात.

आकाशाची सर्वव्यापकता –

आकाश एक अखंड अनंत व्यापक द्रव्य आहे. लोक व अलोक असे आकाशाचे दोन विभाग सांगितले जातात. परंतु आकाशाचे दोन विभाग होत नाहीत. आकाशाच्या जेवढ्या भागामध्ये जीव पुद्गल, धर्म, अधर्म आणि कालद्रव्य आहेत तेवढ्या भागाला लोकाकाश म्हणतात. शेष सर्व सहा बाजूच्या असीम आकाशाला अलोकाकाश म्हणतात. आकाश लोक व अलोकामध्ये अविभाग रूपाने राहते. ज्याप्रमाणे अखंड एका प्रवचन हॉलचे दोन विभाग केले जातात. एक स्त्री विभाग व दुसरा पुरुष विभाग. हॉल दोन नाहीत. एकच आहे. त्याप्रमाणे आकाशद्रव्य दोन नाहीत. एकच आहे.

धर्म व अधर्मद्रव्याची अवगाहना–

धर्मद्रव्य आणि अधर्मद्रव्य एक एक असून लोकामध्ये सर्वत्र व्यापून आहेत. त्यांचे निमित्त प्राप्त करून ज्यांचे गमन होते व स्थिती होते अशा जीव पुद्गलांचे लोकाच्या बाहेर कोठेही गमन होत नाही. जर गमन होत नाही तर गतिपूर्वक स्थितीसुद्धा होत नाही. म्हणून धर्म व अधर्म द्रव्य लोकामध्येच सर्वत्र व्यापून आहेत.

कालद्रव्याचे विवरण–

कालद्रव्य असंख्यात आहेत. ते लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एकेक स्थित आहेत. हे कालाणू जीव पुद्गलादी सर्व द्रव्यांच्या परिणमनामध्ये निमित्त आहेत. जीव पुद्गलांच्या नवीन जुन्या इत्यादी पर्यायांच्याद्वारे कालद्रव्याचे पर्याय प्रकट होतात. कालाणूंचा समय हा पर्याय पुद्गल परमाणूंच्या गमनावरून प्रगट होतो. जेव्हा एक पुद्गल परमाणू एका कालाणूला उल्लंघून जवळच्या कालाणूवर जातो तेवढ्या गमनाला जेवढा काळ लागला त्यालाच समय पर्याय म्हणतात. जेव्हा एक जीव अथवा पुद्गल एका क्षेत्राहून दुसऱ्या क्षेत्रावर जाण्यासाठी जो घटिका, मुहूर्त, तास, दोन तास, सप्ताह, पक्ष, मास आदि काळ लागला त्या सर्वाला व्यवहार काल म्हणतात. हे सर्व व्यवहार काल समयांचा समूहस्वरूप आहेत. ते लोकाकाशाच्या बाहेर नाहीत.

लोकामध्ये जीव व पुद्गलाचे अवस्थान –

जीव व पुद्गलद्रव्य या लोकामध्ये सर्वत्र भरलेले आहेत. जरी एक जीव लोकाकाशप्रमाण असंख्यात प्रदेशी आहे. तरी केवल समुद्घाताशिवाय इतरवेळी कधीही लोकामध्ये व्यापत नाही. कषाय, वेदना, वैक्रियिक, तैजस, आहारक व मारणातिंक समुद्घातामध्ये सुद्धा आत्म्याचे प्रदेश शरीराच्या बाहेर निघतात आणि अंतर्मुहूर्तातच मूळ शरीरात प्रवेश करतात. सात समुद्घाताला सोडून इतरवेळी सर्व जीव आपल्या नामकर्माच्या उदयाने प्राप्त शरीरप्रमाण राहतात. आत्म्याच्या प्रदेशांमध्ये संकोच विस्तार शक्ती आहे. ती शक्ती नामकर्माच्या निमित्ताने परिणमन करीत जीवाच्या प्रदेशांना संकोचित व विस्तारित करते. लोकाच्या प्रमाणापेक्षा जीवाच्या एक प्रदेशसुद्धा अधिक विस्तार होऊ शकत नाही. मुक्त जीव अंतिम शरीरापेक्षा काही कमी आकारामध्ये राहतात.

संसारी जीवांचे शरीर सूक्ष्म व बादर असे दोन प्रकारचे आहे. साधारण

वनस्पती अर्थात निगोद जीवाच्या शरीराची अवगाहना घनांगुलाचा असंख्यातावा भाग आहे. तेवढ्या शरीरात अनन्त जीव राहतात. अर्थात अनंत जीवांचे एकच शरीर आहे. याशिवाय सूक्ष्म पृथ्वी, जल, अग्नि, वायुकायिक जीवसुद्धा सर्व लोकामध्ये सर्वत्र व्याप्त आहेत. सूक्ष्म जीव कोणाला रोकत नाहीत व कोणाकडून रोकले जात नाहीत. बादर एकेन्द्रिय सुद्धा लोकामध्ये यथासंभव सर्वत्र आहेत. द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय व पंचेन्द्रिय त्रस जीव त्रसनाडीमध्येच राहतात.

एकेका जीवाबरोबर अनंत आहार, तैजस, भाषा, मनोवर्गणा व कार्माणवर्गणा आहेत. म्हणून जीवापेक्षा अनन्तपट पुद्गलद्रव्ये आहेत. जीवांच्या प्रदेशांच्या बाहेरसुद्धा अनन्त पुद्गलवर्गणा आहेत. हे पुद्गलसुद्धा संपूर्ण लोकामध्ये व्याप्त आहेत. पुद्गल परमाणू एकप्रदेशी असल्यामुळे लोकाच्या एका प्रदेशावर राहतो. स्निग्धरूक्ष गुणामुळे पुद्गल परस्पर मिळून अनेक जातीचे सूक्ष्म व बादर स्कंधरूप परिणमतात. व ते स्कन्ध लोकाच्या पुष्कळ प्रदेशांमध्ये राहतात. लोकाकाशाचा असा एक प्रदेश नाही की जेथे जीव व पुद्गल नाहीत. ज्याप्रमाणे काजळाच्या डबीत काजळ गचपच भरलेले असते त्याप्रमाणे सहा द्रव्ये लोकाकाशामध्ये पूर्ण भरलेले आहेत. प्रत्येक प्रदेशावर सहा द्रव्यांचे अस्तित्व आहे.

आकाशाची अवगाहन शक्ती–

लोकाकाशामध्ये अशी अवगाहनशक्ती आहे की ज्या एका लोकाकाशाच्या प्रदेशाला एक पुद्गल परमाणू व्यापतो त्या प्रदेशामध्ये सर्व अनन्तानन्त पुद्गल परमाणू राहू शकतात. पुद्गलामध्ये ही तशी सूक्ष्मत्व व अवगाहनशक्ती आहे. ज्याप्रमाणे एका दिव्याच्या प्रकाशात अनेक दिव्यांचे प्रकाश माऊ शकतात. जेथे एक शब्द गुंजायमान होतो तेथे अनेक शब्द गुंजायमान होऊ शकतात. जेथे वायू भरलेला आहे तेथे अन्य वायू व अन्य पुद्गल स्कंध ही येऊ शकतात. त्याप्रमाणे मूर्तिक पुद्गल एक दुसऱ्याला स्थान देतात. असंख्यात प्रदेशी लोकाकाशामध्ये अनंतानंत जीवद्रव्ये, धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, असंख्यात कालद्रव्ये व या अमूर्तिक द्रव्यांबरोबर अनंतानंत मूर्तिक पुद्गलद्रव्ये समाविष्ट आहेत.

एका सूईच्या अग्रभागा एवढ्या प्रदेशावर काय काय स्थित आहे ? वरकरणी पाहिले तर आपल्याला काहीच नाही असे वाटते. पण तेवढ्या जागेत

काय काय आहे पहा. असंख्यात बादर निगोद शरीरे, एका निगोद शरीरामध्ये अनंतानंत जीवद्रव्ये, प्रत्येक जीवद्रव्याच्या एकेका प्रदेशावर अनन्तानन्त औदारिक शरीराचे परमाणू, तैजस शरीराचे परमाणू, कार्मण शरीराचे परमाणू, त्या एकेका परमाणूवर विस्रसोपचयरूपाने स्थित अनन्तानन्त आहारवर्गणा, अनन्तानन्त भाषावर्गणा, तैजसवर्गणा, कार्माणवर्गणा भरलेल्या आहेत.

याप्रमाणे हा लोक सर्वत्र सहा द्रव्यांनी भरलेला आहे. जरी सहा द्रव्ये परस्पर मिसळलेले आहेत तरीसुद्धा कोणतेही द्रव्य आपापल्या स्वभावाला सोडत नाहीत. पंचास्तिकाय संग्रहामध्ये म्हटले आहे की–

अण्णोण्णं पविसंता दिंत्ता ओगासमण्णमण्णस्स।
मेलंता वि य णिच्चं सगं सभावं ण विजहंति ।।७।।

सहा द्रव्ये एक दुसऱ्यामध्ये प्रवेश करतात, नित्य एक दुसऱ्याला अवकाश देतात, नित्य मिसळलेले असले तरी आपापल्या स्वभावाला सोडत नाहीत. कारण यांच्यामध्ये अगुरुलघु हा सामान्य गुण आहे.

ज्याप्रमाणे सिद्धपरमेष्ठी व्यवहाराने लोकाकाशाच्या अग्रभागावर स्थित आहेत परंतु ते निश्चयाने आपापल्या स्वरूपामध्येच स्थित आहेत, त्याप्रमाणे सर्व द्रव्ये व्यवहाराने लोकाकाशामध्ये स्थित आहेत वास्तविक ते आपल्या स्वप्रदेशामध्येच स्थित आहेत.

या सहा द्रव्यांच्या मध्ये स्थित असतानाही आपल्या आत्मस्वभावाला सर्व पुद्गलादी परद्रव्यांपासून भिन्न अनुभवावे. मी एक अमूर्तिक असंख्यातप्रदेशी चैतन्यस्वरूपी शुद्ध जीवास्तिकाय आहे. मी माझ्यामध्ये आहे. अन्य कोणीही माझ्यामध्ये नाही, मी अन्य कोणामध्ये ही नाही असे जाणावे.

ज्ञेयप्रज्ञापन अधिकारामध्ये विशेष द्रव्यांचे वर्णन करीत आहेत. प्रत्येक द्रव्याच्या विशेष गुणांचे वर्णन केले. त्यावरून सहा द्रव्ये स्वतन्त्र भिन्न-भिन्न सिद्ध होतात. कोणतीही वस्तू प्रदेशाशिवाय नाही. वस्तू द्रव्यक्षेत्रकालभाव या स्वरूपचतुष्टयाने सहितच असते. आपल्याला वाटते केवळ आकाशच क्षेत्रात्मक वस्तू आहे, पण तसे नाही. प्रत्येक वस्तूचे स्वतंत्र क्षेत्र आहे. ज्याचे प्रदेश नाहीत ते द्रव्यच जगात नाही. म्हणून येथे द्रव्यामध्ये प्रदेशवानपणा व अप्रदेशवानपणा कशाप्रकारे संभवतो ते सांगतात.–

जध ते णभप्पदेसा तधप्पदेसा हवंति सेसाणं ।
अपदेसो परमाणू तेण पदेसुब्भवो भणिदो ।।१३७।।

अन्वयार्थ – (जध) ज्याप्रमाणे **(ते णभप्पदेसा)** ते आकाशाचे प्रदेश आहेत **(तध)** त्याप्रमाणे **(सेसाणं)** शेष द्रव्यांचे **(पदेसा हवंति)** प्रदेश आहेत. **(परमाणू)** परमाणू **(अपदेसो)** अप्रदेशी आहे. **(तेण)** त्याच्याद्वारे **(पदेसुब्भवो)** प्रदेशाची उत्पत्ती **(भणिदो)** सांगितली आहे.

तात्पर्य – सर्व द्रव्यांमध्ये प्रदेश आहेत, कालद्रव्य एकप्रदेशी आहे. परमाणूसुद्धा एकप्रदेशी आहे, परन्तु अनेक परमाणू मिळून स्कंधाची उत्पत्ती होऊन ते अनेक प्रदेशी होतात.

एक परमाणू आकाशाच्या जेवढ्या जागेला रोकतो/व्यापतो तेवढ्या क्षेत्रांशाला एक प्रदेश म्हणतात. ज्याप्रमाणे विस्तृत आकाशाच्या अविभागी अंशाला प्रदेश म्हणतात त्याप्रमाणे विस्तृत अन्य द्रव्यांच्या अविभागी अंशाला सुद्धा प्रदेश म्हणतात. या प्रदेशाच्या मापाने आकाशाच्या विस्ताराला मोजले असता त्याचे अनन्त अंश होतात म्हणून आकाशद्रव्य अनन्तप्रदेशी आहे अर्थात बहुप्रदेशी आहे. त्याचप्रमाणे धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य व एक जीवाचे प्रदेश परमाणु व्याप्त अंशाच्या द्वारे मोजले असता असंख्यात होतात. म्हणून धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य व जीवद्रव्य असंख्यातप्रदेशी अर्थात बहुप्रदेशी आहे. ज्याप्रमाणे आपण शेतीची जागा किंवा घराची जागा इंच व फूटाने मोजतो तेव्हा ती जागा १० वर्ग फूट आहे असे म्हणतो. त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याची जागा आहे ती प्रदेशाच्या मापाने मोजली जाते. प्रदेश हे क्षेत्राला मोजण्याचे सर्वात लहान साधन आहे. धर्म व अधर्मद्रव्याच्या असंख्यात प्रदेशांचा विस्तार अवस्थित आहे. परंतु जीवाचे प्रदेश संकोच विस्तारामुळे अनवस्थित आहेत. ज्याप्रमाणे चमडे ओले झाले असता फुलते व वाळल्यावर ते संकुचित होते. तरीपण चमड्याचे प्रदेश कमी जास्त होत नाहीत. त्याप्रमाणे जीवाचे प्रदेश शरीर नामकर्माच्या उदयानुसार प्राप्त लहान मोठ्या शरीरप्रमाण संकुचित होतात व पसरतात. परंतु त्याचे प्रदेश कमी जास्त होत नाहीत. ज्याप्रमाणे सूर्याच्या उदयाने कमळ फुलते व सूर्यास्त झाल्यावर संकुचित होते. दिव्याचा प्रकाश लहान मोठ्या पात्रामध्ये ठेवला असता संकुचित व विस्तृत होतो. त्याप्रमाणे जीवाचे प्रदेश स्थूल शरीरात पसरतात व शरीर कृश झाले असता संकुचित होतात. तसेच बालक अवस्थेमध्ये छोट्या शरीरात संकुचित होऊन राहतात व कुमार अवस्थेमध्ये शरीर वाढले असता पसरतात. ही गोष्ट अनुभव सिद्ध आहे.

पुद्गल द्रव्य वस्तुतः द्रव्याच्या अपेक्षेने एकप्रदेशी आहे. द्वितीयादि

प्रदेशांचा अभाव असल्यामुळे त्याला अप्रदेशी म्हणतात. तरीपण दोन प्रदेशादींच्या उत्पत्तीला कारणभूत स्निग्धरूक्ष गुणरूप परिणमण्याची शक्ती असल्यामुळे त्याद्वारे बहुप्रदेशीपणा उत्पन्न होतो. म्हणून पर्याय अपेक्षेने पुद्गल दोन आदी संख्यात, असंख्यात व अनन्तप्रदेशी आहे.

प्रत्येक द्रव्य आपापल्या प्रदेशामध्ये स्थित आहेत. स्वप्रदेश हेच आत्म्याचे खरे घर आहे. कोणत्याही गतीमध्ये जावो तो आपल्या असंख्यात प्रदेशातच राहतो. भलेही बाहेरचे घर लहान झोपडी असो अथवा मोठा राजप्रसाद असो. राजमहालात राहतो म्हणून मी राजा आहे, मी मोठा आहे व छोट्या घरात राहतो म्हणून मी गरीब आहे, छोटा आहे असा मोठेपणा किंवा छोटेपणा मानण्याचे कारण नाही. परपदार्थाच्या आश्रयाने स्वतःला लहान मोठा मानून हा जीव रागद्वेष करतो. जर आपल्या स्वरूपाला जाणतो तर रागद्वेषाचा अभाव करून समता भावाला प्राप्त होतो म्हणून निरंतर आपल्या ध्रुवस्वरूपाचा आश्रय करून आपल्या आत्मगृहात विश्राम करावा त्याद्वारे शाश्वत सुखाची प्राप्ती होईल.

मागील गाथेत शेषद्रव्यांच्या प्रदेशाची चर्चा केली, परंतु कालाणूच्या प्रदेशाची चर्चा केली नाही म्हणून आता कालाणू अप्रदेशीच आहे हा नियम हेतूपूर्वक पुढील गाथेमध्ये सांगतात. यामध्ये कालद्रव्याच्या वर्तनेचे व त्याच्या एकप्रदेशीपणाचे वर्णन केले आहे –

समओ दु अप्पदेसो पदेसमेत्तस्स दव्वजादस्स।
वदिवददो सो वट्टदि पदेसमागासदव्वस्स ।।१३८।।

अन्वयार्थ – (**समओ दु**) कालद्रव्य तर (**अप्पदेसो**) अप्रदेशी आहे. (**पदेसमेत्तस्स दव्वजादस्स**) प्रदेशमात्र परमाणू (**आगासदव्वस्स**) आकाशद्रव्याच्या (**पदेसं**) प्रदेशाला (**वदिवददो**) मंदगतीने उल्लंघन करीत असताना (**सो वट्टदि**) तो प्रवृत्त होतो अर्थात् निमित्तरूपाने परिणमित होतो.

तात्पर्य– कालद्रव्य एकप्रदेशी आहे. त्याचा समय नावाचा परिणाम होतो. आकाशाच्या एका प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशावर परमाणूला जायला जेवढा काळ लागतो तेवढाच काल समय आहे.

लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एकेक कालद्रव्य स्थित आहे. यावरून कालद्रव्य एकप्रदेशी आहे ही गोष्ट सिद्ध होते. त्याच्या द्वितीयादी प्रदेशांचा अभाव असल्यामुळे त्याला अप्रदेशी म्हणतात.

पुद्गलपरमाणूप्रमाणे कालाणू पर्याय अपेक्षेने सुद्धा बहुप्रदेशी नाही. कारण त्यामध्ये स्निग्धरूक्ष गुणांचा अभाव असल्यामुळे स्कंधरूपाने परिणमण्याची शक्ती नाही. त्यामुळे कालाणूंचा परस्पर संयोग होऊन बहुप्रदेशी स्कंध बनू शकत नाही. कालाणू निष्क्रिय नित्य अवस्थित आहे.

जेव्हा पुद्गलपरमाणू मंदगतीने एक कालाणुव्याप्त आकाश प्रदेशाहून जवळच्या कालाणू व्याप्त आकाशप्रदेशावर जातो तेव्हा कालद्रव्याची वर्तना होते अर्थात् त्याची समय पर्याय प्रगट होते. पुद्गल परमाणूचे एका प्रदेशापर्यंत गमन होणे हेच समयपर्यायाचे सहकारी कारण आहे, अधिक दूरपर्यंत जाणे सहकारी कारण नाही. यावरूनसुद्धा कालाणूद्रव्य एक प्रदेशरूप आहे ही गोष्ट सिद्ध होते.

ज्याप्रमाणे आकाशादी पांच द्रव्यांच्या परिणतीला अर्थात् पर्याय बदलण्याला कालद्रव्य सहकारी कारण आहे त्याप्रमाणे कालद्रव्याच्या समयरूप परिणमण्यामध्ये पुद्गलपरमाणूंचे एका आकाशप्रदेशाहून दुसऱ्या आकाश प्रदेशावर मंदगतीने गमन करणे सहकारी कारण आहे.

प्रत्येक कार्यासाठी दोन कारणांची आवश्यकता असते. १) उपादान व २) निमित्त. पाचही द्रव्यांच्या पर्याय होण्यामध्ये ते स्वयं उपादान कारण आहेत. त्यामध्ये कालद्रव्य सहकारी कारण आहे. त्याप्रमाणे समय पर्यायाचे कालद्रव्य स्वयं उपादान आहे, पुद्गल परमाणूंचे मंद गमन सहकारी कारण आहे.

कालद्रव्याला जर लोकाकाश प्रमाण अखंड द्रव्य मानले असते तर कालद्रव्याची वर्तना झाली नसती आणि समयपर्याय पण उत्पन्न झाली नसती. कारण आकाशद्रव्य अखंड आहे त्याचे प्रदेश भिन्न भिन्न नाहीत. कालाणू भिन्न भिन्न असल्यामुळेच एक परमाणू मंदगतीने एक कालाणूव्याप्त प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशावर जाऊ शकतो. कालद्रव्य अखंड लोकाकाश प्रमाण मानले असते तर परमाणूंची नियमित मंदगती झाली नसती. त्यामुळे कालद्रव्याची समयपर्याय पण उत्पन्न झाली नसती. दोन दगड भिन्न भिन्न असतील तर एक पाऊल एकावरून उचलून दुसऱ्यावर ठेवले जाते. परन्तु जर सपाट जमीन असेल तर एक नियमितरूपाने पाऊल पडू शकत नाही, कधी जास्त क्षेत्र उल्लंघले जाईल, कधी कमी त्याप्रमाणे कालाणू वेगवेगळे आहेत म्हणून परमाणूंची नियमित मंदगती संभवते. याच गतीच्या सहाय्याने कालाची समय नावाची पर्याय होते. म्हणून कालद्रव्याचा एक प्रदेशपणा सिद्ध होतो.

लोकाकाशामध्ये परमाणू भरलेले आहेत व ते सर्व हलन चलन करीत असतात. एका परमाणूचे थोडे सरकणेच एकावरून दुसऱ्या कालाणूवर जाणे आहे.

समयपर्याय कालद्रव्याचा आहे, माझा नाही. कालद्रव्याचा वर्तमान स्वभाव माझा नाही. म्हणून दुसऱ्या द्रव्याचे मी परिवर्तन केले असा अंहकार मिथ्या आहे. माझा वेळ दुसऱ्यांनी घेतला म्हणून संक्लेश परिणाम करण्याची गरज नाही. कारण वेळ ही पर्याय माझी नाही. त्या वेळेत झालेला आत्म्याचा संक्लेश किंवा विशुद्ध परिणामच आपला स्वकाल आहे म्हणून सतत स्वतःचे अन्वेषण करावे की मी संक्लेश परिणामामध्ये स्थित आहे की विशुद्ध परिणामात आहे.

कालद्रव्याच्या समयाचा विचार सोडून स्वसमयरूप शुद्धात्म्याचा विचार करावा. कालद्रव्याच्या स्वभावाहून भिन्न आपल्या निज ज्ञानानन्दमय स्वभावाला जाणून त्याच्याशी तन्मय व्हावे ज्यामुळे परमानन्द परमशांती समाधान प्राप्त होईल.

मागील गाथेमध्ये कालद्रव्य एकप्रदेशी आहे ही गोष्ट सिद्ध केली. आता कालपदार्थाच्या ठिकाणी द्रव्य व पर्यायाचे वर्णन करतात. प्रत्येक वस्तू द्रव्यगुणपर्यायात्मक आहे. कालपण एक वस्तू आहे म्हणून त्यामध्ये ही द्रव्यगुणपर्याय आहेत. त्यापैकी कालद्रव्य काय आहे? व त्याचा पर्याय काय आहे हे येथे सांगतात.–

वदिवददो तं देसं तस्सम समओ तदो परो पुव्वो ।
जो अत्थो सो कालो समओ उप्पण्णपद्धंसी ।।१३९।।

अन्वयार्थ –(तं देसं) त्या कालाणूने व्याप्त आकाशाच्या प्रदेशाला **(वदिवददो)** उल्लंघन करण्यासाठी जो काल लागतो **(तस्सम समओ)** त्यासमान समय पर्याय आहे **(तदो परो पुव्वो)** त्या समयाच्या पुढे व मागे **(जो अत्थो)** जो पदार्थ आहे **(सो कालो)** ते कालद्रव्य आहे **(समओ उप्पण्णपद्धंसी)** समय पर्याय उत्पन्न होऊन नष्ट होणारा आहे.

तात्पर्य – कालद्रव्य नित्य आहे. समय पर्याय उत्पादविनाशशील आहे.

निश्चयकाल व व्यवहारकाल–

जोपर्यंत एक पुद्गल परमाणू मंदगतीने एक कालाणुव्याप्त आकाशाच्या प्रदेशावरून दुसऱ्या कालाणू व्याप्त आकाशाच्या प्रदेशावर येतो तोपर्यंत

त्यामध्ये जो काळ लागतो तेवढा काळ प्रमाण कालाणुद्रव्याचा समय नावाचा पर्याय होतो. हा कालद्रव्याचा सूक्ष्म पर्याय आहे. यालाच व्यवहार काल म्हणतात.

हा समय पर्याय उत्पन्न होण्यापूर्वी जो आपल्या पूर्व पूर्व समय पर्यायांमध्ये अन्वयरूपाने बरोबर चालत आला आहे व पुढे भविष्यामध्ये होणाऱ्या समय पर्यायांमध्ये अन्वयरूपाने जाईल तो काल द्रव्य नावाचा पदार्थ आहे. कालपदार्थ नित्य आहे. वर्तमान पर्याय उत्पन्न होण्यापूर्वी पण तो होता व समय पर्याय नष्ट झाल्यावर ही असेल. कालद्रव्य अनुत्पन्न अविनष्ट आहे. आणि समयपर्याय उत्पन्नध्वंसी आहे.

ज्यामध्ये उत्पादव्ययध्रौव्य आहे त्यालाच द्रव्य म्हणतात. कालद्रव्याच्या वर्तमान समयपर्यायाचे पुद्गलपरमाणूच्या मंदगतीला सहकारीकारणरूपाने उत्पन्न होणे हा उत्पाद आहे. पूर्व समय पर्यायाचा नाश होणे तो व्यय आहे. पूर्व समयामध्ये जो होता, वर्तमान समयामध्ये आहे व उत्तर समयामध्ये जो असेल तो काल ध्रौव्य आहे. कालद्रव्याचा गुण वर्तना आहे. स्वयं वर्तन करून अन्य द्रव्यांच्या वर्तनामध्ये (प्रवृत्ती, परिणमन यामध्ये) सहकारी आहे.

जयसेनाचार्यांनी या गाथेचा दुसरा अर्थ केवल व्यवहारकालाच्या अपेक्षेने केला आहे. तो असा- वर्तमान समय पर्यायाच्या समान अनंतानंत समय पर्याय भूतकाळामध्ये झाले आहेत आणि अनन्तानन्त समय पर्याय भविष्यामध्ये होतील या सर्व तीन कालवर्ती समयांना व्यवहार काल म्हणतात. समय पर्यायाचे उपादान कारण कालद्रव्य आहे व निमित्त कारण पुद्गल परमाणूंचे मंद गमन आहे. या मंदगतीमध्ये जो काही काळ लागतो तो सर्वात लहान समयरूप कालाचा पर्यायरूप अंश आहे.

समयपर्यायाची निरंशता-

आकाशाचा एक-एक प्रदेश निरंश आहे. त्यावर स्थित प्रत्येक कालद्रव्य निरंश आहे. प्रत्येक कालपदार्थाचा समयपर्यायसुद्धा निरंश आहे. जर समय निरंश नसेल तर आकाशाच्या प्रदेशाचा निरंशपणा होऊ शकणार नाही.

परमाणू मंदगतीने गमन केला तर एका समयात एका आकाशाच्या प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशावर येतो. जर परमाणू शीघ्रगतीने गमन करतो तर तो एका समयात १४ राजू जाऊ शकतो. तरीसुद्धा त्या समयाचे विभाग (अंश) होऊ शकत नाहीत. जेवढा समय परमाणूला जवळच्या कालाणूवर येण्यासाठी

लागतो तेवढाच समय त्याला १४ राजू जाण्यामध्ये लागतो ही परमाणूची विलक्षण गमनशक्ती आहे. ज्याप्रमाणे एका आकाशप्रदेशाची ही विलक्षण अवगाहन शक्ती आहे की तो एका परमाणूने व्याप्त असतानासुद्धा अन्य अनंत परमाणूंना स्थान देऊ शकतो. अनंत परमाणूंना जागा दिली म्हणून त्या एका प्रदेशाचे अनंत अंश होत नाहीत. किंवा अनेक परमाणू एका प्रदेशावर राहिले म्हणून प्रदेशाची निरंशता समाप्त होत नाही. त्याप्रमाणे परमाणू एका समयात १४ राजू गमन केला म्हणून समयाचे असंख्यात अंश होत नाहीत. १४ राजूंचे प्रदेश असंख्यात आहेत. असंख्यात प्रदेशांचे उल्लंघन केले म्हणून समय पर्यायाचे असंख्यात अंश होत नाहीत. परमाणू एका समयात १४ राजू गमन करतो हा परमाणूच्या गमनशक्तीचा प्रताप आहे.

प्रत्येक आकाशाच्या प्रदेशावर भिन्न भिन्न कालाणू आहेत असे मानले तर समय पर्याय होऊ शकते. भिन्न भिन्न कालाणू आहेत म्हणून एका कालाणूवरून दुसऱ्या कालाणूवर जाताना समय पर्याय प्रकट होतो. एक अखंड लोकाकाशप्रमाण कालद्रव्य मानले तर नियमित गतीचा अभाव झाल्यामुळे समय पर्याय होऊ शकत नाही. कालद्रव्य अनादि अनंत आहे. समयरूप परिणमन ज्या द्रव्यातून उत्पन्न होते ते कालद्रव्य आहे. समय हा कालद्रव्याचा पर्याय आहे. अतीत व अनागत संख्यात, असंख्यात व अनंत समय आहेत.

ह्या जीवाचा अनादिकाळापासून संसार परिभ्रमण करीत अनंत काळ व्यतीत झाला तरीसुद्धा स्वसमयरूप आत्म्याचे ज्ञान व श्रद्धान न झाल्यामुळे एक क्षणही निराकुल सुख मिळाले नाही. 'गई सो गयी, अब राख रही को' या उक्तीप्रमाणे गतकाळाचा विचार न करता वर्तमान क्षण आनंदात घालवावा. संसारवनात भटकणाऱ्या या आत्म्याला आता तरी मोक्षमार्गात स्थापन करावे. निज शुद्धात्म्याचे श्रद्धान, ज्ञान व अनुभव करणे हाच निश्चय मोक्षमार्ग आहे. निश्चय मोक्षमार्गच निज परमात्म स्वभावाच्या प्राप्तीचा उपाय आहे. वर्तमान क्षणाचे दान आत्मानुभवासाठी द्या तर तो आत्मानुभव महामोक्षपद रूप फळ देईल.

आता यापुढील गाथेमध्ये प्रदेशाचे स्वरूप सांगतात,-

आगासमणुणिविट्ठं आगासपदेससण्णया भणिदं।
सव्वेसिं च अणूणं सक्कदि तं देदुमवगासं।।१४०।।

अन्वयार्थ -(**अणुणिविट्ठं आगासं**) एका परमाणूने व्याप्त आकाश

(**आगासपदेससण्णया**) 'आकाशप्रदेश' या नावाने (**भणिदं**) सांगितला गेला आहे. (**च**) आणि (**तं**) तो (**सव्वेसिं अणूणं**) सर्व परमाणूंना (**अवगासं देदुम्**) अवकाश देण्यास (**सक्कदि**) समर्थ आहे.

तात्पर्य– एक परमाणू जेवढ्या आकाशावर राहतो, तो एक प्रदेश आहे. हा प्रदेश सर्व परमाणूंना स्थान देण्यास समर्थ आहे.

आकाशाची अवगाहनशक्ती–

या गाथेमध्ये आकाशाच्या प्रदेशाचे सामर्थ्य सांगितले आहे. जेवढ्या आकाशाला एक पुद्गल परमाणू रोकतो त्याला प्रदेश म्हणतात. त्या प्रदेशामध्ये एवढे सामर्थ्य आहे की सुट्टे अनंतानंत परमाणू तेवढ्याच जागेमध्ये मावू शकतात. एवढेच नव्हे तर सूक्ष्म अनेक स्कंधसुद्धा त्यामध्ये सामावतात. परमाणूमध्ये अडथळा आणण्याची शक्ती नाही. कारण परमाणू सूक्ष्म सूक्ष्म आहे. आजकाल विज्ञानाने पण अनेक शोध लावले आहेत. छोट्याशा मेमरीकार्डमध्ये हजारो प्रवचनाच्या शब्दांना सामावून घेण्याची क्षमता आहे हे प्रत्यक्षच प्रतीतीला आले आहे. लोकाकाशाचे प्रदेश असंख्यात आहेत तरीपण त्यामध्ये असंख्यात कालाणू, धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, अनन्तानन्त जीव, तसेच जीवाहून अनंतपट पुद्गलद्रव्य समाविष्ट आहेत व सुखाने राहतात. ही गोष्ट प्रत्यक्ष आहे की प्रकाशाचे पुद्गल स्थूल सूक्ष्म जातीचे आहेत तरीसुद्धा एका खोलीत एका ट्यूबलाईटचा प्रकाश पसरतो तेथेच हजार ट्यूबलाईट लावल्या तर त्यांचा प्रकाशसुद्धा त्या तेवढ्याच एका खोलीतच सामावू शकतो. त्या खोलीच्या आकाशाने तसेच स्थूलसूक्ष्म प्रकाशाने अन्य प्रकाशांना येण्यास अडथळा केला नाही. त्याच खोलीत अनेक उदबत्त्या लावल्या तर त्यांचा सुगंध तेथे मावू शकतो. भूसा भरला तर तोपण मावू शकतो. अनेक छोटे छोटे जन्तू पण फिरू शकतात. मनुष्य बसले उठले तर त्यांनापण त्या खोलीत अवकाश मिळू शकतो. त्या खोलीचे दृश्यच आपल्याला हे समाधान देते की लोकाकाशामध्ये अनन्तानन्त द्रव्यांना जागा मिळण्यामध्ये काही बाधा नाही.

आगमामध्ये तर हे सांगितले आहे की एका स्कंधामध्ये (एका प्रत्येक शरीरात) असंख्यात लोक प्रमाण अंडर आहेत. एका अंडरात असंख्यात लोकप्रमाण आवास आहेत. एका आवासात असंख्यात लोकप्रमाण पुलवी आहेत. एका पुलवीमध्ये असंख्यात लोकप्रमाण निगोद शरीरे आहेत. एका निगोद शरीरात सिद्धराशीहून अनंतपट निगोदीजीव आहेत. प्रत्येक जीवाच्या

एकेका प्रदेशावर अनंतानंत कर्म परमाणू व एकेका कर्म परमाणूवर अनंतानंत विस्रसोपचय परमाणू, अनंतानंत नोकर्मपरमाणू व एकेका नोकर्मपरमाणूवर त्यांचे विस्रसोपचय परमाणू, अनंतानंत तैजस शरीराचे परमाणू व त्यांचे अनंतानंत विस्रसोपचयरूप परमाणू इत्यादी स्थित आहेत. जीवाच्या एका प्रदेशावर एवढे तर एका जीवाच्या असंख्यात प्रदेशावर किती? व एका जीवाच्या प्रदेशांवर एवढे परमाणू तर अनंतानंत जीवांचे मिळून किती परमाणूद्रव्य, एका शरीरात एवढे तर असंख्यात शरीरांचे मिळून किती होतील. ही सर्व आकाशाची एक विलक्षण अवकाशदान शक्ती आहे सूक्ष्म स्कंध व परमाणूंमध्येही सूक्ष्मत्वशक्ती व अवकाश दानशक्ती आहे.

अखंड आकाशामध्ये खंडकल्पना–

आकाशद्रव्य यद्यपि एक अखंड द्रव्य आहे तथापि आकाशाचा असीम विस्तार असल्यामुळे त्यामध्ये अंशकल्पना केली जाते. आकाशाचे अंश आहेत. म्हणूनच दोन बोटांचे स्थान भिन्न आहे. दृश्यमान सर्व पदार्थ भिन्न भिन्न स्थानांमध्ये दिसतात. टीकेमध्ये अमृतचन्द्र आचार्यांनी दृष्टान्त देऊन तर्कपूर्ण शैलीमध्ये सिद्ध केले आहे. ते म्हणतात.– आकाशामध्ये अंश नाहीत अशी कोणाची मान्यता असेल तर त्यांनी आकाशामध्ये दोन बोटे पसरून सांगावे की दोन बोटांचे क्षेत्र एक आहे की अनेक आहे. जर एक म्हणाल तर पुन्हा दोन प्रश्न उपस्थित होतात. १) अभिन्न अंशरूप अविभागी एक द्रव्यपणा असल्यामुळे दोन बोटांचे एक क्षेत्र आहे की भिन्न अंशरूप अविभागी एक द्रव्यपणा असल्यामुळे एक क्षेत्र आहे ? जर अभिन्न अंशरूप अविभागी एक द्रव्यपना असल्यामुळे दोन बोटांचे एक क्षेत्र आहे असे म्हणाल तर जे स्थान एका बोटाचे आहे तेच स्थान दुसऱ्या बोटाचे पण असायला पाहिजे. असे झाले तर दोन बोटे एकत्रच रहावे लागतील. त्यातील एका बोटाच्या स्थानाचा अभावच होईल. अशाप्रकारे एकापेक्षा अधिक अंशांचा अभाव झाल्यामुळे आकाश परमाणूप्रमाणे प्रदेशमात्र सिद्ध होईल. सर्व जीव, पुद्गल भिन्न भिन्न स्थानात दिसणार नाहीत हा दोष येतो म्हणून हा पक्ष श्रेयस्कर नाही.

जर दुसरा पक्ष आकाश भिन्न अंशरूप अविभाग एक द्रव्य आहे म्हणून दोन बोटांचे एक क्षेत्र आहे असे स्वीकारले तर मग बरोबरच आहे की अविभाग एका द्रव्यामध्ये अंशकल्पना आहे.

जर म्हणाल की दोन बोटांचे एक क्षेत्र नाही, अनेक क्षेत्र आहे, तर पुन्हा दोन प्रश्न उपस्थित होतात. आकाश खंडरूप अनेक द्रव्य आहे म्हणून दोन

बोटांचे अनेक क्षेत्र आहे की आकाशाचा अविभाग एकद्रव्यपणा असूनसुद्धा दोन बोटांचे क्षेत्र अनेक क्षेत्र आहे ?

जर यातील पहिला पक्ष आकाश खंडरूप अनेक द्रव्य आहे म्हणून अनेक क्षेत्र आहे असा स्वीकारला तर आकाशद्रव्ये अनन्त मानण्याचा प्रसंग येईल. परंतु तसे तर नाही. आकाशद्रव्य एकच आहे हा दोष येऊ नये म्हणून दुसरा पक्ष स्वीकारला की अविभाग एक द्रव्य असूनही अनेक क्षेत्र आहे, तर मग अविभाग एक द्रव्यामध्ये अंशकल्पना सिद्ध होते.

जयसेनाचार्यांनी दोन मुनींचे उदाहरण घेऊन आकाशामध्ये खंडकल्पना सिद्ध केली आहे. चिदानन्दमयी एक स्वभावरूप निज आत्मतत्त्वामध्ये परम एकाग्रता स्वरूप समाधीमध्ये लीन, अविकार आत्मिक सुखामृतरसामध्ये तृप्त दोन मुनींचे राहण्याचे क्षेत्र एक आहे की अनेक आहे? जर एकच स्थान आहे असे म्हणाल तर दोन मुनींच्यामध्ये एकत्व प्राप्त होईल, परंतु तसे तर दिसत नाही. दोन मुनी भिन्न भिन्न क्षेत्रामध्ये स्थित आहेत. आणि जर त्यांचे क्षेत्र भिन्न भिन्न आहे असे म्हणाल तर अखंड आकाशामध्ये खंडकल्पना (प्रदेशविभाग) मानण्यामध्ये विरोध नाही ही गोष्ट सिद्ध होते. म्हणून आकाश एक अखंड द्रव्य असूनही त्यामध्ये अंशभेद आहे. आकाश अनन्तप्रदेशी एक अभिन्न द्रव्य आहे.

आकाशाप्रमाणेच मी पण एक अखंड द्रव्य आहे, असंख्यातप्रदेशी असूनही अखंड आहे, निरंश आहे. या माझ्या अखंडप्रदेशामध्ये ज्ञानादी अनंत गुण भरलेले आहेत. मी असंख्यात प्रदेशांचा एक अखंड पिण्ड व अनन्तगुणांचा एक अखंड पिण्ड आहे असा अनुभव करावा.

पूर्व गाथेमध्ये कालद्रव्याच्या बाह्य आधारभूत आकाशप्रदेशाचे लक्षण सांगितले होते. आता या गाथेमध्ये तिर्यक्प्रचय (प्रदेशसमूह) आणि ऊर्ध्वप्रचयाचे (पर्यायसमूह) वर्णन करीत सांगितले आहे की कालद्रव्याचा तिर्यक्प्रचय नाही. कारण कालद्रव्य एकप्रदेशीच आहे.-

एक्को व दुगे बहुगा संखातीदा तदो अणंता य ।
दव्वाणं च पदेसा संति हि समय त्ति कालस्स।।१४१।।

अन्वयार्थ – (दव्वाणं) द्रव्यांचे **(एक्को)** एक **(दुगे)** दोन **(बहुगा)** पुष्कळ **(संखातीदा)** असंख्यात **(य)** आणि **(तदो अणंता)** त्यानंतर अनन्त **(पदेसा)** प्रदेश **(संति)** आहेत. **(हि)** परन्तु **(कालस्स)** कालाचे **(समय त्ति)** समयच आहेत अर्थात् अनेक प्रदेश नाहीत.

तात्पर्य – कालद्रव्याचे अनेक प्रदेश नसल्यामुळे तिर्यक्प्रचय नाही, समय असल्यामुळे ऊर्ध्वप्रचयच आहे.

तिर्यक्प्रचय आणि ऊर्ध्वप्रचयाचे स्वरूप–

प्रदेशांच्या समूहाला तिर्यक्प्रचय म्हणतात व समया-समयामध्ये होणाऱ्या पर्यायांच्या समूहाला ऊर्ध्वप्रचय म्हणतात.

एकाच समयामध्ये क्रमाशिवाय अनेक प्रदेशांच्या समूहाचे ज्ञान करून देणारे विस्तार तिर्यक्प्रचय आहे. अनंत समयांमध्ये क्रमाने होणाऱ्या पर्यायांच्या समूहाचे ज्ञान करून देणारा ऊर्ध्वप्रचय आहे. ज्याप्रमाणे तिर्यक्प्रचय मैदान आहे व ऊर्ध्वप्रचय शीडी आहे. ज्याप्रमाणे मैदान एकाच पंक्तीवर विस्तृत आहे त्याप्रमाणे तिर्यक्प्रचय एकाचवेळी असणाऱ्या प्रदेशांचा समूहरूप आहे. ज्याप्रमाणे शीडीमध्ये अनेक पायऱ्या वर-खाली असतात. क्रमाक्रमाने एकेक पायरी वर आहे. त्याप्रमाणे ऊर्ध्वप्रचय क्रमाक्रमाने एक-एक पर्यायरूप आहे. तिर्यक्प्रचय द्रव्याचा विस्तार आहे आणि ऊर्ध्वप्रचय द्रव्याची लांबी रूप आहे.

द्रव्यांमध्ये तिर्यक्प्रचयाचा सद्भाव असद्भाव–

आकाशद्रव्याचे अवस्थित अनन्तप्रदेश आहेत त्यामुळे आकाशद्रव्याचा तिर्यक्प्रचय आहे. आकाशद्रव्याचे प्रदेश कमी-जास्त पण होत नाहीत व संकोचविस्ताररूप होत नाहीत त्यामुळे अवस्थित आहेत. धर्मद्रव्य व अधर्मद्रव्याचे पण अवस्थित असंख्यात प्रदेश आहेत. संपूर्ण लोकाकाशभर धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य पसरलेले आहे म्हणून धर्मद्रव्य व अधर्मद्रव्याचा तिर्यक्प्रचय आहे. जीवाचे लोकाकाशाप्रमाणे असंख्यात प्रदेश आहेत. परंतु ते अनवस्थित आहेत. प्रदेशांची संख्या कमी-जास्त होत नाही. परंतु प्रदेशांची अवगाहना कमी-जास्त होते. जीवाच्या प्रदेशांमध्ये संकोचविस्ताररूप होण्याची शक्ती आहे. त्यामुळे संसार अवस्थेमध्ये प्रदेश लहान-मोठ्या शरीरप्रमाण होतात, म्हणून त्यास अनवस्थित म्हणतात. अनवस्थित असले तरी असंख्यातप्रदेश विस्तृत आहेत, म्हणून जीवाचा पण तिर्यक्प्रचय आहे.

पुद्गल द्रव्य परमाणू एकप्रदेशी असला तरी अनेक प्रदेशी होण्याची शक्ती असल्यामुळे व स्कंधपर्यायाच्या अपेक्षेने दोन अथवा बहुप्रदेशी असल्यामुळे पुद्गलद्रव्याचा तिर्यक्प्रचय आहे. परन्तु कालद्रव्याचा तिर्यक्प्रचय नाही. कारण ते शक्ती व व्यक्तीच्या अपेक्षेने एकप्रदेशवाला आहे. म्हणून ते अस्तिकाय नाही. एकाच समयामध्ये द्रव्याच्या विस्ताराचे ज्ञान

तिर्यक्प्रचयाने होते.

द्रव्यांमध्ये ऊर्ध्वप्रचयाचा सद्भाव–

सर्वच द्रव्ये परिणमनशील आहेत. त्यामध्ये क्रमाने पर्याय उत्पन्न होतात. एका समयामध्ये एक पर्याय असतो. प्रत्येक समयात पूर्व पर्याय नष्ट होतो व नवीन पर्याय उत्पन्न होतो. जर तीन काळाच्या अपेक्षेने मागच्या व पुढच्या पर्यायांचा जोड आपल्या ध्यानात घेतला तर अनेक पर्यायांचा समूह बुद्धीमध्ये झळकतो व पर्यायांच्या समूहालाच ऊर्ध्वप्रचय म्हणतात. जसे आपल्याला कळत असल्यापासून त्या आतापर्यंतच्या क्रमाक्रमाने झालेल्या विविध अवस्था आपल्या ज्ञानामध्ये झळकतात. त्या अवस्थांचा समूह म्हणजेच ऊर्ध्वप्रचय आहे.

कालक्रमाने होणाऱ्या समयांचा समूह हाच कालद्रव्याचा ऊर्ध्वप्रचय आहे. त्या समयांमध्ये होणाऱ्या आपापल्या पर्यायांचा समूह हा अन्यद्रव्यांचा ऊर्ध्वप्रचय आहे. कालाशिवाय अन्य पाच द्रव्यांमध्ये ऊर्ध्वप्रचय त्या द्रव्यांच्या उपादानकारणरूप परिणमनाने होतो. परंतु त्यांचा बोध कालाच्या समय पर्यायांद्वारे होतो म्हणून कालाचे समय अन्य द्रव्याच्या पर्यायांना सहकारी कारण आहेत.

कालद्रव्याच्या समय पर्यायांचा समूहरूप जो ऊर्ध्वप्रचय आहे त्याचे उपादान कारण ज्याप्रमाणे कालद्रव्य आहे त्याचप्रमाणे त्याचे सहकारी कारणसुद्धा कालद्रव्यच आहे. 'समय' हाच कालद्रव्याचा पर्याय आहे. त्या समयात होणारा अन्यद्रव्याचा पर्याय त्या समयाहून भिन्न आहे म्हणून अन्यद्रव्यांचा ऊर्ध्वप्रचय समयविशिष्ट पर्यायांचा समूह स्वरूप आहे. व समयांचा समूह हाच कालद्रव्याचा ऊर्ध्वप्रचय आहे. जसे ६० वर्षे हा कालाचा ऊर्ध्वप्रचय व त्या ६० वर्षात झालेल्या जीवाच्या शिशु, बालक, तरूण, प्रौढ अवस्था हा जीवाचा ऊर्ध्वप्रचय आहे. यामध्ये ज्या शरीराच्या अवस्था आहेत. तो पुद्गलाचा ऊर्ध्वप्रचय आहे व चैतन्याच्या ज्या अवस्था आहेत तो जीवाचा ऊर्ध्वप्रचय आहे.

ज्याप्रमाणे अन्यद्रव्यांच्या पर्यायांना मोजण्यासाठी कालाचे समय कारण आहेत त्याप्रमाणे कालाच्या पर्यायांना मोजण्यासाठी कालाचे समयच कारण आहेत. म्हणून कालाच्या ऊर्ध्वप्रचयासाठी काळालाच उपादान व निमित्त म्हटले आहे.

सर्व द्रव्यांमध्ये ऊर्ध्वप्रचय आणि तिर्यक्प्रचय दोन्ही आहेत. फक्त कालद्रव्यामध्ये तिर्यक्प्रचय नाही. पाच द्रव्ये अस्तिकाय आहेत, पण कालद्रव्य अस्तिकाय नाही.

मी एक जीवद्रव्य आहे. माझा ही तिर्यक्प्रचय व ऊर्ध्वप्रचय आहे. निज असख्यात प्रदेश हा माझा विस्तार आहे व अनादिअनन्त पर्यायसमूह ही माझी लांबी आहे. असंख्यात प्रदेशांचा समूह हेच माझे क्षेत्रात्मक अस्तित्व आहे व क्रमाक्रमाने माझ्यामध्ये पर्याय होत आहेत. हा ऊर्ध्वप्रचयच माझे कालात्मक अस्तित्व आहे. स्वद्रव्यक्षेत्रकालभावात्मक अस्तित्वाला जाणल्यामुळे स्वची प्रतीती होते. प्रथमतः आपल्या अस्तित्वाला जाणण्याकरिता द्रव्यक्षेत्र-कालभावरूपाने भेद करून जाणावे. स्वतःची ओळख झाल्यावर प्रचयाच्या विकल्पाला सोडून अखंड शुद्ध चिन्मात्र अन्तस्तत्त्वाचा अनुभव करावा.

मागील गाथेत कालद्रव्याचा ऊर्ध्वप्रचयच आहे. तिर्यक्प्रचय नाही ही गोष्ट सिद्ध केली. आता या गाथेत कालद्रव्याच्या ऊर्ध्वप्रचयामध्ये अन्वयाचा अभाव नाही अर्थात कालाच्या समयपर्यायांमध्ये कालद्रव्य अन्वयरूपाने आहे ही गोष्ट सिद्ध करतात. कालद्रव्य सुद्धा उत्पादव्ययध्रौव्यात्मक व गुण-पर्यायात्मक एक पदार्थ आहे हे सांगतात-

उप्पादो पद्धंसो विज्जदि जदि जस्स एकसमयम्हि।
समयस्स सो वि समओ सभावसमवट्ठिदो हवदि।।१४२।।

अन्वयार्थ – (**जस्स समयस्स**) ज्या कालाचा (**एकसमयम्हि**) एका समयामध्ये (**उप्पादो पद्धंसो**) उत्पाद आणि विनाश (**जदि**) जर (**विज्जदि**) प्राप्त होतो (**सोवि समओ**) तर तो सुद्धा कालाणू (**सभावसमवट्ठिदो**) स्वभावामध्ये अवस्थित अर्थात् ध्रुव (**हवदि**) आहे.

तात्पर्य– कालद्रव्य सुद्धा उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे.

कालद्रव्याचे अविभागी परिणमन समय आहे. प्रत्येक समय परिणमन एकेक समयच राहते. म्हणून समय परिणमन उत्पन्न व नष्ट होते. परंतु समय पर्यायाचे उपादानभूत कालद्रव्य ध्रुवच राहते. समय परिणमन वृत्त्यंश आहे आणि कालद्रव्य वृत्तिमान आहे. म्हणून एका कालद्रव्यामध्ये समय नामक वृत्यंशांचा वृत्त्यंशांचा उत्पादव्यय संभव आहे. एकाच समयामध्ये कालद्रव्याच्या वर्तमान समय पर्यायाचा उत्पाद व पूर्व समयपर्यायाचा विनाश होतो.

जर कालद्रव्य मानले नाही, केवळ समय परिणमनच मानले तर दोन

प्रश्न उपस्थित होतात त्या एक समय पर्यायाचा उत्पाद व नाश एका समयात होतो की क्रमाने होतो ? एका समयात एका समय पर्यायाचा उत्पाद व्यय होतो असे मानणे योग्य नाही. कारण एका समय पर्यायाचे दोन विरुद्ध स्वभाव असू शकत नाहीत.

त्याचाच जन्म व त्याचाच नाश परस्पर विरुद्ध आहे. जर समय पर्यायामध्ये उत्पादव्यय क्रमाने होतात असे मानले तर ते पण योग्य नाही. कारण समय अत्यन्त सूक्ष्म आहे. त्याचा विभाग होऊ शकत नाही आणि तो स्थिर पण राहू शकत नाही. म्हणून जेव्हा वर्तमान समय पर्यायाचा उत्पाद होतो त्याचवेळी पूर्व समय पर्यायाचा व्यय होतो. या दोन्ही अवस्थांमध्ये राहणारा कोणीतरी अवश्य मानला पाहिजे तोच समय पदार्थ आहे. त्या समय पदार्थामध्ये एकाच वर्तनेच्या अंशामध्ये उत्पाद आणि व्यय संभव आहे.

जर कालद्रव्याच्या वर्तमान समय परिणमनाचा उत्पाद आहे. पूर्व समयपरिणमनाचा व्यय आहे तर दोन्हींचा आधारभूत कालद्रव्य निरन्वय कसे असू शकते ? कालद्रव्य ध्रुव आहे. त्याच्या समय नावाच्या परिणमनांची संतती चालू राहते. समय पर्याय कालद्रव्याशिवाय होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे जीवद्रव्य ध्रुव मानून त्यामध्ये मनुष्य पर्यायाचा नाश व देव पर्यायाचा उत्पाद मानता येतो त्याप्रमाणे कालद्रव्याला ध्रुव मानून त्यामध्ये पूर्व समय पर्यायाचा नाश आणि वर्तमान समय पर्यायाचा उत्पाद सिद्ध होऊ शकतो. कोणते तरी आधारभूत द्रव्य असतानाच त्यामध्ये अवस्था होऊ शकतात. ज्याप्रमाणे सुवर्ण द्रव्य आधारभूत स्थिर असताना त्यामध्ये कुंडल पर्यायांचा नाश होऊन कंकण पर्यायाचा उत्पाद होऊ शकतो. केवळ कुंडल पर्यायमात्रामध्ये नाश व उत्पाद होऊ शकत नाही. अन्वयरूपाने सुवर्ण स्थिर असतानाच त्यामध्ये दोन भिन्न भिन्न समयांच्या अपेक्षेने दोन भिन्न पर्याय होऊ शकतात. एका क्षणामध्ये एकच पर्याय झळकते.

वास्तविक प्रत्येक द्रव्य आपल्यामध्ये आपल्या अनन्त पर्यायांना शक्तिरूपाने ठेवते. त्यापैकी एका क्षणामध्ये एक पर्याय प्रगट होतो. अन्य सर्व पर्याय शक्तिरूपाने राहतात. कालद्रव्य रूप कालाणू आपल्यामध्ये होणाऱ्या अनन्त समय पर्यायांना शक्तिरूपाने ठेवतो. त्यामधूनच एका क्षणामध्ये एक समय पर्याय प्रगट होतो, अन्य सर्व पर्याय अप्रगट असतात. तत्त्वार्थसूत्रामध्ये पण सांगितले आहे की '**कालश्च**' '**सो अनन्तसमयः**' कालद्रव्य आहे व ते अनन्त समयांना आपल्यामध्ये ठेवते. यावरून कालद्रव्याची सत्ता सिद्ध होते.

ज्याप्रमाणे समयपर्यायांचे उपादानभूत कालद्रव्य आहे त्याप्रमाणे आपल्या अनन्त अर्थपर्यायांचे उपादानभूत स्वात्मद्रव्य आहे त्याचा परिचय प्राप्त करून पर्यायांचा विकल्प सोडून द्यावा. त्या पर्यायांच्या उपादानभूत कारणसमयसारस्वरूप निज परमात्मद्रव्याची आराधना करावी.

मागील गाथेमध्ये ज्याप्रमाणे एका वर्तमान समयांमध्ये कालद्रव्याचा उत्पादव्ययध्रौव्यपणा सिद्ध केला त्याचप्रमाणे सर्व समयांमध्ये उत्पादव्ययध्रौव्यपणा आहे हे आता या गाथेमध्ये सिद्ध करतात –

एगम्हि संति समये संभवठिदिणाससण्णिदा अट्ठा।
समयस्स सव्वकालं एस हि कालाणुसब्भावो।।१४३।।

अन्वयार्थ – (एगम्हि समये) प्रत्येक एका समयामध्ये **(संभवठिदिणाससण्णिदा अट्ठा)** उत्पाद, ध्रौव्य आणि व्यय नावाचे अर्थ **(समयस्स)** कालद्रव्याचे **(सव्वकालं)** सर्वकाल (सदा) **(संति)** होतात. **(एस हि)** वास्तविक हाच **(कालाणुसब्भावो)** कालाणूचा सद्भाव आहे. अर्थात हीच कालाणूच्या अस्तित्वाची सिद्धी आहे.

तात्पर्य – कालद्रव्य प्रतिसमय उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. अशाप्रकारे याचे सदा अस्तित्व आहे.

कालद्रव्याच्या उत्पादव्ययध्रौव्यत्वाची सिद्धी –

कालद्रव्य नित्य आहे. एक कालाणू एक स्वतंत्र कालद्रव्य आहे. याप्रमाणे लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एकेक असे असंख्यात कालाणू आहेत.

द्रुधातूपासून द्रव्य शब्द उत्पन्न झाला आहे. द्रु म्हणजे द्रवणे, वाहणे द्रव्य सदा प्रवाहरूपाने उत्पादव्ययस्वभावाला घेऊन असते. द्रव्य प्रत्येक पर्यायामध्ये अन्वयरूपाने प्रवाहित होते हे द्रव्याचे लक्षण कालद्रव्यामध्ये सुद्धा घटित होते. कालद्रव्याचा वर्तना (परिणमन करविणे) हा गुण आहे. त्या वर्तना गुणाचा पर्याय समय आहे. पर्याय एक समय मात्र असतो. प्रत्येक समयामध्ये पूर्व समय पर्यायाचा नाश होतो उत्तर समय पर्यायाचा उत्पाद होतो व त्या दोघांचा आधारभूत कालद्रव्य ध्रुव असते. जेव्हा एक पर्याय उत्पन्न होतो तो जुन्या पर्यायाचा नाश करूनच उत्पन्न होतो व पर्यायांचा उत्पाद–व्यय आधाराशिवाय होत नाही.

ज्याप्रमाणे अंगठा वाकडा केला तेव्हा अंगठ्याच्या पूर्व सरळ

अवस्थेचा नाश झाला व वक्र अवस्थेचा उत्पाद झाला आणि या दोन्ही अवस्थांचा आधारभूत अंगठा द्रव्य ध्रौव्य आहे त्याप्रमाणे ज्या क्षणी कालद्रव्याच्या वर्तमान समयपर्यायाचा उत्पाद आहे त्याच क्षणी पूर्व समय पर्यायाचा नाश आहे व कालद्रव्य ध्रुव आहे.

ज्याप्रमाणे जेव्हा भाताचा एक कण दाबून पाहतो तो शिजला आहे हे समजते तेव्हा सर्व भाताचे कण शिजले आहेत याचे अनुमान होते. त्याप्रमाणे एका पर्यायामध्ये कालद्रव्याचे उत्पादव्ययध्रौव्यरूप अस्तित्व पाहून सर्व पर्यायांमध्ये कालद्रव्याचे उत्पादव्ययध्रौव्यरूप अस्तित्व आहे ही गोष्ट सिद्ध होते. विशेष अस्तित्व सामान्य अस्तित्वाशिवाय असू शकत नाही. ज्याप्रमाणे पीठाच्या अस्तित्वाशिवाय चपाती, पूरी, पराठा यांचे अस्तित्व होऊ शकत नाही. दूधाशिवाय गुलाबजामून नाही. सुवर्णाशिवाय अंगठी नाही. कालरूप सामान्य अस्तित्वाशिवाय समयपर्यायरूप विशेष अस्तित्व असू शकत नाही. हीच कालपदार्थाच्या सद्भावाची सिद्धी आहे. कारण सामान्य अस्तित्व व विशेष अस्तित्व अस्तित्वाशिवाय सिद्ध होऊ शकत नाही. अस्तित्वाचेच सामान्य अस्तित्व व विशेष अस्तित्व हे दोन भेद आहेत. म्हणून केवळ व्यवहार कालद्रव्याचा स्वीकार करून निश्चय कालद्रव्याचा निषेध करणे योग्य नाही. कोणता ही स्वभाव कोणत्या तरी स्वभावांशिवाय असू शकत नाही. समय नावाचा व्यवहार काल जर प्रसिद्ध आहे आणि तो क्षणाक्षणात नष्ट होतो तर तो कोणत्यातरी द्रव्याचा पर्याय आहे हे स्वीकारावे लागेल. ज्याचा समय पर्याय आहे तेच कालद्रव्य नित्य आहे.

अशाप्रकारे कालद्रव्याचे अनन्तानन्त समय व्यतीत झाले तरीपण अजून सिद्धसमान शुद्ध आत्म्याचा निजस्वभाव प्राप्त झाला नाही. म्हणून या मनुष्य पर्यायाच्या थोड्या समयांना अत्यंत अमूल्य समजून स्वभावप्राप्तीचा पुरुषार्थ करावा.

मोक्षप्राप्तीसाठी काललब्धी बाह्य सहकारी कारण आहे. निश्चय नयाने शुद्ध आत्मतत्त्वाचे श्रद्धान, ज्ञान, चारित्र व परद्रव्याच्या इच्छेचा निरोधरूप तपश्चरण या चार प्रकारच्या आराधना उपादान कारण आहेत. कालद्रव्य उपादान कारण नाही, म्हणून ते सोडण्यायोग्य आहे.

ज्याप्रमाणे समय नामक परिणमनविशेषाहून अविनाभावी अशा कालद्रव्याचा परिचय प्राप्त होतो. **त्याप्रमाणे भावरूप परिणमनविशेषाहून**

अविनाभावी निज आत्मद्रव्याचा परिचय करून घ्यावा व परिणमन विशेषाचा विकल्प सोडून निज परमात्मद्रव्यामध्ये उपयोग लावावा व तेथेच रमवावा हेच या मनुष्यभवात करण्यायोग्य कार्य आहे.

पूर्व गाथेमध्ये कालपदार्थाची उत्पादव्ययध्रौव्य-मयता सिद्ध केली. आता कालद्रव्याचे अस्तित्व अन्यथा असू शकत नाही या हेतूने कालद्रव्याचा प्रदेशमात्रपणा सिद्ध करतात. अर्थात कालाचा एक प्रदेश आहे. कारण प्रदेशाशिवाय कालद्रव्य कोठे राहणार ? प्रदेशाशिवाय कालद्रव्याचे अस्तित्व संभवत नाही हे सिद्ध करतात.-

जस्स ण संति पदेसा पदेसमेत्तं वा तच्चदो णादुं ।
सुण्णं जाण तमत्थं अत्थंतरभूदमत्थीदो ।।१४४।।

अन्वयार्थ - (जस्स) ज्या पदार्थाचे **(पदेसा)** प्रदेश **(वा)** अथवा **(पदेसमेत्तं)** एक प्रदेश सुद्धा **(तच्चदो)** वास्तविक **(णादुं ण संति)** जाणले जात नाहीत. **(तमत्थं)** त्या पदार्थाला **(सुण्णं)** शून्य **(जाण)** जाणा, कारण तो **(अत्थीदो अत्थंतरभूदं)** अस्तित्वाहून अर्थांतरभूत अर्थात भिन्न आहे.

तात्पर्य- ज्याचा एकसुद्धा प्रदेश नाही तो पदार्थच नाही.

उत्पादव्ययध्रौव्याची ऐक्यरूप वृत्ती म्हणजेच अस्तित्व-

जेथे उत्पादव्ययध्रौव्याची एकता आहे तेथेच अस्तित्व सिद्ध होते. उत्पादव्ययध्रौव्य संपूर्णच एक द्रव्य आहे. अन्य अन्य द्रव्य नाहीत. उत्पाद भिन्न द्रव्याचा, व्यय भिन्न द्रव्याचा व ध्रौव्य भिन्न द्रव्याचा असे नाही. या तिघांमध्ये समयभेद पण नाही. उत्पादाचा क्षण भिन्न, व्ययाचा क्षण भिन्न व ध्रौव्याचा समय भिन्न असे पण नाही. एकाच द्रव्यामध्ये एका समयामध्ये या तिघांची जी ऐक्यात्मक प्रवृत्ती आहे. हेच द्रव्याचे अस्तित्व आहे. जे सत् आहे ते उत्पादव्ययध्रौव्यात्मकच आहे. कुंडलाचा नाश, अंगठीचा उत्पाद व सुवर्णत्वाचे ध्रौव्य हे तिन्ही मिळून सोन्याचे अस्तित्व आहे.

प्रदेशाच्या अभावात वृत्तिमानाचा (द्रव्याचा) अभाव-

प्रत्येक द्रव्य प्रदेशात्मक असते. वृत्ती म्हणजे पर्याय व वृत्तिमान म्हणजे द्रव्य. प्रदेशाशिवाय द्रव्याचे अस्तित्व सिद्ध होऊ शकत नाही. जर कालद्रव्याचे प्रदेश नसतील तर कालद्रव्याचा सद्भाव सिद्ध होऊ शकत नाही. जो प्रदेशवान् आहे तोच काल पदार्थ आहे. प्रदेशच मानला नाही तर द्रव्य कोठे राहणार. प्रत्येक द्रव्य आपापल्या क्षेत्रामध्ये स्थित आहे. प्रदेशाच्या अभावामध्ये

वृत्तिमान द्रव्याचा अभाव आहे तर वृत्ती (पर्याय) कशी संभवू शकेल. कोणी मतवादी म्हणतो की केवळ समयपर्यायरूप वृत्तीच मानावी. कालाणू पदार्थाची काय आवश्यकता आहे ? त्याचे समाधान करताना आचार्य म्हणतात– केवळ समयपर्याय काल होऊ शकत नाही.

कारण वृत्तिमानाशिवाय वृत्ती होऊ शकत नाही. जर अंगठाच नसेल तर वक्र पर्यायाचा उत्पाद व पूर्व सरळ पर्यायाचा विनाश व दोघांचे आधारभूत ध्रौव्य कोणाचे होणार ? अर्थात कोणाचेही होणार नाही. त्याचप्रमाणे कालद्रव्याच्या अभावामध्ये वर्तमान समयपर्यायाचा उत्पाद, पूर्व समय पर्यायाचा विनाश तसेच दोन्ही समयांचे आधारभूत ध्रौव्य कोणाचे होणार ? जर सत्ताभूत पदार्थ मानला नाही तर विनाश कोण्या दुसऱ्याचा, उत्पाद कोण्या दुसऱ्याचा व ध्रौव्य दुसऱ्याचे मानावे लागेल.

जर कोणी म्हणेल की, वृत्तिमान पदार्थाशिवाय केवळ वृत्ती होऊ शकते तर त्याला विचारतात– काय एकटी वृत्ती उत्पादव्ययध्रौव्याची एकता स्वरूप होऊ शकते ?

प्रत्युत्तर– असे नाही. ज्या अंशामध्ये नाश आहे व ज्या अंशामध्ये उत्पाद आहे ते दोन अंश एकावेळी प्रवृत्त होत नाहीत तर उत्पाद व व्ययाचे ऐक्य कसे होऊ शकते? नष्ट अंशाचा सर्वथा नाश झाल्यामुळे व उत्पन्न होणारा अंश आपल्या स्वरूपाला प्राप्त न झाल्यामुळे नाश व उत्पादाच्या एकतेमध्ये प्रवर्तमान ध्रौव्य कोठून होऊ शकते ? जर जीवद्रव्यच मानले नाही तर पूर्व समयात मनुष्यपर्यायाचा नाश झाला. देवपर्याय अद्यापि उत्पन्नच झाला नाही तर त्या दोन पर्यायामध्ये ध्रुवरूप एकता कशी राहू शकणार? व मनुष्यपर्यायाचा नाश व देव पर्यायाचा उत्पाद हे दोन अंश एकावेळी प्रवृत्त कसे होणार? जर असे झाले तर द्रव्याची उत्पादव्ययध्रौव्यरूप त्रिलक्षणता नष्ट होते व बौद्धसम्मत क्षणभंगुरता उल्लसित होते. नित्य द्रव्य अस्ताला प्राप्त होते व क्षणाला नष्ट होणारे भाव उदयाला प्राप्त होतात.

या सर्व तत्त्वाचा नाश होऊ नये अशी भीती वाटत असेल तर वृत्तींचा आश्रयभूत, वृत्तिमान अवश्य शोधला पाहिजे. म्हणून केवळ एक एक समय परिणमन कालपदार्थ मानणे योग्य नाही. कारण एक एक समय परिणमनामध्ये उत्पादव्ययध्रौव्य एकता नाही. कोणत्याही प्रकारचे परिणमन असो त्याचे उपादान व आधार ध्रुव द्रव्यच असते. समयसुद्धा एक विनश्वर परिणमन आहे.

त्याचे उपादान व आधार कोणते तरी द्रव्य आहे, त्याचे नाव कालद्रव्य असे आहे. कोणत्याही परिणमनाचा आधार प्रदेशवानच असतो म्हणून कालद्रव्यसुद्धा प्रदेशवान आहे. कालद्रव्य प्रदेशवान आहे परंतु तो एक प्रदेशयुक्तच आहे.

कालाला अनेकप्रदेशी मानले तर समयाची अनिष्पन्नता–

जर कालद्रव्य सप्रदेशी आहे तर कालद्रव्य मानून त्याचे लोकाकाशप्रमाण असंख्यात प्रदेश मानावेत असे कोणी म्हणेल तर त्याला उत्तर देतात– असे मानले तर समयपर्यायच प्रसिद्ध होत नाही. कालद्रव्यावर पोहचल्यावर समयपर्यायाची प्रसिद्धी होते. अर्थात एका परमाणूला अथवा प्रदेशमात्र कालाणूला ओलांडायला जेवढा काळ लागतो त्यालाच समय म्हणतात. दोन कालाणू वेगवेगळे असल्यामुळेच समय पर्यायाचा भेद सिद्ध होतो. जर कालद्रव्य लोकाकाशप्रमाण असंख्यात प्रदेशी असेल तर समयपर्यायाची सिद्धी कोठून होणार ?

पुन्हा यावर शंकाकार म्हणतो की कालपदार्थ लोकाकाशप्रमाण असंख्यातप्रदेशी एक द्रव्य असले तरी परमाणूच्याद्वारे त्याचा एक प्रदेश ओलांडल्यावर समयपर्यायाची सिद्धी होईल.परंतु असे मानणे योग्य नाही. कारण जेव्हा एका प्रदेशामध्ये परिणमन झाले, दुसऱ्या प्रदेशामध्ये झाले नाही तर कालद्रव्याचे परिणमन झालेच नाही. असे मानले तर यामध्ये दोन दोष येतात.

पहिला दोष– द्रव्याच्या एका प्रदेशाच्या परिणतीला संपूर्ण द्रव्याची परिणती मानण्याचा प्रसंग येतो. एका प्रदेशाच्या परिणतीला संपूर्ण द्रव्याची परिणती मानण्यामध्ये विरोध आहे. संपूर्ण कालपदार्थाचा जो सूक्ष्म पर्याय आहे तो समय आहे. त्याच्या एका भागाचा पर्याय तो समय नाही. म्हणून कालद्रव्य एकप्रदेशी आहे.

दुसरा दोष – तिर्यक्प्रचयाला ऊर्ध्वप्रचय मानण्याचा प्रसंग येईल. द्रव्याच्या एकावेळी असणाऱ्या प्रदेशांच्या समूहाला तिर्यक्प्रचय म्हणतात व कालक्रमाने होणाऱ्या पर्यायांच्या समूहाला ऊर्ध्वप्रचय म्हणतात. कालद्रव्यामध्ये तिर्यक्प्रचय असत नाही; कारण कालद्रव्य बहुप्रदेशी नाही. जर कोणी कालद्रव्याला लोकाकाशाएवढा अंसख्यातप्रदेशी मानले तर तेथे कालद्रव्याच्या एका प्रदेशावरून दुसऱ्या प्रदेशावर, दुसऱ्या प्रदेशावरून तिसऱ्या प्रदेशावर परमाणूच्या गतीद्वारे समयपर्यायाची संतती होईल असे मानले तर

तिर्यक्प्रचयच ऊर्ध्वप्रचय बनून द्रव्याला प्रदेशमात्रच स्थापित करतो. अर्थात तिर्यक्प्रचयच ऊर्ध्वप्रचय आहे असे मानावे लागेल म्हणून कालद्रव्य प्रदेशमात्रच सिद्ध होते.

जेथे तिर्यक्प्रचय नाही तेथे जास्त प्रदेश असू शकत नाहीत, म्हणून कालद्रव्य एकप्रदेशीच आहे.

कालपदार्थाचे जे सूक्ष्म परिणमन आहे तोच समय आहे. तो भेद भिन्न भिन्न कालाणू मानल्यावरच सिद्ध होऊ शकतो. असंख्यातप्रदेशी एक अखंड द्रव्य मानल्यावर त्या अखंडाचा एकावेळी एक पर्याय झाला पाहिजे. त्याला कोणी निमित्त होऊ शकत नाही. पुद्गलाचा एक परमाणू भिन्न भिन्न निकटवर्ती कालाणू असल्यावरच एका कालाणूवरून दुसऱ्या कालाणूवर मंदगतीने जाऊ शकतो तेव्हाच समय पर्याय होतो. अखंडद्रव्यामध्ये कोठून कोठे परमाणू जाईल याचा नियम राहणार नाही.

समयपर्यायाचा आधार एक प्रदेशी कालाणू आहे. जसे कालाणू लोकाकाशामध्ये असंख्यात आहेत. सर्वच कालाणूंमध्ये समयपर्याय प्रत्येक समयी होतो. कालद्रव्य मानल्याशिवाय अन्य द्रव्यांचे परिणमन होऊ शकत नाही व व्यवहारकाल पण सिद्ध होऊ शकत नाही. म्हणून कालद्रव्याची एक प्रदेशी सत्ता सिद्ध आहे.

अतीत अनंतकाळामध्ये जे कोणी सिद्ध सुखाला प्राप्त झाले व भविष्यकाळामध्ये जे सिद्धसुखाचे पात्र होतील ते सर्व काललब्धिवश झाले व होतील. तथापि कालद्रव्य हे निमित्तरूप आहे. निज परमात्मद्रव्याची रूचिरूप निश्चयसम्यक्त्व तेथे उपादानकारण आहे, म्हणून त्याचीच मुख्यता आहे. कालाची मुख्यता नाही म्हणून काल सोडण्यायोग्य आहे.

ज्याप्रमाणे समयपरिणमनावरून त्याच्या आधारभूत कालद्रव्यांचा परिचय होतो. त्याप्रमाणे शुभ, अशुभ शुद्ध भावरूप परिणमनावरून त्यांच्या आधारभूत निज परमात्मद्रव्याचा परिचय करून घ्यावा. जर अंतरंगामध्ये ध्रुव आत्मद्रव्य नसेल तर हे भाव कोठून उत्पन्न होतात ? या युक्तीने निज आत्मद्रव्याला जाणून अन्य सर्व विकल्प सोडून त्या निज आत्मद्रव्याची नित्य भावना करावी. त्यामध्येच लीन होण्याचा पुरुषार्थ करावा.

*****

द्वितीय महाधिकार (उत्तरार्ध)
ज्ञेयतत्त्व-प्रज्ञापन
अपरनाम
सम्यग्दर्शनाधिकार

द्वितीय महाधिकाराचे नाव ज्ञेयतत्त्वप्रज्ञापन आहे. हा महाधिकार चार अंतराधिकारामध्ये विभागलेला आहे. सामान्यद्रव्य निरूपण सामान्य भेदभावना, विशेषद्रव्यनिरूपण, विशेष भेदभावना यापैकी ५२ गाथांमध्ये अंतराधिकाराचे वर्णन पूर्ण झाले. आता पुढे ५६ गाथांमध्ये चौथ्या अंतराधिकाराचे वर्णन करतात. जीवद्रव्याला सोडून अन्यद्रव्यांचे वर्णन करण्या- पाठीमागचे प्रयोजन त्यांच्यापासून भिन्नता जाणणे हेच आहे.

हा जीव अनादिकाळापासून स्वतःला विसरलेला आहे. ज्या ज्या परद्रव्यांचा संयोग होतो त्या त्या परद्रव्यांशी तन्मय होऊन त्यालाच आपले खरे स्वरूप मानून बसतो. हीच मिथ्या मान्यता संसार दुःखाचे मूळ कारण आहे. ज्याप्रमाणे नट वेगवेगळ्या नाटकांमध्ये अनेक भूमिका वटवितो. तेथे वेगवेगळ्या चेतन व अचेतन पदार्थांशी त्याचा संबंध होतो. पण त्या नाटकातील एका ही व्यक्तीला तो आपले मानत नाही किंवा तेथे संयोगरूपाने प्राप्त झालेल्या संपत्तीला आपली संपत्ती मानत नाही. वरवरून त्यांना आपले म्हणतो पण अंतरंगामध्ये जाणतो की यातील एकसुद्धा वस्तू माझी नाही. या वस्तूंचा संयोग या नाटकापुरताच आहे. तेथील वस्तूंचा संयोग वियोग झाला असता खोटे खोटे हसणे व रडण्याचे सोंग करतो, पण अंतरंगातून नाही. संसारसुद्धा एक नाटकच आहे. येथेसुद्धा वेगवेगळ्या पर्यायांमध्ये वेगवेगळ्या चेतन व अचेतन पदार्थांचा संयोग होतो. अज्ञानी त्या पर्यायाशी तन्मय होऊन त्या सांयोगिक वस्तूंना आपले मानून त्यांच्या संयोगामध्ये हर्ष व वियोगामध्ये विषाद करतो. त्यामुळे दुःखी होतो पण ज्याला स्वपर भेदविज्ञान झाले आहे असा ज्ञानी याला नाटक समजून हर्षविवाद करीत नाही. ४ व ५ गुणस्थानवर्ती

ज्ञानीला हर्षविवाद झाला तरी तो नाटकातील नटाप्रमाणे चारित्रमोहजनित वरवर असतो. अंतरंग अभिप्रायपूर्वक नसतो. हा भेदविज्ञानाचा महिमा आहे. म्हणून आचार्य त्या भेदविज्ञानाच्या प्राप्तीसाठी येथून पुढे विशेष भेदविज्ञानाची सिद्धि करतात.

आतापर्यंत सामान्य ज्ञेयतत्त्वाचे वर्णन करून विशेष ज्ञेयपदार्थांची पण सिद्धी केली. या विश्वामध्ये जाती अपेक्षेने सहा द्रव्ये आहेत. ते सर्व जाणण्यायोग्य आहेत. पण त्यातील जीवद्रव्य जाणण्यायोग्य पण आहे व जाणणारा पण आहे. त्यामध्ये ज्ञानपणा व ज्ञेयपणा दोन्ही गुण आहेत. त्या जीवाला संपूर्ण परद्रव्यापासून अत्यंत भिन्न करण्याकरिता व्यवहार जीवत्वाच्या कारणाचा पुढील गाथेमध्ये विचार करतात.

सपदेसेहिं समग्गो लोगो अट्ठेहिं णिट्ठिदो णिच्चो।
जो तं जाणदि जीवो पाणचदुक्काभिसंबद्धो।।१४५।।

अन्वयार्थ –(सपदेसेहिं) प्रदेशसहित **(अट्ठेहिं)** पदार्थांच्या द्वारे **(णिट्ठिदो)** भरलेला **(समग्गो लोगो)** संपूर्ण लोक **(णिच्चो)** नित्य आहे. **(तं)** त्याला **(जो जाणदि)** जो जाणतो तो **(जीवो)** जीव आहे. तो जीव **(पाणचदुक्काभिसंबद्धो)** संसार अवस्थेमध्ये चार प्राणांनी संयुक्त आहे.

तात्पर्य– सर्व पदार्थ ज्ञेय आहेत, पण जीव ज्ञेय व ज्ञानरूप आहे. तो स्वतःला न जाणल्यामुळे इंद्रिय, बल, आयू व श्वासोच्छ्वास या चार प्राणांनी संयुक्त होतो.

अनन्त आकाशाच्या मध्यभागी अकृत्रिम व अविनाशी लोकाकाश आहे. हा अखंड असंख्यात प्रदेशी लोकाकाश सर्वत्र अन्य पाच द्रव्यांनी भरलेला आहे. लोकाकाशाचा एक प्रदेश असा नाही की जेथे जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, कालद्रव्य नाही. ही पाच द्रव्ये एका ठिकाणी राहत असतानासुद्धा आपापल्या प्रदेशांनी भिन्न भिन्न राहतात. कोणी कोणामध्ये कधीही मिसळत नाहीत. सर्व द्रव्ये आपापल्या स्वरूप संपदेने स्वतंत्रपणे शोभायमान आहेत. सर्व द्रव्ये ज्ञेय आहेत. अर्थात स्वतंत्ररूपाने भिन्न भिन्न केवलज्ञानरूपी दर्पणामध्ये स्पष्ट झळकत आहेत. या लोकामध्येच अन्तर्गर्भित असूनही आपल्या अचिन्त्य रूप संपदेने अशा स्वपराला जाणणेरूप शक्तिरूपसंपदेने जाणतो. अन्य कोणीही जाणत नाही. आत्मा स्वतःला पण जाणतो आणि लोकातील सर्व पदार्थांना पण जाणतो. म्हणून हा आत्मा ज्ञाता पण आहे व ज्ञेय पण आहे. आपल्या शुद्ध

स्वभावाच्या अपेक्षेने एकाच समयात स्वपराला क्रमाशिवाय जाणतो. जीव ज्ञाता व ज्ञेय आहे पण अन्य द्रव्ये ज्ञेयच आहेत. ज्ञानसंपदा जीवाला मिळालेले निसर्गाचे वरदान आहे. अन्य पदार्थ जड असल्यामुळे स्वतःला ही जाणत नाहीत व पराला ही जाणत नाहीत. म्हणून कुंदकुंदाचार्य जीवाचा उल्लेख '**णाणसहावाधियो, उवओगगुणाधिगो**' या शब्दांनी करतात. अर्थात इतर द्रव्यापेक्षा जीवामध्ये ज्ञानगुण अधिक आहे.

व्यवहारजीवत्वाचे कारण–

जीव स्वरूपाने अनन्तज्ञानशक्तीला कारणभूत सहजज्ञानस्वभावमय आहे. तिन्ही काळामध्ये अवस्थित वस्तूचे स्वरूप असल्यामुळे सर्वदा अविनाशी निश्चय जीवत्व आहे. त्या आपल्या निश्चयजीवत्वाने सदा जगतो. परंतु संसार अवस्थेमध्ये अनादिकाळापासून पुद्गलाचा संश्लेष संबंध झाला आहे. त्यामुळे चार प्राणांनी संयुक्त आहे. हे चार प्राणच व्यवहार जीवत्वाचे कारण आहेत. संसार अवस्थेमध्ये प्रत्येक शरीरात हा जीव या चार प्राणांनी जगतो व या चार प्राणांचा वियोग झाला की मरण अवस्थेला प्राप्त होतो. म्हणून यांना व्यवहार जीवत्वाचे कारण म्हटले आहे.

हे प्राण पुद्गलकर्माच्या उदयाने प्राप्त होतात म्हणून औपाधिक आहेत. निश्चयाने हे जीवाचे स्वरूप नाहीत. जीवापासून अत्यंत भिन्न आहेत म्हणून भिन्न करण्यायोग्य आहेत. निश्चयाने जीव शुद्धचैतन्य प्राणाला धारण करणारा आहे. निश्चयाने तिन्ही काळामध्ये जीव आपल्या चैतन्य प्राणांनी पूर्वी जगला, आता जगत आहेत व पुढेही जगेल.

अज्ञानी जीव आपल्या चैतन्य प्राणाला जाणत नाही व या चार प्राणांनाच आपले स्वरूप मानतो व या चार प्राणाचा नाश झाला की आपला नाश मानतो. म्हणून त्याला सतत मरण भय आहे. जर त्याने या चार प्राणांपासून भिन्न आपल्या चैतन्यप्राणाला जाणले तर त्याचे मरणभय दूर होईल. या चार प्राणांना आपल्यापासून वेगळे करण्यासाठीच आचार्यांनी व्यवहारजीवत्वाचे वर्णन केले आहे. कर्माच्या उदयवश हा जीव विकाररूप परिणमतो. स्वरूपाने तो निर्विकार शुद्ध आहे.

व्यवहारजीवत्व व व्यवहारजीवत्वाच्या कारणांना आपल्यापासून भिन्न जाणून निश्चय जीवत्वस्वरूप निज आत्म्याचा अनुभव करावा.

मागच्या गाथेमध्ये चार प्राणांना व्यवहार जीवत्वाचे कारण सांगितले होते. आता ते प्राण कोणते आहेत या जिज्ञासेचे समाधान करतात–

इंदियपाणो य तधा बलपाणो तह य आउपाणो य ।
आणप्पाणप्पाणो जीवाणं होंति पाणा ते ।।१४६।।

अन्वयार्थ – (इंदियपाणो) इंद्रियप्राण **(तधा बलपाणो)** तसेच बलप्राण **(तह य आउपाणो)** तसेच आयुप्राण **(य)** आणि **(आणप्पाणप्पाणो)** श्वासोच्छ्वास प्राण **(ते)** हे **(जीवाणं)** जीवांचे **(पाणा)** प्राण **(होंति)** आहेत.

तात्पर्य – संसारी जीवांना इन्द्रिय, बल, आयू व श्वासोच्छवास हे चार प्राण आहेत.

जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये प्राणांचे भेद सांगणारी एक अधिक गाथा आहे. ती याप्रमाणे–

पंचवि इंदियपाणा मणवचिकाया य तिण्णि बलपाणा।
आणप्पाणप्पाणो आउगपाणेण होंति दसपाणा ।।

अन्वयार्थ – (पंचवि इंदियपाणा) पाच इंद्रियप्राण **(मणवचिकाया)** मनवचनकाय **(तिण्णि बलपाणा)** हे तीन बलप्राण **(आणप्पाणप्पाणो)** श्वासोच्छ्वास प्राण **(य)** आणि **(आउगपाणेण)** आयुप्राणाने **(दसपाणा)** प्राण दहा **(होंति)** आहेत.

संसारी जीवांचे इन्द्रिय, बल, आयू व श्वासोच्छ्वास हे चार सामान्य प्राण आहेत. परन्तु अपर्याप्त अवस्थेमध्ये श्वासोच्छ्वास प्राणाशिवाय ३ प्राण असतात. सामान्यरूपाने प्राण चार आहेत. त्याचे पुनः भेद केले असता प्राण दहा होतात. ५ इन्द्रियप्राण, ३ बलप्राण, १ आयुप्राण, १ श्वासोच्छ्वास प्राण असे दहा प्राण आहेत. ५ भावेन्द्रियांनाच इन्द्रियप्राण म्हटले आहे. स्पर्शनेन्द्रिय, रसनेन्द्रिय, घ्राणेन्द्रिय, चक्षुरिन्द्रिय, कर्णेन्द्रिय हे पाच भावेन्द्रिय आहेत. पाच इन्द्रियज्ञानवरण कर्माच्या क्षयोपशमाने जाणण्याचे सामर्थ्य व पाच इंद्रिय विषयांचे ज्ञान उत्पन्न होते त्यासच भावेन्द्रिये म्हणतात.

मन, वचन, शरीराच्या अवलम्बनाने प्रकट झालेल्या जीवाच्या शक्तीला बलप्राण म्हणतात. आयुकर्माच्या उदयाने आयुप्राण उत्पन्न होतो. श्वासोच्छ्वास रूपाने होण्याच्या जीवाच्या शक्तीला भाव श्वासोच्छ्वास म्हणतात. श्वास बाहेर पडणे व घेणे यास श्वासोच्छ्वास प्राण म्हणतात. एक आयुप्राणाचा वियोग झाला असता सर्व प्राणांचा वियोग होतो. परन्तु अनन्तर समयामध्येच अन्य प्राणांचा संयोग होतो.

प्रत्येक पर्यायामध्ये नवीन प्राण उत्पन्न होतात व पूर्व पर्यायातील प्राण

नष्ट होतात. या प्राणांच्या उत्पत्तीमध्ये ज्ञानावरण, दर्शनावरण व अन्तराय कर्माचा क्षयोपशम तसेच मोहनीय, आयू व नामकर्माचा उदय निमित्त आहे. म्हणून हे प्राण व त्यांचा व्यापार सर्व पुद्गलकर्माच्या निमित्ताने होतात. शुद्ध आत्म्यामध्ये हे प्राण व यांचा व्यापार नाही. रत्नत्रयाच्या प्रभावाने या प्राणांचा वियोग झाला असता हे प्राण पुनः कधीच उत्पन्न होत नाहीत. म्हणून हे आपल्या आत्म्यापासून भिन्न आहेत. माझ्या स्वभावापासून भिन्न आहेत अशी भावना करावी. माझा आत्मा यापासून भिन्न आपल्या शुद्ध चेतना प्राणाने सदा जीवित आहे. मला जन्म-मरण नाही. जीव स्वयं सहजशुद्ध चैतन्य प्राणमय आहे.

पूर्व गाथेमध्ये व्यवहार जीवत्वाला कारणभूत प्राणांचा निर्देश केला. आता त्या प्राणांची निरुक्ती सांगून पुद्गलद्रव्यांपासून त्यांची रचना झाली आहे हे स्पष्ट करतात -

पाणेहिं चदुहिं जीवदि जीविस्सदि जो हि जीविदो पुव्वं।
सो जीवो पाणा पुण पोग्गलदव्वेहिं णिव्वत्ता।।१४७।।

अन्वयार्थ - (जो हि) जो **(चदुहिं पाणेहिं)** चार प्राणांनी **(जीवदि)** जगतो **(जीविस्सदि)** पुढे जगेल आणि **(पुव्वं जीविदो)** पूर्वी जगला **(सो जीवो)** तो जीव आहे. **(पुणं)** पुन्हा **(पाणा)** ते प्राण **(पोग्गलदव्वेहिं णिव्वत्ता)** पुद्गलद्रव्यांनी रचित आहेत.

तात्पर्य - संसारामध्ये जीव पौद्गलिक प्राणांच्या संबंधाने त्या त्या भवात जगतो, परंतु हा जीवाचा स्वभाव नाही.

प्राणांचे पौद्गलिकत्व -

जो प्राणांनी जगतो त्यास जीव म्हणतात. ज्यांच्याद्वारे जीव जगतो त्यास प्राण म्हणतात. ही प्राण शब्दाची निरूक्ती आहे. जीव कोणत्या प्राणांनी जगतो. व्यवहारनयाने संसारपर्यायामध्ये जीव इंद्रियबलआयुश्वासोच्छ्वास या चार प्राणांनी जगतो. पण निश्चयाने आपल्या चैतन्यप्राणाने जगतो.

पूर्वोक्त चार प्राणांची रचना पुद्गलकर्माच्या निमित्ताने होते. भावेन्द्रिय प्राण व मनोबल प्राण ज्ञानावरण व वीर्यान्तराय कर्माच्या क्षयोपशमाच्या निमित्ताने उत्पन्न होतात. द्रव्येन्द्रिय, द्रव्यवचन व द्रव्यमन नामकर्माच्या उदयाने उत्पन्न होतात. श्वासोच्छ्वास पण नामकर्माच्या उदयाने प्राप्त होतो. आयुप्राण आयुकर्माच्या उदयाने उत्पन्न होतो. भावप्राण आत्म्याची अशुद्ध अवस्था आहे त्याला निमित्त पुद्गलकर्म आहे व द्रव्यप्राण साक्षात् पुद्गलमयच आहेत.

निश्चयप्राण चैतन्य –

अज्ञानी जीव यांनाच आपले वास्तविक प्राण मानतो. जर इंद्रिया नष्ट झाली तर मी जाणूच शकत नाही, असे त्याला वाटते. श्वासोच्छ्वास बंद झाला तर मी कसा जगू शकणार? आयू संपले तर मी नष्टच झालो असे त्याला भासित होते. त्यासाठी हे जाणणे आवश्यक आहे की माझे वास्तविक प्राण कोणते आहेत. वास्तविक जीव सत्ता, चैतन्य, सुख, ज्ञान आदि शुद्ध भावप्राणांनी जगत आला आहे, आता पण जगत आहे व पुढे ही अनंतकाळ जगेल. चैतन्यप्राणाला धारण करणे हेच जीवांचे जीवत्व आहे. चार प्राण नष्ट झाले तरी जीव नष्ट होत नाही. जीव सदा चैतन्यप्राणाने जीवंतच आहे. जीवाचे जीवत्व अनादि अनंत आहे. द्रव्य व भावप्राण माझ्या आत्मस्वभावापासून भिन्न आहेत. निश्चयाने जीवाचा अनादि अनन्त अहेतुक एक चैतन्यस्वरूपच खरा प्राण आहे. चैतन्य प्राणाने रहित जीव कधीही नाहीच. चैतन्य हेच जीवाचे सर्वस्व आहे. म्हणून शाश्वत चैतन्य प्राणमय निज आत्म्याची नित्य आराधना करावी.

पूर्व गाथेमध्ये जीवाच्या व्यवहारजीवत्वाला कारण इंद्रिय, बल, आयू श्वासोच्छ्वास हे चार प्राण आहेत असे सांगितले. आता या गाथेमध्ये ते प्राण पौद्गलिक आहेत हे सिद्ध करतात.

जीवो पाणणिबद्धो बद्धो मोहादिएहिं कम्मेहिं।
उवभुंजं कम्मफलं बज्झदि अण्णेहिं कम्मेहिं ।।१४८।।

अन्वयार्थ– (मोहादिएहिं कम्मेहिं) मोहनीय आदी कर्मांनी **(बद्धो)** बद्ध असलेला **(जीवो)** जीव **(पाणणिबद्धो)** प्राणांनी युक्त होऊन **(कम्मफलं उवभुंजं)** कर्मफळ भोगत **(अण्णेहिं कम्मेहिं)** अन्य नवीन कर्मांशी **(बज्झदि)** बद्ध होतो.

तात्पर्य – संसारी जीव मोहमायादी कर्मांनी बद्ध आहे. त्या कर्माच्या उदयात प्राणांनी संयुक्त होतो, त्या प्राणांद्वारे कर्मफळाला भोगतो, त्यामुळे पुन्हा नवीन कर्मांना बांधतो.

प्राण पौद्गलिककर्माचे कार्य–

हा संसारी जीव अनादिकाळापासून मोहादी कर्मांने संयुक्त आहे. त्या मोहादी कर्मांच्या उदयामुळे याला इंद्रियादी प्राण प्राप्त होतात. अंगोपांग नामकर्म व जातिनामकर्माच्या उदयाच्या निमित्ताने स्पर्शनादी द्रव्येन्द्रिय व द्रव्यमन प्राण प्राप्त होतात. स्वरनामकर्माच्या उदयाने द्रव्य वचनबल प्राण प्राप्त

होतो. शरीरनामकर्माच्या उदयाने द्रव्यकायबल प्राप्त होते. श्वासोच्छ्वास नामकर्माच्या उदयाने श्वासोच्छ्वास प्राण मिळतो व आयुकर्माच्या उदयाने आयुबलप्राण प्राप्त होतो. ज्ञानावरण, दर्शनावरण व वीर्यान्तराय कर्माच्या क्षयोपशमाच्या निमित्ताने भावेन्द्रिय, भावमन, भाववचनबल प्राप्त होते. जीव एक पर्याय सोडून दुसरा पर्याय धारण करतो तेव्हा त्याच्याबरोबर बांधलेले कर्म सोबतच जाते. ते कर्म त्याला लगेच ही सामग्री प्राप्त करून देतात. म्हणून कर्मांनी बद्ध असल्यामुळे प्राण येऊन या जीवाशी संबद्ध होतात. ज्यांनी कर्माचा नाश केला त्याला हे चार प्राण प्राप्त होत नाहीत. यावरून प्राणांचे कारण पौद्गलिक कर्म आहे हे जाणले जाते. पौद्गलिक कर्माच्या निमित्ताने प्राण उत्पन्न होतात म्हणून प्राणपण पौद्गलिक आहेत. कारणाची जी जाती तीच कार्याची पण जाती असते. लोखंडापासून उत्पन्न झालेला कडा लोहमयच असतो.

प्राणांच्याद्वारे कर्मफलभोक्ता–

प्राणांनी सयुंक्त जीव भेदविज्ञानाच्या अभावामध्ये आत्मिक सुखाचा आनंद न घेता इंद्रिय प्राणांद्वारे कडू विषसमान असणाऱ्या कर्मफलरूप सुखदुःखाला भोगतो. इंद्रियरूपी हरणे मन मानेल तसे स्पर्शादी विषयरूपी वनामध्ये यथेच्छ भोग घेतात. उन्हाळ्याच्या दिवसात स्पर्शनेन्द्रियाद्वारे इष्ट थंड स्पर्शाचा भोग घेऊन सुखी होतो. अनिष्ट गरम स्पर्शाचा भोग घेऊन दुःखाचा अनुभव करतो त्याचप्रमाणे रसनेन्द्रियाद्वारे इष्ट थंड गोड आईस्क्रिमचा स्वाद घेऊन सुखाचा अनुभव करतो. अनिष्ट गरम वस्तूचा स्वाद घेऊन दुःखाचा भोग घेतो. अशाप्रकारे इष्ट-अनिष्ट विषयांचे सेवन करून सुखदुःखरूपी कर्मफळाला भोगतो. जर इन्द्रियेच नसती तर कर्मफळाला भोगण्याचा प्रश्नच नसता.

वचनबल प्राणाद्वारे दुसऱ्यांना इष्ट व अनिष्ट वचनांचा प्रयोग करतो. दुसऱ्यांचे इष्ट अनिष्ट वचन ऐकून सुखी दुःखी होतो. मन,वचन,शरीराच्या क्रियांमध्ये संसारी जीव लुब्ध होतो. त्यांना आपले स्वरूप जाणून त्यामध्ये यथेच्छ प्रवृत्ती करतो व पुद्गलकर्माच्या उदयाने प्राप्त सांसारिक पराधीन सुखदुःखांना भोगतो.

कर्मभोग नवीन बंधाचे कारण–

जीव पुद्गलकर्माच्या फळाने प्राप्त झालेल्या भोगामध्ये रागद्वेष करतो, त्यामुळे नवीन पुद्गल कर्मांचा बंध करतो. इंद्रियादी प्राणच कर्मफळ भोगण्याचे

साधन आहेत म्हणून प्राणच नवीन कर्माच्या बंधाचे कारण आहेत.

प्राण पौद्‌गलिक–

कार्य आणि कारणांची जाती एक असते. मातीपासून घट बनला व घटापासून खापऱ्या झाल्या, खापऱ्या पुन्हा मातीरूप झाल्या. घटाचे कारण माती आहे व घटाचे कार्य माती म्हणून घट मातीमय आहे. त्याप्रमाणे प्राण पुद्‌गलकर्माच्या उदयाने उत्पन्न झाले. म्हणून प्राणांचे कारण पुद्‌गलकर्म आहेत व प्राणांच्याद्वारे कर्मफल भोगून पुन्हा नवीन कर्म बांधले म्हणून प्राणांचे कार्य पुद्‌गल कर्म आहेत. अशाप्रकारे प्राणांचे कारण पण पौद्‌गलिक आहे व त्यांचे कार्य ही पौद्‌गलिक आहे. म्हणून प्राण पौद्‌गलिक आहेत.

ज्याप्रमाणे क्षत्रियापासून उत्पन्न झालेली संतान क्षत्रिय आहे व क्षत्रियाला जन्म देणारे पूर्वज पण क्षत्रिय आहेत. त्याप्रमाणे पुद्‌गल कर्मापासून उत्पन्न झालेले प्राण पुद्‌गलमय व पुद्‌गलकर्माला जन्म देणारे प्राण पुद्‌गलमय आहेत.

प्राण पौद्‌गलिक असल्यामुळे आत्म्याचा स्वभाव नाहीत. यांना सदा आपल्या आत्म्यापासून भिन्न जाणावे. समाधिशतक ग्रंथामध्ये पूज्यपाद स्वामी म्हणतात.

स्वबुद्ध्या यावद्‌गृहीयात् कायवाक्‌चेतसां त्रयम्।
संसारस्तावदेतेषां भेदाभ्यासे तु निर्वृत्तिः।।६२।।

जोपर्यंत मन, वचन, काय या तिघांना आत्म्याच्या बुद्धीने ग्रहण करतो. अर्थात् माझे आहेत असे मानतो तोपर्यंत संसार आहे. जेव्हा या तिन्हींपासून मी भिन्न आहे, अशी भावना करतो तेव्हा मोक्षाला प्राप्त करतो. मी एक शुद्ध ज्ञानचेतनारूप प्राणाला धारण करणारा जीव आहे. हे इंद्रियादी प्राण माझ्यापासून भिन्न आहेत. मी यांच्याद्वारे जगत नाही असा अनुभवच आपल्याला कर्मापासून सोडविणारा आहे. नाहीतर हा जीव कर्माच्या उदयाने पुन्हपुन्हा प्राणांना प्राप्त करीत राहील. म्हणून चैतन्यच माझा खरा प्राण आहे. माझे सर्वस्व आहे. चैतन्य प्राणाने मी सदा जीवंत आहे असा अनुभव करावा. पूर्व गाथेमध्ये इन्द्रियादी प्राणांची पौद्‌गलिकता सिद्ध केली. आता पुन्हा प्राणांचा पुद्‌गल कर्माचा कारणपणा व्यक्त करतात–

पाणाबाधं जीवो मोहपदेसेहिं कुणदि जीवाणं ।
जदि सो हवदि हि बंधो णाणावरणादिकम्मेहिं ।।१४९।।

अन्वयार्थ– (जदि) जरी **(जीवो)** जीव **(मोहपदेसेहिं)** मोह आणि

द्वेषाने **(जीवाणं)** स्वपर जीवांच्या **(पाणाबाधं)** प्राणांचा घात करतो तर **(हि)** निश्चयाने **(णाणावरणादिकम्मेहिं)** ज्ञानावरणादिक कर्मांशी **(सो बंधो)** तो बंध **(हवदि)** होतो.

तात्पर्य – मोहरागद्वेषाच्या वश होऊन स्वपर प्राणांचा घात करणारा जीव अवश्य कर्माने बद्ध होतो.

प्राण कर्मबंधाचे कारण–

जीव प्राणांच्याद्वारे कर्मफळाला भोगतो कर्माच्या उदयाने शरीर–वचन व मन मिळाले. शरीर पंचेन्द्रियमय आहे. अर्थात् पाच इन्द्रिये शरीराचे अवयव आहेत. साता–असाता कर्माच्या उदयाने इन्द्रियांना इष्ट– अनिष्ट विषय सामग्री प्राप्त होते. प्राणधारी संसारी जीव या इष्ट–अनिष्ट विषयांचे सेवन करताना त्यामध्ये मोहरागद्वेष करतो अर्थात हे भोग माझे आहेत. चांगले आहेत किंवा वाईट आहेत असे भाव करतो. मनोनुकूल विषय मिळाले की त्यामध्ये राग करतो, मनाविरुद्ध विषय मिळाले की द्वेषभाव करतो.

बुद्धिपूर्वक या इन्द्रियादी प्राणांचा उपयोग करताना इच्छा अवश्य उत्पन्न होतात. त्या इच्छेच्या पूर्तिसाठी एकेन्द्रियादी जीवांचा घात करतो. भेळ खाण्याची इच्छा होते तेव्हा अखंड मसूर, मटकी, मूग आदी धान्यांना मोड आणून त्याचे सेवन अत्यंत आसक्तीने करतो. मोड आलेले धान्याचे सेवन करण्यामध्ये बालहत्या केल्याचे पाप लागते असे आशाधर पण्डितजी सागार धर्मामृत ग्रंथामध्ये सांगतात.

त्याचप्रमाणे चव येण्यासाठी कांदा, लसूण, बटाटा आदी अभक्ष्य पदार्थांचा वापर करतो. त्यामध्ये अनन्त जीवांचा घात होतो. अमर्यादित लोणचे, मुरब्बा, पापड, सांडगे, सेवया इ. वस्तूंचे भक्षण करून इंद्रियांच्या विषयांमध्ये आनंद मानतो. त्यामध्ये होणाऱ्या त्रसकायजीवांच्या हिंसेला मोजत नाही. एकेन्द्रियादी अन्य जीवांना पीडा झाल्यामुळे त्या जीवांच्या भावप्राणांचा व द्रव्यप्राणांचाही घात होतो. आजकाल तर खाण्यापिण्याचा विवेकच राहिला नाही. बाजारची मॅगी, पीज्झा इत्यादिक अभक्ष्य पदार्थांचे लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वजण सेवन करतात. परंतु केवळ जीभेच्या चवीपोटी आपण किती पाप कमवत आहोत याकडे लक्ष नाही. एक क्षणाचा जीभेचा आस्वाद आपल्याला असंख्यात काळापर्यंत दुःख देणारा आहे याचे अज्ञान आहे.त्यामुळे स्वच्छन्दप्रवृत्ती चालू आहे.

संज्ञीपंचेन्द्रिय पर्यायामध्ये हित व अहितामध्ये विवेक करणारी बुद्धी

प्राप्त झाली आहे. त्या बुद्धीचा वापर करून काय सेवन करण्यायोग्य आहे व काय सेवन करण्यायोग्य नाही याचा विवेक करावा व आपल्या आत्म्याला दुर्गतीमध्ये जाण्यापासून वाचवावे.

सकषायी आत्मघातकी–

दुसऱ्या जीवाला त्रास देण्यासाठी एखादी कृती केली तर त्यामुळे दुसऱ्या जीवांना बाधा पोहचेल किंवा नाही याची खात्री नाही, परंतु आपल्या प्राणांचा मात्र निश्चित घात होतो. ज्याप्रमाणे आम्ही दुसऱ्याला मारण्यासाठी तापलेला लोखंडाचा गोळा हातात घेतला तर त्याच्याजवळ पोहचण्यापूर्वी आमचा हात नक्की जळणार. दुसऱ्यावर आम्ही फेकू शकूच किंवा त्याला लागेलच याचा नियम नाही. त्याप्रमाणे जेव्हा आम्ही स्वतःच्या प्राणांसाठी हिंसात्मक भाव करू तेव्हा दुसऱ्याची हिंसा होईल अथवा न होईल, परंतु स्वतःच्या शुद्ध भाव प्राणांची मात्र निश्चित हिंसा होते व त्यामुळे या जीवाला ज्ञानावरणादी आठ कर्मांचा बंध होतो.

पुरुषार्थसिद्ध्युपाय ग्रंथामध्ये अमृतचन्द्र आचार्य म्हणतात–

यस्मात्सकषायः सन् हन्त्यात्मा प्रथममात्मनात्मानम्।
पश्चाज्जायेत न वा हिंसा प्राण्यन्तराणां तु ।।४७।।

कषायाच्या अधीन होऊन आत्मा प्रथम स्वतःद्वारे स्वतःचाच घात करतो. नंतर दुसऱ्या जीवांची हिंसा होईल अथवा न होईल याचा नियम नाही. या जीवाचे मोह–रागद्वेषरूप भाव हिंसक परिणाम आहेत. असे परिणाम शरीरादी प्राणांच्या निमित्ताने होतात. त्यामुळे कर्मबंध होतो म्हणून तत्त्वार्थसूत्रामध्ये इन्द्रिय, कषाय, अव्रत इत्यादींना आस्रवाचे कारण सांगितले आहे. त्या आस्रवाचे दोन प्रकारचे अधिकरण सांगितले आहे. १) जीवाधिकरण व २) अजीवाधिकरण. कषायवश, मन–वचन–कायेचा व्यापार रूप, संरंभ, समारंभ व आरंभ स्वतः करणे, दुसऱ्यांकडून करवून घेणे व करणाऱ्याला अनुमोदना देणे हे जीवाधिकरण आहे. शरीरवचनमनाच्या क्रिया अजीवाधिकरण आहे. जसा आधार असेल व आपली शक्ती असेल त्यानुसार कर्मांचा तीव्र किंवा मंद बन्ध होतो. म्हणून इंद्रिय, आयु आदी प्राणांना कर्मबंधाचे कारण सांगितले आहे.

या कर्मबंधामुळे जीव संसारामध्ये जन्ममरणाचे दुःख सहन करीत परिभ्रमण करतो आणि स्वाधीन आत्मानन्दरूप मोक्षाची प्राप्ती करू शकत नाही. म्हणून इंद्रियादी प्राणांचा संबंध सोडण्यायोग्य आहे व निजज्ञानचेतना रूप

निश्चय प्राण ग्रहण करण्यायोग्य अर्थात आश्रय करण्यायोग्य आहे. व्यवहार प्राणांमध्ये अहंबुद्धी व ममत्व सोडावे. सहज शाश्वत चैतन्यप्राणमय स्वशुद्धात्म्याचा सतत अनुभव करावा. प्राणांपासून विमुक्त होण्याचा हाच रामबाण उपाय आहे.

मागील गाथेमध्ये इंद्रियादी प्राण पुद्गलकर्माचे कारण आहेत हे सांगितले होते. येथे हा प्रश्न उत्पन्न होतो ' या प्राणांच्या परम्परेचे कारण काय आहे ? एक प्राण सोडले की जीव लगेच दुसरे प्राण धारण करतो. ते प्राण सोडले की पुन्हा दुसरे प्राण धारण करतो. अशाप्रकारे अनादिकालापासून व्यवहार जीवत्वाला कारणभूत प्राणांची श्रृखंला तुटत नाही याचे अंतरंग कारण काय आहे, तेच या गाथेमध्ये सांगतात–

आदा कम्ममलिमसो धरेदि पाणे पुणो पुणो अण्णे।
ण चयदि जाव ममत्तं देहपधाणेसु विसयेयु ।।१५०।।

अन्वयार्थ – (कम्ममलिमसो) कर्माने मलिन **(आदा)** आत्मा **(पुणो पुणो)** तोपर्यंत पुन्हपुन्हा **(अण्णे पाणे)** अन्य नवीन प्राणांना **(धरेदि)** धारण करतो **(जाव)** जोपर्यंत **(देहपधाणेसु)** शरीर ज्यामध्ये मुख्य आहे अशा **(विसयेयु)** विषयांमध्ये **(ममत्तं)** ममत्व **(ण चयदि)** सोडत नाही.

तात्पर्य – कर्माने मलिन झालेला जीव विषयांमध्ये ममत्व करून दुसऱ्या दुसऱ्या प्राणांना धारण करतो अर्थात अन्य अन्य जन्म घेतो.

कर्मसंयोगाने आत्मा मलिन–

आत्मा स्वभावाने भावकर्म, द्रव्यकर्म व शरीररूपी मलाने रहित असल्यामुळे अत्यंत निर्मल आहे. परंतु व्यवहारनयाने अनादि कर्मबंधाच्या वश झाल्यामुळे मलिन झाला आहे. ज्याप्रमाणे पाणी स्वभावाने शुद्ध आहे पण त्यामध्ये माती वगैरे मिसळली की ते अशुद्ध होते. मलिन होते. वस्त्र स्वभावाने स्वच्छ आहे, पण त्याला धूळ लागली की ते मलिन होते. त्याप्रमाणे हा जीव स्वभावाने शुद्ध आहे, पण कर्माचा संबंध झाल्यामुळे अशुद्ध झाला आहे.

भावकर्मामुळे द्रव्यकर्म व द्रव्यकर्मामुळे नोकर्माशी संबंध होतो. वास्तविक राग–द्वेष–मोहाच्या स्निग्धतेमुळेच द्रव्यकर्मरूपी मलाचा संयोग होतो व द्रव्यकर्माने संबद्ध झाल्यामुळे नोकर्माचा संयोग प्राप्त होतो.

प्राणांच्या सन्ततीचे अंतरंग कारण ममत्वपरिणाम–

या संसारी जीवाला संसार भ्रमण करीत असताना प्रत्येक नवीन नवीन

शरीरामध्ये जाऊन वरचेवर प्राण धारण करावे लागतात याचे निमित्तकारण पुद्‌गलकर्म आहे. पण याचे अंतरंग कारण शरीरादी संबंधी ममत्वभाव आहे. प्रत्येक संसारी जीव अनादिकाळापासून प्रवाहरूपाने कर्माशी बद्ध आहे. त्या कर्मांच्या उदयामुळे एक गती सोडून दुसऱ्या गतीमध्ये जातो. जेथे जातो तेथे शरीर प्राप्त होते व एक, दोन, तीन, चार अथवा पाच इंद्रिये प्राप्त होतात. त्यांच्या विषयभोगांची इच्छा करीत त्या शरीरामध्ये अत्यन्त रागी होतो. संपूर्ण जीवनभर या रागभावानुसार विषयांच्या पूर्तीची चेष्टा करीत राहतो. इच्छानुसार भोगसामग्री प्राप्त करण्यासाठी काही ना काही तरी उद्योग करीत राहतो. काबाड कष्ट करून विषयांचा संग्रह करीत राहतो. अशाप्रकारे रागपूर्वक विषयांचा संग्रह असतानाच आयुकर्म समाप्त होते तेव्हा ते शरीर सोडतो व जशी आयु बांधली असेल त्यानुसार दुसऱ्या शरीरामध्ये जाऊन पोहोचतो. तेथेही पुन्हा पूर्वीप्रमाणेच त्या नवीन शरीराच्या विषयांमध्ये फसतो. ही या जीवाची अनादिप्रवृत्त कहाणी आहे. जोपर्यंत शरीरादी विषयांसंबंधी ममत्वभाव सोडणार नाही. तोपर्यंत अनन्तकाळापर्यंत भ्रमण करीत राहणार व पौद्‌गलिक प्राणांची संतती जीवंत राहणार. जोपर्यंत ममत्वभाव राहणार तोपर्यंत संसाराच्या पार पोहचण्याचा मार्ग मिळत नाही. प्राप्त शरीर कसलेही असो, काळे असो की गोरे असो, सुरूप असो की कुरूप असो, कुत्र्याचे शरीर असो की डुकराचे शरीर असो, मनुष्याचे असो की देवाचे शरीर असो जीव ज्या शरीरात जातो त्या शरीरावर ममत्व करतो, ते शरीर म्हणजेच मी आहे अशी मिथ्या कल्पना करतो त्यामुळे शरीरावरील ममत्व सुटत नाही. ममत्वपूर्वक शरीराची सेवा केल्यामुळे कर्मरूपी राजा खुष होऊन पुन्हा नवीन नवीन शरीर प्रदान करतो.

जो ज्याची उपासना करतो त्याला ती वस्तू प्राप्त होते. शरीराची उपासना करणाऱ्याला नवीन शरीर प्राप्त होते व त्या शरीराबरोबर इंद्रियादी प्राण ही प्राप्त होतात. ज्याप्रमाणे पत्नीशी विवाह केला की तिच्याबरोबर सोने चांदी इत्यादी अनेक वस्त्रे, आभूषणे इ. प्राप्त होतात त्याप्रमाणे शरीराशी संबंध जोडला की त्याच्याबरोबर इंद्रिय, आयू, श्वासोच्छ्‌वास आदी आभूषणे प्राप्त होतात. हा जीव त्यामध्ये प्रीती करतो, त्यामुळे फसतो.

जेव्हा गुरूच्या उपदेशाने संसार-शरीर-भोगांना असार जाणून त्यावरील मोह सोडून आपल्या शुद्ध आत्म्यावर प्रेम करेल तर त्याची ममत्वरूपी दोरी तुटून जाईल.

श्री पूज्यपाद स्वामी समाधिशतकामध्ये म्हणतात-

देहान्तरगतेर्बीजं देहेऽस्मिन्नात्मभावना।
बीजं विदेहनिष्पत्तेरात्मन्येवात्मभावना।

या शरीरामध्ये जी आत्मभावना आहे ती अन्य शरीर धारण करण्याचे बीज आहे व आत्म्यामध्ये आत्मभावना शरीररहित होण्याचे बीज आहे. म्हणून जड शरीरावरील ममत्व सोडून ज्ञानशरीरी निज आत्म्यावर प्रीती करावी व त्याचीच पुन्हपुन्हा भावना करावी. जोपर्यंत ममता आहे तोपर्यंत संसार आहे असे जाणून सर्व पौद्गलिक प्राणांना भिन्न दुःखाचे कारण जाणून त्यावरील ममत्व दूर करावे व सहजसिद्ध चैतन्य प्राणामध्ये आपला उपयोग लावावा.

मागील गाथेमध्ये पौद्गलिक प्राणांच्या संततीचे अंतरंग कारण सांगितले. आता पौद्गलिक प्राणांच्या संततीच्या निवृत्तीचे अंतरंग कारण सांगतात –

जो इंदियादिविजई भवीय उवओगमप्पगं झादि।
कम्मेहिं सो ण रंजदि किह तं पाणा अणुचरंति।।१५१।।

अन्वयार्थ – (जो) जो जीव **(इंदियादिविजई भवीय)** इंद्रियादींना जिंकणारा होऊन **(उवओगमप्पगं)** उपयोगस्वरूप आत्म्याचे **(झादि)** ध्यान करतो **(सो)** तो **(कम्मेहिं)** कर्मांद्वारे **(ण रंजदि)** रंजित होत नाही. **(तं)** त्याचे **(पाणा)** प्राण **(किह)** कसे **(अणुचरंति)** अनुसरण करतील ?

तात्पर्य – जो इंद्रियविषयांना जिंकून ज्ञानदर्शनस्वरूप आत्म्याचे ध्यान करतो प्राण त्याचा पाठलाग करीत नाहीत.

विरुद्ध कार्यांचे विरुद्ध कारण –

ज्या उपायाने शरीर व त्याचे अंग इंद्रियादी प्राप्त होणार नाहीत, तो उपाय या गाथेत सांगितला आहे.दोन विरुद्ध कार्यांचे कारण पण विरुद्ध असते. ज्याप्रमाणे जे रोगाचे कारण आहे त्याच्याविरुद्ध निरोगाचे कारण आहे. अपथ्यसेवन रोग होण्याचे कारण आहे तर पथ्यसेवन हे निरोगी होण्याचे कारण आहे. त्याप्रमाणे प्राणांच्या संततीची प्रवृत्ती व प्राणांच्या संततीची निवृत्ती ही दोन विरुद्ध कार्य आहेत. प्राणांच्या संततीच्या प्रवृत्तीचे अंतरंग कारण देहादिविषयक ममत्व आहे म्हणून पुद्गल प्राणांच्या संततीच्या निवृत्तीचे अंतरंग कारण देहादिविषयक ममत्वाचा अभाव आहे. मोह रागद्वेषरूप उपरागतेचा सर्वथा अभाव होणे हे प्राणांच्या संततीच्छेदाचे कारण आहे.

इन्द्रियविजय : देहनाशाचा उपाय–

शरीर धारण करण्याचे मूळ कारण गती, जाती, आयू आदि कर्मांचा उदय

आहे. कर्माचा उदय कर्मांच्या बंधाशिवाय होत नाही. कर्मांचा बंध इंद्रियांच्या विषयांमध्ये आसक्ती करणे व क्रोध, मान, माया लोभादी कषायरूप परिणमन करणे व आत्म्याच्या अश्रद्धेमुळे होतो.

शरीरादिविषयक रागाचा अभाव इंद्रियविजयी आत्म्यालाच होऊ शकतो. इन्द्रियांवर विजय कसा मिळवावा ? इन्द्रिये काय आमची शत्रू आहेत की ज्यावर विजय मिळविण्याची प्रेरणा दिली जाते ?

जे आपला घात करतात, आपले धन लुटतात त्यांना आपले शत्रू मानतो. भावेन्द्रिये आपल्या अखंड ज्ञान स्वभावाचा घात करतात व द्रव्येन्द्रिये आत्म्याला भुरळ पाडतात. इन्द्रिये आपल्या विषयांमध्ये जीवाला आसक्त करून स्वतःच्या स्वभाव-संपत्तीचा विसर पाडतात व जीवाला सतत आपले दासत्व करायला लावतात, म्हणून हे आत्म्याचे शत्रू आहेत.

जितेन्द्रिय होण्याचा उपाय –

अज्ञानी जीव द्रव्येन्द्रिये, भावेन्द्रिये व इंद्रियांच्या विषयांना आपले स्वरूप मानतो. आत्मा व या तिन्हींमध्ये भेद जाणत नाही. म्हणून या तिघांशी एकरूप होतो. जेव्हा जीव भावश्रुत ज्ञानाने आत्मा व इंद्रिये यांच्यामध्ये भेद जाणतो तेव्हा इंद्रियांवर विजय मिळवून तो ज्ञानी होतो. भावेन्द्रिय, द्रव्येन्द्रिय व इन्द्रिय विषयांवर कसा विजय मिळवायचा याचा उपाय समयसार गा. ३१ च्या आत्मख्याती टीकेमध्ये अमृतचन्द्र आचार्यांनी सांगितले आहे. ते याप्रमाणे-

द्रव्येन्द्रिय कान, नाक, डोळा, जिव्हा हे सर्व शरीराचे अवयव आहेत म्हणून जड अचेतन आहेत. अज्ञानीची शरीरामध्ये आत्मबुद्धि आहे म्हणून शरीरांच्या अवयवांना आपले अंग(स्वरूप) मानतो. जेव्हा निर्मल भेदविज्ञानाच्या अभ्यासाने ज्ञानी होऊन जाणतो की मी तर अतिसूक्ष्म चैतन्यस्वभावी आहे. ही द्रव्येन्द्रिये जड अचेतनस्वभावी आहेत. ही जाणण्याचे काम करीत नाहीत. शरीरामध्ये असणारा ज्ञायकस्वभावी आत्माच जाणतो. म्हणून ही द्रव्येन्द्रिये माझी नाहीत. याप्रमाणे चैतन्यस्वभावाच्या अवलंबनाने द्रव्येन्द्रियांना वेगळे करणे हाच त्यावर विजय आहे.

भावेन्द्रिये यद्यपि श्रुतज्ञानाची विभावपर्याय आहे. पण ही भावेन्द्रिये आपापल्या स्पर्श, रस, गन्ध, वर्ण व शब्दरूप नियत विषयांना जाणत असल्यामुळे विषयांना खण्डखण्ड रूपाने ग्रहण करतात. ज्ञानी जाणतो की आत्मा तर अखण्ड चैतन्य शक्तिस्वरूप आहे. खण्डखण्ड रूपाने ग्रहण करणे माझा स्वभाव नाही म्हणून अखण्ड स्वभावाच्या आश्रयाने भावेन्द्रियांना

आपल्या पासून भिन्न करतो, हाच त्या भावेन्द्रियांवर विजय आहे.

इन्द्रियांचे विषय ज्ञानाचे ज्ञेय आहेत व आत्मा ज्ञायक आहे. या ज्ञेयज्ञायक संबंधाच्या निकटतेमुळे ज्ञेय ज्ञानाशी एकरूप झाल्यासारखे वाटतात. ज्ञानी भेदविज्ञानाच्या अभ्यासाने जाणतो की मी चैतन्यस्वभावी आत्मा असंगस्वभावी आहे. विषयांचा संग माझ्या ज्ञान स्वभावात नाही. इन्द्रियविषय मूर्तिक आहेत, मी अमूर्तिक चिद्रूप आहे. अशाप्रकारे विषयांना आपल्यापासून भिन्न जाणून त्यावर विजय मिळवितो.

ज्ञानी अखंडचैतन्यस्वभावी निसंग निज आत्मस्वभावाच्या अनुभवबलानेच जितेन्द्रिय होतो. ज्याने या तिन्हींवर विजय मिळविला तो मिथ्यात्वाचा नाश करून सम्यग्दृष्टी होतो.

जो द्रव्येन्द्रिय, भावेन्द्रिय व इन्द्रियांच्या विषयांवर विजय मिळवितो. तो उपयोगस्वरूप आत्म्याचे ध्यान करतो. हा मी ज्ञानस्वभावाने अन्य अचेतन द्रव्यांहून अधिक आहे. हा ज्ञान स्वभाव टंकोत्कीर्ण आहे, विश्वातील सर्व पदार्थांना जाणत असतानाही त्यारूप होत नाही. अंतरंगामध्ये प्रत्यक्ष प्रकाशमान आहे. अविनश्वर स्वतः सिद्ध परमार्थरूप आहे. अशाप्रकारे ज्ञानी स्वरूपसंचेतन करतो. स्वानुभवप्रत्यक्षाने उपयोगस्वरूप आत्म्याचे ध्यान करतो.

इन्द्रियविजय कषायविजय झाल्यावरच संभव आहे. कषायविजय अकषायस्वभावी आत्म्याच्या अवलंबनाने होतो.

जो शरीर व इन्द्रियांचा संबंध इच्छित नाही त्याने निज ज्ञानानन्दमय स्वभावी आत्म्याची दृढ प्रतीती करून इन्द्रियांची आसक्ती सोडून त्याला वश करावे व क्रोधादी कषायभावांना जिंकून शांतभावाचा आश्रय करावा. निश्चलचित्त होऊन ज्ञानदर्शनमय आत्म्याचे ध्यान करून अनुभव करावा व आनन्दामृताचे पान करावे. जो आत्मानुभव करतो तो कर्मांनी रंगत नाही अर्थात् त्याला कर्मबंध होत नाही. ज्याला कर्मबंध नाही, प्राण त्याचे अनुसरण करीत नाहीत. प्राण ही द्रव्यकर्माची देणगी आहे व द्रव्यकर्म ही भावकर्मांची देणगी आहे. भावकर्माने द्रव्यकर्म व द्रव्यकर्माने नोकर्म प्राप्त होते. म्हणून जो शुद्धात्मानुभवाने मोह, राग, द्वेषाचा अभाव करतो तो कर्मबंधाने रहित होतो व जो कर्मबंध करीत नाही, प्राण त्याच्या पाठीमागे लागत नाहीत. अतीन्द्रिय आत्म्यापासून उत्पन्न आनन्दामृतामध्ये संतोष प्राप्त करून इन्द्रियसुखाची उपेक्षा करावी.

हा जीव ऐश्वर्यशाली आहे. ज्यामध्ये रूची करतो ती वस्तू याला प्राप्त

होते. जर अशुद्ध प्राणांमध्ये प्रेम करतो तर हे अशुद्ध प्राण याचा पीछा सोडत नाहीत व जर शुद्ध चैतन्य प्राणामध्ये रूची करेल तर शुद्ध स्वरूप प्राप्त होईल. उपयोग दोन प्रकाराने उपयुक्त होऊ शकतो, भोगामध्ये किंवा योगामध्ये (ध्यानसमाधी) एकावेळी दोन्हींपैकी एकामध्येच रमू शकतो, भोग नाहीतर योग. आता निर्णय करा हित कशात आहे ? आजपर्यंत भोगात रमलो पण सुख मिळाले नाही तर आता एकदा योगामध्ये (ध्यानामध्ये) रमून पहा त्यात किती सुख आहे हे प्रत्यक्ष अनुभवानेच कळेल.

जो इन्द्रियविजयी होऊन ज्ञानदर्शनमय उपयोगमात्र आत्म्याला जाणतो, मानतो, त्याचे ध्यान करतो तो कर्मापासून स्वतःला सोडवतो. (वाचवितो) अशा कर्मरहित जीवाचा प्राण पाठलाग करीत नाहीत.

यापूर्वीच्या गाथेत पौद्गलिक प्राणांच्या संततीच्या निवृत्तीचा उपाय सांगितला. आता या गाथेत आत्म्याला अत्यंत भिन्न सिद्ध करण्यासाठी व्यवहार जीवत्वाला कारणभूत देवमनुष्यादी गतियुक्त पर्यायांचे स्वरूप सांगतात–

अत्थित्तणिच्छिदस्स हि अत्थस्सत्थंतरम्मि संभूदो ।
अत्थो पज्जाओ सो संठाणादिप्पभेदेहिं ।।१५२।।

अन्वयार्थ– (अत्थित्तणिच्छिदस्स) अस्तित्वाने निश्चित **(हि अत्थस्स)** एका पदार्थाचा **(अत्थंतरम्मि)** दुसऱ्या पदार्थाच्या संयोगामध्ये **(संभूदो)** उत्पन्न झालेला **(अत्थो)** जो भाव **(सो)** तोच **(संठाणादिप्पभेदेहिं)** आकार आदी भेदांनी बनलेला **(पज्जाओ)** पर्याय आहे.

तात्पर्य – मनुष्य, तिर्यंच, नारकादी असमानजातीय विभाव द्रव्य व्यंजन पर्याय आहेत.

वस्तु स्वअस्तित्वामध्ये निश्चित –

प्रत्येक द्रव्याचे स्वरूपास्तित्व आपापल्या द्रव्याच्याच प्रदेशांमध्ये व स्वरूपामध्ये आहे. प्रत्येक वस्तू स्वत:च्या द्रव्य–क्षेत्र–काल–भावामध्ये स्थित आहे. जीवाच्या स्वरूपाची सत्ता जीवामध्ये सदा स्थिर आहे. जीव स्वद्रव्यामध्ये टंकोत्कीर्ण आहे. त्याचे द्रव्य बदलून कधी शरीरादी परद्रव्यरूप होत नाही. जीव आपल्या अमूर्तिक असंख्यात प्रदेशांमध्ये अखंडरूपाने विराजमान आहे. तो शरीराच्या प्रदेशांमध्ये कधीही रहात नाही. जीव सदैव स्वपर्यायरूप कालामध्ये राहतो. शरीराच्या अवस्थेमध्ये राहत नाही. जीव ज्ञान, दर्शन, सुख, वीर्यादी आपल्या गुणांच्या अखंड भावामध्ये व्यापून आहे. शरीराच्या स्पर्श–रस–गंध–

वर्णांमध्ये व्यापून नाही. आपल्या अमूर्तिक प्रदेशांमध्ये आपल्या अनंत गुणांवर राज्य करतो. या अनंत गुणांच्या अखंड सत्तेचा तो एकाधिपती सम्राट आहे. त्याचप्रमाणे पुद्‌गलसुद्धा आपल्या द्रव्यक्षेत्र कालभावात्मक अस्तित्वामध्ये स्थित आहे. पुद्‌गलाची सुद्धा आपल्या गुणांमध्येच सत्ता चालते. जीवावर त्याची सत्ता नाही. दोघेही स्वत:च्या अस्तित्वाला कधीही सोडत नाहीत.स्वसत्ताधीश आहेत.

जीवाच्या आकाराचे कारण –

प्रत्येक द्रव्य आपापल्या स्वरूपाने सत् असून देखील एका पुद्‌गलाचा अन्य पुद्‌गलाशी संयोग होऊन द्रव्यपर्याय उत्पन्न होतो. एका परमाणूचा दुसऱ्या परमाणूशी संबंध होऊन द्व्यणुक स्कंध उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे अनेक परमाणूंचा संयोग होऊन स्कन्धरूप विभावव्यंजन पर्याय उत्पन्न होतो. त्याला अनेक आकार प्राप्त होतात. त्याचप्रमाणे निमित्त–नैमित्तिक योगवश जीव व पुद्‌गलांचा संयोग होऊन विभावद्रव्यपर्यायांची प्राप्ती होते. पुद्‌गल–पुद्‌गलांच्या संबंधाने झालेल्या पर्यायाला समानजातीय द्रव्यव्यंजनपर्याय म्हणतात. तसेच जीव व पुद्‌गलांचा संयोग होऊन झालेल्या एकद्रव्यपर्यायाला असमानजातीय द्रव्यव्यंजनपर्याय म्हणतात. मनुष्य, देव, नारक, तिर्यंच असे नाव प्राप्त करतो. मनुष्यादी शरीराच्या प्रमाण आत्म्याचे प्रदेश संकोचविस्ताराला प्राप्त होतात. शरीराच्या संबंधाने आत्मप्रदेशांनाही अनेक प्रकारचा आकार प्राप्त होतो. या आकारांच्या परिवर्तनाला व्यंजन पर्याय म्हणतात. ज्याप्रमाणे आकार भिन्न भिन्न होतात, त्याप्रमाणे ज्ञान, दर्शन, वीर्य आदी विशेष गुणांची प्रगटता सुद्धा भिन्न भिन्न प्रकारची होते.

सर्व द्रव्यांमध्ये आपल्या अद्वैत स्वरूपामध्ये राहणाऱ्या या जीवाने प्रथम स्वत:मध्ये द्वैत उत्पन्न केले. हा द्वैतपणा वाढत वाढत इतक्या द्वंद्वामध्ये पसरला की, ज्यामुळे हा विचित्र नाना लोक उत्पन्न झाला. मी पराला जाणतो. हा प्रथम द्वैत भाव. त्यानंतर रागद्वेषाचा परिग्रह, त्यामुळे कर्ताकर्मबुद्धी, त्यामुळे कर्माशी बंध, त्यामुळे शरीराशी संबंध अशी द्वंद्वाची मालिका उत्पन्न होत हा जीव संकटामध्ये सापडला. वास्तविक या जीवावर दुसरे संकट काही नाही. भ्रमबुद्धीच संकटाचे मूळ आहे. परद्रव्याला जाणल्यावर या जीवाला भ्रम होतो की, हे परद्रव्य माझे आहे.

अनेक द्रव्यांचा संयोग झाल्यावर सुद्धा जीव पुद्‌गलाशी एकरूप होत

नाही. विभावद्रव्यपर्यायाच्या कालामध्ये सुद्धा एक द्रव्यपर्याय सदैव प्रवर्तमान असते. मनुष्यादी पर्यायांमध्ये मनुष्यगतिरूप जीवाचा पर्याय भिन्न आहे व मनुष्य शरीररूप पद्‌गलाचा पर्याय भिन्न आहे. वास्तविक जीव परद्रव्यामध्ये काही करत नाही. केवळ त्याला आपले मानतो. या एका भ्रमावरच सर्व संसाराचे संकट सुरू झाले. जेव्हा जीव भेदविज्ञानाद्वारे जीव व पुद्‌गलामध्ये भेद जाणतो, तेव्हा सर्व संकटातून मुक्त होतो.पुद्‌गलकर्मोपाधीने रहित झाल्यावर स्वभावद्रव्यव्यंजन पर्याय प्रकट होतो. त्यासाठी कर्मोपाधिनिरपेक्ष जीवाचे चिदानन्दैकरूप स्वरूपास्तित्वाला जाणावे. त्या एकत्वाच्या परिचयाने पराशी एकत्व सुटते व स्वत:मध्ये एकत्वाचा अनुभव होतो. असत्य अनेक असते, पण सत्य एकच असते. ज्याप्रमाणे शाळेमध्ये शिक्षकांनी मुलांना एक गणित सोडवायला दिले. त्या प्रश्नाचे सत्य उत्तर एकच असणार आणि चुकीची उत्तरे अनेक असणार. कुणी बेरीज चुकतो, तर कोणी त्याची वजाबाकी चुकतो, कुणाचा भागाकार चुकतो, तर कुणाचा गुणाकार, तर कोणाची सोडवण्याची पद्धत चुकते. पदार्थामध्ये जो सत्याचा विकास होतो, तो एकच प्रकारचा होतो. ज्याप्रमाणे अनंत सिद्धांचा शुद्ध विकास समान आहे. परंतु पराच्या उपाधीच्या संबंधाने संसारी जीवामध्ये जे विकार होतात, ते अनेक प्रकारचे असतात. ते सर्व पर्याय नाशवंत आहेत. असा निश्चय करून, पुद्‌गलाच्या संयोगापासून भिन्न या माझ्या शुद्ध असंख्यात, प्रदेशांमध्ये सिद्ध पर्याय प्रकट करण्यायोग्य आहे व नरनारकादी पर्याय सोडण्यायोग्य आहेत, असे श्रद्धान करावे.

अनन्तर पूर्व गाथेमध्ये व्यवहार जीवत्वाला कारणभूत पर्याय सांगितले. आता या गाथेत त्या पर्यायाचे प्रकार सांगतात.

णरणारयतिरियसुरा संठाणादीहिं अण्णहा जादा
पज्जाया जीवाणं उदयादिहिं णामकम्मस्स ।। १५३ ।।

अन्वायार्थ – (णामकम्मस्स उदयादिहिं) नामकर्माच्या उदयादिकामुळे **(जीवाणं)** संसारी जीवांचे **(णरणारथतिरियसुरा)** मनुष्य, नारक, तिर्यंच व देव **(पज्जाया)** पर्याय **(संठाणादिहिं)** संस्थान आदींच्या द्वारे **(अण्णहा)** अन्य अन्य प्रकारचे **(जादा)** उत्पन्न होतात.

तात्पर्य – संसारी जीव कर्मांनी बद्ध आहे. त्यामुळेच त्याला चार गतीमध्ये अनेक प्रकारच्या शरीराला धारण करून अनेकरूप व्हावे लागते.

संसारी जीवांचे विविध आकार –

ज्याप्रमाणे अग्नी एक उष्णस्वरूप आहे, पण नाना ईंधनाच्या संयोगाने अग्नीचे अनेक आकार बनतात. लाकडाच्या अग्नीचा आकार वेगळा, शेणकूटाच्या अग्नीचा आकार वेगळा, गवताच्या अग्नीचा आकार वेगळा, भूशाच्या अग्नीचा आकार वेगळा होतो. त्याप्रमाणे नाना कर्माच्या उदयानुसार वेगवेगळ्या भावांमध्ये जीवाचे भिन्न भिन्न आकार उत्पन्न होतात. नामकर्माच्या उदयाने एकेंद्रिय पर्यायामध्ये पृथ्वी, जल, अग्नि, वायु, वनस्पति रूप अनेक आकार उत्पन्न होतात. पृथ्वीकायिकामध्येही लालमणि, नीलमणि, स्फटिक, सुवर्ण, चांदी, इत्यादी रूप धारण करतो. वनस्पतीपर्यायामध्ये आंबा, नींबू, केळी, जाई–जुई, गुलाब, मोगरा अनेक विविध रंगरूप प्राप्त करतो.

द्वीन्द्रिय पर्यायामध्ये अळी, शंख, कौडी इत्यादी रूप विभिन्न आकार ग्रहण करतो. त्रीन्द्रिय पर्यायामध्ये मुंगी, मुंगळा, ढेकूण, ऊ इत्यादी, चतुरिन्द्रिय पर्यायामध्ये भुंगा, फुलपाखरू, डास, मधमाशी आदी अवस्थांना अंगीकार करतो. पंचेद्रिय पर्यायामध्ये तिर्यंचगतीमध्ये मासा, गाय, म्हैस, कुत्रा, मांजर, सिंह, वाघ, हरीण, साप, मुंगूस, कबूतर, कावळा, मोर, पोपट आदी अनेक रूप अवस्थांमध्ये नाना प्रकार शरीराचे आकार रंग, हाड, मांस आदी प्राप्त करतो.

मनुष्यगतीमध्ये आर्य म्लेच्छ देशांमध्ये जन्म घेऊन अनेक रंगाचे, अनेक प्रकारे सुन्दर, असुन्दर, जाड, बारीक, उंच, गिड्डे असे शरीर धारण करतो. देवगतीमध्ये भवनवासी, व्यंतर, ज्योतिषी, कल्पवासी देवांमध्ये वैक्रियिक, शरीर अनेक जातींमध्ये जन्म घेऊन अनेक प्रकारचे लहान–मोठे शरीर धारण करून आपला काळ घालवितो. त्याचप्रमाणे नरकगतीमध्ये अनेक प्रकारचे भयावह असुन्दर लहान–मोठ्या शरीरांना धारण करून कष्ट भोगावे लागतात.

संसार अवस्थेत अनेक शरीरांमध्ये जीवाचा आकार संकोच–विस्तारामुळे अनेक प्रकारचा होतो व शरीराच्या चांगल्या–वाईट अनेक अवस्था होतात. यामध्ये नामकर्माचा विचित्र प्रकारचा उदय निमित्त आहे. म्हणून नामकर्माला चित्रकाराची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे चित्रकार अनेक प्रकारची रंगीबेरंगी चित्रे काढतो त्याप्रमाणे नामकर्म अनेक आकार, अनेक रंगरूपवाले शरीरे रचतो.

सर्व सांसारिक व्यंजनपर्याय कर्मद्वारा रचित आहेत –

यद्यपि हा जीव एकस्वरूप आहे. ज्ञायकस्वभावी आहे, परंतु कर्मोपाधीच्या संबंधाने अनेक प्रकारच्या संस्थानांनी अन्य अन्य प्रकारे होऊ लागतो. आज मनुष्य आहे. पुन्हा मनुष्य भव सोडून हाथी झाला की सर्व शरीर बदलते. आकार प्रकार बदलतो.

एक गंमतीची गोष्ट आहे. मुंबईमध्ये कोणी मनुष्य मेला व तो जयपुरमध्ये हाथी बनून जन्मला, रस्त्यामध्ये विग्रहगतीने जातो, तेंव्हा आकार राहणार मनुष्याचा व नाव येणार हत्तीचे. मनुष्याच्या आकारात हत्ती असणार किंवा हत्ती मरून मनुष्य झाला तर विग्रहगतीमध्ये हत्तीच्या आकारात मनुष्य असणार. मुंगी मरून हत्ती झाली तर विग्रहगतीत हत्ती मुंगीच्या आकारामध्ये असतो. आयु बदलली, गति बदलली, ह्या अनुकूल भावपण बदलले पण आधारभूत शरीर अजून मिळाले नाही. तो त्या दुसऱ्या स्थानावर गेल्यावर शरीर वर्गणा ग्रहण करतो. म्हणून विग्रहगतीमध्ये आकार पूर्वीचाच राहतो.

अग्नीच्या स्वरूपामध्ये कोणताही आकार नाही. परंतु अग्नी ज्या इंधनात पोहचतो तसाच त्या अग्नीचा आकार होतो. ज्याप्रमाणे जीवाचा स्वतःचा कोणताही आकार नाही, जसा त्याला शरीराचा आकार मिळाला तसा त्याच्या प्रदेशांचा विस्तार झाला. ज्ञानी असा विचार करतो की, 'संसारामध्ये जेवढ्या अवस्था आहेत, यद्यपि या माझ्या आत्म्याने या पंच परावर्तनरूप संसारामध्ये अनेक अवस्था धारण केल्या. अनेक वेष धारण केले. परन्तु माझा निश्चित असंख्यात प्रदेशमय आकार व माझे निश्चित स्वाभाविक गुण माझ्यामध्ये तसेच आहेत. त्यांच्या अवस्था कर्माच्या निमित्ताने अनेक विकाररूप झाल्या. तथापि त्यांचा स्वभाव कधी नष्ट झाला नाही. मी जेव्हा कर्माच्या आवरणाला आपल्यापासून दूर करून स्वत:ला पाहतो, तेव्हा स्वत:ला सिद्ध भगवान रूपच शुद्ध अनन्तशक्तींनी संपन्न पाहतो. म्हणून निजानन्दरूप अमृताचे पान करण्यासाठी मी आपल्या स्वभावाचा अनुभव करीत स्वाद घेतो.'

निश्चयाने जीव या शरीरादीने रहित शुद्ध टंकोत्कीर्ण ज्ञाता–द्रष्टा आहे. हाच माझा स्वभाव आहे. अशी भावना करून आपल्या आत्म्याला सर्व नरनारकादी पर्यायांपासून भिन्न एकाकाररूप अनुभव करावे.

या विश्वामध्ये एका ठिकाणी अनेक पदार्थ स्थित आहेत. जेथे आपण आहोत तेथेच अनन्त पदार्थ स्थित आहेत त्यामध्ये स्व व पर यांचा विभाग करणे

कसे शक्य आहे ? अज्ञानी एकत्र असणाऱ्या सर्व पदार्थांना एक मानूनच व्यवहार करतो. जेथे एक जीव आहे तेथे अन्य अनन्त जीव आहेत, अनन्तानन्त पुद्गलपरमाणू आहेत, धर्म, अधर्म, आकाश द्रव्याचा काही भाग आहे, असंख्यात कालद्रव्य आहेत. अज्ञानी जीव यांना भिन्न भिन्न न जाणता सर्वांना मी रूपाने स्वीकारतो. म्हणून आचार्य स्व आणि पराला वेगळे करण्यासाठी स्व-पर विभागाला कारणभूत, पदार्थाला निश्चित करणारे स्वरूपास्तित्व आहे हे प्रकाशित करतात. प्रत्येक वस्तूच्या स्वरूपास्तित्वाला जाणल्याशिवाय त्याला वेगळे करणे शक्य नाही. ज्याप्रमाणे गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ सर्व धान्यांचे मिश्रण झाले तर त्याला त्याच्या स्वरूपाच्याद्वारे वेगळे केले जाते. त्याप्रमाणे आत्म्याचे अन्य द्रव्यांबरोबर मिश्रण झाले असता अर्थनिश्चायक अस्तित्वच त्याला परापासून भिन्न करण्यासाठी कारण आहे हीच गोष्ट पुढील गाथेत सांगतात –

तं सब्भावणिबद्धं दव्वसहावं तिहा समक्खादं ।
जाणदि जो सवियप्पं ण मुहदि सो अण्णदवियम्हि ।।१५४।।

अन्वयार्थ –(जो) जो जीव **(तं)** त्या (पूर्वोक्त) **(सब्भावणिबद्धं)** अस्तित्वाने युक्त **(तिहा समक्खादं)** तीन प्रकाराने सांगितलेल्या **(सवियप्पं)** भेदसहित **(दव्वसहावं)** द्रव्यस्वभावाला **(जाणदि)** जाणतो. **(सो)** तो **(अण्णदवियम्हि)** अन्य द्रव्यांमध्ये **(ण मुहदि)** मोहाला प्राप्त होत नाही.

तात्पर्य – जो आपल्या स्वरूपास्तित्वाला यथार्थ जाणतो तो परपदार्थांमध्ये मोह करीत नाही.

अर्थनिश्चायक स्वरूपास्तित्व –

जे द्रव्याला निश्चित करणारे स्वलक्षणभूत स्वरूपास्तित्व सांगितले आहे तो वास्तविक द्रव्याचा स्वभावच आहे. कारण द्रव्याचा स्वभाव अस्तित्वाने बनलेला आहे. ते अस्तित्व द्रव्यगुणपर्याय व उत्पादव्ययध्रौव्यरूपाने तीन प्रकाराने अवस्थित आहे. कोणत्याही पदार्थाला ओळखायचे असेल तर त्याचे द्रव्य काय ? गुण काय व पर्याय काय आहेत ? हे जाणून घेणे आवश्यक आहे. तिन्ही काळामध्ये होणाऱ्या सर्व पर्यायांमध्ये जे अनन्यरूप आहे अर्थात तोच तोचपणा आहे ते द्रव्य आहे. जसे रींगा, कुंडल, बांगड्या, चेन इत्यादी सर्व दागिन्यांमध्ये सोनेपणा आहे ते द्रव्य. अवस्था बदलली तरी जो स्थायी भाव आहे ते द्रव्य. सर्व पर्यायांमध्ये जे व्यापक आहे ते द्रव्य. जीवाच्या देव, मनुष्य

तिर्यंच व नारक पर्यायांमध्ये जो जीवपणा, जीवपणा आहे ते द्रव्य आहे. जे द्रव्याचे विशेषण आहे तो गुण आहे. ज्याच्याद्वारे द्रव्याला अन्य द्रव्यापासून वेगळे केले जाते तो गुण आहे. जसे सोन्याचा पिवळेपणा, स्निग्धपणा, भारीपणा पितळ, चांदी आदि द्रव्यापासून सोन्याला वेगळे करतो. अन्वयाचे व्यतिरेक अर्थात् द्रव्यामध्ये जो भेद करतो तो पर्याय. सोन्यामध्ये अंगठी, रिंगा, कुंडल, कंकण असा भेद तेच पर्याय आहेत.

या द्रव्यगुणपर्यायाचा निर्णय स्वतःमध्ये करून स्वतःच्या अस्तित्वाला जाणता येते. चेतनत्वाचा अन्वय हे माझे द्रव्य. माझ्या अनादिअनंत पर्यायांमध्ये चेतनत्वाचा अन्वय आहे. प्रत्येक पर्यायामध्ये चेतनपणा चेतनपणा प्रतिभासित होत आहे. या चेतनेचे जे विशेष ज्ञान, दर्शन, सुख वीर्य इत्यादी आहेत. ते माझे गुण आहेत. चेतनत्वाचा जो भाव दिसतो तेच पर्याय आहेत. मिथ्यादृष्टी, सम्यग्दृष्टी, असंयमी, संयमी, संसारी, मुक्त, इत्यादी चेतनेमध्ये भेद दिसतो तेच पर्याय होत.

उत्पादव्ययध्रौव्यरूप त्रयात्मक अस्तित्व –

तसेच उत्पादव्ययध्रौव्यरूपाने अस्तित्व तीन प्रकारचे आहे. पूर्व पर्यायाचा नाश व्यय होय. उत्तर पर्याय उत्पन्न होणे उत्पाद आहे आणि पूर्व व उत्तर पर्यायाला स्पर्श करणारे ध्रौव्य आहे. प्रत्येक वस्तू प्रतिसमयाला स्वतःमध्येच उत्पाद, व्यय व ध्रौव्यपणाला प्राप्त होते. माझा उत्तर चेतनरूपानेच उत्पाद होतो, पूर्व चेतनरूपाने नाश होतो व चेतनरूपानेच माझे ध्रौव्य आहे. अशाप्रकारे चेतन द्रव्यगुणपर्यायस्वरूप व चेतन उत्पादव्ययध्रौव्य असे त्रयात्मक स्वरूप-अस्तित्व ज्याचा स्वभाव आहे असा मी वास्तविक सर्व अन्य द्रव्यापासून भिन्न आहे. अचेतनपणाचा अन्वय, अचेतनाचे विशेषणस्वरूप गुण व अचेतनाचे व्यतिरेकरूप पर्याय या तीनस्वरूप तसेच अचेतन उत्पादव्यय ध्रौव्यस्वरूप जे पुद्गलद्रव्याचे अस्तित्व आहे ते माझ्यापासून भिन्न आहे. अशाप्रकारे स्वपरामध्ये भेद करण्यासाठी पदोपदी स्वरूपास्तित्वाकडे लक्ष असणे आवश्यक आहे.

पुद्गलपरमाणूंचा पिंडस्वरूप घनस्वरूप जो हा स्कंध आहे हे माझे स्वरूप अस्तित्व नाही. माझे स्वरूप कसे आहे ? माझ्या स्वरूपामध्ये रूप, रस, गंध, स्पर्श नाही. माझे अमूर्तस्वरूप आहे. परंतु आकाशसुद्धा अमूर्त आहे. ह्या अमूर्त आकाशापासून हा मी भिन्न आहे. याचा विभाग करणारे माझे

ज्ञानस्वरूप आहे. मी ज्ञानधन, आनन्दस्वरूप एक सत् आहे.

जेथे आत्मा आहे तेथे सर्व पदार्थ आहेत, पण ज्ञानीला ते सर्व भिन्न भिन्न भासित होतात. जेवढे जीव आहेत ते सर्व शुद्ध ज्ञानानंदमय झळकतात. जेवढे अनात्मद्रव्य पुद्गलादी आहेत, ते सर्व अचेतनरूपाने भासित होतात. त्याला आपल्या आत्म्याची सत्तासुद्धा अन्य आत्म्यांपासून वेगळी भासित होते. तो आपल्या आत्म्याला परम वीतराग ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य यांचा अखंड पिंडस्वरूप शरीरामध्येच अनुभवतो. अशा आत्मानुभवी जीवाला स्वस्वभावरूप निज द्रव्याला सोडून अन्य द्रव्यावर मोह नसतो. तो संपूर्ण विश्वाला ज्ञाताद्रष्टारूपाने समान पाहतो. कोणत्या पदार्थाविषयी राग व कोणाविषयी द्वेष करीत नाही. स्वरूपास्तित्वाला जाणल्यावर मोह उत्पन्नच होत नाही.

स्वतःच्या अस्तित्वामध्येच स्वतःचा बोध –

वस्तुतः प्रत्येक द्रव्य आपापल्या अस्तित्वाच्या सीमेमध्ये आहे. कोणतेही द्रव्य आपल्या सीमेचे कधीही उल्लंघन करीत नाही. वस्तु आपल्याजवळच आहे; परंतु हा जीव अज्ञानामुळे ती बाहेर शोधत आहे. एका गुरुजवळ एक शिष्य परमात्मा शोधण्यासाठी गेला आणि तो त्यांच्या आश्रमामध्ये राहू लागला. तीन महिन्यानंतर गुरूंनी शिष्याला विचारले, 'मिळाला का ?' शिष्याने नकारार्थी मान डोलावली. गुरूंनी त्याला एक थप्पड मारली आणि सांगितले, ''अजून साधना कर''. तीन महिन्यानंतर पुन्हा गुरूंनी विचारले. शिष्याने सांगितले, 'नाही मिळाला'. अशा प्रकारे चार वेळा झाले. बारा महिने निघून गेले. गुरू पुन्हा शिष्याला भेटले व विचारले, ''मिळाला ?'' शिष्याने एक थप्पड गुरूला मारली व म्हणाला, ''तो तर मिळालेलाच होता, कोठे गेला होता ?'' गुरू नाचू लागले.

वस्तुतः आत्मस्वभाव मिळालेलाच आहे. तो कधीच नष्ट होत नाही. आत्मा अनन्त काळापासून चेतन आहे आणि अनन्त काळापर्यंत चेतन राहणार. तो तर जसा आहे तसाच आहे. मात्र त्याला पाहण्याचा व प्रतीती करण्याचा पुरुषार्थ करायचा आहे. तो स्वतःमध्येच विद्यमान आहे. परन्तु आम्ही स्वतःचे अस्तित्व स्वतःमध्ये न पाहता बाहेर शोधत आहे जेथे तो नाही.

ज्याप्रमाणे कोणी मुलाला फसवतो. जवळ कावळ्याला उडताना पाहून मुलाला म्हणतो की तुझा कान कावळा घेऊन गेला. बालक बालकच आहे. अज्ञानी, मंद बुद्धिवाला स्वतः स्वतःचा निर्णय करण्याची बुद्धिमानी

करीत नाही. आपले कान तपासून पाहत नाही आणि दुसऱ्यांच्या सांगण्यावरून उडणाऱ्या कावळ्याच्या पाठीमागे लागतो, ओरडतो. कोणी त्याला विचारतो 'का पळतोस ? का ओरडतोस ?' बालक म्हणतो, 'मला काही विचारू नका, मला वेळ नाही. माझा कान कावळा घेऊन गेला. आता मी बिन कानाचा होईन.' ऐकणारे लोक हसतात व म्हणतात, 'तुझा कान कावळा कसा घेऊन जाऊ शकतो.' तो म्हणतो, 'मोठमोठ्या लोकांनी सांगितले आहे की तुझा कान कावळा घेऊन गेला. 'अरे, मुला मोठ्या लोकांनी सांगितले असेल. पण तू आपल्या हाताने कान तपासून तर पहा.' जेव्हा तो आपले कान तपासून पाहतो तेव्हा त्याचे सर्व संकट दूर होते. त्याचप्रमाणे आम्ही आपले अस्तित्व बाहेर शोधतो व दुःखी होतो. परिवारामध्ये, धनामध्ये, कुटुम्बामध्ये आपला आनन्द शोधतो. शरीरामध्ये स्वतःचे अस्तित्व शोधतो. आणि त्याच्या पाठीमागे लागून परेशान होतो. जेव्हा श्रीगुरू सांगतात, 'जरा तू आत तर तपासून पहा, तुझे अस्तित्व बाहेर नाही, तुझ्यामध्येच आहे. जेव्हा आत डोकावण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपले अस्तित्व आपल्यामध्येच भासित होते तर याचे सर्व संकट संपते. आपले अस्तित्व आपल्यामध्ये जाणल्यावर परद्रव्यासंबंधीचा मोह आपोआप नष्ट होतो. सर्व परद्रव्य व परभावांपासून भिन्न निज चैतन्यस्वभावामध्ये स्वपणाचा अनुभव करून सहज आनन्दाचा भोग घ्यावा.

आत्मा जर अनादिकाळापासून परद्रव्यापासून भिन्नच आहे तर याला पराचा संयोगच का होतो ? पुढील गाथेमध्ये त्या परद्रव्याच्या संयोगाच्या कारणांचा आचार्य स्वयं विचार करतात. परद्रव्याच्या संयोगाच्या कारणांचा विचार करण्यापाठीमागे सुद्धा आत्म्याला परद्रव्यापासून विभक्त करणे हेच प्रयोजन आहे.

अप्पा उवओगप्पा उवओगो णाणदंसणं भणिदो।
सो वि सुहो असुहो वा उवओगो अप्पणो हवदि।।१५५।।

अन्वयार्थ – (अप्पा) आत्मा **(उवओगप्पा)** उपयोगस्वरूप आहे. **(उवओगो)** उपयोग **(णाणदंसणं)** ज्ञान दर्शनस्वरूप **(भणिदो)** सांगितला आहे **(अप्पणो)** आत्म्याचा **(सो उवओगो)** तो उपयोग **(सुहो असुहो वा)** शुभ अथवा अशुभ **(हवदि)** होतो. परद्रव्याच्या संयोगाचे कारण जीवाचा शुभ किंवा अशुभ उपयोग आहे.

तात्पर्य – परद्रव्याच्या संयोगाचे कारण जीवाचा शुभ किंवा अशुभ

उपयोग आहे.

आत्मा उपयोगस्वभावी –

उपयोग आत्म्याचा स्वभाव आहे. उपयोग म्हणजे चैतन्याला अनुसरून होणारा परिणाम आहे. उपयोगाशिवाय जीव एक क्षणही राहू शकत नाही. जीवाच्या सर्व पर्यायांमध्ये उपयोगाचा सद्भाव आहे व अन्य कोणत्याही द्रव्यामध्ये उपयोग नाही म्हणून उपयोग हे जीवाचे असाधारण लक्षण आहे. उपयोग लक्षणाने जीवाला इतर द्रव्यापासून वेगळे करता येते.

उपयोग दोन प्रकारचा आहे. – १) ज्ञान उपयोग व २) दर्शन उपयोग. दर्शन उपयोग निराकार आहे व ज्ञान उपयोग साकार आहे. दर्शन उपयोग बाह्य पदार्थाला ग्रहण न करता अन्तर्मुख पदार्थाला अर्थात स्वला प्रकाशित करतो व ज्ञान उपयोग बाह्य पदार्थांना विकल्परूपाने ग्रहण करतो. अल्पज्ञानीला दर्शन उपयोग व ज्ञान उपयोग एका वेळेस होत नाहीत. प्रथम दर्शन होते. नंतर ज्ञान होते. ज्ञान दर्शनपूर्वक होते.

परद्रव्यसंयोगाचे कारण : उपयोगविशेष –

अनादि काळापासून या आत्म्याबरोबर उपाधी लागलेली आहे. या उपाधीच्या निमित्ताने आत्म्यावर मोह रागद्वेषाचे संकट आहे. त्यामुळे आत्म्याचा उपयोग दोन प्रकारचा होतो. १) शुद्ध व २) अशुद्ध. जेव्हा मोहाच्या कलुषतेने उपयोग मलिन होत नाही तेव्हा तो उपयोग शुद्ध होतो. शुद्धोपयोग कर्मबन्धाचे कारण नाही. परन्तु जेव्हा मोहाच्या कलुषतेने उपयोग मलिन होतो तेव्हा तो अशुद्धोपयोग म्हटला जातो. शुद्ध उपयोग एकच प्रकारचा आहे. कारण शुद्धता अनेक प्रकारची नसते. वस्तूचा स्वभाव शुद्ध आहे. त्यामध्ये पराचा संयोग झाला की त्याला अशुद्ध म्हटले जाते. पाणी अशुद्ध म्हटले जाते. अशुद्ध उपयोग रागसहित आहे. विभावसहित आहे. विभावाच्या विविधतेमुळे अशुद्ध उपयोग अनेक प्रकारचा आहे. तो संक्षेपाने दोन प्रकारचा आहे. १) शुभोपयोग व २) अशुभोपयोग.

राग दोन प्रकारचा आहे.– १) शुभराग व २) अशुभराग. देवशास्त्रगुरूसंबंधी भक्तिरूप परिणाम शुभरागरूप आहे. शुभरागाने सहित उपयोग शुभोपयोगरूप आहे. जेव्हा उपयोगामध्ये कषायाच्या मन्दतेमुळे धर्मानुराग होतो तेव्हा तो शुभोपयोग म्हटला जातो. पाच इन्द्रियांच्या विषयांमध्ये आसक्तिरूप अशुभरागरूप व कषायांच्या तीव्रतेमुळे तीव्र क्रोध,

मान, माया लोभरूप मोह-द्वेषरूप परिणाम होतो तेव्हा तो अशुभोपयोग म्हटला जातो.

अशुभ उपयोगामध्ये संक्लेशता आहे व शुभोपयोगामध्ये विशुद्धता आहे. पण हे दोन्ही उपयोग कर्मबन्धाचे कारण आहेत. सामान्य उपयोग आत्म्याचा स्वभाव आहे म्हणून ते कर्मबन्धाचे कारण नाही. पण त्या उपयोगामध्ये जे रागादिकांचे मिश्रण झाले आहे त्यामुळे बंधन आहे. हे कर्मबंधनच परद्रव्याच्या संयोगाचे कारण आहे. आज जो या जीवाला इष्ट किंवा अनिष्ट परद्रव्याचा संयोग झाला आहे त्याला आम्हीच शुभ व अशुभ उपयोगाच्या द्वारे आमंत्रण दिले आहे.

ज्याप्रमाणे कोणी एक मुलगा मोठ्या मुलाला शिवी देतो, कटुवचन बोलतो. तर त्याला मार बसतो. मार बसण्याचे कारण आपले कटुवचन आहे ते त्याला रागाच्या भरात लक्षात येत नाही. हा मला मारतो, म्हणून दुःखी होतो, परंतु ही आपत्ती माझ्या कुवचन बोलण्यामुळे आहे. माझाच अपराध आहे हे त्याला लक्षात येत नाही, जर मी कुवचन बोललो नाही तर माझी पिटाई बंद होईल. त्याप्रमाणे हा जीव उपयोगविशेषामुळे संकट आहे हे जाणत नाही. जन्ममरणाचे चक्र, संसारपरिभ्रमण, आकुलता व्याकुलता या सर्वांचे कारण अशुद्ध उपयोग आहे. अशुद्ध उपयोग उपरागसहित आहे म्हणून कर्मबंधनाचे कारण आहे. म्हणून हेय आहे. शुद्ध उपयोग उपरागरहित निरुपराग स्वरूप आहे. म्हणून कर्मबंधनाचे कारण नाही. हे जाणून शुद्धोपयोगाला उपादेय मानून त्याच्या प्राप्तीचा निरंतर पुरुषार्थ करावा.

मागील गाथेमध्ये हे सिद्ध केले की आत्मा उपयोगस्वरूप आहे व तो उपयोग शुद्ध व अशुद्ध दोन प्रकारचा आहे.

अशुद्धोपयोग पण शुभ व अशुभरूपाने दोन प्रकारचा आहे. त्यातील कोणता उपयोग परद्रव्याच्या संयोगाचे कारण आहे हे आता पुढील गाथेत सांगतात -

उवओगो जदि हिं सुहो पुण्णं जीवस्स संचयं जादि ।
असुहो वा तध पावं तेसिमभावे ण चयमत्थि ।।१५६।।

अन्वयार्थ :- (जदि हिं) जर **(उवओगो सुहो)** उपयोग शुभ असेल तर **(जीवस्स)** जीवाला **(पुण्णं)** पुण्याचा **(संचयं जादि)** संचय होतो. **(तध वा)** आणि जर **(असुहो)** उपयोग अशुभ असेल तर **(पावं)** पापाचा संचय होतो.

(तेसिमभावे) त्या दोन्हींच्या अभावामध्ये (चयं ण अत्थि) कर्माचा संचयच होत नाही.

तात्पर्य– शुभोपयोगाने पुण्याचा व अशुभोपयोगाने पापाचा बंध होतो. दोघांचा अभाव झाल्यावर कर्माचा बंध होत नाही.

उपरागाच्या सम्बन्धाने उपयोगाची द्विविधता –

उपयोग जीवाचा स्वभाव असताना त्यामध्ये दोनपणा का आला तर उपरागाच्या संबंधामुळे उपयोगामध्ये भेद झाला. उपरागसहित उपयोग अशुद्धोपयोग व उपरागरहित उपयोग शुद्धोपयोग. तो उपरागसुद्धा दोन प्रकारचा आहे. एक विशुद्धरूप व एक संक्लेशरूप. विशुद्धरूप उपराग काय आहे ? भगवंतांच्या स्वरूपासंबंधी अनुराग, त्यांची वंदना, भक्ती, पूजा, स्तुती करण्याचे भाव, स्वतःच्या स्वरूपाबद्दल ओढ, त्याच्या प्राप्तीसाठी उत्सुकता, स्वतःच्या कल्याणासाठी धडपड हा सर्व प्रशस्त विशुद्ध राग आहे. त्याने सहित उपयोग शुभोपयोग आहे.पाच इद्रियांच्या विषयासंबंधी अनुराग, तीव्र कषायरूप प्रवर्तन इ. अप्रशस्त संक्लेशरूप राग आहे. त्याने सहित उपयोग अशुभोपयोग आहे. द्वेषपूर्ण संक्लेशरूपच आहे. या दोन्ही उपरागाने रहित उपयोग शुद्ध उपयोग आहे.

ज्याप्रमाणे एखादे चक्र फिरत आहे, त्यामध्ये एखाद्या कपड्याचा किंवा प्लॅस्टिकचा संयोग झाला की त्याच्या फिरण्यामध्ये विशिष्टता येते, भारीपणा येतो. त्याच्या पुढील सर्व वर्तनामध्ये अन्तर होऊ लागते. त्याचप्रमाणे उपयोग जेव्हा स्वभाव दृष्टी घेऊन होतो. त्यावेळी त्याची वृत्ती सहज होते. पवित्र असते केवळ जाणणे पाहणेरूप असते, परंतु ज्यावेळी त्यामध्ये परद्रव्याचा संयोग होतो त्यावेळी ती वृत्ती सहज न होता त्यामध्ये अडचण निर्माण होते. तो उपयोग अशुद्ध होतो. उपाधी दूर झाल्यावर उपयोग शुद्ध होतो. म्हणून उपरागरहित उपयोग शुद्ध उपयोग आहे.

शुभ–अशुभ–शुद्ध या उपयोगांचे फळ –

कर्मबंधाचे कारण कषायाची कलुषता आहे. कषायाच्या सद्भावात आयुबंधाच्या वेळी आठ कर्मांचा आणि इतर वेळी सात कर्मांचा बंध नियमित होतो. यापैकी ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अन्तराय हे चार घातिकर्म पापरूपच आहेत. शुभोपयोग असो की अशुभोपयोग यांचा बंध सदैवच होतो. परंतु 'जेव्हा शुभोपयोग होतो तेव्हा यामध्ये अनुभागबंध कमी पडतो व त्यांची स्थिती पण कमी बांधली जाते. जेव्हा अशुभोपयोग होतो तेव्हा अनुभाग बंध जास्त होतो व स्थितिबंध ही जास्त होतो.

अघातिकर्मामध्ये दोन प्रकारच्या प्रकृती आहेत १) पुण्यप्रकृती व २) पापप्रकृती. सातावेदनीय, उच्चगोत्र, देव, मनुष्य व तिर्यचायु, देवगती, मनुष्यगती पंचेन्द्रिय जाती इत्यादि नामकर्माच्या प्रकृती पुण्यरूप आहेत. व असातावेदनीय, नीचगोत्र, नरकायु, नरकगती, एकेन्द्रियादी जाती इ. नामकर्माच्या प्रकृती पापरूप आहेत.

जेव्हा या जीवाचा उपयोग मंदकषाय रूप होऊन दानपूजा, स्वाध्याय, जप,तप इत्यादीमध्ये तत्पर होतो तेव्हा शुभोपयोग होतो व तेव्हा अघातिककर्मामधील पुण्यप्रकृतींचा बंध होतो व जेव्हा उपयोग तीव्र कषायरूप होऊन हिंसा, असत्य इत्यादी पापकार्यामध्ये प्रवृत्त होतो तेव्हा अशुभोपयोग होतो त्याद्वारे अघातिकर्मामधील पापप्रकृतींचा बंध होतो. शुद्धोपयोगामध्ये विशुद्धिरूप आणि संक्लेशरूप दोन्ही उपरागाचा अभाव आहे; म्हणून शुद्धोपयोग परद्रव्याच्या संयोगाचे अर्थात कर्मबन्धाचे कारण नाही. जेव्हा कषायांचा अभाव होऊन आत्मा साक्षात् शुद्धोपयोगमय होतो तेव्हा कोणत्याही कर्माचा बंध होत नाही. अकराव्या गुणस्थानापासून कषायाचा उदय नाही. परंतु योगाचा सद्भाव असल्यामुळे केवळ सातावेदनीयाचा एक समय स्थितियुक्त बंध होतो. व लगेच त्याच समयाला उदय पण येतो. साक्षात शुद्धोपयोग अकराव्या गुणस्थानापासून आहे. खालच्या गुणस्थानांमध्ये ही जेव्हा शुद्ध आत्म्याचा आश्रय करतो, शुद्ध आत्मा ध्येयरूप असतो, तेव्हा शुद्धोपयोग सांगितला आहे. त्याद्वारे संवर-निर्जरा होते; परंतु अजून कषाय सहचर असल्यामुळे आम्रव-बंध ही होतो; परंतु सराग परिणाम बंधाचे कारण आहे व जेवढ्या रागाचा अभाव झाला तो संवर-निर्जरेचे कारण आहे. म्हणून शुभ व अशुभ उपयोग बंधाचे कारण आहे, हे जाणून कर्मबन्धनातून मुक्त होण्यासाठी एक शुद्धोपयोगाची भावना करावी. निरन्तर शुद्ध आत्म्याचा आश्रय घेऊन उपयोग शुद्ध करण्याचा पुरुषार्थ करावा. मुनि यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

अविकारी निजपरमात्मद्रव्याच्या भावनेने शुभाशुभ उपयोगाचा अभाव होऊन शुद्धोपयोग प्रकट होतो. संसारविपत्तीचे निमित्तभूत कर्मविपाकापासून सुटण्यासाठी मूल उपायभूत निज सहज परमात्मतत्त्वाच्या अभेद उपासनेचा पुरुषार्थ करावा.

पूर्व गाथेमध्ये परद्रव्याच्या संयोगाचे कारण शुभ व अशुभ उपयोग सांगितला. आता त्यापैकी शुभोपयोगाचे स्वरूप या गाथेमध्ये सांगतात-

जो जाणदि जिणिंदे पेच्छदि सिद्धे तहेव अणगारे।
जीवेसु साणुकंपो उवओगो सो सुहो तस्स ।।१५७।।

अन्वयार्थः– (जो) जो **(जिणिंदे)** जिनेंद्राना **(जाणदि)** जाणतो **(सिद्धे तहेव अणगारी)** सिद्धांना तथा अनगारांना (साधूंना) **(पेच्छदि)** पाहतो. **(जीवेसु साणुकंपो)** जीवांच्या प्रति अनुकम्पायुक्त आहे. **(तस्स)** त्याचा **(सो)** तो **(सुहो उवओगो)** शुभ उपयोग आहे.

तात्पर्य – पूज्य आत्म्यांची भक्ती व जीवदयेचा भाव शुभोपयोग आहे.

शुभोपयोगाच्या उत्पत्तीची पद्धती –

शुभोपयोगाचे मुख्य साधन आहे, दर्शन मोहनीय व चारित्रमोहनीयाचा विशिष्ट क्षयोपशम. जोपर्यंत श्रद्धान निर्मल होत नाही व कषाय मंद होत नाही तोपर्यन्त शुभोपयोग वास्तविक होत नाही.मोक्षमार्गामध्ये सहायक असा शुभोपयोग दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय यांचा विशिष्ट क्षयोपशम झाल्यावरच होतो. जोपर्यंत श्रद्धान निर्मल होत नाही व कषाय मंद होत नाही तोपर्यंत शुभोपयोग वास्तविक नाही. हा शुभोपयोग वीतरागता आणि सरागतेच्या मध्ये स्थित आहे. जो पूर्ण वीतराग आहे त्याला पण शुभोपयोग नाही आणि जो पूर्ण सराग आहे त्याला पण शुभोपयोग नाही. विभ्रम उत्पन्न करणारा राग ज्यांना नाही व काही विशिष्ट उपराग आहे. अशा स्थितीत शुभोपयोग होतो. मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांच्या सद्भावात मोक्षमार्गामध्ये सहायभूत शुभोपयोग होत नाही. मिथ्यादृष्टीला होणारा शुभराग केवळ पुण्यबंधाला कारण आहे. वास्तविक शुभोपयोग धार्मिक भाव आहे, तो सम्यग्दृष्टीला होतो, मिथ्यादृष्टीला नाही. तथापि व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले तर निश्चय सम्यक्त्वाच्या अभावात जो व्यवहार सम्यक्त्वी देवशास्त्रगुरूंची भक्ती करतो त्याला सुद्धा मंदकषाय असल्यामुळे शुभोपयोग म्हटला जातो. तो शुभोपयोग अतिशय रहित सामान्य पुण्यबंधाचे कारण आहे. सम्यक्त्वसहित शुभोपयोग अतिशय पुण्याचा बंध करतो व परंपरेने मोक्षाला साधतो.

प्रथम शुभोपयोग – परमेश्वरभक्ती

शुभोपयोगाच्या विवरणामध्ये सर्वात प्रथम परमेश्वराची श्रद्धा सांगितली आहे. सर्व जीव कोण्या एकाला मोठे मानून त्याची श्रद्धा करून आपले जीवन पार करतात. कोणी आपल्या वडिलांना आपले सर्व काही मानून त्यांच्या छत्रछायेत आपले जीवन चालवितो. कोणी स्त्रीला आपले सर्वस्व मानून तिच्या

अधीन आपले जीवनयापन करतो. कोणी धनवैभवाला आपले सर्वस्व मानून त्याच्या धुनमध्ये आपले जीवन व्यतीत करतो. परंतु ज्ञानी पुरुष परमपवित्र निर्विकल्प सहजज्ञान विभूषित परमेश्वराला आपले आदर्श मानून त्यांच्या छत्रछायेत आपले जीवन व्यतीत करतो. शुद्ध स्वरूपाकडे जो आदर्श मानून त्याच्या छत्रछायेत आपले जीवन व्यतीत करतो. शुद्ध स्वरूपाकडे जी श्रद्धेची प्रवृत्ती आहे, भक्ती-पूजेची प्रवृत्ती आहे, तो शुभोपयोग आहे आणि माता, पिता, पुत्र, मित्र, कुटुम्ब, धन- वैभवाकडे झुकलेली प्रवृत्ती आहे तो अशुभोपयोग आहे. अरिहंत व सिद्ध परम ईश्वर आहेत. चार घाती कर्मांचा क्षय करून अनंतज्ञान, दर्शन, सुख व वीर्य असे अनंतचतुष्टय प्राप्त करून जे आपल्या स्वरूपामध्ये मग्न आहेत, जे भूख, तहान, जन्म-जरा इत्यादि अठरा दोषांनी रहित झाले व जे आपल्या दिव्यध्वनीने भव्यजीवांचा मोहरूपी अंधार नष्ट करून ज्ञानज्योती प्रगट करतात ते अरिहंत आहेत. जे सर्व कर्मबंधनाने रहित होऊन पूर्ण शुद्ध आहेत, निजानन्दामध्ये तन्मय आहेत, परिपूर्ण, कृतकृत्य झाले, ते सिद्ध होत. यानांच आपले आदर्श मानून सम्यग्दृष्टी त्यांच्या भक्तीमध्ये लीन होतात व शुभोपयोगाच्या भूमिकेला प्राप्त करतात.

द्वितीय शुभोपयोग – गुरुसेवा

आरंभ-परिग्रहाने रहित, ज्ञानध्यानामध्ये रत साधूंच्या गुणांमध्ये अनुराग असणे, ही साधुभक्ती आहे. जे भेदाभेद रत्नत्रयाच्या प्रतापाने मोक्षाचे साधन करतात ते निर्ग्रन्थ दिगम्बर साधू आहेत. त्यांचा उपदेश मोक्षमार्गामध्ये प्रेरणा करणारा असतो. म्हणून त्यांची संगती जीवनाचे उत्थान करणारी असते. हे साधु संसाराच्या सर्व परद्रव्यांना असार मानून ज्ञानस्वभावामध्ये लीन राहण्याचा प्रयत्न करतात. अशा विरक्त, ज्ञानी गुरूंना आहारदान देणे, त्यांना वसती देणे, रोग झाला असेल तर औषधदान देऊन वैय्यावृत्य करणे, त्यांच्यावरील संकट उपसर्ग दूर करण्याची प्रवृत्ती तो सुद्धा शुभोपयोग आहे.

तीसरा शुभोपयोग – जीवदया

सर्व प्राणीमात्रांच्या प्रती दयाभाव होणे, अनुकम्पा आहे. हा सुद्धा शुभोपयोगच आहे. सर्व जीवांना आपल्या समान जाणणारे व त्रसस्थावर जीवभेदांना जाणणारे ज्ञानी सम्यग्दृष्टी जीव दयेचे सागर असतात. ते कोणत्याही जीवाला कष्ट देऊ इच्छित नाहीत. म्हणून साधुपदामध्ये स्थावरपर्यंतच्या जीवांची दया पाळतात व गृहस्थ अवस्थेमध्ये ज्ञानी संकल्प करून त्रसजीवांचा

घात करीत नाहीत, गृहस्थ धर्मामध्ये आरंभ कार्य करताना यत्नाचार करूनसुद्धा त्रसस्थावर जीवांची हिंसा होते. त्याबद्दल स्वतःची निंदा गर्हा करतात. सदा दयारसाने भिजलेल्या महात्म्यांच्या हृदयामध्ये शुभोपयोगाने महान् पुण्यकर्मांचा संचय होतो.

अनुकम्पेचे स्वरूप स्वयं कुन्दकुन्दाचार्यांनी पंचास्तिकाय संग्रहामध्ये सांगितले आहे.

तिसिदं बुभुक्खिदं वा दुहिदं दट्ठूण जो दु दुहिदमणो ।
पडिवज्जेदि तं किवया तस्सेसा, होदि अणुकम्पा ।।

कोणी जीव तहानलेला, भूखेलेला असेल, रोगादीने दुःखी असेल त्याला पाहून त्याच्या पीडेने स्वत: दु:खी होऊन दयाभावाने त्याचे दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्नशील होतो त्या पुरुषाला ही अनुकम्पा होते.

वास्तविक देवशास्त्रगुरूंच्या भक्तीमध्ये व दयाधर्मामध्ये सर्व शुभोपयोग गर्भित आहे. शुभोपयोग राग सहित असल्यामुळे मुख्यत: पुण्यबंधाचे कारण आहे. मोक्षाचे कारण साक्षात् शुद्धोपयोग आहे. सम्यग्दृष्टी शुद्धोपयोगाला उपादेय मानून शुद्धोपयोगाच्या अभावात अशुभोपयोगापासून वाचण्यासाठी शुभोपयोगामध्ये प्रवृत्त होतो.

मागील गाथेत शुभोपयोगाचे स्वरूप सांगून आता या गाथेत अशुभोपयोगाचे स्वरूप सांगतात. कारण अशुभोपयोगापासून वाचण्यासाठी त्या अशुभोपयोगाचे स्वरूप माहित असणे आवश्यक आहे –

विसयकसाओगाढो दुस्सुदिदुच्चित्तदुट्ठगोट्ठिजुदो ।
उग्गो उम्मग्गपरो उवओगो जस्स सो असुहो ।।१५८।।

अन्वयार्थ–(जस्स अवओगो) ज्याचा उपयोग **(विसयकसाओगाढो)** विषय कषायामध्ये मग्न आहे. **(दुस्सुदिदुच्चित्तदुट्ठगोट्ठिजुदो)** खोटे शास्त्र ऐकणे, खोटा विचार करणे, खोटी संगतीमध्ये लागलेला आहे, **(उग्गो)** उग्र आहे, **(उम्मग्गपरो)** मिथ्यामार्गामध्ये तत्पर आहे, त्यांचा **(सो असुहो)** तो अशुभोपयोग आहे.

तात्पर्य – विषयकषायामध्ये लीन, खोट्या देवशास्त्रगुरूंच्या भक्तीमध्ये रमलेला उपयोग अशुभोपयोग आहे.

अशुभोपयोगाचे कारण –

ज्ञानदर्शन उपयोगाच्या परिणतीमध्ये जेव्हा शुभोपयोग व शुद्धोपयोग

असत नाही तेव्हा नियमाने अशुभोपयोग होतो. कारण तीन प्रकारच्या उपयोगांपैकी एकावेळी कोणतातरी एक उपयोग असतोच. ज्याप्रमाणे माकड स्थिर एका ठिकाणी बसत नाही. सारखे इकडून तिकडे व तिकडून इकडे उड्या मारत असते त्याप्रमाणे जीवाचा उपयोग सुद्धा स्थिर असत नाही. सारखा या ज्ञेयावरून त्या ज्ञेयावर, दुसऱ्या ज्ञेयावरून तिसऱ्या ज्ञेयावर फिरत असतो. या उपयोगामध्ये जेव्हा द्वेषभाव व अशुभरागाचे मिश्रण होते तेव्हा तो अशुभोपयोग म्हटला जातो. दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय कर्माचा तीव्र उदय या अशुभोपयोगाचे कारण आहे.

अशुभोपयोग अनेक प्रकारचा आहे. त्यापैकी काही अशुभोपयोगांचे स्वरूप येथे स्पष्ट केले आहे.-

१) विषयांची सेवा –

पाच इन्द्रियांच्या विषयांच्या सेवेमध्ये लागलेला उपयोग अशुभोपयोग आहे. पाच इन्द्रिये आहेत त्यांचे स्वाद घेणे, सुगंधयुक्त अत्तर आदींचा वास घेणे, रमणीय सुंदर वस्तूंचे अवलोकन करणे, रागयुक्त सुरील शब्द ऐकणे ही विषयांची सेवा आहे. इन्द्रियाद्वारे कोणत्या वस्तूचे केवळ ज्ञान होणे म्हणजे इन्द्रियभोग नव्हे. अनुरागयुक्त होऊन त्या विषयामध्ये उपयोग लीन होणे म्हणजे अशुभोपयोग आहे. ज्याचा उपयोग पाच इन्द्रियांच्या तीव्र आसक्तीवश इन्द्रियभोगांच्या संकल्परूप संरंभामध्ये, त्या भोगांची सामग्री गोळा करणेरूप समारंभामध्ये आणि त्यांना भोगणेरूप आरंभामध्ये व्यस्त आहे. त्यांचा तो अशुभ योग आहे. विषयप्रवृत्तीचे साधन पण इन्द्रिये आहेत व ज्ञानाचे साधनपण इन्द्रिये आहेत. त्यामुळे हा जीव इन्द्रियाद्वारे ज्ञान करून शांत बसत नाही. त्याला विषयांची खाज सुटते. ती खाज मिटवण्यासाठी सतत त्या विषयांचे सेवन करतो. ज्या विषयांची इन्द्रिये इच्छा करतात. त्या विषयांना प्राप्त करून इन्द्रियांना संतुष्ट करू इच्छितो, जी ही विषयांची सेवा आहे तो अशुभोपयोग आहे.

२) कषाय प्रवृत्ती अशुभोपयोग –

क्रोध, मान, माया, लोभ हे चार कषायरूपी डाकू या जीवाचे आत्मधन लुटत आहेत. परंतु जीव यांना आपले मानून त्यांची पुष्टी करण्यामध्ये आपला उपयोग बरबाद करीत आहे. क्रोध, मान, माया व लोभ कषायाच्या तीव्रतेमध्ये फसून या कषायांबरोबर मन- वचन-कायेची प्रवृत्ती करतो, क्रोध आला की

दुसऱ्यांना शिवीगाळ करतो, मारपीट करतो. मान कषायामध्ये स्वत:ला श्रेष्ठ व दुसऱ्यांना तुच्छ समजतो.

कपटाने दुसऱ्यांना फसवतो. लोभ कषायाच्या वश होऊन अन्यायाने धन एकत्र करतो. कषायांच्या तीव्रतेमध्ये कषायांची पूर्ती झाली नाही तर स्वत:चा घात करायलासुद्धा मागेपुढे पाहत नाही.

एका स्त्रीने सोन्याच्या नवीन बांगड्या करून घेतल्या. बांगड्या हातात घालून ती शेजारी पाजारी सगळीकडे फिरून आली. परन्तु कोणी तिला विचारले नाही की 'ह्या नवीन बांगड्या कधी बनविल्या, खूप छान आहेत'. वगैरे त्यामुळे तिला राग आला व तिने घराला आग लावली आणि बांगड्यांचा हात उंच करून ओरडू लागली की 'आग लागली, या वाचवा'. लोक धावत पळत येऊ लागले. एका स्त्रीने तिला विचारले.'या नवीन बांगड्या कधी बनविल्या ? खूप छान आहेत.' ती स्त्री म्हणते 'अगं बाई ही गोष्ट पूर्वीच विचारली असतीस तर घराला आग लावावी लागली नसती.' हीच दुर्दशा आमची नाही काय? स्वत:चा अहंभाव पुष्ट करण्यासाठी काय काय करीत नाही? आमचे खाणे पिणे, कपडे नेसणे, दागिने घालणे सर्व दुसऱ्यांना दाखविण्यासाठी आहे. लोक बाहेर जाताना चांगले कपडे नेसणे, दागिणे घालणे, नटणे थटणे करतात. ते मात्र दुसऱ्यांना दाखविण्यासाठी आणि अशी अपेक्षा करतात की दुसऱ्यांनी मला विचारावे. माझी प्रशंसा करावी. कोठून आणलेस? खूप छान आहे इत्यादी. चोवीस तास कषायांच्या पोषणामध्ये हा मौल्यवान उपयोग व्यर्थ नष्ट होत आहे. मायाचार एक शल्य आहे. ज्याप्रमाणे जपेच्या माळेतील एखाद्या मण्यामध्ये छेद वाकडे असेल तर त्यामधून धागा ओवला जात नाही. त्याप्रमाणे हृदयामध्ये कुटिलता असेल तर तेथे धर्म प्रवेश करू शकत नाही. मायाचार पण अशुभोपयोग आहे.

३) दु:श्रुती :–

खोटे शास्त्र ऐकणे दु:श्रुती आहे. मिथ्या एकांत धर्मामध्ये फसविणाऱ्या खोट्या शास्त्रांच्या ऐकण्यामध्ये, चिंतन–मनन करण्यामध्ये उपयोग लावतो, तो सर्व अशुभोपयोग आहे.

हा जीव रागयुक्त गोष्टी ऐकण्यामध्ये दुसऱ्याची निंदा ऐकण्यामध्ये आपला उपयोग लावतो. बरेच लोक वेळ जात नाही म्हणून कादंबरी, विनोदयुक्त पुस्तके वाचतात नि स्वत:च्या मनोरंजनासाठी विषयकषायांचे

पोषण करणारी अश्लील गाणी सतत कानामध्ये हेडफोन घालून ऐकत राहतात. ते लोक मनुष्य पर्यायामध्ये मिळालेल्या वेळेचा, शक्तीचा व उपयोगाचा दुरुपयोग करतात. गप्पागोष्टी करण्यामध्ये उपयोग लावतात. हे सर्व विनाकारण बसल्या बसल्या पाप विकत घेण्यासारखे आहे.

शुद्ध आत्मतत्त्वाचा उपदेश करणाऱ्या शास्त्रांचे श्रवण करणे सुश्रुती आहे.

४) दु:श्चित्त :–

निश्चिन्त होऊन आत्मध्यानामध्ये प्रवृत्त असणाऱ्या मनाला सुचित्त म्हणतात. त्या उलट स्वत:च्या व दुसऱ्याच्या इष्टकामभोगांच्या चिंतेमध्ये लागलेले व रागादि अपध्यान करणारे मन दुश्चित्त आहे. हा जीव सकारण अपध्यान कमी करतो. विनाकारण अपध्यान जास्त करतो. दुसऱ्याचे वाईट चिंतन करणे, आपल्या पक्षाचा विजय होऊ दे, दुसऱ्या पक्षाचा पराजय होऊ दे असे चिंतन करणे, दुसऱ्याचे नुकसान होवो व स्वत:ला फायदा होवो. दुसऱ्यांची निंदा होवो व माझी प्रशंसा होवो. इष्टाची प्रगती होवो. अनिष्ट दूर होवो याचे सतत चिंतन करीत राहणे दुश्चित्त आहे. या चिंतनामध्ये जो उपयोग आहे तो अशुभोपयोग आहे.

५) दुष्ट गोष्टी :–

खोट्या पुरुषांची संगति करणे दुष्टगोष्टी आहे. परमचैतन्य परिणतीला उत्पन्न करणाऱ्या सत्पुरुषांची संगती करणे शुभगोष्टी अथवा सत्संगती आहे. याविरुद्ध कुशील पुरुषांची संगती करणे कुसंगती आहे. हा जीव स्वयं पापामध्ये लिप्त आहेच. पुन्हा दुष्ट पुरुषांची संगती मिळाल्यामुळे आणखीन पापामध्ये आसक्त होतो. खोट्या संगतीमुळे जुगार खेळणे, दारु पिणे, पत्ते खेळणे, सिनेमा पाहणे, वेश्यागमन करणे इत्यादी दुर्व्यसनामध्ये आकण्ठ बुडतो. आचार्य म्हणतात, कोणाची संगती नाही मिळाली तर एकटा राहणे बरे आहे. पण खोट्या पुरुषांची संगती करून स्वत:ला दुर्गतीमध्ये भटकविणे बरे नाही. दु:श्रुति, दुश्चित्त व दुष्टगोष्टीयुक्त उपयोग अशुभ आहे. पापाला कारण आहे.

६) उग्र परिणाम :–

जीवाचे रौद्र हिंसादिरूप भयानक परिणाम उग्र म्हटले जातात. कित्येक जीव धनादीच्या लोभाने दुसऱ्याचा खून करतात. दरोडा घालतात, खोटे बोलतात. विषयाच्या लोभाने कुशील सेवन करतात. परिग्रहाची वृद्धी

करण्यामध्ये रात्रंदिवस व्यस्त असतात. हिंसा, असत्य, चोरी, कुशीलसेवन रूप परिणाम पापरूप आहेत असे सर्वजण मानतात. पण परिग्रह गोळा करण्याचा भाव पापरूप आहे. ही गोष्ट अज्ञानी जीवाच्या गळी उतरत नाही.परिग्रहासाठीच जीव जास्त पाप करतो. थोड्याशा जमिनीच्या तुकड्यासाठी सख्खा भाऊसुद्धा पक्का वैरी बनतो. थोड्याशा संपत्तीसाठी आयुष्यभर कोर्ट कचेरी, भांडणतंटे करण्यात जीवन बरबाद करतो. परिग्रहाची प्राप्ती करण्यामध्ये, त्यांचे संरक्षण करण्यामध्ये, लागलेला उपयोग अशुभोपयोग आहे. काही जीव घरादाराचा त्याग करून संन्यास घेतात, पण खोट्या मार्गाचे सेवन केल्यामुळे शरीराला क्षीण करणारे कठोर तपश्चरण करतात. परंतु यथार्थ वस्तूस्वरूपाचे ज्ञान व श्रद्धान नसते. स्वत:ला उलटे टांगून घेणे, शीर्षासनामध्ये तप करणे, पंचाग्नितप करणे इत्यादी उग्र आचरण करूनसुद्धा सर्व निरर्थक होते. त्यांना कुणी काही म्हटले तर त्यांचा क्रोधाग्नी भडकतो. शाप वगैरे देतात. त्यामुळे हे सर्व उग्र आचरण सहित जो उपयोग आहे तो सुद्धा अशुभोपयोग आहे.

७) उन्मार्गामध्ये तत्परता :–

वीतराग सर्वज्ञदेव– प्रणीत मार्गाहून विपरीत संसार वाढवणाऱ्या मिथ्यामार्गामध्ये लागलेला उपयोग अशुभोपयोग आहे. वीतराग परमात्म्याला सोडून अन्य सरागी देवी–देवतांमध्ये देवपणाची बुद्धी करणे, त्यांची भक्ती, पूजा, श्रद्धा, सेवा करणे, त्यांची आराधना उपासना करणे हा सर्व अशुभोपयोगच आहे. त्याचप्रमाणे निर्ग्रन्थ गुरूंना सोडून इतर जे विषयांमध्ये आसक्त आहेत, नाना आरम्भ–परिग्रहामध्ये लिप्त आहेत, ज्ञानध्यानतपापासून दूर आहेत, त्यांना गुरू मानून त्यांची वैय्यावृत्त्य करणे, पूजा–भक्ती करणे हा सर्व अशुभोपयोग आहे.

चारित्रमोहनीयाच्या तीव्र उदयामुळे अशुभ–रागाची वासना होते. त्यामुळे कुदेव, कुगुरू व कुमार्गाचे श्रद्धान होते. त्यामुळे मोक्षमार्ग दुर्लभ होतो. शांतीचा रस्ता दिसत नाही. अशुभोपयोगाच्या परिणामांमुळे येथेही संक्लेशभाव होतो, आकुलता होते. त्या परिणामांमुळे दुसऱ्या जीवांना ही कष्ट होते. हा अशुभोपयोग पापकर्माला बांधणारा आहे. ज्याच्या फलस्वरूप हा जीव नरक निगोद, तिर्यंच व कुमानुष पर्यायांमध्ये जाऊन मोठ्या असह्य दु:खांना प्राप्त होतो. म्हणून अशुभोपयोगाला घोर दु:खाचे कारण जाणून त्याचा त्याग

करावा. अशुभोपयोग सर्वथा हानिकारक आहे, म्हणून हेय आहे. संसारामध्ये जितकी संकटे आहेत, ते सर्व या जीवाच्या विभाव परिणामांमुळे आहेत. त्या विभाव परिणामांचे अंतरंग कारण या जीवाची तशाप्रकारची योग्यता आहे आणि निमित्त कारण मोहनीय कर्माचा उदय आहे. कर्म परद्रव्य आहे. पुद्गल आहे. त्या परद्रव्याच्या संयोग या जीवाला कसा झाला? तर त्याचे उत्तर आहे की याचे कारण उपयोग विशेष अर्थात् अशुद्धोपयोग आहे. म्हणून आपल्या हितासाठी परद्रव्याच्या संयोगरूप कारणांचा विनाश केला पाहिजे. परद्रव्याच्या संयोगाचे कारण रागद्वेष सहित उपयोग आहे त्याच्या नाशाचा अभ्यास केला पाहिजे.

आता आचार्य पुढील गाथेमध्ये परद्रव्याच्या संयोगाच्या कारणाच्या विनाशाचा अभ्यास करतात–

असुहोवओगरहिदो सुहोवजुत्तो ण अण्णदवियम्हि।
होज्जं मज्झत्थोऽहं णाणप्पगमप्पगं झाए ।।१५९।।

अन्वयार्थ :–(अण्णदवियम्हि) अन्यद्रव्यामध्ये **(मज्झत्थो)** मध्यस्थ **(होज्जं)** होऊन **(अहं)** मी **(असुहोवओगरहिदो)** अशुभोपयोगाने रहित होत **(सुहोवजुत्तो ण)** शुभोपयोगाने युक्त न होता **(णाणप्पगमप्पगं)** ज्ञानस्वरूप आत्म्याचे **(झाए)** ध्यान करतो.

तात्पर्य – अशुद्धोपयोगाने रहित होऊन ज्ञानस्वरूप आत्म्याचे ध्यान केले तर परद्रव्याचा संयोग दूर होतो.

हितरूप चार गोष्टी :– आता कल्याणाच्या उपायामध्ये चार गोष्टी सांगितल्या आहेत.– १) अशुभोपयोगाने रहित होणे २) शुभोपयोगामध्ये पण युक्त न होणे ३) मध्यस्थ होणे ४) ज्ञानस्वरूप आत्म्याचे ध्यान करणे.

१) प्रथम पायरी– प्रथम अशुभोपयोगापासून निवृत्त होणे श्रेयस्कर आहे. कारण अशुभोपयोगातून शुद्धोपयोग प्राप्त होऊ शकत नाही. शुभोपयोगरूप होणे हाच अशुभोपयोगापासून सुटण्याचा उपाय आहे. जिनेन्द्र देवांची श्रद्धा, पूजा, भक्तीरूप परिणाम झाले की अशुभोपयोगाचा आपोआप त्याग होतो. सर्वज्ञप्रणीत आगमाचा अभ्यास करणे, त्याचे चिन्तन, मनन करताना उपयोग एकाग्र होतो तेव्हा अशुभ संकल्प–विकल्प उत्पन्नच होत नाहीत. म्हणून ज्ञानी प्रथम प्रयत्नपूर्वक शुभोपयोग करण्याचा पुरुषार्थ करतो. शुभोपयोगाच्या साधनांचा संग्रह करतो. निर्ग्रंथ गुरूंची उपासना, आहारदान, वैय्यावृत्त्य करतो.

२) दुसरी पायरी – शुभोपयोगामध्ये लीन असतानाही त्याचे लक्ष्य शुद्धोपयोगाकडे असते. कारण शुभोपयोगसुद्धा पुण्यबंधाचे कारण आहे. अशुभोपयोग पापरूप परद्रव्याच्या संयोगाचे कारण आहे व शुभोपयोग पुण्यरूप परद्रव्याच्या संयोगाचे कारण आहे, म्हणून ज्ञानी शुभोपयोगमध्ये न राहता शुद्धोपयोगाचा पुरुषार्थ करतो. त्यासाठी अशुभ व शुभरूप परद्रव्याचे अवलंबन सोडून आपल्या शुद्ध आत्म्याचा आश्रय घेतो.

३) तिसरी पायरी – शुभ व अशुभ सर्व परद्रव्यांसंबंधी रागद्वेषाचा त्याग करून मध्यस्थ होतो ही तिसरी भूमिका आहे. मध्यस्थ भावाचे फळ शान्ती आहे. प्रत्येक द्रव्यामध्ये मी मध्यस्थ राहून प्रत्येक द्रव्यांच्या अधीनतेपासून दूर होऊ. आपल्या आत्मस्वभावानुसार वर्तन करू. उपयोगात्मक आपल्या आत्मस्वरूपामध्ये स्थित होत, मी शान्त होऊ हाच माझा परद्रव्याच्या संयोगाच्या कारणाच्या विनाशाचा अभ्यास आहे .

ज्याप्रमाणे कोणी कपडे धुतले व खुंटीला अडकविले, व चुकून कपडे खाली पडले. तर त्याला धूळ चिकटते. जर ते कपडे उचलून ओले असतांनाच झटकले तर धूळ दूर होत नाही उलट जास्त चिटकून बसते. तर मग धूळ हटवण्याचा उपाय काय आहे? ते ओले कपडे उचलून तसेच खुंटीला अडकवून ठेवावेत. जेव्हा कपडे वाळून जातील तेव्हा एक दोन झटके मारले की सर्व धूळ दूर होऊन जाईल. कपडा सुकण्यापूर्वी जर झटकला तर त्याला धूळ अधिक चिकटून बसते. जर धूळ हटवायची आहे तर त्याला वाळू द्यावे. कपडा व धूळ यांचा संयोग करणारी गोष्ट काय आहे? तर तो ओलावा आहे. त्याचप्रमाणे जीव आणि कर्माचा संयोग करविणारी वस्तू स्नेह आहे, अनुराग आहे. हा अनुराग दूर केला व कषायरहित आत्मदेवाच्या भावनेमध्ये उपयोग लावला की या भावनेच्या प्रसादाने परद्रव्यरूप कर्म सर्व दूर होतील. बन्धन नष्ट होईल व परवस्तूचा संयोग होणार नाही.

४) चौथी पायरी – आत्मभावनेचा चमत्कार –

येथे दुसऱ्यामध्ये काही करायचे नाही. आपल्या स्वत:मध्येच जो स्वभावत: आपला आत्मा आहे, त्याची भावना करायची आहे. मी सहज चिन्मात्र ज्योति स्वरूप आहे. ज्ञानानन्द स्वरूप निराकुल अमूर्तिक चैतन्यमूर्ति आहे. मी प्रभू आहे, विभू आहे अशी आत्मभावना केली की सर्व कर्मधूळ आपोआप दूर होते. ज्याप्रमाणे मंत्र उच्चारण करणारा मांत्रिक स्वत:मध्ये

मंत्रसाधना करतो व सापाचे विष आपोआप उतरते. मंत्र म्हणणारा दूरक्षेत्रामध्ये स्थित आहे तो त्या विष चढलेल्या मनुष्यामध्ये पोहचला पण नाही, परंतु विष दूर होते. हे भावनेचे सामर्थ्य आहे. हा सहज निमित्त नैमित्तिक भाव आहे. त्याप्रमाणे साधक स्वत:मध्ये आत्मभावना करतो व तिकडे कर्माचा संबंध आपोआप दूर होतो. म्हणून येथे परद्रव्याचा संयोग नष्ट करण्यासाठी परामध्ये काही पुरुषार्थ करण्याची गरज नाही. स्वत:मध्ये श्रद्धा प्रतीती दृढ करण्याची गरज आहे. आपल्या ज्ञानसिंहासनावर आपल्या स्वच्छ ज्ञानस्वभावी आत्म्यालाच विराजमान करायचे आहे. केवळ ज्ञायकमात्र आपल्या शुद्ध आत्म्यामध्ये लीन होणे हाच शुद्धोपयोग आहे. हीच स्वात्मानुभव दशा आहे. हीच ध्यानाची अग्नी कर्मरूप इंधनाला जाळून टाकते. हाच रत्नत्रयाची एकतारूप निश्चय मोक्षमार्ग आहे. याच साधनाद्वारे मोक्षाची सिद्धी होते. शुद्धोपयोग परम कल्याणकारी आहे असे जाणून यालाच उपादेय मानून याचाच उपाय करावा.

मागील गाथेमध्ये परद्रव्याच्या संयोगाचे जे कारण आहे अशा शुभ व अशुभोपयोग यापासून निवृत्त होऊन सर्व परद्रव्याविषयी मी मध्यस्थ होतो व ज्ञानस्वरूप आत्म्याचे ध्यान करतो, अशाप्रकारे भावना व्यक्त केली होती. ज्ञानस्वरूप आत्म्यामध्ये अहंपणाचा अनुभव झाला असता सहजच परद्रव्यासंबंधी अहंभाव सुटतो व त्यासंबंधी समताभाव प्रगट होतो. शरीर, वचन व मन यांचा आत्म्याशी अति निकट संबंध आहे. अज्ञानीला त्यामध्ये एकत्वाचा भ्रम होतो. आचार्य आता पुढील गाथेत त्या शरीर, मन, वचनासंबंधी अत्यंत मध्यस्थभाव प्रकट करतात.हा भेदभावनेचा प्रताप आहे–

णाहं देहो ण मणो ण चेव वाणी ण कारणं तेसिं ।
कत्ता ण ण कारयिदा अणुमंता णेव कत्तीणं ।।१६०।।

अन्वयार्थ:– **(अहं देहो ण)** मी शरीर नाही, **(मणो ण)** मन नाही **(चेव)** आणि **(वाणी ण)** वचन पण नाही **(तेसिं कारणं ण)** मी त्यांचे कारण नाही. **(कत्ता ण)** कर्ता नाही. **(कारयिदा ण)** करविणारा ही नाही आणि **(कत्तीणं अणुमंता णेव)** करणाऱ्याचा अनुमोदकही नाहीच.

तात्पर्य – मी परद्रव्यापासून अत्यंत निराळा आहे. माझे शरीरादी सर्व परद्रव्यांमध्ये माध्यस्थभाव आहे.

या गाथेमध्ये आचार्यांनी शरीर, वचन व मनासंबंधी अत्यंत भेदभावना

नाचविली आहे. येथे आचार्य दुसऱ्याला भेदविज्ञान करण्याची आज्ञा न देता स्वत:च भेदविज्ञानाची भावना करतात.

परद्रव्यामध्ये मध्यस्थता –

आचार्य शुद्धात्म्याकडे आपली दृष्टी ठेऊन म्हणतात की, हा आत्मा शरीर नाही, मन नाही, वचन नाही, न त्यांचे कारण, न त्यांचा कर्ता आहे, न करविता आहे, न त्यांचा अनुमोदक आहे. जेव्हा कोणत्याही द्रव्यासंबंधी परत्वाची भावना होते तेव्हा सहज उद्‌गार बाहेर पडतात, ही वस्तू माझी नाही. याचा माझा काही संबंध नाही. ही वस्तू कोणाची आहे मला माहित नाही. त्या परवस्तूकडे आपण परत्वाच्या दृष्टीने पाहतो. शरीर, वचन, मन परद्रव्य आहेत. असा मी निश्चय केला आहे, त्यामुळे मला त्यांच्याविषयी कोणताही पक्षपात नाही. कोणतीही वस्तू जेव्हा इष्ट वाटते तेव्हा त्याचा पक्ष येतो. त्या पक्षामध्ये पडणे यालाच पक्षपात म्हणतात. जर शरीर, वचन, मन परकीय आहेत तर मी त्याला इष्ट- अनिष्ट मानून राग, द्वेष करीत नाही. माझा सर्व परपदार्थांमध्ये मध्यस्थ भाव आहे.

वास्तविक मी शरीर, वचन, मनाच्या स्वरूपाचा आधारभूत अचेतन द्रव्य नाही. शरीर, वचन, मनाचा आधार पुद्‌गलद्रव्य आहे. शरीर एक पुद्‌गलाचा पर्याय आहे. त्या व्यंजनपर्यायाचा आधारभूत अनन्त पुद्‌गल परमाणू आहेत. वचन भाषावर्गणेपासून बनलेली व्यंजन पर्याय आहे. त्याचा आधारभूत अनन्त पुद्‌गलस्वरूप भाषावर्गणा आहे.मन पण पुद्‌गलाची व्यंजनपर्याय आहे. त्याचा आधारभूत अनन्त मनोवर्गणारूप परमाणू आहेत. मी पुद्‌गलद्रव्य नाही, त्यामुळे मी त्यांचा आधार नाही. माझ्या आधाराशिवायच ते आपल्या स्वरूपाला धारण करतात. म्हणून मी शरीर, वाणी व मनाचा पक्षपात सोडून अत्यन्त मध्यस्थ आहे.

जेथे परद्रव्य आपापल्या स्वरूपास्तित्वमात्र स्वतंत्र दृष्टिगोचर होतात, ती चैतन्यज्योति धन्य आहे.

जीवामध्ये शरीरादिकांची अकारणता –

मी शरीर, वचन, मनाला कारणभूत नाही. ते निश्चयाने माझ्या उपादान कारणाशिवायच भिन्न कारणांनी झाले आहेत. शरीराचे उपादान कारण आहारवर्गणा आहेत. आहारवर्गणेपासूनच औदारिक, वैक्रियिक, आहारक ही तीन शरीरे उत्पन्न होतात. आहारवर्गणा पुद्‌गलमय आहेत. त्या माझ्यापासून

भिन्न आहेत तर मग मी शरीराचे कारण रूप नाही. भाषावर्गणांपासून वचन उत्पन्न होते. भाषावर्गणा पुद्गलमय आहेत. त्या माझ्यापासून भिन्न आहेत तर मग मी वचनाचे कारण कसा ? मनाचे उपादान कारण मनोवर्गणा आहे. मनोवर्गणेपासून अष्टपाकळीरूप कमळाच्या आकाराचे द्रव्यमन उत्पन्न होते. मी मनोवर्गणारूप नाही तर मी मनाचे कारण नाही. म्हणून शरीर, वचन मनाच्या कारणत्वाचा पक्षपात सोडून मी अत्यन्त मध्यस्थ होतो.

जीवामध्ये शरीरादिकांच्या कर्तृत्वाचा अभाव –

मी शरीर, वचन, मनाचा कर्ता नाही, कारण ते माझ्या कर्त्याशिवाय आपल्या उपादानातून अचेतन द्रव्यांद्वारे केले गेले आहेत.

जो परिणमतो तो कर्ता व त्याचा जो परिणाम ते कर्म, अशाप्रकारे एकाच द्रव्यामध्ये कर्ताकर्म संबंध असतो. ज्याप्रमाणे पीठ भाकरीरूप परिणमते म्हणून पीठ भाकरीचा कर्ता आहे व भाकरी हे कर्म आहे. स्वयंपाकीण बाई भाकरीचा कर्ता नाही. कारण ती स्वयं भाकरीरूप परिणमत नाही. त्याप्रमाणे आहार वर्गणा शरीररूप परिणमतात म्हणून त्या आहारवर्गणाच शरीराचा कर्ता आहेत व शरीर कर्म आहे. शरीररूप परिणमत नाही म्हणून मी शरीराचा कर्ता नाही. भाषावर्गणा वचनरूप परिणमतात म्हणून भाषावर्गणाच वचनाचा कर्ता आहेत. मी बोलण्याचा कर्ता नाही. वचन माझे कर्म नाही अर्थात मी बोलणारा नाही. मी जाणणारा आहे. मनोवर्गणा मनरूप परिणमतात म्हणून मनोवर्गणा मनाचा कर्ता आहेत. मी मनरूप परिणमत नाही म्हणून मी मनाचा कर्ता नाही. मन माझे कर्म नाही.

शरीराला ग्रहण करणे, त्याच्या क्रिया करणे, वचनाचा व्यवहार करणे, मनामध्ये संकल्प विकल्प करणे, आत्म्याचा स्वभाव नाही. निमित्त नैमित्तिक संबंध असल्यामुळे अज्ञानी जीवाला कर्तृत्वाचा भ्रम झाला आहे. मी शरीराची क्रिया करतो, मी बोलतो, मी संकल्प विकल्प करतो इ. परंतु प्रत्येक वस्तु स्वयं स्वत:मध्ये परिणमते. जेव्हा शरीर-वचन-मनरूप क्रिया होतात तेव्हा आत्मा स्वत:मध्ये ज्ञान, इच्छा आणि योगरूप परिणमतो. ज्याप्रमाणे कुंभार घट बनवतो, तेव्हा तो कुंभार स्वत:मध्ये बुद्धी लावतो, घट करण्याची इच्छा करतो व तदनुरूप परिणमन करतो तेव्हा त्या निमित्ताने स्वयं मातीपासून घट बनतो. त्याप्रमाणे आत्म्यामध्ये शरीरादी विषयक ज्ञान असेल, इच्छा असेल, योग असेल तर त्याचे निमित्त घेऊन पुद्गलामध्ये स्वयं शरीररूप, वचनरूप, मनरूप

परिणमन होते. आत्मा स्वयं आपले काम करीत आहे. तो शरीर वचन मनामध्ये परिणमन करीत नाही. म्हणून मी शरीर, वचन, मनाचा कर्ता नाही.

जीवामध्ये शरीरादींच्या करविण्याचा अभाव –

काहीजण असा विचार करतात.आम्ही शरीरादीला करणारे नाही, पण करविणारे आहोत. जो क्रियारूप परिणमत नाही पण बाहेर राहून करवितो. त्याला कारयिता म्हणतात. 'क्रिया प्रयोजकत्वं हि कारकत्वं' जो क्रियेचा प्रयोजक आहे, क्रियेचे प्रयोजन ज्याला प्राप्त होते तो कारयिता होय. ज्याप्रमाणे ज्याने दागिने बनविले त्याला त्या दागिन्यांचे प्रयोजन प्राप्त होते. शरीरादिक बनविण्याचे प्रयोजन जीवाला प्राप्त होते. म्हणून जीव त्याचा करविणारा आहे. अशी अज्ञानीची मान्यता आहे. वास्तविक विचार केला तर कोणत्याही पदार्थामध्ये जे परिणमन होते त्याचे प्रयोजन काय आहे ? त्या परिणमनाचे फल काय आहे ? परमार्थाने परिणमनाचे प्रयोजन पदार्थाची सत्ता टिकवून ठेवणे हे आहे. त्याच्या अस्तित्वाचे रक्षण हेच प्रयोजन आहे.

शरीर, वचन, मनाचे परिणमन झाले त्याचे प्रयोजन त्यांच्या स्वरूपाचे आधारभूत जे अचेतन द्रव्य आहे त्याची सत्ता कायम राहणे. मी शरीर, वचन, मनाचा प्रयोजक नाही. कारण ते माझ्या प्रयोजनाशिवायच आपल्या उपादान कारणभूत अचेतन द्रव्याच्या अस्तित्वाच्या प्रयोजनाने केले गेलेले आहे.

जीवामध्ये शरीरादिकांच्या अनुमोदकपणाचा अभाव–

ज्याप्रमाणे मी शरीरवचन मनाचा कर्ता नाही, कारयिता नाही त्याचप्रमाणे मी त्यांची अनुमोदना करणारासुद्धा नाही. हे स्वतन्त्र पदार्थ आहेत. यांचे कर्ता ते अचेतन द्रव्य आहेत. त्या अचेतन द्रव्याचा मी अनुमोदक नाही. माझ्या अनुमोदनाशिवायच ते केले गेले आहेत. अनुमोदक कोणास म्हणतात तर हे काम चांगले आहे, यारूपाने ज्ञानाचे परिणमन होणे त्यास अनुमोदन म्हणतात. अनुमोदन हे जीवाच्या ज्ञानाची परिणती आहे. ज्या पदार्थांच्या संबंधी अनुमोदना केली जाते त्या पदार्थांचा मी कोणी लागत नाही. ते सर्व भिन्न आहेत म्हणून वास्तविक हा आत्मा आपल्या भावांचाच अनुमोदक आहे. परपदार्थांचा अनुमोदक नाही. जे विकल्प आपल्यामध्ये झाले त्याचीच अनुमोदना होते. बाह्य पदार्थांची नाही. म्हणून मी तन–मन–वचनाचा अनुमोदक नाही. त्यांना करण्याची गोष्ट तर त्यांची अनुमोदना पण करू शकत नाही. त्याच्या कर्त्याची अनुमोदना न करता ते उत्पन्न झाले आहेत, म्हणून त्यांच्या कर्त्यांचा अनुमोदक

होण्याचा पक्षपात सोडून मी अत्यंत मध्यस्थ होतो.

जाणणाऱ्याला मध्यस्थ म्हणतात. जो मध्यस्थ असतो तो कोणत्याही बाजूला झुकत नाही, जो मध्यभागी स्थित आहे त्याला मध्यस्थ म्हणतात. जेव्हा आत्मा केवळ ज्ञाताद्रष्टा राहतो तेव्हा त्याला मध्यस्थ, साक्षीदार म्हणतात.

जोपर्यंत या मन, वचन कायासंबंधी अहंबुद्धी सोडणार नाही तोपर्यन्त जीवाला स्वपदाचे भान होऊ शकणार नाही.आ.पूज्यपाद समाधि शतक ग्रंथामध्ये सांगतात–

स्वबुद्ध्या यावद गृहीयात् कायवाक्चेतसां त्रयम् ।
संसारस्तावदेतेषां भेदाभ्यासे तु निर्वृतिः ।

जोपर्यंत शरीर–वचन–मनाला स्वबुद्धीने ग्रहण करणार तोपर्यन्त याचा संसार आहे, यापासून मी भिन्न आहे असा भेदाचा अभ्यास झाल्यावर मुक्ती प्राप्त होते.

संसारामध्ये सर्वात मोठी आपत्ती पदार्थांचे खरे ज्ञान न होणे हीच आहे. जेथे यथार्थ ज्ञान नाही तेथे शान्तीचा मार्ग मिळू शकत नाही.

वास्तविक ज्यांनी आपल्या आत्मस्वभावाला चांगल्या रीतीने जाणले आहे. त्यांची शरीर, वचन मनासंबंधी क्रियेमध्ये कधी कल्पना होत नाही. जे अखंड ज्ञानज्योतिमय आपल्या आत्म्याला जाणून संसाराच्या अवस्थांचे ज्ञाता द्रष्टा राहतात. भेदविज्ञानाच्या प्रतापाने शरीरातून उपयोग निघून जातो व अमूर्त चैतन्य प्रकाशमय आत्म्यामध्ये लीन होतो. तेव्हा मी केवळ अमूर्त चिन्मात्र आहे, एवढेच शुद्ध अनुभवन राहते.

एका गावात एक साधू आले होते. लोक त्यांचे प्रवचन ऐकायला जात होते. आपल्या शंकांचे समाधान करीत होते. एका भक्ताने त्यांना प्रश्न विचारला–शरीरामध्ये वेदना झाल्या, शरीराला मार लागला, शरीराला कोणी चावले तरी पीडा होत नाही असे कसे संभव आहे ? त्रास तर होणारच तर मग शरीर व आत्म्याला भिन्न जाणून काय उपयोग ? साधूंनी सांगितले – येथे दोन नारळ पडले आहेत, त्यातील एक कच्चा आहे. त्यामध्ये पानी आहे, त्याला फोडून त्यातील गर बाजूला करण्याची इच्छा केली तर होऊ शकत नाही कारण त्याचा गर परटीला चिकटून बसला आहे. हा दूसरा नारळ आहे. याचे पाणी सुकून गेले आहे. याचा गर परटीपासून वेगळा झाला आहे. हा नारळ फोडला तर आतील खोबऱ्याला धक्का पोहचत नाही. नारळाची परटी व गर वेगवेगळे

झाले आहेत. पुढे साधु म्हणाले. याचप्रमाणे काही लोक शरीराच्या परटीबरोबर चिकटून बसले आहेत. शरीराला मार बसला की, त्यांना पण मार बसतो. व जे स्वत:ला शरीरापासून वेगळे करतात त्यांच्या शरीराला मार बसला तरी त्यांना पीडा व दु:ख होत नाही.

मागील गाथेमध्ये शरीरादी विषयी अत्यन्त मध्यस्थ भाव प्रकट केला. ज्यावेळी कोणत्याही वस्तूसंबंधी आपलेपणा नष्ट होतो तेथे त्यासंबंधी परकेपणा येतो व त्यासंबंधी मोह आपोआप नष्ट होतो. ज्ञानी शरीरादीकांस आपल्यापासून भिन्न परद्रव्यरूप जाणतो म्हणून त्याच्या प्रति ममत्वभाव नष्ट होतो, म्हणून पुढील गाथेमध्ये शरीरवचन मनाच्या ठिकाणी परद्रव्यपणा निश्चित करतात.–

देहो य मणो वाणी पोग्गलदव्वप्पग त्ति णिद्दिट्ठा।
पोग्गलदव्वं हि पुणो पिंडो परमाणुदव्वाणं ।।१६१।।

अन्वयार्थ –(देहो) शरीर **(मणो)** मन **(य)** आणि **(वाणी)** वचन **(पोग्गलदव्वप्पग त्ति)** पुद्गलद्रव्यात्मक आहेत. **(णिद्दिट्ठा)** असे सर्वज्ञदेवांनी सांगितले आहे. **(हि पुणो)** निश्चयाने पुन्हा **(पोग्गलदव्वं)** ते पुद्गलद्रव्य **(परमाणुदव्वाणं पिंडो)** परमाणुद्रव्यांचा पिण्ड आहे.

तात्पर्य – शरीर–वचन–मन पुद्गलद्रव्यात्मक आहेत, म्हणून आत्म्यापासून अत्यन्त भिन्न आहेत.

शरीर–वचन–मनाची परकीयता व पुद्गलात्मकता –

शरीर, वचन, मन परद्रव्य आहेत. कारण ते पुद्गलद्रव्य आहेत. आत्मा नाहीत. चेतन नाहीत. त्यांच्याठिकाणी पुद्गलद्रव्यपणा आहे ही गोष्ट त्यांच्यामध्ये असणाऱ्या पुद्गलद्रव्याच्या स्वलक्षणभूत स्वरूपास्तित्वावरून निश्चित होते. पुद्गलद्रव्याचे स्वलक्षण आहे स्पर्शरसगंधवर्ण. ज्यामध्ये स्पर्शरस–गंधवर्ण आहे, ते पुद्गलद्रव्य होय. शरीरामध्ये थंड, गरम, स्निग्ध, रूक्ष, स्पर्श हे स्पर्शनेन्द्रियाच्याद्वारे प्रत्यक्ष जाणले जातात. शरीरामध्ये दुर्गंध येतो. शरीराची चव घेतली तर रस प्रतीतीला येतो. शरीराचा वर्ण तर डोळ्याने प्रत्यक्ष दिसतो. म्हणून शरीराचे स्वरूपास्तित्व स्पर्शरसगंधवर्णमय आहे, म्हणून ते पुद्गलद्रव्य आहे हे स्पष्ट आहे.

वचन भाषावर्गणेपासून बनतात व भाषावर्गणा सूक्ष्म असल्यामुळे त्याचा स्पर्शरसगंध वर्ण इन्द्रियांचा विषय नाही, पण वचनाची पुद्गलता दुसऱ्या हेतूने जाणली जाते. शब्द टेपरेकॉर्डरच्या माध्यमातून पकडले जातात. मूर्तिक

पदार्थांच्या द्वारे वचनामध्ये व्याघात निर्माण होतो. शब्द मृदू व कठोर दोन प्रकारचे आहेत. ग, घ, ज, झ इत्यादी २० वर्ण ऐकताना कानाला त्यांचा मृदु स्पर्श जाणवतो क, ख, च, छ इत्यादी काही वर्णांचा कठोर स्पर्श जाणवतो. मधुर संगीत लावले असता गुलाबाच्या फुलांची झाडे प्रफुल्लित होतात. त्यांच्या कळ्या विकसित होतात हे प्रयोगाने सिद्ध झाले आहे. यावरून वचनपण पौद्‌लिक आहे, ही गोष्ट सिद्ध होते. मन अत्यंत सूक्ष्म आहे, म्हणून त्याची पुद्‌गलता इन्द्रियाने लक्षात येत नाही. पण मूर्तिक मनोवर्गणेपासून द्रव्यमन उत्पन्न होते, म्हणून ते पण पौद्‌गलिक आहे.

शरीरादी : अनेक द्रव्यांचा एक पिण्ड परिणाम –

वास्तविक शरीर, वचन, मन हे पुद्‌गलद्रव्य नसून पुद्‌गलपरमाणूंचा पिंड आहे. एक परमाणू मूळ पुद्‌गलद्रव्य आहे. ज्याचा पुन्हा दुसरा विभाग होऊ शकत नाही. पुद्‌गलपरमाणूंमध्ये परस्पर बंधरूप होऊन संघातरूप होण्याची शक्ती आहे. अनेक परमाणू अनेक प्रकाराने परस्पर मिळून अनेक प्रकारच्या स्कंधांची उत्पत्ती होते. त्यालाच वर्गणा म्हणतात. याच वर्गणांपासून शरीर, वचन, मनाची रचना होते. म्हणून शरीर, वचन, मन वास्तविक पुद्‌गलद्रव्य नाही. अनेक परमाणूंचा पिंडरूप स्कन्ध पर्याय आहे.

ज्याप्रमाणे जीव व पुद्‌गल मिळून एक मनुष्यरूप द्रव्यपर्याय उत्पन्न झाली तरी त्यामध्ये ते दोन्ही एकरूप झाले नाहीत. त्या मिश्रित अवस्थेमध्ये सुद्धा जीवाचे स्वरूपास्तित्व भिन्न आहे व पुद्‌गलाचे स्वरूपास्तित्व भिन्न आहे. त्याप्रमाणे अनन्तानन्त परमाणू मिळून एक पिण्डपर्याय उत्पन्न झाली तरी त्या स्कंधामधील प्रत्येक परमाणू आपापल्या स्वरूपास्तित्वाने भिन्न भिन्नच आहे. एक परमाणू बदलून कधी दुसऱ्या परमाणूरूप होत नाही. त्या स्कंधरूप एक बंधरूप अवस्थेमध्येही परमाणूंचे स्वरूपास्तित्व टिकून राहते. द्रव्य स्वयं स्वत:मध्ये सुरक्षित आहे.

अनेक परमाणूंचा संघात झाल्यावर अनेकांमध्ये एकत्वाचा आरोप करून त्याला एकद्रव्य म्हटले जाते. वास्तविक शरीरादी एकद्रव्य नाहीत. अनंत परमाणू बंध अवस्थेमध्ये एकरूपाने भासित होतात. ज्याप्रमाणे एक घागर जे परमार्थभूत पुद्‌गलद्रव्य आहे त्यामध्ये व्यवहारच घटित होत नाही. ज्याप्रमाणे परमार्थभूत जीवद्रव्यामध्ये कोणताही व्यवहार चालत नाही त्याप्रमाणे परमार्थभूत पुद्‌गलद्रव्य आहे. त्यामध्ये कोणताही व्यवहार चालत नाही व त्या

एका परमाणूद्वारे न भूक मिटते, न तहान भागते, न देण्याघेण्याचा व्यवहार होतो, काहीही होत नाही. जोपर्यंत ते अनन्तानन्त परमाणू एकपिण्डरूप स्कंध अवस्थेमध्ये असतात तोपर्यंत ते एकरूप भासित होतात. घट उचलला तर सर्वच्या सर्व परमाणू एकजूट होऊन उचलले जातात, विखरून वेगवेगळे होत नाहीत. हीच त्यांची त्या द्रव्यपर्यायामध्ये एकरूपता दिसून येते. स्कंधपर्यायामध्ये ते परमाणू एकरूप झाल्यासारखे वाटतात. परंतु प्रत्येक परमाणू स्वतंत्र सत् आहे. जेथे सत्चा निर्णय असतो तेथे कोठेही चूक होत नाही. ज्ञानी शरीराला एक म्हणतो, पण त्यातील प्रत्येक परमाणूचे अस्तित्व स्वतंत्र जाणतो. शरीर, वचन, मन परमार्थ सत् नाही. काही काळापुरती बनलेली ती द्रव्यर्याय आहे. मायाजालरूप आहे. शाश्वत नाही.

मी मन, वचन, शरीरापासून भिन्न शुद्ध चैतन्य धातूपासून बनलली एक अपूर्व अमूर्तिक वस्तु आहे. हीच प्रतीती शुद्धोपयोगाच्या प्राप्तीचे बीज आहे, ज्यांनी मन, वचन, कायेला आपल्या स्वरूपापासून भिन्न जाणले त्यांनी त्या शरीराशी संबंधित स्त्री, पुत्र, मित्र, कुटुंब, वस्त्र, आभूषण, घर इत्यार्दीना सुद्धा आपल्यापासून भिन्न जाणले. तोच वैराग्याच्या शीडीवर चढून शुद्धोपयोगाच्या भूमिकेमध्ये पोहोचतो.

आता ही गोष्ट सिद्ध करतात की आत्म्यामध्ये परद्रव्यपणा नाही आणि परद्रव्याचा कर्तापणा सुद्धा नाही. अर्थात् आत्मा परद्रव्यरूप होत नाही व परद्रव्याचा कर्ता नाही–

णाहं पोग्गलमइओ ण ते मया पोग्गला कया पिंडं ।
तम्हा हि ण देहोऽहं कत्ता वा तस्स देहस्स ।।१६२।।

अन्वयार्थ – (अहं) मी **(पोग्गलमइओ)** पुद्गलमय **(ण)** नाही. **(ते पोग्गला)** ते पुद्गल **(मया)** माझ्याकडून **(पिंडं)** पिंडरूप **(ण कया)** केले गेले नाहीत. **(तम्हा हि)** म्हणून निश्चयाने **(अहं)** मी **(देहो)** शरीर **(ण)** नाही. **(वा)** आणि **(तस्स देहस्स)** त्या शरीराचा **(ण कत्ता)** कर्ता नाही.

तात्पर्य – मी शरीर नाही आणि त्या शरीराचा कर्ता नाही. कारण आत्मा पुद्गलमय नाही व शरीर पुद्गलमय आहे.

आत्मा व शरीरामध्ये स्वरूपभेद –

या गाथेमध्ये आत्मा आणि शरीराचे भेदज्ञान चांगल्यारीतीने केले आहे. गाथेमध्ये दोन प्रतिज्ञा वाक्य व त्याचे दोन हेतू सांगितले आहेत.

प्रथम प्रतिज्ञा – मी शरीर नाही कारण मी पुद्‌गलमय नाही. मी स्पर्श–रस–गंध–वर्णरहित चैतन्यमय जीवद्रव्य आहे. शरीर ज्या पुद्‌गलापासून बनले आहे त्या पुद्‌गलाचे स्वरूप स्पर्श–रस–गंध– वर्णमय अचेतन जड आहे. चेतन आत्मा चैतन्यमय गुणांमध्ये परिणमन करतो. पुद्‌गलगुणांमध्ये परिणमन करीत नाही, म्हणून मी पुद्‌गलमय नाही. जर पुद्‌गलमय नाही तर मी शरीररूप कसा होऊ शकतो?

पुद्‌गल पूरण–गलन स्वभावी आहे. मी त्यामध्ये पूरणगलन होत नाही. ज्याप्रमाणे परमाणू–परमाणू परस्पर मिळून पूरित होतात आणि पुन्हा मिळालेल्या स्कंधातून गळून जातात त्याप्रमाणे आत्म्यामध्ये होत नाही. पुद्‌गलाचा स्कंध होतो, पण जीवाचा स्कंध होत नाही. निगोद शरीरामध्ये अनन्त जीव राहून सुद्धा तेथे त्या सर्व जीवांचा मिळून एक स्कंध होत नाही. जीवामध्ये समानजातीय द्रव्यपर्याय होत नाही.

येथे शरीरामध्ये मन व वचन सुद्धा गर्भित आहेत. ज्याप्रमाणे मी शरीररूप नाही त्याप्रमाणे मी मन व वचनरूप पण नाही. कारण ते सुद्धा पुद्‌गलमय आहेत व मी पुद्‌गलमय नाही. मी पुद्‌गलापासून भिन्न असाधारण चैतन्यस्वभावी आहे. पुद्‌गल इन्द्रियांच्याद्वारे जाणण्यायोग्य आहे. मी इन्द्रियाद्वारे जाणण्यायोग्य नाही. मी स्वसंवेदनगम्य आहे.

शरीराची तक्रार –

मी पुद्‌गलमय नाही व माझ्यामध्ये पुद्‌गलात्मक शरीरपणा नाही. हे ऐकून शरीर म्हणते, तू शरीर नाहीस तर ठीक आहे, परन्तु तू शरीराचा कर्ता तर आहेस? जीव म्हणतो, नाही. मी शरीराचा कर्ता पण नाही, कारण पुद्‌गलाचा पिण्ड मी बनविला नाही ही तर तुझीच करतूत आहे. यावर पुन्हा शरीर म्हणते, भाऊ शरीराला कारणभूत तर तूच आहेस. आता तू कर्तापणाचा नकार करीत आहेस. माझी आज इतकी अवस्था बिघडली आहे ती कुणामुळे? मी पहिला अत्यंत स्वच्छ आहारवर्गणारूप होतो. माझ्यामध्ये मांस, हाड, रक्त या गोष्टी नव्हत्या, तुझा संबंध झाल्यावर आहारवर्गणा रक्त, मांस, हाड, पू इत्यादीरूप बनल्या आहेत. याचे कारण तर तूच आहेस? आज तू इतका निर्दयी व कठोर कसा झालास? आज निर्णयाची वेळ आली आणि तू स्वतःकडे हात झाडून रिकामा होतोस की मी तुझा कर्ता नाही. अशी एक मोठी शंका पुद्‌गलमय शरीराने जीवावर घेतली.

शरीराच्या तक्रारीचे उत्तर –

ज्ञानी जीव उत्तर देतो की, भाऊ, तू पण चांगला होतास व मी पण चांगला स्वच्छ होतो. तू मांस, हड्डी, रक्तरहित पवित्र दशेमध्ये होतास व मी पण आपल्या स्वभावामध्ये शुद्ध स्वच्छ पवित्र ज्ञानमय होतो, परंतु माझे बिघडण्याचे कारण तुझी संगतीच आहे. फलस्वरूप हे सिद्ध होते की जीवाच्या बिघडण्यामध्ये पुद्गलावर आरोप व पुद्गलाच्या बिघडण्यामध्ये जीवावर प्रत्यारोप, या आरोप प्रत्यारोपावरून हा निर्णय निघतो की न पुद्गलाने जीवामध्ये काही केले व ना जीवाने पुद्गलामध्ये काही केले, परंतु असाच निमित्तनैमित्तिक संबंध होता. दोघांची खोटी होनहार होती की अशी घटना होत आली आहे. वास्तविक मी शरीराचा कर्ता नाही आणि शरीर माझा कर्ता नाही.

कर्त्याचे चार प्रकार –

कर्ता बनण्याचे चार प्रकार आहेत. – १)जो कारणरूप आहे, तो कर्ता म्हटला जातो. जसे माती घटाचा कर्ता आहे. २) जो साक्षात् ते काम करतो, त्याला कर्ता म्हणतात. जसे कुंभार घटाचा कर्ता आहे. ३) जो कर्त्याला प्रेरणा करतो, तो कर्ता म्हटला जातो. जसे ज्यांना घट बनविण्याची ऑर्डर दिली, ते प्रयोजक कर्ता आहेत. ४) जो कर्त्याला अनुमोदना देतो, तो सुद्धा कर्ता म्हटला जातो. जसे ज्यांनी घट बनविण्याची ऑर्डर दिली नाही, पण घट बनल्यावर ज्यांना आनंद झाला ते सुद्धा त्याचे कर्ता म्हटले जातात. ज्याप्रमाणे कोणत्यातरी अशुभ घटनेमध्ये कोणत्यातरी पुरुषाची हत्या झाली त्याच्या केसमध्ये – १) ज्या एका पुरुषाने साक्षात् हत्या केली त्याला तर न्यायाधीश कर्ता साबित करतो. त्याला शिक्षा मिळते. २) जो कोणी मदतरूपाने या घटनेचे कारण बनला असेल, त्याला सुद्धा कर्ता मानून थोडी बहुत शिक्षा मिळते. ३) जो कारण पण बनला नाही व ज्यांनी प्रत्यक्ष केले नाही, परन्तु ज्याने करायला लावले असेल, संकेत केला असेल तर तो सुद्धा शिक्षेला पात्र होतो. ४) कोणी मनुष्याने स्वतः हत्या केली नाही, त्यामध्ये कारण नाही व प्रयोजकपण झाला नाही, परन्तु हत्येच्या काळात उपस्थित राहून शाबासकी देतो असा पुरुषसद्धा अपराधी आहे. हे चारीच्या चारी अपराधी सिद्ध होतात. मी शरीराचे कारण नाही कारण मी पुद्गल नाही. मी शरीराचा कर्ता नाही, कारण त्यांना पिण्डरूप मी बनविले नाही, मी शरीराचा प्रयोजक नाही, कारण पुद्गलपिण्डाला मी करविले नाही. मी शरीराच्या कर्त्याचा अनुमोदक पण नाही कारण शरीर बनण्यामध्ये मला हर्ष नाही. जर मी चारीप्रकारे नाही तर मी शरीराचा कर्ता कसा ? माझे स्वरूप

अस्तित्वच यापासून सर्वथा भिन्न आहे तर माझ्यावर संकट का लादता ?

अकर्तृत्वाच्या आशयावर शान्तीचा निर्माता –

सर्व समस्यांचे मुख्य समाधान हे आहे की मी निजद्रव्याव्यतिरिक्त कोणत्याही परद्रव्याचा कर्ता नाही. आमची मुक्ती, शांती, कल्याण सर्व काही याच निर्णयावर आधारित आहे. मी शरीराचा कर्ता नाही. जो शरीररूप परिणमतो तो त्याचा कर्ता आहे. मी एक अशरीरी आहे. मी सहज शुद्ध चैतन्यरूपाने परिणमतो म्हणून मी शरीराचा कर्ता नाही. मी रागद्वेषाचा पण स्वभावतः कर्ता नाही, अंतरंगामध्ये ज्ञानदर्शन स्वरूप आहे. जाणणे माझे काम आहे, जाणणे माझी कला आहे.

अन्य पदार्थ अन्य पदार्थामध्ये काय करू शकतो ? वास्तविक होण्यापेक्षा करण्याचा अर्थ काय आहे ? प्रत्येक प्रदार्थ आहेत ते स्वयं परिणमतात अर्थात होतात. कोणी अन्य निमित्त प्राप्त करून विकाररूप होतात तर कोणी आपल्यामध्ये स्वभावरूप होतात. होण्याचीच गोष्ट जगात आहे. करण्याचा अर्थ काय आहे ? परंतु व्यवहारामध्ये करण्याचे प्रचलन जास्त आहे.

शरीर भिन्न आहे, मी भिन्न आहे. मी शरीराला करणारा नाही व करविणाराही नाही. ज्याला कार्याचे फळ मिळते त्याला करविणारा म्हणतात. जो कार्य तर करीत नाही, पण कार्याचे फळ प्राप्त करतो त्याला करविणारा म्हणतात. ज्याप्रमाणे कोणी पित्याने मुलाकडून पाणी भरविले. वडिलांनी स्वत: पाणी भरले नाही, पण पाणी भरण्याचे प्रयोजन त्यांनी प्राप्त केले. नोकराकडून घराची स्वच्छता करवून घेतली. त्या स्वच्छतेचा आनन्द मालक प्राप्त करतो. येथे शरीरामध्ये परिणमन होत आहे त्याचे फळ त्यालाच मिळते. कोणत्याही पदार्थाच्या परिणमनाचे फळ कोण्या दुसऱ्या पदार्थाला मिळत नाही. पुद्गलाच्या परिणमनाचे फळ एवढेच आहे की पुद्गलाची सत्ता कायम राहते. घड्याळ चालू आहे याचे फळ कोणाला? घड्याळालाच मिळणार. काय फळ मिळाले तर घड्याळाची सत्ता कायम आहे. आत्म्याने जे परिणमन केले त्याचे फळ आत्म्याला मिळणार. त्याचे फळ आत्म्याची सत्ता कायम राहिली. आत्म्याला दुप्पट फळ मिळते. परंतु पुद्गलाला एक फळ मिळते. पुद्गलाच्या परिणमनाचे फळ एवढेच आहे की त्याची सत्ता कायम राहते. यापेक्षा अन्य काही नाही. परंतु आत्म्याच्या परिणमनाचे फळ दोन आहेत. १) आत्म्याची सत्ता टिकून राहते आणि सुख दु:ख आनन्द पण मिळतो. मी दुसऱ्याचे

परिणमनाचे फळ प्राप्त करीत नाही म्हणून मी शरीराचा करविणारा नाही. मी एक चेतन सत् अनेक परमाणूंच्या पिंडरूप पर्यायाचा कर्ता होऊ ही गोष्ट असंभव आहे. हे सर्व निश्चयनयाचे वर्णन आहे. जी गोष्ट ज्या अपेक्षेने सांगितली जात आहे. ती त्याच अपेक्षेने समजून घेतली तर समजते. जेथून जी वस्तू पाहिली जाते तेथून पाहिली तर ती वस्तू तशी दिसते.

एकदा एक राजा जंगलात शिकार करायला गेला. त्या जंगलात एक भिल्ल होता. तो म्हणतो, चला, मी तुम्हाला दाखवतो की वाघ कोठे आहे ? तो राजाला आत जंगलात घेऊन गेला व दाखविले, 'तेथे पहा. तो वाघ आहे'. परंतु राजाला दिसत नाही. ज्या मार्गातून तो वाघ दिसत होता त्या मार्गातून तो राजा पाहत नव्हता. तो राजा, वरचेवर विचारतो, 'कोठे आहे, कोठे आहे ?' त्या भिल्लांनी त्या राजाला शिव्या पण दिल्या कारण त्याला माहित नव्हते की हा राजा आहे. भिल्ल म्हणतो, 'इकडे पहा', तरीपण त्याला दिसत नाही. राजा म्हणतो, 'मला काही वाघ दिसत नाही'. ज्या दिशेला वाघ आहे, त्या दिशेला पाहिले तर तो दिसणार. मी शरीराचा कर्ता नाही. हे मर्म जर इन्द्रियांच्या द्वारे शरीराला आत्मा मानून पाहिले तर कसे कळणार?

जर स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाद्वारे 'मी चैतन्यस्वरूप ज्ञानघन, आनन्दमय आहे असे जाणले तर शरीराचे भिन्नत्व व अकर्तृत्व लक्षात येईल.

अमृतचंद्र स्वामी समयसार कलशामध्ये म्हणतात.

कर्तृत्वं न स्वभावोऽस्य चितो वेदयितृत्ववत् ।
अज्ञानादेव कर्त्ताऽयं तदभावादकारकः ।।

शुद्ध निश्चयनयाच्या दृष्टीने पाहिले तर आत्म्याचा स्वभाव ज्याप्रमाणे भोगणे नाही त्याप्रमाणे करणेसुद्धा नाही. अज्ञानाने हा जीव कर्ता होतो व अज्ञान निघून गेल्यावर परभावांचा कर्ता होत नाही.

वस्तूचे स्वरूप जाणून मी शरीररूप नाही, व शरीराचा कर्ता नाही असे श्रद्धान दृढ करून शरीरापासून भिन्न निज आत्म्याचा अनुभव करावा व शुद्धोपयोगमय साम्यभावामध्ये क्रीडा करून सदा सुखी व्हावे.

आत्मा शरीराचा कर्ता नाही, कारण पुद्गल परमाणूंपासून उत्पन्न स्कन्ध जीवाने केला नाही असे मागील गाथेमध्ये सांगितले. यावरून एक प्रश्न येतो की, परमाणूंची पिण्डपर्यायरूप परिणती कशी होते? या प्रश्नाचे उत्तर पुढील गाथेत सांगतात–

अपदेसो परमाणू पदेसमेत्तो य सयमसद्दो जो ।
णिद्धो वा लुक्खो वा दुपदेसादित्तमणुहवदि ।।१६३ ।।

अन्वयार्थ –(परमाणू) परमाणू **(अपदेसो)** अप्रदेशी आहे. **(पदेसमेत्तो)** एक प्रदेशमात्र आहे **(य)** आणि **(सयमसद्दो)** स्वयं शब्दरहित आहे. **(णिद्धो वा)** स्निग्ध अथवा **(लुक्खो)** रूक्षरूप होत **(दुपदेसादित्तं)** द्विप्रदेशादिपणाचा **(अणुहवदि)** अनुभव करतो.

तात्पर्य – एक प्रदेशी परमाणू संघातयोग्य स्निग्ध व रूक्षगुणांमुळे द्व्यणुक आदी स्कंधरूप बनतो.

वास्तविक पुद्गलद्रव्य –

हे शरीर अनेक आहारवर्गणेंच्या परमाणूपासून बनलेले आहे. प्रत्येक परमाणू स्वतंत्र आहे. त्यांची एक पिंडरूप परिणती कशी झाली ? स्कंध हे मूळद्रव्य नाही. पर्याय आहे. पैसा, सोना, चांदी, घर, शरीर इत्यादी जितक्या वस्तू आपल्याला जगामध्ये दिसतात. त्या सर्व वास्तविक नाहीत क्षणिक पर्याय आहेत. ते सर्व विखरून जाणार आहेत. यामध्ये परमार्थ वस्तू काय आहे ? तर सांगतात की परमार्थ वस्तू तर परमाणू आहे. परमाणूमध्ये दोन आदी प्रदेश नाहीत म्हणून त्याला अप्रदेशी म्हणतात. अप्रदेशी शब्दाचा अर्थ प्रदेशाचा अभाव नाही. तर दोन आदी प्रदेशांचा अभाव अर्थात परमाणू बहुप्रदेशी नाही. परंतु परमाणू एक प्रदेशी आहे. जर प्रदेशाचा सर्वथा अभाव मानला तर ते द्रव्यच सिद्ध होऊ शकत नाही.

परमाणूचा शब्दरहितपणा व त्याचे स्वरूप –

विश्वामध्ये अनेक प्रकारचे स्कंध दिसतात. त्यापैकी शब्द ही एक स्कंधरूप परिणती आहे. परमाणूंपासून शब्द बनला आहे. परंतु परमाणू स्वयं शब्दरूप नाही. एका परमाणूमध्ये शब्दरूप होण्याचे सामर्थ्य नाही. अनेक परमाणूंच्या संघाताने किंवा भेदाने शब्दरूप पर्याय उत्पन्न होते. शब्द हा पुद्गलाचा पर्याय आहे. त्यामुळे शब्द उत्पन्न होतो. म्हणून एका परमाणूपासून शब्द उत्पन्न होत नाही. परमाणू एक द्रव्य आहे. त्यामुळे त्यामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण हे चारी गुण आहेत. स्पर्शगुणाचे आठ भेद सांगितले आहेत, शीत, उष्ण, स्निग्ध, रूक्ष, हलका, जड, कठीण व मऊ यापैकी पहिले ४ स्पर्श परमाणूमध्ये असतात. पुढचे चार स्पर्श फक्त स्कंधामध्ये आहेत. काही परमाणू हलके व काही जड, काही कठोर, काही मृदु असे असत नाही. अनेक परमाणू मिळून स्कंध बनल्यानंतर त्यांच्यामध्ये हे चार पर्याय प्रगट होतात.

परमाणूमध्ये पाच रसांपैकी कोणताही एक रस, पाच वर्णांपैकी कोणताही एक वर्ण व दोन गंधांपैकी कोणताही एक गंध असू शकतो व चार स्पर्शांपैकी दोन स्पर्श असू शकतात. शीत उष्णपैकी कोणतातरी एक व स्निग्धरूक्ष पैकी कोणतातरी एक स्पर्श असे दोन स्पर्श एकावेळी असतात.

परमाणूंच्या बन्धनाचे कारण –

परमाणूमध्ये जो स्निग्ध व रूक्षगुण आहे. त्यामुळेच त्या परमाणूंचा स्कंध बनतो; ज्याप्रमाणे संसारी जीव बंधाची इच्छा करीत नसतानासुद्धा जेव्हा जेव्हा रागद्वेषरूपाने परिणमन करतो तेव्हा तेव्हा कर्मवर्गणा स्वयं येऊन जीवाशी बद्ध होतात असा निमित्तनैमित्तिक संबंध आहे. त्याप्रमाणे परमाणू सुद्धा आपल्या स्निग्ध व रूक्ष गुणामुळे परस्पर बंधाला प्राप्त होतात व स्वयं स्कंधरूप होऊन बहुप्रदेशी होतात. जगामध्ये परमाणू परस्पर संघटित होऊन अनेक प्रकारचे स्कंध बनतात. ज्याप्रमाणे अग्नीच्या संयोगाने पाणी वाफरूप बनते. वाफेपासून ढग जमतात. ढगामध्ये बर्फाचे गोळे तयार होतात. बर्फाचे गोळे खाली पडता-पडता उष्णतेमुळे पाणीरूप होतात. पाणी मातीला वाहून नेतो. माती जमा होऊन टेकडी बनते. इत्यादी जगामध्ये केवळ पुद्गलद्रव्य आपल्या भिन्न-भिन्न स्वभावाने मोठमोठी कामे करताना दिसून येते. ज्याप्रमाणे परमाणू परस्पर मिळून स्कंधरूप होतात. तसेच विखरून पुन्हा परमाणू अवस्थेला पण प्राप्त होतात. ज्यामध्ये परस्पर मिसळण्याची व वेगळे होण्याची शक्ती आहे त्यालाच पुद्गल म्हणतात. यावरून ही गोष्ट सिद्ध होते की शरीर, वचन, मन ज्या पुद्गल स्कंधापासून बनले आहेत. ते स्कंध स्वयं परमाणूंच्या परस्पर बंधनाने उत्पन्न होतात. जीव त्यांचा कर्ता नाही. म्हणून पुद्गलपिण्डाचे कर्तृत्व पुद्गलामध्ये आहे मी त्याचा अकर्ता आहे असे निश्चित करून त्यांचा करण्याचा विकल्प सोडावा व स्वत:ला स्वत:मध्ये ज्ञानमात्र अनुभव करून ज्ञानाचे वेदन करावे.

आता परमाणूमध्ये स्निग्धपणा व रूक्षपणा कशाप्रकारचा असतो. ते सांगतात.-

एगुत्तरमेगादी अणुस्स णिद्धत्तणं च लुक्खतं।
परिणामादो भणिदं जाव अणंतमणुभवदि ।।१६४।।

अन्वयार्थ – (अणुस्स) अणूचा **(परिणामादो)** परिणमनामुळे **(एगादी)** एक अविभाग-प्रतिच्छेदापासून **(एगुत्तरं)** एक-एक वाढत **(जाव)** जोपर्यंत **(अणंतमणुभवदि)** अनन्तपणाचा अनुभव करतो तेथपर्यंत **(णिद्धतणं)**

स्निग्धपणा **(च)** आणि **(लुक्खत्तं)** रूक्षपणा **(भणिदं)** सांगितला आहे.

तात्पर्य – परमाणूमध्ये एका डिग्रीपासून ते अनंत डिग्रीपर्यंतचे स्निग्ध व रूक्ष गुणांचे अविभागप्रतिच्छेद प्राप्त होतात.

परमाणूची स्वाभाविक विचित्रता –

परमाणू एक द्रव्य आहे. त्यामध्ये प्रत्येक समयाला परिणमन होत आहे. कारण परिणमन करणे हा वस्तूचा स्वभाव आहे. या परिणमनामुळेच त्यामध्ये विचित्रता उत्पन्न होते. सर्वच परमाणू परिणमन शक्तीच्या निमित्ताने द्रव्यक्षेत्रकालाच्या सहायतेने आपल्या स्पर्श, रस, गंध, वर्णामध्ये परिणमन करीत राहतात. याच परिणमनामुळे स्निग्धपणाचे व रुक्षपणाचे अनंत भेद होतात. सर्वात कमी शक्तीला जघन्य गुण ही संज्ञा आहे. त्यालाच एक गुण म्हणतात. जो परमाणु कोणत्यातरी समयात जघन्य गुणाला धारण करतो तोच परमाणू दुसऱ्या समयात अधिक गुणवाला होतो. एवढेच नव्हे तर त्यामध्ये अनंत अंश स्निग्ध किंवा रूक्षगुणाला धारण करीत होता तो अविभाग प्रतिच्छेद कमी होत एक गुण शक्तीला धारण करणारा होऊन जातो.

गुणांच्या हानीवृद्धीचा दृष्टान्त –

ज्याप्रमाणे पाण्यामध्ये स्निग्धपणा कमी आहे, त्याहून बकरीच्या दूधामध्ये स्निग्धता अधिक आहे, त्याहून गाईच्या दूधामध्ये, त्याहून म्हैसीच्या दूधामध्ये, त्याहून उंटणीच्या दूधामध्ये स्निग्धता अधिक-अधिक आहे. याचप्रमाणे एकाच समयामध्ये अनंत परमाणूंमध्ये वेगवेगळ्या प्रकारची कमी-जास्त स्निग्धता व रूक्षता असू शकते. वास्तविक प्रत्येक परमाणू अनंत स्निग्ध व रूक्षशक्तीचा धारक आहे. परमाणूमध्ये ही परिणमन शक्ती नसती तर कच्चा आंबा पक्व झाल्यानंतर अधिक चिकट झाला नसता. पाणी गायीच्या शरीराच्या स्पर्शाने दूधरूप स्निग्धतेमध्ये परिणमले नसते.

एक पाषाण ज्यामध्ये रूक्ष स्पर्श आहे. तो दोरीच्या घर्षणाने कालान्तरामध्ये स्निग्ध स्पर्शवाला होतो. ज्याप्रमाणे जीवाचा चारित्र गुण कषायांच्या उद्घाटनाच्या निमित्ताने तिरोहित होतो त्याप्रमाणे पुद्गलाच्या स्निग्ध अथवा रुक्षगुणांचे अविभाग प्रतिछेद तिरोहित होतात. ज्याप्रमाणे जीव कधी मंद रागद्वेषाला, कधी मध्यम रागद्वेषाला, कधी उत्कृष्ट रागद्वेषाला प्रगट करतो. त्याप्रमाणे परमाणू कधी जघन्य स्निग्धरूक्ष-गुणरूप, तर कधी मध्यमगुणरूप तर कधी उत्कृष्ट गुणरूप परिणमतो, वस्तूच्या स्वभावाला जाणून

सर्व प्रकारच्या परमाणूंपासून स्वत:ला भिन्न जाणावे व प्रतिसमय शुद्ध ज्ञानानंदाचा स्वाद घ्यावा.

आता येथे प्रश्न उत्पन्न होतो की कशाप्रकारच्या स्निग्धरूक्ष गुणामुळे पुद्गल परमाणूंचा पिंड पर्याय बनतो. याचेच समाधान पुढील गाथेमध्ये करतात–

णिद्धा वा लुक्खा वा अणुपरिणामा समा व विसमा वा ।
समदो दुराधिगा जदि बज्झंति हि आदिपरिहीणा ।।१६५ ।।

अन्वयार्थ –(अणुपरिणामा) परमाणूचे परिणाम **(णिद्धा वा लुक्खा वा)** स्निग्ध असोत की रूक्ष असोत **(समा वा विसमा वा)** दोन, चार आदी सम संख्यावाले असोत की तीन,पाच आदी विषम संख्यावाले इ. असोत **(जदि)** जर **(आदिपरिहीणा)** जघन्य अंशाने रहित असतील व **(समदो दुराधिगा)** समान संख्येहून दोन अधिक अंशरूप असतील तर **(बज्झंति)** परस्पर बंधाला प्राप्त होतात.

तात्पर्य – जघन्य गुणरहित स्निग्ध किंवा रूक्ष परमाणू आपल्यापेक्षा दोन अधिक गुणवान स्निग्ध किंवा रूक्ष परमाणूशी बंधतात.

परमाणूंच्या परस्पर बन्धाचे कारण –

पूर्व गाथेमध्ये परमाणूंच्या परिणमन शक्तीमुळे स्निग्धरुक्षगुणामध्ये अंशांच्या अपेक्षेने अनेक प्रकारता स्पष्ट केली होती. ते परमाणू रूक्ष असोत की स्निग्ध असोत, परस्पर दोन अंश अधिक असल्यावर बंधाला प्राप्त होतात. असा वस्तूचा स्वभावच आहे की दोन अंशांची अधिकता असतानाच परमाणूंचा बंध होतो. एका अंशाच्या अधिकतेने बंध होत नाही किंवा दोनपेक्षा जास्त अंश अधिक असताना बंध होत नाही. दोन अंश स्निग्धगुणयुक्त परमाणूचा चार अंश स्निग्ध अथवा रूक्षगुणयुक्त परमाणूशी बंध होतो. चार अंशयुक्त परमाणूचा सहा अंशवाल्या परमाणूशी बंध होतो. सहाचा आठ अंशयुक्त परमाणूशी, आठचा दहा अंशयुक्त परमाणूशी, एक हजार अंशयुक्त परमाणूचा, एक हजार दोन अंशयुक्त परमाणूशी स्वयंमेव बंध होतो. समसंख्यायुक्त गुणवाल्याचा दुसऱ्या दोन अधिक समसंख्यायुक्त परमाणूशीच बंध होतो. त्याचप्रमाणे विषम संख्यायुक्त गुणवाल्या परमाणूचा दोन अधिक विषम संख्यायुक्त परमाणूशीच बंध होतो अर्थात तीन अंशयुक्त परमाणूचा पांच अंशयुक्त परमाणूशी, पाच अंशयुक्त परमाणूचा सात अंशयुक्त परमाणूशी, ७–

९, ९–११, १००१–१००३अंशयुक्त परमाणूंचा बंध होतो.

दोन गुण अधिक असणारा परमाणू आपल्यापेक्षा हीन गुणयुक्त परमाणूला परिणमवितो. जर तीन गुणयुक्त रूक्ष परमाणूचा पांच गुणयुक्त स्निग्ध परमाणूशी बंध झाला तर तो स्कंध चिकट होतो.

जघन्यगुणयुक्त परमाणूमध्ये बन्धाची अयोग्यता –

वरच्या नियमानुसार दोन अधिक गुण दुसऱ्या परमाणूमध्ये आहेत पण पहिल्या परमाणूमध्ये एक गुण अर्थात जघन्यगुण आहे तर त्यांचा बंध होत नाही अर्थात् एक गुणयुक्ताचा तीन गुणवाल्याशी दोन गुण अधिक असतानाही बंध होत नाही. कारण जघन्यगुणयुक्त परमाणू बंधाला योग्य नाही. ज्याप्रमाणे जीवाचा सूक्ष्मरागयुक्त परिणाम मोहनीय कर्माच्या बंधाला कारण नाही त्याप्रमाणे परमाणूचा एक गुण परिणत स्निग्धत्व व रूक्षत्व बंधाला कारण नाही. तत्त्वार्थ सूत्रामध्ये पुद्गलाच्या परस्पर बंधाच्या कारणाचे वर्णन करणारे पाच सूत्र आहेत. **'स्निग्धरूक्षत्वात्बंधः', 'न जघन्यगुणानाम्', 'गुणसाम्ये सदृशानां द्व्यधिकादिगुणानां तु', 'बन्धेऽधिकौ पारिणामिकौ च'** यावरून सर्व स्पष्ट होते.

वीरसेनाचार्यांचे याबाबतीत थोडे वेगळे मत आहे. जघन्यगुणयुक्त परमाणूचा अन्य कोणत्याही गुणयुक्त परमाणूशी बंध होत नाही ही गोष्ट सम्मत आहे. पण त्यांच्या मते केवळ सदृश अर्थात् स्निग्ध–स्निग्ध किंवा रूक्ष–रूक्ष परमाणूंचा दोन गुण अधिक असणाऱ्या परमाणूशी बंध होतो, हा नियम आहे. विसदृश परमाणूंमध्ये हा नियम ते स्वीकारत नाहीत. दोन आदि गुणयुक्त स्निग्ध परमाणूचा दोन, तीन, चार, पाच, हजार आदि अधिक गुणयुक्त रूक्ष परमाणूशी बंध होऊ शकतो असे त्यांचे मत आहे. दोन्ही मते आपल्या बुद्धीच्या संग्रहात ठेवावे. कारण कोणते मत बरोबर आहे, हे सांगण्याची योग्यता आपल्या सारख्या अल्पबुध्दी जीवांमध्ये नाही.

पूर्वीच्या गाथेत सांगितलेल्या अर्थाचेच पुढील गाथेत पुन्हा समर्थन करतात –

णिद्धत्तणेण दुगुणो चदुगुणणिद्धेण बंधमणुभवदि।
लुक्खेण वा तिगुणिदो अणु बज्झदि पञ्चगुणजुत्तो ।।१६६।।

अन्वयार्थ – (णिद्धत्तणेण) स्निग्धत्वाच्या अपेक्षेने **(दुगुणो)** दोन गुणयुक्त परमाणू **(चदुगुणणिद्धेण)** चार गुणयुक्त स्निग्ध परमाणूशी **(लुक्खेण)** अथवा रूक्ष परमाणूशी **(बंधमणुभवदि)** बंधाचा अनुभव करतो. **(तिगुणिदो**

अणु) तीन गुणयुक्त स्निग्ध किंवा रूक्ष परमाणू **(पञ्चगुणजुतो)** पाच गुणयुक्त स्निग्ध किंवा रूक्ष परमाणूंशी **(बज्झदि)** बांधला जातो.

तात्पर्य – परमाणू आपल्यापेक्षा दोन अंश अधिक स्निग्ध किंवा रूक्ष परमाणूशी बंधतो.

पुद्गलामध्ये बंधाची योग्यता –

ज्याप्रमाणे दोन गुणयुक्त व चारगुणयुक्त स्निग्ध-स्निग्ध किंवा रूक्ष-रूक्ष किंवा स्निग्धरूक्ष परमाणूंचा परस्पर बंध होतो. ज्याप्रमाणे दोन मित्र कधी बरोबरीचे मिळत नाहीत. त्या मित्रांमध्ये सर्व गोष्टी अगदी समान मिळत नाहीत. धन, प्रेम, परिस्थिती, व्यवहार यामध्ये पूर्ण समानता असत नाही. एका मित्रापेक्षा दुसऱ्या मित्राचे परिणाम कितीतरी पटीने उच्च असेल तर तेथेही मित्रता होऊ शकत नाही. थोडा उच्चपणा असेल तर मित्रता होऊ शकते. पूर्णत: समानता पण नको व खूप उच्चनीचपणा पण नको. त्याप्रमाणे परमाणूंमध्ये समान गुण असतानाही बंध होत नाही व दोन पेक्षा अधिक गुण असतील तरी बंध होत नाही. दोन परमाणूंमध्ये दोन गुणांचेच अंतर असेल तर त्या दोन परमाणूंचा बंध होतो.

येथे गुण शब्दाचा अर्थ अविभागप्रतिच्छेद आहे. दोन अविभाग प्रतिच्छेदयुक्त स्निग्ध रुक्षापासून ते अनन्त अविभाग प्रतिच्छेदयुक्त स्निग्ध रुक्षापर्यंत वरीलप्रमाणेच नियम लागू होतो. पुद्गल परमाणूंचा परस्पर बन्ध झाल्यावर एक पिण्डरूपता होते. दोन्ही परमाणू एक होत नाहीत. पिण्ड अवस्थेतही सर्वांचे अस्तित्व भिन्नच असते.

आत्मा शरीरादि पिण्डरूप बनविण्याचा कर्ता कदापि होत नाही म्हणून या सर्व परपदार्थांना आपल्यापासून भिन्न जाणून तेथून आपला उपयोग हटवावा व आपल्या स्वरूपामध्ये उपयोग लावावा.

आत्मा शरीरमनवचनादि पुद्गलपिण्डांचा कर्ता नाही, करविणारा नाही व अनुमोदना करणारा पण नाही. तर मग शरीरादिकाची रचना कशी होते? अनेक परमाणूंच्या पिंडाचा कर्ता कोण आहे ? कोण सर्व स्कंधांचा निर्माण करतो? असे अनेक प्रश्न होतात. म्हणून चार गाथांमध्ये पुद्गलपरमाणूंच्या स्कंधाच्या उत्पत्तीचे कारण सांगितले. स्निग्धत्व-रूक्षत्व गुणामुळे परमाणू परस्पर संश्लेषरूप संबंधाला प्राप्त होतात म्हणून पुद्गलपिण्डाचा कर्ता स्वयं पुद्गलच आहे. आत्मा पुद्गलपिण्डाचा कर्ता नाही ही गोष्ट स्वयं सिद्ध होते.

याचाच निर्धार आता पुढील गाथेमध्ये करतात. –

दुपदेसादी खंधा सुहुमा वा बादरा ससंठाणा ।
पुढविजलतेउवाऊ सगपरिणामेहिं जायंते ।।१६७।।

अन्वयार्थ – (सुहुमा वा बादरा) सूक्ष्म किंवा बादर **(ससंठाणा)** आकारसहित **(दुपदेसादी खंधा)** द्विप्रदेशादी स्कंध अर्थात् दोनपासून अनन्त परमाणूपर्यन्तचे स्कन्ध **(पुढविजलतेउवाऊ)** पृथ्वी, जल, अग्नी आणि वायुरूप **(सगपरिणामेहिं)** आपल्या परिणामांनी **(जायंते)** उत्पन्न होतात.

तात्पर्य – पुद्गल पिण्डांचा कर्ता पुद्गलच आहे, आत्मा त्यांचा कर्ता नाही.

द्विप्रदेशी आदि स्कंधांचा कर्ता –

कार्य उपादान कारणासमान होते. उपादान कारणच स्वयं कार्यरूप परिणमते. मातीचा गोळा स्वयं घागररूप परिणमतो. ज्वारीचे पीठ स्वयं भाकरीरूप परिणमते. सोन्याची कडी स्वयं अंगठीरूप परिणमते. म्हणून दृश्यमान जगामध्ये जे पृथ्वी, पाणी, अग्नि आणि वायुरूप शरीर दिसतात ते जीवरहित असोत की जीवसहित असोत, सूक्ष्म असोत की स्थूल असोत ते आहारवर्गणांच्या स्कंधापासून बनतात. आहारवर्गणा, तैजसवर्गणा इत्यादी बावीस प्रकारच्या वर्गणा सांगितल्या आहेत. त्या सर्व परमाणूंच्या परस्पर संबंधामुळे बनतात. या वर्गणांपासूनच जीवांची औदारिक, वैक्रियिक, आहारक, तैजस व कार्माण शरीरे उत्पन्न होतात. ज्या व्यवहारामध्ये वस्तू दिसतात त्या या पुद्गल शरीरापासूनच उत्पन्न होतात. वृक्षापासून लाकूड मिळते. वृक्ष वनस्पतिकाय आहे. लाकडापासून खुर्ची, टेबल इत्यादी फर्नीचर मिळते. दगड, चूना, लोखंड, तांबा सर्व खाणीतून पृथ्वीकायापासून उत्पन्न झाले आहेत. हे सर्व पृथ्वीकायिक जीवांचे मृत शरीर आहे. परंतु एकेन्द्रिय जीवाच्या शरीरामध्ये मांस असत नाही. म्हणून त्याचा वापर होऊ शकतो. या दगड, माती, वीटांपासून घर तयार झाले. जीव यांचा कर्ता नाही. आपल्या स्निग्ध– रूक्षगुणांमुळे पुद्गलांमध्ये परस्पर बंधरूप होण्याची व विभक्त होण्याची शक्ती आहे. पुद्गलस्कंधाचे गोल, चौकोन, त्रिकोण इत्यादी आकार परस्पर बंधाच्या अपेक्षेने होतात. पृथ्वी आदींमध्ये पातळ, जाड इत्यादी विशेषता आहेत. त्या पुद्गल पिण्डांच्या विशिष्ट अवगाहन शक्तीमुळे आहेत.

पृथिवी आदि चारी भूतांमध्ये चारी गुणांचा सद्भाव –

पृथ्वी, पाणी, अग्नी, वायु, वनस्पतींमध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण चारी गुण असतात. परंतु काहीमध्ये काही गुण व्यक्त असतात व काही गुण अव्यक्त असतात. पृथ्वीमध्ये चारी गुण व्यक्त आहेत. पाण्यामध्ये स्पर्श, रस, वर्ण व्यक्त आहेत, पण गंध अव्यक्त आहे. पाण्याला जो वास येतो तो त्यामध्ये मिसळलेल्या माती आदींचा येतो. अग्नीमध्ये स्पर्श व वर्ण गुण व्यक्त आहे, पण रस व गंध गुण अव्यक्त आहे. अग्नीमध्ये जो गंध येतो तो त्या अग्नीचा नाही, इंधनाचा आहे. वायूमध्ये केवळ स्पर्श गुण व्यक्त आहे. शेष तीन गुण अव्यक्त असतात. ही विभिन्नता परमाणुपिण्डाच्या गुणांचा, आविर्भाव- तिरोभाव आपल्या शक्तीमुळे आहे. परमाणूंच्या विचित्र परिणमन स्वभावामुळे तो परमाणू पृथ्वी, पाणी, अग्नी, वायु कायरूप परिणमतात. त्यांना करणारा कोणी नाही. ज्याप्रमाणे प्रत्यक्ष जगामध्ये ढग, इन्द्रधनुष, वीज इत्यादी स्वाभाविक परिणमन पाहिले जातात.

निश्चयाने आत्मा शुद्ध बुद्ध एकस्वभावी आहे. परंतु व्यवहाराने अनादिकर्मबन्धवश शुद्धात्मस्वभावाला प्राप्त न करता पृथ्वी पाणी, अग्नि, वायुकायिकामध्ये उत्पन्न होतो. पृथ्वी आदी शरीरांमध्ये उत्पन्न होऊन सुद्धा जीव आपल्या सुख-दुःख, ज्ञानविकल्प आदी परिणतींचा उपादान कारण आहे, पृथ्वी आदी शरीराकार परिणतीचा कर्ता नाही. पृथ्वीरूप शरीराकार परिणतीचे उपादान कारण पुद्गल स्कन्धच आहेत. म्हणून कर्तृत्वाचा विकल्प सोडून स्वद्रव्यामध्ये उपयुक्त होऊन विश्राम करावा.

हा आत्मा शरीराचा कर्ता नाही. ही गोष्ट ठीक आहे, परंतु हा पुद्गलपिण्डांना आणणारा तर आहे. ज्याप्रमाणे आम्ही घड्याळाला बनविले नाही. परंतु त्याला आणू तरी शकतो ? असा प्रश्न झाला असता. आता पुढील गाथेमध्ये हे सिद्ध करतात की आत्मा पुद्गलपिंडाना आणणारा पण नाही. आत्मा बंधाच्या वेळी बंधयोग्य पुद्गलांना बाहेरून कोठून आणीत नाही –

ओगाढगाढणिचिदो पोग्गलकायेहिं सव्वदो लोगो ।
सुहुमेहिं बादरेहि य अप्पाओग्गेहिं जोग्गेहिं ।।१६८।।

अन्वयार्थ – (लोगो) लोक **(सव्वदो)** आपल्या सर्व प्रदेशांमध्ये **(सुहुमेहिं)** सूक्ष्म **(य)** आणि **(बादरेहि)** बादर **(अप्पाओग्गेहिं)** कर्मरूप होण्यास अयोग्य तथा **(जोग्गेहिं)** कर्मरूप होण्यास योग्य **(पोग्गलकायेहिं)** पुद्गल स्कंधानी **(ओग्गाढगाढणिचिदो)** अत्यंत गाढ भरलेला आहे.

तात्पर्य– लोक अनेक प्रकारच्या पुद्‌गलस्कंधांनी सर्वत्र भरलेला आहे. त्यांना आणणारा आत्मा नाही.

जीव व पुद्‌गलांचे अस्तित्व सहजसिद्ध –

हा असंख्यात प्रदेशी लोक सर्व बाजूंनी अनंतानंत पुद्‌गल स्कंधांनी ठसाठस भरलेला आहे. एका आकाशाच्या प्रदेशामध्ये सूक्ष्मरूपाने परिणत अनंत वर्गणा विद्यमान आहेत. सामान्यरूपाने जगामध्ये सूक्ष्म व बादर दोन प्रकारचे पुद्‌गलस्कंध आहेत. जे कोणत्याही इंद्रियाने ग्रहणयोग्य आहेत त्यांना बादर अर्थात् स्थूल पुद्‌गल म्हणतात. परंतु जे कोणत्याही इंद्रियाने ग्रहणयोग्य नाहीत त्यांना सूक्ष्म म्हणतात. कर्मरूप होण्यायोग्य कार्माण वर्गणा सूक्ष्म आहेत. अशा कार्माण वर्गणा लोकामध्ये सर्वत्र व्याप्त आहेत. कारण या लोकामध्ये सर्वत्र जीव आहेत. एकेका निगोद शरीरामध्ये अनन्त निगोदी जीव आहेत व सूक्ष्म पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक, वायुकायिक, वनस्पति-कायिक जीव सुद्धा सर्व लोकाकाशाच्या प्रदेशांवर स्थित आहेत. त्या प्रत्येक जीवाच्या एकेका प्रदेशावर अनन्तानन्त कर्मरूप परमाणू आहेत व त्या एकेक कर्म परमाणूबरोबर एक क्षेत्रावगाही अनंत विस्रसोपचयरूप कार्मणवर्गणा आहेत. विस्रसा उपचय अर्थात स्वभावानेच जे ढीगरूप वर्तमान आहेत, त्यांना कोणी आणले नाही. ते जीवाच्या प्रदेशावर स्वाभाविक रूपाने स्थित आहेत. त्यातल्याच काही कार्माणवर्गाणा प्रत्येक समयाला कर्मरूप परिणमतात. त्यांना बाहेरून कोठून आणावे लागत नाही.

त्या पुद्‌गलकायामध्ये असाच परस्पर अवगाह विशेष आहे, त्यामुळे त्यांना एकत्र राहण्यामध्ये परस्पर कोणतीही बाधा येत नाही. अतिसूक्ष्म अथवा अतिस्थूल पुद्‌गल कर्मरूप परिणमण्याच्या शक्तीने रहित आहेत. पण जे अतिसूक्ष्म नाहीत किंवा अतिस्थूल नाहीत ते पुद्‌गलस्कंध कर्मरूप होण्यास योग्य आहेत. जेव्हा संसारी जीवामध्ये नामकर्माच्या उदयाने प्रदेशपरिस्पंदन होते तेव्हा आत्म्यामध्ये योग उत्पन्न होतो. त्या योगाच्या निमित्ताने कार्माणवर्गणा कर्मरूप परिणमतात व त्यांचा आत्म्याशी संश्लेशसंबंध होतो त्यालाच बंध म्हणतात. असाच निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. ज्याप्रमाणे तापलेला लोखंडाचा गोळा जर पाण्यात सोडला तर तो चोहोबाजूंनी पाणी ग्रहण करतो त्याप्रमाणे योगाच्या निमित्ताने आत्मा सर्व आत्मप्रदेशांतून कर्मांना ग्रहण करतो.

ज्याप्रमाणे उष्णतेचे निमित्त करून पाणी स्वयं वाफरूप परिणमन करते सूर्याच्या उदयाच्या निमित्ताने कमळ स्वयं विकसित होते त्याप्रमाणे योगाच्या

निमित्ताने कार्माण वर्गणा स्वयं बंधयोग्य होतात.

गोम्मट्टसार कर्मकांडामध्ये प्रदेशबन्धाचे स्वरूप सांगितले आहे, ते याप्रमाणे –

एयक्खेत्तोगाढं सव्वपदेसेहिं कम्मणो जोग्गं ।
बंधदि सगहेदूहिं य अणादियं सादियं उभयं ।।१८५।।

जघन्य अवगाहनारूप एक क्षेत्रामध्ये स्थित आणि कर्मरूप परिणमण्या योग्य अनादी किंवा सादी किंवा दोन्हींरूप पुद्‌गल द्रव्य आहे त्याला हा जीव आपल्या सर्व प्रदेशांनी मिथ्यात्वादीच्या निमित्ताने बांधतो.

मागील गाथेमध्ये सांगितले की आत्मा पुद्‌गलपिण्डांना आणणारा नाही. यावर कोणी म्हणेल की भलेही आत्मा पुद्‌गल वर्गणांना आणत नाही, पण त्यांना कर्मरूप तर परिणमवू शकतो. जीवानेच तर पुद्‌गल कर्माचा बंध केला. जीवामुळेच कार्माणवर्गणा कर्मरूप परिणमतात. म्हणून जीवच पुद्‌गलकर्माचा कर्ता आहे. त्याचे निराकरण करण्यासाठी आचार्य या गाथेमध्ये सांगतात की आत्मा पुद्‌गलपिण्डांना कर्मरूप करीत नाही–

कम्मत्तणपाओग्गा खंधा जीवस्स परिणइं पप्पा ।
गच्छंति कम्मभावं ण हि ते जीवेण परिणमिदा ।।१६९।।

अन्वयार्थ –(कम्मत्तणपाओग्गा खंधा) कर्मत्वाला योग्य स्कंध **(जीवस्स परिणइं पप्पा)** जीवाच्या परिणतीला प्राप्त करून **(कम्मभावं)** कर्मभावाला **(गच्छंति)** प्राप्त होतात. **(हि ते जीवेण ण परिणमिदा)** निश्चयाने ते जीवाकडून परिणमविले गेले नाहीत.

तात्पर्य – जीव परिणामाचे निमित्त मात्र प्राप्त करून कार्माणवर्गणा स्वयं कर्मरूप परिणमतात.

स्वपरिणतीचे कर्तृत्व स्वतःमध्ये –

प्रत्येक पदार्थांचे परिणमन आपापल्या प्रदेशांमध्ये आपापल्या परिणतीने होते. जीव आपल्या परिणामाचा कर्ता आहे व पुद्‌गल आपल्या परिणामाचा कर्ता आहे. जीवाच्या विभाव परिणामांना निमित्तमात्र प्राप्त करून त्या समान क्षेत्रामध्ये असणाऱ्या कर्मयोग्य कार्माण वर्गणा स्वयं कर्मरूप परिणमतात.जीव त्यांना कर्मरूप परिणमवित नाही. प्रत्येक कार्यामध्ये दोन कारण असतात. १) उपादान कारण २) निमित्त कारण. जे स्वयं त्या कार्यरूपाने परिणमते ते उपादान कारण व त्यासाठी जे सहकारी कारण आहे ते निमित्त कारण होय. ज्याप्रमाणे ज्वारीचे पीठ झाले त्यामध्ये ज्वारी स्वयं उपादान कारण आहे; कारण ज्वारी

स्वयं पीठरूप झाली आहे व त्यामध्ये सहकारी गिरणी, मनुष्य वगैरे निमित्त कारण आहेत. या नियमानुसार ज्ञानावरणादी आठ कर्मे होण्यामध्ये उपादान कारण कार्माण वर्गणा आहेत. ते पुद्‌गल वर्गणा स्वतःच्या शक्तीने द्रव्यकर्मरूप होतात. त्यामध्ये निमित्त कारण जीवाचे अशुद्ध परिणाम आहेत. जीव स्वतःच्या परिणामरूपाने परिणमतो, कर्मरूपाने तो किंचित् देखील परिणमत नाही, म्हणून तो त्याचा कर्ता नाही.

अत्यन्ताभावरूप पदार्थांमध्ये निमित्तनैमित्तिक संबंध–

दोन अत्यन्त भिन्न पदार्थांमध्ये निमित्तनैमित्तिक संबंध असतो. दोन वस्तू भिन्न आहेत. वास्तविक त्यामध्ये संबंध कसा ? ज्याप्रमाणे एक मुलगा दुसऱ्या मुलाला चिडवतो. बोट वाकडे करून किंवा जिभ बाहेर काढून. चिडणारा मुलगा त्या परिणतीला निमित्त करून स्वतःमध्ये चिडतो. एकटाच चिडतो. चिडवणारा तर फक्त निमित्तमात्र आहे. त्याप्रमाणे कर्मत्वरूपाने परिणमनारे पुद्‌गलस्कंध एकटेच कर्मरूप परिणमते. त्यामध्ये बाह्य निमित्त आहे जीवाचा विभाव. अग्नी जळते. पाणी गरम होते. तेथे पाणी स्वयं गरम झाले. अग्री तर स्वतःमध्ये जळत आहे. ती आपला प्रदेश सोडून पाण्यामध्ये घुसली नाही. पाणी अग्नीचे निमित्त करून स्वयं स्वतःमध्ये गरम झाले आहे. दुसरे उदाहरण घ्या; आपल्या शरीराची सावली फरशीवर पडते तेथे फरशी सावली रूपाने परिणमते की शरीर सावलीरूपाने परिणमते. शरीर शरीराच्या ठिकाणीच आहे. शरीर फर्शीमध्ये घुसले नाही. शरीराला निमित्त करून फरशीच सावलीरूपाने परिणमली आहे. त्याप्रमाणे जीव कर्मरूपाने परिणमत नाही किंवा जीव पुद्‌गलस्कंधाला कर्मरूपाने परिणमवित नाही. पुद्‌गल स्कंधच जीवाच्या अशुद्ध परिणामाला निमित्त करून कर्मरूपाने परिणमते.

येथे भेदविज्ञानाचे प्रकरण आहे. या जीवाचा कोणत्याही अन्य पदार्थाशी कोणताही संबंध नाही. जीवाचा घर, शेतीवाडीशी काहीही संबंध नाही. परिवाराशी काही संबंध नाही. प्रत्येक पदार्थ स्वत: स्वतःमध्ये आहे. स्पर्श–रस–गंध–वर्णमय शरीराशी काहीही संबंध नाही. त्याचप्रमाणे पुदगल कर्माशीही जीवाचा संबंध नाही. कर्म आदी सर्व परद्रव्यांहून भिन्न सहज ज्ञानस्वरूप आत्म्यामध्ये स्वत:चे अस्तित्व जाणावे. सहज ज्ञाता–द्रष्टा राहणे हाच आत्म्याचा अकर्तृत्व स्वभाव आहे. निश्चयनयाने आत्म्याला द्रव्यकर्माचा अकर्ता समजून त्याच्या ज्ञायकभावामध्ये स्थित होऊन निजानंदाचा

आस्वाद घ्यावा.

जीव पुद्‌गलकर्माचा कर्ता नाही हे सिद्ध केले. आता पुढे हे सिद्ध करतात की आत्मा पुद्‌गल द्रव्यात्मक शरीराचा कर्ता सुद्धा नाही–

ते ते कम्मत्तगदा पोग्गलकाया पुणो वि जीवस्स ।
संजायंते देहा देहंतरसंकमं पप्पा ।।१७०।।

अन्वयार्थ – (कम्मत्तगदा) कर्मरूप परिणत **(ते ते)** ते ते **(पोग्गलकाया)** पुद्‌गल पिंड **(देहंतरसंकमं पप्पा)** शरीरान्तर रूप परिवर्तनाला प्राप्त करून **(पुणो वि)** पुन्हा पुन्हा **(जीवस्स)** जीवाचे **(देहा)** शरीर **(संजायन्ते)** बनवतात.

तात्पर्य – शरीरांचा कर्ता सुद्धा पुद्‌गलच आहे. जीव नाही.

शरीरनिर्माणविधी –

प्रथम जीवाच्या परिणामाला निमित्तमात्र करून पुद्‌गल स्कंध स्वयंच कर्मरूप परिणमतात. त्या द्रव्यकर्माला निमित्त करून अन्य पुद्‌गलस्कंध शरीररूप परिणमतात. पुद्‌गलद्रव्यात्मक शरीर बनण्याचे मूल निमित्त कार्माण शरीर आहे. जेव्हा हा जीव एक भव सोडून अन्य भव ग्रहण करण्यासाठी जातो तेव्हा त्याला न पूर्वीचे शरीर राहते. न वर्तमान शरीर असते. केवळ तैजस व कार्माण शरीर असते, यांना सूक्ष्मशरीर म्हणतात. ते स्थूल औदारिक आदी शरीरांचे बीजभूत आहे.

ज्याप्रमाणे कोणी अपराधी एका जेलमध्ये शिक्षा भोगत होता. त्याचा तेथील शिक्षा काळ संपला की त्याला पोलीसांच्या बंदोबस्तामध्ये दुसऱ्या जेलमध्ये हलविण्यात येते. ते पोलिस त्याला दुसऱ्या जेलमध्ये नेऊन सोडतात व तेथे पुन्हा बेड्या अडकवतात. त्या जेलमध्ये तो पुढची शिक्षा भोगतो. त्याप्रमाणे तो अपराधी जीव विवक्षित एका शरीरामध्ये आपल्या अपराधाची शिक्षा भोगतो. त्या शरीराचा काळ संपला की कर्मरूपी पोलीस त्याला त्याच्या अपराधानुसार दुसऱ्या शरीररूपी जेलमध्ये घेऊन जातात. तेथे राहून त्या कर्मरूपी पोलीसांच्या अधीन त्याची व्यवस्था होते. दुसऱ्या भवात गेल्यावर शरीर नामकर्माच्या उदयाने औदारिक किंवा वैक्रियिक शरीराच्या आकाररूप परिणमण्यायोग्य आहार वर्गणा येतात. बंधन, संघात, निर्माण आदि नामकर्माच्या उदयाने त्या वर्गणा शरीराच्या आकाररूपाने स्वयं परिणमतात. संस्थान नामकर्माच्या उदयाने त्याला आकार प्राप्त होतो. संहनन नामकर्माच्या

निमित्ताने त्याचे हाडांचे बंधनविशेष प्राप्त होते. ते नामकर्माच्या सर्व कारागिरांच्या निमित्ताने ही शरीररूपी बिल्डिंग तयार होते.

त्या शरीररूपी बिल्डिंगमध्ये जीव तोपर्यंतच राहू शकतो जोपर्यंत त्या गतिसंबंधी आयुकर्माचा करार पूर्ण होत नाही. आयुकर्माचा करार पूर्ण होताच जीव त्या गतीला व त्या शरीराला सोडून अन्य बांधलेल्या आयूच्या उदयानुसार अन्य भवामध्ये जातो.

गुणभद्राचार्य आत्मानुशासनामध्ये सांगतात की हा शरीररूप कैदखाना जीवाने रचलेला नाही, कर्मांनी रचलेला आहे –

अस्थिस्थूलतुलाकलापघटितं नद्धं शिरास्नायुभि–
श्चर्माच्छादितमस्रसान्द्रपिशितैर्लिप्तं सुगुप्तं खलैः।
कर्मारातिभिरायुरुदघनिगलालग्नं शरीरालयं
कारागारमवैहि ते हतमते प्रीतिं वृथा कृथाः।।

हा शरीररूपी कैदखाना दुष्ट कर्मरूपी शत्रूंनी बनविला आहे. हे शरीररूपी कारागृह हाडांनी बनलेले आहे. नसांच्या जाळ्यांनी वेष्ठित आहे चामड्यांनी झाकलेले आहे. रक्त व मासांनी लिप्त अति गुप्त बनविले गेले आहे. यामध्ये राहणाऱ्या जीवाच्या पायामध्ये आयुकर्माच्या दृढ साखळ्या बांधलेल्या आहेत, हे निर्बुद्ध जीवा, तू या शरीराला कारागृह समज. यावर विनाकरण प्रेम करू नकोस.

जेथे हा जीव आपल्या शरीराचा पण कर्ता नाही. तेथे घर, शेतीवाडी, व्यापारधंदा यांचा कर्ता कसा होऊ शकतो. आत्मा आपल्याच परिणामाचा कर्ता आहे, अन्याचा नाही. ज्याप्रमाणे जीव द्रव्यकर्माचा कर्ता नाही त्याप्रमाणे जीव पुद्गल द्रव्यात्मक शरीराचा देखील कर्ता नाही, पुद्गलपिण्डच शरीराचा कर्ता आहे, म्हणून मी सर्व प्रकारच्या पौद्गलिक शरीराहून भिन्न होऊन कोणत्याही प्रकाराने त्याचा कर्ता–धर्ता नाही असा अनुभव करून आपल्या आत्म्याच्या शुद्ध स्वभावामध्येच उपयुक्त राहणे योग्य आहे.

कोणी म्हणेल शरीराला करण्याचा आणि न करण्याचा काय प्रश्न आहे? जे शरीर आहे तोच आत्मा आहे. त्याला उत्तर देतात की आत्म्यामध्ये शरीरपणाच नाही–

ओरालिओ य देहो देहो वेउव्विओ य तेजयियो।
आहारय कम्मइयो पोग्गलदव्वप्पगा सव्वे।।१७१।।

अन्वयार्थ – (ओरालिओ य देहो) औदारिक शरीर, **(वेउव्विओ य देहो)** वैक्रियिक शरीर, **(तेजयियो)** तैजस शरीर, **(आहारय)** आहारकशरीर, **(कम्मइयो)** कार्माणशरीर **(सव्वे)** सर्व **(पोग्गलदव्वप्पगा)** पुद्गलद्रव्यात्मक आहेत.

तात्पर्य – औदारिकादी सर्व शरीर पुद्गल द्रव्यात्मक आहेत. जीवरूप नाहीत.

शरीरांची पौद्गलिकता –

शरीर पाच प्रकारचे आहेत. औदारिक, वैक्रियिक, आहारक, तैजस व कार्माण पाचही शरीर पुद्गल द्रव्यात्मक आहेत. कारण ते पुद्गल द्रव्यापासून बनले आहेत व त्याचे निमित्त पुद्गलमय द्रव्यकर्म आहे. मनुष्य, तिर्यंचांचे औदारिक शरीर आहे. देव नारकींचे वैक्रियिक शरीर आहे व आहारक ऋद्धिधारी मुनींना सूक्ष्मतत्त्वाची शंका दूर करण्यासाठी आहारक शरीर उत्पन्न होते. ही तीन शरीरे आपापल्या शरीर नामकर्माच्या उदयाने आहारवर्गणा नामक पुद्गल स्कंधांपासून बनतात. तैजसशरीर नामकर्माच्या उदयाने तैजस शरीर बनते व कार्माण शरीर नामकर्माच्या उदयाने कार्माण वर्गणेपासून कार्माण शरीर बनते. या शरीरांचे उपादान व निमित्त कारण पुद्गलच आहे. आत्मा शरीराचे उपादान कारण पण नाही व निमित्तकारण पण नाही. तर शरीर आत्मारूप कसे होऊ शकते ? शरीर भिन्न आहे व आत्मा भिन्न आहे. शरीराच्या प्रति कर्तव्य जो शरीर व आत्म्याला एक मानतो. तो मोही आहे. मूढ आहे. दुरात्मा आहे. कागदाच्या पाकीटाप्रमाणे किंवा शेंगाच्या फोलपटाप्रमाणे निस्सार असणाऱ्या शरीराला जीव आपले सर्वस्व मानून बसला आहे, ही सर्वात मोठी चूक आहे. ज्या शरीरावर अत्यन्त प्रेम करून त्याचे पालनपोषण करतो, मेवा-मिठाई खाऊ घालतो ते शरीर शेवटी इंधनामध्ये जळून जाणार आहे. जे इंधनामध्ये खाक होणार आहे, ज्याचे काही निशान राहणार नाही अशा शरीरावर तू का प्रीती करतोस ? चेतन शरीराला मरताना म्हणतो, हे काया, मी तुझ्या पालन पोषणासाठी न्याय-अन्यायाला मोजले नाही, भक्ष्य-अभक्ष्य पाहिले नाही. रात्रंदिवस खाण्यापिण्याचा विवेक ठेवला नाही. तुझा शृंगार वाढविण्यासाठी माझे सर्व वैभव पणाला लावले. तुझ्यावर खूप प्रेम केले. आता मी चाललो आहे तर तू माझ्यासोबत चल. तेव्हा काय उत्तर देते, 'तू बावळट आहेस. मी तीर्थंकर चक्रवर्तीसारख्या महापुरुषांसोबत गेले नाही तर तुझ्याबरोबर कशी जाईन ? लाख उपाय केले तरी मी तुझ्याबरोबर जाऊ शकत नाही.

हे शरीर प्रेम करण्यालायक नाही. शरीरावर प्रेम करणारे शरीराला कष्ट देऊ इच्छित नाहीत. ऐश आरामामध्ये, छान मोठ्या गादीवर शरीराला झोपवतात व त्या ऐश आरामामध्ये स्वत:ला मोठे पुण्यशाली समजतात. हे शरीर आराम देण्यासाठी नाही. हे तर एक बेईमान नोकर आहे, यावर जेवढे प्रेम कराल, तेवढे आत्म्याला सतावण्यामध्ये निमित्त बनते. शरीराला जेवढे परोपकारामध्ये, धर्मकार्यामध्ये व तपस्येमध्ये लावू तेवढे हे ताब्यात येईल.

जीव शरीरामध्ये इतका आळशी झाला आहे की शरीराला थोडे ही कष्ट देऊ इच्छित नाही. दोन तीन आळशी माणसे कोठेतरी चालली होती. तिघेजण चालता चालता थकल्यामुळे वाटेत एका जांभळाच्या झाडाखाली झोपलो. झोपून उठले तरी आळशासारखे झोपून राहतात. त्यातील एका व्यक्तीजवळ एक जांभूळ पडले तेव्हा तो म्हणतो, 'जर मला कोणी उचलून दिले तर मी खाईन.' दुसऱ्या व्यक्तीच्या छातीवर जांभूळ पडले तर तो म्हणतो, 'भैय्या कोणी माझ्या तोंडात सरकवेल तर मी खाईन.' तिसऱ्या व्यक्तीच्या ओठावर जांभूळ पडले तर तो विचार करतो, 'कोणी माझे ओठ उघडतील तर मी खाईन.' असे आळशी लोक शरीरापासून भिन्नत्वाची भावना कशी करतील. तन, मन, धन आणि वचन विनाशिक आहेत. यांना परोपकारामध्ये लावले तर मनुष्यजीवनाची सफलता आहे.

जे शरीर आपल्याला साथ देत नाही. त्याच्या मागे न लागलेले बरे. आताच त्यापासून भिन्नत्वाची भावना करावी की ज्यामुळे शरीराचा संबंध तुटून पुन्हा नवीन शरीर धारण करावे लागणार नाही. शरीरापासून भेदभावनाच शरीराचा संबंध संपण्याचे कारण आहे. म्हणून निरन्तर शरीराहून भिन्न सहजानन्दमय आत्मस्वरूपाची भावना करावी.

मागील १०-१२ गाथांमध्ये शरीर-वचन- मनापासून जीव भिन्न आहे हे स्पष्ट केले. जीव शरीरादीकांचा कर्ता नाही, कारयिता नाही. अनुमोदक नाही. जर जीव शरीरादी सर्व पदार्थांपासून भिन्न आहे तर त्यापासून वेगळे करणारे जीवाचे स्वतःचे असाधरण लक्षण काय आहे ? असे विचारले असता आचार्य पुढील गाथासूत्र सांगतात. -

अरसमरूवमगंधं अव्वत्तं चेदणागुणमसद्दं ।
जाण अलिंगग्गहणं जीवमणिद्दिट्ठसंठाणं ।।१७२।।

अन्वयार्थ - (जीवं) जीवाला **(अरसं)** रसरहित, **(अरूवं)** रूपरहित, **(अगंधं)** गंधरहित, **(अव्वत्तं)** अव्यक्त, **(चेदनागुणं)** चेतनागुणमय, **(असद्दं)**

शब्दरहित, **(अलिंग्गहणं)** लिंगाद्वारे ग्रहण न होण्यायोग्य, **(अणिद्दिट्ठसंठाणं)** व ज्याचा कोणताही आकार सांगितलेला नाही असे **(जाण)** तू जाण.

तात्पर्य – जीव स्पर्शरसगंधवर्णरहित अमूर्त चैतन्यस्वभावमय आहे.

अभाव हा जीवाचा स्वभाव –

अरसस्वरूप –

आत्मा अरस आहे. कारण रसगुणाचा अभाव हा आत्म्याचा स्वभाव आहे. ज्याप्रमाणे अस्तित्व वस्तूचा स्वभाव आहे त्याप्रमाणे नास्तित्व हा सुद्धा वस्तूचा स्वभाव आहे. जर वस्तूचा अभाव स्वभाव नसता तर वस्तू सर्वरूप झाली असती. जो गुण वस्तूमध्ये नाही त्या गुणाचा अभाव हा वस्तूचा स्वभाव जाणावा. जीव स्वयं गोड, आंबट, तिखट इत्यादी रसरूप नाही. कारण जीव पुद्गलद्रव्य रूप नाही. रस हा पुद्गलाचा गुण आहे. जीवाचा नाही. शरीरामध्ये रस आहे. आत्मा रसनेन्द्रियाद्वारे चाखला जाऊ शकत नाही. आत्मा भावेन्द्रियरूप रसनेन्द्रियाद्वारे पण जाणला जाऊ शकत नाही म्हणून जीव अरस आहे.

अरूपस्वरूप –

आत्मा अरूप आहे. कारण रूपगुणाचा अभाव जीवाचा स्वभाव आहे. काळे-पांढरे जे रूप दिसते ते जीवाचे नाही. हे शरीराचे रूप आहे. रूप गुणाचा अभाव असल्यामुळे आत्मा डोळ्याने दिसत नाही. जे दिसते ते सर्व पुद्गल आहे. आरशामध्ये जो चेहरा दिसतो तो पुद्गलमय आहे. हा चेहरा जीवाचा नाही. अज्ञानी जीव बाहेरच्या रंगरूपाला स्वतःचे मानून मी गोरा, मी सुंदर, मी रूपवान आहे, असे गर्व करतो. ज्या रूपाचा गर्व करतो ते रूप तर अग्नीमध्ये जळून नष्ट होते. तरूणपणी सुंदर दिसणारा चेहरा म्हातारपणी कुरूप दिसतो. ज्ञानी जाणतो की मी सुरूप पण नाही व मी कुरूप पण नाही, मी चैतन्यरूप आहे.

अगंधस्वरूप –

आत्मा अगंध आहे. कारण गंधगुणाचा अभाव हा जीवाचा स्वभाव आहे. सुगंध, दुर्गंध हा पुद्गलाचा गुण आहे. जीवाचा नाही. शरीराच्या नवद्वारातून सतत मल वाहत असतो त्यामुळे त्याचा दुर्गंध शरीरामध्ये येतो. जीवाचे अमूर्तिक प्रदेश त्या गंधगुणाला स्पर्शदेखील करीत नाहीत. आत्मा नाकाच्याद्वारे जाणला जात नाही. अत्तर इत्यादी सुगंधद्रव्याद्वारे शरीरालाच

सुगंधित केले जाते. आत्मा सुगंधरूप होत नाही.

अस्पर्शस्वरूप –

आत्मा अस्पर्शरूप आहे. कारण स्पर्शगुणाचा अभाव हा जीवाचा स्वभाव आहे. स्निग्ध, रूक्ष, थंड, गरम हे स्पर्श जीवामध्ये नाहीत. शरीर पुद्‌गलमय आहे म्हणून शरीरामध्ये थंड, गरम स्पर्श जाणवतो. शरीरच स्निग्ध किंवा रूक्षरूपाने परिणमते. स्पर्शनेन्द्रियाने जीवाला स्पर्श करू शकत नाही. स्पर्शनेन्द्रियाने ज्याचा स्पर्श होतो ते पुद्‌गलद्रव्य होय.

महापुराणाचे कर्ता जिनसेन आचार्य ५-६ वर्षाचे होते त्यावेळची घटना आहे. ते इतर बाल-सवंगड्यांबरोबर पाठशिवणीचा खेळ खेळत होते. ते सर्व मित्रांना म्हणतात, 'तुम्ही मला शिवा.' सर्व मुले त्यांना जाऊन पकडतात. तरीपण जिनसेन बालक म्हणतो, 'तुम्ही मला शिवा'. सर्व मुले म्हणतात, 'आम्ही तुम्हालाच तर पकडले आहे. आणखीन कसे तुम्ही म्हणता की मला शिवा.' तेव्हा जिनसेन बालक म्हणतो, 'तुम्ही तर मला शिवूच शकत नाही. तुम्ही ज्याला शिवले आहे तो मी नाही. तुम्ही माझ्या शरीराला शिवले आहे. मी जीव आहे. जीवाला स्पर्श नाही तर त्याला कसे स्पर्श करू शकणार'. हा खेळ रस्त्यावरून जाणारे आचार्य पाहत होते. त्यांना त्या बालकाची बुद्धी, चाणाक्षता लक्षात आली. त्यांनी मातेजवळ जाऊन त्या जिनसेनाची मागणी केली. त्याचवेळी ते आचार्यांबरोबर निघून गेले व अकराव्या वर्षी त्यांनी नग्न दिगम्बर दीक्षा घेतली. त्यानां आजन्म नग्न म्हणतात. कारण त्यांनी लहानपणापासून कधी कपडे घातलेच नव्हते. म्हणून त्यांचा 'आगर्भनग्न' अशा विशेषणाने उल्लेख करतात. त्यांच्या मातेने त्यांच्यावर हे अध्यात्माचे संस्कार केले होते. पाळण्यात असल्यापासून 'तू शुद्ध आहेस, तू बुद्ध आहेस. तू स्पर्शरसगंधवर्णरहित आहेस.' अशा ओवी ती माता म्हणत असे.

अव्यक्तस्वरूप –

आत्मा अव्यक्त आहे. आत्म्यामध्ये स्पर्श गुणाच्या पर्यायांचा अभाव स्वभाव आहे. स्पर्शगुणामुळे पुद्‌गलाच्या अवस्था व्यक्त होतात. वारा इतर कोणत्याही इन्द्रियाने लक्षात येत नसला तरी स्पर्श गुणामुळे व्यक्त होतो. जरी वारा डोळ्याने दिसत नसला तरी शरीराला थंड स्पर्श होतो त्यावरून तो व्यक्त होतो. आंधळा व्यक्ती डोळ्याने पाहू शकत नसला तरी स्पर्शावरून वस्तू

ओळखतो. ज्याप्रमाणे शरीर व्यक्त आहे, रागद्वेष व्यक्त आहेत. वर्तमान द्रव्यपर्याय व्यक्त आहे तसा आत्मा व्यक्त नाही म्हणून अव्यक्त आहे. परंतु अव्यक्त आहे म्हणून आत्म्याचा अभाव नाही. तो इन्द्रियसाधनाने व्यक्त नाही, पण अतीन्द्रिय स्वसंवेदन ज्ञानाने प्रत्यक्ष आहे, व्यक्त आहे. समाधिशतक ग्रंथामध्ये आचार्य पूज्यपाद म्हणतात –

स्वसंवेदनसुव्यक्तस्तनुमात्रो निरत्ययः ।
अत्यन्तसौख्यवान् आत्मा लोकालोकविलोकनः।।२१।।

शरीरप्रमाण, अविनाशी, लोक व अलोकाला जाणणारा, अत्यन्त सौख्यवान् आत्मा स्वसंवेदनाच्या द्वारे सुव्यक्त आहे.

समयसार कलशामध्ये अमृतचन्द्र आचार्य म्हणतात –

अनाद्यनन्तमचलं स्वसंवेद्यमिदं स्फुटं ।
जीवः स्वयं तु चैतन्यमुच्चैश्चकचकायते ।।

जीव अनादि, अनन्त, अचल, चैतन्य स्वरूपाने चकचकायमान आहे, अत्यंत स्पष्ट स्वसंवेद्य आहे.

येथे आत्म्याचे अव्यक्त हे विशेषण आत्मा जाणीवेत येत नाही असे सूचवत नाही तर आत्मा सूक्ष्म आहे. बाहेरच्या स्थूल पदार्थासमान तो इन्द्रियांचा विषय नाही. त्याला जाणण्यासाठी आपला उपयोग अत्यंत सूक्ष्म करण्याची आवश्यकता आहे हे सूचविते.

अशब्दस्वरूप –

आत्मा अशब्द आहे. कारण शब्दपर्यायाचा अभाव हा आत्म्याचा स्वभाव आहे. शब्द हा पुद्गलद्रव्याच्या भाषावर्गणांचा पर्याय आहे. आत्मा स्वयं शब्द स्वरूप नाही. शब्दपर्यायाचा कर्ता देखील नाही. शब्द अचेतन आहे. परंतु अचेतन शब्दाला निमित्त करून हा अज्ञानी जीव किती रागद्वेषरूप विकल्प करतो. मी जर जीव आहे तर मी शब्दरूप होत नाही किंवा शब्द माझ्यारूप परिणमत नाही तर शब्द ऐकून मी का विकल्प करू ? असा विचार ज्ञानी करतो.

अलिंगग्रहणस्वरूप –

आत्मा अलिंगग्रहण आहे. कारण स्पर्शरस-गंधवर्णाचा व शब्दपर्यायाचा अभाव असल्यामुळे तो इंद्रियांच्याद्वारे ग्रहण होऊ शकत नाही.

या अलिंगग्रहणाचे अमृतचंद्र आचार्यांनी वीस अर्थ केले आहेत. त्याचा खुलासा पुढे करू. आता संक्षेपात एवढा अर्थ ग्रहण करावा. आत्मा कोणत्या बाह्य चिन्हाच्याद्वारे जाणला जाऊ शकत नाही किंवा कोणत्याही इंद्रियांच्या द्वारे ग्रहण केला जाऊ शकत नाही.

असंस्थानस्वरूप –

आत्मा असंस्थानस्वरूप आहे. कारण सर्व संस्थानांचा अभाव हाच आत्म्याचा स्वभाव आहे. संस्थान म्हणजे आकार. गोल, चौकोन, त्रिकोण हा पुद्गलाचा आकार आहे. आत्मा हा कोणत्याही आकाररूप नाही. आत्मा संसार अवस्थेत शरीरामध्ये राहतो म्हणून जो शरीराचा आकार आहे तोच आत्म्याचा आकार व्यवहाराने म्हटला जातो. पण तो वास्तविक आत्म्याचा आकार नाही. शरीर हा साचा आहे. साच्यामध्ये धातूचा रस ओतल्यानंतर त्या धातूचा तसा आकार प्रगट होतो त्याप्रमाणे हा आत्मा शरीरामध्ये प्रवेश करतो म्हणून त्या आकारात राहतो. परंतु त्याही अवस्थेत तो शरीरापासून भिन्न आहे. म्हणून निराकार आहे. शरीर बदलत असल्यामुळे आत्म्याचा आकार सारखा बदलत राहतो. मग आत्म्याचा निश्चित आकार विचारला तर कोणता आकार सांगता येतो ? त्याचा कोणताही आकार सांगता येत नाही म्हणून त्याला अनिर्दिष्टसंस्थान म्हणतात.

असाधारणगुण चेतना –

आतापर्यंत सांगितलेल्या विशेषणांवरून आत्म्याला पुद्गल द्रव्यापासून भिन्न जाणता येते. जीव पुद्गलापासून वेगळा होतो. अमूर्तिक सिद्ध होतो. पण अमूर्तिक द्रव्ये तर पाच आहेत. धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्याला ही वरील विशेषणे लागू होतात तर मग जीवाला धर्मादी द्रव्यांपासून भिन्न जाणण्याचे साधन काय आहे ? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठीच आचार्यांनी सर्व परद्रव्यापासून जीवाला वेगळे करण्याचे एक असाधारण लक्षण सांगितले आहे ते म्हणजे 'चेतनागुणत्व' चेतना गुण केवळ आत्म्यामध्येच आहे. अन्य कोणत्याही द्रव्यामध्ये हे लक्षण सापडत नाही. म्हणून चेतनागुणपणा हा आत्म्याचा असाधारण गुण आहे. जे गुण दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीमध्ये आढळत नाहीत. एखाद्या विशिष्ट व्यक्तीमध्येच आढळतात तेव्हा आपण त्या व्यक्तीचे वर्णन करताना म्हणतो याचे असाधारण व्यक्तिमत्त्व आहे. असाधारण

या शब्दाचा हाच अर्थ येथे अभिप्रेत आहे. चेतना हा गुण अन्य कोणत्याही द्रव्यामध्ये आढळत नसून केवळ जीवद्रव्यामध्येच आढळतो म्हणून तो आत्म्याचा असाधारण गुण म्हणतात. म्हणून कुन्दकुन्दाचार्य आत्म्याला इतराहून वेगळे ओळखण्यासाठी त्याचे असे विशेषण देतात '**णाणसहावाधियं**' '**उवओगगुणाधिगं**'. ज्याचा ज्ञान हा स्वभाव अधिक आहे, जो उपयोग गुणाने अधिक आहे. उपयोग म्हणा, ज्ञान म्हणा अथवा चेतना म्हणा हे आत्म्याचे लक्षण आहे. याला विशेष गुणही म्हणतात. '**विशिष्यन्ते पृथक्क्रियन्ते द्रव्यं द्रव्यान्तरात् स विशेषगुणः**' जो गुण मिसळलेल्या द्रव्यामधून एका द्रव्याला दुसऱ्या द्रव्यांपासून वेगळे करतो तो विशेष गुण होय. या विशेष गुणाच्या द्वारेच पृथक्करणाची क्रिया होऊ शकते. अनेक धान्य एकत्र मिसळले आहेत तेव्हा आपण त्यांना वेगवेगळे कसे करतो? त्याच्या विशेषगुणावरूनच वेगळे करतो. गव्हाचा वर्ण आकार भिन्न आहे, ज्वारीचा वर्ण, आकार भिन्न आहे, तांदुळाचा वर्ण, आकार भिन्न आहे. त्या त्या वर्ण आकाररूप त्याच्या गुणांनी त्या त्या द्रव्यांना वेगळे करतो.

या विश्वामध्ये जाती अपेक्षेने सहा द्रव्ये आहेत. त्या द्रव्यांचे मिश्रण झाले आहे. त्यामधून आपल्या जीवाला आपल्याला वेगळे करायचे आहे तर आपण कसे वेगळे करू शकणार ? कोणालाही सांगितले तू आपल्या जीवाला जाण. तर लगेच प्रश्न होतो 'आम्ही जीवाला कसे जाणणार ? आम्हाला जीव दिसत नाही.' अहो, जीवाला जाणणे एकदम सोपे आहे. त्याचा हा चेतनागुण आहे व तो सर्व आबालगोपालांना प्रत्यक्ष अनुभवात येतो. ज्या दिव्याच्या प्रकाशात आम्ही सर्व वस्तूंना पाहत आहोत. काय त्या दिव्याला पाहण्यासाठी दुसरा दिवा पाहिजे ? जो हा प्रकाशमय आहे तोच तर दिवा आहे. ज्या चेतना अर्थात ज्ञानगुणाने अन्य सर्व वस्तूंना जाणतो त्या ज्ञान गुणाला जाणण्यासाठी दुसऱ्या ज्ञानाची आवश्यकता नाही आणि हा जो स्वपर प्रकाशक ज्ञानगुणमय आहे तोच तर जीव आहे. आम्ही अंतरंगामध्ये सतत चैतन्याचा अनुभव करतो. मी आहे याची जाणीव प्रत्येक क्षणी आपल्याला येते. परंतु हा अनुभवात्मक चैतन्यपदार्थ मी आहे याचे भावभासन हा जीव करीत नाही हेच याचे अज्ञान आहे. जेव्हा हा जीव या चेतनागुणमय स्वतःला जाणतो तेव्हाच तो ज्ञानी म्हटला जातो. जो अनुभव करतो, जाणतो तो मी आहे. चेतनेच्या द्वारे

चेतनेचा स्पर्श होतो हेच स्वसंवेदन ज्ञान आहे. चेतना अनुभवशील असूनही मी चैतन्यस्वरूप आहे याचे वेदन न करता मी मनुष्य आहे, स्त्री आहे, पुरुष आहे, मी धनिक आहे, मी जडवैभवाचा स्वामी आहे असे पराचे वेदन मानतो हेच अज्ञान आहे.

आता सर्व विकल्प सोडून 'एक आपल्या चैतन्य स्वरूपाने अनुभव करावा.' हेच या भवामध्ये करण्यायोग कार्य आहे. आजपर्यंत अन्य सर्वरूपाने स्वतःचा अनुभव केला पण चैतन्यरूपाने स्वतःचा कधी अनुभव केला नाही म्हणून हेच या जन्मातले अपूर्व कार्य/कर्तव्य समजावे.

चैतन्यस्वरूपोऽहं, ज्ञानानन्दस्वरूपोऽहं, उपयोगस्वरूपोऽहं याची धुन अंतरंगामध्ये लागून आतली मोहग्रंथी नष्ट होऊ देत. अज्ञान अंधाराचा नाश होऊन ज्ञानदीपाचा प्रकाश अंतरंगामध्ये उजळून जावू द्या हाच दीपावलीचा शुभसंदेश ग्रहण करावा.

एकमात्र निज आत्मा दाखविणे , हेच संपूर्ण जिनवाणीचे प्रयोजन आहे. आपण जेव्हा कुणाच्या तरी घराचा पत्ता विचारतो तेव्हा त्या निश्चित घरापर्यंत पोहचविण्यासाठी त्या गावाचे, गल्लीचे, आजूबाजूच्या प्रसिद्ध ठिकाणांचे वर्णन सांगितले जाते. जसे अमुक बँकेच्या शेजारी आहे, अमुक दुकानच्या पाठीमागे आहे. पोस्ट ऑफीसच्या समोर आहे इत्यादी. जेव्हा आपण ते घर शोधण्यासाठी जातो तेव्हा ज्या ज्या स्थानांचे वर्णन ऐकले, त्या स्थानांना जाणत जातो, परंतु तेथे प्रवेश करीत नाही. त्या सर्व स्थानांना सोडत जातो व निश्चित स्थान आले की तेथे प्रवेश करतो. त्याप्रमाणे निज आत्म्याला दाखविण्यासाठी जिनवाणीमध्ये संपूर्ण विश्वाचे वर्णन केले आहे. कारण आत्मा या विश्वामध्ये आहे व या आत्म्याच्या शेजारी आजूबाजूला पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्य आहेत. त्या निज आत्म्याची ओळख करून देण्यासाठी याच पाच द्रव्यांचे विस्ताराने पण वर्णन केले आहे. म्हणून भव्य जीवांनी त्या पाच द्रव्यांना जाणून त्यापासून आपला उपयोग हटवून निज आत्म्याला शोधण्याचा प्रयत्न केला तर तेथे प्रवेश करणे शक्य होईल. जर शेजाऱ्या-पाजाऱ्यांना जाणण्यातच रमून गेलो तर स्वस्थान प्राप्त होणार नाही.

आत्मा देहरूप नाही, वचनरूप नाही तर मग त्याचे असाधारण स्वरूप काय आहे असा प्रश्न झाला असता या १७२ नंबर गाथेमध्ये आत्म्याचे स्वरूप आठ विशेषणांच्या माध्यमातून सांगितले आहे. कारण विशेषणाच्या द्वारे

विशेष्याची प्रसिद्धी होते. त्यापैकी अरस, अरूप, अगंध, अव्यक्त, अशब्द, अलिंगग्रहण व अनिर्दिष्ट संस्थान ही विशेषणे पुद्गल द्रव्यापासून भिन्न करण्यासाठी दिली आहेत. कारण इंद्रियाने दिसणाऱ्या पुद्गलांमध्ये या जीवाची आत्मीयबुद्धी अधिक आहे. त्या बुद्धीला दूर करण्यासाठीच त्या पुद्गल गुणांनी रहित अशा जीवाची विशेषणे सांगितली आहेत.

अन्य अमूर्तिक व मूर्तिक पाचही अचेतन द्रव्यापासून जीवाला भिन्न करण्यासाठी चेतनागुणस्वरूप हे एक विशेषण दिले आहे. कारण चेतनागुण स्वयं अनुभवात येतो. आत्म्याच्या चेतनगुणाद्वारे अनुभव करणे सहज शक्य आहे. आत्मा चेतनगुणरूपानेच अनुभवात येतो. स्वयं अनुभवात येणाऱ्या चेतनागुणाने आत्मा सदा अंतरंगामध्ये प्रकाशमान आहे; म्हणून जीव चेतनागुणरूप आहे. चेतनागुण सर्व विवादांना दूर करणारा आहे. अनेक मतवादी लोक जीवाला अन्य प्रकाराने मानून विवाद करतात. कोणी चार महाभूतापासून जीवाची उत्पत्ती मानतात. तर कोणी जीवाला शरीररूप मानतात, तर कोणी जीवाला रागद्वेष- मोहादी अध्यवसाय भावांनाच जीव म्हणतात. तर कोणी कर्माच्या उदयालाच जीव मानतात. त्या सर्वांचे भांडण मिटवणारा हा चेतनागुण आहे. कारण स्वयं संवेद्यमान आहे. ज्याप्रमाणे प्रकाश स्वत:ला प्रकाशित करतो. प्रकाशाचे स्वरूप प्रकट करण्यासाठी दुसऱ्या प्रकाशाची गरज नाही. बाहेरच्या वस्तूला कोण जाणत आहे ? विवाद करणारा पण कोण आहे? अचेतन वस्तू तर स्वत:लाही जाणू शकत नाही व दुसऱ्याला ही जाणू शकत नाही. अन्य वस्तू जाणल्या जात आहेत यावरूनच सिद्ध होते की येथे चेतना गुण आहे. बाह्य वस्तू ज्ञानामध्ये ज्ञेय होतात. त्या जीवाला दाखवून देतात की तू ज्ञानरूप आहेस म्हणून आम्ही तुझ्यामध्ये झळकलो. आरशामध्ये प्रतिबिंबित झालेले पदार्थ स्वयं आरशाची सिद्धी करीत आहेत. आरसा नसता तर कसे झळकले असते ?

चेतनागुणाचे पोट एवढे मोठे आहे की सर्व लोक व अलोकाला ते गिळंकृत करते. सर्व पदार्थ या चेतनेचे ग्राह्य आहेत. सर्वांना गिळंकृत केल्यामुळे अत्यन्त तृप्त होऊन चेतना उपशान्त झाली आहे. त्यामुळे आपल्या स्वरूपापासून कधीही चलायमान नाही म्हणून अचल आहे. या चेतनागुणाने आपले सर्वस्व भेदज्ञानी जीवांना समर्पित केले आहे. अर्थात् भेदज्ञानी जीव सदा चेतनेचा चैतन्यरूपाने अनुभव करतात. चेतनेलाच आपले सर्वस्व मानतात.

'**अरसमरूवमगंध**' ही गाथा कुन्दकुन्द आचार्यांच्या पाचही

परमागमामध्ये समाविष्ट आहे. मूलाचारादी अन्य ग्रन्थांमध्ये व धवला टीकेमध्ये सुद्धा उद्धृत आहे. यावरून ही गाथा पूर्वचार्यांच्या परंपरेने मौखिक रूपात चालत आली असावी असे अनुमान आहे. पंचास्तिकाय ग्रंथात गा. नं. १२७, प्रवचनसारमध्ये गा. नं. १७२, समयसारमध्ये गा. नं. ४९, नियमसार गा. नं. ४७, अष्टपाहुड (भावपाहुड) गा. नं. ६४, मूलाचारमध्ये पण ही गाथा उपलब्ध आहे. या गाथेच्या प्रत्येक टीकेमध्ये वेगवेगळ्या विशेषणांवर विशेष प्रकाश टाकला आहे. पंचास्तिकाय ग्रंथ प्राथमिक शिष्यांसाठी असल्यामुळे या गाथेचा सामान्य अर्थ केला. प्रवचनसार ग्रंथ माध्यमिक शिष्यांसाठी असल्यामुळे याचा थोडा अधिक विस्तार केला आहे. उपयुक्त विशेषणांपैकी अलिंगग्रहण विशेषणाचा येथे खुलासा केला आहे. समयसार ग्रंथाच्या आत्मख्याती टीकेमध्ये अरस, अरूप, अगंध, अस्पर्श (हे विशेषण अधिक घेतले आहे.) अव्यक्त, अशब्द, अनिर्दिष्ट संस्थान या विशेषणांचे ६-६ अर्थ केले आहेत व अध्यात्मिक ग्रंथ असल्यामुळे अमृतचन्द्र आचार्य अध्यात्म्याच्या खोलीमध्ये उतरले आहेत.

प्रस्तुत प्रवचनसारच्या तत्त्वप्रदीपिका नामक टीकेमध्ये अलिंगग्रहण शब्दाचे २० अर्थ केले आहेत. त्याचाच खुलासा आता आपण पाहणार आहोत. वास्तविक आत्मा कोणत्याही लिंगाच्याद्वारे अर्थात चिन्हाच्याद्वारे ग्रहण करण्यायोग्य नाही; म्हणून अलिंगग्राह्य असे विशेषण ठेवायला पाहिजे होते, पण आचार्यांनी गाथेमध्ये अलिंगग्रहण असे विशेषण ठेवले आहे. यावरून आचार्यांना अनेक अर्थांचे ज्ञान करून द्यायचे होते हे लक्षात येते. त्यातील प्रथम अर्थ याप्रमाणे...

१) पहिला बोल - न लिंगैरिन्द्रियैर्ग्राहकतामापन्नस्य ग्रहणं यस्येत्य-तीन्द्रियज्ञानमयत्वस्य (प्रतिपत्ति:)।

अ = नाही, लिंग = इन्द्रिये, ग्रहण = जाणणे अर्थात आत्मा इंद्रियाने जाणत नाही.

ग्राहकपणाला प्राप्त झालेल्या ज्याचे लिंगाच्या द्वारे अर्थात इन्द्रियांच्या द्वारे ग्रहण अर्थात जाणणे होत नाही तो अलिंगग्रहण आहे. याप्रमाणे आत्मा अतीन्द्रिय ज्ञानमय आहे, या अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा इन्द्रियाने जाणत नाही. -

आत्मा ज्ञानस्वभावी आहे, जाणणे हा आत्म्याचा स्वत:सिद्ध स्वभाव आहे. त्याला अन्य साधनांची गरज नाही कारण ज्ञान हेच वास्तविक जाणण्याचे

साधन आहे.

शंका – व्यवहारात तर डोळ्याने वर्णाचे ज्ञान होते, रसनेन्द्रियाने रसाचे ज्ञान होते. नाकाने गंधाचे, कानाने शब्दाचे व स्पर्शनेंद्रियाने स्पर्शाचे ज्ञान होते असे दिसते तर मग इन्द्रियांने ग्रहण होत नाही असे म्हणणे कसे घटित होते ?

समाधान – अल्पज्ञ अवस्थेमध्ये साधनभूत ज्ञानावर आवरण आहे. त्यामुळे आत्मा सर्व प्रदेशांतून जाणू शकत नाही. विशिष्ट प्रदेशांतूनच ते कार्य प्रगट होते. पण त्याही अवस्थेत इन्द्रियाने जाणत नाही. ज्ञानानेच जाणतो. ज्याप्रमाणे बेडीने बद्ध असलेला पुरुष कारागृहात अडकला आहे. त्याला बाहेर जाता येत नाही. एका खोलीत कोंडलेले आहे. त्या खोलीला खिडक्या आहेत. त्याला बाहेर पाहायचे असेल तर तो खिडकीतून पाहतो. त्याप्रमाणे हा आत्मा कर्माने बद्ध आहे. हा कर्मबद्ध जीव शरीररूपी कारागृहात अडकला आहे. या शरीराला इन्द्रियरूपी खिडक्या आहेत. जेव्हा त्याला पर पदार्थाला पाहण्याची इच्छा होते तेव्हा तो इन्द्रियरूपी खिडकीतून पाहतो. ज्याप्रमाणे खिडकीतून पुरुषच पाहतो, खिडकी पाहत नाहीत.

परंतु संसार अवस्थेमध्ये इन्द्रिये बाह्य साधन बनले म्हणून व्यवहाराने इन्द्रियाने जाणले असे म्हटले जाते. निश्चयाने इन्द्रिये जड पुद्‌गलमय आहेत. त्यामुळे इन्द्रिये जाणत नाहीत. जो स्वयं ज्ञानमय आहे तोच पराला पण जाणू शकतो. इन्द्रिये स्वयं स्वत:ला जाणू शकत नाहीत, ती पराला कशी काय जाणू शकतील? खिडकी स्वत:ला पाहू शकत नाही ती दुसऱ्याला कशी पाहू शकेल? म्हणून मी डोळ्याने पाहिले. नाकाने वास घेतला इत्यादी म्हणणे व्यवहाराचे मतं आहे. त्याला व्यवहार न मानता निश्चय मानला तर ते मिथ्याज्ञान आहे.

प्रेताला पण डोळे आहेत. कान आहेत. नाक आहे, जीभ आहे. मग ते प्रेत का पाहत नाही ? का ऐकत नाही ? वास का घेत नाही ? चव का घेत नाही? या प्रश्नांचे उत्तर आहे त्या शरीरामध्ये असणारा आत्मा निघून गेला आहे. त्यामुळे त्याला दिसत नाही. ऐकू येत नाही, वास येत नाही. यावरून हे सिद्ध झाले की, त्या शरीरात जो आत्मा होता तोच जाणण्याचे काम करीत होता. इन्द्रिये जाणत नव्हती.

केवलज्ञान झाल्यावर आत्मा ज्ञानाने जाणतो व संसारात इन्द्रियाने जाणतो असे नाही तर तिन्ही काळामध्ये आत्मा अतीन्द्रिय ज्ञानस्वभावी आहे. पूर्वीही ज्ञानानेच जाणत होता. आताही ज्ञानानेच जाणतो व भविष्यकाळातही

ज्ञानानेच जाणेल. त्या अतीन्द्रिय ज्ञानस्वभावाला न जाणल्यामुळे अज्ञानी इन्द्रियांवर प्रीती करतो. इन्द्रिये नष्ट झाली तर माझाच नाश होईल असे त्याला वाटते. म्हणून सतत इन्द्रियांची काळजी करतो. त्याला वाटते इन्द्रिये नसतील तर मी जाणूच शकणार नाही. ज्ञानी जाणतो की मी अलिंगग्रहण स्वभावी आहे. इन्द्रियाने जाणणे माझा स्वभाव नाही. इन्द्रियांना आपल्यापासून भिन्न जाणून अतीन्द्रिय ज्ञान स्वभावाचे वेदन करतो.

२) दुसरा बोल – न लिंगैरिन्द्रियैर्ग्राह्यतामापन्नस्य ग्रहणं यस्येत्यतीन्द्रिय प्रत्यक्षाविषयत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = इन्द्रियाद्वारे, ग्रहण = जाणणे (ग्राह्य) अर्थात आत्मा इन्द्रियप्रत्यक्षाचा विषय नाही.

ग्राह्यपणाला प्राप्त झालेल्या ज्याचे लिंगाद्वारे अर्थात इंद्रियाद्वारे ग्रहण (जाणणे) होत नाही. तो अलिंगग्रहण आहे. याप्रमाणे आत्मा इन्द्रिय प्रत्यक्षाचा विषय नाही या अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा इन्द्रियाचा विषय नाही.–

आत्मा इन्द्रियाने जाणला जात नाही. कारण आत्मा अमूर्तिक आहे. स्पर्श, रस, गंध, वर्ण रहित आहे. आत्मा डोळ्याने दिसत नाही, कानाने ऐकू येत नाही. आत्मा रसनेन्द्रियाने चाखला जाऊ शकत नाही. नाकाने त्याचा वास येत नाही. स्पर्शनेन्द्रियाने त्याचा स्पर्श होऊ शकत नाही. तर मग आत्मा जाणला जाऊ शकत नाही का ? असे नाही. आत्मा एक द्रव्य आहे. त्यामध्ये प्रमेयत्व नावाचा गुण आहे. त्यामुळे तो कोणत्या ना कोणत्या ज्ञानाचा विषय होतो. आत्मा अतीन्द्रिय आहे त्यामुळे तो इन्द्रियांचा विषय नाही. परंतु स्वानुभव प्रत्यक्षरूप मतिज्ञान–श्रुतज्ञानाचा विषय आहे.

पहिल्या बोलमध्ये सांगितले की आत्मा इन्द्रियाने जाणत नाही व दुसऱ्या बोलमध्ये सांगितले की आत्मा इन्द्रियाने जाणला जात नाही. अर्थात् आत्मा डोळ्याने दुसऱ्यांना पाहत नाही व आत्मा स्वतः डोळ्याने दिसत नाही.

३) तिसरा बोल – न लिंगादिन्द्रियगम्याद् धूमादग्नेरिव ग्रहणं यस्येत्यतीन्द्रियप्रत्यक्षपूर्वकानुमानाविषयत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = इन्द्रियगम्य लिंग, ग्रहण = जाणणे (ज्याला) अर्थात आत्मा इन्द्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही.

ज्याप्रमाणे धुरावरून अग्नीचे ग्रहण होते. त्याप्रमाणे इन्द्रियगम्य लिंगाद्वारे

ज्याचे ग्रहण होत नाही तो अलिंगग्रहण होय. यावरून 'आत्मा इन्द्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही.' या अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा इन्द्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाने जाणला जात नाही. –

जेथे धूर आहे तेथे अग्नी आहे. जसे धुरावरून अग्नीचे ज्ञान होते. विशिष्ट ढग आले तर पाऊस पडणार. ढगावरून पावसाचे ज्ञान होते. तसे कोणत्यातरी बाह्य साधनावरून आत्म्याचे ज्ञान होत नाही. कोणी शंका करेल की जेथे श्वासोच्छ्वास आहे तेथे आत्मा आहे. बाह्य श्वासोच्छ्वासाद्वारे आत्म्याचे ज्ञान होते किंवा शरीराच्या हालचालीवरून आत्म्याचे ज्ञान होते किंवा बोलण्यावरून आत्म्याचे ज्ञान होते. गर्भ वाढल्याने आत्मा जाणला जातो. जरी अनुमानाने जीव वरवरून जाणला जातो. तरी ते आत्म्याचे खरे ज्ञान नाही. या बाह्य चिन्हांने वास्तविक आत्मा जाणला जाऊ शकत नाही. बाह्य इन्द्रिय प्रत्यक्ष चिन्हाने जर आत्म्याचे ज्ञान झाले तर सर्व संज्ञी पंचेन्द्रिय जीवांना सम्यग्दृष्टी म्हणावे लागेल. परंतु सर्वजण सम्यग्दृष्टी होऊ शकत नाहीत. जो शुद्ध आत्म्याचा स्वानुभव प्रत्यक्ष ज्ञानाने अनुभव करतो तोच सम्यग्दृष्टी होतो. म्हणून आत्मा स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाचा विषय आहे. इन्द्रिय प्रत्यक्षरूप साधनाद्वारे अनुमानाचा विषय नाही. ज्याप्रमाणे थर्मामीटरने ताप जाणला जातो तसे कोणत्याही बाह्य चिन्हांनी आत्मा जाणला जात नाही.

भलेही इन्द्रिय प्रत्यक्ष चिन्हाने या शरीरामध्ये आत्मा आहे असे अनुमान झाले तरी आत्मा कसा आहे ? हे जाणले जाऊ शकत नाही. जसे डोळ्याने वरच्या आकार प्रकारावरून हे गुलाबजामुन आहे हे जाणू शकतो पण त्या गुलाबजामुनची चव डोळ्याने येऊ शकत नाही. त्यासाठी त्याचा स्वाद घेऊनच त्याची चव कळते व त्याचे खरे स्वरूप लक्षात येते. त्याप्रमाणे इन्द्रियाने आत्म्याचे अस्तित्व जाणू शकू पण आत्म्याचा अनुभव करू शकत नाही व अनुभव केल्याशिवाय खरा आत्मा जाणला जाऊ शकत नाही.

४) चौथा बोल – न लिंगादेव परैः ग्रहणं यस्येत्यनुमेयमात्रत्वाभावस्य (प्रतिपतिः)।

अ = नाही, लिंग = अनुमानज्ञान, ग्रहण = जाणणे. अर्थात आत्मा मात्र अनुमानाचा विषय नाही.

मात्र लिंगावरून दुसऱ्यांच्याकडून ज्याचे ग्रहण होत नाही तो अलिंगग्रहण आहे. यावरून 'आत्मा अनुमेयमात्र नाही' या अर्थाची प्राप्ती होते. आत्मा केवळ अनुमानाचा विषय नाही.

अनुमेय म्हणजे अनुमानाने जाणण्यायोग्य, अनुमानाचा विषय. येथे 'मात्र' शब्द लावला आहे. यावरून आत्मा कथंचित् स्वसंवेदन सहित अनुमानाचा विषय आहे. परंतु केवळ अनुमानाचा विषय नाही.

जसे बाह्य पौद्गलिक पदार्थ केवळ अनुमानाने जाणले जाऊ शकतात तसा आत्मा केवळ अनुमानाने जाणला जाऊ शकत नाही. केवलज्ञानामध्ये तर तो सर्वथा प्रत्यक्ष ज्ञात होतो आणि अल्पज्ञ अवस्थेत श्रुतज्ञानाने प्रत्यक्ष प्रतीतीमध्ये येतो. साधकदशेमध्ये केवळ अनुमान ज्ञानाने ज्ञात झाला तर स्वसंवेदनरूप आंशिक प्रत्यक्ष ज्ञान होऊ शकणार नाही. स्वसंवेदन ज्ञान आंशिक प्रत्यक्ष नसेल तर ते संपूर्ण प्रत्यक्षरूप होऊ शकणार नाही. म्हणून आत्मा साधक दशेमध्ये स्वसंवेदन प्रत्यक्षपूर्वक जाणला जातो.

केवळ आत्म्याचे अनुमान करीत बसल्याने आत्मा जाणीवेत येणार नाही. तर त्याला आपल्या स्वानुभव प्रत्यक्षाचा विषय बनवा हे यातून सांगत आहेत.

एका अलिंगग्रहण शब्दाचे अमृतचंद्र आचार्यांनी २० अर्थ केले आहेत. त्यातील मागील लेखामध्ये चार अर्थांचे स्पष्टीकरण केले होते. १) आत्मा इन्द्रियाने परद्रव्यांना जाणत नाही अर्थात अतीन्द्रिय ज्ञानी आहे. २) आत्मा इन्द्रियांद्वारे जाणला जाऊ शकत नाही अर्थात इंन्द्रिय प्रत्यक्षाचा विषय नाही. ३) आत्मा इन्द्रियगम्य लिंगाच्या द्वारे ग्रहण होऊ शकत नाही. इन्द्रिय प्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही. ४) केवळ लिंगावरून दुसऱ्यांच्याद्वारे आत्म्याचे ग्रहण होत नाही. अर्थात् आत्मा अनुमेय नाही.

५) पाचवा बोल – न लिंगादेव परेषां ग्रहणं यस्येत्यनुमातृमात्र–त्वाभावस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = केवळ अनुमानमात्राने, ग्रहण = जाणणे.

ज्याला लिंगावरूनच दुसऱ्यांचे ग्रहण होत नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा अनुमाता मात्र, केवळ अनुमान करणारा नाही, असे समजते.

*** आत्मा केवळ अनुमाता नाही–**

आत्मा केवळ अनुमानज्ञानाने स्वतःला किंवा पराला जाणतो असे नाही. अनुमान ज्ञान हे परोक्ष ज्ञान आहे. जेव्हा ज्ञानावरण कर्माचा सद्भाव आहे तेव्हा पूर्ण प्रत्यक्ष ज्ञान होऊ शकत नाही. म्हणून अनुमानज्ञान प्रवृत्त होते. परंतु अनुमानज्ञानाने जाणणे आत्म्याचा स्वभाव नाही. ज्याप्रमाणे आपण अग्नीला

प्रत्यक्षाने पाहू शकतो, परंतु जेव्हा तो प्रत्यक्षाचा विषय होत नाही तेव्हा त्या अग्नीला अनुमानाने जाणतो. त्या पर्वतावर धूर दिसत आहे यावरून तेथे अग्नी आहे असे अनुमानाने जाणतो. अनुमानाने जाणण्यामध्ये पराधीनता आहे. कारण साधनाच्या ज्ञानावरून साध्याचे ज्ञान होते. जी व्यक्ती स्वयं काम करू शकते ती दुसऱ्यांची मदत घेऊ इच्छित नाही. दुसऱ्यांची मदत घेण्यामध्ये कमीपणाचा अनुभव करते. मी स्वयं करू शकतो तर मी दुसऱ्यांचा आधार का घेऊ ? तसे आत्मा प्रत्यक्षज्ञानाने जाणू शकतो तर अनुमानज्ञानाचा आधार घेण्याची काय आवश्यकता. अनुमानाने जाणण्यामध्ये आत्म्याची हीनता आहे. काही अज्ञानी व्यक्तींना आपल्या अनुमानज्ञानाचा खूप गर्व असतो. ते मोठ्या फुशारकीने सांगतात की 'मी अंदाजपंजे सर्व ओळखतो. माझ्यामध्ये तर्कशक्ती अफाटच आहे. शितावरून सर्व भाताची परीक्षा करतो. अनुमानाने मी सर्व काही ओळखतो.' पण त्याला आपल्या स्वभावासंबंधीच अज्ञान आहे. कोणत्याही साधनाचे अवलंबन न घेता प्रत्यक्षज्ञानाने जाणणे हा आत्म्याचा स्वभाव आहे.

आत्मा स्वतःला तर अनुमानाने जाणतच नाही, परंतु अन्य जीवांना, परपदार्थांना, शरीराला मात्र अनुमानाने जाणणे हा त्याचा स्वभाव नाही. स्वसंवेदनाशिवाय केवळ अनुमान ज्ञान खरे अनुमान नाही. ज्यांनी स्वसंवेदन प्रत्यक्षज्ञानाने आपल्या आत्म्याला जाणले आहे अशा सम्यग्ज्ञानीच्या स्मृती, प्रत्यभिज्ञान, तर्क, अनुमान आदी परोक्षज्ञानांना सम्यग्ज्ञान म्हटले आहे. आत्मा स्वयं केवळ अनुमान करणारा असता तर कधीही प्रत्यक्षज्ञान प्रगट झालेच नसते.

या अर्थावरून हे लक्षात घ्यावे की अनुमान करण्यामध्ये मोठेपण न मानता प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करावा.

साधकदशेमध्ये आंशिक प्रत्यक्ष स्वसंवेदनज्ञान आहे. तेच क्रमाक्रमाने वाढत जाऊन संपूर्ण प्रत्यक्ष केवलज्ञान प्रगट होते. तेव्हा अनुमानज्ञानाचा पूर्ण अभाव होतो.

पंचपरमेष्ठी भगवान मात्र अनुमानाने जाणले जात नाहीत. –

काही जीव केवळ बाहेरून, अनुमान करतात आणि म्हणतात की हे वीतरागी देव आहेत, हे निर्ग्रन्थ गुरू आहेत. अशाप्रकारे खरी परीक्षा होत नाही, सर्वज्ञ वीतरागी देवाधिदेव अरिहंत, सिद्ध आणि साधूंचा आत्मा केवळ अनुमानाने जाणला जाऊ शकत नाही. ज्याप्रमाणे रत्नाच्या दुकानामध्ये दोन पैसे

घेऊन गेल्याने हीरा, माणिक मिळत नाहीत. कोणी भिकारी भीक मागतो तर त्याला लाडूचा चुरा मिळतो, पूर्ण लाडूसुद्धा मिळत नाही. पूर्ण लाडू मागण्याचे त्याचे धाडस पण होत नाही. घरातील हिरे, माणिक दाखवा असे म्हणण्याचेही त्याचे साहस होत नाही. याप्रमाणे मात्र अनुमानज्ञान भिकाऱ्याप्रमाणे आहे. त्याद्वारे हिऱ्यासमान पंचपरमेष्ठींच्या आत्म्यांची परीक्षा होऊ शकत नाही.

पंचपरमेष्ठी जाणण्यासाठी प्रथम स्वतःच्या आत्म्याच्या स्वसंवेदन प्रत्यक्षज्ञानाने जाणणे व आत्मा हा शरीर, मन व इन्द्रिय रहित आहे, रागरहित आहे अशी आपल्या आत्म्याची श्रद्धा झाली तर पंचपरमेष्ठींच्या आत्म्याचे ज्ञान व श्रद्धान यथार्थ होते.

६) सहावा बोल – न लिंगात्स्वभावेन ग्रहणं यस्येति प्रत्यक्षज्ञातृत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = परोक्षज्ञानाने (स्वभावाने) ग्रहण = जाणणे.

ज्याचे लिंगाच्या द्वारे ग्रहण होत नाही स्वभावाच्याद्वारे ग्रहण होते तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे 'आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे' अशा अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे –

आत्मा इन्द्रियाने स्वपराला जाणत नाही, आत्मा इन्द्रियाने ज्ञात होत नाही, आत्मा इन्द्रियगम्य चिन्हांनी ज्ञात होत नाही, आत्मा केवळ अनुमानज्ञानाने ज्ञात होत नाही, आत्मा केवळ अनुमानज्ञानाने स्वपराला जाणत नाही. या पाच लिंगाद्वारे आत्मा ज्ञात होत नाही. पण आत्मा प्रत्यक्ष ज्ञात आहे.

पहिल्या पाच बोलामध्ये नास्तिरूपाने वर्णन केले. सहाव्या बोलामध्ये आत्मद्रव्याचे अस्तिरूपाने वर्णन केले.

परोक्षज्ञान आत्म्याचा स्वभाव नाही. तो जर आत्म्याचा स्वभाव असता तर आत्मा कधीच परोक्षज्ञान रहित झाला नसता, कारण जो स्वभाव असतो किंवा जी वस्तु सदाकाल आपली असते ती कधीही आपल्यापासून वेगळी होत नाही. परंतु अनन्त जीव परोक्षज्ञानाचा अभाव करून प्रत्यक्षज्ञानी सर्वज्ञ झाले आहेत. म्हणून परोक्षज्ञान आत्म्याचा त्रिकालीस्वभाव नाही.

ज्याप्रमाणे कोणी जीव रागाला आपले स्वरूप मानेल तर कधीही रागरहित होऊ शकत नाही, परन्तु रागाच्या सद्भावामध्ये सुद्धा स्वतःचे रागरहित ज्ञान श्रद्धान करतो तर त्याला आंशिक वीतरागता प्रगट होते आणि पुन्हा रागरहित

आत्मस्वभावामध्ये स्थिरता वाढत परिपूर्ण वीतराग अवस्था प्रगट होते. त्याप्रमाणे जो जीव वर्तमानात परोक्षज्ञान असतानाही स्वतःला स्वभावाने प्रत्यक्ष जाणतो व श्रद्धान करतो. तेव्हा त्याला आंशिक प्रत्यक्ष ज्ञान प्रगट होते आणि विशेष रूपाने ते ज्ञान वाढत जाऊन केवलज्ञान प्रगट होते.

'न हि वस्तुशक्तयः परमपेक्षन्ते ।' ज्या वस्तूमध्ये जी शक्ती आहे ती पराची अपेक्षा करीत नाही. ज्याप्रमाणे अग्नीला उष्ण होण्यासाठी दुसऱ्या कोणाचीही अपेक्षा नाही, साखरेला गोड होण्यासाठी अन्य कोणाची अपेक्षा नाही त्याप्रमाणे जीवाला जाणण्यासाठी अन्य कोणत्याही साधनांची अपेक्षा नाही, कारण जाणणे हा आत्म्याचा स्वभाव आहे. म्हणून आत्मा स्वभावानेच ज्ञाता आहे. त्याला इन्द्रियादिकांची गरज नाही. संसारी जीव इन्द्रियांचे अवलंबन घेऊन जाणतो तो आत्म्याचा स्वभाव नाही, विभाव आहे.

७) सातवा बोल – न लिंगेनोपयोगाख्यलक्षणेन ग्रहणं ज्ञेयार्थालम्बनं यस्येति बहिरर्थालम्बनज्ञानभावस्य (प्रतिपत्तिः) ।

अ = नाही, लिंग = उपयोग, ग्रहण = ज्ञेयपदार्थांचे अवलंबन

ज्याला लिंगाद्वारे अर्थात् उपयोग नामक लक्षणाद्वारे ग्रहण अर्थात ज्ञेयपदार्थांचे अवलम्बन नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्म्याला बाह्यपदार्थांच्या अवलंबनाने ज्ञान होत नाही, या अर्थाची प्राप्ती होते.

उपयोगाला ज्ञेयपदार्थांचे अवलंबन नाही, म्हणून आत्मा अलिंगग्रहण आहे.

उपयोग आत्म्याचे लक्षण आहे. तो आत्म्यापासून अभिन्न आहे. उपयोगाचा जाणणे व पहाणे सहज स्वभाव आहे. तो ज्ञेयरूप परपदार्थांमुळे जाणत नाही. जेव्हा आत्मा उपयोगाद्वारे परपदार्थांना जाणतो तेव्हा परपदार्थ तेथे निमित्तरूप आहेत. परपदार्थ उपयोगाला उत्पन्न करीत नाहीत. ज्ञेयपदार्थ नसतील तर मी जाणू शकणार नाही असे नाही.

अज्ञानीला वाटते शब्द ऐकल्यामुळे मला ज्ञान होते, गुरूंच्यामुळे मला ज्ञान होते. बाह्य पदार्थ आहेत म्हणून मी त्यांना पाहू शकतो. इन्द्रियांमुळे, प्रकाशामुळे, चष्म्यामुळे मला ज्ञान होते. परंतु उपयोग असा परपदार्थाच्या अधीन नाही. आत्मा स्वाधीन आहे व त्याचा उपयोग ही स्वाधीन आहे. परपदार्थ असोत की नसोत उपयोग जाणण्याचे काम करतो. जर पदार्थाच्या सान्निध्यातच ज्ञान होते तर भूतकाळातील वस्तू वर्तमानात नाही तर त्याचे ज्ञान व्हायला नको, पण भूतकाळात घडलेल्या घटनांचे किंवा जाणलेल्या पदार्थांचे

ते नसताना सुद्धा ज्ञान होताना दिसते. केवली भगवान तीन लोकातील भूत, वर्तमान व भविष्यकाळातील सर्व पदार्थांना स्पष्ट जाणतात. यावरून लक्षात येते की ज्ञानामध्ये जाणण्याची शक्ती आहे म्हणून ज्ञान जाणते व पदार्थांमध्ये जाणले जाण्याची शक्ती आहे, म्हणून पदार्थ जाणले जातात. आत्म्यामध्ये जाणण्याची पण शक्ती आहे व जाणली जाण्याची पण शक्ती आहे; म्हणून आत्मा ज्ञान पण आहे व ज्ञेय पण आहे.

पदार्थ नसताना ही कधी त्याचे ज्ञान होते. डास नसतानाही डास असल्याचा भास होतो. रात्री फिरणाऱ्या प्राण्यांना प्रकाश नसतानाही पदार्थांचे ज्ञान होते. म्हणून पदार्थ, प्रकाश, इन्द्रिये, चष्मा ही फक्त निमित्त आहेत. त्यांच्यामुळे ज्ञान होत नाही. ज्ञानामुळे ज्ञान होते. ज्ञान पर पदार्थावर विसंबून नाही. म्हणून उपयोग उपयोगरूप आहे, ज्ञेय ज्ञेयस्वरूप आहेत. उपयोग ज्ञेयरूप होत नाही. ज्ञेय उपयोगरूप होत नाहीत.

८) आठवा बोल – न लिंगस्योपयोगास्य लक्षणस्य ग्रहणं स्वयमाहरणं यस्येत्यनाहार्यज्ञानत्वस्य (प्रतिपत्तिः) ।

अ = नाही, लिंग = उपयोग, ग्रहण = बाहेरून आणणे, ग्रहण करणे. अर्थात उपयोग बाहेरून आणला जात नाही.

जो लिंग अर्थात उपयोग नामक लक्षणाला ग्रहण करीत नाही अर्थात स्वयं बाहेरून आणीत नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा अनाहार्यज्ञान-स्वरूप अर्थात् कोठूनही बाहेरून आणले जात नाही असा ज्ञानस्वरूप आहे. या अर्थाची प्राप्ती होते.

उपयोग बाहेरून ग्रहण करण्यायोग्य नाही. –

उपयोग हा आत्म्याचा स्वभाव आहे. स्वभाव बाहेरून ग्रहण केला जात नाही. जो सदैव त्या वस्तूपासून अभिन्न असतो तो स्वभाव अर्थात् जो असतानाच वस्तूचा सद्भाव आहे व ज्याच्याशिवाय वस्तू राहू शकत नाही, तो त्या वस्तूचा स्वभाव आहे. आत्मा सदैव उपयोगरूप आहे व उपयोगाशिवाय आत्मा एक क्षणही राहूच शकत नाही. म्हणून उपयोग आत्म्याचा स्वभाव आहे. पहिला ज्ञान कमी होते नंतर गुरूंनी शिकविल्यामुळे ते वाढले किंवा पुस्तक वाचल्यामुळे ते वाढले असे नाही. ज्ञान आत्म्यातच आहे. ते आत्म्यातूनच प्रगट होते. संसार अवस्थेमध्ये ज्ञानावरण कर्माचा सद्भाव असल्यामुळे ज्ञान पूर्ण प्रगट होत नाही. पण जेव्हा ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम होतो अर्थात आंशिक आवरण दूर होते तेव्हा तेवढे ज्ञान व्यक्त होताना दिसते. त्यावेळी गुरूंचे

शिकवणे व पुस्तक वाचणे हे निमित्त होते. परंतु गुरूपासून ज्ञान आले नाही किंवा पुस्तकातून ज्ञान आले नाही. गुरूंचे ज्ञान गुरूंमध्ये आहे. जर गुरूंच्यातून ज्ञान आले असते तर सर्व विद्यार्थ्यांना गुरूंनी शिकविले होते व त्यामुळे सर्वांना समान ज्ञान व्हायला पाहिजे होते. परंतु तसे तर होताना दिसत नाही. काही विद्यार्थ्यांना तर गुरूंपेक्षा जास्त ज्ञान होताना पण दिसते. कोणी १००% नी पास होतो कोणी ८०% तर कोणी ३५% नी पास होतो तर कोणी नापास होतो. यावरून लक्षात येते की स्वतःच्या ज्ञानातूनच ज्ञान येते, बाहेरून ज्ञान येत नाही.

गौतम गणधर पूर्वी वेदपाठी मिथ्याज्ञानी होते. महावीर भगवंतांच्या समवसरणात गेले. मानस्तंभ पहाताच त्यांचा मान गळाला. मति, श्रुत, अवधि व मनःपर्यय या चार ज्ञानाने युक्त सम्यग्ज्ञानी झाले. प्रभूंचे दर्शन करताच ते निर्ग्रंथ झाले आणि ४ ज्ञानाचे धारी झाले. भगवंतांची वाणी ऐकताच बारा अंग व चौदा पूर्वांचे ज्ञान त्यांना झाले. ते त्यांना कोठून मिळाले ? काय भगवंतांच्याकडून त्यांनी आणले ? असे नाही. भगवान् महावीर निमित्तमात्र आहेत. त्यांच्यापासून त्यांना ज्ञान मिळाले हे व्यवहाराने म्हटले जाते, पण वास्तविक हा आत्मा अनंतज्ञानाचा धनी आहे. याच्या असंख्यात प्रदेशरूपी घरामध्येच ज्ञाननिधी भरलेला आहे. हा निज भगवान आत्माच ज्ञानाचा स्रोत आहे. उगमस्थान आहे. तेथूनच ज्ञान प्रगट होते. समुद्रामध्ये भरती येते त्याचे काय कारण आहे? पुष्कळ पाऊस पडला म्हणून की पुष्कळ नद्या समुद्रामध्ये प्रवेश केल्या म्हणून ? असे नाही. कितीही पाऊस पडला किंवा कितीही नद्या समुद्रामध्ये मिसळल्या तरी समुद्रामध्ये फरक पडत नाही. भरती तर समुद्राच्या मध्यबिंदूतून येते. त्याप्रमाणे अंतरंगामध्ये ज्ञानशक्तीचा भण्डार आहे त्यातूनच स्वतःच्या पुरुषार्थाने केवलज्ञानसुद्धा प्रगट होते. म्हणून ज्ञानाच्या वृद्धीसाठी बाहेर न भटकता आपल्या ज्ञानस्वभावामध्ये उपयोग एकाग्र करावा. ध्रुव ज्ञानस्वरूप आत्म्याचे ध्यान केल्यानेच हा आत्मा भगवान बनतो.

जोपर्यंत अज्ञानाचा अभाव होत नाही तोपर्यंत लाख पुरुषार्थ करून काहीही उपयोग नाही. –

चार युवक एकत्र जमले आणि त्यांनी ठरविले की आज चांदणी रात्र आहे. शरदपौर्णिमेची रात्र आहे. थोडा नौकाविहार करून आनंद लुटू. नावेत बसण्यापूर्वी चौघांनी भरपूर दारू प्याली. दारू पिऊन चौघेजण नावेत बसले व नांव खेचायला सुरू केली. त्यांच्यावर केवळ दारूचीच नशा नव्हती. तारुण्याची पण नशा होती व थंड वातावरणसुद्धा त्यांना साथ देत होते. पूर्ण

शक्ती लावून रात्रभर नाव खेचली. सकाळ झाली तर दिसले की आपली नाव किनाऱ्याला लागली आहे. एक युवक उतरला आणि म्हणू लागला की 'पहा, आपण तर पोहोचलो.' परंतु पुन्हा डोळे चोळून चांगले पाहिले तर त्याला आश्चर्य वाटले व तो म्हणाला, 'हे काय ? हा तर तोच किनारा आहे, जेथून आपण चाललो होतो.' दुसरा म्हणाला – 'तू काय सांगतोस. रात्रभर चाललो आणि अजून तेथेच आहोत.' सगळ्यांची नशा उतरू लागली. परंतु चौघांच्याही मनात एकच प्रश्न – रात्रभर आपण नाव चालवली आणि आम्ही एक पाऊल सुद्धा पुढे सरकलो नाही. सगळ्यांनी कपाळ बडवले. विचार केला तरी काही समझेना. कारण शोधता–शोधता खुंटीला बांधलेल्या दोरीकडे त्यांचे लक्ष गेले. 'अरेच्या ! रात्रभर नाव वल्हवली, परंतु याची दोरी तर सोडलीच नाही. दोरी सोडल्याशिवाय नाव पुढे कशी जाणार.' बस हीच स्थिती आमची झाली आहे. मोक्षमार्गामध्ये वाटचाल करण्यासाठी आम्ही अथक परिश्रम करतो. व्रत, दान, पूजा, शास्त्रस्वाध्याय तपश्चरण करतो. परंतु अज्ञानाची दोरी सोडत नाही. अज्ञानाची दोरी सोडल्याशिवाय जीवनाची नाव कितीही चालवा ती जेथल्या तेथेच राहणार आहे.

यासाठी खऱ्या आत्मस्वरूपाचे ज्ञान करून त्याचे श्रद्धान करणे आवश्यक आहे.त्या आत्मस्वरूपाला दाखविण्यासाठीच आचार्य अलिंग्रग्रहणाचा इतक्या विस्ताराने अर्थ करीत आहेत.

आचार्य कुन्दकुन्द देवांनी आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी अनेक विशेषणे दिली. त्यापैकी अलिंगग्रहण हे एक विशेषण आहे. त्या एका विशेषणाचा खुलासा करण्यासाठी अमृतचन्द्राचार्यांनी वीस अर्थ केले आहेत. ज्याप्रमाणे पित्याने दिलेल्या एका रत्नाचे पुत्र अनेक रत्न निर्माण करतो. त्याप्रमाणे कुन्दकुन्द आचार्यांनी दिलेल्या एका प्रमेयरत्नाचे अनेक अर्थांद्वारे खुलासा करून अमृतचन्द्र आचार्यांनी आत्म्याचे वैभव वृद्धिंगत केले आहे. एका अलिंगग्रहणविशेषणाने आत्म्याची अतीन्द्रियता, प्रत्यक्षज्ञातृता, स्वसंवेदनप्रत्यक्षता, स्वाधीनता, परनिरपेक्षता इत्यादी अनेक पैलूंचे दिग्दर्शन करविले आहे. यापूर्वीच्या दोन लेखांमध्ये आठ अर्थांचे स्पष्टीकरण करून सांगितले आहेत.

९) नववा बोल – न लिंगस्योपयोगाख्यलक्षणस्य ग्रहणं परेण हरणं यस्येत्यहार्यज्ञानत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = उपयोग, ग्रहण = पराकडून हरण होणे.

ज्या लिंगाचे अर्थात उपयोग नामक लक्षणाचे ग्रहण अर्थात दुसऱ्यांकडून हरण केले जात नाही तो अलिंगग्रहणस्वरूपी आहे. अशाप्रकारे आत्म्याच्या उपयोगगुणाचे (ज्ञानगुणाचे) दुसऱ्याकडून हरण केले जाऊ शकत नाही, या अर्थाची प्राप्ती होते.

उपयोग (ज्ञान) सुरक्षित धन –

उपयोग हा आत्म्याचा निज स्वभाव आहे. स्वभाव स्वतःसिद्ध स्वावलंबी असतो. स्वभाव त्या वस्तूपासून कधीही वेगळा केला जाऊ शकत नाही. दुसरा त्या स्वभावाची कधी चोरी करू शकत नाही. तिन्ही काळामध्ये त्याचे कोणीही हरण करू शकत नाही. अज्ञानी जीव सोने, चांदी, हिरा, माणिक, मोती इत्यादीला आपले धन समजतो. परंतु हे धन आत्म्याचे खरे धन नाही. कारण ते धन बाहेरून येते व ते दुसऱ्याकडून हरण पण केले जाते. अज्ञानीला आपल्या खऱ्या वैभवाची ओळख नाही. उपयोग अर्थात ज्ञान दर्शन हे आत्म्याचे खरे वैभव आहे. हे निजवैभव अनादि अनंत सुरक्षित आहे. नीतीकार भर्तृहरीने पण आपल्या नीतिशतकमध्ये म्हटले आहे –

न चोरहार्यं न भ्रातृभाज्यं, न राजहार्यं न च भारकारी ।
व्यये कृते वर्धत एव नित्यं, विद्याधनं सर्वधनप्रधानम् ।।

सोने, चांदी, रुपये-पैसा या धनाची चोर चोरी करतात. त्यामुळे धनिकाला सदैव चोरीचे भय असते. पण ज्ञानधन कोणीही चोरू शकत नाही म्हणून भय असत नाही. इतर धनामध्ये सर्व भाऊबंधू वाटणी मागतात. थोडे कमी-जास्त झाले तरी वैर धारण करतात. ज्ञानधन वाटणी करून देता येत नाही. कारण ज्याचे ते धन आहे त्याचा मालक तो स्वयं एकटाच आहे. इतर धनाची आवक जास्त झाली की राजा त्यावर कर बसवतो किंवा ते धन हिसकावून घेतो. म्हणून राजापासून हे धन लपविले जाते. परंतु ज्ञानधन कितीही वाढले तरी राजा त्यावर कर बसवू शकत नाही. उलट राजा त्या विद्वानाचा आदर सत्कार करून त्याला उपहार देतो.

इतर धन डोक्यावर कोठेतरी घेऊन जायचे म्हटले तर भारस्वरूप होते. त्याचे ओझे वाटते. परंतु ज्ञानधन कितीही वाढले तरी भारस्वरूप वाटत नाही. उलट आत्मा हलका होऊन आनंदाचा अनुभव करतो. इतर धन खर्च केले तर कमी होते. पण विद्याधन जेवढे खर्च करतो अर्थात् दुसऱ्याला देतो तेवढे ते

वाढत जाते. कमी होत नाही; म्हणून सर्व धनामध्ये ज्ञानधन श्रेष्ठ आहे. कोणत्याही प्रकाराने उपयोगाचे हरण होऊ शकत नाही.

उपयोग स्वरूपाचा दुसऱ्यांकडून घात होत नाही, अज्ञानी मानतो की दुसऱ्यांनी दंगा केला; म्हणून माझे ज्ञान कमी झाले, चांगले भोजन मिळाले नाही म्हणून माझी बुद्धी कमी झाली. शरीरामध्ये शक्ती असेल तर उपयोग चांगले काम करतो. ध्यानामध्ये उपयोग लागतो. इ. परंतु हे सर्व अज्ञानीचे भ्रम आहेत. बाहेरच्या जड चेतन पदार्थांचा आत्म्यामध्ये अत्यन्त अभाव आहे ते आत्म्याच्या उपयोगाचा घात कसे करू शकतील ? अर्थात् घात करू शकत नाहीत. अनुकूल संयोगामुळे ज्ञान उपयोग वाढतो आणि प्रतिकूल संयोगामुळे उपयोग हीन होतो असे नाही. उपयोग स्वतःमध्ये सुरक्षित आहे.

सातवा बोल – जो उपयोग 'आहेच' त्याला पराच्या अवलंबनाची काय गरज ?

आठवा बोल – जो उपयोग 'आहेच' त्याला बाहेरून आणण्याची काय गरज ?

नववा बोल – जो उपयोग 'आहेच' त्याला दुसरा कसे हरण करू शकेल ?

१०) दहावा बोल – न लिंगे उपयोगाख्यलक्षणे ग्रहणं सूर्य इवोपरागो यस्येति शुद्धोपयोगस्वभावस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = उपयोग, ग्रहण = सूर्याप्रमाणे मलिनता

ज्याला लिंगामध्ये अर्थात उपयोग लक्षणामध्ये ग्रहण अर्थात सूर्याप्रमाणे उपराग (मलिनता विकार) नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा शुद्ध उपयोग स्वभावी आहे, या अर्थाची प्राप्ती होते.

ज्याप्रमाणे सूर्य किंवा चंद्राला राहु ग्रसित करतो त्यामुळे त्यांना ग्रहण लागते. अर्थात ते मलिन दिसतात, झाकले जातात. त्याप्रमाणे उपयोगामध्ये विकार किंवा मलिनता नाही. कारण उपयोग हा आत्म्याचा स्वभाव आहे. स्वभावामध्ये मलिनता असत नाही. ज्याप्रमाणे पाण्याचा स्वभाव स्वच्छता आहे. त्या स्वच्छतेमध्ये कधी मलिनता येत नाही. पाण्यामध्ये चिखल मिसळल्यावर पाणी गढूळ दिसते त्यावरून आपल्याला असे वाटते की पाणी मलिन झाले. परंतु जरी पाण्याची स्वच्छता चिखलामुळे झाकली गेली असली तरी त्याचा स्वच्छ स्वभाव नष्ट झाला नाही. अन्यथा त्या पाण्यामध्ये तुरटी फिरविल्यानंतर पाणी स्वच्छ झाले नसते. मलिन अवस्थेमध्ये सुद्धा पाणी स्वभावाने स्वच्छच आहे. त्याप्रमाणे आत्म्याचा उपयोग स्वभाव शुद्धच आहे. त्यामध्ये मलिनता (विकार) नाही. पण मोहनीय कर्मांच्या उदयाच्या निमित्ताने

त्यामध्ये राग, द्वेष मोहादी क्षणिक विकारी भाव उत्पन्न होतात त्यामुळे उपयोग अशुद्ध झाल्याप्रमाणे वाटतो, पण जर स्वभावदृष्टीने पाहिले तर त्याही अवस्थेमध्ये स्वभावाने उपयोग शुद्धच आहे. निरुपराग आहे. नाहीतर भेदविज्ञानच्या द्वारे वीतराग अवस्था प्रकट होते तेव्हा उपयोग शुद्ध झाला नसता. स्वभावाला कधी मरण नाही. आत्म्याचा स्वभाव शुद्ध उपयोगस्वरूपी आहे. सूर्य व चंद्रसुद्धा अंतरंगामध्ये प्रकाशस्वभावी आहेत. तो प्रकाशस्वभाव ग्रहणामुळे नष्ट होत नाही. केवळ तो झाकला जातो. त्याप्रमाणे संसार अवस्थेमध्ये शुद्ध उपयोगस्वभाव रागादी परिणामामुळे मलिन होतो. पूर्ण नष्ट होत नाही. म्हणून स्वतःला एक शुद्ध उपयोगस्वरूप अनुभवावे.

११) अकरावा बोल – न लिंगादुपयोगाख्यलक्षणाद्ग्रहणं पौद्गलिककर्मादानं यस्येति द्रव्यकर्मासंपृक्तत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = उपयोग, ग्रहण = पुद्गलकर्माचे ग्रहण

ज्याला लिंगाद्वारे म्हणजे उपयोग नामक लक्षणाद्वारे, ग्रहण म्हणजे पुद्गलकर्माचे ग्रहण नाही तो आत्मा अलिंगग्रहण आहे. यावरून आत्मा द्रव्यकर्मापासून असंयुक्त (असंबद्ध, भिन्न) आहे, या अर्थाची प्राप्ती होते. ज्ञानावरणादी आठ कर्मांना द्रव्यकर्म म्हणतात. उपयोग द्रव्यकर्माला ग्रहण करीत नाही. आणि द्रव्यकर्म येण्यामध्ये निमित्तपण नाही. येते निश्चयनयाने शुद्ध आत्मा दाखवण्याची विवक्षा आहे. आत्मा निश्चयाने भावकर्म–द्रव्यकर्मापासून भिन्न आहे.

कषायाने स्थिती व अनुभागबंध होतो तसेच योगाने प्रकृति व प्रदेश बंध होतो. दहाव्या बोलामध्ये सांगितले की आत्मा रागादि विकारीभावांनी रहित आहे. कारण आत्मा व आस्रव–बंध हे पदार्थ भिन्न आहेत. जर आत्म्यांच्या उपयोगामध्ये मलिनताच नाही तर त्या मलिनतेच्या निमित्ताने आलेल्या द्रव्यकर्माला उपयोग कसा ग्रहण करू शकेल ? कार्माणवर्गणा स्वयं कर्मरूप होऊन आत्म्याबरोबर एकक्षेत्रावगाहरूपाने राहतात त्यामध्ये कषाय व योगरूप मलिनता निमित्त आहे. द्रव्यकर्माचा समूहरूप कार्माणशरीर आत्म्याबरोबर अनादिकाळापासून आहे, पण आत्मा कधी द्रव्यकर्मरूप झाला नाही. कर्म कर्मरूपच आहे व आत्मा आत्मारूपच आहे. ज्याप्रमाणे दूध व पाणी एकत्र आले तरी दूध दूध आहे व पाणी पाणी आहे. दूध कधी पाणी होत नाही व पाणी कधी दूध होत नाही. त्याप्रमाणे आत्मा व कर्म एकत्र राहिले तरी कर्म व आत्मा

एक होऊ शकत नाहीत. म्हणून आत्मा द्रव्यकर्मापासून अलिप्त आहे. अबद्धस्पृष्ट आहे.

१२) बारावा बोल – न लिंगेभ्य इन्द्रियेभ्यो ग्रहणं विषयाणामुपभोगो यस्येति विषयोपभोक्तृत्वाभावस्य (प्रतिपत्तिः) ।

अ = नाही, लिंग = इन्द्रिये, ग्रहण = विषयांचा उपभोग

ज्याला लिंगाच्या द्वारे, अर्थात इन्दियांच्या द्वारे, ग्रहण अर्थात विषयांचा उपभोग नाही. तो अलिंगग्रहण आहे. यावरून आत्मा विषयांचा उपभोक्ता नाही या अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा चैतन्यस्वभावी ज्ञाता–द्रष्टा आहे. आत्मा इन्द्रिय विषयांचा भोक्ता नाही, परन्तु स्वतःचा भोक्ता आहे. आत्मा परद्रव्याद्वारे पराला भोगू शकत नाही. इन्द्रिये पुद्गलरूप परद्रव्य आहेत व स्पर्श, रस, गंध, वर्ण आणि शब्द हे पुद्गलद्रव्याचेच गुण व पर्याय आहेत. आत्म्यामध्ये परद्रव्य, परगुण व परपर्यायांचा अभाव आहे. ज्या वस्तूचा ज्यामध्ये अभाव आहे ती त्याचा भोग कसा घेऊ शकते ? म्हणून आत्मा इन्द्रियांच्या द्वारे विषयांना भोगू शकत नाही. अज्ञानीला वाटते, कान, नाक, डोळे, जीभ सर्व माझेच आहेत व यांच्याद्वारे मी सुंदर गाणी ऐकतो, गंध घेतो, डोळ्यांनी सुंदर चित्र पाहतो, जीभेने चविष्ट भोजनाचा आस्वाद घेतो. स्पर्शेनेन्द्रियाने पंखा, कुलर, ए. सी.च्या थंडगार हवेचा आनंद लुटतो. सर्व विषयांना मीच भोगतो आणि त्यामुळे संपूर्ण विषयसामग्री गोळा करण्यामध्ये आपले सर्व जीवन घालवतो. परन्तु हा त्याचा भ्रम आहे. अज्ञानी सुद्धा परद्रव्यरूप विषयांना भोगत नाही. मी पराला भोगतो असा फक्त भाव करतो. दुसऱ्याला भोगण्याचा विकारी भावसुद्धा वास्तविक आत्मा नाही. तो मोहाचा परिणाम आहे. आत्मा पराला भोगतो किंवा त्याला भोगण्याचा भाव करतो हे व्यवहारनयाचे कथन आहे. येथे आचार्य शुद्ध आत्म्याचे अर्थात आत्म्याचे असली स्वरूप दाखवत आहेत. परवस्तूला भोगण्याचा भाव आत्म्याचे स्वरूप नाही. आत्मा तर आपल्या चैतन्यरूपी अमृतरसाचा स्वाद घेणारा आहे. जेव्हा आत्मा लाडू, पेढा, जिलेबी इ. पदार्थांचा भोग घेतांना दिसतो तेव्हा तो त्या पदार्थांना भोगत नसतो, हे पदार्थ इष्ट किंवा अनिष्ट आहेत असे राग–द्वेष करून त्या रोगद्वेषाचा भोग घेतो. निश्चयाने त्या रागद्वेषाला पण भोगत नाही तर केवळ ज्ञानाने जाणतच असतो; म्हणून तो आपल्या ज्ञानाचाच भोग घेत असतो; ज्याप्रमाणे कुत्रा हाड चघळतो.

त्यामुळे त्याच्या दातातून रक्त निघते. त्याचा तो आस्वाद घेतो, परंतु त्याला असा भ्रम होतो की हाडांचाच हा स्वाद येत आहे त्याप्रमाणे अज्ञानीला असा भ्रम होतो की मी विषयांचा भोग घेतो व त्यातूनच मला आनंद मिळतो.

लौकिकामध्ये जो आपल्या घरामध्ये उत्तम-उत्तम वस्तूंचे सेवन करतो त्यास श्रीमंत गृहस्थ म्हणतात व जो लोकांचे उष्टे खातो त्यास भिकारी म्हणतात. त्याचप्रमाणे आत्म्यामध्ये ज्ञान, आनन्द, सुख आदि चैतन्य शक्तींचा अक्षय भण्डार आहे. जो जीव चैतन्यगृहामध्ये आपल्या अक्षयनिधीला उघडून त्याचा आस्वाद घेतो त्याला स्वाभाविक निर्मलपर्यायरूपी आनंदस्वरूप मिष्टान्नाचा स्वाद येतो. तो धर्मात्मा जीव चैतन्यलक्ष्मीचा स्वामी श्रीमंत म्हटला जातो, परन्तु जो जीव आपल्या स्वरूपाचा भोग सोडून शरीराचा भोग घेतो, भोजनपान आदि बाह्य विषयांचा भोग घेतो, वा इष्ट विषयांना भोगण्याची इच्छा करतो तो जीव तीव्र आकुलता भोगतो. तो आपल्या घरातील ताजी मिठाई सोडून भिकाऱ्याप्रमाणे दुसऱ्याचे उष्टे खाण्याची इच्छा करतो. तो आत्मलक्ष्मीचा स्वामी नाहीच, तो मिथ्यादृष्टी भिकारी आहे. म्हणून श्रीमंत व्हायचे असेल तर आपल्या चैतन्य घरात राहून आपल्या ज्ञानदर्शनसुखादी अमूल्यगुणनिधीस्वरूप स्ववैभवाचा भोग घेण्याचे संस्कार आपल्या आत्म्यावर घालणे आवश्यक आहे. मी कोण आहे ? व माझे काय आहे ? याचा शोध घ्या. याचा खरा शोध लागल्याशिवाय शांती, सुख, समाधान मिळणे शक्य नाही. आत्मानंदामध्ये जगायला शिका. हाच कुन्दकुन्दाचार्यांचा आपल्यासाठी संदेश आहे.

अनादिकाळापासून या जीवाला अन्य जड वैभवाचा परिचय आहे, परंतु निज चैतन्यवैभवाचा परिचय नाही. प्रत्येक पर्यायामध्ये कर्माच्या उदयाने प्राप्त होणाऱ्या संयोगाला आपले स्वरूप व आपली संपत्ती मानतो, परंतु कर्मनिरपेक्ष स्वतः सिद्ध स्वस्वरुप निजगुणसंपत्तीला ओळखत नाही. कुन्दकुन्दाचार्य व अमृतचन्द्र आचार्य या १७२ गाथेमध्ये आत्म्याच्या वास्तविक स्वरूपाला दाखवित आहेत.

जीव रसरहित, रूपरहित, गंधरहित, अव्यक्त, शब्दरहित, चेतनागुणस्वभावी आहे. याचा आकार निश्चित सांगता येत नाही व अलिंगग्रहणस्वभावी आहे. 'अलिंगग्रहण' या विशेषणाचे अमृतचन्द्र आचार्यांनी वीस अर्थ केले आहेत. प्रत्येक अर्थातून जीवाची एकेक विशेषता दाखवून दिली आहे. यापूर्वी १२ अर्थांचे स्पष्टीकरण केले आहे.

१३) तेरावा बोल – न लिंगात्मनो वेन्द्रियादिलक्षणाद्ग्रहणं जीवस्य धारणं यस्येति शुक्रार्तवानुधिवायित्वाभावस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = इंद्रिय, मन इ. ग्रहण = जीवत्वाला धारण करणे.

इन्द्रियादी लक्षणाच्या द्वारे जीवत्वाला धारण करणे शक्य नाही तो अलिंगग्रहण होय. अशाप्रकारे आत्मा रजोवीर्याचे अनुसरण करून होणारा नाही या अर्थाची प्राप्त होते.

आत्मा जडप्राणांनी जीवंत नाही –

पाच इन्द्रिये, तीन बल, श्वासोच्छ्वास आणि आयु हे व्यवहाराने जीवाचे दहा प्राण म्हटले जातात. त्यामुळे अज्ञानीला असा भ्रम उत्पन्न होतो की हे प्राण टिकून आहेत तर माझे जीवन आहे. ते नष्ट झाले की मी नष्ट होतो. म्हणून यांना टिकविण्याचा प्रयत्न करतो. सर्व इन्द्रिये साबूत असतील तर मी सुरक्षित आहे. जोपर्यंत वाचा चालू आहे तोपर्यंतच माझे बरे आहे. मानसिक बल आहे तर मी जीवंत आहे. अज्ञानी मानतो की –

पहला सुख निरोगी काया, दूजा सुख पुत्र चार पाया ।
तीजा सुख कुलवन्ती नार, चौथा सुख अन्न भण्डार ।।

अशाप्रकारे अज्ञानी शरीर, पुत्र, स्त्री व धान्य यामध्ये सुख मानतो. परंतु त्याचा हा महाभ्रम आहे. येथे तर पाच इन्द्रियादी जड प्राण जीवाचे नाहीत, असे सांगितले आहे. तेथे प्रत्यक्ष पृथक् पुत्र, स्त्री, धनधान्यादिकांना जीवाचे कसे म्हटले जाऊ शकते ? त्यामुळे जीव सुखी कसा होऊ शकतो ? दहा प्राण तर अचेतन जड आहेत. त्याच्याद्वारे जीवाचे अस्तित्व कसे राहू शकते. या जडप्राणांचा तर जीवामध्ये अभाव आहे. जीव आपल्या शाश्वत चैतन्यप्राणाने जगणारा आहे. निश्चयाने चैतन्यच जीवाचा ध्रुव प्राण आहे.

आत्मा मातापिताच्या रजोवीर्यापासून बनलेला नाही. रजोवीर्याला निमित्त करून शरीर बनले आहे, जीव नाही. जो पूर्वी जीव होता तोच मातेच्या योनिस्थानामध्ये आला व तेथे त्या जीवाच्या सांयोगिक शरीराची उत्पत्ती झाली; जीव सदा अशरीरी, ज्ञानशरीरी आहे. चैतन्यरत्न या मलिनशरीरामध्ये पडल्यामुळे अज्ञानीला भ्रम होतो की हे शरीरच मी आहे. परंतु वास्तविक जीव या दहा प्राणरूप शरीरापासून वेगळा आहे. स्वतः सिद्ध चैतन्यस्वरूप आहे.

१४) चौदावा बोल – न लिंगस्य मेहनाकारस्य ग्रहणं यस्येति लौकिकसाधनमात्रत्वाभावस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = मेहनाकाराचे (पुरुषाच्या लिंगाचा आकार), ग्रहण = ग्रहण करणे.

अर्थात् ज्याला मेहनाकार म्हणजे पुरुषादिकांच्या इन्द्रियाचा आकार ग्रहण करणे नाही तो अलिंगग्रहण आहे. यावरून आत्मा लौकिकसाधन मात्र नाही या अर्थाची प्राप्ती होते.

जीव इन्द्रियांच्या आकाराला ग्रहण करीत नाही. –

जो या शरीराच्या इन्द्रियांचा आकार दिसतो त्याला जीवाने ग्रहण केले नाही. ज्या पुरुषाच्या शरीराचा, स्त्रीशरीराचा किंवा नपुंसकाच्या आकृती दिसतात. त्या सर्व पुद्गलाच्या अवस्था आहेत. त्या आकृतींचा आत्म्यामध्ये अभाव आहे. ज्या वस्तूचा ज्यामध्ये अभाव असतो त्या अभावरूप वस्तूचे ग्रहण होऊ शकत नाही.

कित्येक अज्ञानी जीव पुरुषाच्या लिंगाची देव मानून पूजा करतात. जे कामभोगाचे कारण आहे, त्याचे प्रतीक आहे, त्यामध्ये पूज्यता कशी ? आत्मा लौकिक साधन मात्र नाही, ज्याच्या पुत्रपुत्री उत्पन्न होतात त्याचे साधन आत्मा नाही. आत्मा चैतन्य ज्ञाताद्रष्टा स्वभावी आहे. आत्मा सम्यग्दर्शनज्ञानचारित्राच्या निर्मल पर्यायाला उत्पन्न करणारा आहे. आत्मा वीतराग पर्यायाला जन्म देणारा आहे, म्हणून लोकोत्तर साधन आहे. लौकिक साधनमात्र नाही.

१५) पंधरावा बोल – न लिंगेनामेहनाकारेण ग्रहणं लोकव्याप्तिर्यस्येति कुहुकप्रसिद्धसाधनाकारलोकव्याप्तित्वाभावस्य (प्रतिपत्तिः) ।

अ = नाही, लिंग = अमेहनाकार, ग्रहण = लोकव्याप्ती.

लिंगाच्या द्वारे अर्थात अमेहनाकाराच्या द्वारे ज्याचे ग्रहण करणे, लोकामध्ये व्यापकत्व नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा पाखण्डींमध्ये प्रसिद्ध साधनरूप आकारवाला अर्थात लोकव्याप्तिवाला नाही. या अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा लोकव्यापक नाही –

अन्य मतावलम्बी आत्म्याला लोकव्यापक मानतात. एकच ब्रह्मा आहे. तोच संपूर्ण चराचर पदार्थांमध्ये व्याप्त आहे. संपूर्ण जगामधील वस्तू त्याचे अवयव आहेत. यांची स्वतंत्र सत्ता नाही. त्याचेच अंश आहेत. म्हणून प्रत्येक व्यक्ती मरणानंतर ब्रह्मामध्येच विलीन होते. दूसरी मान्यता अशी आहे की

ज्याप्रमाणे पक्ष्याचे पंख तुटल्यानंतर पक्षी तेथेच पडून राहतो. हलत डुलत नाही त्याप्रमाणे या आत्म्याचे पुण्यपापरूपी पंख तुटल्यानंतर तो लोकामध्ये व्याप्त होऊन पडून राहतो. तो आपल्या ऊर्ध्वगमन स्वभावाने वर जात नाही. जोपर्यंत अशुद्ध आहे तोपर्यंत मर्यादित क्षेत्रामध्ये राहतो. परन्तु शुद्ध झाल्यावर अमर्यादित क्षेत्रप्रमाण राहतो. असे अनेक पाखंडी मानतात. परंतु असे नाही.

प्रत्येक आत्मा ज्याप्रमाणे संसारामध्ये प्रत्येक शरीरामध्ये भिन्न भिन्न राहतो त्याप्रमाणे मुक्त झाल्यावर सुद्धा भिन्नच राहतो. तो लोकामध्ये व्याप्त होत नाही. आत्मा शुद्ध झाल्यावर अंतिम शरीराहून काही कमी आपल्या आकारामध्ये आपल्या असंख्यात प्रदेशामध्येच राहतो. ऊर्ध्वगमनस्वभावामुळे लोकाच्या अग्रभागी जाऊन विराजमान होतो.

जगामधील प्रत्येक जड व चेतन वस्तूचे स्वतंत्र अस्तित्व प्रतीतीला येते. जर एका ब्रह्माचे सर्व अवयव मानले तर एका व्यक्तीला काही दुखापत होऊन वेदना झाली तर ती वेदना सर्वांना व्हायला पाहिजे; कारण आपण पाहतो आपल्या शरीराच्या एका अवयवास जखम झाली तर त्याची वेदना सर्वांगात होते. शेजारच्या व्यक्तीला पीडा झाली तर त्याचा अनुभव आपल्याला होताना दिसत नाही. म्हणून एका आत्म्याला लोकव्यापक मानणे चुकीचे ठरते. प्रत्येक जीव मीपणाचा अनुभव करतो. प्रत्येकजण आपापल्या गुणपर्यायांना धारण करतो. जो चेतन आहे तो जड अचेतन वस्तूंमध्ये कसा काय व्याप्त होऊ शकतो? म्हणून आत्म्याला लोकव्यापक मानणे भ्रम आहे. आत्मा आपल्या असंख्यातप्रदेशरूप स्वक्षेत्रामध्येच राहतो व आपल्या गुण व पर्यायांमध्येच व्याप्त आहे. आपल्या अमूल्य गुणनिधीचा एकटाच स्वामी आहे.

१६) सोळावा बोल – न लिंगानां स्त्रीपुन्नपुंसकवेदानां ग्रहणं यस्येति स्त्रीपुन्नपुंसकद्रव्यभावाभावस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = स्त्री, पुरुष, नपुंसकवेद, ग्रहण = ग्रहण

ज्याला लिंगाचे अर्थात् स्त्री–पुरुष–नपुंसकवेदाचे ग्रहण नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा द्रव्य व भावाने स्त्री, पुरुष, नपुंसक नाही या अर्थाची प्राप्ती होते.

पुरुषादिकांच्या आकाराला आत्मा मानणे म्हणजे जडाला जीव मानल्यासारखे आहे.

आत्मा निर्वेदस्वरूप आहे. –

चौदाव्या अर्थामध्ये सांगितले होते की पुरुषाच्या इन्द्रियाचा आकार

आत्म्यामध्ये नाही. येथे सांगतात की सर्व द्रव्य व भाववेदांचा आत्म्यामध्ये अभाव आहे. वेद नोकषायाच्या उदयाने जो आत्म्यामध्ये मैथुनरूप परिणाम होतो, तो भाववेद आहे. तो अशुभभाव आहे अर्थात पापरूप आहे. आत्मा जीवतत्त्व आहे म्हणून त्या भाववेदाचा आत्म्याच्या त्रिकालीस्वभावामध्ये अभाव आहे. अंगोपांग नामकर्माच्या उदयाने जे शरीरामध्ये पुरुष, स्त्री व नपुंसकाचे विशिष्ट अवयव उत्पन्न होतात त्या विशिष्ट शरीरालाच द्रव्यपुरुष, द्रव्यस्त्री व द्रव्य नपुंसक म्हणतात.

वास्तविक शरीर पुद्गलमय आहे. त्याचा जीवामध्ये अत्यन्त अभावच आहे. तर मग त्या शरीराचे चिन्हविशेष आत्मा कसा होऊ शकतो. म्हणून आत्म्यामध्ये द्रव्यवेदाचा अभाव आहे.

अज्ञानी जीवाला आपल्या अवेदस्वभावाचे ज्ञान नाही, त्यामुळे संयोग व विकारीभावावर त्याची दृष्टी जाते. स्त्रियांना वाटते की आम्ही स्त्रिया आहोत, अबला आहोत, म्हणून कुणाच्या आधाराशिवाय जीवित राहू शकत नाही. पुरुषांना वाटते की आम्ही पुरुष आहोत. सर्व कुटुंबाचे पालनपोषण करणारे आहोत. आई, वडील, स्त्री-पुत्रादिकांचा आधार मीच आहे. नपुंसकाना वाटते आम्ही जन्मानेच नपुंसक आहोत. कुचेष्टा करणेच आमचा स्वभाव आहे. याप्रमाणे वेदाच्या संयोगी दृष्टीमुळे अज्ञानी पराधीनतेची कल्पना करतो.

ज्ञानी संयोगापासून भिन्न स्वतःला ओळखतो. तो जाणतो की स्त्रीचे, पुरुषाचे किंवा नपुंसकाचे शरीरच माझे नाही तर मी स्त्री, पुरुष, नपुंसक कसा? भाववेद सुद्धा कर्मोदयजनित विकारी भाव आहे. तो माझा स्वभाव नाही. नारकी द्रव्य व भाव वेदाने नपुंसक असून सुद्धा स्वतःच्या अवेदस्वभावाचे अनुभव करून सम्यग्दर्शन प्राप्त करतो तर मनुष्यपर्यायामध्ये सम्यग्दर्शन होण्यासाठी काय बाधा आहे? आपण पण आपल्या सहज ज्ञानदर्शनादी अनंतगुणस्वरूप निर्वेद अलिंगग्रहण स्वभावाचे वेदन करून सम्यग्दर्शन प्राप्त करू शकतो, याचा विश्वास उत्पन्न करून पुरुषार्थ करावा.

१७) सतरावा बोल – न लिंगानां धर्मध्वजानां ग्रहणंयस्येति बहिरङ्गयतिलिंगाभावस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = धर्मचिन्हांचे ग्रहण.

ज्याला लिंगांचे म्हणजे धर्मचिन्हांचे ग्रहण नाही तो अलिंगग्रहण आहे, यावरून आत्म्यामध्ये बाह्य मुनिलिंगाचा अभाव आहे या अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा बाह्य धर्मचिन्हांचा ग्राहक नाही. –

'मी शुद्धचिदानन्दस्वरूप आहे' असा निर्विकल्प अनुभव झाल्यानंतर स्वभावामध्ये विशेष स्थिरता होते तेव्हा अंतरंगामध्ये समताभावरूप मुनिपना प्रकट होतो आणि सामायिक संयमरूप अवस्था प्रगट होते व बहिरंगामध्ये नग्न दिगम्बर अवस्था प्रकट होते. बाह्य नग्नपना, केशलोच, शरीरसंस्कार न करणे, अहिंसाधर्माचे पालन करण्यासाठी मयूरपिच्छिका ग्रहण करणे हे बाह्य मुनिलिंग आहे. परंतु या बाह्य यतिलिंगाचा सुद्धा आत्म्यामध्ये अभाव आहे.

जसा आत्मा गृहस्थ नाही तसा तो मुनि देखील नाही. कारण आत्मा अनादिअनंत त्रिकाली ध्रुवस्वरूप सत् चिदानंदस्वरूप आहे. गृहस्थ व मुनी ही तर क्षणिक पर्याय आहे. गृहस्थ अवस्थेमध्ये जसा आत्मा शुद्ध चैतन्यस्वरूप आहे तसाच मुनी अवस्थेमध्ये ही शुद्धचैतन्यस्वरूपीच आहे. जो स्वतःला मुनी मानतो तो मिथ्यादृष्टी आहे. मुनी होण्यापूर्वी ही आत्मा होताच व मुनी अवस्था सुटल्यानंतर ही तो आत्माच आहे. पर्यायार्थिक नयाने पाहिले तर आत्मा वर्तमान अवस्थेमध्ये मुनी आहे, पण द्रव्यार्थिक नयाने पाहिले तर सर्व पर्यायांमध्ये व्यापक ध्रुव नित्य आत्मा आहे. येथे शुद्धद्रव्यार्थिक नयाचा विषयभूत शुद्ध आत्म्याचे वर्णन चालू आहे. म्हणून आत्म्यामध्ये मुनी अवस्थेचा पण निषेध केला आहे. शुद्धद्रव्यार्थिकनयाने आत्मा बाह्य सर्व वस्तूंना ग्रहण पण करीत नाही व त्याग पण करीत नाही. तर मग बाह्य मुनिलिंगाला आत्मा कसा ग्रहण करू शकेल ? नग्न शरीर पुद्गलद्रव्य आहे, केस हे पण शरीररूप परद्रव्याचे अवयव आहेत. मयूरपिच्छी हे पण परद्रव्य आहे. आत्मा या परद्रव्यांना धारण करू शकत नाही. म्हणून निश्चयाने बाह्य धर्मचिन्हांना ग्रहण करतो असे म्हणणे मिथ्यात्व आहे.

कोणी म्हणेल बाह्य मुनिलिंग धारण केल्याशिवाय मोक्ष कसा प्राप्त होईल? ही गोष्ट अगदी बरोबर आहे. संपूर्ण आरंभ परिग्रहाचा त्याग केल्याशिवाय मोक्ष होऊ शकत नाही. मुनिवेष धारण केल्याशिवाय मोक्ष नाही व मुनिपदाचा अहंकार सोडल्याशिवाय ही मोक्ष नाही. जोपर्यंत मी मुनी आहे असा विकल्प आहे तोपर्यंत तो संसारीच आंहे. सर्व पर्यायांच्या अतीत मी ध्रुवशुद्ध चैतन्यस्वरूप आहे असे निर्विकल्प स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञान मोक्षाचे कारण आहे.

परद्रव्य, परभाव, पर्याय व गुणभेदापासून भिन्न ध्रुव शुद्धचैतन्य स्वरूप

आत्मा मी आहे असा स्वस्वरूपाचा अनुभव करण्याचा सतत पुरुषार्थ करावा.

स्वतंत्रता सर्व जीवांना प्रिय आहे. परंतु ती स्वतन्त्रता काय वस्तु आहे व ती कशी प्राप्त होते ? या दोन्ही संबंधी अज्ञान असल्यामुळे हा परतन्त्र असणारा जीव योग्य उपायांच्या द्वारे स्वतंत्रता प्राप्त करण्यास असमर्थ असतो. हा जीव सासू-सासरे, आईवडील, पतिपत्नी, आपल्यावरील अधिकारी यांच्या अधीनतेतून सुटणे म्हणजे स्वतन्त्रता मानतो. म्हणून यांच्यापासून दूर होण्याचा प्रयत्न करतो. परंतु यांच्या अधीन आपल्याला करणारा सर्वात मोठा अधिकारी आठ कर्म व आपले विकार आहेत, हे या जीवाला माहीत नाही. वास्तविक **शरीराच्या तावडीतून, शुभाशुभ कर्मांच्या तावडीतून व विकारांच्या तावडीतून सर्वथा सुटणे म्हणजे स्वतन्त्रता होय.**

मोक्षप्राप्ती म्हणजे जीवनस्वातन्त्र्य. हा जीव मोक्षाला जातो म्हणजे पूर्ण पराधीनता नष्ट होऊन पूर्ण स्वाधीन होतो. शरीर, कर्म व विकारांपासून मुक्त होतो. ही स्वतन्त्रता प्राप्त करण्याचा उपाय आहे, संवर व निर्जरा. नवीन विकार उत्पन्न न होणे हा संवर होय व पूर्वी केलेल्या विकारांचे फळ भोगून त्याला समूळ नष्ट करणे म्हणजे निर्जरा होय.

रोगातून मुक्त होण्यासाठी वैद्यलोक दोन उपाय सांगतात. लंघन (काही न खाणे) व विरेचन (पोट साफ करणे). नवीन रोग उत्पन्न होवू नये म्हणून लंघन सांगतात व जो शरीरात मलसंचय झाला आहे तो काढून टाकण्यासाठी विरेचन घ्यायला सांगतात. अर्थात लंघन म्हणजे संवर व विरेचन म्हणजे निर्जरा. आता पुढचा प्रश्न उत्पन्न होतो की त्या संवर-निर्जरेचा उपाय काय आहे ? सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्राची एकता हाच संवरनिर्जरेचा उपाय आहे; म्हणून यालाच मोक्षमार्ग म्हटले आहे.

पुन्हा पुढचा प्रश्न उत्पन्न होतो की सम्यग्दर्शनादिकांचे स्वरूप काय आहे व त्याला प्राप्त करण्याचा उपाय काय आहे ? स्वपराचे भेदज्ञान होऊन स्वत:च्या शुद्ध आत्म्याची प्रतीती होणे म्हणजेच सम्यग्दर्शन आहे. शुद्ध आत्म्याची प्रतीती होण्यासाठी आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाची ओळख होणे आवश्यक आहे. त्या आत्म्याची ओळख करून देणारी ही प्रवचनसारची १७२ नंबरची गाथा आहे. आत्मा अरस, अरूपी, अगंध, अव्यक्त, अशब्द, अलिंगग्रहण व अनिर्दिष्टसंस्थान (निराकार) असून चेतनागुणवाला आहे.

या विशेषणांपैकी 'अलिंगग्रहण' या विशेषणाचे वीस अर्थ केले आहेत.

त्यापैकी सतरा अर्थाचा खुलासा पूर्वीच्या लेखांमध्ये केला आहे.

१८) अठरावा बोल – न लिंगं गुणो ग्रहणमर्थावबोधो यस्येति गुणविशेषानालीढशुद्धद्रव्यत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = गुण असा, ग्रहण = अर्थावबोध (पदार्थज्ञान)

ज्याचा गुण असा अर्थावबोध (पदार्थज्ञान) नाही तो अलिंगग्रहण होय. यावरून 'आत्मा' गुणविशेषाने व्याप्त न होणारे शुद्धद्रव्य आहे, अशा अर्थाची प्राप्ती होते.

आत्मा गुणभेदांनी रहित अखंड –

आत्मा एक वस्तू आहे. पदार्थ आहे. वस्तू म्हटल्यानंतर त्यामध्ये गुण राहणारच; कारण ज्यामध्ये गुण वास करतात त्यालाच वस्तू म्हणतात. प्रत्येक वस्तू आपापल्या अनंतगुणांनी भरलेली आहे. आत्मा पण अनंतगुणांचा पिंड आहे. त्यामध्ये ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य, प्रभुत्व, विभुत्व, जीवत्व इत्यादी अनंत विशेष गुण आहेत. तसेच अस्तित्व, वस्तुत्व, प्रमेयत्व इत्यादी अनंत सामान्य गुण आहेत. जरी त्यामध्ये अनंतगुण आहेत तरी त्यातील गुण विखरून वेग वेगळे होत नाहीत. ते सर्व एकरसरूप होऊन एकत्र राहतात. अनंत गुणांचा एक मिलित आस्वादरूप अखंड आत्मा आहे.

ज्याप्रमाणे सोने आहे त्यामध्ये पिवळेपणा, जडपणा, स्निग्धता, सुवर्णपणा इत्यादी अनेक गुण आहेत. तो सर्व गुणांचा अभेदात्मक समूह म्हणजेच सोने आहे. त्यातील एक गुण जरी नष्ट झाला तरी त्याला सोने म्हणता येणार नाही. सोन्याचा एखादा दागिना करायचा असेल तर सोनाराकडे जातो व सोन्याची सर्व चौकशी करतो. त्यामधील गुणांची परीक्षा करतो. सर्व गुण त्यामध्ये आहेत याची खात्री करून दागिना बनवितो. दागिना बनेपर्यंत सर्व विकल्प केले तोपर्यंत आनंद येत नाही. ज्याक्षणी सोन्याचा दागिना हातात येतो व ते आपल्या अंगावर परिधान करतो तेव्हा सर्व विकल्प समाप्त होतात व आनंद येतो. त्याप्रमाणे आत्मा वस्तू काय आहे हे समजून घेण्यासाठी त्यामध्ये गुणभेद करून त्याचे विश्लेषण केले जाते. ज्यामध्ये ज्ञान, दर्शन, चारित्र इत्यादी गुण आहेत तो आत्मा आहे. ज्याला सुखाची आनंदाची अनुभूती होते तो आत्मा आहे. वस्तूचा निर्णय करेपर्यंत सर्व विकल्प उत्पन्न होतात. तोपर्यंत निर्विकल्प आनंद मिळत नाही. जेव्हा आत्म्याचा निर्णय करून निर्विकल्प होऊन अखंड गुणपिण्ड स्वरूप आत्म्याची अनुभूती करतो तेव्हा अतींद्रिय

आनंद उत्पन्न होतो. म्हणून गुणभेदाने रहित आत्मा सम्यग्दर्शनाचा विषय आहे. गुणभेद असताना ही गुणभेदाचा स्पर्श करीत नाही.

व्यवहारनयाने आत्म्यामध्ये ज्ञान, दर्शन, चारित्र, स्वच्छत्व आदि अनंत गुण आहेत. एक गुण अन्य गुणरूप होत नाही. म्हणून गुणभेद आहे. गुणभेद नसता तर गुणांची संख्या अनंत मानता येणार नाही. परंतु आत्मा त्रिकाली गुणांचा पिंड आहे. एक-एक गुणरूप नाही. तो सामान्य आहे. गुण विशेषरूप आहेत. सामान्य सामान्यामध्ये आहे. विशेष विशेषामध्ये आहे. सामान्यामध्ये विशेष नाही. विशेषामध्ये सामान्य नाही, अनंतगुणांचा समूहरूप एकाकार आत्मा मात्र ज्ञानगुणाला स्पर्श करीत नाही. शुद्ध द्रव्य शुद्ध एकरूप आहे. त्यामध्ये गुणगुणी भेद केला तर विकल्प उत्पन्न होतात. आत्मा गुणभेदाला ही स्पर्श करीत नाही, म्हणून त्याला अलिंगग्रहण म्हटले आहे.

१९) एकोणीसावा बोल – न लिंगं पर्यायो ग्रहणमर्थावबोधविशेषो यस्येति पर्यायविशेषानालीढशुद्धद्रव्यत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = पर्याय, ग्रहण = अर्थावबोधविशेष.

पर्याय असा अर्थावबोध ज्याचा नाही तो अलिंगग्रहण आहे. अशाप्रकारे आत्मा पर्यायविशेषाने स्पर्शित न होणारे शुद्धद्रव्य आहे. या अर्थाची प्राप्ती होते.

गुणांच्या विकाराला पर्याय म्हणतात. द्रव्याच्या परिणमनाला पण पर्याय म्हणतात. पर्याय क्षणिक आहे. अनित्य आहे. पर्याय उत्पन्न होतो नष्ट होतो. पर्याय म्हणजे कालक्रमाने होणारी द्रव्याची विशेषता आहे. परंतु एक पर्याय म्हणजे पूर्ण द्रव्य नाही. जर एक पर्यायरूपाने द्रव्याला पाहिले तर पर्यायाचा नाश झाला की द्रव्यच नष्ट झाले असे मानून जीव दु:खी होतो. परंतु पर्यायाचा नाश झाला तर द्रव्याचा नाश होत नाही. पर्याय एक-एक समयवर्ती आहे. द्रव्य त्रिकाली आहे. ज्याप्रमाणे सोने एक द्रव्य आहे व त्याचे कुंडल, कंकण, अंगठी, चेन इत्यादी पर्याय आहेत. सोने त्या त्या पर्यायरूपाने परिणमले, परंतु कोणत्याही एका पर्यायरूपाने स्थिर राहिले नाही. ते प्रत्येक पर्यायामध्ये आपल्या स्वभावरूपाने स्थिरच आहे. त्याप्रमाणे आत्मा एक द्रव्य आहे. मनुष्य, देव, नारक, तिर्यंच, सिद्ध इत्यादी पर्याय आहेत. पर्याय प्रत्येक समयाला भिन्नभिन्न आहे, पण आत्मा एकरूप आहे. तो जर समयवर्ती पर्यायरूप झाला तर द्रव्य व पर्याय हे दोन राहणार नाहीत. ज्याप्रमाणे पर्याय क्षणिक आहे

त्याप्रमाणे द्रव्यसुद्धा क्षणिक होईल अर्थात द्रव्य अनादिअनंत राहणार नाही.

अज्ञानी स्वत:ला विकारीपर्यायरूपाने स्वीकारतो मी रागी, द्वेषी, मोही, क्रोधी, मानी, मायावी आहे असे मानतो, परंतु त्याचा आत्मासुद्धा कधी विकारी भावाला स्पर्श करीत नाही. तो सुद्धा स्वभावाने विकाररहितच आहे, शुद्धद्रव्य जर विकाररूप झाले तर ते कधी विकार रहित शुद्ध होऊ शकणार नाही. येथे तर त्याच्या ही पुढे जाऊन सांगतात की विकारपर्याय तर दूर, आत्मा शुद्ध निर्मल पर्यायाला सुद्धा स्पर्श करीत नाही. कारण आत्मा नित्य शुद्ध द्रव्य आहे. निर्मल पर्याय तर आता वर्तमानात उत्पन्न झाली. तू तर अनादिकालापासून आहेस. निर्मल पर्याय अनित्य आहे. त्यावरून आपली दृष्टी हटवून नित्य शुद्ध एकरूप अभेद द्रव्य आहे त्यावर दृष्टी करावी. तसे करण्याने सम्यग्दर्शनरूप निर्मल पर्याय प्रगट होते. निर्मल पर्यायाच्या लक्षाने निर्मल पर्याय उत्पन्न होत नाही. 'पर्यायदृष्टी विनश्वर, द्रव्यदृष्टी जिनेश्वर' हे वचन सत्य आहे. जो पर्यायाकडे दृष्टी ठेवतो, पर्यायाचा आश्रय घेतो त्याला चार गतिरूप विनश्वर पर्याय प्राप्त होते. जो ध्रुव द्रव्यावर दृष्टी ठेवतो, ध्रुव द्रव्याचा आश्रय घेतो, त्याला जिनेश्वररूप सिद्ध पर्याय प्राप्त होते.

नित्यवस्तूच्या लक्षाने निर्मलता वाढत जाऊन परिपूर्ण निर्मलता प्राप्त होते हे तात्पर्य आहे.

२०) वीसावा बोल – न लिंगं प्रत्यभिज्ञानहेतुर्ग्रहणमर्थावबोधसामान्यं यस्येति द्रव्यानालीढशुद्धपर्यायत्वस्य (प्रतिपत्तिः)।

अ = नाही, लिंग = प्रत्यभिज्ञानाचे कारण, ग्रहण = अर्थावबोध सामान्य.

अर्थात ज्यांचा हा प्रत्यभिज्ञानाला कारणभूत पदार्थ आहे' असा बोध होत नाही. यावरून 'आत्मा द्रव्याने अस्पर्शित शुद्धपर्याय आहे' अशा अर्थाची प्राप्ती होते.

पूर्वी अनुभविलेल्या वस्तूची आठवण होणे त्यास स्मृती म्हणतात व ती वस्तू प्रत्यक्षात पाहिली की पूर्वीची स्मृति व वर्तमानातील प्रत्यक्ष या दोन्हींचे जोडरूप ज्ञान उत्पन्न होते, त्यास प्रत्यभिज्ञान म्हणतात. जसे– ती ही बाहुबलीची मूर्ती आहे. प्रत्येक परिचित वस्तूला अथवा व्यक्तीला आपण प्रत्यभिज्ञानाने जाणत असतो.

प्रत्यभिज्ञानाला कारण सामान्यद्रव्य आहे. अनेक पर्यायांमध्ये व्यापक

अलिंगग्रहणाचे वीस बोल			
अ चा अर्थ	**लिंग चा अर्थ**	**ग्रहण चा अर्थ**	**कोणत्या अर्थाची प्राप्ती होते**
१) नाही	इन्द्रियाद्वारे	जाणणे (ग्राहक)	आत्मा अतीन्द्रिय ज्ञानमय आहे
२) नाही	इन्द्रियाद्वारे	जाणणे (ग्राह्य)	आत्मा इन्द्रियप्रत्यक्षाचा विषय नाही
३) नाही	इन्द्रियगम्य लिंग	जाणणे (ज्याला)	आत्मा इन्द्रियप्रत्यक्षपूर्वक अनुमानाचा विषय नाही.
४) नाही	लिंगावरून(साधनावरून)	दुसऱ्यांकडून ग्रहण (ज्यांचे)	आत्मा केवळ अनुमानाने जाणण्यायोग्य नाही.
५) नाही	लिंगावरून	दुसऱ्यांचे ग्रहण ज्याला	आत्मा अनुमाता नाही अर्थात् अनुमानाने जाणणारा नाही.
६) नाही	लिंगावरून	स्वभावाने ग्रहण ज्याचे	आत्मा प्रत्यक्ष ज्ञाता आहे.
७) नाही	उपयोग नामक	ज्ञेयपदार्थाचे आलम्बन	आत्म्याला बाह्य पदार्थांच्या अवलम्बनाने ज्ञान नाही.
८) नाही	उपयोग नामक	स्वयं बाहेरून आणण	आत्मा बाहेरून कोठून न जाणण्यायोग्य ज्ञानयुक्त लक्षणाचा आहे.
९) नाही	उपयोग नामक	पराकडून हरण	आत्म्याच्या ज्ञानाचे हरण केले जाऊ शकत नाही.
१०) नाही	उपयोग नामक	सूर्याप्रमाणे ग्रहण	आत्मा शुद्धोपयोग स्वभावी आहे.
११) नाही	उपयोग लक्षणामध्ये	पौद्गलिक कर्माचे	आत्मा द्रव्यकर्मापासून असंयुक्त आहे.
१२) नाही	इन्द्रियांच्याद्वारे	विषयांचा उपयोग ज्याला	आत्मा विषयांचा उपभोक्ता नाही.
१३) नाही	इन्द्रियांच्याद्वारे	जीवत्वाला धारण करणे	आत्मा रजवीर्याचे अनुसार करणारा नाही.
१४) नाही	मेहनाकार (पुरुषादि इन्द्रियाचा आकार)	ग्रहण ज्याला	आत्मा लौकिक साधनमात्र नाही.
१५) नाही	अमेहनाकाराने	लोकामध्ये व्यापकपणा	आत्मा पाखंडींना प्रसिद्ध लोकव्याप्तिवाला नाही.
१६) नाही	स्त्रीपुरुष नपुंसक	ग्रहण ज्याला	आत्मा द्रव्य व भावाने स्त्री, पुरुष वा नपुंसक नाही.
१७) नाही	धर्मचिन्हांचे	ग्रहण ज्याला	आत्म्याला बहिरंग मुनिलिंगाचा अभाव आहे.
१८) नाही	गुण असे	अर्थावबोध ज्याला	आत्मा गुणविशेषाने अस्पर्शित अभाव आहे.
१९) नाही	पर्याय असे	अर्थावबोध ज्याला	पर्यायविशेषाने आलिंगित न होणारे शुद्धद्रव्य आहे.
२०) नाही	प्रत्यभिज्ञानाचे	अर्थावबोध सामान्य	आत्मा द्रव्याने अस्पर्शित शुद्धपर्यायत्व आहे.

असणाऱ्या सामान्याच्या आश्रयाने प्रत्यभिज्ञान उत्पन्न होते. येथे शुद्ध वस्तूला त्या सामान्य अंशापासून भिन्न सिद्ध करायचे आहे. पर्यायत्व हा पण एक धर्म आहे. त्या पर्यायत्व धर्माकडून अभेद करून अखंड वस्तूला ग्रहण करविणे येथे प्रयोजनभूत आहे. ज्यावेळी पर्यायत्व धर्माकडून आत्मा जाणतो तेव्हा आत्मा शुद्धपर्यायभूत होतो. येथे आत्म्याला केवळ पर्यायरूप सिद्ध न करता शुद्ध पर्यायत्व धर्मापासून अभिन्न सिद्ध करणे प्रयोजनभूत आहे.

१८व्या बोलामध्ये गुणभेदापासून भिन्न शुद्धद्रव्यत्वाची प्रतीती करविली, १९व्या बोलामध्ये पर्यायभेदापासून भिन्न शुद्धद्रव्यत्वाची प्रतीती करविली. २०व्या बोलामध्ये द्रव्यत्वापासून भिन्न शुद्धपर्यायत्वाची प्रतीती करविली आहे. वास्तविक आत्मा द्रव्यत्व, गुणत्व, पर्यायत्व या तिन्ही धर्मांचा अखंड पिण्ड आहे.

आपल्या स्वभावाचा अखंडपणा विसरून अज्ञानी परामध्ये अखंडपणाची कल्पना करतो. ज्याप्रमाणे लौकिकामध्ये कुणाजवळ ५ करोड रुपयांची संपत्ती असेल तर त्याचा मुलगा, मुलगी, सून सर्वजण असे मानतात की आम्ही ५ करोडाचे मालक आहोत. घरामध्ये २५ व्यक्ती असतील तर एकेकाला पंचविसावा भाग वाटणीला येतो तरीसुद्धा प्रत्येकजण म्हणतो की आम्ही ५ करोडाचे स्वामी आहोत. तेथे खण्ड-भेद करीत नाही. कारण तेथे पराची रूची आहे. बाहेरचे संयोग कधीही आपल्या बरोबर राहू शकत नाहीत ते संयोग कधीही आपले होऊ शकत नाहीत, अखण्ड तर आपल्याशी होऊ शकत नाहीत तरीपण अज्ञानी त्यामध्ये अभेद मानून सुख मिळण्याची आशा करतो हा त्याचा मोह आहे. ज्यापासून भेद आहे त्यापासून अभेदाची प्रतीती करतो व ज्यापासून अभेद आहे त्यापासून भेदाची प्रतीती करतो.

आत्मा स्वयं अखण्ड वस्तू आहे. तो परपदार्थापासून भिन्न, विकारापासून भिन्न, गुणभेदा-पासून भिन्न आणि पर्यायभेदाने रहित आहे. धर्माची रूची असणाऱ्या जीवाला त्रिकाली स्वरूपाची श्रद्धा करावावी. ज्याला संसाराचा नाश करायचा असेल त्यांनी अखंड ज्ञायक स्वभावाची श्रद्धा करावी. आत्म्याला परद्रव्य, परभाव, स्वत:चे विकारी भाव, द्रव्यकर्म, भावकर्म गुणभेद, पर्यायभेद यापासून भिन्न दाखविण्यासाठी अलिंगग्रहणाचे २० अर्थ केले आहेत.

पूर्व गाथेमध्ये आत्म्याचे असाधारण लक्षण सांगितले आहे. आत्मा रसरहित, रूपरहित, गंधरहित, शब्दरहित, स्पर्शरहित असल्यामुळे अरस, अरूपी, अगंध, अस्पर्श व अशब्दस्वरूपी आहे व चेतना गुणवाला आहे. या पूर्वीच्या गाथांमध्ये आत्मा पुद्गलाच्या बंधाचा कर्ता नाही हे सिद्ध करताना युक्ती सांगितली होती की पुद्गलाच्या स्पर्शगुणाची स्निग्ध- रूक्षपर्याय पुद्गलांच्या परस्पर बंधाचे कारण आहे. जीव पुद्गलपिण्डाचे कारण नाही. यावरून शिष्याच्या मनात सहजच शंका उत्पन्न झाली आहे की अमूर्त आत्म्यामध्ये स्निग्ध-रुक्षत्वाचा अभाव आहे तर याचा कर्मांशी बंध कसा ? त्यालाच पूर्वपक्ष म्हणून या गाथेमध्ये आचार्य प्रस्तुत करीत आहेत.

मुत्तो रुवादिगुणो बज्झदि फासेहिं अण्णमण्णेहिं ।
तव्विवरीदो अप्पा बंधदि किध पोग्गलं कम्मं ।।१७३ ।।

अन्वयार्थ – (मुत्तो) मूर्त पुद्गल **(रुवादिगुणो)** रूपादिगुणयुक्त आहे. त्यामुळे **(अण्णमण्णेहिं फासेहिं)** परस्पर स्पर्शांनी **(बज्झदि)** बंधाला प्राप्त होतो. परंतु **(तव्विवरीदो)** त्याहून विपरीत अमूर्तिक असा **(अप्पा)** आत्मा **(पोग्गलं कम्मं)** पौद्गलिक कर्माला **(किध)** कसा काय **(बंधदि)** बांधतो ?

तात्पर्य – अमूर्तिक आत्म्याचा मूर्तिक कर्माशी बंध कसा होतो ?

आत्मा व कर्मबंधासंबंधी शंका –

एका पुद्गलाचा दुसऱ्या पुद्गलाशी कसा बंध होतो याचे वर्णन पूर्वी १६४ ते १६७ गाथांपर्यंत केले आहे. पुद्गलामध्ये स्पर्शरसगंधवर्ण हे गुण आहेत. त्यापैकी स्पर्शगुणाचे शीत, उष्ण, स्निग्ध, रूक्ष, हलका, भारी, कठिण, मऊ हे आठ पर्याय आहेत यापैकी स्निग्ध व रूक्ष गुणपर्याय बंधासाठी कारणभूत आहे. स्निग्ध व रूक्षगुणपर्यायांचे अविभाग प्रतिच्छेद जघन्यापासून एक एक गुण अधिक होत अनन्तापर्यन्त असू शकतात. जघन्य म्हणजे सर्वात कमी. जेव्हा परमाणु जघन्य स्निग्ध रूक्ष गुणाने परिणत होतो तेव्हा तो बंधास योग्य नाही अर्थात त्याचा दुसऱ्या परमाणूशी बंध होत नाही. जेव्हा जघन्य गुणापेक्षा अधिक गुणरूपाने परिणमतो तेव्हा तो बंधास योग्य होतो व त्यापेक्षा दोन अधिक गुणयुक्त परमाणूशी त्याचा बंध होतो. दोन मूर्तिक पुद्गलामध्ये स्निग्धरूक्षत्व गुण असल्यामुळे परस्पर बंध होणे शक्य आहे. परन्तु तो बंध आत्मा व कर्मपुद्गलामध्ये कसा शक्य आहे ? कारण मूर्तिक कर्मपुद्गलामध्ये तर यथायोग्य स्निग्धत्व-रूक्षत्व गुण सभंव आहे. कारण तो रूपादिगुणयुक्त

आहे, परंतु आत्मा रूपादिगुणरहित अमूर्तिक आहे. त्यामध्ये स्निग्ध-रूक्षत्व गुण संभवत नाही तर त्या आत्म्याचा कर्मपुद्गलाशी बंध कसा होऊ शकणार ? बंधाच्या दोन बाजू आहेत. एक बाजू बंधाच्या कारणाने सहित आहे व एक बाजू रहित आहे. तर त्या दोघांचा बंध कसा होणार ?

परम पवित्र शुद्ध ऐश्वर्यवान चैतन्य प्रभू स्वतन्त्र आत्मदेव आहे. त्याला बंधन कसे ? कर्म तर त्याला स्पर्श करू शकत नाही तर मग त्याला कर्म कसे बांधतो, त्यामुळे परतन्त्रता कशी आली ? ही शंकाकाराची जिज्ञासा आहे. त्याचेच समाधान आचार्य पुढील गाथेत करतात. -

रूवादिएहि रहिदो पेच्छदि जाणादि रुवमादीणि।
दव्वाणि गुणे य जधा तध बंधो तेण जाणीहि ।।१७४।।

अन्वयार्थ -(जधा) ज्याप्रमाणे **(रूवादिएहि रहिदो)** रूपादिरहित जीव **(रुवमादीणि)** रूपादिक **(दव्वाणि गुणे य)** द्रव्यांना व गुणांना (रूपी द्रव्यांना व त्यांच्या रूपादि गुणांना) **(पेच्छदि जाणदि)** पाहतो व जाणतो **(तध)** त्याप्रमाणे **(तेण)** त्याच्याशी **(बंधो)** बंध **(जाणीहि)** जाणा.

तात्पर्य - अरूपी आत्मा जसे रूपी द्रव्याला जाणतो तसे जीव रूपी पुद्गल कर्माला बांधतो.

प्रश्नांचे उत्तर प्रतिप्रश्नाने-

कधी कधी प्रश्नाचे उत्तर प्रति प्रश्नाने दिले जाते. आत्मा अमूर्तिक असताना सुद्धा तो मूर्तिक कर्मपुद्गलांशी कसा बंधाला प्राप्त होतो ? या प्रश्नाचे उत्तर देताना आचार्य प्रतिप्रश्न करतात की आत्मा अमूर्तिक असताना सुद्धा तो मूर्तिक पदार्थांना कसा जाणतो ? जसा तो मूर्तिक पदार्थांना जाणतो तसाच तो मूर्तिक कर्म पुद्गलांशी बांधला जातो.

पराला जाणण्याचा संबंध -

आत्मा मूर्तिक पदार्थाला जाणतो तेथे अमूर्तिक आत्म्याचा मूर्तिक पदार्थाबरोबर कोणताही संबंध नाही. त्याचा फक्त त्या मूर्तिक पदार्थाच्या आकाररूप होणाऱ्या ज्ञानाबरोबर संबंध आहे. त्या पदार्थाकार ज्ञानाच्या संबंधामुळेच अमूर्तिक आत्मा मूर्तिक पदार्थाला जाणतो असा अमूर्तिक-मूर्तिकाचा संबंध रूप व्यवहार सिद्ध होतो. ज्याप्रमाणे एक बालक मातीच्या बैलाला (खेळण्यातील बैलाला) पाहतो, जाणतो आणि म्हणतो की हा बैल माझा आहे. हे खेळणे माझे आहे. आता सांगा त्या मुलाचा त्या मातीच्या

बैलाशी संबंध कसा झाला ? तो मुलगा असे का मानू लागला. वास्तविक मुलगा वेगळा आहे आणि मातीचा बैल वेगळा आहे. त्या दोघांमध्ये संबंध कसा बनला ? त्याचप्रमाणे शेतकरी खऱ्या बैलाला पाहतो व जाणतो आणि म्हणतो की हा माझा बैल आहे. वास्तविक त्या शेतकऱ्याचा त्या बैलाशी कोणताही संबंध नाही. तर त्याचा संबंध कसा झाला ? जो संबंध आहे तो वास्तविक नाही. ज्ञानाच्या विषयभावाला प्राप्त झालेला बैल आहे त्याला निमित्त करून जो उपयोगामध्ये बैलाचा आकार प्रगट झाला त्याचे ज्ञानामध्ये ग्रहण झाले. त्या बैलाच्या ज्ञानाचा सम्बन्ध बैलाच्या संबंधाचा साधक आहे. परमार्थाने आत्म्याचा पर पदार्थांशी ज्ञेय-ज्ञायक संबंध आहे. स्वस्वामिसंबंध नाही.

जेवढा बाह्य परिग्रह आहे, त्याच्याशी आत्म्याचा काय संबंध ? घर, शेतीवाडी, स्त्री, पुत्र, मित्रादी, सोने, चांदी, भांडी, कपडे आदी बाह्य पदार्थांना हा अज्ञानी जीव आपले म्हणतो. वास्तविक बाह्य पदार्थांचा आत्म्याशी काही संबंध नाही. केवळ हे आपल्या ज्ञानामध्ये झळकत आहेत. ज्ञानामध्ये या वस्तूंचा आकार प्रगट झाला. त्या ज्ञानघराशी, ज्ञानपुत्राशी याचा संबंध आहे व त्या ज्ञानामध्ये या वस्तू बाह्य निमित्तमात्र आहेत. एवढाच काय तो संबंध आहे. जो ज्ञानामध्ये आलेला आकार, त्या वस्तूंना जाणणे रूप ज्ञानाचे परिणमन त्यांच्या संबंधाच्या व्यवहाराला सिद्ध करतो.

आत्मा व कर्माच्या बंधाचा संबंध –

आत्मा अरूपी आहे, स्पर्शशून्य आहे त्यामुळे याचा कर्मपुद्गलाशी सम्बन्ध नाही. एकक्षेत्रावगाहामध्ये अवस्थित कर्मपुद्गलांचे निमित्त प्राप्त करून उपयोगामध्ये जो रागद्वेष भावांचा संबंध होतो तो कर्मपुद्गलांच्या बंधाच्या व्यवहाराचा साधक आहे.

ज्याप्रमाणे कोणी पुरुष स्त्री अथवा पुत्राशी खूप बांधलेला असतो त्यांच्या म्हणण्यानुसार चालतो, स्त्रीपुत्रांना सुखी करण्यासाठी खूप भावात्मक प्रयत्न करतो, त्यांना सोडून कोठे ही जात नाही. हे सर्व बंधन कोठून आले ? तो पुरुष तर एकदम वेगळा आहे. आपल्या स्वरूपामध्ये आहे. तो स्त्री व पुरुषाशी कसा बांधला गेला ? हा एक प्रश्न आहे. जर ते भिन्न भिन्न क्षेत्रामध्ये आहेत. जर त्यांचे भिन्न भिन्न अस्तित्व आहे तर पुरुष स्त्री व पुत्राच्या बंधनामध्ये कसा बद्ध झाला ? स्त्रीपुत्रादिकांना निमित्त करून उपयोगामध्ये जो प्रीतिरूप भाव होतो तो प्रीतिरूप परिणामच स्त्रीपुत्रांच्या व्यवहाराचा साधक आहे.

पुरुष किती लांब परदेशात जरी गेला तर पुन्हा आपल्या घरी येतो. त्याला कोण ओढून आणते ? कोणत्या दोरीने तो आपल्या घराशी बद्ध होता. तेथे फक्त रागभावाचे बंधन आहे. राग नसता तर तो घराकडे ओढला गेला नसता. हे रागभावाचे बंधनच बाहेरच्या बंधाचे साधक आहे. ज्या क्षणी स्त्री-पुत्रादि परवस्तूंसंबंधी राग नष्ट होतो. त्याक्षणी त्यांचा संबंध सुटतो जोपर्यंत रागाचे बंधन आहे तोपर्यंत बाह्यवस्तूशी बंधन आहे. चक्रवर्ती, राजा, महात्मा एवढ्या मोठ्या ऐश्वर्याचा त्याग कसा काय करू शकतात ? ते जाणतात की या परवस्तूंशी माझा वास्तविक संबंध नाही. आजपर्यंत यांच्या प्रेमामुळे मी संसारात बद्ध झालो. हे माझे नाहीत, मी त्यांचा नाही. अशाप्रकारे भावाचे बन्धन नष्ट होताच बाहेरचे बंधन आपोआप नष्ट होते.

त्याचप्रमाणे आत्म्याचा कर्मपुद्गलाशी वास्तविक कोणताही संबंध नाही ते आत्म्यापासून सर्वथा भिन्न आहेत तथापि रागद्वेषादी भाव करणाऱ्या आत्म्याला रागद्वेषादि भावांचे बन्धन असल्यामुळे त्या भावांमध्ये कर्मपुद्गल निमित्त आहे. म्हणून व्यवहाराने असे म्हटले जाते की या आत्म्याला कर्मपुद्गलांचे बन्धन आहे

ज्याप्रमाणे महिला कपड्याच्या दुकानात कपडे विकत घेण्यासाठी जाते. त्या दुकानात अनेक प्रकारच्या साड्या आहेत. वेगवेगळ्या रंगाच्या, वेगवेगळ्या डिझाईनच्या त्या सर्व साड्यांशी तिचा काहीही संबंध नाही. त्यातील एक साडी ती पसंत करते व ती ग्रहण करते त्यावेळी ती साडी तिची म्हटली जाते. त्या दुकानात असतानाच ती म्हणते ही साडी माझी आहे, बाकीच्या साड्या माझ्या नाहीत. त्याठिकाणी काय घडले की त्या साडीशी तिचा संबंध झाला ! तेथे फक्त त्या साडीसंबंधी तिला प्रेमभाव उत्पन्न झाला. त्या प्रेमभावाशी तिचा संबंध आहे व त्या प्रेमभावामध्ये निमित्त ती साडी आहे म्हणून त्या साडीशी तिचा संबंधांचा व्यवहार झाला. त्याचप्रमाणे अमूर्तिक आत्म्याचा मूर्तिक कर्मपुद्गलाशी कोणताही संबंध नाही. आत्म्याचा तर कर्मपुद्गल ज्यामध्ये निमित्त आहेत अशा रागद्वेषादिभावांशी संबंध आहे आणि त्या कर्मनिमित्तक रागद्वेषादि भावांशी संबंध असल्यामुळेच या आत्म्याचा मूर्तिक कर्मपुद्गलाशी बंध आहे असा अमूर्तिक मूर्तिकाचा बन्धरूप व्यवहार सिद्ध होतो.

जेथे भावबंधन नाही तेथे द्रव्यबन्धन पण नाही. वास्तविक या जीवाला अनुरागाचे भावबंधन आहे म्हणून इतर पदार्थांशी आपला संबंध जोडला आहे.

जेथे पर पदार्थाविषयी अनुरागच नाही तर त्या पर पदार्थांशी कोणताही संबंध नाही.

एकदा एक राजकुमार जंगलामध्ये रस्ता विसरला त्यामुळे भटकत जंगलात राहणाऱ्या एका साधूच्या आश्रमामध्ये गेला. साधूने त्याचा यथोचित सत्कार केला आणि त्याचा परिचय विचारला. राजकुमार म्हणाला, निर्मोही नगरीच्या निर्मोही राजाचा ज्येष्ठ पुत्र निर्मोही युवराज आहे. जंगलात रस्ता चुकल्यामुळे आपल्या आश्रमापर्यंत येऊन पोहचलो आहे. परिचय ऐकून साधू आश्चर्यचकित झाले की राजा निर्मोही, युवराज पण निर्मोही, आणि एवढेच नव्हे तर सर्व प्रजा निर्मोही. त्याची उत्सुकता इतकी वाढली की राजकुमाराला तेथेच बसवून तो स्वयं त्या नगरीत गेला.

नगरीच्या प्रवेशद्वाराजवळ पोहचताच त्याला छोटा राजकुमार हत्तीवर सवार होऊन जाताना दिसला. साधूला पाहून राजकुमार हत्तीवरून खाली उतरला आणि त्याला नमस्कार केला. साधूने त्याला म्हटले – 'तुमच्याकरिता एक वाईट बातमी घेऊन आलो आहे. तुमचा मोठा भाऊ वनात गेला होता तेथे त्याला एका वाघाने मारून टाकले.' राजकुमार म्हणाला – 'महाराज ! एका झाडावर दोन आंबे लागले होते, एक तुटून पडला, दुसरा अजून झाडाला लागलेला आहे ! तुटून पडणारा आंबा दुसऱ्या आंब्याला संदेश देत आहे की एक दिवस तुला पण माझ्यासारखे पडावे लागणार. तो पडणारच. तुम्ही एवढ्या छोट्या गोष्टीसाठी विनाकारण श्रम घेतले.' साधूने विचार केला, 'हा राजपुत्र खरोखर निर्मोही आहे. तरीपण अन्य लोकांची परीक्षा घेण्यासाठी पुढे जावे.

पुढे गेल्यावर साधूला एक स्त्री दिसली. चौकशी केल्यावर समजले की ही युवराज्ञीची दासी आहे. फूल आणण्यासाठी बागेत जात आहे. साधूने तिला ही गोष्ट सांगितली. दासीने उत्तर दिले – ''साधू महाराज ! जे फूल सकाळी उमलले आहे ते सायंकाळी कोमेजणार. यामध्ये काय आश्चर्य ? हे तर निश्चितच आहे.'' दासीचे उत्तर ऐकून साधूला आश्चर्य वाटले आणि विचार केला की येथील दासी सुद्धा निर्मोही आहे.

साधु पुन्हा पुढे गेला आणि युवराज्ञीच्या महालात पोहचला. तिने साधूला आसनावर बसवले व येण्याचे प्रयोजन विचारले – साधू म्हणाले, 'तुमच्याकरिता अत्यंत दुःखद समचार घेऊन मी आलो आहे. तुमचे सौभाग्य नष्ट झाले. तुम्ही विधवा झाला आहात.' युवराज्ञी म्हणाली – 'महाराज !

जेव्हा आमचा विवाह झाला तेव्हा दोन व्यक्तींचा संयोग झाला होता. त्याचवेळी हे निश्चित होते की दोघांपैकी एकाला पहिल्यांदा जावे लागणार. पत्नी पहिला जाईल किंवा पती. जेथे संयोग होतो तेथे वियोग सुद्धा अवश्य होतो. यामध्ये दुःखाची काय गोष्ट ?' साधू निरूत्तर झाला. तेथून तो राजकुमाराच्या आईजवळ गेला - तेथे सुद्धा युवराजाच्या आकस्मिक निधनाची गोष्ट सांगितली. राणी म्हणाली - 'महाराज मुलाला जेव्हा पहिल्यांदा ओटीत घेतले होते तेव्हापासूनच त्याची आयू एक-एक क्षणाने कमी होऊ लागली होती. ती आता समाप्त झाली. त्यामध्ये अनहोनी कशी ? जो उत्पन्न होतो तो अवश्य मरतो. संसाराचा असा नियमच आहे.' साधू गुपचुप तेथून निघून राजाच्या दरबारात पोहचला.

राजा जवळ जाऊन पुन्हा तीच गोष्ट सांगितली - राजा म्हणाला, 'महाराज आजपर्यंत संसारात कोणीसुद्धा अमर झाला नाही. जन्मासोबत मरण, उत्पत्ति बरोबर नाश अवश्यम्भावी आहे. याला कोणी रोखू शकले नाही व रोखू शकणार नाही. हा सृष्टीचा शाश्वत नियम आहे. साधूने जेव्हा हे सर्व पाहिले तेव्हा लक्षात आले की वास्तविक सर्व नगरीच निर्मोही आहे. येथे राजा, प्रजा सर्व निर्मोही आहेत तेव्हा तो नगरीतून परत आपल्या आश्रमात आला. रस्त्यात विचार करीत गेला की आता फक्त युवराजाच्या निर्मोहीपणाची परीक्षा घेणे बाकी आहे.

आश्रमात पोहचताच साधू युवराजाला म्हणाला, 'मला परत येण्यास उशीर लागला. तिकडे तुमच्या नगरीमध्ये आग लागली होती. त्यामध्ये तुमचे आई वडील, पत्नी, भाऊ सर्वजण जळून गेले. तर काही लोक वाचले आहेत. त्यांची व्यवस्था करण्यात मला वेळ लागला. राजकुमाराने लगेच उत्तर दिले - 'कुणाचा बाप, कुणाची आई, कुणाची पत्नी व कुणाचा भाऊ ? हे सर्व या शरीराशी संबंधित आहेत. त्यांचा माझा काय संबंध ? मी तर एकटाच आलो, एकटाच जाणार.'

अशी आहे भेदविज्ञानाची महिमा. मोहांध जीवांच्या हृदयामध्ये बाह्य स्त्री, पुत्र, शरीर आदि पदार्थ निजरूप भासित होतात, मोहरहित पुरुषांच्या हृदयामध्ये कर्मफलाने रहित अविनाशी आत्माच सदा निजरूप भासित होतो. आत्मा अमूर्तिक असताना सुद्धा तो मूर्तिक पुद्गलाशी कसा बांधला जातो या प्रश्नाचे उत्तर मागील गाथेमध्ये दिले. ज्याप्रमाणे आत्मा अमूर्तिक असताना

सुद्धा मूर्तिक पदार्थाला जाणतो तसा तो मूर्तिक कर्मपुद्‌गलाशी बंधाला प्राप्त होतो. ज्याप्रमाणे मनुष्याला स्त्रीपुत्रधनादिकाबरोबर वास्तविक कोणताही संबंध नाही. ते मनुष्यापासून सर्वथा भिन्न आहेत तथापि स्त्रीपुत्र-धनादिकासंबंधी प्रेम करणाऱ्या मनुष्याला प्रेमाचे बन्धन असल्यामुळे आणि त्या प्रेमामध्ये स्त्रीपुत्रधनादिक निमित्त असल्यामुळे व्यवहाराने असे म्हटले जाते की या मनुष्याला स्त्रीपुत्रधनादिकाचे बन्धन आहे. त्याप्रमाणे आत्मा त्या कर्मपुद्‌गलाशी वास्तविक कोणताही संबंध नाही, ते आत्म्यापासून भिन्न आहेत. तथापि रागद्वेषादी भाव करणाऱ्या आत्म्याला रागद्वेषादी भावांचे बंधन असल्यामुळे व त्या रागद्वेषादी भावांमध्ये कर्मपुद्‌गल निमित्त असल्यामुळे व्यवहाराने आत्म्याला कर्मपुद्‌गलांचे बंधन आहे असे म्हटले जाते. आता या गाथेत त्या भावबंधाचे स्वरूप सांगतात. -

उवओगमओ जीवो मुज्झदि रज्जेदि वा पदुस्सेदि ।
पप्पा विविधे विसये जो हि पुणो तेहिं सो बन्धो ।।१७५।।

अन्वयार्थ – (जो हि पुणो) जो **(उवओगमओ)** उपयोगमय जीव **(विविधे विसये)** अनेक प्रकारच्या विषयांना **(पप्पा)** प्राप्त करून **(मुज्जदि)** मोह करतो **(रज्जेदि)** राग करतो **(वा)** अथवा **(पदुस्सेदि)** द्वेष करतो **(सो)** तो जीव **(तेहिं)** त्या मोहरागद्वेषाशी **(बंधो)** बंधरूप आहे.

तात्पर्य – राग, द्वेष, मोह करणारा हा जीव निश्चयाने राग, द्वेष मोहाने बांधलेला आहे.

आत्मा उपयोगमय –

हा जीव स्वभावाने विशुद्ध उपयोगमय आहे. कारण तो सविकल्प आणि निर्विकल्प प्रतिभासस्वरूप आहे अर्थात् ज्ञान-दर्शनस्वरूप आहे. स्व-पराला जाणणे मात्र त्याचे कार्य आहे. शुद्ध उपयोगामध्ये राहणेच याचा धर्म आहे. ज्याप्रमाणे स्फटिक मण्याचा स्वभाव निर्मल सफेद आहे त्याप्रमाणे हा आत्मा शुद्ध आहे. परंतु संसारामध्ये प्रत्येक आत्मा प्रवाहरूपाने अनादिकाळा-पासून पुद्‌गलकर्माच्या उपाधीने सहित आहे. त्यामुळे शुद्ध ज्ञानदर्शन उपयोगामध्ये परिणमित न होता क्षयोपशम रूप मति-श्रुतज्ञानाने इंद्रिय व मनाच्या द्वारे जाणतो व पाहतो. त्यासोबत मोहाचा उदय आहे. त्यामुळे पाच इन्द्रियांच्या द्वारे ज्या ज्या पदार्थांना जाणतो त्यापैकी जे आपल्याला आवडतात त्यामध्ये मोह व राग करतो व जे आपल्याला आवडत नाहीत, अनिष्ट वाटतात त्यामध्ये द्वेष करतो. पदार्थांचे स्वरूप जसे आहे तसे भासित न होणे हा मोह

आहे.

आवडणे हा राग (प्रेम) आहे व अनिष्ट वाटणे हा द्वेष आहे. त्यावेळी हा आत्मा त्या मोह-राग-द्वेष भावांशी तन्मय होऊन रागी, द्वेषी, मोही होतो अर्थात् त्याचा उपयोग स्वभाव मलिन होतो. ज्याप्रमाणे स्फटिकमणी काळ्या, पिवळ्या, हिरव्या कागद किंवा कापडाच्या उपाधीच्या निमित्ताने आपल्या शुद्ध स्वभावाला झाकून काळा, पिवळा अथवा हिरवा भासित होतो, त्याप्रमाणे हा आत्मा रागद्वेषमोहामध्ये रंजायमान झाल्यामुळे रागी, द्वेषी, मोही होतो. त्यावेळी आत्म्याची स्वाभाविक वीतरागता झाकली जाते.

स्वतःला विसरून हैरान –

आपला जो सहज शुद्ध ज्ञानस्वभाव आहे त्याचे दर्शन होते व त्यामध्येच उपयोग रममाण होऊन संतोष प्राप्त करतो तर परमसुखाचा अनुभव करतो. उपयोग ही आत्म्याची विभूती आहे. जेव्हा तो या आपल्या चैतन्य घरातून बाहेर पडतो बाह्यवस्तूंकडे उपयोग लावतो तेथे तो आपल्या घरापासून दूर जातो तेव्हा तो घरोघरी भटकतो. ज्याप्रमाणे कोणी मनुष्य आपल्या घरातून रूसून घर सोडून पळून जातो तो पदोपदी ठोकर खातो. त्याचप्रमाणे हा आत्मा आपल्या प्रदेशांना अर्थात् स्वक्षेत्राला सोडून अज्ञानी होऊन कषायाने रंजित होऊन बाहेर भटकतो, बाह्य पदार्थांकडे पाहत राहतो तो दारोदारी भटकतो, फिरतो. चौऱ्यांशी लाख योनीमध्ये फिरतो. संपूर्ण लोकामध्ये असा कोणताही प्रदेश शिल्लक नाही ज्या प्रदेशामध्ये ह्या जीवाने अनन्तवेळा जन्ममरण केले नसेल. तरीसुद्धा या मोही जीवाची खोटी सवय सुटली नाही की ज्या नगरामध्ये, ज्या घरामध्ये राहतो तेथील लोकांशी अहंभाव करतो. आपल्याच अपराधामुळे विभावांचे बिकट बन्धन झाले आहे.

आत्म्याशी वास्तविक बंधन मात्र विभाव –

वास्तविक जीवाबरोबर विभाव भावाचे बंधन लागलेले आहे, कोणत्या अन्य वस्तूचे बंधन नाही. आपल्या भावांनी स्वतःला बांधून घेतले आहे. या बन्धनामध्ये बाह्य पाच इंद्रियांचे विषय निमित्तभूत आहेत. रागादी भावांचे आश्रय आहेत तथापि आत्मा निर्विकल्प आहे. विषयांच्या अतीत आहे, परंतु आम्ही आपल्या शुद्ध स्वभावाची भावना करीत नाही स्वतःच्या प्रभूचा आदर करीत नाही म्हणून पंचेन्द्रिय विषयांचा उपद्रव सहन करण्याची आपत्ती येते. स्वतःचे भाव बिघडवले हा त्या जीवाचाच दोष आहे, निमित्ताचा

नाही.

एकदा एका जंगलामध्ये एक साधू बसले होते. त्यांच्याजवळ त्यांचा शिष्य बसला होता. त्याचवेळी एक व्यक्ती आली आणि साधूला बरे वाईट बोलू लागली. शेवटी रागारागाने थुंकून निघून गेली. साधू काहीच बोलले नाहीत. शिष्य म्हणाला 'काय नीच आहे, जाता जाता थुंकून पण गेला.' साधू म्हणाले, 'जे काम तो समोर करून गेला तेच काम तू त्याच्या पाठीमागे करीत आहेस. त्याच्यात व तुझ्यात काय अंतर ?' दुसऱ्या दिवशी तो मनुष्य आला व माफी मागू लागला. साधू म्हणाले, 'कालचे कृत्य पण तुझेच होते आणि आजचे कृत्य सुद्धा तुझेच आहे. माझे तर काही पण नाही. कालचे पण माझे नव्हते, आजचे पण माझे नाही. तुझ्या कृत्याचा तूच मालक आहेस. माझा तर त्याच्याशी काही संबंध नाही.'

आम्ही दुसऱ्याच्या कार्याला आपल्याशी जोडतो आणि मोह-राग-द्वेष करतो ही चूक आपली आहे. जर आपण त्याला आपल्याशी जोडले नाही तर त्याच्याशी आपला काही संबंध नाही. कुणाला कपडे खुंटीला टांगायचे आहेत. कपडे त्याचेच आहेत तो कशाला पण खुंटी बनवू शकतो. कपडे चांगले टांगले तरी किंवा वाकडे टांगले तरी त्या खुंटीचा काही संबंध नाही. ज्याने कपडे टांगले त्याचा संबंध आहे. साधू खुंटीचे काम करीत होते. ही गोष्ट समजली तर क्रोधादी करण्याचे प्रयोजन राहत नाही.

या जीवाला वास्तविक आपल्या भावांचे बंधन आहे. बंधन दोघांमध्ये असते. तेथे जीव एक आहे, व रागादी विकारी भाव दुसरे आहेत. त्या भावांशी जीवाचे बंधन आहे, रागादी परिणाम होण्यासाठी उदयागत कर्म निमित्त आहेत. ज्याप्रमाणे कोणी पुरुष जात आहे. त्याच्याबरोबर एक कुत्रा आहे. तो कुत्रा त्या मालकाच्या आधारामुळे कोणत्याही प्राण्यावर किंवा पुरुषावर हल्ला करतो. त्याचप्रमाणे रागद्वेषमोह होणे मालकाप्रमाणे आहेत. उदयागत कर्म कुत्र्याप्रमाणे आहेत. ते रागद्वेषमोहाचा संकेत प्राप्त करून आपल्यामध्ये प्रभुता प्रकट करते व नवीन कर्मांचा आस्रव करते.

वास्तविक जीव उपयोगमय आहे. त्यामुळे उपयोगाने युक्त होऊन अनेक प्रकारच्या ज्ञेयपदार्थांना जाणतो. त्या पदार्थांना केवळ ज्ञेयरूपाने न जाणता त्याच्याशी एकरूप होऊन मोहरागद्वेष उत्पन्न करतो आणि त्या मोहरागद्वेष भावामुळे द्वैतपणाला प्राप्त होतो. त्या मोहरागद्वेष भावांशी संबंध करतो.

आता या भावबंधाच्या दुर्घटनेमुळे पुन्हा द्रव्यबंधाला प्राप्त करतो. त्या भावबंधनाच्या युक्तीला व द्रव्यबंधाच्या स्वरूपाला पुढील गाथेत सांगतात. –

भावेण जेण जीवो पेच्छदि जाणादि आगदं विसये ।
रज्जदि तेणेव पुणो बज्झदि कम्म त्ति उवदेसो ।।१७६ ।।

अन्वयार्थ – (जीवो) जीव **(जेण भावेण)** ज्या मोहरागद्वेष परिणामाच्या द्वारे **(विसये आगदं)** विषयाला प्राप्त झालेल्या पदार्थाला **(पेच्छदि जाणादि)** पाहतो व जाणतो **(तेणेव)** त्याच्याद्वारेच **(रज्जदि)** उपरक्त होतो **(पुणो)** आणि त्यामुळेच **(कम्म बज्झदि)** कर्म बांधतो **(ति)** असा **(उवदेसो)** जिनेन्द्र भगवंतांचा उपदेश आहे.

आत्मा स्वभावाने वीतराग चैतन्यप्रभू आहे. तो उपयोग सामान्यस्वरूप आहे. त्यामुळे आकार आणि निराकार उपयोगरूपाने परिणमतो. त्या ज्ञानोपयोगाच्या विषयाला प्राप्त झालेल्या पदार्थसमूहाला आपले आहेत असे मानून मोहरूप परिणमतो, किंवा हे चांगले आहेत असे मानून रागरूप परिणमतो किंवा हे चांगले नाहीत असे मानून द्वेषरूप परिणमतो. ज्या मोहरूप, रागरूप, द्वेषरूप भावांनी युक्त होऊन जाणतो त्या भावांच्या द्वारेच रंगतो. हा रागद्वेषरूप उपराग द्रव्यकर्मांच्या बंधनामध्ये स्निग्धरूक्षत्वाचे काम करतो. पुद्गलामध्ये परस्पर स्निग्धत्व रूक्षत्वामुळे बंध होतो. येथे राग स्निग्धस्थानीय आहे व द्वेष रूक्षस्थानीय आहे. त्यामुळे द्रव्यकर्माच्या बंधनामध्ये ते निमित्त होतात.

आत्म्यामध्ये विभावाचे कर्तृत्व –

या जीवाने कर्मामध्ये काही केले असे नाही. कार्मण वर्गणा स्वयं कर्मरूपाने परिणमतात. जीव विभावरूप परिणमतो, आपले विचार खराब करतो. एवढे काम यामध्ये झाले की पुद्गलवर्गणेमध्ये स्वयं कर्मरूप परिणमन होते. ज्याप्रमाणे एक मुलगा दुसऱ्या मुलाला शिवी देतो, वेडवान दाखवितो. हे काम तो स्वतःमध्ये करतो. त्याला निमित्त करून दुसरा मुलगा त्याला बडवतो, तडाखे देतो, उलटे पुलटे करतो. पहिल्या मुलाचे तर एवढेच काम की त्यांनी आपले तोंड वाकडे केले, शिव्या दिल्या त्याचे काम समाप्त झाले, पण आता जे काही मार, तडाखा आदि बसायचा, तो त्याला बसणार. त्यांनी चूक आपल्यामध्ये केली. शिव्या दिल्या दुर्वचन बोलला. त्याचप्रमाणे या जीवाने केवळ आपले परिणाम बिघडविले. द्रव्यकर्मांना ओढून आणणे किंवा आपल्या प्रदेशांमध्ये विस्रसोपचय रूपाने राहणाऱ्या वर्गणांना कर्मरूप परिणमन

करविणे हे जीवाचे काम नाही. जीवाचे काम तर एवढेच आहे की तो आपला विभाव परिणाम करतो. मग जे परद्रव्यामध्ये होणार ते त्याच्या स्वतःच्या परिणतीमुळे होते.

विभावांच्या घाणीवर कर्मसंचय प्राकृतिक –

ज्याप्रमाणे मलीन शरीर असणारा पुरुष जंगलातून विचरण करतो तेव्हा माशा त्याच्या डोक्यावर आपोआप येऊन भिनभिनत त्याच्याबरोबर जातात. त्याचप्रमाणे मोहभावाने मलिन जीवाबरोबर द्रव्यकर्मांच्या माशा येतात व त्याच्याभोवती भिनभिनतात. ज्याप्रमाणे मलीन शरीरवाला माशांना प्रेरणा देत नाही, त्यांना पकडून आपल्याजवळ आणत नाही. त्याचे तर काम एवढेच आहे की गलिच्छ राहणे. मग जे काही होते. माशांचे येणे, भिनभिनणे, चिकटणे, हे सर्व त्या माशांमध्येच होत आहे. तेथे हा पुरुष काही करीत नाही. त्याचप्रमाणे आत्मा केवळ खराब परिणाम करतो, रागद्वेषमोहरूप परिणती करतो. अशा परिणामाचे निमित्त प्राप्त करून कार्माण वर्गणा स्वयं कर्मरूप परिणमतात. जीवाला जे बन्धन झाले ते त्याच्या स्वतःच्या चुकीमुळे, आपल्या अपराधामुळे झाले आहे.

संकटविनाशाचा उपाय–

हा जीव उपयोगमय आहे, पण अज्ञानामुळे उपयोगविशेषाने विशिष्ट होऊन बाह्य पंचेन्द्रिय विषयांचा आश्रय करून रागरूप, द्वेषरूप, मोहरूप परिणमतो. हा जीव आपल्या निर्मोह निर्विकार स्वभावाला प्राप्त करीत नाही तर कर्मबंधनाने जखडला जातो. ज्याप्रमाणे स्वतःच्या चुकीमुळे कोणी पुरुष करोडो रूपयांचे किमती रत्न हरवून बसतो व एवढेच नाही तर मोठ्या संकटात सापडतो त्याप्रमाणे अनन्त ऐश्वर्यांचा स्वामी हा प्रभू लुटला गेला. आणि लुटला गेला एवढेच नाही तर कर्मबंधनाच्या संकटात सापडला. हे सर्व एक आपल्या परमात्म–स्वरूपाच्या भावनेपासून दूर गेल्याचे फळ आहे. भावबंधनच द्रव्यबंधाचे निमित्त झाले, हे बन्धन तोडण्याचे सामर्थ्य आत्म्यामध्येच आहे. ज्याप्रमाणे ईंधन टाकून अग्नीला शांत केले जाऊ शकत नाही त्याप्रमाणे बाहेरच्या पदार्थांमध्ये रागद्वेषमोह करून शांती प्राप्त होऊ शकत नाही.

संकट दूर होण्याचा उपाय एकच आहे की मी कोण आहे ? माझे काय आहे ? आपले अस्तित्व काय आहे ? अशाप्रकारे विचार करून सम्यक्स्वरूपाचे स्वतःमध्ये अनुभव करणे.

ज्याप्रमाणे सफेद वस्त्र व स्वच्छ स्फटिकाला पाहण्याची इच्छा करणारा रंग व डाकाच्या संबंधाला सोडवितो त्याप्रमाणे आम्हाला शुद्ध आत्म्याचा लाभ होण्यासाठी रागद्वेषमोहरूप रंगाला व त्या निमित्ताने झालेल्या कर्मबंधनाला आत्म्यापासून दूर करावे व अभेद रत्नत्रयाच्या आश्रयाने स्वानुभवाच्या बलाने मोहाच्या बळाला निर्बल केले पाहिजे.

बंध ३ प्रकारचा आहे. १) पुद्गलबंध (द्रव्यबंध), २) जीवबंध (भावबंध), ३) उभयबंध (जीवपुद्गलबंध). आता पुढील गाथेमध्ये याच तीन प्रकारच्या बंधांचे स्वरूप सांगतात–

फासेहिं पोग्गलाणं बंधो जीवस्स रागमादीहिं ।
अण्णोण्णस्सवगाहो पुग्गलजीवप्पगो भणिदो ।।१७७।।

अन्वयार्थ – (फासेहिं) स्निग्ध रूक्ष स्पर्शांबरोबर **(पोग्गलाणं)** पुद्गलांचा **(बंधो)** बंध आहे. **(रागमादीहिं)** रागादी भावांशी **(जीवस्स)** जीवाचा **(बंधो)** बंध आहे. **(अण्णोण्णस्सवगाहो)** परस्पर अवगाह स्वरूप **(पोग्गलजीवप्पगो)** पुद्गल–जीवात्मक उभय बंध **(भणिदो)** सांगितला आहे.

तात्पर्य – कर्मवर्गणेच्या परस्पर बंधाला द्रव्यबंध, उपयोगामध्ये रागादिक होणे यांस भावबंध व जीव आणि कर्मपुद्गलाच्या परस्पर अवगाहाला उभयबंध म्हणतात.

द्रव्यबंधाचे स्वरूप –

या गाथेमध्ये बंधतत्त्वाचे वर्णन केले आहे वास्तविक दोन वस्तूंचे मिळून एकरूप होणे बंध आहे. बंध म्हटले की तेथे दोन घटक पाहिजेत.

पुद्गलाचा पुद्गलाबरोबर स्पर्शगुणाच्या द्वारे बंध होतो. स्निग्ध रूक्ष गुणाचे दोन अविभाग प्रतिच्छेद अधिक असताना परमाणू–परमाणूचा किंवा स्कंधांचा परस्पर मिळून एक बंधरूप स्कंध होतो. याचा खुलासा गा. १६८ आदी गाथांमध्ये केला आहे. परंतु येथे द्रव्यबंधामध्ये पुद्गलांचा केवळ स्पर्शत्व गुणामुळे होणारा स्कंधरूप बंध विवक्षित नाही. येथे जीवगत रागभावाचे निमित्त प्राप्त करून पूर्वबद्ध पुद्गलकर्मांशी नवीन कर्मांचा परस्पर विशिष्ट संयोग होतो त्यास द्रव्यबंध म्हटले आहे. जीवाच्या योगाच्या निमित्ताने कार्माण वर्गणा कर्मरूप परिणमतात. त्या नवीन कर्मवर्गणा पूर्वबद्ध सत्तारूप कर्माशी स्निग्धरूक्षत्व गुणामुळे एक बंधरूप होतात. येथे पूर्वबद्ध कर्म व नवीन कर्म या दोघांचा परस्पर बंध होतो म्हणून त्यास पुद्गल बंध म्हणतात.

भावबंधाचे विश्लेषण –

जीव वास्तविक निरुपराग परम चैतन्यस्वरूप आहे. जो जीव निज आत्मतत्त्वाच्या भावनेपासून च्युत होऊन विभावरूपाने परिणमतो. मोहनीय कर्माच्या उदयाचे निमित्त प्राप्त करून रागद्वेषमोहरूप भावाने परिणमतो. त्या रागादिकांशी जो जीवाचा एकत्वरूप परिणाम होतो तोच भावबंध आहे. त्यालाच जीवबंध म्हणतात. जीवद्रव्य व विभाव परिणाम याचे परस्परांमध्ये तन्मय होणेच जीवबंध आहे. स्वभाव तिरोहित होतो व विभाव व्यक्त होतो अर्थात स्वभाव विभाव परिणमनाच्या रूपाने प्रगट होतो तोच जीवबंध आहे. जीव जीवाशीच बांधलेला आहे. निश्चयाने पाहिले तर या जीवाने आत्मपरिणामाने स्वतःलाच बांधून घेतले आहे. त्यामध्ये निमित्त पर उपाधी आहे. पर उपाधीच्या सान्निध्याशिवाय जीवामध्ये विभाव परिणाम होऊ शकत नाही. स्फटिक स्वभावाने शुद्ध आहे. पण जेव्हा ते लाल-पिवळे इत्यादी परद्रव्याच्या सान्निध्यात येते तेव्हाच त्या उपाधीच्या निमित्ताने लाल-पिवळे रूपाने परिणमते. केवळ एकट्यामध्ये विभाव नाही व परद्रव्यामुळे ही विभाव नाही. जीव पर उपाधीचे निमित्त प्राप्त करून आपल्या योग्यतेने आपल्यामध्ये विभावांचे परिणमन करतो. परवस्तूमुळे पराचे बंधन नाही तर जीवाचे या रागादिक भावांशी एकस्वरूप परिणमनच बंधन आहे.

अज्ञानी जीव मानतो मी स्त्री-पुत्र-मित्रांशी बांधलेलो आहे. मी त्यांना सोडू शकत नाही किंवा त्यांनी मला बांधलेले आहे. वास्तविक पाहिले तर कोणी कुणाला बांधलेले आहे ? दोघे तर प्रत्यक्ष भिन्न दिसतात. त्यांच्यामध्ये दोरी वगैरेचे पण बंधन दिसत नाही. मग कसे काय बांधलेले आहेत ? त्या दोन जीवांमध्येही रागाचेच बंधन आहे. भलेही परवस्तू किती दूर असली तरी जोपर्यंत त्या परवस्तूशी रागाचा संबंध आहे तोपर्यंत त्याच्याशी बंधन असते. ज्यावेळी त्याच्याशी रागाचे बंधन तुटते त्यावेळी जवळ असला तरी कोणत्याही प्रकारचा आपला संबंध स्वीकारत नाही. लग्न होण्यापूर्वी पत्नीशी कोणताही संबंध नव्हता. तेथे राग झाला की संबंध सुरू झाला. पत्नीशी राग संपला. घटस्फोट झाला की बंध संपला. जोपर्यंत राग आहे तोपर्यंत पराशी बंध आहे, म्हणून जीव राग द्वेष मोहानेच बांधलेला आहे.

विजय राजांचे पुत्र वज्रबाहूचा विवाह मनोदया राजकुमारी बरोबर झाला होता. विवाहाच्या नंतर आपल्या बहिणीला माहेरी घेऊन जाण्यासाठी

उदयसुंदर मेहुणे आले होते. तेव्हा वज्रबाहू पत्नीवर तीव्र आसक्त असल्यामुळे तिच्याबरोबर सासरी जाण्यासाठी प्रस्थान केले. त्यांच्याबरोबर २६ राजकुमार मित्र व त्यांच्या राण्यासुद्धा होत्या. सर्वजण हत्तीवर बसून चालले होते. वाटेमध्ये जंगलात जात असताना वज्रबाहूचे लक्ष धानस्थ मुनिराजांच्याकडे वेधले गेले. अहो ! निर्ग्रन्थ दिगम्बर मुद्रा ! शांतरसाच्या अस्तिमध्ये मस्त आहेत. तपाच्या द्वारे शरीर दुर्बल झाले आहे, परंतु चैतन्याचे तेज सर्वांगामध्ये ओसांडत आहे. धन्य मुनिदशा ! ते स्वयं मोक्षमार्गावर आरूढ आहेत आणि मी संसाररूपी चिखलामध्ये फसलो आहे. मी एका स्त्रीमध्ये आसक्त होऊन मुक्तिलक्ष्मीपासून दूर जात आहे. अशाप्रकारे विचारामध्ये मग्न असतानाच उदयसुंदरनी त्यांना टोमणा मारला. 'काय विचार आहे ? काय तुम्हाला पण मुनी बनायचे आहे का?' तेव्हा वज्रबाहू म्हणाले, 'हो, मी जर दीक्षा घेतली तर तुम्ही पण घेणार का?' उदयसुंदरला वाटले हा इतका स्त्रीमध्ये आसक्त आहे. हा कसा दीक्षा घेईल ? म्हणून त्यांनी 'हो' म्हटले. तुम्ही दीक्षा घेतली तर मी पण घेणार आणि वज्रबाहू खरोखर दीक्षा घेण्यासाठी जाऊ लागले. उदयसुंदरनी क्षमा मागितली. 'मी तुमची चेष्टा केली. मला क्षमा करा. तुम्ही दीक्षा घेऊ नका.' मनोदयाने पण विनंती केली, 'स्वामी, आपण मला सोडून जाऊ नका.' परंतु आता राग विरागतेमध्ये परिवर्तित झाला होता. जोपर्यंत राग होता तोपर्यंत मनोदयेशी संबंध होता. रागच निघून गेल्यावर आता कसला संबंध. पूर्ण परिवाराला क्षमा मागून आचार्य गुणसागरांच्या जवळ जाऊन वज्रबाहूंनी मुनिदीक्षा घेतली. रानी मनोदया ही वीरपत्नी धर्मपत्नी होती. आत्महिताची सुंदरसंधी जाणून तिने सुद्धा आर्यिका दीक्षा घेतली. त्याचबरोबर उदयसुंदर, २६ राजकुमार व त्यांच्या राण्यांनी पण दीक्षा घेतली.

उभयबंधाचे विवरण –

जीव आणि कर्मपुद्गलाचा विशिष्ट परस्पर अवगाह होणे हा उभयबंध आहे. एकेका जीवाच्या प्रदेशामध्ये अनंत पुद्गल कर्मवर्गणांचा विशिष्ट अवगाह आहे. दोन्ही पदार्थ परस्परांमध्ये निमित्त आहेत. जीवाच्या रागादी भावांचे निमित्त करून कर्मांचा अवगाह आहे व कर्मपरिणामांना निमित्त करून जीवाचा हा अवगाह आहे. एका क्षेत्रामध्ये सहाही द्रव्यांचा परस्परामध्ये अवगाह आहे. परंतु त्या सर्व अवगाहांचे नाव बंध नाही, हा विशिष्टतर अवगाह आहे. ज्यामध्ये निमित्तनैमित्तिक रूप बंधन आहे. जीवाचे परिणाम

बदलले की कर्माच्या अवस्थेमध्ये आपोआप बदल होतो व कर्माची अवस्था बदलली की जीवाचे परिणाम बदलतात. असा विशिष्टतर परस्पर अवगाह जीवपुद्गलरूप उभयबंध आहे.

कोणताही पदार्थ आपल्या सत्तेमुळे आपल्या विनाशाला कारण नसतो. स्वयं स्वतःचा घात करीत नाही. कोणत्याही पदार्थामध्ये टूट फूट होते. विनाश होतो ते कोणत्यातरी उपाधीला निमित्त करूनच होतो. स्वसत्तेमुळे कोणताही पदार्थ बिघडत नाही. म्हणून जीव पदार्थ आपल्या अस्तित्वामुळेच रागी होत नाही. रागादिक याच्या अस्तित्वामध्येच आहेत, दुसऱ्या द्रव्यातून आले नाहीत. तरी सुद्धा दुसऱ्या द्रव्यांच्या उपाधि (निमित्त) शिवाय सुद्धा रागादिक होत नाहीत. म्हणून हे औपाधिक भाव आहेत. या औपाधिक भावांच्या निमित्ताने पुद्गलकर्मवर्गणा जीवाशी एकबंधनरूप होतात.

या तीन बंधापैकी पुद्गल बंध व उभयबंधास द्रव्यबंध म्हणतात. जीवबंधाला भावबंध म्हणतात. या तीन प्रकारच्या बंधांपैकी रागादिरूप भावबन्ध संसाराचे कारण जाणून याचा त्याग करावा व वीतराग साम्यभावामध्ये राहण्याचा प्रयत्न करावा, जेव्हा हा जीव निर्विकार स्वसंवेदन ज्ञानापासून च्युत होतो तेव्हाच राग आणि द्वेषभावरूपाने परिणत होतो. म्हणून निर्विकार स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाने निजध्रुवशुद्धस्वरूपाला जाणण्याचा अभ्यास करावा.

पूर्वी बंधाचे कारण सांगितले आहे. मध्यंतरी प्रकरणाच्या अनुषंगाने अन्य-अन्य वर्णन झाले. त्यामुळे भावबंधाचे वर्णन दबले गेले. आता आचार्य द्रव्यबंधाचे कारण भावबंध आहे हे मर्म पुनर्जीवित करतात. -

सपदेसो सो अप्पा तेसु पदेसेसु पोग्गला काया ।
पविसंति जहाजोग्गं चिंट्ठति य जंति बज्झंति ।।१७८।।

अन्वयार्थ - (सो अप्पा) तो आत्मा **(सपदेसो)** प्रदेशसहित आहे. **(तेसु पदेसेसु)** त्या प्रदेशांमध्ये **(पोग्गला काया)** पुद्गल समूह **(पविसंति)** प्रवेश करतात. **(जहाजोग्गं चिंट्ठति)** यथायोग्य राहतात. **(जंति)** निघून जातात. **(य)** आणि **(बज्झंति)** बांधले जातात.

तात्पर्य - प्रदेशसहित आत्म्यामध्ये कर्मस्कंध येतात, बंधतात, राहतात, नंतर निघून जातात.

आत्मा सप्रदेशी -

हा आत्मा सप्रदेशी आहे. लोकाकाशाचे जेवढे प्रदेश आहेत तेवढे

एका जीवाचे प्रदेश आहेत. वास्तविक हा आत्मा अखंड क्षेत्ररूप आहे. एक वस्तू आहे. त्यामध्ये प्रदेश भेद नाही. परंतु आकाशाच्या जेवढ्या भागाला एक परमाणू व्यापतो त्याला एक प्रदेश म्हणतात. या प्रमाणाने एका जीवाचे क्षेत्र मोजले तर ते क्षेत्र असंख्यात प्रदेशी आहे. म्हणून जर जीव पसरला तर तो लोकाकाशा एवढा होतो. त्यावेळी जीवाचा एकेक प्रदेश लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर असतो. आत्मा प्रदेशवान् आहे. यावरून जीवाचे स्वतन्त्र अस्तित्व सिद्ध हाते. बाह्य आधाराच्या अपेक्षेने शरीरात आत्मा राहत असला तरी तो आपल्या प्रदेशातच राहतो. शरीराचे प्रदेश भिन्न आहेत व आत्म्याचे प्रदेश भिन्न आहेत. आत्मा असंख्यात प्रदेशरूपी निजघरात राहतो. ज्यावेळी अज्ञानी जीव जीवाला जाणण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो जीवाला प्रदेशात्मक न पाहता निराधार शोधण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे स्वतःच्या अस्तित्वाला स्पर्श करीत नाही. म्हणून 'सपदेसो सो अप्पा' हे सूत्र लक्षात ठेवावे व स्वतःला अमूर्तिक असंख्यात प्रदेशात्मक ग्रहण करावे.

कर्मांचे प्रवेशद्वार योग –

संसार अवस्थेत जीवाच्या प्रदेशांमध्ये मन-वचन-काय वर्गणांच्या अवलंबनाने परिस्पंद होतो. त्या प्रदेशाच्या परिस्पंदनालाच योग म्हटले आहे. आत्मप्रदेशांमध्ये परिस्पंद होताच पौद्गलिक कार्माण शरीरामध्ये ही प्रदेश परिस्पंद होतो व योगद्वाराने पुद्गलकर्मवर्गणा प्रवेश करतात व जीवाच्या प्रदेशांवर अवगाह करून राहतात. जीवाच्या कषायभावाला निमित्त करून काही काळपर्यंत जीवाबरोबर राहतात. तोच स्थितिबंध आहे. जेवढी स्थिती बांधली असेल तेवढा काळ जीवाबरोबर राहून उदयकाळ आला की निघून जातात. निघून जाताना पुन्हा दुसऱ्या कार्मण वर्गणांना बांधून जातात. ज्याप्रमाणे रेल्वेमध्ये सीटवर बसलेल्या यात्रेकरूचे त्या सीटजवळ उभारलेल्या यात्रेकरूशी भांडण झाले. आता सीटवर बसलेल्या यात्रेकरूला मधल्या स्टेशनवर उतरायचे असेल तर तो प्लॅटफार्मवर फिरणाऱ्या प्रवाश्याला बोलावतो व सांगतो, ही सीट रिकामी आहे तुम्ही बसा. त्याला आपली सीट देऊन उतरतो. पहिल्या यात्रेकरूबरोबर त्याचा रागच आहे म्हणून दुसऱ्या आपल्यापेक्षा सवाशेर असणाऱ्या दुसऱ्या प्रवाश्याला भांडण्यासाठी आपल्या जागेवर बसवून तो निघून जातो. त्याचप्रमाणे कर्म जेव्हा आत्म्यापासून निघून जाते तेव्हा नवीन पुद्गल कर्मांना बांधून जीवाला त्रास देण्यासाठी सोडून जाते. कर्माच्या उदयामध्ये जीव

जसे भाव करतो तसेच कर्म पुन्हा प्राप्त होते. याप्रमाणे कर्मसन्तती जीवाला बाधा देत राहते.

चार क्रियांचे चार मर्म –

गाथेमध्ये चार क्रियापद आहेत. कार्मणवर्गणा प्रवेश करतात, राहतात, निघून जातात आणि बांधतात या चार क्रियांतून चार गोष्टी सांगितल्या आहेत. प्रवेश करतात अर्थात् आस्रव होतो. या वर्गणा राहतात अर्थात काही काळपर्यंत आत्म्याजवळ एकक्षेत्रावगाहरूपाने सत्तेमध्ये असतात. केवळ येतात व राहतात एवढेच नाही तर उदयकाळ आल्यावर फल देऊन निघून जातात व जाताना बंधाला कारणभूत रागादिकांचे निमित्त प्राप्त करून अन्य कर्मांना बांधून जातात. यावरून हे सिद्ध होते की रागादी परिणामच द्रव्यबंधाचे कारण आहे.

जयसेनाचार्यांनी या गाथेचा दुसरा अर्थ पण केला आहे. तो याप्रमाणे– प्रविशन्ति म्हणजे प्रवेश करतात, अर्थात प्रदेशबंधरूपाने परिणमतात. तिष्ठन्ति अर्थात् स्थितिबंध होतो. यान्ति म्हणजे फल देऊन जातात अर्थात् अनुभागबंध. बध्यन्ते म्हणजे प्रकृतिबंध अशाप्रकारे चार प्रकारचा बंध जाणावा.

ज्यावेळी कार्माणवर्गणा कर्मरूप होतात त्याचवेळी चार प्रकारचे निर्णय होतात. १) हे कर्म कोणत्या स्वभावरूप झाले ? ज्ञानगुणाला झाकणार की दर्शनगुणाला. हा प्रकृतिबंध होय. २) या प्रकृतिवाले किती परमाणू परिणमतात. हा प्रदेशबंध होय. ३) हे कर्म परमाणू किती काळ आत्म्याबरोबर परस्पर अवगाह रूप होऊन राहणार हा स्थितिबंध होय. ४) हे कर्मपरमाणू किती डिग्रीचे फल देण्यास निमित्त होणार हा अनुभाग बंध होय.

जीव केवळ विभाव परिणमन करून थांबतो. कार्माण वर्गणेमध्ये या चार गोष्टी स्वयं येतात. हे चारी कर्मांचे परिणमन आहे. कर्मकुलाची शोभा आपल्या घरातील शत्रूमुळे आहे. भवाभवामध्ये जी जीवाची दुर्गती, दुर्दशा होते या सर्वांचे निमित्त आपले भावकर्म आहेत, अज्ञानमय परिणाम आहेत.

कर्मनाशांचा स्वाधीन उपाय –

जर जीवाला कर्माचे बंधन तोडण्याची बुद्धी झाली अथवा शरीराच्या बंधनातून मुक्त व्हायचे असेल तर कर्मावर किंवा शरीरावर दृष्टी देऊ नये. कर्मावर किंवा शरीरावर प्रयोग न करता आपल्या विभावांवर वार करावा. कर्माला येण्याचे, राहण्याचे, जाण्याचे साधन बनायचे नाही याची खबरदारी बाळगावी. ज्याप्रमाणे कधी आपल्या घरी कोणी कुमित्र वारंवार येतो, बसतो ते

आपल्याला आवडत नाही. त्याचे येणे जाणे बंद करण्याची इच्छा असेल तर विवेकी लोक तोंडाने त्याला काहीच बोलत नाहीत. रागवत नाहीत. की तुम्ही आजपासून येऊ नका. आम्ही तुमची मित्रता करणार नाही इत्यादी. तर मग काय करतात ? ज्या गोष्टीमुळे कुमित्र घरी येतो त्याची पूर्ती बंद करतात. त्याचे येणे आपोआप बंद होते. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष कर्माचे येणे थांबविण्यासाठी कर्मावर काहीच प्रयोग करीत नाहीत. ज्या कारणामुळे कर्म येतात त्याची पूर्ती थांबवितात. कर्माच्या उदयामध्ये त्याच्या फलामध्ये आसक्त न होता त्याची उपेक्षा करतात की कर्माचे येणे आपोआप बंद होते.

कर्माकडे लक्ष न देता निज आत्मप्रभूच्या ऐश्वर्यामध्ये लीन होणे. आपल्या स्वतःच्या अस्तित्वामध्ये मस्त राहणे हेच कर्मबंधाच्या निवृत्तीचे कारण आहे.

पूर्वीच्या गाथेमध्ये द्रव्यबंधाचे निमित्त भावबंध सांगितला. रागादी परिणामच वास्तविक द्रव्यबंधाचे निमित्त कारण आहे. म्हणून भावबंधच निश्चयबंध आहे याची सिद्धी करतात, आता या गाथेमध्ये बन्ध व मोक्षाचे कारण संक्षेपाने सांगतात. बंध व मोक्षाला पात्र कोणता जीव आहे याचे चांगले विश्लेषण यामध्ये केले आहे. संपूर्ण जिनागमाचा सार या गाथेमध्ये सांगतात –

रत्तो बंधदि कम्मं मुञ्चदि कम्मेहिं रागरहिदप्पा।
एसो बंधसमासो जीवाणं जाण णिच्छयदो ।।१७९।।

अन्वयार्थ – (रत्तो) रागी आत्मा **(कम्मं बंधदि)** कर्म बांधतो **(रागरहिदप्पा)** रागरहित आत्मा **(कम्मेहिं)** कर्मापासून **(मुञ्चदि)** मुक्त होतो. **(एसो)** हा **(जीवाणं)** जीवांचा **(बंधसमासो)** बंधाचा संक्षेप तूं **(णिच्छयदो)** निश्चयाने **(जाण)** समज.

तात्पर्य – रागी जीव कर्माने बांधला जातो आणि रागरहित जीव कर्मापासून सुटतो.

द्रव्यबंधाचे साधकतम कारण रागपरिणाम –

राग म्हणजे अनुराग, प्रेम, स्नेह. येथे राग शब्द उपलक्षणात्मक आहे. अर्थात राग शब्दावरून मोह, द्वेष इत्यादि सर्व विकारी भाव ग्रहण करावेत. रागपरिणत आत्माच नवीन द्रव्यकर्मांशी बद्ध होतो. परंतु वैराग्य परिणत आत्मा कर्मांशी बद्ध होत नाही. राग हा मोठा अपराध आहे. जो अपराध करतो त्याला शिक्षा मिळाल्याशिवाय राहत नाही. ज्याप्रमाणे चोरी इत्यादि अपराध केलेल्या

जीवाला पोलीस पकडतात व त्याच्या हातात बेड्या घालून त्याला जेलमध्ये अडकवितात. रागी जीव नवीन द्रव्यकर्मांनी पण बद्ध होतो व पूर्वी बांधलेल्या द्रव्यकर्मापासून ही सुटत नाही. म्हणून हा निर्णय होतो की द्रव्यबंधाचे साधकतम कारण रागपरिणाम आहे. रागपरिणाम हाच भावबन्ध आहे. भावबन्धच निश्चयाने बन्ध आहे.

आपण लौकिक व्यवहारात पण पाहतो की कोणत्या तरी जीवाशी आपले प्रेम झाले की त्या जीवाशी आपण बांधले जातो. त्या जीवाला निरन्तर प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो, त्यांच्यापासून स्वत: अपेक्षा ठेवतो, त्यांनी पण माझ्यावर प्रेम करावे असे भाव करतो. दुसऱ्यांची चिंता करतो. त्यामुळे आकुलित होतो. जेव्हापासून राग झाला तेव्हापासून दुसऱ्याशी बंधन सुरू झाले. बंधन हीच पराधीनता अर्थात दु:ख आहे.

वैराग्य परिणाम मुक्तीचे कारण –

वैराग्यपरिणत जीवच पूर्वी बांधलेल्या कर्मांपासून सुटतो व नवीन कर्म बांधत नाही. राग परिणत आत्मा कर्मांपासून मुक्त होत नाही. निरपराधी जीव बांधला जात नाही. ज्यांनी अपराध केलाच नाही त्याला शिक्षा होत नाही. पूर्वी केलेल्या अपराधाची शिक्षासुद्धा निरपराध झाल्यावर रद्द होते.

लोकामध्ये मोठा कोण ? व छोटा कोण आहे ? ज्याला रागादिकाची हीनता आहे. वैराग्यशील आहे तो मोठा आहे. त्यांची प्रशंसा होते व ज्याला रागादिकांची तीव्रता आहे. कषायी आहे तो छोटा आहे. त्याची लोकामध्ये निंदा होते.

वैराग्य तत्त्वज्ञानामुळे उत्पन्न होते. जो स्व व परामध्ये भेद जाणतो स्वत:ला ज्ञानमात्र अनुभवतो व परद्रव्य परभावापासून भिन्नत्वाचा अनुभव करतो तो ज्ञानी आहे. ज्ञानीच वैराग्य परिणत असतो. भेदज्ञानाशिवाय असणारे वैराग्य वास्तविक वैराग्य नाही. ते वैराग्य कर्म निर्जरेला कारण नाही तर ते पुण्यबंधाला कारण आहे. म्हणून तत्त्वज्ञानपूर्वक वैराग्यच कर्मनिर्जरेचे कारण आहे. म्हणून प्रथम तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावा, कोणत्या तरी अन्य प्रसंगाने उत्पन्न झालेले तत्त्वज्ञानरहित वैराग्य नष्ट होऊ शकते. पण तत्त्वज्ञानपूर्वक झालेले वैराग्य दृढ राहते.

जर शुद्ध ज्ञानस्वरूपाचा शोध चालू आहे व त्यासाठीच प्रयत्नशील आहे तर मोक्षाच्या मार्गाकडे वाटचाल चालू आहे असे समजावे. शांतीसाठी

मोठा त्याग करावा लागेल. जेवढा राग आहे, विकल्प आहे, स्नेह प्रीति आहे त्या सर्वांना उद्ध्वस्त करावे लागेल. जाळावे लागेल तर शान्तीचा मार्ग प्राप्त होऊ शकतो. बाह्य वस्तूचा त्याग त्यासंबंधीचा राग सोडण्यासाठीच केला जातो, छहढालामध्ये दौलतरामजी म्हणतात,

यह राग आग दहे सदा, तातै समामृत सेईये।
चिर भजै विषय कषाय अब तो त्याग निज पर बेईये।।

राग ही आग आहे. आग जेथे असेल तेथे जाळण्याचेच काम करते. म्हणून रागभावाचा त्याग करून समतारूपी अमृताचे सेवन करावे. दीर्घ कालापासून सेवन केलेल्या विषय कषायाचा पण त्याग करून निज आत्मस्वरूपाचा अनुभव करावा.

जे रत्नत्रयाच्या प्रभावाने वीतरागतेला धारण करतात ते नवीन कर्मांना न बांधता पूर्वीच्या कर्मापासून सुटतात. यावरून हा सार ग्रहण करावा की रागद्वेष संसाराचे कारण आहेत व वीतराग भाव मोक्षाचे कारण आहे. पूज्यपाद आचार्यांनी इष्टोपदेश ग्रंथामध्ये हाच भाव सांगितला आहे –

बध्यते मुच्यते जीवः सममो निर्ममः क्रमात्।
तस्मात्सर्वप्रयत्नेन निर्ममत्वं विचिंतयेत्।।२६।।

ममतासहित जीव कर्मांनी बांधला जातो व ममतारहित जीव मुक्त होतो म्हणून सर्व प्रकारच्या प्रयत्नाने निर्ममत्व भावाचे चिन्तन करावे.

म्हणून मुमुक्षु जीवांनी निरन्तर रागादी भावाचा रंग हटविण्यासाठी निज आत्म्याच्या विभूतीलाच आपले समजून त्यामध्ये तन्मय व्हावे व निरंतर वीतराग भावाची भावना करावी. अविकार ज्ञानमात्र अन्तस्तत्त्वाच्या आश्रयाने वैराग्यपरिणत व्हावे. माझे काहीही नाही. माझा मात्र मीच सत् आहे. या सत्‌चा कोणी मित्र नाही, कोणी शत्रू नाही.

आजपर्यंत सर्व काम केले, वैभव वाढविले तरी त्याद्वारे काही सुद्धा तत्त्व प्राप्त झाले नाही. एक आपल्या स्वतःच्या ज्ञानाच्या खोलीमध्ये उतरलो तर याला सर्व वैभव प्राप्त होऊन सर्वानन्द प्राप्त होईल.

आता आत्म्याचा जो भाव द्रव्यबंधाचे कारण आहे, तो एक विशिष्ट परिणाम आहे. रागादी परिणामालाच विशिष्ट परिणाम म्हणतात. त्या परिणामांच्या विशेषता अर्थात भेद पुढील गाथेत सांगतात –

परिणामादो बंधो, परिणामो रागदोसमोहजुदो ।
असुहो मोहपदोसो सुहो व असुहो हवदि रागो ।।१८० ।।

अन्वयार्थ – (परिणामादो) परिणामाने **(बंधो)** बंध होतो. **(परिणामो)** तो परिणाम **(रागदोसमोहजुदो)** राग द्वेष मोहाने युक्त आहे. **(मोहपदोसो असुहो)** त्यापैकी मोह आणि द्वेष अशुभ आहेत. परंतु **(रागो)** राग **(सुहो व असुहो)** शुभ व अशुभ **(हवदि)** आहे.

तात्पर्य – मोह, राग, द्वेष भावाच्या निमित्ताने कर्म बांधले जाते. त्यामध्ये मोह व द्वेष अशुभच असतात. काही राग शुभ व काही राग अशुभ असतो.

विशिष्ट परिणाम बंधाचे कारण –

विशिष्ट परिणामामुळे बंध होतो. लोकामध्ये पण पाहतो कुणाच्या प्रति विशिष्ट परिणाम केला की त्याच्या प्रति आपण बांधलो जातो. त्याचप्रमाणे आत्म्यामध्ये विशिष्ट परिणाम झाल्यामुळे तेथे द्रव्यकर्माचा बंध होतो. पुण्य अथवा पापबंध विशिष्ट परिणामामुळेच होतो. विशिष्ट परिणामाचा अर्थ आहे, परिणाम विशेषाने रंजायमान होणे.

विशिष्ट परिणामाचे प्रकार –

परिणामविशेष राग-द्वेष व मोहरूप आहे. त्यापैकी मोह आणि द्वेष अशुभरूपच आहेत. राग दोन प्रकारचा आहे. शुभरूप आणि अशुभरूप; कारण कधी राग (प्रेम) विशुद्ध परिणामाचे कारण बनतो तर कधी संक्लेश परिणामाचे कारण बनतो. मोह-राग-द्वेषाच्या निमित्ताने जीव व पुद्गलकर्मांचा परस्परांमध्ये विशिष्टतर परस्पर अवगाहरूप बंध होतो.

वास्तविक बंध काय आहे ? बंध तर आपल्या राग-द्वेष-मोह विकार भावांचाच आहे. जीव दुसऱ्याच्या अधीन आहे. तेथे वस्तुत: दुसऱ्याच्या अधीन नाही, परन्तु तो स्वयं आपल्या राग परिणामांनी विवश होऊन अशी चेष्टा करतो की ज्यामुळे दुसऱ्याच्या बंधनामध्ये अडकतो. तोपर्यंत कर्माचा बंध आहे जोपर्यंत राग परिणाम राहतो. जेव्हा त्याच व्यक्तिसंबंधी रागाच्या ठिकाणी द्वेष भाव उत्पन्न होतो तेव्हा बंधन मिटले का ? नाही मिटले. पूर्वी प्रेमरूपाने बंधन चालू होते. आता द्वेषरूपाने बंधन चालू झाले. जेव्हा प्रेम होते तेव्हा आपल्या उपयोगामध्ये त्याला घेऊन वेगळ्या प्रकारच्या विकल्पाने दु:खी होता. आता द्वेषाच्या स्थितीमध्ये वेगळ्या प्रकारच्या विकल्पाने दु:खी होतो. बंधाचा फक्त

प्रकार बदलला.

बंधाची ओळख –

बंधन आहे याची ओळख स्वत:ची बेचैनी आहे. रागाच्या वेळी पण बेचैनी होती आणि द्वेषाच्या वेळी पण बेचैनी आहे. बेचैनीचा प्रकार आणि त्याची सीमा बदलली. जेथे बेचैनी आहे तेथे नियमाने बंधन आहे.

मोहाचे बंधन –

सर्वांत जास्त बंधन मोहाचे आहे. त्यामध्ये तर जीव पूर्ण बेचैन असतो. मोह म्हणजे मिथ्यात्व, परद्रव्यामध्ये आपलेपणाची बुद्धी. घर, स्त्री, पुत्र, धन, धान्य यामध्ये ममत्वबुद्धी हे माझेच आहेत व मी यांचा आहे.

पुत्र, स्त्री जर आजारी पडले तर हा मोही किती क्लेश करतो ? तेव्हा किती आसक्ती आहे ? हे लक्षात येते. जगामध्ये सर्वात मोठे संकट आहे ममतेचे संकट. या जगामध्ये या जीवाचे काहीही नाही. सर्व पदार्थ भिन्नभिन्न आपापल्या अस्तित्वाला घेऊन आहेत. पण ज्यावर मोह आहे त्याची चिन्ता करीत स्वत:ला विसरून जातो, ज्याप्रमाणे वैद्य आजारी पडला तर त्या वैद्याचा रोग समजणारा दुसरा वैद्य असतो. स्वयं स्वत:ला लक्षात येत नाही व त्याचा इलाज सुद्धा दुसऱ्या वैद्याकडून करविला जातो. त्याप्रमाणे मोही जीव स्वत:च्या अज्ञानाला स्वत: जाणत नाही व स्वत: उपाय पण करू शकत नाही. दर्शनमोहाच्या उदयाने मिथ्या श्रद्धानरूप भाव होतो. मोहयुक्त जीवाला मोक्षाची रूची न होता संसाराची रूची होते. संसारसुखामध्ये, त्याच्या कारणांमध्ये व त्या सुखाच्या सहकारी कारणभूत धर्माभासांमध्ये रूची होते. हा मिथ्यात्वभाव अनंत संसाराला कारण आहे.

चारित्रमोहाच्या, उदयाने रागद्वेष भाव होतात. क्रोध व मान कषाय तसेच अरती, शोक, भय, जुगुप्सा यांच्या उदयजनित भाव द्वेषरूप आहेत. द्वेषभाव संक्लेशरूप आहे म्हणून अशुभभाव आहे. लोभ व मायाकषाय तसेच रती, हास्य, स्त्रीवेद, पुरुषवेद, नपुंसकवेद यांच्या उदयाने होणारे भाव रागरूप आहेत.

जो राग भाव पाच इन्द्रियांच्या विषयांना भोगण्यामध्ये किंवा अभिमानादिकाच्या पुष्टिसाठी होतो, तो अशुभराग आहे. जेव्हा याच कषायांच्या मंदतेमुळे अरिहंत सिद्ध आदि पाच परमेष्ठींच्या भक्तिरूप, पूजा, दान, परोपकार, जप तथा स्वाध्याय करण्याची इच्छारूप भाव होतो तो शुभ राग

म्हटला जातो. यापैकी शुभराग पुण्यबंधाचे कारण आहे व अशुभ राग, मोह व द्वेष पापबंधाचे कारण आहे. म्हणून सर्वथा सोडण्यायोग्य आहे.

या सर्व बंधाच्या कारणभूत परिणामांना जाणून त्यांचा त्याग करण्यासाठी नित्य शुद्धोपयोगाची भावना करावी. बन्धापासून निवृत्त होण्यासाठी शुभाशुभ भावरहित सहज चैतन्य स्वरूपामध्ये आत्मबुद्धी करावी व त्याचाच अनुभव करावा.

मागील गाथेमध्ये द्रव्यबन्धाला कारणभूत राग- द्वेष- मोहयुक्त विशिष्ट परिणाम आहेत हे सांगितले होते व त्या विशिष्ट परिणामांचे शुभ व अशुभ असे दोन भेद केले. आता या गाथेमध्ये त्या विशिष्ट परिणामांचे विशेष व अविशिष्ट परिणाम यांना कारणामध्ये कार्याचा उपचार करून सांगतात -

सुहपरिणामो पुण्णं असुहो पावं ति भणिदमण्णेसु ।
परिणामो णण्णगदो दुक्खक्खयकारणं समये ।।१८१।।

अन्वयार्थ- (अण्णेसु) परद्रव्याविषयी **(सुहपरिणामो)** शुभ परिणाम **(पुण्णं)** पुण्य आहे व **(असुहो)** अशुभ परिणाम **(पावं)** पाप आहे. **(ति भणिदं)** असे (आगमामध्ये) सांगितले आहे. **(णण्णगदो)** जो परिणाम दुसऱ्यांच्या मध्ये प्रवर्तमान नाही अर्थात् आत्मस्वरूपामध्ये लीन आहे तो **(समये)** योग्यकाळी **(दुक्खक्खयकारणं)** दुखक्षयाचे कारण आहे.

तात्पर्य - शुभ परिणाम पुण्य आहे, अशुभ परिणाम पाप आहे आणि कर्मक्षयाला कारणीभूत शुद्ध परिणाम धर्म आहे.

परिणामाचे भेद-

परिणाम दोन प्रकारचे आहेत. १) परद्रव्यप्रवृत्त परिणाम व २) स्वद्रव्यप्रवृत्त परिणाम. परद्रव्यप्रवृत्त परिणाम पराच्या निमित्ताने विकारी झाल्यामुळे विशिष्ट परिणाम आहे व स्वद्रव्यप्रवृत्त परिणाम पराच्या द्वारे उपरक्त (विचार रूप) नसल्यामुळे अविशिष्ट परिणाम आहे. आत्म्याच्या निरुपाधिक सहज स्वभावाचे परिणमन अविशिष्ट परिणाम आहे व त्या स्वभावापासून च्युत होऊन जे विकाररूप परिणमन आहे तो विशिष्ट परिणाम आहे. केवळ ज्ञाताद्रष्टारूप राहणे अविशिष्ट परिणाम व कर्मजनित औपाधिक परिणाम विशिष्ट परिणाम आहे. अविशिष्ट परिणाम शुद्ध आहे. विशिष्ट परिणाम अशुद्ध आहे.

त्या विशिष्ट परिणामाचे दोन भेद आहेत १) शुभ परिणाम, २) अशुभ

परिणाम. अशुभ परद्रव्याच्या (स्त्रीपुत्रमित्रादी) निमित्ताने झालेला परिणाम अशुभ व शुभ परद्रव्या (देवशास्त्रगुरू) च्या निमित्ताने झालेला परिणाम शुभ आहे.

पुण्यपाप नामकरण

पुण्यरूप पुद्गलबंधाला कारण असल्यामुळे शुभपरिणामाला पुण्य म्हटले आहे व पापरूप पुद्गलबंधाला कारण असल्यामुळे अशुभ परिणामाला पाप म्हटले आहे. येथे कारणामध्ये कार्याचा उपचार केला आहे. जसे लौकिकामध्ये अन्नालाच प्राण किंवा धनाला प्राण म्हणतात. अन्न किंवा धन वास्तविक प्राण नाहीत. अन्न खाल्यामुळे जीव जगतो म्हणून अन्न कारण आहे व प्राण कार्य आहे. तसेच धन प्राण नाही, पण धनाच्या द्वारे अन्न विकत आणतो व अन्न खाल्यामुळे जीव जगतो म्हणून धन हे कारणाचे कारण आहे व प्राण कार्य आहे. येथे कारणामध्ये कार्याचा उपचार करून अन्नाला व धनालाच प्राण म्हटले आहे.त्याचप्रमाणे शुभ परिणाम कारण आहे व पुण्यबंध कार्य आहे.

अशुभ परिणाम कारण आहे व पापबंध कार्य आहे. परंतु कारणांमध्ये कार्याचा उपचार करून शुभ व अशुभ परिणामालाच पुण्य-पाप म्हटले आहे.

शुभ परिणामामध्ये प्रसन्नता व अरूची

कर्माचे दोन भेद आहेत. घातिकर्म व अघातिकर्म. घातिकर्म तर सर्व पापरूपच आहेत. शुभ परिणाम असो की अशुभ परिणाम असो घातिकर्मांचा (गुणस्थानाला योग्य) निरन्तर बन्ध होतो. अघाति कर्मांमध्ये दोन भेद आहेत १) पुण्यप्रकृती व २) पापप्रकृती. देवायु, मनुष्यायु, तिर्यंचायु, मनुष्यगती आदि शुभनाम कर्म, उच्चगोत्र व साता वेदनीय अशा ६८ पुण्यप्रकृती आहेत व शेष १०० पापप्रकृती आहेत. शुभपरिणामाच्या निमित्ताने पुण्यप्रकृतींचा बंध होतो व अशुभ परिणामाच्या निमित्ताने अघातीकर्मातील पापप्रकृतींचा बंध होतो. म्हणून अशुभ परिणाम करण्यापेक्षा शुभ परिणाम करणे बरे असे शास्त्रामध्ये सांगितले आहे. इष्टोपदेश ग्रंथामध्ये पूज्यपाद आचार्य म्हणतात. -

वरं व्रतैः पदं दैवं नाव्रतैर्बत नारकं ।
छायातपस्थयोर्भेदः प्रतिपालयतोर्महान् ।। ३ ।।

व्रतांच्या द्वारे देवपद प्राप्त करणे बरे आहे, पण खेद आहे की अव्रतांच्याद्वारे नरकात जाणे योग्य नाही. दोघे मित्र तिसऱ्या मित्राची वाट पहात आहेत. त्यापैकी एकजण उन्हामध्ये राहून वाट पहात आहे व दुसरा झाड्याच्या

सावलीमध्ये बसून वाट पहात आहे. त्या दोघांच्यामध्ये महान् अन्तर आहे; कारण मित्र येईपर्यंत पहिला खूप कष्टात आहे व दुसरा सुखात आहे. त्याप्रमाणे मोक्ष प्राप्त होईपर्यंत शुभात राहणे म्हणजे सावलीत राहण्यासारखे आहे व अशुभात राहणे म्हणजे उन्हात थांबण्यासारखे आहे. शुभपरिणामाला परंपरेने मोक्षाचे कारण मानले आहे. कारण शुभपरिणामपूर्वकच शुद्ध परिणाम होतात व शुद्ध परिणामाने मोक्ष होतो. पण अशुभपरिणामपूर्वक शुद्ध परिणाम होत नाहीत. म्हणून ज्ञानी अशुभापासून वाचण्यासाठी व शुद्धापर्यंत पोहचण्यासाठी शुभपरिणामाचे अवलंब घेतो. तरीपण त्याला अंतरंगामध्ये हेय (सोडण्यायोग्य) समजतो. कारण परद्रव्यप्रवृत्त परिणाम विकारच आहे. कोणत्याही विकाराने आत्म्याचे हित नाही. शुभपरिणाम अल्प दंड आहे व अशुभ परिणाम महादंड आहे.

ज्याप्रमाणे एखाद्या व्यापाऱ्याला परप्रांतातून माल आपल्या प्रांतात आणताना जकात नाक्यावर पकडले व त्याला दहा हजार रूपयांचा दंड झाला. तो दंड कमी करण्याचा प्रयत्न करतो. प्रयत्नाने दहा हजाराऐवजी एक हजार दंड भरून त्याचा माल परत मिळतो तर तो प्रसन्न होतो. कारण एक हजार भरले नसते तर ९ हजार रूपयांचा दंड भरावा लागला असता व लाखो रूपयांचा माल हातचा गेला असता. ते लाखो रूपये वाचविण्यासाठी तो हजार रूपये भरणे योग्य समजतो, परंतु अंतरंगातील जर त्याचा आवाज पाहिला तर हजार रूपयेसुद्धा देऊ इच्छित नाही. त्याप्रमाणे ज्ञानी अशुभ परिणामांपासून वाचण्यासाठी शुभ परिणामांचे अवलंबन घेऊन प्रसन्न होतो. पण अंतरंगातून शुद्ध परिणाम करू इच्छितो. महान् दंड देण्यापेक्षा अल्प दंड देणे योग्य आहे असे समजतो.

ज्याप्रमाणे कोणी रोगी तापाने अतिशय फणफणत होता. त्याला १०५ डिग्री ताप होता. खूप त्रास होत होता. बेशुद्ध होता. आता त्याचा ताप उतरला व १०० डिग्री झाला. मित्रमंडळी, नातलग भेटायला येतात. विचारतात की कसे काय आहे ? अगदी खुश होऊन सांगतो, 'आता बरे आहे.' परंतु जर कोणी विचारले की तब्बेत ठीक आहे ना ! आता असाच तू रहा. तर त्याचे उत्तर काय येते ? नाही, अजून १०० डिग्री ताप आहे. तो पण उतरला पाहिजे. त्याशिवाय आरोग्य नाही. १०५ डिग्री तापाच्या अपेक्षेने १०० डिग्री तापाला तो चांगले म्हणतो पण अंतरंगातून तापरहित होण्याचेच श्रद्धान करतो. त्याप्रमाणे

ज्ञानी अशुभापेक्षा शुभाला चांगले म्हणतो. पण तो विकाररहित होऊन शुद्ध होणे हिताचे मानतो.

अविशिष्ट परिणाम शुद्ध अभेद

जो भाव आपल्या आत्म्याकडे सन्मुख आहे,कोणत्याही परवस्तूमध्ये प्रेम करीत नाही व द्वेष करीत नाही. तो शुद्धोपयोग रूप भाव अविशिष्ट परिणाम आहे. आत्म्यामध्येच एकाग्र रमणतारूप भाव संपूर्ण संसार दुःखाचा नाश करण्यासाठी कारण आहे, म्हणून तोच परिणाम उपादेय (ग्रहण करण्यायोग्य) आहे.

अविशिष्ट परिणामामध्ये भेद नाही. कारण तो शुद्ध आहे. अशुद्धतेमध्ये भेद असतो. शुद्धतेमध्ये भेद होऊ शकत नाही. हे वस्त्र कमी मलिन आहे, हे जास्त मलीन आहे. कपड्यामध्ये, मलामध्ये अनेक भेद आहेत. जो शुद्ध आहे तो एकस्वरूपच आहे. अविशिष्ट परिणाम शुद्ध आहे. एक स्वरूप आहे, म्हणून त्यामध्ये विशेष नाही. अविशिष्ट परिणाम स्वयंच आपल्या समयी संसार दुःखाला कारणभूत कर्मपुद्गलाच्या क्षयाचे कारण असल्यामुळे मोक्षस्वरूपच आहे. सुख व आनंद सर्व जीवांना इष्ट आहे. जितके म्हणून प्रयत्न चालले आहेत ते सर्व सुखासाठीच चालू आहेत. त्या आनंदाचा उपाय काय आहे ? सर्वप्रथम आनन्दामध्ये बाधक कारण काय आहे ते शोधावे. आनन्दाचे बाधक कारण निमित्तदृष्टीने कर्म आहे. त्या कर्मांचा क्षय होईल तर आनन्द मिळेल. उपादानदृष्टीने पाहिले तर आनन्दामध्ये बाधक रागादि विकल्प आहेत. त्या विकल्पांचा क्षय झाला तर आनन्द मिळेल. त्या दोघांच्या क्षयाला कारण अविशिष्ट परिणाम आहे. स्वद्रव्यामध्ये लागलेला उपयोग अविशिष्ट परिणाम आहे.

ज्याने आपले स्वरूपास्तित्व यथार्थ जाणले आता तो आपला उपयोग त्या स्वतन्त्र स्वअस्तित्वामध्ये ठेऊ इच्छितो. कोणत्याही परवस्तूमध्ये आपला उपयोग लावण्याची इच्छा नाही. ज्याप्रमाणे लहान मुले खेळता खेळता काही बिनसले की लगेच गट्टी फू करतात त्याचप्रमाणे सर्व वस्तूंच्या मध्ये राहत असताना सुद्धा ज्ञानी सर्व पदार्थापासून विरक्त होऊन त्यांची संगती सोडण्याची कला आत्मसात करतो.

जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये शुभ, अशुभ व शुद्ध या तीन उपयोगांचा विशेष खुलासा केला आहे. तो याप्रमाणे – प्रथम तीन

गुणस्थानामध्ये तारतम्यरूपाने अशुभोपयोग आहे. ४ ते ६ या गुणस्थानात तारतम्यरूपाने शुभोपयोग आहे व ७ ते १२ या गुणस्थानांमध्ये तारतम्यरूपाने शुद्धोपयोग आहे . याचे स्पष्टीकरण गा. ९च्या लेखामध्ये केले आहे. तेथून जाणावे. या गाथेच्या तात्पर्यवृत्तीमध्ये शुद्धोपयोगासंबंधी प्रश्न उत्पन्न करून चांगला खुलासा केला आहे.

प्रश्न – नयाच्या अपेक्षेने विचार केला तर मिथ्यात्व गुणस्थानापासून क्षीणकषायपर्यंतच्या गुणस्थानांमध्ये अशुद्धनिश्चयनयच असतो. या अशुद्धनिश्चयामध्ये शुद्धोपयोग कसा प्राप्त होतो ?

उत्तर – वस्तूच्या एकदेशाची परीक्षा करणे नयाचे लक्षण आहे आणि शुभ, अशुभ व शुद्ध द्रव्याचे अवलंबन घेणे हे उपयोगाचे लक्षण आहे. अर्थात वस्तू अनेक धर्मात्मक आहे. नित्य, अनित्य, एक, अनेक, द्रव्य, पर्याय इत्यादि. त्यापैकी नय वस्तूच्या एक धर्माचा विचार करतो. तसेच उपयोग कोणत्यातरी विषयाचा अवलंबन घेऊन उत्पन्न होतो. ज्यावेळी तो विषय कषायाला कारणभूत अशुभ वस्तूंचे अवलंबन घेतो त्यावेळी त्या उपयोगाला अशुभोपयोग म्हटले जाते. जेव्हा देवशास्त्रगुरू आदि शुभ वस्तूंचा अवलंब घेतो तेव्हा तो शुभोपयोग म्हटला जातो. जेव्हा तो शुद्ध आत्म्याचा आश्रय घेतो अर्थात शुद्ध आत्म्याला स्वानुभव प्रत्यक्षाने जाणतो तेव्हा तो शुद्धोपयोग म्हटला जातो. म्हणून ७ ते १२ गुणस्थानांमध्ये अशुद्ध निश्चय नय आहे. कारण जीवाची अशुद्ध अवस्था आहे. १३व्या गुणस्थानामध्ये पूर्ण शुद्ध अवस्था प्रकट होते. परंतु अशुद्धनिश्चयनय असला तरी त्या गुणस्थानवर्ती जीवांनी उपयोगामध्ये शुद्ध आत्म्याचे अवलंबन घेतले आहे. शुद्ध आत्म्याला आपल्या ध्यानाचे ध्येय बनविले आहे व शुद्ध आत्म्याची साधना करीत आहेत म्हणून त्यांना शुद्धोपयोगरूप परिणाम प्राप्त होतो. असे नयाचे लक्षण व उपयोगाचे लक्षण यथासंभव सर्वत्र जाणावे.

येथे रागादिविकल्परहित समाधी ज्याचे लक्षण आहे असा शुद्धोपयोग मुक्तीचे कारण आहे. हा शुद्धोपयोग अभेदप्रधान शुद्धद्रव्यार्थिक नयाने शुद्धपारिणामिक भावस्वरूप शुद्धात्म्यापासून अभिन्न आहे, पण भेदप्रधान पर्यायार्थिक नयाने भिन्न आहे. कारण शुद्धोपयोग एकदेश निरावरण असल्यामुळे क्षायोपशमिक खण्डज्ञानरूप आहे व शुद्ध पारिणामिक भाव संपूर्ण आवरणरहित असल्यामुळे अखण्डज्ञानव्यक्तिरूप आहे. शुद्धोपयोग सादि सान्त

असल्यामुळे विनश्वर आहे. शुद्ध परिणामिक भाव अनादि अनन्त असल्यामुळे अविनाशी आहे. जर दोहोंमध्ये एकान्ताने अभेद मानला तर ज्याप्रमाणे घटाची उत्पत्ती झाल्यावर मातीच्या गोळ्याचा नाश होतो त्याप्रमाणे ध्यान पर्यायाचा नाश झाल्यावर ध्येयरूप पारिणामिक भावाचा नाश होईल. परंतु तसे कधी होत नाही. ध्यान पर्यायाचा नाश होऊन मोक्ष पर्याय उत्पन्न झाल्यावर सुद्धा शुद्ध पारिणामिक भाव विद्यमान आहेच. म्हणून शुद्धपारिणामिक भाव ध्येयरूप आहे. ध्यानभावनारूप नाही.

मोक्ष प्राप्त करण्यासाठी निर्विकल्प समाधी रूप शुद्धोपयोग भावाचा उपाय करावा. या जीवाचे सर्व वैभव आपल्या आत्मतत्त्वामध्ये आहे. आनन्द कोठून बाहेरून येत नाही. आनन्दमय तर आत्मा स्वयं आहे. या शुद्ध आत्मतत्त्वामध्ये उपयोग फार मोठ्या भवितव्यतेने प्राप्त होतो. ती भवितव्यता प्राप्त होण्यासाठी तदनुकूल पुरुषार्थ पण आवश्यक आहे.

या गाथेमध्ये परद्रव्यप्रवृत्त परिणाम व स्वद्रव्यपरिणाम अशाप्रकारे दोन भेद करण्याचे प्रयोजन हे आहे की परद्रव्यप्रवृत्त जेवढा म्हणून परिणाम आहे तो विकार आहे. त्याची रूची केल्याने जीवाचे कल्याण नाही. स्वद्रव्यप्रवृत्त-परिणामच माझा रक्षक आहे, गुरू आहे, बंधू आहे, शरण आहे, देव आहे, प्रभू आहे. मोक्षाचे कारण आहे. कारणामध्ये कार्याचा उपचार केला तर शुद्ध परिणामच मोक्ष आहे.

पूर्वीच्या गाथेमध्ये दोन प्रकारचे परिणाम व त्याचे फळ सांगितले. १) स्वआत्म द्रव्यामध्ये प्रवृत्त परिणाम व परद्रव्यामध्ये प्रवृत्त परिणाम, परद्रव्यामध्ये प्रवृत्त परिणाम बंधाचे कारण आहे व स्वद्रव्यामध्ये प्रवृत्त परिणाम मोक्षाचे कारण आहे. म्हणून मोक्षाची इच्छा असणाऱ्या जीवाने परद्रव्यापासून निवृत्त होणे व स्वद्रव्यामध्ये प्रवृत्त होणे आवश्यक आहे. आता या गाथेमध्ये स्वद्रव्यामध्ये प्रवृत्ती व परद्रव्यापासून निवृत्तीच्या सिद्धिसाठी स्वपर विभाग दाखवितात –

भणिदा पुढविप्पमुहा जीवणिकायाध थावरा य तसा ।
अण्णा ते जीवादो जीवो वि य तेहिंदो अण्णो ।।१८२।।

अन्वयार्थ – (अध) आता **(थावरा य तसा)** स्थावर आणि त्रस असे जे **(पुढविप्पमुहा)** पृथ्वीकायिक आदि **(जीवणिकाया)** जीवनिकाय **(भणिदा)** सांगितले आहेत, **(ते)** ते **(जीवादो)** जीवापासून **(अण्णा)** भिन्न आहेत **(य)**

आणि **(जीवो वि)** जीव सुद्धा **(तेहिंदो)** त्यापासून **(अण्णो)** भिन्न आहे असे सांगतात.

तात्पर्य – वास्तविक पृथ्वी आदी ६ काय जीवापासून भिन्न आहेत आणि जीव त्यांपासून भिन्न आहे.

मला स्वद्रव्यामध्ये प्रवृत्ती करायची आहे हे ठरविले पण जोपर्यंत स्वद्रव्य काय आहे ? त्याचे स्वरूप स्पष्टपणे जाणत नसलो तर त्यामध्ये प्रवृत्ती कशी करणार ? एक लहान मुलगा हरवला होता. तो इकडे तिकडे रस्त्यावर भटकत होता. अशान्त होता. त्याला कुणीतरी म्हटले 'तू असा काय भटकतोस, तू आपल्या घरामध्ये जा. तेथे रहा. विश्राम कर.' आता त्या मुलाला स्वतःचे घरच माहीत नाही तर तो कसा काय आपल्या घरात जाऊ शकणार ? तो प्रथम हेच विचारतो, माझे घर कोठे आहे ? कसले आहे. तुम्ही मला दाखवा. त्याला कोणीतरी ओळखीच्या माणसाने घरचा मार्ग दाखविला व घराची ओळख करून दिली की तो सहजपणे आपल्या घरात प्रवेश करतो व शान्तीचा अनुभव करतो. त्याचप्रमाणे हा अज्ञानी जीव चौऱ्यांशी लाख योनीमध्ये भटकत आहे त्यामुळे दुःखी आहे. त्याला श्री गुरू उपदेश करतात की तू स्वद्रव्यामध्ये प्रवृत्त हो. तेथेच विश्रांती कर म्हणजे तू सुखी होशील. परद्रव्यामध्ये फिरू नकोस. परंतु ज्या अज्ञानी जीवाला स्वद्रव्याची ओळखच नाही म्हणून तो उपदेश देणाऱ्यांचे तोंड पाहत राहतो की स्वद्रव्यामध्ये प्रवृत्त व्हायचे म्हणजे नेमके काय करायचे? स्वद्रव्य कोठे आहे? त्याची ओळख नाही. मला स्वद्रव्याची ओळख करून द्या. तेव्हा श्रीगुरू त्याला स्व काय ? व पर काय ? याचा भेद दाखवून देतात.

लहानपणी आपण पाठशाळेत जो धडा शिकलो तोच येथे आचार्य आपल्याला शिकवत आहेत. जीवाचे भेद किती ? जीवाचे भेद दोन आहेत. १) संसारी व २) मुक्त. पुन्हा संसारी जीवाचे भेद दोन आहेत. १) त्रस २) स्थावर. द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय, पंचेन्द्रिय हे त्रस जीवाचे भेद आहेत. पृथ्वी, जल, अग्नी, वायू व वनस्पती हे स्थावर जीवाचे भेद आहेत. हे भेद आपण तोंडपाठ केले, परंतु त्यावेळी आपल्याला याचे मर्म कळाले नाही. हे सर्व समजून घेण्याचे मर्म आचार्य या गाथेत सांगत आहेत. हे जीवनिकाय व्यवहाराने जीव म्हटले जातात, परंतु वास्तविक निश्चयाने जीवनिकाय जीव नाहीत. जीव या सर्व त्रस व स्थावर कायापासून भिन्न आहे. ज्याप्रमाणे

मिठाईचा बॉक्स म्हटले तरी आपण जाणतो की वरचा बॉक्स मिठाई नाही. बॉक्समध्ये मिठाई आहे, पण बॉक्स मिठाई नाही. दिसणारे कव्हर किंवा बॉक्स वेगळे आहे व आतील वस्तू वेगळी आहे. त्याप्रमाणे हे स्थावर काय व त्रस काय यामध्ये जीव आहे, पण हे म्हणजे जीव नाही. काय भिन्न आहे व जीव भिन्न आहे.

येथे फक्त शरीरापासून भिन्नता सांगत नाहीत. संसार अवस्थेमध्ये त्रस व स्थावर रूप जीवाची अशुद्ध पर्याय आहे. त्यापासूनही शुद्ध जीव भिन्न आहे. हे पर्याय पुद्गलकर्माच्या उदयाने उत्पन्न झाले आहेत. या पर्यायांमध्ये विद्यमान शाश्वत ध्रुव शुद्ध जीव या पर्यायांहून भिन्न आहे. अज्ञानी जीव जीवाला पहायला सांगितले की या पर्यायांकडेच पाहतो. त्यामध्ये असणाऱ्या ध्रुव जीवाला जाणत नाही हेच अज्ञान संसार परिभ्रमणाचे अर्थात नवीन पर्याय धारण करण्याचे मूळ कारण आहे. टंकोत्कीर्ण ज्ञायक एक स्वभावरूप परमात्मतत्त्वाची भावना न केल्यामुळेच जीव त्रस व स्थावर नामकर्माचा बंध करतो व त्याचा उदय आला की जीव या स्थावर किंवा त्रस पर्यायामध्ये जन्म घेतो. त्रस-स्थावर पर्याय म्हणजे कर्माकडून घेतलेले भाड्याचे घर आहे ते आपले घर नाही. आपले घर तर शुद्धचैतन्यमय असंख्यात अमूर्तिक प्रदेशात्मक स्वतंत्र आहे. या आपल्या निजघराची ओळख करून घेतली तर स्वघरामध्ये प्रवेश करणे व राहणे सुलभ आहे.

हा स्व-पर विभाग जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. हा मनुष्य पर्याय, त्रसपर्याय, पंचेन्द्रिय पर्याय म्हणजे मी नव्हे. मी याहून भिन्न शुद्ध चैतन्य ज्योतिर्मय आहे असे अंतरंगामध्ये भेदविज्ञानाची ज्योत प्रज्वलित करावी.

विश्व जीवनिकायाचे प्रदर्शन –

एक जीवन्त जीवनिकाय व एक मृतकाय. हेच सर्वांना चर्मचक्षूने दिसत आहे. दगड, माती, सिमेन्ट, माणिक, मोती, सोने, चांदी सर्व पृथ्वीकायाचे मृतशरीर आहे. जे काही स्कंध दिसतात ते सर्व जीवांच्या द्वारे पूर्वी कायरूप शरीर बनले होते. आता ते अजीव आहेत. विश्वामध्ये असा कोणता पदार्थ दिसत नाही की जो जीवाचे शरीर बनला नाही. कागद, कपडे, फर्नीचर, सतरंजी सर्व जीवांनी सोडलेल्या शरीरापासून बनलेले आहेत. आता ते मृत आहे. पण जेव्हा जीव यामध्ये होता तेव्हा त्याला जीवन्तकाय म्हणत होते, पण निश्चयाने तेव्हा ही जीव त्यापासून भिन्नच होता. केळाचे साल केळ असताना ही

त्यापासून भिन्न आहे व वेगळे झाल्यावर तर भिन्न आहेच त्याप्रमाणे हा जीव या कायामध्ये असतानाही भिन्न आहे व मृत कायापासून तर भिन्न आहेच.

आम्हाला जास्तकाही कळाले नाही तर सरळ सोप्या भाषेमध्ये एवढेच समजून घ्यायचे आहे की आपला उपयोग (विचार) आपण कोठे ठेवायचा की ज्यामुळे आम्हाला विश्रांती व शांती मिळेल. आतापर्यंत तर आम्ही उपयोगाला इकडे तिकडे कोठेही वाटेल तेथे लावले. आम्हाला अशांतीच मिळाली. आचार्य सांगतात की आपला उपयोग परापासून निवृत्त करून स्वतःमध्ये लावा. अज्ञानीला वाटते, एवढ्या सर्व परद्रव्यांच्या मिश्रणामध्ये असणारा आत्मा आम्हाला कसा दिसेल? काळजी करू नका. ज्याप्रमाणे तिजोरीमध्ये आतला लॉकरचा कप्पा आहे त्यामध्ये छोटी पेटी आहे. त्या पेटीत डब्बी आहे. त्यामध्ये पण अनेक छोट्या छोट्या पुढ्या आहेत. त्यातील एका पुडीमध्ये हिरा ठेवलेला आहे. किती आवरणामध्ये तो पडलेला आहे. त्याला पहायला आम्हाला किती वेळ लागतो. ते आवरण हटविण्याची पण गरज नाही. एका सेकन्दात आम्ही त्याचे दर्शन करू शकतो. त्याचप्रमाणे मांस, हाड आदि सप्तधातुस्वरूप शरीररूपी तिजोरी. त्याच्या आतमध्ये कार्माण शरीर, त्याच्या आत ही अशुद्ध जीवपर्याय, त्यामध्ये पुन्हा क्रोधादिक पर्यायरूप पुड्या त्याच्यामध्ये एका पुडीत शुद्ध ज्ञान स्वभाव निज परमात्मा किती पडद्यांच्या आत आहे. परंतु फरक एवढा आहे की ह्या सर्व वस्तू प्रदेशांच्या अपेक्षेने एक क्षेत्रावगाहरूप आहेत. कितीही आवरणांच्या आड लपलेला असला तरी हा शुद्ध ज्ञानस्वभावी कारण परमात्मा एका सेकन्दात अंतर्दृष्टीने आपण जाणू शकतो. फक्त एकदा त्याचा सम्यक् परिचय करून घेणे आवश्यक आहे.

परद्रव्यांपासून निवृत्त होऊन स्वद्रव्यामध्ये प्रवृत्त होण्यामध्येच परमकल्याण आहे, म्हणून त्रस स्थावर स्वरूप अशुद्धपर्यायांपासून ममत्व सोडून निजशुद्ध चैतन्यस्वभावामध्ये आपला उपयोग लावून त्याचीच भावना करावी.

अशाप्रकारे स्व-पर द्रव्याचा विभाग निश्चित करून आता हे निश्चित करतात की स्व-पर भेद विज्ञान स्वद्रव्यामध्ये प्रवृत्त होण्याचे कारण आहे व स्वपर भेद विज्ञानाचा अभाव परद्रव्यामध्ये प्रवृत्त होण्याचे कारण आहे -

जो ण विजाणदि एवं परमप्पाणं सहावमासेज्ज ।
कीरदि अज्झवसाणं अहं ममेदं ति मोहादो ।।१८३।।

अन्वयार्थ - (जो) जो **(एवं)** अशा प्रकारे **(सहावमासेज्ज)**

स्वभावाला प्राप्त करून (जीवपुद्गलाच्या स्वभावाला निश्चित करून) **(परमप्पाणं)** पराला व स्वतःला **(ण विजाणदि)** जाणत नाही (तो) **(मोहादो)** मोहामुळे **(अहं ममेदं ति)** हे मी आहे व हे माझे आहे अशाप्रकारे **(अज्झवसाणं)** अध्यवसान (मिथ्या अभिप्राय) **(कीरदि)** करतो.

तात्पर्य – स्वपराच्या भेदज्ञानाने रहित जीव मिथ्याभाव करून दुःखी होतात.

भेदविज्ञानासाठी स्व–पर स्वभावाच्या निर्णयाची आवश्यकता –

पराला पर जाणण्यासाठी पराच्या स्वभावाला समजणे आवश्यक आहे व स्वला स्व जाणण्यासाठी स्वतःच्या स्वभावाला जाणणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे लोकामध्ये कोणताही कार्यक्रम किंवा लग्नादी समारंभामध्ये अनेकांच्याकडून सामान गोळा केले जाते. समारंभ पूर्ण झाल्यावर ते सामान विभक्त केले जाते. ते विभक्त कशाच्या द्वारे होते ? प्रत्येक वस्तूचा आकार प्रकार त्याचे रंग रूप माहित असते. प्रत्येक वस्तूचे लक्षण आपल्याला माहित असते. त्या लक्षणावरून मिसळलेले सामान सुद्धा वेगळे केले जाते. त्या वस्तूला पाहून लगेच ओळखतो ही आमक्याची वस्तू आहे, ही आपल्या घरातील वस्तू आहे. त्या वस्तूची ओळख असल्यामुळे त्याला वेगळे करणे सहज सोपे होते. त्याचप्रमाणे या विश्वामध्ये जाती अपेक्षेने सहा द्रव्ये व संख्येच्या अपेक्षेने अनंत द्रव्य आहेत. प्रत्येक वस्तूंचा स्वभाव भिन्न भिन्न आहे. प्रत्येक वस्तू आपल्या स्वभावाचा आश्रय घेते. आपापल्या स्वरूपास्तित्वाला कोणी सोडू शकत नाही. आपापल्या दृढ निजकिल्ल्यामध्ये सर्व द्रव्ये राहतात. आपले गुण, आपले परिणमन, आपले काहीसुद्धा आपल्यापासून बाहेर अन्यत्र नाही. अशा प्रकारे स्वरूप अस्तित्वाचा बोध झाल्यावर स्व व परामध्ये विभाग आपल्या उपयोगामध्ये उत्पन्न होतो हीच वास्तविक भेदविज्ञानाची कला आहे. प्रत्येक पदार्थाचे स्वरूप जाणून त्यामध्ये भेद जाणला जातो.

व्यर्थ व्यामोह –

खेदाची गोष्ट आहे कि हा जीव वस्तुस्वरूपाला समजून घेऊ इच्छित नाही. मोहरूपी भूत याच्या डोक्यावर सवार झाले आहे. त्यामुळे स्वभावाचा आश्रय घेऊन स्वतःला पण जाणत नाही व पराला पण जाणत नाही.

आपल्या आत्म्याला सर्व रागादि भावकर्म, ज्ञानावरणादि द्रव्यकर्म व

शरीरादि नोकर्मापासून भिन्न अनादि अनन्त एक शुद्ध चैतन्यस्वभावी अनुभवत नाही. त्यामुळे परसंयोग जनित अशुद्ध द्रव्यपर्यायाला, परद्रव्यजनित विकारी भावांना स्व मानतो. मी रागी, मी द्वेषी, मी राजा, मी रंक, मी मनुष्य, मी पुरुष, मी स्त्री, मी सुखी, मी दुःखी, मी विद्वान्, मी मूर्ख, मी व्रती, मी अव्रती इत्यादि परामध्ये अहंकार बुद्धी करतो. त्याचप्रमाणे हे शरीर माझे आहे, हे धन माझे आहे, हे माझे घर, ही माझी शेती-वाडी अशी ममत्वबुद्धी करतो. परामध्ये अहंभाव व ममभाव हाच जीवाचा खोटा अभिप्राय आहे.

व्यर्थ अभिमान –

ज्याप्रमाणे रेडा शेणाच्या ढीगामध्ये आपली शिंगे खुपसून विस्कटाविस्कट करून धुमाकूळ माजवतो व आपली शेपूट वर करून, मान उंचावून, पाठ लांब करून आपल्यामध्ये गौरवाचा अनुभव करतो व मी किती श्रेष्ठ आहे हे दाखवतो, त्याप्रमाणे मोही पुरुष आपल्यामध्ये विराजमान शुद्ध ज्ञायक प्रभूला विसरून बाह्य पदार्थामध्ये विकल्प करून गौरवाचा अनुभव करतो. मी एवढ्या पोजीशनवाला आहे, माझा एवढा मोठा परिवार आहे, मी सरपंच आहे, मी मंत्री आहे इत्यादी या अहंकारामध्ये स्वतःच्या स्वरूपाला पूर्ण विसरला आहे. ज्या क्षणी या ज्ञायकदेवाच्या उपयोगामध्ये स्त्रीदेव पुत्रदेव विराजमान आहे, त्याक्षणी काय याला चैन आहे ? विश्रांती आहे ? नाही. एक क्षणसुद्धा चैन नाही. मोहरूपी पिशाचाने पिछाडलेला हा प्राणी रात्रं दिवस कुटुंबाचे ओझे वाहतो. हा पिशाच त्याला शांत बसू देत नाही. परद्रव्य प्रवृत्त उपयोगाचा हा स्वभावच आहे की आकुलता उत्पन्न करणे. मोही जीव सर्व काही चैन मिळविण्यासाठी करतो, परंतु त्याचे फळ बेचैनी आहे. आपापल्या जीवनातील घटनांवरून आपण निर्णय करू शकतो की मी हे काम चैन मिळविण्यासाठी केले होते, परंतु त्याच प्रवृत्तीचे फळ मिळते बेचैनी. परद्रव्यविषयक एक तरी असे कार्य सांगा की, जे त्यांच्या बेचैनीचे कारण झाले नाही. परद्रव्याच्या प्रवृत्तीचे फळ बेचैनीच आहे.

एका घराला आग लागली होती. लोक सामान बाहेर काढत होते. घराचा मालक बाहेर उभारून रडत होता. थोड्या वेळाने सर्व राख होऊन जाणार. लोकांनी एकदा शेवटचं विचारले 'काही महत्त्वाचे सामान तर काढणे राहिले नाही ना ? सर्व बाहेर काढले का ? मालकाने सांगितले 'मला काही आठवत नाही, जे वाचविले जाऊ शकते ते वाचवा. काही लोग आत गेले व

परत आले तर मालकाच्या एकुलत्या एका मुलाचे प्रेत घेऊन. लोक घरातील सामान वाचविण्याच्या पाठीमागे लागले, परन्तु घरचा एकमात्र मालक जळून खाक झाला होता.

हीच आमची अवस्था झाली आहे. आम्ही शरीर व परिग्रहाला वाचवू पहात आहे, पण या शरीरामध्ये बसलेला मालक मरत आहे. पर पदार्थामध्ये इतके लीन आहोत की आम्हाला स्वतःचे भान नाही. हाच आत्मघात आहे. धनासाठी, शरीरासाठी, स्त्रीपुत्रांसाठी अनेक प्रकारचा अन्याय, खोटे कार्य करून यांचा संग्रह करू इच्छितो व त्यासाठी आपल्या आत्मतत्त्वाची हत्या करीत आहोत. जी वस्तू कायम राहणारी नाही त्यासाठी शाश्वत वस्तूचा घात करीत आहोत. शाश्वत वस्तूचा घात तर होत नाही. परंतु त्याला न जाणल्यामुळे या जीवाच्या शुद्ध परिणतीचा घात होत आहे. ज्याला स्व-पराचे भेदविज्ञान नाही तोच परद्रव्यामध्ये अहंकार ममकार करतो. भेदविज्ञानी परामध्ये अहंकार ममकार करीत नाही. म्हणून परद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञानाचा अभाव आहे आणि स्वद्रव्यामध्ये प्रवृत्तीचे कारण भेदविज्ञानच आहे. त्या भेदविज्ञानाच्या सिद्धीसाठी परद्रव्यांच्या स्वभावाला जाणून त्यापासून निवृत्त व्हावे व स्वद्रव्याच्या स्वभावाला जाणून त्यामध्ये रमावे.

आत्मा परद्रव्याचा कर्ता नाही. तर आत्म्याचे काम काय आहे ? आत्मा काय करतो ? ही जाणून घेण्याची शिष्याला उत्सुकता आहे. ज्याप्रमाणे दुसरे कोणी काम करीत असतील तर दूसरे प्रेक्षक लोक उत्सुकतेने पाहत असतात. हे काय करतात ? त्याप्रमाणे मोक्षार्थी पुरुष मोठ्या उत्सुकतेने पाहतो की आत्मा काय काय करतो ! त्याचेच वर्णन आचार्य पुढील गाथेत करतात. -

कुव्वं सभावमादा हवदि हि कत्ता सगस्स भावस्स।
पोग्गलदव्वमयाणं ण दु कत्ता सव्वभावाणं ।।१८४।।

अन्वयार्थ - (सहावं कुव्वं) आपल्या भावाला करणारा **(आदा)** आत्मा **(हि)** निश्चयाने **(सगस्स भावस्स)** आपल्या भावाचा (परिणामाचा) **(कत्ता)** कर्ता **(हवदि)** आहे. **(दु)** परन्तु **(पोग्गलदव्वमयाणं)** पुद्गलद्रव्यमय **(सव्वभावाणं)** सर्व भावांचा **(कत्ता ण)** कर्ता नाही.

तात्पर्य - आत्मा पुद्गलमय सर्व भावांचा कर्ता नाही, केवळ आपल्या भावांचा कर्ता आहे.

आत्मा स्वभावाचा कर्ता –

आत्मा वास्तविक स्व परिणामाला करतो. कारण तो त्याचा स्वधर्म आहे. आत्म्यामध्ये त्या भावरूप होण्याची शक्ती आहे; म्हणून तो भाव अवश्य आत्म्याचे कार्य आहे. येथे एक महासिद्धान्त सांगितला की जो ज्यारूपाने परिणमन करू शकतो तेच त्याचे कार्य होऊ शकते. जो त्या रूपाने परिणमन करू शकत नाही ते त्याचे कार्य होऊ शकत नाही. बाई भाकरीरूपाने परिणमन करू शकत नाही. म्हणून भाकरी बाईचे कार्य नाही. बाई त्या भाकरी बनविण्याच्या अनुरागाने परिणमते म्हणून तो अनुरागरूप परिणाम बाईचे कार्य आहे.

स्वभावशब्दाने यद्यपि शुद्धनिश्चयाने शुद्ध बुद्ध एक स्वभाव सांगितला जातो तथापि कर्मबन्धाच्या प्रकरणामध्ये अशुद्ध निश्चयाने रागादी परिणामांना ही स्वभाव म्हटले आहे.

तो आत्मा त्या स्व भावाला स्वतंत्ररूपाने करतो म्हणून तो त्याचा कर्ता अवश्य आहे आणि आत्म्याद्वारे केला जाणारा तो स्व भाव आत्म्याद्वारे प्राप्त करण्यायोग्य असल्यामुळे अवश्य आत्म्याचे कर्म आहे. याप्रमाणे स्वपरिणाम आत्म्याचे कर्म आहे.

जो कार्य करण्यामध्ये स्वतंत्र असतो तो त्या कर्माचा कर्ता आहे; म्हणून व्याकरणतज्ज्ञांनी कर्त्याचे लक्षण सांगितले आहे, **'स्वतन्त्रः कर्ता'** आत्मा भावात्मक पदार्थ आहे, म्हणून त्याचे कार्यसुद्धा भावात्मक आहे. आत्मा चैतन्यमय आहे; म्हणून यामध्ये चैतन्यमय भावच होऊ शकतो. म्हणून हा आपल्या चेतनभावांचा कर्ता आहे. शुद्ध निश्चयनयाने शुद्ध वीतराग चेतन भावाचा कर्ता आहे व अशुद्ध निश्चयनयाने अशुद्ध रागादी भावांचा कर्ता आहे. रागादि भाव पुद्गलकर्माच्या निमित्ताने होतात पण हे आत्म्याच्याच अस्तित्वामध्ये होतात. परिवर्तन आपल्याच आश्रयामध्ये होते. वस्तूचे काम वस्तूला सोडून अन्यत्र होऊ शकत नाही. जसे बोट सरळ होवो अथवा वाकडे होवो कोणत्याही अवस्थेत असो त्याची क्रिया त्याच्यामध्येच होणार बाहेर त्याची क्रिया होऊ शकणार नाही.

आत्मा परभावाचा अकर्ता –

आत्मा पुद्गलाच्या परिणामांना करीत नाही. कारण पुद्गलाचा परिणाम पुद्गलाचा धर्म आहे म्हणून तो परधर्म आहे. पुद्गलाच्या पर्यायरूपाने

होण्याची शक्ती आत्म्यामध्ये नाही म्हणून आत्मा पुदगलाच्या धर्माचा (पर्यायाचा) कर्ता नाही. आत्म्याच्या रागादि परिणामांना निमित्त करून कार्माण वर्गणारूप पुद्गल स्वयमेव ज्ञानावरणादी कर्मरूपाने परिणमतात. त्यामुळे जीवाला व्यवहाराने पुद्गलकर्माचा कर्ता म्हटले जाते, परन्तु वास्तविक जीव आपल्या भावाचा कर्ता आहे. आत्म्याकडून न केले जाणारे ते पुद्गल कर्म आत्म्याचे कार्य नाही.

परस्पर कर्तृकर्मभावाचा निषेध –

खेडेगावामध्ये किंवा चाळीमध्ये दोन महिला परस्पर भांडतात. एक स्त्री आपल्या दरवाजामध्येच उभे राहून दुसऱ्या स्त्रीला हातवारे करून शिव्या देते. दुसरी स्त्री आपल्या दारामध्ये उभे राहून चिडून तिला उत्तर देते. दोघी आपापल्या उंबरठ्यावर उभे राहून आपापल्या मध्येच हातवारे करून स्वत:मध्येच परिणमन करीत आहेत. एक स्त्री दुसऱ्या स्त्रीमध्ये काही करीत नाही. आपापल्यामध्ये भाव बिघडवून विकृत होत आहेत. परंतु त्यांना वाटते की आम्ही एक दुसऱ्यालाच बोलत आहोत. दुसऱ्याचा अपमान करीत आहोत. हीच मिथ्या मान्यता आहे. आपण आपले भाव बिघडवत आहोत. दुसऱ्यामध्ये मी काही करू शकत नाही हेच अज्ञानीला कळत नाही. आम्ही स्व:तच्या परिणामाचे स्वामी आहोत. दुसऱ्याच्या परिणामाचे नाही. जर कर्ता व्हायचेच आहे तर मग या विकृत परिणामांचे कर्तृत्व आपल्या शिरावर नको. शुद्धभावांचे कर्तृत्व घेऊन आनंदी होणे चांगले. आपल्या परिणतीचे फळसुद्धा स्वत:लाच भोगावे लागते.

पदार्थ स्वयं परिणमनशील आहे. प्रत्येक पदार्थ स्वस्वरूपाने परिणमन करीत आहेत. आपल्या प्रदेशांमध्ये व आपल्या गुणांमध्येच प्रत्येक पदार्थ परिणमन करतो त्याच्याबाहेर नाही. ज्याप्रमाणे उन्हामध्ये अंगणात उभे राहिलो की आपल्या शरीराची सावली जमिनीवर पडते. तेथे जमिनीवर पडलेली सावली कोणाची ? त्या सावलीरूपाने कोण परिणमले आहे ? शरीर की जमीन ? शरीराच्या प्रदेशामध्ये सावली आहे का ? अथवा शरीराचे रंगरूप बदलले आहे का ? तर नाही. शरीरामध्ये काही परिवर्तन झाले नाही. जमीन प्रकाशरूपाने परिणमली होती तीच आता सावली रूपाने परिणमित झाली. ते जमीनरूप पुद्गलाचे परिवर्तन आहे. या शरीराला निमित्त करून जमीन सावलीरूपाने परिणमली. त्याचप्रमाणे जीव स्वत:मध्ये रागादी भाव करतो.

त्याला निमित्त करून कार्मण वर्गणा कर्मरूप परिणमतात. जीव-पुद्गल कर्मरूपाने परिणमत नाही. म्हणून जीव त्याचा कर्ता नाही. निमित्तनैमित्तिक संबंधालाच अज्ञानी जीव कर्ताकर्म संबंध मानून बसला आहे. ज्याप्रमाणे दोन द्रव्यामध्ये स्वस्वामिसंबंध नाही त्याप्रमाणे दोन द्रव्यामध्ये कर्ताकर्म संबंध नाही.

निमित्ताच्या उपस्थितिशिवाय विभावभाव होत नाही. परंतु निमित्ताच्या उपस्थितीमध्ये पदार्थ स्वयं विभावरूपाने परिणमतो. हा आत्मा स्वतन्त्र होऊन त्या विभावांना करीत त्या विभावांचा कर्ता होतो. कोणताही पदार्थ किती पण संयुक्त असू देत, विकृत असू देत, त्या परिस्थितीमध्येसुद्धा पदार्थाच्या स्वरूपास्तित्वावर दृष्टी दिली तर लक्षात येते की या पदार्थांनी केवळ आपल्या गुणांचेच कार्य केले आहे. स्वत:मध्येच परिणमन झाले आहे.

हा मी आत्मा आपल्या प्रदेशांमध्येच अवस्थित आहे. अनंत शक्तींचा पुंज आहे. तो या प्रदेशांमध्येच व्याप्त आहे. त्या गुणांचे जे कार्य आहे ते त्या गुणामध्येच समाप्त होते. परिवर्तन आपल्या आधारामध्येच होते. वस्तू आपल्या सीमेमध्येच परिणमते. आपल्या सीमेचे कधी उल्लंघन करीत नाही. जीव आपले परिणमन करायला स्वतन्त्र आहे, हे जाणून रागादी परिणामरूपाने परिणमन न करता साम्यभावरूपाने परिणमन करण्याचा पुरुषार्थ करावा. निज शुद्ध ध्रुव स्वरूपाच्या आश्रयाने शुद्ध वीतराग भावरूपाने परिणमावे. शुद्ध आत्म्याचा आश्रय घेतला तर शुद्ध परिणमन सहज होते.

ह्या चिदानन्द राजाची लीला अद्भुत आहे. आपल्या स्वरूपामध्ये आत गेला तर परम आनंदाचा स्वाद घेतो व आपले तोंड बाहेर काढले तर नाना संकट झेलतो व दु:खरूपी विष पीतो. म्हणून स्वत:मध्ये विश्रान्ती करावी. सुखी होण्याचा उपाय स्वद्रव्यप्रवृत्ती आहे व त्याचा उपाय भेदविज्ञान आहे. भेदविज्ञानाचा उपाय वस्तुस्वरूपाचे यथार्थ ज्ञान आहे.

निमित्तनैमित्तिक भावाचा अवलंब घेतला तर आत्मा परद्रव्याचे परिणमन करताना दिसतो म्हणून अज्ञानीला संदेह होतो की पुद्गल परिणमन आत्म्याचे कर्म का नाही ? अज्ञानीचा संशय दूर करण्यासाठी आचार्य युक्ती देऊन समाधान करतात -

गेण्हदि णेव ण मुञ्चदि करेदि हि पोग्गलाणि कम्माणि ।
जीवो पोग्गलमज्झे वट्टण्णवि सव्वकालेसु ।।१८५।।

अन्वयार्थ - (जीवो) जीव **(सव्वकालेसु)** सर्व काळामध्ये

(पोग्गलमज्झे वट्टणवि) पुद्गलाच्यामध्ये राहूनसुद्धा **(पोग्गलाणि कम्माणि)** पौद्गलिक कर्मांना **(हि)** वास्तविक **(गेण्हदि णेव)** ग्रहण करीत नाही, **(ण मुञ्चदि)** सोडत नाही आणि **(ण करेदि)** करीत नाही.

तात्पर्य – जीव पुद्गलाच्या मध्ये राहून सुद्धा निश्चयाने तो पुद्गलांना ग्रहण करीत नाही आणि सोडत नाही.

अनुमानाने जीवाच्या अकर्तृत्वाची सिद्धी –

अनुमानाचे पाच अंग आहेत – प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय व निगमन

प्रतिज्ञा –निश्चयाने पुद्गलपरिणाम आत्म्याचे कर्म नाही.

हेतु – कारण तो परद्रव्याच्या ग्रहण–त्यागाने शून्य आहे.

उदाहरण – जो ज्याला परिणमविणारा पाहिला आहे तो त्याच्या ग्रहण व त्यागाने शून्य पाहिला गेला नाही. ज्याप्रमाणे लोखंडाचा गोळा अग्नीला ग्रहण करीत नाही व सोडत नाही.

उपनय – आत्मा परद्रव्याच्या ग्रहण–त्यागाने शून्यच आहे.

निगमन – म्हणून तो पुद्गलाला कर्मरूपाने परिणमविणारा नाही अर्थात् पुद्गल परिणाम आत्माचे कर्म नाही.

अथवा जो ज्याला परिणमविणारा नाही तो त्याच्या ग्रहण–त्यागाने शून्य पाहिला जातो. ज्याप्रमाणे लोखंडाचा गोळा अग्नीला परिणमवित नाही तर तो अग्नीला ग्रहण करीत नाही व सोडत नाही अथवा करीत नाही.

एकक्षेत्रावगाहामध्ये सुद्धा द्रव्याची स्वतंत्रता –

आत्मा व कर्म एका क्षेत्रामध्ये राहतात. तरीसुद्धा आत्मा कर्म–नोकर्माला ग्रहण करीत नाही व सोडत नाही. ज्याप्रमाणे सिद्ध भगवान् अनेक पुद्गलांच्यामध्ये राहतात. कारण जेथे सिद्ध प्रभु विराजमान आहेत तेथे अनन्त निगोद जीव पण आहेत आणि त्या निगोद जीवांच्या बरोबर अनन्त पुद्गल पिंड कर्मरूपाने, शरीररूपाने, विस्रसोपचय–रूपाने संलग्न आहेत. तरीसुद्धा सिद्ध भगवान् एका पण पुद्गल परमाणूला ग्रहण करीत नाहीत, सोडत नाहीत व उपादानरूपाने करीत नाहीत, त्याचप्रमाणे निश्चयाने सर्व जीव पुद्गलांना ग्रहण करीत नाही, सोडत नाही व करीत नाही.

जीव अनादिकाळापासून अनंत पुद्गलाच्या घोळक्यामध्ये स्थित आहे. व्यवहारानयाने जीव कर्म व शरीराच्या परमाणूंना ग्रहण करतो, असे

सांगितले जाते, पण स्वरूपास्तित्वावर दृष्टी दिली तर लक्षात येते की एका ही पुद्‌गलपरमाणूला जीवाने ग्रहण केले नाही. जर जीवाने पुद्‌गलाला ग्रहण केले असते तर जीव पुद्‌गलरूप झाला असता. ज्याप्रमाणे हाताने पुस्तक ग्रहण केले असे व्यवहारात म्हणतो तेथे विचार केला तर लक्षात येईल हाताने पुस्तकाला ग्रहण केले म्हणजे काय केले ? पुस्तक पुस्तकामध्ये आहे. हात हातामध्ये आहे. दोन्ही क्षेत्राच्या अपेक्षेने जवळ आहेत. एवढाच त्याचा अर्थ आहे. त्याप्रमाणे जीवाने कर्माला, नोकर्माला ग्रहण केले असे व्यवहाराने म्हटले जाते. पण जीव जीवामध्ये आहे. कर्म कर्मामध्ये आहे. दोघे एका क्षेत्रामध्ये स्थित आहेत व त्यांचा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. पण परस्पर भिन्न आहेत. विचार करा जेथे संश्लेषरूपाने एकत्र असणाऱ्या कर्म व नोकर्माच्या ग्रहण-त्यागाचा व त्याला करण्याचा निषेध केला आहे तर अत्यन्त भिन्न असणाऱ्या घर, दुकान, स्त्री, पुत्र, सोने, चांदी, धनधान्य इत्यादी परद्रव्यांना जीव कसा काय ग्रहण करू शकेल ? घर-परिवार आदींना ग्रहण करण्याचा भाव अत्यंत बिकट मोह आहे. परद्रव्याच्या ग्रहण त्यागाच्या विकल्पामध्ये व त्यांच्या कर्तृत्वाच्या अहंकारामध्ये हा जीव इतका व्यस्त झाला आहे की त्याला आपल्या स्वभावाचे दर्शन करण्याची पण फुरसत नाही. व्यर्थ श्रम चालू आहेत.

ज्याप्रमाणे यात्रा भरते तेथे सर्व लोक एकत्र येतात. एकमेकाला भेटतात. यात्रा संपली की आपापल्या स्थानी परत जातात. त्याप्रमाणे संसारामध्ये जीव पुद्‌गलांची यात्रा भरली आहे. वेगवेगळे पुद्‌गल या जीवाच्या संपर्कात येतात. आपला काळ संपला की निघून जातात.

छहढालामध्ये दौलतरामजी म्हणतात. -

जलपय ज्यों जियतन मेला पै भिन्न भिन्न नहिं भेला
तो प्रगट जुदे धन धामा, क्यों है इक मिलि सुत रामा ।।

एक साधू एका गावात राहिले होते. लोक त्यांचे दर्शन करायला येत होते. आपल्या शंकेचे समाधान करीत होते. एक मनुष्य आला तो साधूला म्हणाला, हे कसे शक्य आहे की शरीरात रोग झाला, शरीरामध्ये छेद-भेद झाला, त्याला कापले तरी जीवाला पीडा होत नाही, शरीराला लागले तर पीडा होणारच तर मग शरीर व आत्म्याला भिन्न भिन्न पाहिल्यामुळे सुद्धा काय सिद्धी होणार ? साधूंच्या समोर दोन नारळ चढवले होते. त्यांनी सांगितले हे दोन नारळ आहेत. एक कच्चा आहे व एक वाळलेला नारळ आहे. कच्चा

नारळामध्ये पाणी आहे. त्याला फोडून त्यातील खोबरे वेगळे करण्याचा प्रयत्न केला तर करू शकत नाही. कारण ते खोबरे परटीला चिकटून बसले आहे. दुसऱ्या नारळात पाणी वाळून गेले आहे व खोबरे परटीपासून वेगळे झाले आहे. हा नारळ फोडला व वरचे परटे वेगळे केले तरी आतल्या खोबऱ्याला धक्का पोहचत नाही. कारण नारळाचे परटे व खोबरे वेगवेगळे झाले आहे. पुढे साधू म्हणाले, 'हेच कारण आहे की काही लोक शरीररूपी परटीशी चिकटलेले आहेत. शरीराला धक्का पोहचताच त्यांना मार बसतो. त्यांना पीडा होते व जे स्वत:ला या शरीररूपी परट्यापासून भिन्न अनुभव करतात त्यांच्या शरीराला मार बसला तरी त्यांना काहीही पीडा व दु:ख होत नाही.'

ज्यांच्या अंतरंगामध्ये प्रेम आहे ते शरीराशी चिकटलेले आहेत. प्रेम हाच ओलावा आहे. ज्यांनी शरीरालाच स्व मानले आहे. ते शरीर व आत्म्याचे अस्तित्व भिन्न असतानाही त्यांना एकरूप अनुभवतात. शरीराच्या पीडेला आपली पीडा मानतात. वास्तविक आत्मा शरीराच्या एका परमाणूलाही स्पर्श करीत नाही. त्याला ग्रहण करीत नाही,सोडत नाही व उत्पन्न करीत नाही. अज्ञानी विना कारण खोटे विकल्प करून दु:खी होतो.

संसारातील कितीतरी पदार्थ उदा. बदाम, पिस्ता, शेंगदाणे, केळ इत्यादी आपल्याला भेदविज्ञानाचा धडा शिकवितात. परंतु आमची तिकडे दृष्टी नसते त्यामुळे आम्ही शिकत नाही. अशा वस्तूंना पाहून आपल्यामध्ये पण भेदविज्ञानाचा विचार करावा. जसे बदामाचे वरचे मोठे कव्हर, आतील टरपल व त्याच्यावर असलेले लाल फोलपट वेगळे आहे व आतील पांढरी बदाम बी वेगळी आहे. त्याप्रमाणे वरचे कव्हर म्हणजे शरीर, आतील टरपल म्हणजे द्रव्यकर्म व त्याच्या आतील लाल फोलपट म्हणजे रागादी भावकर्म माझ्या आत्म्यापासून वेगळे आहेत. मी एक स्वतन्त्र शुद्ध चैतन्यमय आत्मा सर्वापासून भिन्न आहे. असा भेदविज्ञानाचा सतत अभ्यास करावा.

मागील गाथेमध्ये हे सिद्ध केले की आत्मा पुद्गल कर्मांना ग्रहण करीत नाही, सोडत नाही व उत्पन्न करीत नाही. हे ऐकून कर्मशास्त्राच्या अभ्यासू शिष्याला सहजच शंका उत्पन्न होते की जर आत्मा पुद्गलकर्मांना ग्रहण करीत नाही तर कर्मकाण्ड ग्रंथामध्ये कसे सांगितले आहे की जीव प्रत्येक समयाला अनंतानंत पुद्गल कर्मपरमाणूंना व नोकर्मपरमाणूंना ग्रहण करतो. तत्त्वार्थसूत्र ग्रंथामध्ये पण अध्याय ८ मध्ये सांगितले आहे की 'कषायसहित

जीव कषायभावामुळे कर्माला योग्य अशा पुद्‌गलांना ग्रहण करतो' जर जीव पुद्‌गलाच्या ग्रहणत्यागाने रहित आहे तर तो कशाप्रकारे पुद्‌गलकर्माद्वारे ग्रहंण केला जातो व सोडला जातो. या शंकेचे समाधान आचार्य पुढील गाथेत करतात.

स इदाणिं कत्ता सं सगपरिणामस्स दव्वजादस्स ।
आदीयदे कदाइं विमुच्चदे कम्मधूलीहिं ।।१८६।।

अन्वयार्थ – (स) तो जीव **(इदाणिं)** आता संसार अवस्थेमध्ये **(दव्वजादस्स)** आपल्या द्रव्यापासून उत्पन्न होणाऱ्या **(सगपरिणामस्स)** स्वतःच्या परिणामाचा **(कत्ता सं)** कर्ता होऊन **(कदाइं)** कदाचित् **(कम्मधूलीहिं)** कर्मरूपी धूळीने **(आदीयदे)** ग्रहण केला जातो व **(विमुच्चदे)** सोडला जातो.

तात्पर्य – आत्म्याचे अशुद्ध परिणाम होणे व न होणे हे कर्माच्या बंधाचे व सुटण्याचे निमित्तमात्र आहे, आत्मा त्यांचा कर्ता नाही.

आत्मा बन्धमोक्षरहित –

परमशुद्धनिश्चय नयाने आत्मा शुद्ध बुद्ध एकस्वभावी आहे. नित्य निरंजन अविकार सहजानन्दमय चिद्रूप आहे. परद्रव्याच्या ग्रहण–त्यागाने रहित त्यागोपादानशून्यत्व शक्तीने संपन्न आहे. परद्रव्यापासून भिन्न आहे. परद्रव्याच्या निमित्ताने होणाऱ्या संयोगी भावापासून भिन्न आहे. हा ध्रुव शुद्ध आत्मा आपल्या स्वरूपामध्येच स्थित आहे. हा शुद्धात्मा परद्रव्यामध्ये प्रवेश करू शकत नाही व परद्रव्य याच्यात प्रवेश करू शकत नाही तर याला बंध कसा व बंधच नाही तर मोक्ष कसा ? जो बांधला जातो तोच बंधनातून मुक्त होतो. या विवक्षेने मागील गाथेत सांगितले की जीव पुद्‌गलकर्मांना ग्रहण करीत नाही व सोडत नाही. ज्याप्रमाणे कमळ पाण्यात असून ही स्वभावाने पाण्याला स्पर्श करत नाही त्यापासून अलिप्त असते त्याप्रमाणे जीव पुद्‌गलवर्गणांमध्ये असूनसुद्धा स्वभावाने अबद्धस्पृष्ट आहे.

पुद्‌गलकर्मांचे ग्रहण उपाधिजन्य –

आत्मा असा निर्लेप स्वभावी असूनसुद्धा अनादिकाळापासून त्याचा पुद्‌गलकर्माबरोबर निमित्त– नैमित्तिक संबंध आहे. त्यामुळे संसार अवस्थेमध्ये पुद्‌गलकर्माच्या उदयाच्या निमित्ताने मोहरागद्वेषादि विभाव पर्यायरूपाने स्वयं परिणमतो त्यामुळे त्या विभाव परिणामांचा कर्ता होतो. त्या विभाव अशुद्ध

परिणामामुळे कर्मधूलीने लिप्त होतो. अशुद्ध परिणाम हा जीवाचा अपराध आहे त्यामुळे या अपराधाची शिक्षा म्हणून कर्मरूपी पोलिसांच्या बंधनातून मुक्त होतो. अथवा अशुद्ध परिणामरूपी अपराध सोडून विशुद्ध भावरूपी निरपराध दशेला प्राप्त होतो तेव्हा आपोआप कर्मधूळीने सोडला जातो. कर्मधूळी चिपकण्याचे एकमात्र कारण अशुद्ध परिणाम आहे. कर्मधूळीपासून सुटण्याचे कारण एकमात्र शुद्ध परिणाम आहे.

गतिरूपी मिलमध्ये विभाव बटणरूपी इलेक्ट्रिक –

ज्याप्रमाणे कपड्याच्या मिल आहेत किंवा अन्य अनेक प्रकारच्या माल बनविण्याच्या मोठमोठ्या कंपन्या असतात. तेथे अनेक मशिन्स असतात. हजारो कामगार तेथे काम करीत असतात. सर्व साधनसामग्री तेथे हजर आहे, परंतु इलेक्ट्रिकचे एक छोटेसे बटण दाबल्यावरच सर्व यंत्रणा ऑटोमेटिक चालू होते. जर लाईट गेली की सर्व यंत्रणा बंद पडते. अर्थात् एका इलेक्ट्रिक बटणावर एवढ्या मोठ्या मिलचा कार्यभार अवलंबून आहे. अथवा घरोघरी पण आपण पाहतो पंखा, कुलर, मिक्सर इत्यादी यंत्र एक वीजेचे बटण दाबले की त्यांचे कार्य सुरू होते. त्याप्रमाणे पुद्गलकर्माची मोठी मिल आहे तेथे गति, शरीर इत्यादी कार्य सुरू असते. या सर्वांचे मूळ एक विभाव परिणामाचे बटण आहे. जीवाने अशुद्ध परिणामाचे बटण दाबले की सर्व यंत्रणा चालू होते. कार्माणवर्गणा पुद्गलकर्मरूप होतात, पुद्गलकर्म शरीर इंद्रियादींची रचना करतात. इंद्रिये विषयांचा भोग घेतात. त्यामुळे इष्टानिष्ट भाव उत्पन्न होतात. पुन्हा गती मिळते. बाहेरची वीज कधी असते कधी नसते पण विभावांची वीज मात्र चोवीस तास, बारा महिने बंद पडत नाही. त्यामुळे पुद्गलकर्मांचे कार्य सतत चालू आहे त्यामुळे संसाराची मिल बंद पडत नाही.

आनन्दामध्ये बाधक मोह –

आमच्या आनन्दामध्ये बाधा करणारा आमचा रागादिक परिणामच आहे. मोहामुळे असे श्रद्धान होते की स्त्रीपुत्र मित्रादिकांवर प्रेम केल्याने मला आनन्द मिळेल. परंतु प्रत्यक्षात त्या राग परिणामामुळे आकुलतेला सुरवात होते. त्या जीवांच्या बरोबरचे प्रेम टिकविण्यासाठी अनेक उद्यम चालू होतात. त्यांच्यासाठी पैसा मिळविण्याचे कष्ट करतो. त्या पैशाद्वारे त्यांच्या अनुकूल साधन सामग्रींचा संग्रह करतो. बंगला, गाडी, सोने चांदी ही त्याची प्रत्यक्ष उदाहरणे आहेत. या सर्व व्यस्ततेमध्ये सुखाचा अनुभव करण्यासाठी एक क्षण

शिल्लक राहत नाही. जो विभाव आनन्दामध्ये बाधा करतो त्यालाच आम्ही आनन्दाचे साधन मानून बसलो आहोत. हेच मोहाचे परिणमन आहे. किती विचित्र गोष्ट आहे की जो समागम या भवातच सुटणार आहे त्या समागमाच्या प्रति काही काळापुरता सुद्धा राग सुटत नाही किंवा त्यांचा विकल्प विसरत नाही. निजध्रुव शुद्ध ज्ञायक परमात्मा अंतरंगामध्ये विराजमान असताना सुद्धा या रागादी विभाव परिणामांच्या व्यस्ततेमध्ये त्याचे नित्य विस्मरण होते. त्यामुळे कर्मधूळीने हा जीव बांधला जातो.

कर्ममुक्ततेचा उपाय शुद्ध परिणामांचा विकास –

या संसार अवस्थेमध्येच जेव्हा जीव आपल्या स्वरूपाला जाणतो तेव्हा या संसारमिलचा मिथ्यात्वरूप विभाग बंद पडतो. त्या विभागातर्फे चाललेले कार्य एकेन्द्रिय, नारकादी पर्यायांमध्ये गमन बंद होते, पुन्हा जीव स्वस्वरूपामध्ये आपली लीनता वाढवतो व अप्रत्याख्यानादी कषायांचा त्याग करतो तसतसे असंयमरूपी विभागाचे कामकाज बंद होते. जीव मोक्षमार्गामध्ये अग्रेसर होतो. कर्मरूपी धूळी त्या जीवाचा पाठलाग सोडते. जीव संयममार्गामध्ये स्थित होतो तेव्हा प्रमाद कषायादी विभाग बंद पडत जातात. जीव क्षपकश्रेणीवर आरोहण करतो तेव्हा चार घातिकर्मरूपी धूळ त्या जीवाचा पीछा सोडते. जीव जीवन्मुक्त होऊन अरिहंतपदाला प्राप्त होतो. म्हणून कर्माची फॅक्टरी बंद पाडायची असेल तर शुद्धभावांचा आश्रय करून अशुद्ध परिणामांचा संप करावा.

कर्म परमाणू जीवाच्या विशिष्ट अवगाहरूपाने राहतात हेच येथे पुद्गलाने केलेले जीवाचे ग्रहण आहे व जीवाच्या अवगाहन रूपाने काही काळ राहून कर्म निघून जातात अथवा जीवाच्या शुद्धपरिणामाला निमित्त करून ती कर्मधूळी जीवाला सोडते सुद्धा.

ज्याप्रमाणे तेलाने माखलेल्या शरीराला इच्छा नसतानाही धूळ आपोआप येऊन चिकटते त्याप्रमाणे रागादियुक्त आत्म्याला कर्म स्वयमेव येऊन बद्ध होतात. जेव्हा तेल शरीरामध्ये प्रवेश करते, वर चिकटपणा राहत नाही तेव्हा धूळ स्वयं शरीरापासून गळून पडते. त्याप्रमाणे जेव्हा हा आत्मा वीतराग भावरूपाने परिणमतो तेव्हा कर्मधूळ स्वयमेव आत्म्यापासून वेगळी होते. संसारामध्ये कर्मबंध व आत्म्याचा अशुद्ध भावांचा असा विलक्षण संबंध आहे. विचार केला तर लक्षात येते की आत्मा आपल्या भावांशिवाय दुसरे

काही करीत नाही.

अशुद्ध भावांचे निमित्त प्राप्त करून कर्म स्वयं बांधले जातात तसेच शुद्ध भावांचे निमित्त प्राप्त करून स्वयं सुटतात. या निमित्तनैमित्तिक संबंधामुळे जीवाला व्यवहाराने बंधाचा कर्ता व मोक्षाचा कर्ता म्हटले जाते.

ज्याप्रमाणे सूर्य स्वयं उदासीनभावाने उदयाला प्राप्त होतो व अस्ताला प्राप्त होतो परन्तु उदयाचे निमित्त प्राप्त करून कमळ स्वयं फुलते व चकवाचकवी यांचा स्वयं संयोग होतो. त्याच्या अस्ताचे निमित्त प्राप्त करून कमळ स्वयं बंद हाते व चकवाचकवी स्वयं वेगळे होतात. असा वस्तूचा स्वभाव आहे.

बंध व मोक्षाला नैमित्तिक जाणून त्यापासून उदासीन होऊन आपल्या शुद्ध ज्ञानानन्द स्वभावामध्ये तन्मय व्हावे. कर्मफळापासून सुटण्यासाठी निज सहजचित् स्वभावाचा अनुभव करावा.

पुढे पुन्हा प्रश्न उत्पन्न होतो की पुद्गल स्वयं कर्मरूप परिणमते व जीवाशी बद्ध होते. पण या बद्ध पुद्गलकर्मांमध्ये पुण्य पाप, घाति-अघाति आदि विचित्रता कोणत्या कारणाने येते ? मूळात कर्म एक आहे. त्यामध्ये ज्ञानावरणादी प्रकारची विभिन्नता उत्पन्न होते. काही कर्म ज्ञानाच्या आवरणामध्ये निमित्त होतात तर काही दर्शनगुणाला आवृत करतात. कोणी कर्म साता- असातारूप परिणमते, कोणी कर्म जीवाला मूर्च्छा मोह उत्पन्न करण्यामध्ये निमित्त होते. कोणी कर्म अनेक प्रकारच्या शरीरादींना उत्पन्न करण्यामध्ये निमित्त होते. प्रत्येक प्राण्याच्या शरीराचा आकार, प्रकार, रंग रूप भिन्न भिन्न आहे. कुठे चिनी माणसाचा चेहरा तर कुठे अमेरिकन आकाराचा तर कुठे भारतीय चेहरा. या शरीरांच्या विचित्रतेमध्ये निमित्त कर्मच आहे. जितक्या व्यक्ती तितके चित्र आहेत. उच्च नीच कुलामध्ये उत्पत्तीला निमित्त गोत्र कर्म आहे. अशा प्रकारे नाना विचित्रता कर्मामध्ये कशी आली या शंकेचे समाधान पुढील गाथेत करतात. -

परिणमदि जदा अप्पा सुहम्हि असुहम्हि रागदोसजुदो ।
तं पविसदि कम्मरयं णाणावरणादिभावेहिं ।।१८७।।

अन्वयार्थ - (जदा) जेव्हा **(अप्पा)** आत्मा **(रागदोसजुदो)** रागद्वेषयुक्त होऊन **(सुहम्हि)** शुभ **(असुहम्हि)** अशुभ भावामध्ये **(परिणमदि)** परिणमतो तेव्हा **(कम्मरयं)** कर्मधूळ **(णाणावरणादिभावेहिं)** ज्ञानावरणादि

रूपाने **(तं)** त्या जीवामध्ये (पविसदि) प्रवेश करते.

तात्पर्य –जीवाच्या शुभ अशुभ विकाराचे निमित्त प्राप्त करून कर्म ज्ञानावरणादी रूपाने प्रवेश करते.

जीवभाव कर्माच्या विचित्रतेमध्ये निमित्त मात्र –

ज्याप्रमाणे स्फटिकमणि स्वयं शुद्ध स्वच्छ आहे. त्याची वृत्ती एकस्वरूप आहे परन्तु परउपाधीच्या संयोगाचे निमित्त प्राप्त करून नाना रंगरूपाने परिणमतो त्याप्रमाणे हा आत्मा स्वतः शुद्ध ज्ञानदर्शनस्वभावी आहे, चैतन्य अस्तित्वमय एकस्वरूप आहे पण कर्माच्या उपाधीच्या निमित्ताने नाना शुभ–अशुभ भावरूपाने परिणमतो. जेव्हा आत्मा शुभ–अशुभ भावरूपाने परिणमतो. तेव्हा योगाच्या निमित्ताने स्वयं आलेले पुद्गल कर्म स्वयंच ज्ञानावरणादी अनेक भावरूपाने परिणमते. जीव त्याला परिणमवित नाही.

ज्याप्रमाणे जेव्हा आषाढ महिन्यामध्ये नवीन पाऊस पडतो व ते पाणी जमिनीमध्ये संयुक्त होते. तेव्हा दुसरेच पुद्गल स्वयंच हिरवे गवत, कुत्र्याची छत्री, इन्द्रगोप कीडे किंवा छोटे छोटे लाल कीडे यारूपाने स्वयं परिणमतात. त्यांना अन्य कोणी परिणमवित नाही.

कुंथलगिरीहून बार्शीकडे आमच्या संघाचा विहार चालू होता. रात्री खूप पाऊस पडला. सकाळी उठून आमचा विहार चालू झाला. रस्त्यावर जणू बेडकांचा सडा पडला होता. दोन तीन पावलावर एक तरी बेडूक गाडीखाली चेंगरून मेलेले दिसत होते. ते पाहून संसारासंबंधी वैराग्याचे भाव जागरूक होत होते. काय हे जीवन आहे ! पावसाच्या निमित्ताने एवढे जीव उत्पन्न झाले व लगेच मृत्युमुखी ही पडले. पावसाच्या निमित्ताने स्वयं पुद्गलामध्ये विचित्रता येते त्याप्रमाणे जीवाच्या शुभ–अशुभ भावाला निमित्त करून पुद्गलकर्म स्वयंच पुण्यपापादि नाना रूपाने परिणमतात. यावरून हे लक्षात येते की कर्मांमध्ये विचित्रता येते ती कर्माच्या प्रकृतीने आहे. आत्म्याच्या द्वारे केलेली विचित्रता नाही. आत्मा प्रकृतिबंधाला करीत नाही व प्रदेशबंधाला करत नाही. अनुभागबंधाला पण करीत नाही व स्थितिबंधही करीत नाही. परन्तु चारी प्रकारचा बंध कर्मामध्ये होईल असा निमित्तभूत आत्मपरिणाम आत्म्यामध्ये होतो.

विभावपरिणामांची फटाकडी –

ज्याप्रमाणे विवाहादि कार्यामध्ये किंवा निवडणूक आदि झाल्यावर

पुष्कळ लोक फटाकडी उडवतात. ते काय करतात – ॲटोबॉम्ब फटाकडी रस्त्यावर ठेवतात व त्याला थोडी उदबत्तीच्या काडीने अग्नीचा स्पर्श करवितात व बाजूला होतात. फटाकडी स्वयं फुटते, वर जाते, रंगबिरंगी बनते व मोठा आवाज करते. हे कोण करते स्वयं त्या फटाकडीमध्ये हे परिणमन होते. लोकांनी काय केले फक्त अग्नीचा स्पर्श करविला. पुढचे काम त्यामध्ये स्वयं झाले त्याप्रमाणे आत्म्यामध्ये विभाव परिणाम झाले म्हणजे अग्नीचा स्पर्श झाला. त्यापुढे आत्म्याचे परद्रव्यामध्ये काही काम नाही. विभाव परिणामाचे निमित्त प्राप्त करून आत्म्याजवळ असणाऱ्या विस्रसोपचयरूप कार्माण वर्गणा स्वयं कर्मरूप परिणमतात. कोणत्या परमाणूमध्ये कोणती प्रकृती, किती स्थिती, किती अनुभाग ही सर्व व्यवस्था स्वयं पुद्गलामध्ये होते. तेथे कोठेही चूक होत नाही, कारण ही सर्व व्यवस्था स्वयंकृत आहे. दुसऱ्यांनी करायचे ठरविले तर त्यात चुका होतात, पण सर्व आपापले काम करतात त्यामुळे चूक होत नाही. सर्व आपापले काम करतात तर तेथे अव्यवस्था होत नाही.

ज्याप्रमाणे ५०–६० लोक मिळून यात्रेला जातात. तेथे प्रत्येकांचे सामान मिळून खूप सामान होते. तेथे संघपति सांगतो, 'प्रत्येकांनी आपापले सामान सांभाळा.' प्रत्येकजण आपापले १–२ सामान सांभाळतो तर सर्व व्यवस्था व्यवस्थित होते. आणि जर, प्रत्येकजण दुसऱ्याचे सामान सांभाळण्याचा प्रयत्न करतो तर कोणते ही सामान सांभाळले जाऊ शकत नाही, तर सर्व व्यवस्था बिघडून जाते. नुसता गोंधळ माजतो.

कर्मबन्धासाठी जीवविकार निमित्तमात्र आहे व जीवविकारासाठी कर्माचा उदय निमित्तमात्र आहे. धर्मानुरागरूप विशुद्ध परिणामाचे निमित्त मिळाल्यावर पुण्य प्रकृतीमध्ये अमृतसमान उत्कृष्ट अनुभाग होतो. मोहादी तीव्र संक्लेशाचे निमित्त मिळाल्यावर पाप प्रकृतींमध्ये हलाहल समान तीव्र अनुभाग होतो. जीवाच्या जघन्य (सर्वात कमी) विशुद्धीच्या निमित्ताने पुण्यप्रकृती जघन्य गुड समान अनुभागरूपाने व जघन्य संक्लेशाच्या निमित्ताने पापप्रकृती निबंरूप जघन्य अनुभागरूपाने परिणमते. मध्यम विशुद्ध व संक्लेशाच्या निमित्ताने मध्यम अनुभागरूपाने परिणमते. निश्चयाने कर्मांची सर्व विचित्रता पुद्गलकृत आहे, जीवकृत नाही.

बन्धनमुक्त होण्यासाठी पुण्य–पापकर्म व त्याला निमित्तभूत शुभ अशुभ भाव या सर्व परभावांपासून भिन्नत्वाची भावना करून निजध्रुव शुद्ध

चैतन्य स्वभावाची उपासना करा. आपल्या अकर्तास्वभावाची प्रतीती करावी.

मागील गाथेमध्ये सांगितले की पुद्गल-कर्मामध्ये विचित्रता कोणत्या कारणाने आलेली आहे. पुद्गलकर्म स्वयं अनेक प्रकारच्या अवस्थारूपाने परिणमते त्याला पुण्यपाप आदिरूपाने दुसरे कोणी परिणमवित नाही. स्वयं त्याच्यामध्येच अनेक रूपाने परिणमण्याची योग्यता आहे. आता या गाथेमध्ये हे सांगतात की निश्चयाने एक हाच जीव बन्धरूप आहे. उपाधिसहित जीव स्वयं बन्धरूप होत आहे. विकाररूपाने जीव एकटाच परिणमतो म्हणून तो एकच जीव बन्धरूप आहे. हे सिद्ध करतात –

सपदेसो सो अप्पा कसायिदो मोहरागदोसेहिं।
कम्मरजेहिं सिलिट्ठो बंधो त्ति परूविदो समये ।।१८८।।

अन्वयार्थ – (सपदेसो) प्रदेशयुक्त **(सो अप्पा)** तो आत्मा **(मोहरागदोसेहिं)** मोहरागद्वेषाच्या द्वारे **(कसायिदो)** कषायित होऊन **(कम्मरजेहिं)** कर्मधुळींनी **(सिलिट्ठो)** लिप्त होतो, **(बंधो त्ति)** हाच बंध आहे असे **(समये)** आगमामध्ये **(परूविदो)** सांगितले आहे.

तात्पर्य – सोपाधी विकारी जीव स्वयं बंधरूप होत आहे.

आत्मा सप्रदेशी –

आत्मा लोकाकाशप्रमाण असंख्यात प्रदेशी असल्यामुळे सप्रदेशी आहे. आत्मा केवळ कपोल-कल्पित वस्तू नाही. या शरीरामध्ये जीव वास करीत आहे; परंतु जीवाचे प्रदेश शरीराहून स्वतंत्र आहेत. ज्याप्रमाणे घरामध्ये व्यक्ती राहते, परंतु त्या घराहून त्या व्यक्तीचे अस्तित्व स्वतंत्र आहे. घर म्हणजे व्यक्तीचे अस्तित्व नाही. घराचे प्रदेश भिन्न आहेत व व्यक्तींचे प्रदेश भिन्न आहेत. त्याप्रमाणे शरीराचे प्रदेश भिन्न आहेत व जीवाचे प्रदेश भिन्न आहेत. स्वत:च्या प्रदेशामध्येच स्वभावरूप असो अथवा विभावरूप असो जीवाचे परिणमन होते. प्रदेशाशिवाय परिणमन कुणामध्ये ? आत्मा प्रदेशसहित आहे. कारण लोकाकाशाचे जेवढे प्रदेश आहेत तेवढेच आत्म्याचे प्रदेश आहेत. आत्म्यामध्ये संकोचविस्तार शक्ती असल्यामुळे प्राप्त शरीराच्या प्रदेशामध्येच आत्म्याचे प्रदेश समाहित होतात. लहान-मोठ्या शरीराप्रमाणे ते प्रदेश संकुचित व प्रसरण पावतात.

केवलिसमुद्घाताच्या लोकपूरण अवस्थेमध्ये आत्म्याचे प्रदेश संपूर्ण लोकभर पसरतात. इतरवेळी शरीरप्रमाण राहतात.

औपाधिक परिणमन –

जागा असेल तर त्या जागेमध्ये आपण चांगले किंवा वाईट कोणतेही रचनात्मक कार्य करतो. जागेच्या बाहेर रचनात्मक कार्य होऊ शकत नाही. प्राप्त जागेतच आपण रचना करतो. आत्मारूपी जागेमध्ये मोह–राग– द्वेषाची रचना होते. आत्म्याचे प्रदेशच मोह–राग–द्वेषरूपाने परिणमून कषाययुक्त होतात. त्यामुळेच त्याला कर्मधूळ येऊन चिकटते. ज्याप्रमाणे वस्त्र रंगवायचे असेल तर त्याला प्रथम तुरटी, हिरडा इत्यादी कषाययुक्त (तुरट) पाण्यामध्ये एक रात्र भिजवून ठेवतात. त्यामध्ये तुरटपणा आल्यावर त्याला कोणत्या पण रंगामध्ये बुडवले तर तो रंग त्याच्यावर चढतो व तो टिकून राहतो. कषाययुक्त वस्त्रामध्ये रंग चिकटतो, अन्यथा तो रंग वरवरच राहतो, रंग चढल्यावर अभेदनयाने म्हटले जाते की वस्त्रच लाल आहे, हिरवे आहे इत्यादी त्याप्रमाणे वस्त्राच्या ठिकाणी हा आत्मा तुरटी इत्यादीच्या ठिकाणी मोहरूप–द्वेषरूप परिणमन करून रंगाच्या स्थानी पुद्गलकर्माशी बांधले जाते. वास्तविक आत्मा कर्मापासून भिन्न आहे. वास्तविक वस्त्र तर वस्त्रामध्ये आहे. रंगाने त्याच्या आतमध्ये प्रवेश केला नाही. वस्त्राच्या स्वरूपाच्या बाहेर अतिनिकट रंग आहे. ज्याप्रमाणे भींतीला रंग दिला तर भींत रंगरूप होत नाही. भींतीची मर्यादा संपल्यावर रंगाची मर्यादा सुरू होते, पण व्यवहाराने दोघांचा संश्लेष पाहून असा उपचार केला जातो की भींतच रंगीत आहे. उपचरित असद्भूत व्यवहाराने वस्त्र रंगाने रंगले आहे, असे म्हटले जाते. त्याप्रमाणे आत्मा कषाययुक्त होतो. त्यामुळे कर्मधूळ चिकटते तर उपचरित असद्भूत व्यवहाराने आत्माच बंधरूप आहे असे म्हटले जाते. दोन भिन्न वस्तूंमध्ये संबंध सांगितला जात आहे, म्हणून हा व्यवहार आहे. रंग वस्त्राच्या स्वरूपामध्ये नाही, कर्म आत्म्यामध्ये नाही तरीपण असे सांगितले जात आहे, म्हणून असद्भूत आहे. एका वस्तूच्या धर्माचा दुसऱ्या वस्तूमध्ये आरोप केला जात आहे, म्हणून हा उपचार आहे.

उपचाराचे प्रयोजन अपराधबोध –

आत्म्यामध्ये बंधाचा उपचार करण्याचे प्रयोजन आहे की स्वत:ला स्वत:च्या अपराधाचे ज्ञान व्हावे. आत्मा कषायरूप परिणमतो, म्हणून बंधाला प्राप्त होतो. जर आत्म्याने मोह–राग–द्वेषरूप कषाय परिणाम केला नाही तर बंध होणार नाही. स्वत:च्या निरपराध अवस्थेला प्राप्त झालो तर बंधाचा अभाव होऊन स्वतन्त्रतेची प्रचिती येईल. मोह–राग–द्वेषाच्या अपराधामुळे

आत्मा पराधीन होतो व बंधाचा अनुभव करतो. ज्याप्रमाणे नवीन विवाह झाल्यावर पुरुष व स्त्री दोघे परस्पर स्नेहामुळे बांधले जातात. स्त्री माहेरी गेली असेल व पुरुष आपल्या घरात असेल. दोघे दूर आहेत. तरीपण दोघांच्यामध्ये बंधन आहे की नाही? स्त्री पुरुषाचा विचार करते व पुरुष स्त्रीचा. दोघेही दुसऱ्याचा विचार करून पराधीन होतात. भिन्न भिन्न क्षेत्रामध्ये असून ही बांधलेले आहेत. ते बंधन काय दोघांमध्ये आहे ? वास्तविक दोघे ही स्वत:हून स्वत:शीच बांधलेले आहेत. स्नेह हेच त्यांचे बंधन आहे.

आत्मा आकाशाप्रमाणे अमूर्तिक निर्लेप स्वरूप असूनही, सर्व परद्रव्याहून अत्यन्त भिन्न असूनही बंधनामध्ये कसा अडकला आहे, किती आकुलता, चिन्ता ? आपल्या आनन्दापासून दूर आहे. कोणत्याही पर पदार्थामध्ये स्नेह करून त्याशी बांधले जाणे म्हणजे आनन्दापासून दूर भटकणे आहे.

चिखल लावून धुण्यापेक्षा चिखल न लावणे चांगले –

राजगृही नगरीमध्ये तीन पुरुष होते. एक लहान वयाचा, एक तरूण व एक म्हाताऱ्या वयाचा. तिघे मिळून दररोज स्वाध्याय करीत होते. शास्त्रामध्ये ज्ञान व वैराग्याच्या गोष्टी ऐकून त्या तिघांनी परस्पर विचार विमर्श केला की जेव्हा आपल्या तिघांपैकी कुणाला एकाला वैराग्य येईल तेव्हा त्यांनी दुसऱ्या दोघांना सांगून नंतर वनामध्ये जावे. एकदा त्या तिघांपैकी वृद्ध पुरुषाला वैराग्य झाले. त्यांनी सर्व संपत्ती परिवारातील सर्वांना समान वाटून दिली. पत्नी, भाऊ, मुले सर्वांची परवानगी घेतली व दीक्षा घेण्यासाठी निघाला. रस्त्यामध्ये तरूणाचे दुकान लागले. वृद्ध पुरुषाने त्याला संबोधन केले, 'बंधू, आम्ही विरक्त झालो. तू पण चल.' तरूण दुकान उघडून बसला होता. पैशाचा गल्ला उघडून हिशोब करीत होता. वृद्धाचे शब्द ऐकून, तुरंत म्हणाला, 'चला, मी तुमच्या बरोबर निघालोच.' तसेच दुकान, गल्ला उघडे सोडून वृद्धाबरोबर जाऊ लागला. वृद्ध त्याला म्हणतो, 'बंधु, असे कसे काय निघाला. अन्य बंधूना व मुलांना बोलावून त्यांना समजावून त्यांच्यावर सर्व कारभार सोपवा आणि मग चला, प्रत्येक जण स्वतः प्रमाणेच दुसऱ्याला समजतो.' तरूण म्हणतो, 'जी वस्तू आपण सोडली ती दुसऱ्याला काय सांभाळायला सांगायचे. ज्याची असेल तो सांभाळेल. मी तर निघालो.'

दोघे मिळून वनात जाऊ लागले. वाटेत १८ वर्षाचा मुलगा मुलांच्या

बरोबर खेळत होता. दोघे म्हणाले, 'हे बाळ, आम्ही दोघे विरक्त होऊन वनात दीक्षा घेण्यासाठी चाललो आहोत.' त्याने ही हातातील क्रिकेट तेथेच टाकली व म्हणाला, 'चला मी पण तुमच्याबरोबर निघालोच.' तरूण मुलगा म्हणतो, 'बाळ, तुझा विवाह निश्चित झाला आहे. तुझा विवाह होणार आहे. दोन-चार वर्षे संसार कर, नंतर तू ये.' तो मुलगा म्हणतो, 'चिखल लावून नंतर धुण्यापेक्षा चिखल न लाऊन घेतलेले चांगले.' आणि तोही त्या दोघांच्या बरोबर दीक्षा घेण्यासाठी गेला. ही गोष्ट अशक्य नाही. पुराणामध्ये जंबूस्वामी, वारिषेण आदींची कथा प्रसिद्ध आहे. स्नेह संपला की बंधन संपले. स्नेहामुळे सर्व बंधन झाले. वास्तविक आत्मा कर्मांशी बांधला नाही. बंधाच्या विपत्तीपासून वाचण्यासाठी अबन्ध अविकारी चैतन्य स्वरूपामध्ये आत्मपणाचा अनुभव करावा.

निश्चयनयाच्या दृष्टीने एक आत्माच बंधस्वरूप आहे. निश्चय नय शुद्ध द्रव्याला विषय करतो. शुद्ध द्रव्याचा अर्थ शुद्धपर्याय परिणत असा नाही, तर केवळ एका द्रव्याला विषय करणे असा आहे. शुद्ध म्हणजे केवळ एक. व्यवहारनयाने जीवाचा व कर्माचा बंध आहे. परन्तु निश्चयनयाने हा आत्मा एकच बंधरूप आहे.

आता पूर्वोक्त व्यवहार व निश्चयातील विरोध दूर करतात व दोन्ही नयामध्ये अविरोध दाखवतात -

एसो बंधसमासो जीवाणं णिच्छयेण णिद्दिट्ठो ।
अरहंतेहिं जदीणं ववहारो अण्णहा भणिदो ।। १८९ ।।

अन्वयार्थ - (एसो) हा / पूर्वोक्त प्रकाराने **(जीवाणं)** जीवाच्या **(बंधसमासो)** बंधाचा संक्षेप **(अरहंतेहिं)** अरिहंत भगवंतांनी **(जदीणं)** मुनींना **(णिच्छयेण)** निश्चयाने **(णिद्दिट्ठो)** सांगितला आहे. **(ववहारो)** द्रव्यकर्मरूप व्यवहारबंध **(अण्णहा)** अन्य प्रकाराने **(भणिदो)** सांगितला आहे.

तात्पर्य - उपयोगामध्ये रागादिक होणे हा निश्चयाने बन्ध आहे व जीवाबोरबर कर्माचे लिप्त होणे व्यवहाराने बन्ध आहे.

निश्चयनयाच्या विषयाचे विवरण -

निश्चयनय शुद्ध द्रव्याचे निरूपण करतो. शुद्ध द्रव्य म्हणजे केवळ एकटे द्रव्य. त्यामध्ये दुसऱ्या द्रव्याचे मिश्रण नसणे. निश्चयाने स्वतःच्या स्वरूपास्तित्वमय द्रव्याचे वर्णन करतो. या नयाच्या दृष्टीने रागपरिणामच

आत्म्याचे कर्म आहे. तो रागपरिणाम पुण्यपापाच्या भेदाने दोन प्रकारचा आहे. पंचपरमेष्ठीसंबंधी भक्तिरूप परिणाम जिनवाणीसंबंधी श्रवण, मनन, चिन्तनादि परिणाम शुभरागरूप पुण्यकर्म आहे.

विषयकषायासंबंधी रागपरिणाम पापरूप आहे. आत्मा या पुण्यपापाचा रागपरिणामाचा कर्ता आहे. कारण आत्मा स्वयं रागरूपाने परिणमतो. जी वस्तू ज्या रूपाने परिणमते ती त्या परिणमाचा कर्ता होते. तो परिणाम त्या वस्तूचे कर्म आहे. अशुद्ध आत्मा आपल्या राग परिणामाचा कर्ता आहे. अशुद्धात्मा राग परिणामांना ग्रहण करणारा आहे व हा आत्मा राग परिणामांचा त्याग करणारा आहे. ग्रहण-त्याग वस्तूमध्येच आहे. कोणतेही द्रव्य परद्रव्याच्या भावाला ग्रहण करीत नाही व सोडत नाही. पर उपाधीच्या निमित्ताने जीव रागादी भावांना ग्रहण करतो व त्या उपाधीच्या अभावात त्या औपाधिक भावांचा त्याग करतो. हे सर्व निरूपण शुद्ध द्रव्याचे आहे. शुद्ध द्रव्य म्हणजे एकटे द्रव्य. त्या एक द्रव्याचे हे निरूपण आहे.

व्यवहारनयाच्या विषयाचे विवरण –

व्यवहारनय अशुद्ध द्रव्याचे निरूपण करतो. येथे अशुद्ध द्रव्य म्हणजे परद्रव्याचा सम्बन्धयुक्त. व्यवहारनय अनेक द्रव्यांच्या संबंधाचे वर्णन करतो. या नयाच्या दृष्टीने जे पुद्गल परिणामात्मक द्रव्य कर्म आहे ते आत्म्याचे कर्म आहे. पुद्गलकर्म पुण्य व पापाच्या भेदाने दोन प्रकारचे आहे. घातिकर्म सर्व पापरूप आहेत. अघाति कर्मामध्ये ६८ पुण्य व ५३ पाप प्रकृती आहेत. जीवाचे शुभ परिणाम पुण्यकर्माच्या बंधाला कारण आहेत व अशुभपरिणाम पापकर्माच्या बंधाला कारण आहेत. म्हणून आत्मा पुद्गलकर्माचा कर्ता आहे. पुद्गलकर्माला ग्रहण करणारा आहे व पुद्गलकर्माचा त्याग करणारा आहे. दोन द्रव्यामध्ये निमित्त नैमित्तिक संबंध आहे. त्या अपेक्षेने एका द्रव्याच्या परिणामाचा उपचार दुसऱ्या द्रव्यावर करून त्याचा कर्ता उपचाराने म्हटले जाते.

विशिष्ट परिणामानेच जीवाचे संकट–

निश्चयाने पाहिले तर या जीवावर संकट आपल्या परिणामानेच आहे. कुण्या दुसऱ्याच्या परिणामाने येत नाही. यद्यपि निमित्त नैमित्तिक भाव अनिवार्य आहे. तीव्र कर्माचा उदय आहे. तेव्हा त्याचा संक्लेश परिणाम चालू आहे, तेव्हा सुद्धा द्रव्यकर्म आपला उदयरूप परिणाम करून समाप्त होतो व आत्मा त्याला निमित्त करून आपल्यामध्ये विभावरूप परिणमन करून समाप्त

होतो. ज्याप्रमाणे दोन व्यक्ती दूरवर बसून चर्चा करीत आहेत, तीसरी व्यक्ती दूर उभारून त्यांच्याबद्दल वाईट दृष्टीने विचार करते. ते दोघे माझ्या बद्दलच वाईट बोलत असतील. या विचारानेच त्याच्यामध्ये संकट उभा राहते. भलेही ते दोघे याच्या हितासंबंधी विचार करीत असतील किंवा दुसऱ्यासंबंधी विचार करीत असतील, परंतु हा जीव स्वतःच्या विचाराने आकुलतेचा अनुभव करतो. निश्चयाने संकट म्हणजे आपल्या राग–द्वेष– मोहाच्या संपर्काने उत्पन्न होणारा अज्ञानमय आत्मपरिणाम आहे.

दोन्ही नयांची उपयोगिता –

दोन्ही नय श्रुतज्ञानाचेच अंश आहेत. दोन्ही नयांचे अस्तित्व आहे. कारण द्रव्य शुद्धरूपाने व अशुद्धरूपाने दोन्ही प्रकाराने प्रतीतीला येते. दोन्ही नयाचा विषय आपापल्या अपेक्षेने योग्य आहे. व्यवहाराने पाहिले तर निमित्त–नैमित्तिक भाव व्यवस्थित आहे. निमित्ताच्या सान्निध्याशिवाय संसारवृक्ष उभा राहू शकत नाही. निश्चयाला निश्चयाच्या पद्धतीने पहावे व व्यवहाराला व्यवहाराच्या पद्धतीने पहावे. दोन्ही गोष्टी आहेत. जीवाबरोबर पुद्गल कर्म लाभलेले आहे. त्यामुळे जीव बन्धनाला प्राप्त झाला आहे. कर्माच्या उदयाच्या निमित्ताने जीव विकारभावाला प्राप्त होतो. हे सर्व सत्य आहे. निश्चयाने स्वरूपास्तित्वाचा विचार केला तर आत्मा स्वयं स्वतःच्या स्वरूपामध्ये आहे. पुद्गल कर्म आपल्या स्वरूपामध्ये आहे. हाताची दोन बोटे आहेत. एक मधले बोट व एक तर्जनी बोट. प्रत्येक बोट आपापल्या स्वरूपामध्ये आहे. जेव्हा एक दुसऱ्याची अपेक्षा घेतली तेव्हा एक बोट मोठे आहे व एक लहान आहे. त्याप्रमाणे द्रव्य दोन्ही प्रकाराने प्रतीयमान आहे. स्वरूपास्तित्वाने व संयोगरूपाने.

निश्चयनयाची साध्यसाधकता –

यद्यपि दोन्ही नय आहेत, तथापि निश्चयनय साधकतम असल्यामुळे ग्रहण करण्यायोग्य आहे. शुद्ध आत्म्याची उपलब्धिरूप सिद्ध अवस्था या जीवाचे अंतिम साध्य आहे. निश्चयनय आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाला प्रकाशित करतो. म्हणून साध्याच्या सिद्धीसाठी उपयोगी आहे. साधकतम आहे. व्यवहारनय जीवांच्या अशुद्ध अवस्थेला प्रकाशित करणारा आहे. त्यामुळे साध्य सिद्धिसाठी उपयोगी नाही म्हणून निश्चयनय उपादेय आहे व व्यवहारनय हेय आहे. आपल्या आत्म्याला शुद्ध स्थितीमध्ये ठेवण्यासाठी कर्मोपाधीपासून

भिन्न चैतन्य प्रतिभासमय अनुभव करावे.

वस्तूस्वरूपाला समजावून घेण्याची पद्धती नय आहे. नय दोन प्रकारचा सांगितला आहे – १) निश्चयनय, २) व्यवहारनय. निश्चयनयाचेच दुसरे नाव आहे शुद्धनय व व्यवहारनयाचे दुसरे नाव आहे अशुद्धनय. जो शुद्ध द्रव्याला अर्थात केवळ एक पदार्थाला जाणतो त्याला शुद्धनय म्हणतात व जो अनेक पदार्थांच्या सामान्याला जाणतो त्याला अशुद्धनय (व्यवहारनय) म्हणतात. जसे हा जीव आहे. ज्ञानानन्द स्वभावी आहे हे शुद्धनयाचे कथन आहे व हा मनुष्य आहे, गरीब आहे, श्रीमंत आहे हे अशुद्धनयाचे कथन आहे. या दोन्ही नयांपैकी शुद्धनयाला उपादेय (ग्रहण करण्यायोग्य) सांगितले आहे. कारण तो आपले साध्य सिद्ध करण्यामध्ये साथकतम आहे. साध्य आहे – शुद्ध होणे केवळ एकटे राहणे, द्रव्यकर्म भावकर्मापासून पृथक् होणे. सर्वापासून वेगळे होणे हा जर आमचा उद्देश असेल तर तो सर्वापासून भिन्न निजस्वरूपाला दृष्टीमध्ये घेतल्याशिवाय सिद्ध होणार नाही. शुद्धनयाच्या अवलंबनाने शुद्धत्वरूप साध्याची सिद्धी होते.

याउलट आजपर्यंत अशुद्धनयाचीच दृष्टी ठेवली त्यामुळे शुद्धत्वरूप साध्याची सिद्धी झाली नाही. कारण अशुद्धनयाने अशुद्ध आत्म्याचा लाभ होतो. व्यावहारिक दृष्टी ठेवल्याने व्यावहारिकतेचा निर्वाह होतो, असे आचार्य या गाथेमध्ये सांगत आहेत. ज्याप्रमाणे व्यवहारामध्ये आपल्या कुटुंबातील बंधु, पुत्र इत्यादींना हात जोडून विनवणी करून सांगतो की दुर्व्यसन हा खोटा मार्ग आहे. या मार्गावर जाऊ नका. त्याप्रमाणे दयेने भिजलेले आचार्य आपल्याला विनवणी करून सांगत आहेत, बाबांनो, अशुद्धनयाने अशुद्ध आत्म्याची प्राप्ती होते. अशुद्धनय संसाराचा मार्ग आहे –

ण चयदि जो दु ममत्तिं अहं ममेदं ति देहदविणेसु।
सो सामण्णं चत्ता पडिवण्णो होदि उम्मग्गं ।।१९०।।

अन्वयार्थ – (जो दु) जो **(देहदविणेसु)** शरीर व धनादिकांमध्ये **(अहं ममेदं)** मी हा आहे व माझे हे आहे **(ति)** अशा प्रकारे **(ममत्तिं)** ममत्वाला **(ण चयदि)** सोडत नाही. **(सो)** तो **(सामण्णं)** मुनिपणाला **(चत्ता)** सोडून **(उम्मग्गं)** उन्मार्गाला अर्थात् खोट्या मार्गाला **(पडिवण्णो होदि)** प्राप्त होतो.

तात्पर्य – जो शरीर धनादिकामध्ये अहंभाव व ममत्वभाव सोडत नाही तो मुनिपदापासून च्युत होतो.

निश्चयनिरपेक्ष व्यवहारमूढतेची प्रवृत्ती –

जो कोणी जीव शुद्ध द्रव्याचे निरूपण करणाऱ्या निश्चयनयाची अपेक्षा ग्रहण करीत नाही व अशुद्ध द्रव्याचे निरूपण करणाऱ्या व्यवहारनयालाच ग्रहण करून मोह उत्पन्न करतो, त्यामुळे शरीर धनादिक परद्रव्यांमध्ये मी व माझे अशा प्रकारची आत्मीयता करतो, त्याकारणाने परद्रव्याच्या ममत्वाचा त्याग करीत नाही. तो वास्तविक मुनिपणाचा त्याग करून मिथ्यामार्गाला प्राप्त होतो.

ममत्व न सोडण्याची दोन कारणे आहेत. – १) निश्चयनयाची अपेक्षा सर्वथा सोडली व २) व्यवहारनयाला सर्वथा पकडून बसलो आहे. या दोन चुका इतक्या बिकट आहेत की तेथे ममत्वाचा त्याग होऊ शकत नाही.

शुद्ध द्रव्य, शुद्ध पदार्थ आपापल्या स्वरूपास्तित्वामध्ये स्थित आहेत, ते परद्रव्याला, परभावाला ग्रहण करू शकत नाहीत ही चर्चा कधी ऐकण्यात आली नाही. ऐकण्यात आली तरी त्याचा परिचय करून घेतला नाही. परिचय झाला तरी त्याचा कधी अनुभव केला नाही. त्यामुळे सामान्य जीव शरीर, धन, घर व कुटुम्ब परिवारालाच हा मी आहे व हे माझे आहे असे मानतो. शरीरामध्ये अहंबुद्धीचे उदाहरण – मी पुरुष आहे, स्त्री आहे, नपुंसक आहे. मी गोरा आहे, काळा आहे, ब्राह्मण आहे, क्षत्रिय आहे, वैश्य आहे, शूद्र आहे. मी राजा आहे, सेठ आहे, गरीब आहे. मी गृहस्थ आहे, मी मुनी आहे इत्यादी. परद्रव्यांमध्ये ममबुद्धीचे उदाहरण – हे माझे धन आहे, घर आहे, स्त्री– पुत्र माझे आहेत. माझा देश, माझे गांव, माझे कुटुंब, माझा संघ इत्यादी. या अहंकार–ममकार बुद्धीने ग्रस्त जीव राग–द्वेष–मोहाने लिप्त होऊन जरी मुनिपदामध्ये असला तरी भावमुनिपदापासून भ्रष्ट होऊन मिथ्यादृष्टी होऊन पाप बांधून संसारामध्येच परिभ्रमण करतो.

माझी शान, माझी पोजीशन, माझी इज्जत, माझे पद याने भरलेली ही दृष्टी कशी आहे ? मिथ्यात्वमलाने भरलेली आहे. तळात गाळ बसला आहे. सोन्याचा कळस आहे. वरून स्वच्छ निर्मल केला आहे, पण आत घाण भरली आहे. अज्ञानीची अशीच वृत्ती आहे. धर्मक्रिया करण्यासाठी पुष्कळ कामे केली जात आहेत. पूजा, व्रत, त्याग, ध्यान, स्वाध्याय, तप इत्यादी सर्व करूनसुद्धा अंतरंगातील मीपणा व माझेपणा गेला नाही तर सर्व धर्मक्रिया सुद्धा निरर्थक आहेत.

अज्ञानातच बिकट संकट –

या जीवावर सर्वात मोठे संकट आहे ते अज्ञानाचे व मोहाचे. जीवाचा

स्वभाव ज्ञान व आनन्द आहे. याला चिंता कशाची आहे ? परंतु पर्यायामध्ये अहंबुद्धी आहे, त्यामुळे सर्व संकट ओढवतात. कुयोनिमध्ये परिभ्रमण करीत अनन्त काळ गेला पण आपल्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले नाही. या भवामध्ये सम्यग्ज्ञान होण्याची सर्व निमित्त मिळाली आहेत. जर या जीवाला स्वतःचे भान होईल की मी आत्मा शुद्ध केवळ एक ज्ञानानन्द स्वरूपी आहे. माझा कोणत्याही अन्य पदार्थांशी थोडासुद्धा संबंध नाही. दुसऱ्याच्या अधिकारामध्ये असलेल्या वस्तूंमध्ये माझा जितका अत्यन्ताभाव आहे, तितकाच अत्यन्ताभाव माझ्या या आपल्या मानलेल्या घरच्या वस्तूंमध्ये आहे. ज्ञानस्वरूप आत्म्याचे बाहेर काहीही नाही. परमाणूमात्र सुद्धा परद्रव्यामध्ये आत्मीयतेची श्रद्धा असेल तर तो मिथ्यात्वच आहे. जो जीवाला जाणत नाही तो अजीवाला पण जाणत नाही व जो जीव अजीव दोन्हींला जाणत नाही तो सम्यग्दृष्टी कसा ?

जे जीव निश्चयनयापासून निरपेक्ष होऊन व्यवहारनयामध्ये मोह उत्पन्न करतात अर्थात परद्रव्यासंबंधी ममत्व सोडत नाहीत, ते श्रामण्य नावाच्या मार्गाला दूरूनच सोडतात. हा मुनिजनांना दृष्टीमध्ये ठेऊन उपदेश सांगत आहेत. म्हणून आचार्य म्हणतात की जे ममत्व सोडत नाहीत ते मुनिपदापासून दूर होतात.

श्रामण्य म्हणजे शुद्ध आत्म्याची परिणती, समताभाव, ज्ञाता द्रष्टारूप राहणे. जीवन-मरण, लाभ- अलाभ, सुख-दुःख, शत्रु-मित्र यामध्ये समदृष्टी असणे श्रामण्य आहे. अचानक मरणाचे चित्र दिसू लागले की अंतरंगात भीती का वाटू लागते ? पर्यायबुद्धी सुटली नाही. अजून माझे अमुक काम झाले नाही. एवढे काम अपूर्ण आहे ते पूर्ण होवो. अशा इच्छा अंतरंगात बसलेल्या आहेत त्यामुळे दुःखी होतो. आपले शुद्ध ज्ञायकस्वरूप आपल्या उपयोगामध्ये दिसेल तर मरणाचे आमन्त्रण आले तरी दुःख होणार नाही. त्यांना हे शरीर सोडण्यामध्ये कोठेही बाधा दिसत नाही. येथे नाही राहिलो तर तेथे राहू.

ज्याप्रमाणे कोणी पाहुणा गावामध्ये आला व त्याचे गावामध्ये दहा ठिकाणी नातेवाईक आहेत. एकाने त्याला बोलाविले, चला आपल्या घरी, दुसरा नातेवाईक म्हणतो, आमच्या घरी जेवायला चला. तो म्हणतो येथे जेवलो की तेथे जेवलो, काही फरक नाही. मनामध्ये काही क्षोभ ना मनामध्ये एवढाच निश्चय आहे की जेवायचे आहे. भूक शमवायची आहे. कोठे जेवलो तरी काही विकल्प नाही. त्याप्रमाणे ज्याच्या अंतरंगामध्ये ज्ञायक स्वरस सामावले आहे

त्याचे काम फक्त ज्ञानमात्र राहणे आहे. केवळ जाणत राहून प्रत्येक ठिकाणी हेच काम करतो. त्यामुळे मंदिरात बसलो काय ? किंवा स्मशानात बसलो की महालात बसलो ? तरी काही फरक नाही. त्याची इच्छा एकच आहे की मला ज्ञानमात्राचा आश्रय राहो. तो कोठे ही गेला तर काम एकच करतो, आपल्या ज्ञानस्वभावाचा आश्रय. त्यामुळे जीवन आणि मरण या दोन्हीमध्ये ते समदृष्टी राहतात.

त्याचप्रमाणे ज्ञानी लाभ व अलाभ या दोन्हींना समान समजतो. कोणतीही वस्तू प्राप्त झाली किंवा प्राप्त नाही झाली तरी हर्ष-विषाद नाही. वस्तू मिळाली तरी ती माझ्या स्वरूपापासून भिन्न आहे व नाही मिळाली तरी भिन्न आहेच. त्यामध्ये माझा कोणताही फायदा तोटा नाही. ती वस्तू मिळाली तेव्हाही मी एकटाच होतो, नाही मिळाली तरी एकटाच आहे. अशाप्रकारे वस्तूस्वरूपावर दृष्टी ठेवणाऱ्या ज्ञानी साधक पुरुषाला लाभ-अलाभामध्ये समता भाव असतो. हेच वास्तविक श्रामण्य आहे. मुनिमार्ग म्हणजे समता.

जो परवस्तूमध्ये अहंकार, ममकार सोडत नाही तो शुद्धात्मपरिणतिरूप श्रामण्य मार्गापासून दूर होतो. भलेही बाहेरून नग्न अवस्था राहील, परंतु अंतरंग शुद्धात्मदृष्टीरूप भावनग्नतेपासून भ्रष्ट होतो व अशुद्धात्मपरिणतिरूप उन्मार्गाला (खोट्या मार्गाला) प्राप्त होतो.

चिन्तन तशी पर्याय –

जो जसे भाव करतो, तसे त्याला फळ मिळते. जो स्वतःला जसे मानतो तो तसाच बनतो. मी अशुद्धच आहे. अशुद्ध भावामध्ये राहणारा आहे असे स्वतःला जो मानतो तो पुन्हा त्या फलस्वरूप अशुद्ध पर्यायाला प्राप्त करतो. जो स्वतःला शुद्ध आत्मा मानतो. पुन्हापुन्हा शुद्ध आत्म्याची भावना करतो तो शुद्ध आत्मा होतो. समयसारमध्ये आचार्य कुन्दकुन्ददेव सांगतात. –

सुद्धं तु वियाणंतो सुद्धं चेवप्पयं लहदि जीवो ।
जाणंतो तु असुद्धं असुद्धमेवप्पयं लहदि ।। १८६ ।।

जो शुद्धाला जाणतो तो शुद्धच आत्म्याला प्राप्त करतो व जो अशुद्ध आत्म्याला जाणतो तो अशुद्ध आत्म्यालाच प्राप्त करतो.

आजपर्यंत संसारामध्ये अशुद्ध पर्याय प्राप्त करण्याचे हेच रहस्य आहे. आम्ही स्वतःला कधी शुद्धरूपाने जाणलेच नाही. अशुद्ध पर्यायाकडे पाहून सतत मी अशुद्ध आत्मा आहे असेच चिंतन केले त्यामुळे अशुद्ध पर्यायांची

मालिका तुटली नाही. सर्व काही भावनेचेच फळ आहे.

एकदा राजा श्रेणिक भगवान महावीरांच्या दर्शनाकरिता निघाले होते. जात असताना वाटेमध्ये त्यांनी एका मुनिराजांना एका झाडाखाली ध्यान अवस्थेमध्ये बसलेले पाहिले. मुनिराजांचा चेहरा अत्यंत क्रोधमय दिसत होता. श्रेणिकाला आश्चर्य वाटले. राजा श्रेणिकाने त्यांना वंदन केले. आणि सरळ भगवान महावीर स्वामींच्या समवसरणामध्ये गेले. भगवंतांना मुनिराजांच्या तीव्र क्रोधाचे कारण व त्याचे फळ जाणण्याची इच्छा व्यक्त केली. भगवंतांच्या वाणीमध्ये आले की 'श्रेणिक, जेव्हा तुम्ही तिकडून येत होता तेव्हा ते मुनी अत्यंत क्रोधामध्ये मग्न होते. जर ते थोडावेळ त्याच अवस्थेत राहिले असते तर सातव्या नरकामध्ये गेले असते. घटना अशी घडली की हे मुनी पूर्वी एक राजा होते आणि आपल्या मुलाला अबोध अवस्थेमध्ये राजतिलक करून दीक्षित झाले होते. ते दीक्षित झाल्यानंतर त्यांच्या मंत्र्यांनी छलपूर्वक पूर्ण राज्य आपल्या ताब्यात घेतले व राजकुमाराला व राणीला देशातून काढून टाकले.'

ही गोष्ट गावातील येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या चर्चेतून मुनिराजांच्या कानावर पडली. 'हा तर दीक्षा घेऊन रिकामा झाला पण त्या राजकुमार व राणीची किती दुरवस्था झाली आहे. मंत्र्यांनी त्यांना देशाबाहेर काढले आहे. हे शब्द ऐकताच त्यांचे परिणाम बिघडले व ते क्रोधी झाले.'

श्रेणिक राजा भगवंतांचा उपदेश ऐकून परत चालले, तेव्हा तेथील दृश्य पाहून आश्चर्यचकित झाले. त्या क्रोधी झालेल्या महाराजांना केवलज्ञान झाले होते व सर्व देव येऊन त्यांची पूजा करीत होते. राजा श्रेणिकाला प्रश्न पडला की यांना एवढे भाव खराब असताना एवढ्या लवकर केवलज्ञान कसे झाले ? पुन्हा महावीर भगवंतांच्या जवळ समवसरणात गेले आणि त्यांनी सर्व वृत्तान्त जाणून घेण्यासाठी भगवंतांना प्रश्न विचारला.

भगवंतांनी सांगितले, 'जेव्हा तुम्ही येत होता तेव्हा महाराजांच्या मनात खूप क्रोध होता. त्या क्रोधाच्या आवेशात मंत्र्यांना मारण्याचे भाव झाले. जसा एक हात तलवारीवर व दुसरा हात मुकुटाच्या स्थानी गेला तेव्हा लगेच त्यांना लक्षात आले की 'आपण आता राजा नाही, एक मुनिराज आहोत.' तत्काल आपली चूक लक्षात आली. प्रायश्चित्त प्रतिक्रमण केले. स्वतःची निंदा-आलोचना करून आपल्या आत्मध्यानामध्ये लीन झाले. अंतर्मुहूर्तात क्षायिक सम्यक्त्व प्राप्त करून क्षपकश्रेणीवर आरोहण करून केवलज्ञानरूपी साम्राज्य

प्राप्त करून घेतले.

हा सर्व भावांचा (परिणामांचा) चमत्कार आहे. म्हणून परिणाम बिघडू नयेत असे प्रथम प्रयत्न करावेत. कदाचित् बिघडलेच तर लगेच परिणाम सांभाळावेत. जर भाव सुधारले तर भव सुधरणार.

भावना भववर्धिनी, भावना भवनाशिनी

आपली भावना भव वाढवणारी आहे व आपली भावनाच भवांचा नाश करणारी आहे. पराश्रित सर्व बाधांपासून दूर होण्याकरिता परद्रव्य व परभावांवरून दृष्टी हटवावी व आपल्या ज्ञायक ध्रुव आत्म्यावर दृष्टी ठेवावी. सर्व अहंकार, ममकाराचा त्याग करून परम वीतराग समता भाव धारण करणे कार्यकारी आहे.

मागील गाथेत जे सांगितले की अशुद्धनयाने अशुद्धात्म्याचा लाभ होतो अर्थात् जो मी अशुद्ध आहे असे चिंतन करतो तो निरन्तर अशुद्ध होऊन अशुद्ध पर्यायांनाच प्राप्त करतो. त्याला कधी शुद्धात्मा प्राप्त होणार नाही.

आता पुढील गाथेत हे सांगतात की शुद्धनयाने शुद्धात्म्याचा लाभ होतो.-

णाहं होमि परेसिं ण मे परे संति णाणमहमेक्को ।
इदि जो झायदि झाणे सो अप्पाणं हवदि झादा ।।१९१।।

अन्वयार्थ – (णाहं परेसिं होमि) मी दुसऱ्यांचा नाही. **(परे मे ण संति)** दुसरे माझे नाहीत. **(अहमेक्को णाणं)** मी एक ज्ञानमय आहे. **(इदि जो)** अशा प्रकारे जो **(झाणे)** ध्यानामध्ये **(झायदि)** ध्यान करतो **(सो)** तो **(अप्पाणं)** आत्म्याचा **(झादा)** ध्याता (ध्यान करणारा) **(हवदि)** होतो.

तात्पर्य – स्वतःला ज्ञानमात्र अनुभव करणारा आत्मा आत्म्याचा ध्याता आहे.

ज्ञानपद्धती –

कोणत्याही वस्तूला जाणण्याचे दोन प्रकार आहेत. - १) केवळ एकाच पदार्थाला जाणणे २) अनेक पदार्थांच्या संबंधाला जाणणे. जसे १) स्टीलचा डबा व २) साखरेचा डबा. एका पदार्थाला जाणणे हा शुद्धनय आहे व अनेक पदार्थांच्या सम्बन्धाला जाणणे अशुद्धनय आहे. प्रथम नय वस्तुस्वरूपाला जाणून वस्तुस्वरूपाला प्राप्त करण्यासाठी कारण आहे. दुसरा नय परस्पर संबंधाला जाणून व्यवहार चालण्यासाठी उपयोगी आहे. परंतु त्या

अशुद्धनयाचे प्रयोजन न समजता त्याला शुद्धनयाप्रमाणे वास्तविक मानले तर नयाचे प्रयोजन सिद्ध होत नाही. अशुद्ध द्रव्याचे निरूपण करणे हे अशुद्ध नयाचे प्रयोजन आहे. तो नय आपल्या विषयमात्रामध्ये प्रवृत्त आहे. संयोगाचे ज्ञान करविणे त्याचे काम आहे. त्याने आपले काम पार पाडले. परंतु अज्ञानी अशुद्धनयाच्या विषयाला यथार्थ समजून परद्रव्याला स्व मानतो व स्वतःला पररूप जाणतो. त्यामुळे अशुद्ध पर्यायांना प्राप्त करतो.

ज्ञानी स्वविषयमात्रामध्ये प्रवृत्त अशुद्धनयाचे निरूपण करणाऱ्या व्यवहारनयाचा विरोध न करता मध्यस्थ होतो अर्थात् परद्रव्यासंबंधी राग-द्वेष करीत नाही. शुद्ध द्रव्याचे निरूपण करणाऱ्या शुद्ध निश्चयनयाचे अवलंबन घेऊन आपला मोह दूर करतो. अशुद्धनयाने दाखविलेल्या वस्तूला सोपाधी जाणतो. ते वस्तूचे असली स्वरूप नाही. संयोगाच्या अपेक्षेने हे वर्णन केले आहे. व्यवहारनयाने साखरेचा डबा म्हटले, परंतु डबा साखरेचा नाही. त्यामध्ये साखरेचा संयोग झाला आहे म्हणून उपचाराने व्यवहार चालण्यासाठी साखरेचा डबा म्हटले जाते पण डबा स्टीलचा आहे. साखरेचा नाही. त्याप्रमाणे मी मनुष्य जीव, तिर्यंच जीव, माझा मुलगा, माझी पत्नी असे व्यवहाराने म्हटले जाते. परंतु वास्तविक जीव मनुष्य, तिर्यंच, देव, नारकी नाही किंवा येथील संयोगाचा मी स्वामी नाही.

पराशी स्वस्वामिसंबंधाचा त्याग –

जो अशुद्धद्रव्य निरूपक व्यवहारनयाशी विरोध न करता मध्यस्थ होतो व शुद्धनयाचा आश्रय घेऊन निर्मोही होतो. त्या ज्ञानीची भावना कशी असते ते सांगतात. – 'मी दुसऱ्यांचा नाही, दूसरे माझे नाहीत. मी एक ज्ञानमात्र आहे. स्वतःच्या आत्म्यासंबंधी विचार करतो की हा मी एकटाच आहे. एकटाच जन्मतो, एकटाच मरतो, एकटाच सुखदुःख भोगतो, संसारामध्ये एकटाच आहे व मोक्षमार्गामध्ये सुद्धा एकटाच आहे. मुक्त होणार तेव्हा एकटाच मुक्त हाईल. अनादिकाळापासून एकट्याचाच प्रवास चालू आहे. अनन्तकाळापर्यंत एकट्यानेच राहायचे आहे. सर्वत्र स्वतःचे एकत्वस्वरूप जाणले तर वस्तविक स्वस्वरूपाचे भान होईल.

संयोगामध्ये राहता-राहता अज्ञानी जीव स्वस्वरूपाला व निजघराला विसरून जातो. व्यवहारनयाने जो संबंध दाखविला जातो. त्यालाच वास्तविक स्वरूप मानतो. त्यामुळे परामध्ये आत्मदृष्टी करतो.

एकदा एक सज्जन आपल्या कामासाठी पानीपतला गेला होता. तेथे त्याचे एका कुणाच्या घरी जाणे झाले. ती एक हवेलीच होती. तो जसा त्या हवेलीजवळ पोहचला तर त्याची दृष्टी मुख्य दरवाजावर लिहलेल्या श्लोकाकडे गेली. तेथे लिहिले होते.

आगाह अपनी मौत से, कोई बशर नहीं ।
सामान सौ बरस का, पल की खबर नहीं ।।

त्याला मोठे आश्चर्य वाटले. तो विचार करू लागला की, 'सर्वजण आपल्या मुख्य दरवाजावर घराचे नाव किंवा सुस्वागतम्, अतिथि देवो भव अशी वाक्य लिहतात, पण या सुंदर हवेलीच्या बाहेर असा नश्वरतेचा उपदेश का लिहला ? त्यांनी घरमालकाला याचे कारण विचारले तेव्हा त्या हवेलीतील घडलेली घटना त्याने ऐकवली, जी खूप मार्मिक आहे. त्यांनी सांगितले. – तुम्हाला काय सांगू ? माझ्या वडिलांनी खूप तन्मयतेने व निष्ठेने हे घर तयार करविले होते. आजपासून वीस पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी तीस लाख रूपये खर्च करून वडिलांनी ही हवेली बनविली होती. अत्यंत हौसेने इटालियन मार्बल लावले होते. अत्यंत जिद्दीने व अमाप पैसा खर्च करून हवेली बनविली. परंतु ज्या दिवशी गृहप्रवेश होता त्याचवेळी त्यांचा एक पाय दरवाजाच्या आत व एक पाय दरवाजाच्या बाहेरच होता. ते तेथेच खाली पडले व तत्काल त्यांचे प्राणपखेरू उडून गेले. ते घरात एक दिवस पण राहू शकले नाहीत. त्यांच्या स्वप्नाचा महाल धराशायी झाला. ते तर निघून गेले पण जाता जाता आम्हाला जीवनाचे सत्य सांगून गेले. म्हणून आम्ही हा विचार केला की जीवनाचे हे अटल सत्य मुख्य दरवाजावरच लिहावे. त्यामुळे पुन्हा ते विसरून जाऊ नये. सतत या सत्याची जाणीव होत रहावी.

शरीराचा, धनाचा, स्त्री–पुत्र–मित्रादिकांचा संयोग किती काळ ? माहीत नाही. कितीही काळ असो. संयोगामध्ये राहत असताना सुद्धा संयोगी दृष्टी सोडावी व असंयोगी शुद्ध चैतन्य तत्त्वाची भावना करावी.

शुद्ध आत्म्याचा ध्याता कोण ?

ज्ञानी स्व व परामध्ये परस्पर स्वस्वामिसंबंधाचा त्याग करून स्वतःला मी शुद्ध ज्ञानमात्र आहे असे मानतो. प्रतीती करतो. हा आत्मा शरीर नाही. रागादी भावरूप नाही. आत्म्यामध्ये जे क्षायोपशमिक ज्ञान आहे. हे ज्ञानसुद्धा माझे स्वरूप नाही. परन्तु कर्मनिरपेक्ष सहज शाश्वत ज्ञानमात्र मी आत्मा आहे.

अशाप्रकारे हा आपल्या आत्म्याला ग्रहण करतो व अनात्मक पदार्थांचा त्याग करतो. आपल्या आत्म्याला ग्रहण केल्यामुळे परद्रव्यापासून व्यावृत्ती स्वयं होते. ज्याप्रमाणे दुसऱ्याची खेळणी पाहून रडणारा बालक तोपर्यंत रडणे बंद करत नाही जोपर्यंत त्याला त्याची खेळणी दिली जात नाहीत. त्याप्रमाणे ह्या बाह्य पदार्थांमध्ये उपयोग लावण्याची आणि हर्षविषाद करण्याची या जीवाची प्रवृत्ती तोपर्यंत बंद होत नाही जोपर्यंत स्वतःच्या आत्मानन्दाचा, ज्ञानस्वरूपाचा स्वतः स्वतःला परिचय होत नाही. मी ज्ञानमात्र स्वयं आहे. मी केवळ जाणण्याचे कार्य करू शकतो व जाणण्याचेच फळ भोगतो. ज्ञानी परद्रव्यापासून भिन्न झाल्यामुळे एक स्व आत्म्यामध्येच राहतो.

जो ज्ञानी ज्ञानाद्वारे ज्ञानामध्ये ज्ञानस्वरूपाला शुद्धात्म्यालाच जाणतो तो त्या काळामध्ये शुद्धात्म्याचा उपयोग आहे अर्थात् शुद्धात्म्याचा ध्याता आहे. शुद्धनयाचे विषयभूत शुद्धात्म्यामध्ये उपयोग लावला म्हणून शुद्धनयाने शुद्धात्मलाभ होतो. शुद्धात्मध्यानामध्ये स्थित झालेला ज्ञानी चिदानन्द एकस्वभाव सहज परमात्म्याचा ध्याता आहे. सहज परमात्म्याचा ध्याता सहजपरमात्मपणाला प्राप्त करतो, म्हणून शुद्धात्म्याच्या प्राप्तीसाठी मी एक ज्ञानमात्र आहे. अशाप्रकारे एकत्वविभक्त आत्म्याचे ध्यान करावे.

शुद्ध आत्माच का प्राप्त करण्यायोग्य आहे ? याचे कारण पुढील गाथेमध्ये सांगतात. या जीवाला कोणतीही वस्तू ध्रुवरूपाने पाहिजे असते. जी वस्तू प्राप्त झाली ती आपल्याजवळ सदैव असावी असे वाटते. नोकरी मिळाली तर ती कायमस्वरूपी असावी, काही काळापुरती नोकरी नको. बँकेमध्ये पैसे ठेव म्हणून ठेवली की फिक्स डिपॉझीट ठेवतो. त्याच्या व्याजामध्ये आपला चरितार्थ व्हावा. मूळ धन तसेच सुरक्षित रहावे. अशी इच्छा असते. पुत्र, मित्रादिकांचा संयोग ध्रुव रहावा अशी इच्छा असते. तर मग सर्वत्र दृष्टीपात करून सांगा की या जगामध्ये ध्रुव काय आहे ? घर, शेत, वैभव, धन ह्या ध्रुव वस्तू नाहीत. कुटुंब परिवार हे सुद्धा नष्ट होताना दिसतात. हे शरीरसुद्धा नष्ट होते, ध्रुव राहात नाही. प्रतिष्ठा सुद्धा नष्ट होते. इन्द्रिय, मन, विषय, कषाय हे सुद्धा कायम राहत नाहीत. एक आत्माच ध्रुव वस्तू आहे. आत्मा ध्रुव असल्यामुळे तोच प्राप्त करण्यायोग्य आहे. हेच या गाथेत सांगतात –

एवं णाणप्पाणं दंसणभूदं अदिंदियमहत्थं।
धुवमचलमणालंबं मण्णेऽहं अप्पगं सुद्धं ।।१९२।।

अन्वयार्थ – (अहं) मी **(एवं)** अशाप्रकारे **(अप्पगं)** आत्म्याला **(णाणप्पाणं)** ज्ञानात्मक, **(दंसणभूदं)** दर्शनस्वरूप,**(अदिंदियमहत्थं)** अतींद्रिय महापदार्थ, **(धुवं)** ध्रुव, **(अचलं)** अचल, **(अणालंबं)** निरालम्ब आणि **(सुद्धं)** शुद्ध **(मण्णे)** मानतो.

शुद्ध आत्माच ध्रुव आहे –

माझ्यासाठी माझा शुद्ध आत्माच ध्रुव आहे. या जगातील अन्य कोणतीही वस्तू माझ्यासाठी ध्रुव नाही अर्थात माझ्याजवळ सदा रहाणार नाही. प्रत्येक वस्तू आपापल्यामध्ये ध्रुव असेल, परंतु त्यांचा माझ्याशी संबंध सदा राहत नाही. म्हणून माझ्या अपेक्षेने त्या अध्रुव आहेत. जेथे शरीराचा संबंध सुद्धा काही काळापुरता आहे तर स्त्री-पुत्र-मित्रादिकांचा संबंध अथवा गुरू-शिष्यांचा संबंध ध्रुव कसा असेल ? कोणत्याही अन्य वस्तूचा संबंध सदैव राहावा ही इच्छा करणेच मूर्खपणाचे आहे. माझ्याकरिता ध्रुव माझा शुद्ध ज्ञानस्वरूप आत्मा आहे जो अनादिकाळापासून माझ्या जवळ आहे व अनंत काळपर्यंत माझ्याजवळ राहणार आहे. आम्ही कधीही ज्ञानमय आत्मस्वरूपाला ओळखले नाही तरीसुद्धा हा आमच्याजवळ सदैव आहे. असा त्रिकालवर्ती चित्स्वभाव शुद्ध आत्मतत्त्व आहे ते माझ्यासाठी ध्रुव आहे.

आत्म्याच्या ध्रुवत्वाचे प्रथम कारण –

आत्मा स्वत: सत् आहे, म्हणून ध्रुव आहे. कोणाच्या कृपेने कोणाच्या आधाराने या आत्मतत्त्वाची सत्ता आहे असे नाही. जो स्वत: सिद्ध सत् असतो तो ध्रुव राहतो. आत्म्याच्या अस्तित्वासाठी दुसऱ्या कुणाची ही आवश्यकता नाही. शरीराच्या अस्तित्वामुळे आत्म्याचे अस्तित्व नाही. शरीराचा नाश झाला तरी आत्मा नष्ट होत नाही. तो स्वयं सत् आहे. हे शरीर अनेक परमाणूंच्या संयोगाने बनलेले स्कंधरूप आहे. म्हणून स्वत: सत् नाही, म्हणून ध्रुव नाही. यातील एक परमाणू स्वत: सत् आहे, म्हणून परमाणू त्रैकालिक आहे, ध्रुव आहे. तो परमाणू सुद्धा माझ्यासाठी ध्रुव नाही. आत्मा स्वत: सत् शुद्ध ज्ञायकस्वरूप आहे, म्हणून शुद्ध ज्ञायकस्वरूप शाश्वत राहणारे तत्त्व आहे.

आत्म्याच्या ध्रुवत्वाचे दुसरे कारण –

हा शुद्ध आत्माच ध्रुव आहे; कारण हा अहेतुक आहे. या आत्म्याला इतराने कोणी उत्पन्न केले नाही. जो सहेतुक असतो तो ध्रुव नसतो. जो

कोणत्यातरी कारणाने उत्पन्न होतो तो सदा राहत नाही. हा आत्मा कोणत्याही कारणाने बनला नाही. माता-पित्यांनी या आत्म्याला उत्पन्न केले नाही. ते काहीही उत्पन्न करीत नाहीत. त्यांच्या विषयवासनेच्या निमित्ताने या शरीराचा संचय प्रारंभ झाला. मातेच्या गर्भामध्ये जीव दुसरीकडून आला व त्याच्या नामकर्माच्या निमित्ताने शरीराची निर्मिती झाली की आम्हाला वाटते मातेनेच आम्हाला जन्म दिला. मातेचे गर्भस्थान ही शरीराच्या उत्पत्तीचे स्थान आहे. जीव उत्पन्नच होत नाही तर त्याचे कारण कसे असू शकणार ? व जी वस्तू अहेतुक असते ती कधी नष्ट होत नाही. हा आत्मा अहेतुक आहे, म्हणून ध्रुव आहे.

आत्म्याच्या ध्रुवत्वाचे तिसरे कारण –

आत्मा अनादि-अनन्त आहे म्हणून ध्रुव आहे. जो पदार्थ अनादि-अनन्त असतो तो ध्रुवच असतो. आत्म्याला जन्म नाही व मृत्यू पण नाही. आत्मा अनादि काळापासून आहे व अनन्त काळापर्यंत राहणार आहे. अनादि अनन्तपणाचे भावभासन असे होते जसे उदाहरणार्थ आता आपण मनुष्यभवात आहोत. विचार करा, मनुष्य होण्यापूर्वी मी होतो की नव्हतो ? त्यापूर्वीही मी होतो कारण कोठून तर येऊनच मी मनुष्य झालो आहे. त्या पूर्व पर्यायात येण्यापूवी मी होतो की नव्हतो ? तर उत्तर येते की होतो. पुन्हा त्या पूर्व पर्यायाच्या पूर्व पर्यायापूर्वी मी होतो की नव्हतो, तर होतो. अशाप्रकारे पूर्व-पूर्व पर्यायामध्ये आपले अस्तित्व दिसून येते. अशाप्रकारे अनन्त पर्याय पाठीमागे गेलो तरी आपले अस्तित्व होतेच हे लक्षात येते म्हणून आत्म्याला सुरवात नाही, आणि हा पर्याय सोडून गेल्यावर पुढच्या अन्य पर्यायामध्ये राहणार की नाही ? तर राहणार. पुन्हा तो पर्याय सुटल्यावर त्याच्या पुढच्या पर्यायामध्ये राहणार की नाही ? तर उत्तर येते, राहणार. अशाप्रकारे पुढच्या पुढच्या अनन्त पर्यायामध्ये हाच असणार आहे. म्हणून याचा अन्त कधीही होत नाही. म्हणून आत्मा अनादि अनन्त ध्रुव आहे. शरीर अनादि अनन्त नाही; कारण ते उत्पन्न होते, नष्ट होते. रागादिक भाव अनादि अनन्त नाहीत, धनवैभव अनादि अनन्त नाही; कारण यांचा संयोग काही काळापुरता आहे. म्हणून हे काहीही ध्रुव नाही. परन्तु ज्ञानस्वभावी शुद्ध आत्मा अनादि काळापासून आहे व अनन्त काळापर्यंत राहणार आहे, म्हणून ध्रुव आहे.

आत्म्याच्या ध्रुवत्वाचे चौथे कारण –

आत्मा स्वतःसिद्ध आहे, म्हणून ध्रुव आहे. जी नैमित्तिक वस्तू असते ती ध्रुव असत नाही. ज्याप्रमाणे अग्नीच्या निमित्ताने पाणी गरम हाते तर ते सदैव गरम राहते काय ? नाही. काही काळानंतर पाणी थंड होते. म्हणून पाण्याची उष्णता ध्रुव नाही. त्याप्रमाणे रागद्वेष मोहादी भाव कर्माच्या उदयाच्या निमित्ताने होतात; म्हणून ते सदाकाळ राहत नाहीत. क्षणिक आहेत. सुखदुःख हे सुद्धा नैमित्तिक आहेत म्हणून सदाकाळ राहत नाहीत. असाता वेदेनीय कर्माच्या उदयाच्या निमित्ताने दुःख होते व सातावेदनीय कर्माच्या उदयाच्या निमित्ताने सुख होते. साता व असाताचा उदय नेहमी बदलत असतो. म्हणून संसारातील सुख व दुःख शाश्वत नाही. आत्मा नैमित्तिक नाही. स्वतःसिद्ध आहे, म्हणून माझ्यासाठी माझा आत्माच ध्रुव आहे. अन्य कोणतीही वस्तू ध्रुव नाही.

आत्म्याच्या एकत्वाचे कारण –

आत्म्याच्या ठिकाणी एकत्व असल्यामुळे आत्मा शुद्ध आहे. आत्म्याच्या एकत्वाची दोन कारणे आहेत. १) आत्मा परद्रव्यापासून विभक्त आहे व २) स्वधर्मापासून अविभक्त आहे. आत्मा परद्रव्यांनी रहित झाला नाही. परद्रव्याशी तन्मय झाला, तर त्याची सत्ता कशी राहणार. माझी सत्ता तेव्हाच कायम राहील जेव्हा मी परद्रव्यापासून भिन्न राहू व स्वद्रव्यामध्ये तन्मय होऊ. हाताची दोन बोटे आहेत. जर एक बोट दुसऱ्या बोटामध्ये एकमेक होईल तर त्या बोटाचे अस्तित्व राहील काय ? तर नाही आणि हे बोट आपल्याच परमाणूमध्ये तन्मय झाले नाही तर याची सत्ता राहील काय ? नाही राहणार. जर आपला आत्मा दुसऱ्या आत्म्याशी तन्मय झाला तर आपल्या आत्म्याची सत्ता राहणार नाही व आपल्या गुणांमध्ये तन्मय झाला नाही तरी आपल्या आत्म्याची सत्ता राहणार नाही. जेव्हा आपल्या गुणांमध्ये तर परिपूर्ण आहे आणि दुसऱ्या सर्व द्रव्यापासून अलिप्त आहे तेव्हा आपली सत्ता आहे. यालाच शुद्ध म्हणतात. जगातील जीवांची दृष्टी या शुद्धतेकडे जात नाही. हा अज्ञानी प्राणी स्वतःला दुसऱ्यांशी एकरूप मानतो व स्वतःची तर त्याला खबरच नाही. अशी शुद्धता आपल्यामध्ये सदैव विद्यमान आहे, असा त्रैकालिक शुद्ध आत्माच माझ्यासाठी ध्रुव आहे.

परद्रव्यापासून भिन्न स्वतःला मानने व ज्ञानसामान्य प्रकाशमात्र स्वतःला अनुभवणे हाच धर्म आहे.

आत्मा ज्ञानात्मक, दर्शनस्वरूप अतीन्द्रिय महापदार्थ अचल आणि निरालम्ब असल्यामुळे आत्म्यामध्ये एकत्व आहे, हीच आत्म्याची अभिप्रेत शुद्धता आहे आत्म्याच्या एकत्वाची दोन कारणे या सर्व विशेषणांमध्ये घटित होते.

आत्म्याच्या ज्ञानदर्शनात्मकतेमुळे एकत्व –

हा आत्मा स्वयं आपल्या स्वतःमध्ये ज्ञानाला धारण करतो. स्वयं स्वतःचे ज्ञानरूपाने वेदन करतो, म्हणून हा ज्ञानात्मक आहे व स्वयं दर्शनभूत आहे. यामध्ये जास्त युक्ती देण्याची आवश्यकता नाही. आम्ही आपल्या स्वरूपाला निरन्तर पाहत आहोत. सतत जाणण्याचे काम सुरू आहे. एक क्षणसुद्धा कुठे खंड पडत नाही. जागृत अवस्थेत असो, झोपेत असो, बसलेला असो, चालत असो जाणणे एक क्षणसुद्धा थांबलेले नाही. जाणण्याची विशेषता आत्म्याला सोडून अन्य कोणत्याही द्रव्यामध्ये नाही. जेथे ज्ञानात्मकता आहे अर्थात् विशेष प्रतिभास आहे तेथे सामान्य प्रतिभास नियमाने होतो. सामान्य प्रतिभासाशिवाय विशेष प्रतिभासाला पकडू शकत नाही. कितीपण विशेष प्रतिभास होत राहो, तो सामान्य प्रतिभासाला घेऊनच होतो. सामान्य प्रतिभास म्हणजे दर्शन व विशेष प्रतिभास म्हणजेच ज्ञान होय. अशाप्रकारे आत्मा ज्ञानदर्शन स्वरूप आहे म्हणून एकत्व आहे. आपल्या स्वतःमध्ये ज्ञानमय असल्यामुळे अखिलप्रतिभासमय हा आत्मा अतन्मय परद्रव्यापासून भिन्न व निजचैतन्य स्वभावामध्ये तन्मय असल्यामुळे एकत्वगत शुद्ध आहे. स्वयं प्रतिभासमात्र असल्यामुळे दर्शनभूत हा आत्मा अतन्मय परद्रव्यापासून वेगळा व निज दर्शन– स्वभावापासून अभिन्न असल्यामुळे एकत्वगत शुद्ध आहे.

आत्म्याची अतीन्द्रिय महार्थता –

हा आत्मा अतीन्द्रिय महापदार्थ आहे. आत्मा इन्द्रियांच्या द्वारे जाणला जात नाही, म्हणून अतीन्द्रिय आहे. इन्द्रिय याचा स्वभाव नाही म्हणून अतीन्द्रिय आहे. इन्द्रियांच्या द्वारे आत्म्याचे काही कार्य होत नाही, म्हणून अतीन्द्रिय आहे. इन्द्रिये नसली तरी याची सत्ता नष्ट होत नाही, म्हणून आत्मा अतीन्द्रिय आहे. प्रतिनियत स्पर्शरसगन्धवर्णगुण व शब्द पर्यायाला ग्रहण करणाऱ्या मूर्त विनश्वर इन्द्रियांपासून भिन्न आणि सर्व स्पर्शादिकांचा ज्ञाता, अमूर्त, अविनश्वर हा आत्मा अतीन्द्रियस्वभावी आहे. तो इन्द्रियात्मक परद्रव्यापासून भिन्न व ज्ञायकस्वरूप स्वधर्माशी तन्मय असल्यामुळे एकत्वगत शुद्ध आहे.

जगातील सर्व द्रव्यांमध्ये एक आत्मद्रव्यच व्यवस्थापक, प्रतिभासक आहे आणि महान् मोक्ष पुरुषार्थाचे साधक आहे, म्हणून महार्थ आहे. सर्व द्रव्यांचे आपापले ऐश्वर्य आहे, परन्तु ज्ञातृत्व गुणामुळे आत्म्याचे अद्‌भुत उत्कृष्ट ऐश्वर्य आहे.

आपल्याला आपला आत्मा कधी महान वाटतो का ? ज्ञानामध्ये येणारे परज्ञेय महान् भासित होतात. ताजमहाल, कुतुबमिनार, इंडिया गेट, श्रवणबेळगोळची मूर्ती इ. किती महान पदार्थ आहेत असे वाटते, पण या सर्वांना आपल्या ज्ञानाद्वारे जाणणारा माझा आत्मा किती महान् आहे असे वाटत नाही.

आत्म्याची अचलता –

हा आत्मा प्रत्येक क्षणी जाणत राहतो. जाणणेरूप परिणती निरन्तर चालू आहे तरीसुद्धा हा अचल आहे. संपूर्ण विश्वाला जाणतो परंतु कोणत्याही पदार्थाशी तन्मय होत नाही. मोही आत्मासुद्धा पराला जाणतो. रागद्वेषरूपाने परिणमन करतो, परन्तु पराशी तन्मय होत नाही. मोही जीव केवळ उपयोगाने पराशी तन्मय होतात. परंतु प्रदेशांनी परद्रव्याशी तन्मय कधीही होऊ शकत नाही, म्हणून अचल आहे. मन-वचन-कायेची चेष्टा अचलस्वरूप आहे. मन एका सेकन्दात सर्वत्र विश्वात फिरून येते व स्वतः परेशान होते. वचनसुद्धा चंचल आहेत. कुणाला वचनांचा भरवसा नाही की याच्या मुखातून फूल झडतील की बाण निघतील ? क्षणात रूष्ट होतो तर क्षणात संतुष्ट होतो. शरीर सुद्धा अतिचंचल आहे. परन्तु हा मी आत्मा आपल्या स्वरूपाने निश्चल आहे. क्षणिक विनाशरूपाने प्रवर्तमान ज्ञेय पर्यायांना ग्रहण करणे व सोडणे याचा अभाव असल्यामुळे आत्मा अचल आहे. हा आत्मा ज्ञेयपर्यायस्वरूप परद्रव्यापासून भिन्नत्व असल्यामुळे व तन्निमित्तक ज्ञानस्वरूप स्वधर्मामध्ये तन्मय असल्यामुळे एकत्वगत शुद्ध आहे.

आत्म्याची निरालंबता –

आत्मा सर्वत्र सर्वदा अनालम्ब आहे. या आत्म्याला आपले कार्य करण्यामध्ये कोणत्याही परपदार्थाच्या आलंबनाची आवश्यकता नाही. ते आत्मतत्त्व स्वतंत्र सत् आहे. स्वयं परिणमन करते. विश्वामध्ये कोणत्याही पदार्थाला आपली सत्ता कायम ठेवण्यासाठी व आपली अर्थक्रिया निर्बाध चालविण्यासाठी कोणत्याही परद्रव्याची अपेक्षा नसते. त्या आत्म्यानेसुद्धा स्वयं स्वतःमध्ये ज्ञान धारण केलेले आहे. त्याला परद्रव्याला जाणण्यासाठी

परद्रव्याच्या आलंबनाची गरज नाही. म्हणून आत्मा निरालम्ब आहे. नित्यरूपाने प्रवर्तमान ज्ञेयद्रव्यांच्या आलंबनाचा अभाव असल्यामुळे निरालंब आत्म्याचे ज्ञेयभूत परद्रव्यापासून भिन्नत्व असल्यामुळे व ज्ञेयनिमित्तक ज्ञानस्वरूप स्वधर्मापासून अभिन्नत्व असल्यामुळे एकत्व आहे.

येथे शुद्धतेचा अर्थ वीतरागता नाही. रागद्वेषाशी येथे प्रयोजन नाही. परापासून विविक्त (वेगळा) व स्वतःमध्ये एकत्व (तन्मयता) याला शुद्धता म्हणतात. हा मी आत्मा सर्व पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व कालद्रव्यापासून तसेच स्वजीव सोडून अन्य सर्व जीवांपासून वेगळा आहे. मी द्रव्येन्द्रियांपासून भिन्न आहे, भावेन्द्रियांपासून भिन्न आहे, ज्ञेयाकारांहून भिन्न ध्रुव ज्ञायकस्वरूप आहे. असे स्वयं स्वतःला पहावे. यालाच म्हणतात स्वतःच्या एकत्वाला पहाणे, स्वतःच्या शुद्धत्वाला पहाणे. ही शुद्ध दृष्टी आहे.

अध्रुवाच्या प्रीतीच्या त्यागाची प्रेरणा –

हा मी स्वाधीन आहे. आपल्या शुद्ध ज्ञानस्वभावाने परिपूर्ण आहे. सम्पूर्ण पराधीन परद्रव्यांच्या आलम्बनाने रहित निरालम्बस्वरूप आहे. असा हा मी आपल्या स्वतःच्या स्वरूपाला प्राप्त होतो. अन्य सर्व पर्याय व परद्रव्याचा समागम अध्रुव आहे. ज्याप्रमाणे चालणाऱ्या वाटसरूच्या शरीरावर अनेक प्रकारच्या झाडांची सावली येऊन तत्काल निघून जाते. वाटसरू निरन्तर चालत जातो आणि रस्त्यावर अनेक झाडे लागतात त्यांची सावली याच्या शरीराला स्पर्श करते आणि निघून जाते. त्याप्रमाणे हा आत्मा एका गतीतून दुसऱ्या गतीमध्ये भ्रमण करीत आहे. येथे त्याला किती संयोग मिळतात, किती क्षणिक परिणती होतात, ते केवळ वृक्षाच्या सावलीप्रमाणे अध्रुव आहेत. त्या अध्रुव समागमाचा काय लाभ ? त्या अध्रुव समागमाची प्रीती सोडून एक ह्या ध्रुव आत्म्यालाच ग्रहण करा.

जिनागमामध्ये सर्वत्र आपल्या शुद्ध आत्म्याला प्राप्त करण्याची, त्याचाच आश्रय घेण्याची व शरीरादी परद्रव्याला सोडण्याची, त्याचा आश्रय न घेण्याची प्रेरणा दिली आहे. येथे प्रश्न होतो की, आत्म्याचा आश्रय का घ्यावा, परद्रव्याचा आश्रय का घेऊ नये ? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी १९२ व १९३ या गाथांची रचना झाली आहे. मागील गाथेत सिद्ध केले की ध्रुव शाश्वत राहणारा असल्यामुळे शुद्ध आत्माच प्राप्त करण्यायोग्य आहे. आता या गाथेत सांगतात की अध्रुव असल्यामुळे शरीरादी परद्रव्य व परभाव प्राप्त करण्यायोग्य नाहीत.

ज्याप्रमाणे एखादी नदी पार करायची असेल तर आपण फुटक्या नावेत बसत नाही. कारण फुटकी नाव स्वयं बुडते व त्याचा आश्रय घेणाऱ्याला सुद्धा ती बुडवते. छिद्ररहित नावच नदी पार करू शकते. त्याप्रमाणे संसार समुद्रातून पार करण्यासाठी ध्रुव आत्माच निश्छिद्र नाव आहे. त्याचाच आश्रय घेणे योग्य आहे. शरीरादी स्वयं नाशवंत आहेत, ते आपला आश्रय घेणाऱ्याला कसे तारू शकतील? ध्रुवाचा आधार घेणारा सुखी होतो व अध्रुवाचा आधार घेणारा दुःखीच राहतो. त्या अध्रुव वस्तू कोणकोणत्या आहेत की ज्यांना आपण शाश्वत समजून त्यांचा आधार घेतला आहे व ध्रुव वस्तू कोणती आहे. ते पुढील गाथेत सांगतात. –

देहा वा दविणा वा सुहदुक्खा वाध सत्तुमित्तजणा ।
जीवस्स ण संति धुवा धुवोवओगप्पगो अप्पा ।।१९३।।

अन्वयार्थ – (देहा वा) शरीर **(दविणा वा)** धन **(सुहदुक्खा)** सुख-दुःख **(वाध)** अथवा **(सत्तुमित्तजणा)** शत्रू आणि मित्रजण हे सर्व **(जीवस्स)** जीवाचे **(धुवा)** ध्रुव **(ण संति)** नाहीत **(धुवो)** ध्रुव तर **(उवओगप्पगो)** उपयोगात्मक **(अप्पा)** आत्मा आहे.

तात्पर्य – आपले ध्रुव ज्ञानदर्शनमय आत्मतत्त्व आहे. अन्य काहीही नाही.

परद्रव्यापासून मी अत्यन्त भिन्न आहे, म्हणून कोणतेही परद्रव्य माझ्या आत्म्यासाठी ध्रुव नाही, कारण संपूर्ण परद्रव्य माझ्यामध्ये असत् आहेत. पौद्गलिक कर्माच्या निमित्ताने उत्पन्न होणाऱ्या विकारी भावापासून मी भिन्न आहे, म्हणून नैमित्तिक परभावसुद्धा माझा आत्म्यासाठी ध्रुव नाहीत. कारण ते सहेतुक असल्यामुळे आदि अन्तसहित आहेत व मी अनादि अनन्त आहे. या गाथेमध्ये तीन प्रकारच्या अध्रुव वस्तू सांगितल्या आहेत.

१) शरीरादी परद्रव्य, २) जीवाचे विकारी भाव, ३) अन्य जीवद्रव्य.

शरीराची अध्रुवता –

जीव दुसऱ्या गतीतून येऊन नवीन शरीर धारण करतो. तेथे आहारवर्गणेच्या अनन्तानन्त परमाणूंना ग्रहण करून नवीन शरीररूपी बिल्डिंग तयार होते. नामकर्मरूपी इंजिनिअर या शरीराची रचना करतो. नामकर्माचे अनेक कारागिर आहेत. ते याचा आकार, रंग, रूप ठरवतात. जीव या शरीराशी तन्मय होऊन त्यालाच आपले स्वरूप मानतो. परंतु हे विसरून जातो की ही

बिल्डिंग थोड्या दिवसानंतर जुनी होऊन पडणार आहे. आयुकर्माशी जेवढ्या वर्षांचा करार केला आहे तोपर्यंत हे टिकून राहणार. ज्या दिवशी ज्या क्षणी आयुकर्माचा केलेला करार संपेल त्यादिवशी त्या क्षणी जीवरूपी पक्षी हे शरीररूपी भाड्याचे घर सोडून उडून जाणार. शरीर ज्या पुद्गलपरमाणूंपासून बनले आहे, ते पुद्गल परमाणू सुद्धा ध्रुव आहेत. कारण हे पुद्गलद्रव्य आहेत. द्रव्याचा कधीही नाश होत नाही. परंतु त्या परमाणूंपासून बनलेली शरीररूपी स्कन्ध पर्याय ध्रुव नाही. जन्मल्यापासून ही शरीराचा वृद्धि-ह्रास सतत चालू आहे. सदैव एकरूप नाही. निरन्तर आपले रूप बदलत आहे. लहानपणापासून ते म्हातारपणीपर्यंतचे आपले सर्व फोटो क्रमाने लावून पहा. आपल्या शरीरामध्ये कसा बदल होत गेला आहे, ते लक्षात येईल.

सुपार्श्वनाथ भगवंतांची स्तुती करताना समन्तभद्र आचार्य स्वयंभूस्तोत्रात सांगतात. –

अजंगमं जंगमनेययन्त्रं यथा तथा जीवधृतं शरीरम् ।
बीभत्सु पूति क्षयि तापकं च स्नेहो वृथाऽत्रेति हितं त्वमाख्यः।।

ज्याप्रमाणे जीवाकडून नेले जाणारे अचेतन यंत्र आहे त्याप्रमाणे जीवाने धारण केलेले हे शरीर आहे. शरीर अत्यंत किळसवाणे, दुर्गन्धमय, प्रतिक्षण नष्ट होणारे व तापदायक आहे, म्हणून यावर स्नेह करणे व्यर्थ आहे असे भगवंतांनी हिताचे व्याख्यान केले आहे. जीव निघून गेल्यावर हे शरीर अग्नीमध्ये जाळले जाते. अज्ञानी अशा नाशवंत शरीराला सजविण्यामध्ये, पुष्ट करण्यामध्ये सर्व जीवन बरबाद करतो.

दृश्य स्थूल औदारिक शरीर तर नाशवंत आहे तसेच सूक्ष्म अदृश्य तैजस व कार्माणशरीरसुद्धा प्रतिक्षण नष्ट होत आहे. तैजसवर्गणेपासून तैजस शरीर बनते व कार्माणवर्गणेपासून कार्मण शरीर बनते. यामध्ये नवीन वर्गणांचे आगमन व पूर्वी आलेल्या वर्गणांची निर्जरा ही दोन्ही कार्ये निरन्तर चालू आहेत, म्हणून ते सुद्धा ध्रुव नाहीत. कार्माणशरीर आश्रय करण्यायोग्य नाही. कधी पुण्यकर्माचा उदय तर कधी पापाचा उदय होतो. कर्मजनित कोणतेही कार्य स्थिर नाही. म्हणून कर्मसुद्धा आश्रय करण्यायोग्य नाही.

आत्म्यापासून धनवैभवाची प्रकट भिन्नता –

जे धन मिळविण्यासाठी हा जीव रात्रंदिवस परिश्रम व कष्ट करीत आहे. ते धन ध्रुव नाही. जेथे एकक्षेत्रावगाहरूप औदारिक, तैजस व कार्मण

शरीर जीवाचे सदैव राहत नाही. तेथे प्रत्यक्ष भिन्न दिसणारे धन, वैभव, बंगला, गाडी, सोने-चांदी जीवाचे कसे होऊ शकतील ? हे सर्व संयोगरूप पदार्थ आहेत. ज्याचा संयोग होतो. त्याचा नियमाने वियोग होतो. एकतर हे बाह्य पदार्थ जीवाला सोडून निघून जातात किंवा जीव यांना येथेच टाकून दुसऱ्या गतीत निघून जातो. संयोग असताना जीव यांचा वियोग होणार आहे हे विसरून जातो.

एकदा एका शेठजींनी खूप पैसे खर्च करून सर्व सुविधायुक्त घर बांधले. घर बांधताना त्यांनी खूपच बुद्धी लावली होती. उत्कृष्ट इंजिनिअरचा सल्ला घेऊन चांगल्या प्रतीच्या कारागिरांना लावून उत्कृष्ट घर बांधण्याचा त्यांचा संकल्प होता. आजपर्यंत कोणीही असे घर बांधले नसेल असे अद्वितीय घर बांधण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. दगड, सिमेंट, वाळू, लाकूड, फरशी सर्व चांगल्या प्रतीचा माल वापरला होता. काही वर्षांच्या प्रयत्नानंतर शेठजींचा बंगला तयार झाला.

शेठजींनी घराची वास्तूशांती मोठ्या प्रमाणात आयोजित केली. संपूर्ण गावाला आमंत्रित करून पंच पक्वान्नाचे भोजन दिले. प्रत्येकांनी आपली वास्तू पाहून प्रशंसा करावी असे शेठजींना वाटत होते. भोजनपंक्ती झाल्यानंतर शेठजींनी पंडित व वास्तुतज्ज्ञ लोकांची सभा घेतली व सर्वांना आव्हान केले की या वास्तूमध्ये काही दोष राहिले असतील तर जरूर आम्हाला सूचित करावे जेणे करून ते सुधारून घेता येईल. शेठजींनी आपले वक्तव्य दिल्यावर पुष्कळ पंडित प्रशंसा करून म्हणू लागले, 'खूप सुंदर घर बांधले आहे. अशी रचना व सुखसुविधा आम्ही अन्यत्र कोठे ही पाहिली नाही.' शेठजी अत्यंत खूष झाले. जी त्यांची इच्छा होती ती पूर्ण झाली. तेवढ्यात एक वृद्ध पंडितजी म्हणू लागले, 'सर्व काही उत्तम आहे. यामध्ये फक्त दोन कमतरता आहेत.' शेठजी म्हणाले, 'कोणत्या दोन कमतरता आहेत सांगा. म्हणजे त्या दुरुस्त करून घेता येईल.' पंडितजी म्हणाले, 'नाही, त्या चुका सुधारता येण्यासारख्या नाहीत.' 'आपण सांगा तरी, आमच्याकडे मोठमोठे तज्ज्ञ आहेत. काहीच अशक्य नाही.' पंडितजी म्हणाले, 'ठीक आहे. ऐका तर पहिली चूक आहे, ही वास्तू शाश्वत राहणार नाही व दुसरी चूक आहे, याचा स्वामी पण या वास्तूमध्ये शाश्वत राहणार नाही.' शेठजी हे ऐकून स्तब्ध झाले. त्यांच्याकडे याचे उत्तर नव्हते. हे शाश्वत सत्य होते.

हा जीव मोठमोठ्या कल्पना करतो. महत्त्वाकांक्षा वाढत जातात, परंतु जे सत्य आहे त्याला मात्र विसरून जातो. सर्व धन, वैभव मी येथेच सोडून जाणार आहे ही गोष्ट विसरून जातो. आपल्याला शरण अन्य कोणीही नाही. या जगामध्ये कोणी दुसऱ्याला आपले शरण समजत असतील तर याहून मोठा धोका काही नाही. हे सर्व बाह्य पदार्थ माझ्यासाठी ध्रुव नाहीत, कारण हे सर्व माझ्याहून भिन्न आहेत, असत् आहेत, पर्यायरूप आहेत. हेतुसहित असल्यामुळे आदि अन्तयुक्त आहेत. परपदार्थाला निमित्त करून प्रसिद्ध होतात, म्हणून हे सर्व माझ्यासाठी ध्रुव नाहीत.

सुखदुःखाची अध्रुवता –

कर्माच्या उदयाला निमित्त करून जे रागद्वेष भाव अंतरंगामध्ये उत्पन्न होतात ते परिणामसुद्धा ध्रुव नाहीत. हे आत्म्याचेच परिणाम असले तरी औपाधिक आहेत. अनित्य आहेत, क्षणिक विकाररूप आहेत, म्हणून आश्रय करण्यायोग्य नाहीत. कर्माचे फलस्वरूप सुखदुःख सुद्धा अध्रुव आहेत. सातादि पुण्य प्रकृतींचा उदय आला की जीव सुखाचा अनुभव करतो व असातादी पाप प्रकृतींचा उदय आला की दुःखाचा अनुभव करतो. साता व असाताचा उदय रात्र व दिवसाप्रमाणे सतत बदलत असतो. कोणी सम्राट जरी असला तरी त्यालाही सतत साताचा उदय असत नाही. काही काळ साताचा उदय झाला की नियमाने असाताचा उदय होतो. स्वर्गामध्ये सुद्धा साताचा उत्कृष्ट उदयकाळ सहा महिने सांगितला आहे अर्थात् त्यानंतर नियमाने असाताचा उदय होणारच. मनुष्य व तिर्यंच्यामध्ये तर साता व असाताचा उदयकाळ अल्प आहे. अंतर्मुहूर्त अंतर्मुहूर्तामध्ये बदलत असतो. म्हणून सांसारिक सुख व दुःख अध्रुव आहेत.

एकदा एक राजा जंगलातून जात असता त्याला निर्ग्रन्थ साधूंचे दर्शन झाले. मुनिराजांचे दर्शन करून राजाला खूप आनंद झाला. राजाने साधूला विनंती केली की, 'महाराज, आपण मला एखादा मंत्र सांगा व काही हिताची गोष्ट सांगा.' साधू महाराजांनी छोट्या कागदावर एक मंत्र लिहिला व त्याला सांगितले, छोट्या पेटीमध्ये हा कागद जपून ठेव व तुला जेव्हा भयंकर संकट ओढावेल किंवा अत्यंत आनंदाचा प्रसंग असेल तेव्हा हा कागद उघडून यातील मंत्र वाच. ठीक आहे असे म्हणून राजांनी एका छोट्या ताईतमध्ये तो कागद ठेऊन आपल्या गळ्यात तो ताईत बांधून घेतला.

थोड्या दिवसानंतर एक प्रसंग ओढवला. शेजारच्या राजाने अचानक

याच्या राज्यावर आक्रमण केले. नगरीला चारी बाजूंनी गराडा घातला. अचानक आपत्ती ओढवल्यामुळे राजाला काही सूचेना. त्याने आपल्या गळ्यात बांधलेल्या ताईतमधून कागद काढून पाहिला तर त्यावर लिहिले होते 'ये भी बीत जायेगा ।' ही वेळसुद्धा निघून जाईल. राजा प्रसन्न झाला जणू त्याला दुःखमुक्तीचा उपायच मिळाला. संकटामध्येही तो स्थिर झाला व धैर्य धारण केले. शत्रूने राजाला नजराणा पाठवून त्याचे स्वागत केले व त्याचे आधिपत्य स्वीकारले. राजाची धीरवृत्ती पाहून शत्रूचे हृदयपरिवर्तन झाले. त्या राजाला त्याचे राज्य परत देऊन आपल्या राजधानीत परतला. राजाला साधूच्या मंत्राने वाचविले.

काही वर्षे लोटली. राज्याची अत्यंत भरभराटी झाली. राजाच्या विजयाची पताका दिग्दिगंत पसरली. सर्व काही अनुकूलता होती. राजा अत्यंत खूष होता. त्याला त्या सुखामध्ये सुद्धा साधूच्या कागदाची आठवण झाली. त्यांनी कागद उघडून पाहिले व वाचले 'ये भी बीत जायेगा ।' राजाला लगेच बोध झाला. ज्या सुखामध्ये मी न्हाऊन निघालो आहे हे सुखसुद्धा कायम राहणार नाही. हे दिवस पण निघून जातील व पुन्हा दुःखाचे दिवस यायला वेळ लागणार नाही. त्याला सर्व संसार, शरीर व भोगापासून वैराग्य झाले म्हणून सर्व राज्यभार पुत्रावर सोपवून विरक्त होऊन जंगलात जाऊन निर्ग्रन्थ दिगम्बर दीक्षा धारण केली.

संसारातील सुख व दुःख ऊन व सावलीप्रमाणे क्षणाक्षणात बदलत राहतात. अज्ञानी जीव सुख प्राप्त झाले असता त्यामध्ये आसक्त होतो व दुःख प्राप्त झाले असता शोक करतो. ज्ञानी संसाराच्या स्वरूपाला जाणतो, म्हणून सुखामध्ये हर्षाने प्रफुल्लित होत नाही व दुःखामध्ये गर्भगळीत होत नाही. दौलतरामजी म्हणतात –

पुण्य पाप फलमाही हरख बिलखो मत भाई ।
यह पुद्गल पर्याय उपजैं विनसैं फिर थाई ।।

पुण्य व पाप दोन्ही कर्म पुद्गलाचाच पर्याय आहे. तो उत्पन्न होतो, नष्ट होतो, म्हणून पुण्याच्या फळामध्ये हर्षित होऊ नये व पापाच्या फळामध्ये विलाप करू नये.

शत्रुता व मित्रता अध्रुव –

ज्याप्रमाणे पुद्गलादी परद्रव्य या जीवापासून भिन्न आहेत त्याप्रमाणे

अन्य जीव सुद्धा या जीवापासून भिन्न आहेत. प्रत्येक जीव स्वयं स्वतःसाठी ध्रुव आहे. परंतु दुसऱ्या जीवाबरोबर त्याचा संयोग सदा असत नाही म्हणून दुसरे जीव अध्रुव आहेत. हा जीव अज्ञानाने दुसऱ्या जीवामध्ये शत्रू व मित्रभाव करतो. वास्तविक कोणी कुणाचा शत्रू नाही, कोणी कुणाचा मित्र नाही. ज्यावेळी कोणी जीव आपल्याला प्राप्त झालेल्या इन्द्रियांच्या विषयभोगामध्ये बाधक बनतो, त्यावेळी तत्काल आम्ही त्या जीवाला शत्रू मानतो. अत्यंत प्रिय व्यक्तीसुद्धा आमच्या स्वार्थामध्ये बाधक बनली की शत्रू वाटायला लागते. ज्यावेळी दुसऱ्या जीवाचे परिणमन आपल्या कषायांच्या पूर्तीमध्ये, विषयभोगामध्ये साधक होते त्यावेळी तो आमचा मित्र बनतो. अत्यंत विरोधी शत्रूसुद्धा मित्र बनतो. इतिहासातील कित्येक घटना याला साक्षी आहेत.

रावण व विभीषणाचे खूप बंधुप्रेम होते. जेव्हा ज्योतिषतज्ज्ञाकडून ऐकले की दशरथपुत्राच्या द्वारे रावणाचा मृत्यू होणार आहे तेव्हा बिभीषणाने दशरथाला ठार मारण्याचा प्रयत्न केला. जेव्हा रावणाने सीतेला पळवून आणले व स्वतःची पत्नी बनवण्याचा अट्टाहास केला तेव्हा बिभीषणाने रावणाचा विरोध केला. रावणाच्या स्वार्थपूर्तीमध्ये बिभीषण बाधक झाला म्हणून एकेकाळी अत्यंत प्रिय असणारा बिभीषण शत्रू बनला. अत्यंत शत्रू असणारा बिभीषण सुद्धा रामाचा मित्र बनला. म्हणून शत्रू व मित्रभाव स्थायी नाही. या भवात सीता व लक्ष्मणाची रावणाशी कट्टर शत्रुता होती. सीता स्वर्गात गेली तसेच लक्ष्मण व रावण मरून नरकात गेले. तेथून च्युत होऊन पुढे दोघेही सीतेच्या जीवाचे पुत्र होतील. रावण तीर्थंकर होईल व सीतेचा जीव त्यांचा गणधर होईल हे सर्व चरित्र आपल्याला हेच सांगते की या जगात कोणीही आपला स्थायी शत्रू व मित्र नाही.

प्रत्येक जीव आपल्या स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल व स्वभावामध्ये राहूनच स्वतःचे परिणमन करीत आहे व आपल्या परिणमनाचे फळ सुख अथवा दुःख भोगत आहे. याव्यतिरिक्त तो काहीही करीत नाही. कोणत्याही पदार्थांशी आपला कोणत्याही प्रकारचा संबंध नाही ज्या कुटुम्बियांसाठी आपले तन-मन-धन सर्व समर्पित करतो ते कुटुम्बीजन आपल्या हितामध्ये किती साधक होतात? साधक होणे तर दूर, राग व मोहाचे निमित्त बनून आपल्या दुर्गतीचे कारण होतात.

शाश्वत शरण ध्रुव आत्मा –

अनादि अनन्त शुद्ध उपयोगमय आत्माच ध्रुव आहे. हा माझा अनादि

अनन्त चैतन्य ज्ञानदर्शन स्वभाव माझे सर्वस्व आहे. यापासून मला कधीही धोका नाही. उलट माझ्या आनन्दाला हा कारण आहे. हा माझा ज्ञानस्वभाव सदा राहतो त्यामुळे याच्या वियोगाची शंकाच नाही. हा माझा प्रभू मला सोडून कधीच जात नाही.

या प्रभूला आम्ही जाणू अथवा न जाणू, हा प्रभू माझे कल्याण करण्याचे व्रत घेऊन अनादिकाळापासून माझ्यामध्ये बसला आहे. याची अन्तर्ध्वनी आहे की मी तुझे कल्याण करण्यासाठी अनादिकाळापासून आतापर्यंत रहात आलो आहे, पुढेही अनन्त काळापर्यंत सतत राहीन. तू एकदा माझ्याकडे दृष्टी तर दे. तुझे नेहमीसाठी कल्याण होईल. परन्तु विषयवासनेमध्ये मूर्छित झालेली ही आपली दृष्टी आपल्या प्रभूकडे झुकत नाही. जर झुकली तर कल्याण आहे.

जोपर्यंत संबंध आहे तोपर्यंत अध्रुव शरीरादिक राहू देत. मी तर उपलभ्यमान त्या शरीरादिकाला प्राप्त न करता शुद्ध ध्रुव आत्म्यालाच प्राप्त करतो. हे शरीर शरीररहित माझ्या सहज परमात्मतत्त्वाहून भिन्न आहे. इन्द्रिय भोगोपभोगाचे साधनभूत धन माझ्यापासून अत्यन्त भिन्न आहे. सुख-दुःखरूप विकारी भाव अविकार अशा माझ्या सहज परमात्मतत्त्वाहून भिन्न आहेत. अध्रुवस्वरूप परद्रव्य व परभावापासून भेद-विज्ञानाने विरक्त होऊन ध्रुवस्वरूप चिन्मात्र आत्मतत्त्वाची सतत भावना करावी.

ध्रुव निरंजन निर्विकार आत्मतत्त्व शाश्वत शरण आहे, कल्याणाचे स्थान आहे.

१) अशुद्धनयाच्या अवलंबनाने अशुद्ध आत्म्याचा लाभ होतो. २) शुद्धनयाच्या अवलंबनाने शुद्ध आत्म्याचा लाभ होतो. ३) ध्रुव असल्यामुळे शुद्ध आत्माच प्राप्त करण्यायोग्य आहे. ४) आत्म्याहून अन्य शरीर, धन, सुखदुःख, शत्रुमित्र अध्रुव आहेत, म्हणून ते प्राप्त करण्यायोग्य नाहीत. असे चार दिव्य संदेश मागील चार गाथांमध्ये आचार्यांनी दिले आहेत. ते संदेश जाणून आपल्या जीवनात उतरविले तर आपले जीवन उच्चत्वाला प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. आजपर्यंत शरीरादी अध्रुव वस्तूंचीच उपासना केली. त्यांचाच आश्रय घेतला म्हणून अध्रुव पर्यायांना प्राप्त झालो. आचार्य सांगतात, आता एकदा तरी या ध्रुव आत्म्याची उपासना कर. त्या ध्रुव आत्म्याचा आश्रय घेतल्यामुळे काय फळ मिळते. ते पुढील गाथेत सांगतात. -

जो एवं जाणित्ता झादि परं अप्पगं विसुद्धप्पा ।
सागारोऽणागारो खवेदि सो मोहदुग्गंठिं ।।१९४।।

अन्वयार्थ –(जो विसुद्धप्पा) जो विशुद्ध आत्मा होऊन **(एवं)** मागील चार गाथांमध्ये सांगितल्याप्रमाणे **(जाणित्ता)** जाणून **(परं अप्पगं)** उत्कृष्ट आत्म्याचे **(झादि)** ध्यान करतो **(तो)** तो **(सागारो)** गृहस्थ श्रावक व **(अणागारो)** मुनी **(मोहदुग्गंठिं)** मोहरूपी दुष्ट गाठीचा **(खवेदि)** नाश करतो.

तात्पर्य – शुद्ध आत्म्याला प्राप्त केल्यामुळे दर्शनमोहाचा नाश होतो हे मोठे फळ मिळते.

दुःखाचे मूळ मोह दुर्ग्रन्थी –

या गाथेमध्ये आचार्यांनी दर्शनमोहाच्या ग्रन्थीला नष्ट करण्याचा उपाय सांगितला आहे. ग्रन्थी म्हणजे गाठ. अनादिकाळापासून या अज्ञानी जीवाला मोहरूपी गांठ झाली आहे. याचे निदान जिनेन्द्र भगवान् रूपी महावैद्यांनी केले आहे. मोहरूपी गाठ झाल्यावर होणाऱ्या त्रासाचेही वर्णन आचार्यांनी केले आहे. ते वर्णन ऐकून त्याची प्रतीती ही या जीवाला होत आहे. चार गतींमध्ये परिभ्रमण व तेथे होणारे दुःख याचे कारण मोहच आहे. म्हणून मलासुद्धा मोहरूपी गाठ झालेली आहे. असा विश्वास काही जीवांना होतो. शरीराच्या वैद्यांनी शरीराच्या एखाद्या रोगाचे निदान सांगितले तर लगेच विश्वास बसतो. तुम्हाला कॅन्सरची गाठ झाली आहे असे सांगितले की त्या गाठीचे ऑपरेशन करण्याची किती घाई करतो. कितीही पैसे लागले तरी, जवळ पैसे नसतील तर कर्ज काढूनसुद्धा ती गाठ लवकरात लवकर काढण्याचा प्रयत्न करतो. जिनेन्द्र भगवान सांगतात, 'हे जीवा, अनादि काळापासून तुला मिथ्यात्वाची मोठी गाठ झाली आहे. पण त्या गाठीमुळे तुझा हा भव व भावी अनंत भव बिघडतात. परंतु ती गाठ काढून टाकण्याचा हा जीव थोडाही प्रयत्न करत नाही, ऐकतो व गप्प बसतो. याचा अर्थ असा होतो की त्याला जिनेन्द्र भगवंतांवर विश्वास बसत नाही. कॅन्सरची गाठ तर एक भव बिघडवते, परंतु मिथ्यात्वरूपी गाठ अनंत भव बिघडवते. म्हणून या मनुष्य भवात मला मोहग्रंथीचा नाश करायचा आहे असा निश्चय करावा.

मोहग्रन्थीच्या नाशाचा अमोघ उपाय शुद्धात्मध्यान–

ज्या जीवाला या मोहग्रन्थीचा विश्वास झाला, तो त्या ग्रन्थीला

भेदण्याचा उपाय शोधतो. कोणत्या उपायाने या मोहग्रन्थीचा नाश होईल ? मोह-राग-द्वेषाने मोहग्रन्थीचा नाश होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे रक्ताने रंगलेले वस्त्र रक्ताने धुऊन जात नाही, उलट ते अधिक मलिन होते त्याप्रमाणे मोहाने मोह दूर होत नाही, उलट तो वाढत जातो. श्रीगुरूंच्या मुखातूनच उपदेश प्राप्त होऊन त्याला उपायाचे पण ज्ञान होते. आचार्य सांगतात, 'विशुद्धात्मा होऊन जो उत्कृष्ट आत्म्याचे ध्यान करतो त्याच्या मोहदुर्ग्रन्थीचा नाश होतो. मोहरूपी गाठीचा नाश करण्यासाठी त्या मोह गाठीला स्पर्श सुद्धा करण्याची गरज नाही. मी मोहादी विकाराने रहित ध्रुव शुद्ध आत्मा आहे असा प्रथम निश्चय करून त्यामध्येच एकाग्र होऊन ध्यान करतो. त्याच्या मोहग्रंथीचा तत्काल नाश होतो.

जी वस्तू विद्यमान आहे व ज्या वस्तूचा आपल्या ज्ञानामध्ये निर्णय होतो त्या वस्तूचेच आपण ध्यान करू शकतो. जी वस्तू विश्वात नाहीच त्याचे ध्यान होऊ शकत नाही. गाढवाचे शिंग, आकाशकुसुम, वांझपुत्र यांचे ध्यान करा म्हटले तर कसे करणार ? व ज्या वस्तूचा निर्णयच झाला नाही त्याचे ध्यान कसे होणार ? याप्रमाणे एखाद्या कुमारीकेचा विवाह निश्चित झाला नाही. तिला म्हटले, 'तू पतीचे ध्यान कर. तर ती कोणत्या रूपाने पतीचे ध्यान करणार?' करू शकणारच नाही. ज्या क्षणी तिचा एखाद्या वराशी संबंध निश्चित होतो. त्या क्षणापासून तिला पतीचे सहज ध्यान होते. तू त्याचे ध्यान कर असे सांगावे सुद्धा लागत नाही. त्याप्रमाणे ज्या जीवाला आत्मस्वरूपाचा निर्णय झाला नाही तो निज आत्म्याचे ध्यान करू शकत नाही. हा मी ध्रुव शुद्ध आत्मा आहे. मी क्षणिक पर्यायमात्र नाही. अनादि अनन्त शाश्वत परमात्मा आहे. अनन्तशक्तिसंपन्न कारण परमात्मा आहे. असा अंतरंगामध्ये ज्या जीवाला ज्या क्षणी निर्णय होतो त्या क्षणी आत्म्याचा अनुभव होऊन तो तेथे सहज लीन होतो. आत्मा सदा विद्यमान ध्रुव सत् पदार्थ आहे. त्याचा अभाव कधीच नाही. ज्या जीवांनी त्या शुद्ध आत्म्याशी आपला संबंध स्थापित केला त्याला आत्म्याचे सहज ध्यान होते. स्व व परामध्ये भेदविज्ञान करणे व निज ध्रुव शुद्ध ज्ञानमय आत्म्याचे ध्यान करणे हेच मोहग्रन्थीला भेदण्याचे अमोघ अस्त्र आहे. रामबाण उपाय आहे.

मोहग्रन्थीचा नाश करण्याचा अधिकारी कोण ? –

गाथेमध्ये मोहनाशाचा कर्ता सागार आणि अनागार आहे असे

सांगितले आहे. जयसेन आचार्यांनी या दोन शब्दांचे तीन अर्थ केले आहेत.

१) सागार = घरसहित म्हणजे गृहस्थ व अनागार = घररहित म्हणजे मुनी

२) साकार = ज्ञानोपयोग व अनाकार = दर्शनोपयोग

३) साकार = चिन्हसहित मुनी व अनाकार = चिन्हरहित श्रावक

या सर्वांचा भावार्थ हा आहे की गृहस्थ व मुनी दोघेही दर्शनमोहाचा नाश करण्याचे अधिकारी आहेत. करणानुयोगाच्या द्वारे सुद्धा याची सिद्धी होते. दर्शनमोहाचा उपशम, क्षय व क्षयोपशम चौथ्या गुणस्थानापासून सातव्या गुणस्थानापर्यंत कोणत्याही गुणस्थानात होतो. चौथे व पाचवे गुणस्थान गृहस्थांचे आहे. दर्शनमोहाच्या नाशाचा उपाय शुद्ध आत्म्याचे ध्यान सांगितले आहे. यावरून चौथ्या व पाचव्या गुणस्थानात शुद्ध आत्म्याचे ध्यान होते ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. कारण ज्याला स्व आत्म्याचे ज्ञान नाही त्याला पराचे पण ज्ञान होत नाही. ज्याला स्व व पराचे ज्ञान नाही तो मोह दूर करून सम्यग्दृष्टी होऊ शकत नाही. शुद्ध आत्म्याच्या प्राप्तीचा उपाय भेदविज्ञान आहे. मी भिन्न आहे, शरीर भिन्न आहे. मी ज्ञानमात्र आत्मा भिन्न आहे व हे राग-द्वेषभाव भिन्न आहेत. जे माझ्यापासून भिन्न आहेत, त्यांच्यावर काय प्रेम करायचे ? माझा हा ज्ञानमात्र आत्मा ध्रुव आहे. त्याच्यामध्ये प्रीती व प्रवृत्ती केल्याने परम आनंद उत्पन्न होतो. अनन्त शक्ति संपन्न चैतन्यमात्र परमात्म्याचे एकाग्ररूपाने जे ध्यान होते तेच मोक्षाचे साधक आहे. हे निश्चय धर्मध्यान गृहस्थ व मुनि दोघेही करू शकतात. गृहस्थसुद्धा सामायिकादी काळामध्ये परापासून निवृत्त होऊन शुद्ध आत्म्याचे ध्यान करतो. फरक एवढा आहे की गृहस्थाची गाढता कमी असते व त्याला असे अवसर कमी मिळतात. बाह्य आरंभादी कार्यामध्ये व्यापृत असल्यामुळे ध्यानामध्ये स्थिरता कमी प्रमाणात होते. मुनिराज संपूर्ण आरंभ व परिग्रहाने रहित असल्यामुळे त्यांची स्थिरता व गाढता अधिक असते व त्यांना वारंवार ध्यान होते. म्हणून सम्यग्दृष्टी गृहस्थ सतत गृहस्थपणा सोडून मुनि होण्याची भावना करतो.

दुसरा अर्थ - साकार अर्थात ज्ञानोपयोग व अनाकार अर्थात् दर्शनोपयोगाने युक्त जीव दर्शनमोहाचा नाश करतो. याची सिद्धी सुद्धा करणानुयोगाने होते. दर्शनमोहनीयाच्या क्षयाचा प्रारंभ करतो त्याला प्रस्थापक व दर्शनमोहाच्या नाशाची समाप्ती करतो त्यास निष्ठापक म्हणतात. प्रस्थापक ज्ञानोपयोगानेच युक्त असतो व निष्ठापक ज्ञानोपयोग अथवा दर्शनोपयोगाने

युक्त असतो असा नियम सांगितला आहे. यावरून दर्शनमोहाचा क्षय करणारा जीव ज्ञानोपयोग अथवा दर्शनोपयोगाने युक्त असतो. अधःप्रवृत्तकरणामध्ये ज्याने प्रवेश केला त्याला प्रस्थापक म्हणतात. तो मात्र ज्ञानोपयोगानेच युक्त असतो, कारण ज्ञानोपयोगामध्येच स्व-पर भेद विज्ञानाचा विशेष विचार होऊ शकतो.

सर्व ज्ञानामध्ये श्रेष्ठ ज्ञान हेच आहे की पदार्थांचे स्वरूप भिन्न भिन्न आपापल्या स्वरूपामध्ये पहाणे. कोणत्याही पदार्थाशी कोणत्याही दुसऱ्या पदार्थाचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. सर्व पदार्थ पूर्ण स्वतन्त्र सत्तायुक्त आहेत. या सम्यग्ज्ञानाचे फल मोहाचा अभाव व मोक्षमार्गाचा सद्भाव आहे.

अत्यंत दुर्लभ असा मनुष्य पर्याय एवढ्यासाठीच मिळाला होता की हा जीव धर्माचे साधन करून संसाराच्या कष्टातून नेहमीसाठी मुक्त होईल. परंतु आजही त्या पर्यायाचा उपयोग कसा करीत आहोत याचा विचार करा, दोन चार जीवांना प्रसन्न करण्यामध्ये आम्ही मस्त आहोत. त्यांना सुखी करण्याच्या चिन्तेमध्ये मग्न आहोत. चोवीस तासातून १-२ तास स्वतःसाठी काढा. त्यावेळात सर्व विकल्पांचा त्याग करून स्वतःची धर्मसाधना करा. आत्म्याच्या व ज्ञानाच्याच गोष्टी करा.

लोकामध्ये जेवढी संकटे आहेत ती सर्व मोहगाठीचीच संकटे आहेत. कोणत्याही प्रकाराने या मोहगाठीचे ऑपरेशन झाले तर या जीवाला शान्तीचा मार्ग मिळू शकतो.

वास्तविक शुद्ध आत्म्याकडे लक्ष्य दिल्याने शुद्ध आत्म्याची उपलब्धी होते. त्यामुळे मोहाची गाठ सुकून पडून जाते. म्हणून निरन्तर शुद्ध आत्म्याचेच चिन्तन, मनन व ध्यान करावे.

मोहग्रन्थीचा नाश झाल्यामुळे काय फळ मिळते ? याचे वर्णन पुढील गाथेमध्ये करतात -

जो निहदमोहगंठी रागपदोसे खवीय सामण्णे।
होज्जं समसुहदुक्खो सो सोक्खं अक्खयं लहदि।।१९५।।

अन्वयार्थ - (निहदमोहगंठी) ज्याने मोहग्रन्थीचा नाश केलेला आहे असा **(जो)** जो आत्मा **(रागपदोसे)** रागद्वेषाचा **(खवीय)** क्षय करून **(समसुहदुक्खो)** सुखदुःखामध्ये समभाव ठेऊन **(सामण्णे)** श्रामण्यामध्ये **(होज्जं)** परिणमतो. **(सो)** तो **(अक्खयं सोक्खं)** अक्षय सुखाला **(लहदि)**

प्राप्त होतो.

तात्पर्य – मोहग्रन्थीचा नाश झाल्यामुळे क्रमाने तीन फायदे होतात – १) राग-द्वेषाचा नाश होतो, २) समताभाव प्राप्त होतो, ३) अक्षय सुखाची प्राप्ती होते.

रागद्वेषाचे मूळ मोह –

मोह म्हणजे मिथ्यात्व, पदार्थासंबंधी अयथार्थ श्रद्धान. विपरीत मान्यतेमुळेच रागद्वेष उत्पन्न होतात. परपदार्थ सुख-दुःखाला कारण नाहीत. परंतु मिथ्यात्वामुळे हा जीव परपदार्थाला आपल्या सुखदुःखाचे कारण मानतो. जे परपदार्थ सुखाचे कारण भासित होतात त्यासंबंधी राग भाव उत्पन्न होतो. जे पर-पदार्थ दुःखाचे कारण भासित होतात त्यासंबंधी द्वेषभाव उत्पन्न होतो. जे आपल्या इच्छेच्या अनुकूल वागतात त्यांना मित्र समजून सुखाचे कारण मानतो व जे आपल्या इच्छेच्या विरूद्ध वागतात त्यांना शत्रू समजून दुःखाचे कारण मानतो. हाच मोह (मिथ्यात्व) आहे. ज्याप्रमाणे झाडाचे मूळ, झाडाच्या फांद्या, डहाळ्या, पाने व फुले इत्यादींचे कारण आहे. जोपर्यंत मूळ जीवंत आहे तोपर्यंत फांद्या, डहाळ्या, पाने, फुले जीवंत असतात. जर झाडाचे मूळच नष्ट झाले तर फांद्या इत्यादी जगू शकत नाहीत. नष्ट होतात. त्याप्रमाणे मिथ्यात्वाचा सद्भाव आहे तोपर्यंत रागद्वेष उत्पन्न होतात. मिथ्यात्वाचा अभाव झाल्यावर रागद्वेष जास्त काळ राहू शकत नाहीत. ज्यांना झाड नष्ट करायचे आहे त्यांनी प्रथम झाडाचे मूळ उखडून काढावे.

झाडाचे मूळ उखडून काढल्यानंतर फांद्या, पाने, फुले इत्यादी काही काळ हिरवी राहतात, परंतु थोड्या दिवसातच सुकून जातात. त्याप्रमाणे ज्यांना रागद्वेष दूर करायचे आहेत त्यांनी प्रथम आपला मोह दूर करावा. मोह नष्ट झाल्यावर मोहमूलक रागद्वेषाचा पण नाश होतो.

समतेचे मूळ रागद्वेषाचा क्षय –

जेव्हा राग-द्वेष नष्ट होतात तेव्हा सुखदुःखामध्ये समान परिणाम स्वयं होतो. हा माझा मुलगा, हा शेजाऱ्यांचा मुलगा अशाप्रकारे द्विधाभाव का आहे? याचे कारण रागद्वेष आहे. आपल्या मुलाशी राग (प्रेम) आहे. शेजाऱ्याच्या मुलाशी प्रेम नाही. जगातील सर्व जीव समान आहेत. पण रागद्वेष भावामुळे दुविधा होते. हा माझा, हा दुसऱ्याचा, हा चांगला, हा वाईट. जेथे रागद्वेष आहे तेथे विषम परिणाम आहे. ज्या साधूंचे रागद्वेष समाप्त होतात. त्यांना अन्य

वस्तूंमध्ये तर समता आहेच स्वतःच्या सुख व दुःख परिणामांमध्ये सुद्धा समता येते.

सातादि पुण्य प्रकृतींच्या उदयामध्ये हा जीव सुखाचा अनुभव करतो व असाता – पाप प्रकृतींच्या उदयामध्ये दुःखाचा अनुभव करतो. परंतु ज्ञानी जाणतो की पुण्य व पाप दोन्ही कर्मच आहेत. तो माझा स्वभाव नाही.

पुण्य उदय सुख का बढवारा,

पाप उदय दुःख होत अपारा

पाप पुण्य दोऊ मम नाहीं, मै तो चेतन.....

पूर्व मुनिराजांचे व ज्ञानी गृहस्थांचे चरित्र वाचले तर लक्षात येते की त्यांच्या जीवनात किती तीव्र पापकर्माचा उदय आला तरी त्यांनी त्याच्या फळामध्ये दुःख मानले नाही. उलट समताभाव ठेवला. सुकुमाल मुनींचे पाय कोल्हीण आपल्या दोन पिल्लांसह तीन दिवसपर्यंत भक्षण करीत होती, पण त्यामध्ये दुःखरूप परिणाम न करता समताभाव धारण केला, ते आपल्या स्वभावात लीन झाले. पंडित टोडरमल्लजींना हत्तीच्या पायाखाली तुडवून फाशी देण्याची शिक्षा राजांनी सुनावली पण त्यामध्ये त्यांनी दुःख न मानता समभावरूप राहिले.

जयपूर नरेशच्या दरबारी टोडरमल्लजी एक जैनधर्मीय नररत्न होते. ते त्यांच्या सात्त्विक वृत्तीमुळे राजाला अत्यंत प्रिय होते. पण जैनधर्माचा द्वेष करणाऱ्या मंत्र्यांनी राजास त्यांची चहाडी केली. हे टोडरमल्लजी आपल्या देवाचा अपमान करतात. त्यांनी राजाला पटविण्यासाठी युक्ती करून टोडरमल्लजींच्या खिशामध्ये गणेशजींची मूर्ती ठेवली. राजाला ते प्रत्यक्ष दाखवून दिले. राजाचा क्रोध अनावर झाला. आपल्या देवाचा अपमान हा घोर अपराध आहे असे समजून त्याने टोडरमल्लजींना हत्तीच्या पायाखाली चिरडून प्राणान्त करण्याची शिक्षा सुनावली. पुष्कळ लोकांनी टोडरमल्लजींना समजावले. आपण राजाला सांगून ही शिक्षा पाठीमागे घ्यायला लावू. पण टोडरमल्लजी म्हणाले, राजाची आज्ञा शिरसावंद्य आहे. त्यांचा काही अपराध नाही. माझ्या पापकर्माचा उदय आहे. शिक्षेचा दिवस उजाडला. सर्व जनता राजमैदानामध्ये एकत्र जमली होती. हत्तीच्या समोर शांत, धीर गंभीर पंडित टोडरमल्लजी उभे होते. हत्तीचा माहूत हत्तीला पाय देण्यासाठी उकसत होता, पण हत्ती पाय द्यायला तयार नव्हता. मूक प्राणीसुद्धा सज्जन व दुर्जन मनुष्यांना

ओळखतात. माहूताचा मार सहन करूनसुद्धा हत्ती पाय देत नव्हता. ही गोष्ट टोडरमल्लजींना लक्षात आली. टोडरमल्लजींनी हत्तीला संबोधन केले, 'हे गजराज, तू माझ्यासाठी विनाकारण मार का सहन करीत आहेस. तुला वाटते मी निरपराध आहे, यांच्यावर मी कसा पाय देवू ? परंतु मी निरपराधी नाही. या जन्मात मी अपराध केला नसेल, परंतु पूर्व जन्मामध्ये मी काहीतरी अपराध केला आहे. त्याचेच हे फळ आहे. जगात कोठेही अन्याय, अनीती नाही. निरपराध्याला कोठेही शिक्षा होत नसते. तू राजाची आज्ञा स्वीकार कर व मला पापकर्माच्या कर्जातून मुक्त कर !' टोडरमल्लजींचे संबोधन ऐकताच हत्तींनी त्यांच्यावर पाय दिला. केवढी ही उच्चकोटीची समता आहे.

मध्यस्थतेचे मूळ समता –

जेथे सुखदुःखामध्ये समभाव असतो. तेथे उत्कृष्ट मध्यस्थपणा प्रकट हातो. मध्यस्थता म्हणजेच साक्षीभाव. जो साक्षी बनतो तो कोणत्याही पक्षाची बाजू घेत नाही. जशी गोष्ट घडली आहे तशीच सांगतो त्यासच साक्षी म्हणतात. असा मध्यस्थ परिणाम. हेच श्रामण्य आहे. त्या श्रामण्य पर्यायामध्ये हा जीव निर्मोही होऊन स्थित होतो. जेव्हा समतारूप श्रामण्य परिणामामध्ये स्थित होतो तेव्हाच अनाकुलस्वरूप सुखाची उत्पत्ती होते. ज्ञान व आनन्दस्वरूप निज आत्म्याच्या आश्रयानेच समता भाव प्रकट होतो. त्या समताभावाचेच दुसरे नाव मुनिधर्म आहे. जेव्हा कोणी जीव विषयकषायांपासून विरक्त होऊन श्रामण्याचा (मुनिपणा) अंगीकार करतो तेव्हा तो प्रथम सामायिक संयमाची प्रतिज्ञा घेतो. अर्थात् संपूर्ण रागद्वेषाचा त्याग करून तो समताभावाचा स्वीकार करतो अशी प्रतिज्ञा घेतो. या समताभावाला प्राप्त करण्यासाठीच मुनि बनतो. मुनी होऊन पुन्हा पुन्हा शुद्धात्मानुभवाचा पुरुषार्थ करतो. वारंवार निज स्वभावाचे वेदन करण्यासाठी प्रयत्नशील राहतो. म्हणून त्याला 'यती' ही संज्ञा दिली आहे. यत् – प्रयत्न करणे या धातूपासून यती शब्द बनला आहे. क्षणाक्षणामध्ये अंतर्मुख होऊन निज आत्मनिधीचे अवलोकन करतात. त्यामुळे परम आनन्दाचा अनुभव करतात.

समता परिणामाचे फळ अक्षयसुख –

जो समताभाव प्राप्त करतो, तो अनाकुलतारूप अविनाशी सुखाला प्राप्त करतो. जो स्वतःला आनन्दस्वरूपी अनुभव करतो, तो आनन्दाला प्राप्त करतो. आपल्या स्वरूपाला पहा, तेथे ज्ञान व आनन्दाशिवाय काही नाही. जो

परम मध्यस्थ होऊन निज शुद्धात्मसंवेदनाने उत्पन्न परमानंदामध्ये तृप्त होतो तो अनाकुलतास्वरूप शाश्वत अक्षय सुखाला प्राप्त होतो. शुद्धात्मतत्त्वाच्या भावनेमुळे रागद्वेष दूर होऊन सहज आत्मविकास होतो. अशाप्रकारे मोह दूर होण्याचे फळ अविनाशी सुखाची प्राप्ती आहे. सुखाची इच्छा सर्वांना आहे, परंतु अशा सुखाची इच्छा करा की जे कधीही संपणार नाही. आम्ही अशी इच्छा पण करतो की मला जे सुख मिळेल ते कधी नष्ट होऊ नये. तसा प्रयत्न पण करतो, पण असे अविनाशी अक्षय सुख प्राप्त होत नाही याचे कारण आहे, मोह. अर्थात विषयसुखाची इच्छा. विषयसुख नियमाने नष्ट होणारे आहे व आत्मिक अतीन्द्रिय सुखच अविनाशी आहे.

अविनाशी सहजसुखाच्या प्राप्तीसाठी अविकार सहज चित्प्रतिभासमात्र अन्तस्तत्त्वामध्ये आत्मत्वाचा अनुभव करण्याचा पुरुषार्थ करावा.

देवपूजा स्वाध्याय, सामायिक, गुरूपास्ति इत्यादी जितकी धर्माची साधने आहेत त्या सर्वांचे एकच प्रयोजन आहे की आत्मा आपल्या सहज स्वरूपाच्या ध्यानामध्ये लागावा. पूजा करीत असताना भगवंतांच्या स्वरूपाला पाहून त्यांच्यासारख्या निज आत्म्याची आठवण होते. स्वाध्याय करताना उपयोगाची एकाग्रता होऊन निज स्वभावाची ओळख होते. गुरूंची उपासना (सेवा) करताना गुरूंच्या मुखातून शुद्धात्म्याचा महिमा ऐकायला मिळतो. सामायिकामध्ये तर निज शुद्ध आत्म्यामध्ये आपला उपयोग एकाग्र करण्याचा प्रयत्न होतो. आत्मा आपल्या सहज स्वरूपामध्ये उपयुक्त होणे हेच एकाग्र संचेतन लक्षण ध्यान आहे. ध्यानामुळे आत्म्यामध्ये शुद्धता प्रकट होते. आता ध्यान, आत्म्यामध्ये अशुद्धता उत्पन्न करीत नाही. आत्म्यामध्ये राग-द्वेष न होणे, आकुलता न होणे, परिणामाची विशुद्धी होणे हीच शुद्धता म्हटली जाते. ही शुद्धता आत्मध्यानाच्या प्रतापाने प्रकट होते. या गोष्टीचा निश्चय पुढील गाथेत करतात –

जो खविदमोहकलुसो विसयविरत्तो मणो णिरुंभित्ता।
समवट्ठिदो सहावे सो अप्पाणं हवदि ।।१९६ ।।

अन्वयार्थ – (खविदमोहकलुसो) ज्याने मोहाची कलुषता नष्ट केली आहे असा **(जो)** जो आत्मा **(विसयविरत्तो)** विषयापासून विरक्त होऊन **(मणो णिरुंभित्तो)** मनाचा विरोध करून **(सहावे)** स्वभावामध्ये **(समवट्ठिदो)** सम्यक्

रीतीने स्थित झाला **(जे)** तो **(अप्पाणं)** आत्म्याचे **(झादा)** ध्यान करणारा **(हवदि)** होतो.

तात्पर्य – निर्मोह जीव स्वभावामध्ये स्थित होत आत्मध्याता होतो.

मोहक्षयाचा प्रभाव –

ज्याने प्रथम मोह व कलुषतेचा अभाव केला तोच आत्मध्यानी बनू शकतो. मोह एक जीवानाच्या वाटेवरचा दाट अंधार आहे. प्रत्येक द्रव्य स्वतन्त्र आहे. आत्मा भिन्न आहे व शरीर भिन्न आहे. तरी सुद्धा अज्ञानी मोहामुळे शरीरादी परपदार्थाशी संबंध मानतो, हाच मोहांधार आहे. या मोहामध्ये सत्य मार्ग सापडत नाही. म्हणून आत्मध्यानाचा इच्छुक सर्वप्रथम मोहाचा अभाव करतो. तसेच रागद्वेष ही कलुषता दूर झाली की परद्रव्याध्ये होणारी प्रवृत्ती मिटते. दुसऱ्या द्रव्यामध्ये आम्ही आसक्त होतो त्याचे कारण मोह आहे. मोह नसेल तर परद्रव्याच्या मागे कोण लागेल ? परद्रव्यामधील प्रवृत्ती थांबली की पाच इन्द्रियांच्या विषयापासून आपोआप विरक्ती होते. मोहपूर्वक परद्रव्यामध्ये उपयोग लागला की त्यामध्ये इष्ट व अनिष्ट बुद्धी उत्पन्न होते. जेथे इष्टबुद्धी होते तेथे राग उत्पन्न होतो व ज्यामध्ये अनिष्ट बुद्धी होते तेथे द्वेष उत्पन्न होतो. ज्याने मोह म्हणजे दर्शनमोह व कलुषता म्हणजे चारित्रमोह या दोन्हींचा क्षय केला आहे. त्याला विषयांमध्ये रागद्वेष उत्पन्न होत नाहीत अर्थात विषयांपासून विरक्ती होते.

मनाची अन्यत्र निराश्रयता व अनन्य शरणता –

परद्रव्यामध्ये प्रवृत्ती न झाल्यामुळे मनाचा पण निरोध होतो. मनाचा आधार परद्रव्य आहे. जर बाह्यपदार्थमध्ये मन लागले नाही तर मन स्वत:मध्ये लागते. तेथे मन अनन्य शरण होते. ज्याप्रमाणे समुद्रामध्ये एक जहाज आहे. जेव्हा ते जहाज किनाऱ्यावर होते तेव्हा एक पक्षी जहाजाच्या टोकावर बसला. ते जहाज हळूहळू समुद्राच्या मध्यभागी पोहचले.त्या पक्ष्याला आता आजूबाजूला कोणताही आश्रय राहिला नाही. तो पक्षी उडून गेला तर कोठे जाणार ? थोडा उडून गेला तरी दूसरे काही शरण मिळत नाही. तो परत फिरून येतो व त्याच जहाजाच्या टोकावर बसतो. तो आता अनन्यशरण समजून जहाजावरच बसून राहतो. त्याचप्रमाणे ज्या जीवाला आत्मज्ञान उत्पन्न झाले आहे, परद्रव्यासंबंधी आसक्ती दूर झाली. विषयापासून वैराग्य झाले आहे. आता त्याचे मन बाहेर कुठे जाणार ? त्या मनाला आता बाहेर आश्रय मिळत

नाही. कारण आता कोणत्याही विषयाशी प्रेम राहिले नाही. आता हा मनपक्षी आत्म्याला सोडून दुसरीकडे लागू शकत नाही, जो ज्ञानी आहे, निर्मल आहे, त्याचे ज्ञान बाहेर विषय कषायांमध्ये रमू शकत नाही.

मनोनिरोधाचा परिणाम स्वभावामध्ये समवस्थान –

मनाचा स्वभाव आहे, उंच उड्डान मारणे. जर मनाचा निरोध झाला तर मनाचे उड्डान समाप्त झाले. मनाच्या उड्या संपल्या की मनाची चंचलता पण नष्ट होते. मनाची चंचलता नष्ट झाल्यामुळे आत्म्याचा जो सहज ज्ञानस्वभाव आहे त्यामध्ये मन स्थिर होते. जसा जीवाचा स्वभाव ज्ञान आहे तसा जीवाचा स्वभाव आनन्द आहे. सर्व जीव सुख स्वभावी आहेत. कारण आनन्द सर्वांचा स्वभाव आहे, परंतु या मोहाने आनन्दाचा तिरस्कार केला आहे. मोह सोडून पहा, आनन्द मिळतो की नाही. मोह सोडू इच्छित नाही व आनन्दी राहू इच्छितो तर हे शक्य नाही. हाच एक गोरखधंदा आहे. ज्यामध्ये संसारी जीव फसलेला आहे. ज्या मोहामुळे जीव दु:खी आहे त्या दु:खाला सहन न करू शकल्यामुळे जीव सुखी होण्यासाठी पुन्हा मोहालाच प्राप्त करतो. ज्यामुळे दु:ख दूर होण्याचा मार्गच खुंटतो. जर जीव मोहाला दूर करेल तर परपदार्थामधील प्रवृत्ती आपोआप थांबेल. विषयांचा उपभोग आपोआप दूर होईल. मन आत्म्यामध्ये स्थित होईल. जेव्हा मन आत्म्यामध्ये सामावेल तेव्हा आत्म्याची स्थिती आत्म्यामध्ये होईल. मनाचा निरोध झाल्यावर योग व उपयोगाची चंचलता विलयाला जाते. योग व उपयोगाची चंचलता दूर झाल्यामुळे अनन्त सहज चैतन्यात्मक स्वभावामध्ये दृढतेने अवस्थान होते. स्वभावामध्ये समवस्थानच अनाकुल शुद्धात्म्याचा अनुभव असल्यामुळे उत्कृष्ट ध्यान आहे.

इच्छेंच्या पूर्तीसाठी रात्रंदिवस प्रयत्नपूर्वक अभ्यास करून इच्छेच्या अभावामध्ये उत्कृष्ट ध्यान –

जरा विचार तर करा, जन्मापासून आतापर्यंत आपण किती इच्छा केल्या ? लहानपणी काय इच्छा केली ? कोणतातरी नवीन खेळ मिळावा. मन रमविण्यासाठी नवीन खेळणी पाहिजे. नाही मिळाले की लगेच रडायला लागलो. थोडे मोठे झालो शाळेला जाऊ लागलो की अभ्यास करून परीक्षा पास करण्याच्या, त्यामध्ये नंबर काढण्याच्या इच्छा केल्या, डिग्री प्राप्त केली. त्यानंतर धनाची इच्छा उत्पन्न झाली. मोठे पॅकेज मिळवून धनिक होण्याची इच्छा केली. धन मिळाले तर आता पत्नी मिळावी म्हणून इच्छा केली.

काहीतरी करून लग्न झाले की मुले होण्याची इच्छा केली, मुले झाली की त्यांचे पालनपोषण, शिक्षण, लग्न इत्यादी इच्छांची शृंखला मरेपर्यंत तुटतच नाही. एवढ्या सर्व इच्छा करून शेवटी हाती काय लागले ? शांती सुख-समाधान मिळाले का ? या आत्म्यामध्ये काय वृद्धी झाली ? आत्म्याला काय फायदा झाला ? काहीच नाही.

आम्ही साधनेच्या मार्गाला पण लागतो. तेथे देवपूजा करतो, गुरूभक्ती करतो, शक्तीनुसार संयम पण करतो. शुद्ध भोजनसुद्धा करतो, इतके परिश्रम करून सुद्धा अंतरंगामध्ये शांती मिळत नाही. याचे काय कारण आहे हे कधी शोधले का ? याचे कारण आहे की या जीवाने स्वत:च्या स्वरूपाला कधी जाणलेच नाही. मी स्वयं आनंद स्वभावी आहे, हे कधी श्रद्धान केले नाही. त्यामुळे परामध्येच आनंद शोधत राहतो. त्यामुळे परद्रव्याचीच इच्छा करीत राहिलो.

जेव्हा स्वस्वरूपाला जाणले व त्याचे श्रद्धान झाले तेव्हा इच्छा दूर व्हायला लागल्या. इच्छेचा अभाव होऊन स्वरूपामध्ये परिणत होतो तेव्हा एक अनाकुलतेचाच अनुभव होतो. उत्कृष्ट ध्यान तेच आहे जेथे परम अनाकुलतेचा अनुभव होतो. ध्यानाचे फळ सुख आहे. जेथे परमानन्द प्राप्त झाला तेच उत्कृष्ट ध्यान आहे. ध्यान परिणती आत्म्याची शुद्ध परिणती आहे. ध्यानाच्या स्थितीमध्ये आत्मा आपल्या स्वभावात स्थित आहे, म्हणून परमध्यान आत्म्यापासून अनन्य आहे. म्हणून आत्मस्वरूपच आपल्याकरिता परम आनन्द देणारी वस्तू आहे, अन्य वस्तू नाही.

उपयोगाचे स्वरूपामध्ये अवस्थान –

ज्याप्रमाणे पाण्याचा पाऊस पडतो ते पावसात पडणारे पाणी कोठून निघते. कधी विचार केला का ? हे पाणी समुद्रातून निघते, समुद्रातून वाफ बनते. वाफ बनून हेच पाणी ढग रूपाने परिणमले. ढगातून ते पाणी रूपाने होऊन पुन्हा पाणी पृथ्वीवर आले. येथून वाहत जाऊन छोट्या नदीत मिसळले. छोट्या नदीतून मोठ्या नदीमध्ये पोहचले. पुन्हा मोठ्या नदीतून वाहत जाऊन ते पाणी पुन्हा त्याच समुद्रामध्ये मिसळले. ज्या समुद्रातून पाणी निघाले होते पुन्हा ते समुद्रात येऊन मिळाले. त्याचप्रमाणे उपयोग आत्म्यातून निघतो. (उत्पन्न होतो) निघून सगळीकडे फिरतो. कधी कुठे तर कधी कुठे रमतो. सगळीकडे उपयोगाची वर्षा होऊन इकडे तिकडे फिरत उपयोग सर्वांकडून संकुचित होत

पुन्हा आत्म्यामध्ये येऊन मिळतो. आपल्या आत्म्यातून निघालेला उपयोग जोपर्यंत बाहेर पडतो तोपर्यंत त्रास आहे, आकुलता आहे. जेव्हा पसरलेला उपयोग संयमित होऊन आपल्यामध्ये येतो तेव्हा याला शान्ती प्राप्त होते. अनाकुल अनुभवाचा उपाय आहे, एकाग्र रुपाने आत्म्यामध्ये उपयोग लावणे. जेव्हा हा उपयोग बाहेरच्या सर्व पदार्थापासून दूर होऊन आत्म्यस्वरूपामध्ये स्थित होतो तेव्हा आत्म्यामध्ये निराकुल सुखाचा अनुभव होतो. हे उत्कृष्ट आत्मध्यान आत्म्याच्या अशुद्धतेला कारण नाही, उलट परमशुद्धतेसाठी कारण आहे.

आत्मविशुद्धीचे कारण आत्मध्यान –

जयसेन आचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये ध्यानाच्या सम्बन्धी चार प्रकारचे व्याख्यान आहे १) ध्यान, २) ध्यानसन्तान, ३) ध्यानचिंता, ४) ध्यानान्वय सूचन.

१) ध्यान – ज्याप्रमाणे वस्त्र मलिन झाले की त्याला साबण व पानी लावून स्वच्छ करतो त्याप्रमाणे आत्मा पण एक वस्त्र आहे. ते कषायाने मलिन झाले असता ध्यानरूपी पानी व भेदविज्ञान रूपी साबणाने ते स्वच्छ होते. एका कोणत्याही वस्तूवर उपयोगाला एकाग्र करणे म्हणजे ध्यान आहे. ते ध्यान दोन प्रकारचे आहे, अशुद्ध व शुद्ध. जेथे अशुद्ध भावांमध्ये स्थिरता अथवा एकाग्रता होते त्याला अशुद्ध ध्यान म्हटले आहे. आर्तरौद्र ध्यान अशुद्ध आहे व धर्म व शुक्ल ध्यान हे शुद्ध ध्यान आहेत. येथे शुद्ध ध्यानाचे प्रकरण आहे. श्रेणीमध्ये शुक्लध्यान असते. शुक्लध्यानामध्ये ध्याता पुरुषाची बुद्धिपूर्वक आत्मस्वरूपामध्ये एकाग्रता असते. यद्यपि अबुद्धिपूर्वक कषायांच्या निमित्ताने उपयोगामध्ये विषयभूत पदार्थांचे सूक्ष्मपरिवर्तन होत असते. परंतु ते त्यांना अनुभवात येत नसल्यामुळे त्यांना शुद्धोपयोगामध्ये स्थिरतारूप ध्यान सांगितले जाते. धर्मध्यानाचे दोन प्रकार आहेत १) व्यवहार धर्मस्ध्यान २) निश्चय धर्मध्यान

सर्वज्ञ भगवंतांच्या आज्ञेचा पुन:पुन्हा विचार करणे, संसारी जीवांना मिथ्यामार्गापासून निवृत्त होऊन मोक्षमार्गाची प्राप्ती होवो अशी भावना करणे, कर्माच्या फलाचे चिंतन करणे, लोकांच्या स्वरूपाचा विचार करणे इत्यादी सर्व व्यवहार धर्मध्यान आहे हे शुभोपयोगरूप आहे. शुद्ध आत्मस्वरूपामध्ये उपयोगाची एकाग्रता होणे हे निश्चय धर्मध्यान आहे, हे शुद्ध ध्यान आहे. संवर

व निर्जरेला कारण आहे. शुद्धध्यानाने पर्यायामध्ये शुद्धता प्रगट होते.

२) ध्यानसन्तान – जेथे अंतर्मुहूर्त पर्यन्त ध्यान होते. पुन्हा ध्यानाची चिंता होते पुन्हा अंतर्मुहूर्त पर्यन्त ध्यान होते, अशाप्रकारे ध्यानाची परंपरा काही काळपर्यंत चालू राहते त्यास ध्यानसंतान म्हणतात. चतुर्थ काळामध्ये मुनिराज चार महिन्याची, एक महिन्याची योगधारणा करीत असत. या काळातसुद्धा ज्ञानी पुरुष पर्वदिनी एक-एक दिवस ध्यानामध्ये स्थित होतात. त्याकाळी त्यांची ध्यानसंतान चालू असते. कोणी ज्ञानी योगी सहा घटिकेपर्यंत सामायिक करतात त्यावेळी ही ध्यानसंतान असू शकते कारण ध्यान एक अंतर्मुहूर्तापेक्षा जास्त काळ राहू शकत नाही. थोडावेळ उपयोग आत्म्यामध्ये एकाग्र होतो. आत्म्यातून उपयोग च्युत झाला की योगी पुन्हा चिंतनामध्ये त्याला लावतात. असा हा खेळ मुनिराज जंगलामध्ये बसून करीत असतात.

३) ध्यानचिंता – जेथे आत्मा व परमात्म्याच्या गुणांचा विचारच मुख्य असतो त्याला ध्यानचिन्ता म्हणतात. यामध्ये कधी कधी मध्ये-मध्ये एखादा क्षण आत्मध्यान पण होते. परंतु मुख्यरूपाने चिंतन असते. म्हणून याला ध्यानचिंता म्हटले आहे. ध्यानाचा अभ्यास प्रारंभ केल्यानंतर सुरवातीला स्थिरता कमी असते. चिंतनच जास्त होते.

४) ध्यानान्वय सूचन – जेथे ध्यानाला प्राप्त करण्याची सामग्री गोळा केली जाते अर्थात् बारा भावनांचे चिन्तन अथवा धर्मानुराग वाढविणारे व संसार-शरीर-भोगांपासून वैराग्य उत्पन्न करणारे कथन करणे, त्याला ध्यानान्वय सूचन म्हणतात. ज्याप्रमाणे वक्ता ध्यानसूत्र सांगतो किंवा उपयोग एकाग्र होण्यासाठी अरिहंत व आत्म्याच्या स्वरूपाचे वर्णन केले जाते. रूपस्थ व पिण्डस्थ ध्यानामध्ये प्रयोगात्मक पद्धतीने वर्णन सांगितले जाते हे सर्व ध्यानान्वयसूचन म्हटले जाते. ते सूत्र ऐकत असताना मध्ये मध्ये आपला उपयोग काही क्षणासाठी आत्म्यामध्ये एकाग्र होतो ते ध्यान आहे.

या ध्यानाच्या चार भेदांपैकी जेथे उपयोग लागेल तेथे लावून वीतराग साम्य भाव प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. कारण आत्मध्यानानेच आत्मा शुद्ध होतो हेच आत्मध्यान आत्म्याचे बंधन नष्ट करून आत्म्याला परमात्मा बनवते. म्हणून निरन्तर ज्ञानमात्र सहज आत्मस्वरूपाचे ध्यान करावे.

आत्मश्रद्धेचा महिमा –

ज्याला शुद्ध आत्म्याचे श्रद्धान झाले तोच निज शुद्ध आत्म्याचे ध्यान

करतो. श्रद्धेचा महिमा अगम्य आहे. एक राजा होता त्याला एकच मुलगा होता. काही कारणास्तव राजा आपल्या मुलावर नाराज झाला. त्यांनी मुलाला राज्यातून हाकलून लावले व त्याला उत्तराधिकारी बनविण्याचे साफ नाकारले. तो राजकुमार अन्य राज्यामध्ये निघून गेला. त्याला मिळकतीचे कोणतेही साधन नसल्यामुळे भीक मागून पोट भरू लागला. तेथील लोक त्याची टींगल करीत होते. त्याला मारत होते. बडवत होते. त्याला कोणताही राहण्याचा ठिकाणा पण नव्हता.

एकदा राजा आजारी झाला. त्याची वाचण्याची कोणती आशा नव्हती, मंत्री राजाला म्हणाला, 'आपल्या पश्चात् या राज्याचे काय होणार ? या राज्याचा स्वामी कोण ? स्वामीशिवाय राज्य नष्ट होते. जर आपण स्वीकृती देत असाल तर राजकुमाराला शोधून आणू. राजाने राजकुमाराला शोधण्याची स्वीकृती दिली. मंत्र्याने सर्वत्र राजकुमाराला शोधण्यासाठी दूत पाठविले व स्वत: सुद्धा जवळच्या राज्यामध्ये शोधण्यासाठी गेला. तेथे जाऊन त्याने पाहिले की युवराज हातामध्ये पात्र घेऊन भीक मागत आहे. काही मुले त्याला वेडा समजून सतावत होते. मंत्री त्याच्याजवळ गेला व नमस्कार करून म्हणाला, 'महाराजांनी आपल्याला राज्याचा उत्तराधिकारी बनविण्यासाठी बोलाविले आहे. आता आपणच राजा होणार. त्या भिकाऱ्याच्या हातातून पात्र खाली पडले. त्याचा भिकारीपणा नष्ट झाला. यद्यपि तो अजून भुकेलेला होता. 'मी राजा होणार' या श्रद्धानानेच त्याचे वीर्य जागृत झाले व तो आनंदी झाला.

त्याचप्रमाणे अज्ञानी जीव धनाची भीक मागत आहे. त्याच्या इच्छेमध्ये भिकारी होऊन नाना योनीमध्ये भटकत आहे. त्याला हे माहीत नाही की मी अनंत गुणरूपी ऐश्वर्याचा स्वामी आहे. जेव्हा श्रीगुरूंच्या उपदेशाने स्वस्वरूपाला जाणतो. कदाचित् कालादी लब्धिवश त्याचा अनुभव करतो, की अहो ! मी तर परमात्मा आहे. मी आजपर्यंत स्वत:ला जाणलेच नाही म्हणून परपदार्थामध्ये सुखाची कल्पना करून परपदामध्ये अपनत्व मानून मी त्याचाच भिकारी झालो आहे.ही माझी किती मोठी चूक आहे.' दृढतेने निजस्वरूपाचे श्रद्धान करतो तेव्हा त्याच्या हातातून मिथ्यात्वाच्या वश होऊन ग्रहण केलेले परपदरूपी भिक्षापात्र खाली पडते. अजून परमात्मपद प्राप्त झाले नाही तरी श्रद्धेमध्ये स्वत:ला त्या रूपाने स्वीकारतो व एक दिवस परमात्मपदाला प्राप्त

करतो.

'चिंती मना ते येई घरा' ज्या वस्तूचे आपण ध्यान करतो ती वस्तू आपल्याला प्राप्त होते. 'चिंतन तशी पर्याय' जसे आपण चिंतन करतो तशीच पर्याय प्राप्त होत असते. जो अशुद्ध आत्म्याचे ध्यान करतो त्याला अशुद्ध पर्याय प्राप्त होते व जो शुद्ध आत्म्याचे ध्यान करतो त्याला शुद्ध आत्मा प्राप्त होतो. ज्यांनी परिपूर्ण शुद्ध आत्म्याला प्राप्त केले आहे त्यांना अरिहंत व सिद्ध परमात्मा म्हणतात. ते वीतराग सर्वज्ञ आहेत. यावरून कुन्दकुन्द आचार्यांच्या शिष्याला प्रश्न उत्पन्न झाला आहे की जर परमात्मा संपूर्ण विश्वाचे ज्ञाते आहेत तर ते कशाचे ध्यान करतात ? प्राप्त करण्यायोग्य जे आहे ते सर्व काही परमात्म्याने प्राप्त केले आहे. जे जाणण्यायोग जे आहे ते सर्व काही जाणले आहे. आता त्यांना ध्यान करण्यायोग्य काही उरलेच नाही. प्राप्त करण्यायोग्य काही उरले नाही तर ते कोणाचे ध्यान करतात ? ही एक जिज्ञासा आहे. ती जिज्ञासा पुढील गाथेत व्यक्त करतात. पुढील गाथेत फक्त प्रश्नच मांडला आहे तो याप्रमाणे –

णिदघणघादिकम्मो पच्चक्खं सव्वभावतच्चण्हू ।
णेयंतगदो समणो झादि कमट्ठं असंदेहो ।। १९७ ।।

अन्वयार्थ –(णिहदघणघादिकम्मो) ज्यांनी घनरूपाने असणाऱ्या घातिकर्माचा नाश केला आहे व **(पच्चक्खं सव्वभावतच्चण्हू)** प्रत्यक्ष सर्व पदार्थांच्या स्वरूपाला जाणले आहे **(णेयंतगदो)** ज्ञेयाच्या अंताला प्राप्त, **(असंदेहो)** संदेहरहित श्रमण **(कं अट्ठं)** कोणत्या पदार्थाचे **(झादि)** ध्यान करतात ?

तात्पर्य – घातिकर्मरहित सर्वज्ञदेव कोणत्या पदार्थाचे ध्याने करतात ? येथे हा एक प्रश्न झाला आहे.

घातिकर्मरहित सर्वज्ञदेव कोणत्या पदार्थाचे ध्यान करतात. असा येथे एक प्रश्न आहे. कारण मोहाचा सद्भाव असेल, ज्ञानशक्तिाला रोखणाऱ्या वस्तूचा सद्भाव असेल, पदार्थ प्रत्यक्ष नसेल तर जीव त्या अभिलषित, जिज्ञासित व संदिग्ध पदार्थांचे ध्यान करताना दिसतो. केवली भगवंतांच्या मोहाचा अभाव झाला आहे, त्यामुळे त्यांना इच्छा नाही. ज्ञानावरणाचा अभाव असल्यामुळे ज्ञानाचे प्रतिबंधक काही नाही, त्यामुळे जिज्ञासा नाही, संदेह पण नाही तर मग केवली कोणाचे ध्यान करतात ? हा प्रश्न आहे.

मोह–तृष्णा–इच्छा–ध्यान ही कार्यकारणपरम्परा –

मोह अर्थात् पदार्थांना यथार्थ न जाणणे, त्यामुळे परपदार्थांना आपले मानतो. परपदार्थांना सुखाचे कारण मानतो. त्यामुळे परपदार्थांसंबंधी तृष्णा उत्पन्न होते. जसजसे इच्छित विषय प्राप्त होतात तसतशी तृष्णा वाढत जाते. तृष्णा जागृत झाली की इष्ट पदार्थाची अभिलाषा उत्पन्न होते. इष्ट पदार्थ प्राप्त करण्याची इच्छा उत्पन्न झाली की लगेच त्या इच्छित वस्तूचे ध्यान सुरू होते. जसे उन्हाळ्यामध्ये खूप गरम होते तेव्हा मोहामुळे असे वाटते की थंड वस्तूचे सेवन केले की मी सुखी होईन. थंड पदार्थाची तृष्णा उत्पन्न होते. कुलर शीतलता उत्पन्न करते असे वाटते म्हणून कुलरची इच्छा उत्पन्न होते. जोपर्यंत कुलर घरात येत नाही तोपर्यंत सतत कुलरचे ध्यान सुरू राहते. त्याचप्रमाणे बर्फ आईस्क्रिम इत्यादी वस्तू सेवन करण्याची तृष्णा उत्पन्न होते त्यासाठी फ्रीजला इष्ट मानून त्याची इच्छा होते. फ्रीज येईपर्यन्त सतत फ्रीज कुठल्या कंपनीचे घ्यावे ? पैसे किती लागतील ? कोणत्या रंगाचे घ्यायचे ? ह्याचे आर्त ध्यान सुरू होते. याप्रमाणे मोह, त्यामुळे तृष्णा, तृष्णेमुळे इच्छा, तत्पश्चात् इच्छित पदार्थाचे ध्यान ही परम्परा (मालिका) सतत सुरू राहते. इच्छित पदार्थाचे ध्यान करा असे सांगावे लागत नाही. तेथे सहज ध्यान होते. म्हणून सर्व संकटांचे मूळ कारण मोह आहे.

केवली भगवंतांना मोहाचा पूर्ण अभाव झाला आहे, त्यामुळे त्यांना कोणत्याही पदार्थाची तृष्णा नाही. तृष्णा नाही त्यामुळे इच्छा नाही. इच्छा नाही तर इच्छित पदार्थ नाही. इच्छित पदार्थच नाही त्यामुळे केवली कोणाचे ध्यान करतात ? हा प्रश्न आहे.

जिज्ञासा ध्यानाचे कारण –

ज्ञानशक्तीला रोखणाऱ्या ज्ञानावरणकर्माचा उदय असल्यामुळे जीव पुष्कळ पदार्थांना जाणत नाही. सर्व पदार्थांचे ज्ञान होत नाही. त्यामुळे काही अंशाने ज्ञात व बहुधा अज्ञात पदार्थांना स्पष्ट जाणण्याची इच्छा होते. जिज्ञासा उत्पन्न झाली की त्या जिज्ञासेची पूर्ति होईपर्यंत जिज्ञासित अर्थाचे ध्यान चालू राहते. ज्याप्रमाणे शास्त्रात वाचले की स्वर्ग आहे. त्याचे सामान्य ज्ञान झाले, परंतु ते स्वर्ग किती आहेत ? तेथे रचना कशी आहे ? स्वर्गामध्ये देव काय करतात ? इत्यादी जिज्ञासा उत्पन्न होतात. त्रिलोकसार, तिलोयपण्णति

इत्यादी ग्रंथ वाचण्याची इच्छा होते. थोडीसी जिज्ञासा शान्त होते, परंतु अजून ज्ञानामध्ये अपूर्णता असल्यामुळे नवीन नवीन जिज्ञासा उत्पन्न होत राहतात. ती शांत करण्यासाठी चिन्तन, मनन, ध्यान चालू राहते.

कित्येक पुरुष असे आहेत की ज्यांना मोह अधिक नाही त्यामुळे भोगांची अधिक अभिलाषा नाही, पण जाणण्याची इच्छा अधिक आहे. त्यांना धन मिळविण्याची बिल्कुल इच्छा नाही, पण ज्ञानाची तृष्णा आहे. ज्याप्रमाणे आजकाल मोठमोठ्या वैज्ञानिक लोकांची दृष्टी धनाकडे नाही, त्यांना केवळ धुन आहे विज्ञानाचे प्रयोग सफल करण्याची. कोणकोणत्या परमाणूंच्या मिश्रणाने कोणते द्रव्य तयार होते हे जाणून घेण्याची केवळ इच्छा आहे. त्यासाठी रात्रंदिवस त्यांचे ध्यान (चिंतन) करतात. त्यांना खाण्यापिण्याची सूध नसते. दाढी, मिशा, केस वाढलेले, कपडे मळके इत्यादी त्यांची अवस्था जिज्ञासेपोटी होते म्हणून जिज्ञासा पण दुःखाचे कारण आहे.

अरिहंत भगवंतांच्या चारी घातिकर्मांचा अभाव झाला आहे. ज्ञानशक्तीला प्रतिबंधक संपूर्ण ज्ञानावरण कर्मच नाही. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी सर्वज्ञता प्रकट झाली आहे. ज्यांना काही जाणणे शिल्लक राहिले नाही त्यांना कोणत्या पदार्थाची जिज्ञासा आहे ? कोणत्याच पदार्थाची जिज्ञासा नाही तर प्रभू कशाचे ध्यान करतात ?

संदेह ध्यानाचे कारण –

दोलायमान ज्ञानाला संशय म्हणतात. जेव्हा ज्ञान दोन्ही बाजूला स्पर्श करते त्यातील एकाचा निर्णय होत नाही तेव्हा संशय होतो. ज्यावेळी कोणत्याही विषयासंबंधी संशय उत्पन्न होतो, असे आहे की असे आहे ? शरीर आत्मा आहे की अन्य दुसरा आत्मा आहे. जेव्हा संशय निर्माण होतो तेव्हा तो संशय दूर करण्यासाठी त्या विषयाचे ध्यान चालू होते.

दोन वस्तूमधील सामान्य (सदृश) अंशाचे ज्ञान झाले, परंतु दोघांमधील असाधारण विशेष अंशाचे ज्ञान झाले नाही तर संशय उत्पन्न होतो. जसे दुरून वाळलेल्या झाडाचा बुंधा पाहिला की हा पुरुष आहे की झाडाचा बुंधा आहे असा संशय निर्माण होतो. तेथे दोन्हीमधील ऊर्ध्वता (उंची) आदी समान धर्माचे ज्ञान झाले, पण डोके, हात, पाय आदि विशेष धर्मांचे ज्ञान झाले नाही म्हणून संशय उत्पन्न झाला. संदिग्ध मनुष्य संदिग्ध पदार्थाचे ध्यान करतो. अरिहंत प्रभू संपूर्ण ज्ञेयाच्या अंताला प्राप्त झाले आहेत. सर्व वस्तू हातात

ठेवलेल्या आवळ्याप्रमाणे स्पष्ट आहेत त्यामुळे त्यांना कोणत्याच वस्तूसंबंधी संदेह नाही त्यामुळे ते असंदिग्ध आहेत तर ते कशाचे ध्यान करतात ? असा प्रश्न आहे.

परमात्म्यामध्ये ध्यानाचा निषेध –

परमात्म्यांनी पूर्वी श्रमण अवस्थेमध्ये केवलज्ञान व केवलज्ञानाच्या फलस्वरूप अनंतसुखाची प्राप्ती होण्यासाठी शुद्धात्मभावनारूप ध्यान केले होते. शुद्धात्मभावनारूप ध्यानाच्या प्रतापाने जर त्यांना केवलज्ञान व अनन्तसुख प्राप्त झाले तर आता कशासाठी ध्यान करतील ? जेव्हा संपूर्ण प्रत्यक्ष ज्ञान नाही, पदार्थ परोक्ष आहे तेव्हा ध्यान होते. जेव्हा प्रिय व्यक्ती आपल्यापासून दूर असते तेव्हा त्याचे स्मरणरूप ध्यान पुन्हापुन्हा होते. ती प्रिय व्यक्ती समोर असेल तर त्याचे ध्यान होत नाही. त्याचा आनंदच भोगतो. भगवंतांना सर्व पदार्थ प्रत्यक्ष ज्ञात आहेत तर त्यांना ध्यान कसे संभवू शकते ? परमात्म्याला अभिलाषा नाही, जिज्ञासा नाही, सन्देह नाही तर ते कशाचे ध्याता आहेत ?

परमात्म्याच्या पूर्ण निर्दोषतेचा निश्चय करून आपले दोष व जिज्ञासा दूर करून स्वयं स्वतःमध्ये अविकार ज्ञानदर्शनस्वभावमय व आनन्दस्वभावमय निज आत्म्याचा अनुभव करण्याचा पुरुषार्थ करावा.

मागील गाथेत जो प्रश्न केला आहे. त्याचे उत्तर पुढच्या गाथेत देतात. ज्यांना आपला शुद्धात्मा प्राप्त झाला आहे असे सकलज्ञानी कशाचे ध्यान करतात ते सांगतात –

सव्वाबाधविजुत्तो समंतसव्वक्खसोक्खणाणड्ढो ।
भूदो अक्खातीदो झादि अणक्खो परं सोक्खं ।। १९८ ।।

अन्वयार्थ – (अणक्खो) अतीन्द्रिय व **(अक्खातीदो)** इन्द्रियातीत झालेला आत्मा **(सव्वाबाधविजुत्तो)** सर्व बाधेने रहित **(समंतसव्वक्ख–सोक्खणाणड्ढो)** संपूर्ण आत्मप्रदेशांमध्ये सर्व प्रकारच्या अक्षसुख व ज्ञानाने समृद्ध असणारा परमात्मा **(परं सोक्खं)** उत्कृष्ट सौख्याचे **(झादि)** ध्यान करतो अर्थात अनुभव करतो.

तात्पर्य – सर्वज्ञ प्रभू अनन्त आनन्दाचा अनुभव करतात हेच त्यांचे ध्यान आहे.

सर्वज्ञदेवांची विशेषता –

भगवान सर्वज्ञदेव सर्व प्रकारच्या बाधांनी रहित आहेत आणि आपल्या आत्म्याच्या सर्व प्रदेशांमध्ये सर्व सुख व ज्ञानाने परिपूर्ण आहेत. संसारातील सर्व लोक आपल्या इन्द्रिय व मनाच्या द्वारे जेवढ्या ज्ञान व आनन्दाला भोगतात त्यापेक्षा अनन्तपट ज्ञान आणि सुखाने ते संपन्न आहेत अणि अक्षातीत आहेत. इंद्रियांच्या विषयांपासून अतीत आहेत. स्वयं इन्द्रियरहित आहेत. असे सर्वज्ञदेव परमसुखाचे ध्यान करतात. ते सर्वज्ञ भगवान् कोणी दुसरे जीव नाहीत. जसे तुम्ही आम्ही आहोत तसाच हा आत्मा आहे. तोच परमात्मा बनला आहे. हाच आत्मा जेव्हा इन्द्रियरहित होतो तेव्हा अनन्त ज्ञान व अनन्त सुखाचा भण्डार बनतो. तसेच अनन्त ज्ञान व सुख सहजस्वभावरूपाने आपल्यामध्ये आतासुद्धा आहे, पण त्यामध्ये बाधा उत्पन्न करणारे निमित्तभूत द्रव्यकर्म आहे व अंतरंग बाधा उत्पन्न करणारे आंतरिक मोह राग द्वेष रूप भावकर्म आहे. जेव्हा अंतरंग व बहिरंग साधनांचा अभाव होतो तेव्हा हाच आत्मा इन्द्रियातीत होऊन सर्व ज्ञान व सुखाने परिपूर्ण होतो.

इन्द्रिये सर्वज्ञान व सुखामध्ये बाधक –

ज्या इन्द्रियांना आम्ही आमच्या ज्ञान व सुखाचे साधन मानून बसलो आहोत ती इन्द्रियेच ज्ञान व सुखामध्ये सर्वात मोठे बाधक कारण आहेत. इन्द्रिये हेच वास्तविक ज्ञान व सुखाचे आवरण आहे. इन्द्रियाने जाणत असल्यामुळे ज्ञानाला मर्यादा आल्या. कारण इन्द्रिये मर्यादित क्षेत्र व काळातील वस्तूंना जाणण्यामध्येच निमित्त होतात. त्या इन्द्रियांचे अवलंबन घेतल्यामुळे सहज सुख व ज्ञान प्रवृत्त होत नाही. इन्द्रियांनी सर्व दिशातील वस्तू जाणू शकत नाही. ज्याप्रमाणे एका खोलीत बंद असणारा पुरुष एका खिडकीतूनच पाहू शकतो सर्व दिशातून पाहू जाणू शकत नाही. त्याप्रमाणे शरीररूपी खोलीमध्ये बन्द हा आत्मा शरीराच्या पाच खिडकीतून पाहतो तो सर्व बाजूंनी पाहू शकत नाही. इन्द्रियरूपी खिडकीतून सुद्धा सर्व काही जाणू शकत नाही. स्पर्शनेन्द्रिय खिडकीतून आपण फक्त स्पर्शालाच जाणतो. रसनेन्द्रिय खिडकीतून फक्त रसच जाणतो, घ्राणेन्द्रियाने गंधच जाणतो, चक्षुरिन्द्रियाने रूप व कर्णेन्द्रियाद्वारे शब्दच जाणतो. आंशिक ज्ञानाला कारणभूत इन्द्रियांचा जेव्हा अभाव होतो तेव्हा स्वयं इन्द्रियरहित होऊन जीव प्रवर्तन करतो. त्याचवेळी तो स्वयं इन्द्रियातीत होतो. अर्थात भगवान स्वयं इन्द्रियांच्या द्वारे जाणत नाहीत व

दूसरे लोक त्यांना इन्द्रियांद्वारे जाणत नाहीत.

जोपर्यंत इन्द्रिये आहेत तोपर्यंत जीवाला निराकुलता नाही. सतत अप्राप्त वस्तूला जाणण्याची व भोगण्याची आकुलता असते. आकुलता म्हणजे दुःख आहे. इन्द्रिये कल्पित सुख व ज्ञानाचे बाह्य साधन आहेत.

इन्द्रिये सहज सुख व ज्ञानाच्या बाधेचे आयतनभूत आहेत. आयतन म्हणजे आश्रय. इन्द्रिये अपूर्ण ज्ञान व सुखाला निमित्त मात्र आहेत. इन्द्रियामुळे ज्ञान व सुख उत्पन्न होत नाही. उलट ती आकुलतेला उत्पन्न करीत असल्यामुळे दुःखाचे साधन आहेत.

सर्वज्ञ भगवंतांचे सार्वदिक्क ज्ञान –

जेव्हा जीव इन्द्रियरहित अविकार सहज चित्प्रकाशमात्र अन्तस्तत्त्वाची अभेद आराधना करतो तेव्हा तत्काल इन्द्रियांचा अभाव झाल्यावर स्वयं अतीन्द्रिय होतो. अर्थात इन्द्रियाने ज्ञान व सुख प्राप्त करीत नाही. त्याचवेळी दुसऱ्यांना इन्द्रियातीत होऊन निर्बाध सहज परिपूर्ण ज्ञान व परिपूर्ण आनन्दरूप परिणत होतो. सर्व बाधांनी रहित होतो. केवली भगवंतांचा आत्मा ज्ञानावरणादी चार घातिकर्माचा अभाव झाल्यामुळे अनन्तज्ञान, अनंतदर्शन, अनन्तसुख, अनन्तवीर्य, क्षायिक सम्यक्त्व, क्षायिक चारित्र या गुणांनी संपन्न होतो. त्यांना ज्ञान व सुख स्वाभाविक प्रगट होते. ते इंद्रियांच्या द्वारे जाणत नाहीत व विषयसुखाचा भोग घेत नाहीत. त्यांना भूक, तहान, रोग, शोक, शीत, उष्ण इत्यादी परीषहांची अथवा चतेन व अचेतन कृत उपसर्गाची बाधा होत नाही. त्यांचा शुद्ध आत्मा अन्य अल्पज्ञानींच्या इंद्रियज्ञानाचा विषय होत नाही. भगवान इन्द्रियांनी जाणत नसल्यामुळे त्यांचे ज्ञान सर्व आत्मप्रदेशांतून प्रवृत्त होते व त्यांना दिशांचे पण बंधन नाही. सर्व दिशा व सर्व कालाचे त्यांना ज्ञान होते. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, असीम अशा आकाशद्रव्याला ते जाणतात व समस्त द्रव्यांना त्यांच्या अनन्तगुणांना व त्या गुणांच्या भूत वर्तमान भविष्यकालीन अनंत पर्यायांना जाणतात. सर्व क्षेत्रातील व सर्व काळातील जीवांना मिळून जे ज्ञान व सुख होते त्याच्यापेक्षा अनन्तपट ज्ञान व सुख केवली भगवंतांना असते. ते ज्ञान व सुख आत्म्याच्या सर्व प्रदेशांतून होते.

सर्वांना उत्सुकता असते की भगवान् मोक्षामध्ये काय करीत असतील? आपल्याला काही काम मिळाले नाही तर आपण लगेच बेचैन होतो. जर कोणताही विषय ज्ञानासाठी किंवा प्रवृत्तीसाठी मिळाला नाही तर

आपण आकुल व्याकुल होतो. सारखे काम शोधत राहतो. एक काम पूर्ण केले की दुसऱ्या कामाच्या शोधात असतो. सर्वज्ञ भगवंतांना पहा, न त्यांचे घर आहे, न त्यांना कुटुम्ब आहे, न उपजीविकेचे काम आहे, न संगोष्ठी आहे, न कोणाला भेटायचे आहे, न सभा सोसायटी आहे. शरीरसुद्धा नाही. अरिहंतांना शरीर आहे पण ते असून नसल्यासारखे आहे. सर्वज्ञ भगवंतांना दिवस कसा सरत असेल ? असा प्रश्न मनात येतो. त्याचेच उत्तर या गाथेत दिले आहे.

भगवान सर्वज्ञ देवांना सर्व प्रकारच्या इच्छांचा अभाव झाला आहे. तर ते कशाची इच्छा करतील ? ते सर्वज्ञदेव संपूर्ण बाह्य पदार्थांच्या स्वरूपाला एक समान पाहतात. पदार्थांचे जसे शुद्ध स्वरूप आहे तसेच पाहतात. म्हणून त्यांना कोणत्याही प्रकारची अभिलाषा नाही. ते संपूर्ण विश्वाला जाणतात म्हणून जाणण्याची इच्छा पण करीत नाहीत. ते सर्व पदार्थांना स्पष्ट जाणतात म्हणून त्यांना कोणताही संशय नाही. त्यामुळे सर्वज्ञ भगवान् सतत अपूर्व अनन्त आनन्दाचा अनुभव करतात.

भगवंतांचे ध्यान म्हणजे ज्ञानानन्दाचा अनुभव –

केवली भगवंतांना ध्यान उपचाराने सांगितले आहे. त्याचे कारण ध्यानाचे फळ. संवर व निर्जरा चालू आहे. तसेच तीसरे व चौथे शुक्लध्यान आहे. जेव्हा कायेच्या द्वारे सूक्ष्म परिस्पन्दन होते तेव्हा तीसरे शुक्लध्यान होते व जेव्हा योगरहित होतात तेव्हा सर्व क्रियेपासून निवृत्त झाल्यामुळे चौथे शुक्लध्यान होते. केवली भगवंतांना वास्तविक चित्ताला रोकणे रूप ध्यान नाही. केवलींच्या ठिकाणी 'योगनिरोधो' ध्यान ही ध्यानाची व्याख्या लागू होते.

जर ध्यानशब्दानेच परमात्म्याचे रहस्य जाणण्याचा आग्रह असेल तर म्हणू शकतो की परमात्मा परम सहज आनन्दाचे ध्यान करतात. अर्थात् परमात्मा आत्म्याचे निराकुलरूपाने एकाग्र संचेतन करीत अवस्थित आहेत. एकीकडचा उपयोग हटवून दुसरीकडे उपयोग स्थित करणे रूप ध्यान भगवंतांना नाही. ज्ञान व आनन्दाने परिपूर्ण राहणे हेच त्यांचे ध्यान आहे. एक क्षण सुद्धा ते अनन्त सुखापासून वंचित नाहीत. प्रत्येक समयाला अनंत सुखाचा अनुभव करीतआहेत. हेच प्रभूंचे ध्यान आहे. संसारी जीव सर्व काही करतात ते एका सुखासाठी. जेथे परिपूर्ण शाश्वत सुख प्राप्त झाले आता तेथे अन्य काही करण्याची गरज नाही. फक्त त्या सुखाचा निरन्तर भोग घेणे एवढेच करणे आहे.

जर प्रत्येक समयाला सुखाचा अनुभव करीत नाहीत असे मानले तर केवलींना सुखाचा अभाव मानावा लागेल.

प्रभूंचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात जातो तेव्हा एकच प्रार्थना करणे योग्य आहे. प्रभू ज्या निर्विकल्प सहज अनन्त आनन्दाचा आपण आस्वाद घेत आहात ते सुख प्राप्त करण्याची शक्ती माझ्यामध्ये प्रगट होऊ देत. ज्या सुखासाठी रात्रंदिवस उठाठेव करतो ते सुखच प्राप्त झाले तर अन्य वस्तूंची काय आवश्यकता ? ते सदा आत्मध्यानी व आत्मानन्दी आहेत. प्रभूंची महिमा वचनातीत आहे.

सिद्धीचा अर्थ –

सिद्धी म्हणजे एक ज्ञायकस्वभावामध्ये अनाकुलरूपाने एकाग्र संचेतन होत सहज आनन्दाचा निरन्तर उपभोग होत राहणे. हेच परम सुख आहे. आपला उपयोग असा निर्लेप व निर्मल करावा जेणे करून आत्म्याच्या उपभोगाची स्थिती सतत राहील. आत्मज्ञानाने निराकुलतेचे वेदन निरन्तर होत रहावे.

आपल्याला कुठे प्रवासाला जायचे असेल तर आपण प्रथम हे निश्चित करतो की कुठे जायचे आहे ? त्यानंतर हे निश्चित करतो की त्या ठिकाणी आपल्याला कसे जायचे ? अर्थात् कोणत्या मार्गाने गेलो तर आपण तेथे पोहचू शकू ? कुठे जायचे हे निश्चित झाले व कोणत्या मार्गाने जायचे हे पण निश्चित झाल्यानंतर त्याची दृढता येण्यासाठी तेथे पोहचलेल्या व्यक्तींचा दृष्टान्त घेऊन मार्गाचा पुन्हा दृढनिश्चय करतो की 'याच मार्गाने अमुक व्यक्ती गेली होती व तेथे ती सुरक्षित पोहोचली' तर 'हाच मार्ग योग्य आहे' तसेच कोणते ही कार्य सिद्ध करायचे असेल तर तेथे पण हीच पद्धती आहे. कोणते कार्य करायचे आहे व त्या कार्याच्या सिद्धीचा उपाय काय आहे याचा निश्चय करणे. त्यानंतर ज्यांचे कार्य सिद्ध झाले आहे त्यांना जाणून आपल्या उपायाचा दृढनिश्चय करणे, तीच पद्धती येथे आचार्य आत्मसात करतात.

आतापर्यंत हा निर्णय केला की शुद्धात्म्याचे ध्यान केल्याने दर्शनमोहाचा नाश होतो. त्यानंतर त्याच शुद्धात्मध्यानाने राग द्वेष मोहरूप चारित्रमोहाचा पण नाश होतो. त्याच उपायाने घातिकर्मांचा नाश होऊन जीव परमात्मपदाला प्राप्त होतो. आता मुक्त झालेल्या जीवांना लक्ष्य करून हे दृढ निश्चय करतात की शुद्धात्म्याची उपलब्धी हाच मोक्षाचा मार्ग आहे. –

एवं जिणा जिणिंदा सिद्धा मग्गं समुट्ठिदा समणा।
जादा णमोत्थु तेसिं तस्स य णिव्वाणमग्गस्स ।।१९९।।

अन्वयार्थ – (जिणा) सामान्यकेवली, **(जिणिंदा)** तीर्थंकर केवली, **(समणा)** मुनी **(एवं)** अशा प्रकारे **(मग्गं समुट्ठिदा)** मार्गावर आरूढ होऊन **(सिद्धा)** सिद्ध झाले **(तेसिं)** त्यांना **(य)** आणि **(तस्स णिव्वाणमग्गस्स)** त्या निर्वाणमार्गाला **(णमोत्थु)** नमस्कार असो.

तात्पर्य – जसा पूर्वी मार्ग सांगितला त्या मार्गावर आरूढ झालेले मुनीच सिद्ध होतात. त्या सर्व सिद्धांना व त्या मोक्षमार्गाला नमस्कार असो.

या जगात दोन मुख्य मार्ग आहेत. १) संसार मार्ग २) मोक्षमार्ग. संसारमार्ग शिकविण्याची गरज नाही. ज्या मार्गावर आपण चाललो आहोत तोच संसारमार्ग आहे. म्हणून आजपर्यंत संसाराचीच प्राप्ती झाली. मोह करणे, राग द्वेष करणे, इन्द्रियविषयांमध्ये आसक्ती करणे व अज्ञान हा संसाराचा राजमार्ग आहे, मोक्षाचा मार्ग बरोबर याच्या उलट आहे. मोह राग द्वेष न करणे, इन्द्रियविषयांमध्ये आसक्ती न करणे व स्वतःच्या ज्ञानानन्द स्वरूपाला पाहणे अर्थात अनुभव करणे हा मोक्षाचा मार्ग आहे. अभ्यस्त असल्यामुळे संसाराचा मार्ग सरळ वाटतो व अभ्यास नसल्यामुळे मोक्षाचा मार्ग कठिण वाटतो. परंतु जेव्हा पण संसारातून पार होऊ तेव्हा याच मार्गाचा अवलंब करावा लागेल. मग कधीतरी करण्यापेक्षा आताच त्या मोक्षमार्गाचा आश्रय करणे श्रेयस्कर आहे भले ही त्यामध्ये कष्ट पडले तरी चालेल.

शुद्धात्मतत्त्व प्रवृत्ती हाच मोक्षमार्ग –

जितके मोक्षगामी पुरुष झाले ते चरमशरीरी सामान्यकेवली असोत, तीर्थंकरकेवली असोत अतवा अचरमशरीरी मुनि असोत ते याच शुद्धात्मतत्त्वामध्ये प्रवृत्ती रूप मोक्षमार्गाचा आश्रय करून सिद्ध झाले. दुसऱ्या मार्गाने नाही. मोक्षाचा 'वन वे ट्राफिक' आहे. कोणी भक्तीने, कोणी ज्ञानाने तरी कोणी क्रियाकाण्डाने मोक्षाला जातील असे नाही. शुद्ध आत्म्याला जाणणे, त्याचे श्रद्धान करणे व त्यामध्ये लीन होणे रूप अभेद रत्नत्रयच एक मोक्षाचा मार्ग आहे. जे आजपर्यंत वर्तमानामध्ये २४ तीर्थंकर झाले. भूतकाळामध्ये अनंत तीर्थंकर झाले किंवा चरमशरीरी सामान्य केवली राम, हनुमान, सुग्रीव, पांडव, इत्यादी झाले. ते याच मार्गावर आरूढ होऊन सिद्धत्वाला प्राप्त झाले किंवा जे या भवात मोक्षाला जाणार नाहीत, पुढच्या भवात मोक्षाला जातील,

त्यांना सुद्धा या मार्गाचाच आश्रय घेणे योग्य आहे . जे २-४ किंवा ७-८ भवात मोक्षाला जातातते सुद्धा त्या २-४ भवात किंवा ७-८ भवात याच मोक्षमार्गाची आराधना करतात.

ज्ञानाच्या द्वारे ज्ञानमय आत्म्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. ज्ञानाच्या द्वारे या शरीराला विसरून हे शरीर मी नाही, ज्ञानमात्र मी आहे, जेथे मीचे ज्ञान होते तेथे आपली दृष्टी घेऊन जावा. शान्तिपूर्वक जाणा, की हे ज्ञानमात्र तत्त्व मी आहे. जर असा अंतरंगामध्ये आपण प्रयत्न करीत राहिलो तर 'स्वयं' स्वतःमध्ये एक अतुल, अद्भुत तेज प्रतिभासित होईल ते पौद्गलिक तेज नाही ते ज्ञान तेज आहे. ते अनुभूतीचा विषय आहे, इन्द्रियांचा विषय नाही. त्या तेजाचा अनुभव आला की स्वयं अतीन्द्रिय आनन्दाचे वेदन होईल. मोक्षाचा मार्ग दुःखाने क्लेशाने प्राप्त होत नाही, मोक्ष आनन्दमय आहे तर त्याचा मार्गसुद्धा आनन्दमयच आहे, जो आत्म्याची आराधना करतो, त्याला परम आनन्द प्राप्त होतो. त्याला दुःख होत नाही व त्या आनन्दानेच कर्माची निर्जरा होते. इष्टोपदेश ग्रंथामध्ये पूज्यपाद आचार्य सांगतात-

आत्मानुष्ठाननिष्ठस्य व्यवहारबहिःस्थितेः
जायते परमानन्दः कश्चिद् योगेन योगिनः ।।४७।।
आनन्दो निर्दहत्युद्घं कर्मेन्धनमनारतम् ।
न चासौ खिद्यते योगी बहिर्दुःखेष्वचेतनः ।।४८।।

आत्मानुष्ठानामध्ये रत असणाऱ्या योगीला त्या शुद्धोपयोगाच्या द्वारे कोणतातरी एक परम आनन्द उत्पन्न होतो व तो आनन्द प्रचुर कर्मरूपी इंधनसमूहाला जाळून टाकतो. योगी पुरुष शारीरिक दुःखामध्ये अचेतन असतात. त्यांना त्यामध्ये खेद उत्पन्न होत नाही.

म्हणून हे निश्चित होते की शुद्ध आत्म्याचे दर्शनच मोक्षाचा मार्ग आहे. जास्त सांगून काय उपयोग ? जो करेल तो आनन्द भोगेल वचनांनी काही सिद्धी होत नाही, प्रत्यक्ष आचरण केल्यानेच कार्यसिद्धी होते, म्हणून शुद्ध आत्म्यामध्ये प्रवृत्ती करावी.

नोआगमभावनमस्कार-

नमस्कार दोन प्रकारचा आहे. १) द्रव्यनमस्कार, २) भावनमस्कार. वचनाने व शरीराने अरिहंत व सिद्धांना समस्कार करणे द्रव्य नमस्कार आहे मनाने अरिहंत व सिद्धांच्या गुणांचे स्मरण करणे हा भावनमस्कार आहे. पुन्हा

भावनमस्कार दोन प्रकारचा आहे. १) आगमभावनमस्कार, २) नोआगमभाव नमस्कार. अरिहंत सिद्धांचे वर्णन ज्या आगमामध्ये सांगितले आहे त्या आगमाला जाणणे व वर्तमानामध्ये त्या आगमाला जाणण्यामध्ये उपयुक्त असणे तो आगमभावनमस्कार आहे. त्या गुणरूपाने स्वतः परिणत होणे हा नोआगम भावनमस्कार आहे. जेथे सिद्ध आराध्य व मी आराधक असा आराध्य आराधक भावाचा विभाग समाप्त होतो व सिद्धसमान शुद्ध आत्म्याचे स्वसंवेदन प्रत्यक्ष ज्ञानाने अनुभव करतो, मीच आराध्य व मीच आराधक असा अभेदनमस्कार होतो तेथे नोआगमभाव नमस्कार होतो. सहज चित्स्वभावाच्या अनुभूतीच्या बलाने शुद्धात्मतत्त्वामध्ये प्रवृत्ती करणे हाच सिद्ध भगवंतांना नो आगमभावनमस्कार आहे. तसेच शुद्धात्मतत्त्वामध्ये प्रवृत्तिरूप निश्चय मोक्षमार्गाला नोआगमभावनमस्कार आहे.

मोक्षमार्गामध्ये करणीय प्रयत्न –

शुद्ध आत्मस्वरूपाचे दर्शन, ज्ञान व शुद्धआत्मस्वरूपामध्ये रमणे, लीन होणे हाच निश्चय मोक्षमार्ग आहे. असा मोक्षमार्ग तर निश्चित झाला आहे. पण फक्त निश्चय करून काम होणार नाही. आता त्या मोक्षमार्गावर चालणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आपल्याला शिखरजीला पोहचायचे आहे तर प्रथम शिखरजीला जाण्याचा मार्ग कोणता आहे हे निश्चित करतो हाच मार्ग आहे असे श्रद्दान करतो. एवढेच करून शिखरजीला पोहचणार नाही. वाहनामध्ये बसून त्या मार्गावरून चालून गेलो तर शिखरजीला पोहचतो. त्याप्रमाणे मोक्षमार्गाचा फक्त निश्चय करून मोक्षाला प्राप्त होणार नाही. त्या मोक्षमार्गाचे अनुसरण करून त्या मोक्षमार्गरूपाने परिणत झालो तरच मोक्षाला प्राप्त होऊ शकतो. मनुष्य जीवन अत्यन्त अल्प शिल्लक राहिले आहे. जर या अल्प जीवनामध्ये एक आत्म्याचे काम केले नाही तर जीवन व्यर्थ आहे.

एकदा एका व्यक्तीची म्हातारी आई आजारी पडली. तिची एक बाग होती. ती दररोज त्या बागेचा सांभाळ करीत होती. बाग खूप सुन्दर होती. ती खूप चिन्तित होती. स्वतःसाठी नव्हे तर बागेसाठी. त्या व्यक्तीने आपल्या आईला सांगितले की तू काही काळजी करू नकोस. तुझ्या बागेची मी काळजी घेतो. तू निश्चिन्त रहा. दुसऱ्या दिवशीपासून तो बागेची देखरेख करू लागला. झाडाचे एक-एक पान झाडू लागला. एक-एक फुलाला कपड्याने पुसू लागला. परन्तु झाडे वाळू लागली. पंधरा दिवसात आईची बाग उजाड झाली.

पंधरा दिवसानंतर आई बरी होऊन बागेमध्ये आली. पहाते तर सर्व बाग वाळून गेली होती. तिने आपल्या मुलाला विचारले हे काय झाले ? तो म्हणाला, 'मी तर एकेका फुलावर पाणी शिंपडले आहे. एकेका रोपट्याच्या गळ्यात पडून प्रेम केले आहे, तरीसुद्धा बाग वाळून गेली.' आई हसून म्हणाली, 'फुलांचा प्राण त्यांच्या मुळात असतो जो दिसत नाही. पाणी फुलांना द्यावे लागत नाही. मूळाला द्यावे लागते. काळजी पानांची नाही तर मूळाची करावी लागते.'

हीच गोष्ट आमची आहे. आम्ही बाहेरच्या क्रियेवर जोर देतो, पण त्याच्या मूळ गोष्टीकडे लक्ष देत नाही. जर मूळाला पाणी मिळाले, त्याचा सांभाळ केला तर पाने फुले आपोआप येतील आणि ते व्यवस्थित राहतील. आपला चैतन्यस्वभाव मूळ आहे. त्याला जाणले, श्रद्धान केले व त्यामध्ये लीन झालो तर मोक्षमार्ग आपोआप प्राप्त होईल म्हणून निरन्तर आत्मस्वभाव प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा.

मोक्षमार्ग समजला म्हणून काय झाले ? मोक्षमार्गावर चालावे लागेल. सकाळ होते. सूर्याचा उदय होतो. सूर्याच्या उदयाने मार्ग दिसू लागतो. मार्ग दाखविण्याचे काम सूर्याचे आहे, परंतु तुमचे पाय सूर्य चालवणार नाही. चालावे तर स्वतःला लागेल. सूर्याचे काम फक्त मार्ग दाखविणे आहे. जो चालेल तोच निश्चित स्थानावर पोहचू शकेल. त्याचप्रमाणे मोक्षमार्ग दाखविणे हे गुरूंचे कार्य आहे. त्यांची ही मोठी अनुकम्पा आहे. प्रत्येक स्वरूपास्तित्व भिन्न आहे. एका स्वरूपास्तित्वाचा दुसऱ्या स्वरूपास्तित्वाशी थोडापण संबंध नाही. हे तत्त्व समजले पण हे जाणल्यानंतर तशा प्रकारचे आचरण केले तर मोक्षमार्ग प्राप्त होऊन मोक्ष मिळणे दूर नाही. केवळ गप्पागोष्टीने काम होणार नाही. भोजनाची चर्चा करून पोट भरणार नाही. पोट खाण्याने भरते. त्याप्रमाणे फक्त ज्ञानाच्या गप्पा गोष्टी करून मोक्ष मिळणार नाही. मोक्षमार्गाचे ज्ञान श्रद्धान करून आचरण करण्याने मोक्ष निश्चित मिळेल.

सहज परमानन्दसम्पन्नता रूप सिद्धीसाठी सहजज्ञानानन्दमय सहज परमात्मतत्त्वाची अभेद आराधना करावी.

श्री कुन्दकुन्द आचार्य देवांनी मंगलाचरणानंतर 'उवसंपयामि सम्मं जत्तो णिव्वाणसंपत्ती' अशाप्रकारे समताभावाला प्राप्त करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्या प्रतिज्ञेचा निर्वाह करीत 'शुद्धात्मप्रवृत्तीच मोक्षमार्ग आहे' हे निश्चित करतात. प्रतिज्ञा करण्यामध्ये अनेक जण शूर असतात, परंतु त्या प्रतिज्ञेचे पालन करणारे

शूर अत्यन्त विरल आहेत. जयसेन आचार्य म्हणतात की श्री कुन्दकुन्द आचार्यांनी मी समता भावाचा आश्रय घेतो इत्यादी स्वयं घेतलेल्या प्रतिज्ञेचा निर्वाह करीत स्वयंच मोक्षमार्ग परिणतीचा स्वीकार केला आहे असे जे गाथेच्या प्रारंभी म्हटले आहे त्याचा भाव असा आहे की, ज्या महात्म्यांनी साम्यभावाची प्रतिज्ञा घेऊन सिद्धी प्राप्त केली त्यांच्याकडूनच वास्तविक प्रतिज्ञेची पूर्णता केली. श्री कुन्दकुन्द देवांनी तर केवळ ज्ञान व दर्शन अशा दोन अधिकारांना सांगून प्रतिज्ञा पूर्ण केली आहे व शिवकुमार महाराजांनी ग्रंथाचे श्रवण करण्याच्या द्वारे प्रतिज्ञा पूर्ण केली. कुन्दकुन्दाचार्य व शिवकुमार महाराज दोघेही पंचम काळामध्ये झाले म्हणून या भवातून मोक्षाला गेले नाहीत. म्हणून यांची साम्यभावाला ग्रहण करण्याची प्रतिज्ञा आयुक्षयानंतर राहू शकत नाही. कारण हे शरीर सोडून ते देवगतीला प्राप्त झाले असणार. जे रत्नत्रयाचे साधन करून त्याच भवात मोक्षाला गेले त्यांचीच प्रतिज्ञा पूर्णतेला प्राप्त झाली. ते अनंतकाळापर्यंत साम्यभावामध्ये लीन राहणार. श्री कुन्दकुन्द आचार्य महाराज या गाथेमध्ये मोक्षमार्गासंबंधी गाढ श्रद्धा व्यक्त करतात-

तम्हा तह जाणित्ता अप्पाणं जाणगं सहावेण।
परिवज्जामि ममत्तिं उवट्ठिदो णिम्ममत्तम्मि॥ २००॥

अन्वयार्थ -

(तम्हा) म्हणून अर्थात् शुद्धात्म प्रवृत्तीच्या द्वारेच मोक्ष होतो म्हणून **(तह)** तशाच प्रकारे **(अप्पाणं)** आत्म्याला **(सहावेण)** स्वभावाने **(जाणगं)** ज्ञायक **(जाणित्ता)** जाणून **(णिम्ममत्तम्मि)** निर्ममत्वामध्ये **(उवट्ठिदो)** उपस्थित राहून मी **(ममत्तिं)** ममत्वाचा **(परिवज्जामि)** त्याग करतो.

तात्पर्य - स्वभावाने ज्ञायकमात्र स्वतःला जाणून मी निर्मम होतो.

ज्याप्रमाणे पूर्व महापुरुषांनी आपल्या स्वभावाने ज्ञाताद्रष्टा आनन्द स्वरूप आत्म्याला जाणून अनुभव केला होता त्याचप्रमाणे मी सुद्धा निज आत्म्याच्या शुद्धस्वभावाला जाणून ममकार अहंकार रहित वीतरागचारित्ररूप समताभावामध्ये स्थित होऊन आपल्या शुद्ध आत्म्याशिवाय सर्व चेतन, अचेतन व मिश्र पदार्थांसंबंधी ममता सोडतो आणि आत्मस्थ होऊन समतारसाचे पान करतो.

अन्य कर्तव्याचा अभाव व शुद्धात्म तत्त्वामध्ये प्रवृत्ती कर्तव्य -

अमृतचन्द्र आचार्य टीकेमध्ये म्हणतात, 'हा मी मोक्षाचा अधिकारी आहे, आतापर्यंत या जीवाला अनेक अधिकार प्राप्त झाले. परंतु त्याद्वारे मोठेपणा प्राप्त झाला नाही. ते सर्व अधिकार नाशवंत वस्तूसंबंधी होते. त्यामुळे त्याद्वारे प्राप्त होणारे मोठेपण टिकून राहिले नाही. कधी गावाचा अधिकारी झाला तर कधी नगराचा अधिकारी झाला तर कधी जिल्हाधिकारी झाला तर कधी प्रान्ताधिकारी बनला तर कधी देशाचा अधिकारी झाला. परंतु हे सर्व अधिकार काढून घेतले गेले. ही सर्व पदे अपदस्वरूप आहेत. एक मोक्षपद शाश्वत आहे. त्या मोक्षाचा अधिकारी मी झालो आहे. ज्याच्याजवळ रत्नत्रयाची संपत्ती आहे तो मोक्षाधिकारी बनतो.' हा मी मोक्षाधिकारी सर्व आरंभांनी अर्थात सर्व प्रकारची शक्ती पणाला लावून शुद्ध आत्म्यामध्ये प्रवृत्त होतो. शुद्ध आत्मा म्हणजे सर्व परपदार्थापासून भिन्न केवळ ज्ञान व आनन्दमय निज आत्मतत्त्व. मी शुद्ध आत्म्यामध्ये प्रवृत्त होतो अर्थात यथार्थ स्वरूपवान निज आत्म्याचे अवलोकन करीत राहतो. कारण मला करण्यासाठी दूसरे काम राहिले नाही. वास्तविक कोणालाच दूसरे काही करण्यायोग्य काम नाही. कारण आपण तर ज्ञान व आनन्दस्वभावी आहोत. अन्य जीव व पुद्गलादी परतत्त्व आहेत. माझा कोणत्याही परामध्ये प्रवेश नाही, अधिकार नाही. परपदार्थ स्वतःच्या अस्तित्वाने परिणमतात. मी आपल्या अस्तित्वामध्ये आहे.

ममत्वाचा त्याग व निर्ममत्वाचे विधान -

ज्यावेळी ज्ञायकस्वभावी आत्मतत्त्वाचे ज्ञान होते तेव्हा ममत्वाची हानी होते व निर्ममत्वाचा लाभ होतो. जेव्हा अत्यन्त पृथक् स्वतन्त्र स्वतन्त्र मी सर्वाला पाहू तेव्हा ममत्व राहू शकत नाही. ममता तेथेच जागृत राहू शकते जेथे अन्य पदार्थाला स्वतःपासून वेगळे जाणले जात नाही. जेथे स्वपराचे यथार्थ ज्ञान होते तेथे हा विचार राहतो की मी परामध्ये काय करू ? मला काय करायचे आहे ? काहीही केले जाऊ शकत नाही. करण्याचे काम तर काही राहिलेच नाही.

एका सेठजींचा मुलगा लहानपणीच हरवला. पुष्कळ शोध करून सुद्धा सापडला नाही. सेठ व सेठानीजी खूप दुःखी झाले. या घटनेला ७-८ वर्षे निघून गेली. हळूहळू दुःखपण विसरले. सेठजीनी एका मुलाला आपल्या घरी

साफसफाई, भांडी घासण्यासाठी नोकर म्हणून ठेवून घेतले. तो मुलगा खूप काम करायचा तरी पण सेठानी त्याच्यावर नेहमी ओरडायची, 'कामचुकार, नुसता झोपून राहतो, चल ऊठ काम कर. नुसता खादाड आहे.' त्याला वेळेवर पोटभर अन्न सुद्धा देत नव्हती. उरलेले, शिळे अन्न त्याला वाढायची. काही दिवसानंतर त्याची विचारपूस केल्यानंतर लक्षात आले की, हा आपलाच हरवलेला मुलगा आहे. तेव्हा सेठानी रडते, की मी माझ्या मुलाला किती त्रास दिला. आता तो किती जेवला तरी म्हणते, माझ्या बाळाने काही खाल्लेच नाही. काही काम करू लागला तर म्हणते, 'बेटा तू काम करू नकोस.'

व्यक्ती एकच आहे तर त्याच्याबरोबर वागण्यामध्ये असे अंतर का झाले ? जोपर्यंत तो दुसऱ्याचा आहे असा भाव होता तोपर्यंत त्याच्यावर ममत्व नव्हते. जेव्हा हा माझा मुलगा आहे असा भाव झाला की ममत्व सुरू झाले.

त्याचप्रमाणे जोपर्यंत आम्ही आपल्या आत्म्याला परका मानले आहे व शरीराला आपले समजले आहे तोपर्यंत आमची चाल उलटी चालू आहे. परका असून सुद्धा शरीराला आपले समजून त्याची देखरेख सुरू आहे. याच्या उलट जो वास्तविक आपला आहे त्याची आपल्याला परवा नाही. त्याचे अहित करून शरीराच्या हिताची चेष्टा चालू आहे.

जेव्हा भेदविज्ञानाच्या द्वारे यथार्थ मान्यता होते तेव्हा आमचा व्यवहार व आचरण बदलते. जो व्यवहार आजपर्यंत शरीराच्या प्रति होता तसा आत्म्याच्या प्रति होतो आणि जो आत्म्याच्या प्रति होता तसा शरीराच्या प्रति होतो. परवस्तूचे ममत्व सुटल्यावर सहज निर्ममत्व भाव प्रगट होतो. म्हणून आचार्य कुन्दकुन्ददेव नियमसार मध्ये म्हणतात -

ममतिं परिवज्जामि णिममत्तिमुवट्ठिदो।
आलंबणं च मे आदा, अवसेसाइंवोसरे।।

मी ममत्वाचा त्याग करतो व निर्ममत्वामध्ये स्थित होतो. आत्माच माझे अवलंबन आहे. शेष सर्वांचा आश्रय मी सोडतो.

माझा विश्वाबरोबर मात्र ज्ञेयज्ञायक संबंध -

ज्ञानी संत आपल्या शुद्ध ज्ञानमात्र आत्मस्वरूपामध्ये दृष्टी लावतात. ते जाणतात की, 'मी स्वभावाने ज्ञायक आहे. केवळ ज्ञायकस्वभावी माझा अन्य सर्व

पदार्थांबरोबर सहज ज्ञेयज्ञायक संबंध आहे. शरीर, स्त्री, पुत्र, मित्र, धन, धान्य, घर, शेती इत्यादी सर्व पदार्थ माझ्या ज्ञानरूपी आरशामध्ये केवळ ज्ञात होत आहेत. त्यांना मी जाणत आहे. या व्यतिरिक्त त्यांचा माझा अन्य कोणताही संबंध नाही. शरीर एक आत्म्याचा कलंक आहे, हे माझे वैभव नाही. ज्याच्या संबंधामुळे आम्ही आमच्या प्रभुतेचा नाश करीत आहोत. ज्याच्या संबंधामुळे भूक, तहान, थंडी, उष्णता, रोग इत्यादी अनेक प्रकारचे दुर्विकल्प होतात. हे शरीर माझा श्रृंगार आहे की कलंक. अज्ञानी जीवाने या शरीराला आपला श्रृङ्गार मानला आहे. हा मी किती सुंदर आहे, मी गोरा आहे इत्यादी. या शरीराला आराम दिला. शरीराला नाना प्रकारच्या आभूषणांनी सजविले, अनेक प्रकारचे स्वादिष्ट भोजन खाऊ खातले. आता मला समजले या शरीराबरोबर माझा अन्य कोणताही संबंध नाही. केवळ ज्ञेयज्ञायक संबंध आहे. अन्य स्वस्वामी संबंध नाही. पर व परभावापासून विविक्त ज्ञानस्वभावी माझा पर व परभावांशी काहीही ममत्व नाही. सर्वत्र निर्ममत्वच आहे. माझा सर्व विश्वाशी एवढाच संबंध आहे की ते पदार्थ माझ्या जाणण्यामध्ये येत आहेत व मी त्यांना जाणत आहे. या व्यतिरिक्त अन्य कोणताही संबंध नाही. ज्याला आपण आपले सर्वस्व समजता. जरा विचार करून तरी पहा. ते पुत्र, स्त्री, मित्रादिक, काय मी त्यांच्या आत्म्याचा स्वामी आहे ? कोणत्या गतीतून हा आत्मा आला ? काही दिवस राहून कोणत्या गतीमध्ये तो जाणार ? जितक्या काळापर्यंत हे प्राणी माझ्याबरोबर आहेत. तेवढ्या काळापर्यंत सुद्धा माझ्या इच्छेनुसार परिणमन करीत नाहीत.'

ज्ञानाचा हा चमत्कार संपूर्ण विश्व घरबसल्या त्यामध्ये झळकते. विश्वाला जाणण्यासाठी त्याच्याजवळ जाण्याची गरज नाही. मी ज्ञानस्वरूप आहे व हे संपूर्ण विश्व जाणण्यायोग्य ज्ञेय आहे. एवढाच माझा विश्वाशी ज्ञेयज्ञायक संबंध आहे.

ज्ञानामध्ये विश्वाचा उत्कीर्णवत् प्रतिभास -

ज्याप्रमाणे दगडी भिंतीवर अक्षर खोदले जातात. मूर्ति कोरली जाते. ते अक्षर व मूर्ति त्या भिंतीवर उत्कीर्ण म्हटले जातात. त्याचप्रमाणे विश्वातील संपूर्ण पदार्थ जेव्हा जाणले जातात तेव्हा असे प्रतिभासित होतात की जणू ते ज्ञानरूपी भिंतीवर खोदले गेले आहेत व उत्कीर्ण आहेत. समोर दगड, माती, सिमेंट, वाळू, विटांनी बनलेले घर दिसत आहे. घर एक पौद्गलिक स्कंध आहे. ते घर आमच्या

ज्ञानामध्ये येते तेव्हा हे घर आहे. एवढे जाणणे आमचा प्रामाणिकपणा आहे. पण त्याच्यापुढे हे माझे घर आहे, हे छान आहे, त्याचा मी कर्ता आहे असे जाणणे अप्रामाणिकपणा आहे. कोणत्याही वस्तूला जाणले असता असे भासित होते की हे माझ्या ज्ञानातच सामावले आहे. हे विश्व माझ्या ज्ञानात उकरल्याप्रमाणे वाटते. तरी सुद्धा याच्याशी माझा रंचमात्र संबंध नाही.

विश्वाचा ज्ञानामध्ये लिखितवत् प्रतिभास -

ज्ञानाची एक विशिष्ट कला आहे की सर्व ज्ञेय त्यामध्ये लिखिताप्रमाणे भासित होतात. लिखित शब्दाचा अर्थ कागदावर लिहिणे असा नाही. शाईने कागदावर लिहिले जात नाही तर लिपले जाते. शेतामध्ये जे नांगर मारले जाते तेव्हा जी रेषा उमटते त्याचे नाम लिखित आहे. दाबून खोल लिहिले जाते. तेथे जमिनित खोल खड्डे पडतात. ज्याप्रमाणे पूर्वी ताडपत्राच्या पानावर लोखंडाच्या सुईने कोरून लिहिले जायचे. आताचे सर्व ग्रन्थ लिपिक आहेत. लिखित नाहीत. लिपण्यामध्ये खोल असर होत नाही. लिहिण्यामध्ये खोल असर होतो. ज्याप्रमाणे कागदावर लिपिबद्ध झालेले अक्षर पाण्याने धुतले जाते, मिटून जाते पण सुईने लिहिलेले अक्षर मिटत नाही, हे सर्व विश्वज्ञानामध्ये लिखिताप्रमाणे भासित होते.

विश्वाचा ज्ञानामध्ये निखातवत् प्रतिभास -

विश्व ज्ञानामध्ये केवळ लिखित आहे असे नाही तर ते निखातरूप आहे, जडलेले आहे. ज्याप्रमाणे सोन्यामध्ये रत्न जडवले जातात किंवा दोन लोखंडांच्यामध्ये मोळा फसविला जातो त्याप्रमाणे हे संपूर्ण विश्व आत्म्यामध्ये फसलेले आहे. जडविले आहे असे भासित होते. छद्मस्थसुद्धा जेवढ्या पदार्थांना जाणतो त्या सर्व पदार्थांचे ज्ञेयाकार ज्ञानामध्ये आहेत ते पदार्थ ज्ञानामध्ये निखाताप्रमाणे वाटतात.

विश्वाचा ज्ञानामध्ये कीलितवत् प्रतिभास -

एवढेच नव्हे तर हे विश्व ज्ञानामध्ये कीलिताप्रमाणे फिट्ट बसले आहे. ज्याप्रमाणे भिंतीमध्ये खिळा खोलवर घट्ट बसतो, लाकडामध्ये खिळा खोल बसतो त्याप्रमाणे हे विश्व ज्ञानामध्ये खोलवर आत बसले आहे असे वाटते. ज्ञानाची विचित्रता पहा, ज्ञेय पदार्थ पदार्थाच्या ठिकाणी आहे, आत्म्यामध्ये थोडेदेखील प्रवेश करीत नाही. तरीसुद्धा ज्ञानामध्ये आत खोलवर कीलित

झाल्याप्रमाणे वाटते.

विश्वाच्या ज्ञानामध्ये मज्जितवत् प्रतिभास -

मज्जित म्हणजे बुडणे. संपूर्ण विश्व ज्ञानामध्ये बुडल्याप्रमाणे भासित होते. ज्याप्रमाणे पाण्यामध्ये कोणी मुलगा डुबकी मारतो त्यावेळी तो पाण्यामध्ये बुडाल्यासारखा वाटतो. त्याचप्रमाणे या ज्ञान समुद्रामध्ये संपूर्ण विश्व बुडाले आहे. ज्या वस्तूला आपण जाणतो ती वस्तू आपल्या ज्ञानामध्ये मग्न झाल्याप्रमाणे वाटते. ज्याप्रमाणे समुद्रामध्ये एक बालक उडी मारून बुडतो, आणि पुन्हा दूसरा बालक येऊन बुडतो तर समुद्र त्याला आडवत नाही. माझ्यामध्ये असे लाखो बालक बुडाले तरी काही हरकत नाही. समुद्रामध्ये तेवढी खोली आहे. हा समुद्राचा संदेश आहे. त्याप्रमाणे माझ्या ज्ञानामध्ये कितीही पदार्थ आले तरी येऊ देत. तेथे विशाल जागा आहे.

विश्वाचा ज्ञानामध्ये समावर्तिताप्रमाणे प्रतिभास -

बुडणे दोन प्रकारचे आहे. एक बुडणे असे आहे की, दगड पाण्यात टाकला तर तो बुडतो. दुसरे बुडणे असे आहे की पाण्यामध्ये रंग टाकला तर तो रंगसुद्धा पाण्यात बुडतो. परंतु दोघांच्या बुडण्यामध्ये अंतर आहे. त्याप्रमाणे मज्जित व समावर्तितामध्ये अंतर आहे. समावर्तित म्हणजे एकरूप भासित होणे. रंग पाण्याच्या सर्व कणांमध्ये व्याप्त होऊन जातो. त्याचप्रमाणे विश्वातील पदार्थ ज्ञानामध्ये प्रत्येक प्रदेशामध्ये सामावून जाते. पदार्थाचा ज्ञेयाकार ज्ञानाच्या प्रत्येक प्रदेशामध्ये व्याप्त होऊन जातो.

विश्वाचा ज्ञानामध्ये प्रतिबिम्बिताप्रमाणे प्रतिभास -

संपूर्ण विश्व ज्ञानामध्ये प्रतिबिम्बित झाल्यासारखे वाटते. ज्याप्रमाणे आरशामध्ये समोरचे सर्व पदार्थ प्रतिबिम्बित होतात. जसा पदार्थ आहे तसाच त्याचा आकार आरशामध्ये झळकतो. परंतु तरी तो पदार्थ आरशामध्ये प्रवेश करीत नाही. ज्याप्रमाणे पदार्थ आपल्या जागेला न सोडताच आरशामध्ये प्रतिबिम्बित होतो. त्याप्रमाणे पदार्थ स्वक्षेत्राला न सोडताच ज्ञानामध्ये झळकतो. ज्याप्रमाणे आरसा कोणाचे प्रतिबिम्ब घेतल्याशिवाय राहू शकत नाही. आरसा पेटीत ठेवला तरी त्या पेटीची आतील बाजू आरशात प्रतिबिम्बित होते, कापडात गुंडाळला तरी त्या कपड्यालाच प्रतिबिम्बित करतो. असा कोणताही एक समय

नाही की ज्यावेळी आरसा कोणालाच प्रतिबिम्बित करीत नाही. आरशामध्ये परपदार्थांचे प्रतिबिम्ब उमटणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे या आत्म्याच्या ज्ञानामध्ये प्रत्येक समयाला पदार्थ प्रतिबिंबित होतात. ज्ञानामध्ये पदार्थांचे ज्ञान होणे अनिवार्य आहे. कोणते ना कोणते तरी ज्ञेय आत्म्यामध्ये जाणले जाते. ज्ञानाने काही जाणले नाहीतर ज्ञानाचे अस्तित्वच नष्ट होईल.

विश्वरूप ज्ञानाची एकरूपता -

हा आत्मा सहज एक ज्ञायक स्वभावी आहे. ज्ञानामध्ये नाना पदार्थांचे नाना ज्ञेयाकार सामावलेले आहेत तरीसुद्धा ज्ञान नानारूप होत नाही ते एकरूपच आहे. ज्याप्रमाणे आरशामध्ये अनेक वस्तूंचे अनेक रंग दिसतात, परंतु आरसा एकरूपच आहे. आरशाचे अनेक रूप आहेत की एक स्वच्छ रूपच आहे ? आरसा एक स्वच्छ स्वरूपच आहे. नानारूप त्याचे नाहीत. जर आरसा अनेक रंगीबिरंगी होऊन जाईल तर तो आरसाच राहणार नाही. त्याचे अस्तित्वच समाप्त होऊन जाईल. त्यामध्ये पदार्थ प्रतिबिम्बितच होणार नाहीत. आरसा आपल्या स्वच्छत्व स्वरूपाला कधी सोडत नाही म्हणून त्यामध्ये पदार्थ नेहमी प्रतिबिम्बित होतात. त्याप्रमाणे आत्मा एक ज्ञायक स्वरूप आहे. म्हणून सर्व विश्व त्याच्या ज्ञानामध्ये प्रतिबिम्बित होते. जर ज्ञान ज्ञेयस्वरूप नानारूप होईल तर त्यामध्ये ज्ञेयांचे आकार झळकणे बंद होऊन जाईल. म्हणून केवळ जाणणस्वभावी आत्म्याचा संपूर्ण पदार्थाबरोबर सहज ज्ञेय ज्ञायक रूप संबंध आहे. अन्य कोणताही संबंध नाही. वास्तविक निश्चयाने ज्ञेयज्ञायक संबंध सुद्धा नाही. ज्ञेय पदार्थांचा सहजस्वभाव आहे की ते ज्ञानामध्ये जाणले जातात व ज्ञानाचा सहज स्वभाव आहे की ज्ञान त्यांना जाणते. ज्याप्रमाणे आरशाचा सहज स्वच्छ स्वभाव आहे की पदार्थांना तो त्यामध्ये झळकवितो व पदार्थांचा सहज स्वभाव आहे की ते आरशाला आपले समर्पण देऊन त्यामध्ये झळकतात. हा सहज स्वभावाचा शुद्ध उदय आहे.

मोहामुळे अन्यथा निश्चय -

आत्मा ज्ञेयाला जाणत असल्यामुळे ज्ञेयाकार रूपाने विश्वरूप दिसत असला तरी आपल्या सहज ज्ञायक स्वभावाने एकरूपतेला कधीही सोडत नाही. अनादिकाळापासून हा मी ज्ञायकच आहे. परंतु मोहामुळे मी स्वतःला अन्य प्रकाराने अर्थात् ज्ञेयरूप मानले. शरीर, स्त्री, पुत्र, मित्र, घर, शेती, सोने, चांदी

इत्यादी पदार्थ ज्ञानामध्ये जाणले जातात. त्यांना हा जीव मोहामुळे आपले मानतो, ज्ञान व ज्ञेय हे दोन विभागच मोहामुळे नष्ट होतात. शरीर ज्ञानाचे ज्ञेय आहे, मी शरीर नाही. शरीर ज्या ज्ञानामध्ये दिसत आहे त्या ज्ञानस्वरूप मी आहे, स्त्री, पुत्र, मित्र ज्या ज्ञानामध्ये जाणले जात आहेत त्या ज्ञानस्वरूप मी आहे. असा ज्ञान व ज्ञेयामध्ये विभाग जाणून स्वतःला ज्ञानरूप अनुभवावे. त्यासाठी प्रथम मोहाला मूळासकट उखडून काढावे. मोहाला वरवर दाबून उपयोग नाही. एकदा वस्तुस्वरूपाचा यथार्थ निर्णय केला तर मोहाचा मूळासकट नाश होणे संभव आहे.

एक राजा परमात्म्याला शोधण्यासाठी सर्वत्र भ्रमण करू लागला. तो एका आश्रमात गेला, त्याने आचार्यांना विचारले 'मला परमात्मा पाहायचा आहे. मला तुम्ही दाखवा. आचार्य म्हणाले. 'जे तुमच्याजवळ आहे ते सोडून द्या. त्या राजाने राज्याचा त्याग केला. सर्व सम्पती वाटून टाकली. आता त्याच्याजवळ काही राहिले नाही. परत आचार्यांच्या जवळ येऊन निवेदन केले. आचार्यांनी त्याच्याकडे पाहून सांगितले, जे तुझे नव्हते ते तर तू सोडून आलास, परन्तु जे तुझ्याजवळ होते तेच सोडले नाहीस. वास्तविक त्याग आपल्या जवळच्या वस्तूचाच करायचा असतो.

राजाला काही समजले नाही, आचार्यांनी राजाला आश्रम स्वच्छ करण्याचे काम सोपविले. काही दिवसांनी आश्रमवासीयांनी आचार्यांना प्रार्थना केली की, राजाला या कष्टमय कार्यातून मुक्त करावे. आचार्य म्हणाले, 'पहिला परीक्षा घ्यावी लागेल. दुसऱ्या दिवशी राजा कचऱ्याची टोपली डोक्यावर घेउन बाहेर फेकण्यासाठी जात होता तेव्हा कोणी व्यक्ती त्याला धडकला. राजा लगेच म्हणाला, 'काय आंधळा आहेस का? आचार्य म्हणाले, 'अजून तो तोच आहे' काही दिवसानंतर पुन्हा एक व्यक्ती राजाला धडकला आणि कचरा खाली पडला. राजांनी त्याच्याकडे तीव्र नजरेने पाहिले आणि कचरा उचलून निघून गेला, परन्तु जे सांगायचे होते ते डोळ्यांनी सांगितले. राजा आचार्याच्या परीक्षेत अजूनही पास झाला नाही. काही महिन्यानंतर पुन्हा एका व्यक्तीची राजाशी टक्कर झाली. कचरा सर्वत्र पसरला. परन्तु असे वाटले की जणू काही झालेच नाही. त्यादिवशी आचार्य म्हणाले 'आता याचा 'मी' मरून गेला. ज्याला सोडायला पाहिजे होते ते आता याने सोडले आहे.

धन सम्पती इत्यादी बाह्य वस्तू सोडणे सोपे आहे. परन्तु "मी" सोडणे फार कठीण आहे. आम्ही स्वत:ला काहीतरी समजून बसलो आहोत. तो परामधला मी पणाच संसार आहे. ज्याचा मीपणा मेला त्याचा संसार संपला. जे पर्यायामध्ये 'मी' ने भरलेले आहेत ते परमात्म्याला जाणू शकत नाहीत. परमात्मा कोठे बाहेर नाही, मी स्वयं परमात्मा आहे, परंतु ते विसरून अज्ञानी स्वतःला काहीतरी समजून बसला आहे, मी राजा, मी डॉक्टर, मी इंजिनिअर, मी पंडित, मी साधू , मी व्रती इत्यादी ही सर्व अशाश्वत पदे आहेत. मी एक स्थायी ज्ञायकभावस्वरूप आहे. याची प्रतीती होणे, अनुभूती होणे आवश्यक आहे.

शुद्धात्म देवाला नमस्कार –

ज्याच्या दर्शनाशिवाय या जगातील जीव आनन्द प्राप्त करण्यासाठी इकडे तिकडे भटकत आहेत, अशा शुद्ध ज्ञानस्वरूप निज आत्मस्वरूपाचे श्रद्धान केल्याशिवाय स्वतःमध्ये रिक्तपणाचा अनुभव करून जगाकडे आशेने पाहत आहेत. त्या शुद्ध आत्मदेवाला माझा भाव नमस्कार असो. अर्थात या शुद्ध आत्म्याची महिमा जाणू या. शुद्ध ज्ञानस्वरूपाच्या अनुभूतीमध्ये लीन होऊन अतीन्द्रिय आनन्दाचा भोग घेतो, हाच खरा नमस्कार आहे. शरीराने नमस्कार करणे हा द्रव्यनमस्कार आहे. द्रव्यनमस्कार कपटपूर्वक केला जाऊ शकतो किंवा दुसऱ्यांना दाखविण्यासाठी केला जाऊ शकतो किंवा लौकिक कार्याच्या सिद्धीसाठी सुद्धा केला जाऊ शकतो. परन्तु शुद्ध परमात्म तत्त्वामध्ये लीनतारूप भावनमस्कार हा स्वतःच्या सत्य, परम, आनन्दाला कारणी भूत आहे. अशा या शुद्धस्वभावाला नमस्कार असो जो स्वयं स्वतःमध्ये अनादिकाळापासून अनन्त काळापर्यन्त नित्य अन्तः प्रकाशमान आहे. या निज शुद्ध आत्मतत्त्वाला ज्यांनी प्रकट केले आहे अशा अरिहंत व सिद्ध परमात्म्याला भाव नमस्कार असो. परमात्मा बनण्याचा जो मार्ग आहे त्या मोक्षमार्गाला माझा भाव नमस्कार असो. नमस्कार स्वयमेव होतो, करण्याने होत नाही. स्वरूपाची महिमा जाणली, तिकडे आपली दृष्टी झाली, त्यामध्ये लीनता झाली, त्याच्या अनुभवामध्ये आनन्द झाला. हे सर्व स्वयमेव होते. हाच वास्तविक भावनमस्कार आहे.

अमृतचन्द्र आचार्य तीन श्लोकांच्या माध्यमातून या अधिकाराची समाप्ती करतात. पहिल्या श्लोकामध्ये आचार्य आपली भावना व्यक्त करतात -

जैनं ज्ञानं ज्ञेयतत्त्वप्रणेतृ
स्फीतं शब्दब्रह्म सम्यग्विगाह्य।
संशुद्धात्मद्रव्यमात्रैकवृत्या
नित्यं युक्तैः स्थीयतेऽस्माभिरेवम्॥१०॥

अन्वयार्थ -

(एवं) अशा प्रकारे **(ज्ञेयतत्त्वप्रणेतृ)** ज्ञेयतत्त्वाला सांगणाऱ्या **(जैनं ज्ञानं)** जिनेन्द्रासंबंधी ज्ञानामध्ये व (स्फीतं) विशाल (शब्दब्रह्म) शब्दब्रह्मामध्ये **(सम्यक्)** सम्यक् रीतीने **(विगाह्य)** अवगाहन करून **(अस्माभिः)** आमच्याकडून **(संशुद्धात्मद्रव्यमात्रैकवृत्या)** मात्र शुद्ध आत्मद्रव्यामध्ये प्रवृत्तीच्याद्वारे **(नित्यं)** सदैव **(युक्तैः स्थीयते)** युक्त होऊन स्थिर राहिले जाते.

या श्लोकामध्ये करण्यायोग्य तीन गोष्टीची आचार्यांनी प्रतिज्ञा केली आहे. (१) द्रव्यश्रुतामध्ये अवगाहन करणे. (२) आगमानुसार सम्यग्ज्ञान प्राप्त करणे (३) शुद्धात्म स्वरूपामध्ये प्रवृत्ती करणे. जणू सुखाच्या तीन किल्ल्या आचार्यांनी आपल्याला प्रदान केल्या आहेत. या अनादिकाळापासून आपल्या हृदयाचे दरवाजे बंद आहेत ते एकेका किल्लींनी उघडायचे आहेत.

१) द्रव्यश्रुताचा अभ्यास -

द्रव्यश्रुतासाठी आचार्यांनी शब्द वापरला आहे 'शब्दब्रह्म'. त्या शब्दांना ब्रह्माची उपमा दिली आहे. ब्रह्म हणजे जगातील सर्वश्रेष्ठ पदार्थ. शब्दब्रह्म म्हणजेच आगम, शास्त्र. आपल्या घरामध्ये बँकेचे पासबुक असते ते आपण किती जपून ठेवतो. तिजोरीच्या आतल्या कप्यात त्याला सांभाळून ठेवतो. कारण माझ्या संपत्तीचा सर्व जमाखर्च त्यामध्ये लिहला आहे. माझ्या नावावर किती धन आहे व मी किती कर्ज काढले आहे. या दोन्हींचा उल्लेख त्यामध्ये आहे. आपल्या एफडी च्या पावत्या, पासबुक पाहिले की आपल्याला आनंद होतो. माझे सर्वस्व यामध्ये आहे असे वाटते. ठीक त्याचप्रमाणे हे शास्त्र म्हणजे आपल्या आत्म्याचे पासबुक आहे. यामध्ये आपल्या नावावर अनंतगुणरूपी धन जमा आहे त्याचा उल्लेख आहे व आपण किती कर्माचे कर्ज काढले आहे त्याचा पण उल्लेख आहे. आपल्या नावाने किती धन जमा आहे ते वाचून आपल्याला आनंद होतो व किती कर्ज आहे हे वाचल्यावर हे कर्ज मला चुकते करून कर्जमुक्त व्हायचे आहे याची जाणीव होते. म्हणून दररोज हे शास्त्ररूपी पासबुक उघडून वाचायचे आहे.

केवळ वाचायचेच नाही तर यामध्ये अवगाहन करायचे आहे. जसजसा आपण शास्त्राचा अभ्यास करीत जातो तसतसे आपण खोल उतरत जातो व जसजसे खोल उतरत जातो तसतसा आपला आनंद द्विगुणित होत जातो. जेव्हा आपण एखादा समुद्र पाहायला जातो तेव्हा त्या विशाल समुद्राला पाहून खूप आनंद होतो. पुन्हा समुद्रात पोहणारे लोक आपल्याला म्हणतात उडी मार. त्यांच्या आग्रहाने आपण उडी मारतो. तेव्हां आपल्याला शीतलतेचा अनुभव होऊन अधिक आनंद येतो. त्यानंतर दररोज पोहायला जायचे भाव होतात. पुन्हा त्यामध्ये जसजसा अधिक खोल उतरतो तसतसा अधिक आनंद येतो व ज्याला खोल बुडल्यावर त्या समुद्राच्या तळाशी असणारी रत्ने दृष्टीस पडतात. त्याला अपूर्व आनंद येतो. त्याचप्रमाणे या शास्त्र समुद्राला ज्यावेळी आम्ही वरवर पाहतो अर्थात ऐकतो तेव्हा यामध्ये काहीतरी नवीन सांगितले आहे असे वाटून आनंद येतो. जेव्हा त्याचा पुन्हा पुन्हा अभ्यास करतो त्यावेळी अधिक आनंद यायला लागतो. पुन्हा या श्रुतरत्नाकरामध्ये खोल खोल अवगाहन करतो तसतसा अधिक अधिक आनंद येतो आणि जेव्हा या शास्त्र समुद्रामध्ये दाखविलेले अनमोल आपल्या गुणरूपी रत्नावर दृष्टी पडते तेव्हा तर अपूर्व आनंद येतो. म्हणून एकदा या श्रुतसिंधुमध्ये अवगाहन करून पहा. किती अवर्णनीय व शांती आनंद प्राप्त होतो. सुखाचा मार्ग सापडतो. म्हणून ग्रंथ हेच आपले मार्गदर्शक गुरू आहेत. आपल्या कपाटात श्रुतभंडार धूळ खात पडला आहे. जरा धूळ बाजूला सारून याला वाचण्याचे कष्ट करा व आपली निधी प्राप्त करा.

२) ज्ञानामध्ये अवगाहन

आगमामध्ये जसे वस्तूचे स्वरूप सांगितले आहे तसेच वस्तूचे स्वरूप जाणले तर सम्यग्ज्ञान रूपी फळ प्राप्त होते. द्रव्यश्रुताचा खूप अभ्यास केला. त्यामध्ये पारंगत झाला. परंतु त्या शब्दानुसार जर अंतरंगामध्ये वस्तूंच्या अस्तित्वाचे भावभासन झाले नाही तर ते सर्व तोतारटंत ज्ञान होईल. म्हणून द्रव्यश्रुतामध्ये सांगितलेल्या जीवादि पदार्थांचे जसे स्वरूप आहे तसे जाणणे म्हणजेच भावश्रुतज्ञान आहे. केवळ शब्द शिकण्यामध्ये तेवढा आनंद नाही जेवढा वस्तूस्वरूपाचे भावभासन झाल्यावर होतो. गुलाबजामुन हा शब्द ऐकल्यावर जो आनंद होतो त्यापेक्षा त्याचा स्वाद घेतल्यानंतर अधिक आनंद होतो. ज्ञानामध्ये

आनंद आहे. वस्तूंचे असे यथार्थ ज्ञान प्राप्त करावे की प्रत्येक अणू-अणू आपापल्या अस्तित्वाने प्रतिभासित व्हावा. पुस्तक आहे, टेबल आहे, यामध्ये अनन्त परमाणू आहेत. परंतु त्यातील प्रत्येकाची सत्ता भिन्न-भिन्न आहे. शरीरपण अनन्त परमाणूंचा पिंड आहे. त्यामध्ये एक चेतन राजा निवास करीत आहे. त्या शरीरातील प्रत्येक परमाणूची सत्ता भिन्न आहे. ते सर्व परमाणू या देहाला जाळल्यावर राखरूप होऊन विखरून जातात, यामध्ये निवास करणाऱ्या चेतन राजाची सत्ता भिन्न आहे. अशाप्रकारे वस्तूस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानामध्ये अवगाहन केल्यामुळे हा जीव विशुद्ध होतो व निर्मल होऊन शांतीचा अनुभव करतो. अंतरंग व बहिरंग पदार्थाचे यथार्थ ज्ञान ही सुखाची गुरुकिल्ली आहे.

३) शुद्धात्मतत्त्वाचा अनुभव : अमृतपान -

'सबसे न्यारा, सब से प्यारा, यह शुद्धात्म हमारा' शुद्धात्मतत्त्व सर्व पदार्थापासून भिन्न एक अलौकिक सर्वोत्कृष्ट तत्त्व आहे. संपूर्ण जिनवाणीचे आलोकन केले व इतर सर्व पदार्थांना जाणले पण शुद्धात्मतत्त्वाचा अंतरंगामध्ये अनुभव झाला नाही तर आमचा सर्व पुरुषार्थ व्यर्थ आहे. शुद्धात्मतत्त्व म्हणजे सुखाची पाणपोई आहे. जसजसे त्याचे प्राशन करतो तसतसा अपूर्व आनंद प्राप्त होतो.

संक्लेश केल्याने कर्म कटत नाहीत. कर्म कटतात शुद्ध आनन्दाच्या अनुभवाने. कष्टांनी कर्म कटत नाहीत, विषयांच्या द्वारे मौज मानल्याने कर्म कटत नाहीत, परिग्रहाचा संचय केल्याने कर्म कटत नाहीत, बाह्य क्रियामात्राने कर्म कटत नाहीत, कर्म कटतात केवळ शुद्ध आत्मतत्त्वाच्या अनुभवाने. जर आपल्या उपयोगामध्ये बाह्य पदार्थ विराजमान आहेत तर नियमाने अशान्ती आहे व जर आपला शुद्धात्मा आपल्या उपयोगामध्ये विराजमान आहे तर शांती आहे. म्हणून एक शुद्ध आत्मतत्त्वामध्ये प्रवृत्ती करून सदैव स्थिर रहावे.

आता पुढील श्लोकात तीन मार्मिक गोष्टी सांगतात-

ज्ञेयीकुर्वन्नज्जसासीमविश्वं
ज्ञानीकुर्वन् ज्ञेयमाक्रान्तभेदम्।
आत्मीकुर्वन् ज्ञानमात्मान्यभासि
स्फूर्जत्यात्मा ब्रह्म संपद्य सद्यः ।।

अन्वयार्थ -

(आत्मा) आत्मा **(असीमविश्वं)** अनन्त विश्वाला **(अज्जसा)** स्पष्टपणे **(ज्ञेयीकुर्वन्)** ज्ञेयरूप करीत **(आक्रान्तभेदम्)** अनेक भेदस्वरूप **(ज्ञेयम्)** ज्ञेयाला **(ज्ञानीकुर्वन्)** ज्ञानरूप करीत अर्थात् ज्ञानामध्ये जाणीत **(आत्मान्यभासि)** स्वपर प्रकाशक **(ज्ञानं)** ज्ञानाला **(आत्मीकुर्वन्)** आत्मरूप करीत **(ब्रह्म)** परमात्मतत्त्वाला **(सद्यः)** तत्काल **(संपद्य)** प्राप्त करून **(स्फूर्जति)** स्फुरायमान होतो.

या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. १) विश्वाला ज्ञेयरूप करणे, २) ज्ञेयाला ज्ञानरूप करणे ३) ज्ञानाला आत्मरूप करणे. या तीन गोष्टी जाणण्यासाठी तीन वस्तू जाणणे आवश्यक आहे. १) संपूर्ण विश्व, २) ज्ञानामध्ये झळकलेले विश्वाचे ज्ञेयाकार परिणमन ३) ज्ञानाचे ज्ञानाकार रूप परिणमन. ज्याप्रमाणे आरशाच्या समोर पिंछी ठेवली तर तेथे तीन गोष्टी आहेत. १) बाहेरची मयूरपिंछी, २) पिंछीच्या निमित्ताने उमटलेली प्रतिबिंब स्वरूप आरशातील मयूर पिंछी, ३) आरशाची स्वच्छता. मोराच्या पंखांना एकत्र करून बनवलेली मयूरपिंछी एक पुद्गलाचा स्कन्ध आहे. आरशामध्ये अशी योग्यता आहे जो पदार्थ त्याच्यासमोर येईल त्याची छाया आरशामध्ये पडते. अर्थात आरशामध्ये वस्तूचे प्रतिबिंब प्रकट होते. कितीही वस्तूंचे प्रतिबिंब आरशात पडले तरी आरशाची स्वच्छता नष्ट होत नाही. किंबहुना आरसा स्वच्छत्वरूपाने परिणमन करतो म्हणून त्यामध्ये वस्तूचे प्रतिबिंब उमटतात. त्याचप्रमाणे येथे तीन वस्तू आहेत. १) बाहेरील विश्व, २) विश्वातील वस्तूंच्या निमित्ताने उठलेले ज्ञानामधील ज्ञेयाकार, ३) ज्ञानाची स्वच्छता. सहा द्रव्यांचा समूहात्मक बाहेरचे विश्व प्रसिद्ध आहे. विश्वातील पदार्थांच्या निमित्ताने ज्ञानामध्ये त्याचे ज्ञेयाकार प्रगट होतात. ज्ञेयाकार प्रकट झाले तरी ज्ञानाची स्वच्छता नष्ट होत नाही. उलट ज्ञानाच्या स्वच्छतेमुळेच संपूर्ण पदार्थांचे आकार त्यामध्ये प्रगट होतात. जर ज्ञान आपली स्वच्छता सोडेल तर त्यामध्ये वस्तूंचे ज्ञेयाकार प्रगट होणारच नाहीत.

या तीन गोष्टी समजून आता जीवनामध्ये त्याचा प्रयोग कसा करायचा की जेणे करून हा आत्मा शांतीचा अनुभव करेल. समाधीचे हे तीन चरण आहेत. त्यातील पहिले चरण –

१) असीम विश्वाला ज्ञेयरूप बनविणे -

जेव्हा हा जीव बाह्य पदार्थांना ज्ञानाच्या द्वारे जाणतो तेव्हा असा विकल्प करतो की मी पुस्तकाला जाणतो, मी स्त्री, पुत्र, मित्र इत्यादिकांना जाणतो इत्यादी. ज्ञानी जाणतो की वास्तविक मी कोणत्याही बाह्य पदार्थांना जाणत नाही. मी तर केवळ ज्ञानामध्ये आलेल्या स्वतःच्या ज्ञेयाकाराला जाणत आहे. कारण जोपर्यंत बाह्य वस्तू आपल्या ज्ञानामध्ये येत नाहीत तोपर्यंत आपण त्यांना जाणू शकत नाही म्हणून आम्ही बाह्य वस्तूला न जाणता स्वतःच्या ज्ञानपरिणामालाच जाणतो, ज्याप्रमाणे आपण आरशामध्ये पाहत आहोत. आपल्या पाठीमागे चार मुले उभे आहेत. ती मुले हात, पाय, नाक, जीभ हलवतात. त्यांच्याकडे आम्ही पाहत नाही. केवळ आरशातच पाहून आम्ही सांगतो की अमुक्या मुलांनी पाय हलवला, अमुक्यांनी हात हलवला, अमुक व्यक्ती जीभ हलवतो इत्यादी. त्याप्रमाणे आम्ही आपल्या ज्ञानामध्ये होणाऱ्या अमुक परिणमनाला जाणतो आणि ते परिणमन पाहून वर्णन करतो की हे घर आहे, हे शेत आहे, हे ज्वारीचे पीक आहे इत्यादी, आम्ही साक्षात् त्या वस्तूला जाणत नाही, परंतु ज्या वस्तूचे ज्ञेयाकार आमच्या ज्ञानात झळकले त्यालाच आम्ही जाणत असतो. त्या ज्ञेयाकारामध्ये ती वस्तू निमित्त आहे म्हणून उपचाराने त्या वस्तूला मी जाणले असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे एखादी वस्तू दूरवर्ती आहे ती आमच्या ज्ञानात येत नाही तर त्या वस्तूला आम्ही जाणू शकत नाही. शिक्षक एखादा विषय शिकवतात. सर्व विद्यार्थी शिकवलेला सर्व विषय एक समान जाणत नाहीत. ज्याच्या ज्ञानात जेवढा विषय आला तेवढाच ते ग्रहण करतात. यावरूनच लक्षात येते की आम्ही पदार्थाला साक्षात न जाणता त्या पदार्थाच्या ज्ञेयाकाराला जाणतो. म्हणून ज्ञानी समताभाव प्राप्त करण्यासाठी हा प्रयोग करतो की सर्व पदार्थांना ज्ञेयरूप बनवतो. ज्ञानउपयोग बाहेर भटकत होता आणि अहंकार करीत होता की मी याला जाणतो, त्याला जाणतो हा अहंकार समाप्त करून ज्ञानी जाणतो की मी कोणालाही जाणत नाही. परन्तु संपूर्ण विश्वाचे जे ज्ञेयरूपाने परिणमन होत आहे. मी केवळ त्यालाच जाणतो, याप्रमाणे विश्वाचा मोह हटवतो, राग हटवतो. घर, शेतीवाडी, स्त्री, पुत्र, मित्र इत्यादी ज्या वस्तू दिसत आहेत ते केवळ माझ्या ज्ञानाचे ज्ञेयाकार आहेत. या वस्तूंशी माझा कोणताही संबंध नाही. ते माझ्या ज्ञानाचे ज्ञेय आहेत. मी व्यर्थच पूर्वी

यांच्याशी मोह केला. हे तर फक्त जाणण्यायोग्य आहेत व मी जाणणारा आहे.

२) समाधीचे दूसरे चरण : ज्ञेयाला ज्ञानरूप करणे -

हे ज्ञेयाकार परिणमन अन्य काही नाही हे तर माझे ज्ञानच आहे ही ज्ञानाचीच स्वच्छता आहे की ज्यामुळे त्यामध्ये वस्तूंचे ज्ञेयाकार प्रकट होत आहेत. ज्याप्रमाणे आरशामध्ये जे प्रतिबिंब उमटते ती आरशाची स्वच्छताच आहे. आरशामध्ये स्वच्छता नसती तर त्यामध्ये वस्तूंचे प्रतिबिंब पडलेच नसते. समोर दगडी भिंत आहे त्यामध्ये पाहिले तर आमचे मुख दिसत नाही. त्यामध्ये आमच्या मुखाची छाया का प्रकट झाली नाही ? तर त्यामध्ये स्वच्छता नाही. आरशामध्ये कितीही पदार्थ येऊ देत त्या सर्वांचे प्रतिबिंब तेथे प्रकट होतात. त्या पदार्थांना प्रतिबिंबित करीत असताना सुद्धा आरशाचे अंतरंगामध्ये स्वच्छत्वरूप परिणमन चालू आहे. तो जर स्वच्छरूपाने नाही परिणमला तर त्यामध्ये वस्तूंचे प्रतिबिंब प्रकट होणारच नाहीत. म्हणून जे वस्तूंच्या प्रतिबिंबाचे आकार आहेत ती आरशाची स्वच्छताच आहे. त्याचप्रमाणे ज्ञानामध्ये जे पदार्थांचे ज्ञेयाकार प्रकट होतात ते ज्ञानाचेच परिणमन आहे. ज्ञेयपदार्थांना जाणत असताना ही ज्ञान ज्ञानरूपाने परिणमत आहे, ज्ञेयरूपाने नाही. ज्ञानाने जर आपले ज्ञानरूप सोडले तर त्यामध्ये ज्ञेयपदार्थ जाणलेच जाणार नाहीत. म्हणून ज्ञानी जाणतो की मी ज्ञानरूपच आहे. माझ्या ज्ञानामध्ये झळकलेले वस्तूंचे ज्ञेयाकार वस्तूंचे नसून ते माझ्या ज्ञानाचेच परिणमन आहे. प्रथम विश्वाला ज्ञेयरूप जाणले होते. आता त्या ज्ञेयाकारांना ज्ञानरूप जाणतो. वस्तू जाणल्या जात आहेत याचा अर्थ मी ज्ञानरूप आहे. मी ज्ञानरूप नसतो तर हे पदार्थ जाणले गेले नसते: ध्यान करताना आवाज आला की आम्ही म्हणतो , 'मला खूप बाधा येत आहे, त्यावेळी विचार करायचा की हा आवाज मला ऐकू येतो म्हणजे मी ज्ञानरूप आहे. हा आवाज नाही, हे माझ्या ज्ञानात झळकलेले ज्ञेय आहे. हे केवळ ज्ञेयच नाही तर हे माझे ज्ञानच आहे.

३) समाधीचे तिसरे चरण : ज्ञानाला आत्मरूप करणे -

हे ज्ञान आत्म्याहून वेगळे नाही. हा तर आत्माच आहे. ज्याप्रमाणे स्वच्छता हा आरसाच आहे कारण स्वच्छता हा आरशाचाच गुण आहे. जो गुण आहे तो गुणीपासून वेगळा नाही. त्याप्रमाणे ज्ञान हा आत्म्याचा गुण आहे म्हणजे आत्माच आहे. आत्म्यापासून ज्ञान वेगळे नाही. म्हणून आपल्या ज्ञानामध्ये ज्ञानस्वरूप

शुद्धात्मतत्त्वाचे निरन्तर अवलोकन करावे. शांतीसाठी काय करायचे आहे ? जेवढे आपण स्वतःपासून दूर गेलो तेवढेच आता बाहेरून निवृत्त होऊन स्वतःजवळ यायचे आहे. शांतीचा हाच उपाय आहे जी उपयोगाची (ज्ञानाची) किरणे बाहेर जाऊन सर्वत्र पसरली आहेत त्या सर्व ज्ञानकिरणांना संकुचित करून एक आपल्यामध्ये एकत्रित करायचे आहे. ज्याप्रमाणे सूर्याच्या किरणापुढे विशिष्ट काच धरली तर त्या काचेखाली धरलेल्या कागद इत्यादिकांना तो जाळून टाकतात. तेथे काय झाले ? फक्त विखुरलेली सूर्यकिरणे एकत्रित आली तर त्यामध्ये जाळण्याची शक्ती उत्पन्न होते. त्याचप्रमाणे या ज्ञानाची किरणे चोहीकडे पसरली आहेत ज्ञानबलाने त्या किरणांना एकत्रित करून एक आत्म्यामध्ये केन्द्रित केली तर केवळ शुद्ध आत्मज्ञानाच्या प्रकाशात एवढी शक्ती उत्पन्न होते की भवाभवामध्ये संचित झालेला कर्माचा पुंज भस्मसात होतो. ज्ञानकिरणे एकत्रित करून आत्मस्वरूपामध्ये लावणे हीच समाधी आहे.

ज्ञानाला स्वस्वरूपामध्ये लीन करण्याच्या या तीन पायऱ्या आहेत. विश्वाला पाहून जाणावे की हे विश्व म्हणजे माझ्या ज्ञानाचे ज्ञेयच आहे. ज्ञेय दूसरे काही नसून हे माझे ज्ञानच आहे व ज्ञान अन्य काही नसून माझा आत्माच आहे. पदार्थाकडून स्वस्वरूपामध्ये जाण्याचा हा मार्ग आहे. असा प्रयोग केल्यानंतर हा आपला परमात्मा अंतरंगामध्ये तत्काल स्फुरायमान होतो.

निर्विकल्प अखण्ड ज्ञान आत्म्याचा स्वभाव आहे. ज्याप्रमाणे सूर्य प्रकाशाचा पिण्ड आहे त्याप्रमाणे आत्मा ज्ञानाचा पिण्ड आहे. क्षायोपशमिक ज्ञान त्या ज्ञानसूर्याचा अंश एक किरण मात्र आहे. त्या ज्ञान किरणाला जर ज्ञानपिण्डस्वरूप निजज्ञायक स्वभावाच्या सम्मुख करून स्वतःचा अनुभव केला तर कर्माचा ऱ्हास होईल व सम्यक्ज्ञानाची वृद्धी होते व ज्ञानाची पूर्णतः होऊन केवलज्ञानरूप परिणमित होतो.

वस्तुस्वरूपाच्या सम्यग्ज्ञानाचे फळ चारित्र आहे. ज्याला वस्तुस्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले आहे त्याच्या जीवनात चारित्र कदाचित् आल्याशिवाय राहत नाही. कदाचित तो चारित्र धारण करू शकला नाही तरी त्याला अंतरंगामध्ये चारित्र धारण करण्याची ओढ लागलेली असते व चारित्राबद्दल अंतरंगात बहुमान असतो. ज्ञान व चारित्रामध्ये विरोध नाही. उलट ते दोन्ही सापेक्ष आहेत हीच गोष्ट

अमृतचन्द्र आचार्य दुसऱ्या अधिकाराच्या शेवटी एका श्लोकाच्या माध्यमातून सांगत आहेत.

द्रव्यानुसारि चरणं चरणानुसारि द्रव्यं
मिथो द्वयमिदं ननु सव्यपेक्षम्।
तस्मान्मुमुक्षुरधिरोहतु मोक्षमार्गं
द्रव्यं प्रतीत्य यदि का चरणं प्रतीत्य ।।१०।।

अन्वयार्थ –

(चरणं) चारित्र **(द्रव्यानुसारि)** द्रव्यानुसार (यथार्थ ज्ञानानुसार) असते व **(द्रव्यं)** द्रव्य (ज्ञान) **(चरणानुसारि)** चारित्रानुसार असते. **(ननु)** वास्तविक **(इदं द्वयं)** हे दोन्ही **(मिथो)** परस्पर **(सव्यपेक्षम्)** सापेक्ष असतात. **(तस्मात्)** म्हणून **(द्रव्यं प्रतीत्य)** द्रव्याचा आश्रय घेऊन **(यदि वा)** अथवा **(चरणं)** चारित्राचा **(प्रतीत्य)** आश्रय घेऊन **(मुमुक्षुः)** मोक्षाचा इच्छुक पुरूष **(मोक्षमार्गं)** मोक्षमार्गावर **(अधिरोहतु)** आरूढ होवो.

यथार्थ ज्ञानाची स्थिरताच चारित्र –

जसे पदार्थाचे स्वरूप आहे तसे ज्ञान करणे हेच यथार्थ ज्ञान आहे व तसेच ज्ञानामध्ये स्थिर राहणे हेच चारित्र आहे. ज्ञानानुसार आचरण करणे हेच चारित्र आहे. ज्ञानानुसार चारित्र असते व चारित्राच्या अनुसार ज्ञान असते. ह्या दोन्ही आपेक्षिक गोष्टी आहेत.

येथे आचार्यांना द्रव्य शब्दाचा अर्थ 'वस्तुस्वरूपाचे यथार्थ ज्ञान' असा गृहीत असावा. अथवा द्रव्य शब्दाचा अर्थ द्रव्यानुयोग असा सुद्धा घेऊ शकतो. द्रव्यानुयोग व चरणानुयोगामध्ये विरोध नाही. द्रव्यानुयोगामध्ये वस्तूच्या यथार्थ स्वरूपाचे वर्णन केले आहे व चरणानुयोगामध्ये आचरणाचे वर्णन आहे.

काही लोकांना वाटते ज्ञानाच्या द्वारे सिद्धी होते, चारित्राचा काय उपयोग ? काही लोकांचे मत असते की चारित्रानेच मोक्ष होतो म्हणून चारित्र धारण करावे. नुसते ज्ञान करून काय उपयोग ? या दोन्ही एकान्ताचे खंडन करून आचार्य येथे सांगतात की जेथे एक यथार्थ आहे तेथे दुसरे येतेच, यथार्थ ज्ञान झाले की त्याच्या जीवनात चारित्र येतेच व ज्याला यथार्थ चारित्र प्राप्त झाले त्याच्याजवळ यथार्थ ज्ञान आहेच. ज्ञानाशिवाय चारित्र नाही व चारित्राशिवाय यथार्थ ज्ञान नाही.

समयसार ग्रंथाच्या कर्तृकर्म अधिकारातील गाथा नं. ७२ मध्ये आचार्यांनी ज्ञान व आस्रवनिवृत्ती यामध्ये अविनाभाव आहे हे सिद्ध केले आहे. आस्रवनिवृत्ती म्हणजेच चारित्र आहे. ते म्हणतात "जेव्हा हा जीव आत्मा व आस्रव यामध्ये भेद जाणतो त्याच समयात क्रोधादी आस्रवापासून निवृत्त होतो. कारण त्याच्यापासून जो निवृत्त नाही त्याला आत्मा व आस्रवातील पारमार्थिक भेदविज्ञानाची सिद्धीच नाही."

ज्याप्रमाणे ज्याला ज्ञान झाले की हा साप आहे, तो चावतो व चावला की विष चढून मृत्यु होतो. तो त्या सापापासून दूर राहतो त्याच्याजवळ जात नाही. अग्नी जाळते याचे ज्याला ज्ञान झाले तो अग्नीला आपल्या हातात घेत नाही, जसे ज्ञान तसे चारित्र, ज्याला क्रोधादी आस्रव भाव माझे नाहीत. विरोधी भाव आहेत. बंधाला कारण आहेत, दुःखरूप आहेत हे ज्ञान झाले तो त्याच क्षणी आस्रव भावापासून निवृत्त होतो.

पुढे गाथा ७४ च्या टीकेत आचार्य म्हणतात-

" सहजरूपाने विकसित चित्शक्तीने आत्मा जसजसा विज्ञानघनस्वभावी होतो तसतसा आस्रवापासून निवृत्त होत जातो. जसजसा आस्रवापासून निवृत्त होतो तसतसा विज्ञानघन स्वभाव होत जातो. तेवढा विज्ञानघन स्वभाव होतो जेवढा सम्यक्प्रकाराने आस्रवापासून निवृत्त होतो आणि तेवढा आस्रवापासून निवृत्त होतो जेवढा सम्यक्प्रकाराने विज्ञानघन स्वभाव होतो. अशाप्रकारे ज्ञान आणि आस्रवनिवृत्ती यांचा समकालपणा आहे. "

आस्रवनिवृत्ती म्हणजेच चारित्र आहे. ज्यावेळी हा जीव जाणतो की मी एक शुद्ध ज्ञानदर्शनस्वभावी आहे. परद्रव्याचा माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. प्रत्येक द्रव्य स्वतंत्र आहे. अशा शाब्दिक ज्ञानाशी चारित्राचा अविनाभाव नाही. जर तो स्वसंवेदन प्रत्यक्षाने निज स्वरूपाला अनुभवत असेल तर त्याचा त्याच समयात मोह गळून जातो. त्याचा परद्रव्यासंबंधी मोह नाहीच. मोह न करणे म्हणजेच चारित्र आहे. कोणी ज्ञानाने परद्रव्याला भिन्न जाणत आहे, पण अंतरंगामध्ये राग व मोहाची श्रद्धा अजून गेली नाही तर त्याचे ज्ञान वास्तविक नाही. आचरण आणि ज्ञान या दोन्हीमध्ये एकरूपता आहे.

मोक्षमार्गावर आरूढ होणे आवश्यक –

आचार्य येथे प्रेरणा देतात की तुम्ही ज्ञानाचा आश्रय घेऊन अथवा

चारित्राचा आश्रय घेऊन मोक्षमार्गावर आरूढ व्हा. सगळ्यात महत्वाची गोष्ट आहे मोक्षमार्गावर आरूढ होणे. जो मार्गावर आरूढ झाला तो एक दिवस इष्टस्थळी निश्चित पोहचणार. कधी कोणी जीव प्रथम ज्ञान प्राप्त करून घेतो नंतर चारित्र अंगीकार करतो. कोणी जीवाला प्रथम वैराग्य उत्पन्न होते, तो चारित्र धारण करतो. नंतर ज्ञानाची प्राप्ती करून घेतो. मूलभूत भेदविज्ञान तर त्याला वैराग्याबरोबर झालेले असते. परंतु विशेष ज्ञानाची सिद्धी तो नंतर करतो.

संसाराचा मार्ग सोडून मोक्षाच्या मार्गावर आपले प्रयाण होणे महत्वाचे आहे. आचार्यांची इतकी तळमळ आहे की कसे पण करून तुम्ही मोक्षमार्गावर आरूढ व्हा.

मार्गप्राप्तीचा अवर्णनीय आनंद -

जेव्हा आपण कोणत्यातरी इच्छित स्थानी जाण्याचा निर्णय करतो तेव्हा त्या स्थानाला प्राप्त करण्याचा मार्ग विचारतो, कोणत्या मार्गाने आम्ही तेथे पोहचू शकतो. मार्गाचे ज्ञान झाल्यानंतर तेथेच थांबत नाही. त्या मार्गाला प्राप्त करण्याच्या साधनांचा शोध घेतो. कोणती रेल्वे, किंवा बस किंवा विमान त्या मार्गावरून जाते त्याचे रीझर्वेशन करतो. रीझर्वेशन झाले की आता मी निश्चित त्या मार्गावर जाणार याचे श्रद्धान होऊन आनंद होतो. मार्गामध्ये लागणाऱ्या सामग्रीची जुळवाजुळव करतो. नंतर ज्यादिवशीचे रीझर्वेशन मिळाले त्यादिवशी ती गाडी पकडतो. गाडीत जाउन बसल्यावर अधिक आनंद येतो. गाडी चालू लागते. त्या मार्गावर असणाऱ्या मधल्या मधल्या स्टेशनाची प्रतीक्षा करीत जातो. पहिल्यांदा पहिल्या स्टेशनापर्यंत पोहचण्याची ओढ लागते. ते स्टेशन आले की पुन्हा पुढच्या स्टेशनची ओढ लागते. मध्यंतरी कोठेही थांबण्याचे भाव होत नाहीत. जोपर्यंत इच्छित स्थान येत नाही तोपर्यंत पुढे - पुढे जाण्याचीच अभिलाषा असते. जसजसे पुढचे पुढचे स्टेशन येत जाईल तसतसा आनंद वाढत जातो. शेवटच्या स्थानावर पोहचल्यानंतर कृतकृत्यतेचा अनुभव होऊन परम आनंद होतो.

हीच गोष्ट मोक्षयात्रेची आहे. जो जीव मोक्षाला जाण्याचा निर्णय करतो तो त्या मोक्षाच्या मार्गाचा शोध घेतो. मोक्षमार्ग कोणता आहे ? सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक् चारित्र मोक्षमार्ग आहे हे कळाले पण मोक्षमार्गाचे ज्ञान करून केवळ काम भागणार नाही. त्या मोक्षमार्गाला प्राप्त करण्यासाठीच्या साधनांचा

शोध घेणे आवश्यक आहे. सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र मला कसे प्राप्त होईल ? याचे रीझर्वेशन करणे आवश्यक आहे. ज्याने सात तत्त्वांचा निर्णय करून स्वपराचे भेदविज्ञान केले व शुद्धात्मानुभव केला त्याने मोक्षाचे रीझर्वेशन केले. सम्यग्ज्ञान व सम्यग्दर्शन झाले की मोक्षमार्गाचे श्रद्धान होऊन अपूर्व आनंद होतो. बारा भावना, आत्म भावना इत्यादी सामग्रीनिशी चारित्ररूपी गाडीमध्ये आरूढ होतो. तेव्हा आणखीन आनंद होतो. चारित्ररूपी गाडी ज्यावेळी मार्ग क्रमण करू लागते. पुढच्या पुढच्या पदाला प्राप्त होतो तेव्हा अधिक-अधिक आनंद येत जातो. जेव्हा चारित्ररूपी गाडी भावमोक्षरूपी इच्छित स्थानाजवळ पोहोचते. तेव्हा कृतकृत्यतेचा अनंत आनंद प्राप्त होतो. तो जेव्हा द्रव्यमोक्षरूपी अंतिम इष्ट स्थानाला प्राप्त होतो तेव्हा अव्याबाध अतीन्द्रिय शाश्वत आनंदाची प्राप्ती होते.

आचार्य म्हणतात, 'हे भव्य जीव, तुझ्या दृष्टीनेच संसार पण मिळतो व तुझ्या दृष्टीनेच मोक्षपण मिळतो. एकीकडे आहे संसाराचा यमघट, दुसरीकडे आहे शुद्धज्ञान व आनन्दाचा निधान परमात्मदेव. तुला पाहिजे ते तू माग. तुझा आत्मा चिन्तामणी रत्न आहे. तू जे चिंतन करशील तेच तुला प्राप्त होईल.'

अमृतचन्द्र आचार्यांच्या अपेक्षेने येथे दूसरा अधिकार समाप्त झाला. आता जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये एक गाथा अधिक आहे. ती गाथा अमृतचन्द्र आचार्यांच्या टीकेमध्ये नाही. ही गाथा म्हणजे दर्शन अधिकाराची समाप्तिस्वरूप मंगल गाथा आहे अथवा ग्रन्थाच्या अपेक्षेने मध्यमंगल आहे. या गाथेत निजशुद्धात्म्याची भावना रूप मोक्षमार्गाच्याद्वारे ज्यांनी सिद्धी प्राप्त केली आहे आणि त्या मोक्षमार्गाची जे आराधना करीत आहेत. त्यांना त्या पदाची इच्छा करीत आचार्य नमस्कार करतात –

दंसणसंसुद्धाणं सम्मणाणोवजोगजुत्ताणं।
अव्वाबाधरदाणं णमो णमो सिद्धसाहूणं।। ११३।।

अन्वयार्थ –

(दंसणसंसुद्धाणं) सम्यग्दर्शनाने शुद्ध **(सम्मणाणोवजोग-जुत्ताणं)** सम्यग्ज्ञानमय उपयोगाने युक्त **(अव्वाबाधरदाणं)** अव्याबाध सुखामध्ये लीन **(सिद्धसाहूणं)** सिद्धांना व साधूंना **(णमो णमो)** पुन्हा पुन्हा नमस्कार असो.

प्रत्येक ग्रंथरचना करण्याच्या सुरूवातीला मध्ये व शेवटी ग्रंथकार मंगलाचरण करतात. या ग्रंथाच्या प्रारंभी कुन्दकुन्द आचार्यांनी पाच गाथांच्याद्वारे

विस्तृत मंगलाचरण केले आहे. जयसेनाचार्यांच्या तात्पर्यवृत्तीमध्ये दुसऱ्या अध्यायाच्या सुरुवातीला ही एक मंगलाचरणरूप गाथा आहे व आता दुसऱ्या अधिकाराच्या शेवटीसुद्धा ही मंगलाचरणरूप गाथा आहे. याला मध्य मंगलाचरण म्हटले आहे व दुसऱ्या अधिकाराच्या अपेक्षेने हे अंतिम मंगलाचरण आहे.

या मंगलाचरणामध्ये आचार्यांनी सिद्ध व साधूंना नमस्कार केला आहे. सिद्ध व साधू हे पंचपरमेष्ठींचे वाचक आहेत. सिद्धांमध्ये अरिहंत गर्भित आहेत व साधू पदामध्ये आचार्य व उपाध्याय गर्भित आहेत. कारण अरिहंत व सिद्ध हे दोन्ही परमात्मा आहेत. आचार्य व उपाध्याय हे साधूच आहेत. त्यांना ते विशिष्ट पद प्राप्त झाल्यामुळे वेगळे पद सांगितले आहे. परंतु ते सुद्धा आत्मसाधनेमध्ये तत्पर असतात म्हणून ते साधू आहेत.

या गाथेमध्ये सिद्ध व साधूंची समान तीन विशेषणे दिली आहेत. १) सम्यग्दर्शनाने शुद्ध, २) सम्यग्ज्ञान उपयोगमय, ३) अव्याबाधसुखामध्ये रत

१) सम्यग्दर्शनाने शुद्ध –

तीन मूढता, सहा अनायतन, ८ मद व ८ शंकादी दोष हे पंचवीस सम्यग्दर्शनाचे दोष आहेत. या दोषांनी रहित सम्यगदर्शन असणे ही सम्यग्दर्शनाची शुद्धता आहे. अरिहंत व सिद्ध क्षायिक सम्यग्दृष्टी असून त्यांना परमावगाढ सम्यक्त्वाची प्राप्ती झाल्यामुळे ते सम्यग्दर्शनाने शुद्ध आहेत. मोक्षमार्गाचा प्रारंभ प्रथमोपशम सम्यक्त्वाने होतो व तो गुण विशुद्ध होत अरिहंत अवस्थेत परमावगाढरूपाने परिपूर्ण विशुद्ध होतो. कारण बाराव्या गुणस्थानापर्यंत ज्ञानावरण कर्माच्या उदयाच्या निमित्ताने अज्ञान भाव आहे. त्या निमित्ताने सम्यग्दर्शनामध्ये ही परिपूर्णता नाही. जेव्हा अज्ञानाचा अभाव होऊन परिपूर्ण सर्वज्ञता प्रगट होते तेव्हा श्रद्धानामध्ये परिपूर्णता येते. कारण ज्या वस्तूचे ज्ञान नाही त्या वस्तूचे श्रद्धान पण नाही. असा ज्ञान व श्रद्धानाचा अविनाभाव आहे. म्हणून अरिहंत अवस्थेत परमावगाढ श्रद्धान प्रगट होते. म्हणून अरिहंत व सिद्ध सम्यग्दर्शनाने शुद्ध आहेत. आचार्य, उपाध्याय व साधूसुद्धा यथायोग्य सम्यग्दर्शनाने शुद्ध असतात.

२) सम्यग्ज्ञान उपयोगाने संपन्न –

अरिहंत व सिद्ध केवलज्ञान उपयोगाने युक्त आहेत. त्यामुळे ते परिपूर्ण सम्यग्ज्ञानाने संपन्न आहेत. त्यांच्या ठिकाणी अज्ञानाचा पूर्ण अभाव झाला आहे.

आचार्य, उपाध्याय व साधूसुद्धा संशय विपर्यय अनध्यवसाय रहित मतिज्ञान, श्रुतज्ञान रूप सम्यग्ज्ञानाने संपन्न आहेत. कदाचित त्यांना अवधिज्ञान व मनःपर्ययज्ञानसुद्धा असू शकते. ज्ञान किती आहे हे महत्वाचे नाही ते अल्प का असेना ते सम्यग्ज्ञान असणे आवश्यक आहे. अल्प मतिश्रुतज्ञानाच्याद्वारे सुद्धा महान केवलज्ञानाची प्राप्ती होते. ते सम्यक् उपयुक्त असणे आवश्यक आहे. निर्विकल्प स्वसंवेदन प्रत्यक्षज्ञानाने निजध्रुवशुद्ध ज्ञानानंद स्वभावी आत्म्यामध्ये उपयोग जोडणे हाच सम्यग्ज्ञान उपयोग मयपणा आहे. आचार्यादी साधू सदैव शुद्धात्म्याच्या साधनेमध्ये तत्पर असतात. म्हणून ते सम्यक् ज्ञान उपयोगाने संपन्न असतात.

३) अव्याबाध सुखामध्ये रत –

अरिहंतांना चार घाती कर्मांचा अभाव झाला आहे. म्हणून त्यांना अनंतसुख उत्पन्न झाले आहे. ते निरंतर अतीन्द्रिय आत्मिक सुखामध्ये लीन असतात. त्यांना असाता वेदनीयाचा उदय असल्यामुळे अव्याबाध सुख सांगितले नाही. पण थोड्या कालावधीमध्ये त्यांना अघाती कर्मांचा नाश होऊन अव्याबाध सुखाची उत्पत्ती होणार आहे. म्हणून भावी नैगमनयाने त्यांना अव्याबाधसुख म्हटले तरी दोष येत नाही. असाताचा उदय असला तरी त्यांना तो अंतरंग आनंदामध्ये बाधक होत नाही म्हणून असून नसल्यासारखाच आहे. सिद्ध तर प्रत्यक्ष अव्याबाध अनंत सुखामध्ये रतच आहेत. आचार्य, उपाध्याय व साधू निर्विकल्प समाधीने उत्पन्न अतीन्द्रिय सुखामध्ये लीन असतात. त्यांना पण भावी नैगमनयाच्या अपेक्षेने अव्याबाधसुखामध्ये रत म्हटले आहे.

हे पंच परमेष्ठी आपले आदर्शस्वरूप आहेत. ते सुद्धा पूर्वी आपल्यासारखेच होते. आत्मस्वरूपाची साधना करून निर्विकल्प समाधीच्याद्वारे त्यांनी ही परमपदे प्राप्त केली व अनंतसुखाला प्राप्त झाले. आपणसुद्धा त्यांचे अनुकरण करून परमेष्ठी पदाला प्राप्त करू शकतो. त्यासाठीच त्यांची उपासना पूर्वभूमिकेमध्ये करण्यायोग्य आहे.

दूसरा ज्ञेयाधिकार लिहिण्याचा आचार्यांचा उद्देश्य निज आत्मतत्त्वाची प्राप्ती करून देणे हाच आहे. विश्वातील सर्व वस्तूंचा निर्णय करून त्यामध्ये परापासून पृथक आपली वस्तू कोणती आहे हे समजले तर ज्ञानाचे खरे फळ

आपल्याला मिळाले असे समजावे. आत्मवस्तू केवळ चर्चेचा विषय नाही तर अनुभवाचा विषय आहे.

एका समुद्राच्या किनाऱ्यावर काही पंडित लोक बसले होते आणि त्या समुद्राच्या खोलीची चर्चा करीत होते. कोणी किती सांगत होता, दूसरा त्याचा विरोध करून तर्क व हेतूच्याद्वारे आपले मत मांडत होता. नुसता वादविवाद चालू होता. समाधान होत नव्हते. एवढ्यात दोन मीठाचे पुतळे वर आले आणि ते म्हणाले, 'काठावर बसून चर्चा करण्यामध्ये समुद्राची खोली जाणू शकत नाही. जर समुद्राची खोली जाणून घ्यायची असेल तर आमच्याबरोबर चला असे म्हणून ते पाण्यात खोल बुडाले, कारण मीठाचे होते त्यामुळे पाण्यामध्ये मिसळून एकरूप झाले.'

आता आपली गोष्ट आहे. आम्ही शास्त्र वाचतो आणि चर्चा करीत राहतो. चर्चा करण्यामध्येच आम्ही आपली विद्वत्ता समजतो. एखादाच विरळा व्यक्ती आहे की जो वस्तु तत्त्वाचा स्वाद घेतो. चर्चा करण्याने स्वाद येत नाही. जो स्व वस्तूशी एकरूप होतो त्यालाच स्वाद येतो. वस्तूस्वरूपाचा अनुभव करतो.

चर्चा करणारे लाखो लोक आहेत, पण स्वरूपाचा अनुभव करणारा कोणी एखादाच असतो. आंब्याचे गुणगान करणाऱ्याला आंब्याचा स्वाद येत नाही. परंतु आंब्याचे सेवन करणाऱ्याला आंब्याचा स्वाद येतो. चर्चेमुळे व्यक्ती जाणकार होऊ शकतो. परन्तु अनुभवाने त्याचे जीवन परिवर्तन होते. म्हणून बनारसीदासजी नाटक समयसारमध्ये म्हणतात –

अनुभव चिंतामणि रतन, अनुभव है रसकूप।
अनुभव मारग मोख को, अनुभव मोख स्वरूप।।

द्वितीय अधिकाराच्या अध्ययनाने सर्व भव्यजीवांना आत्मानुभवरूपी अमृतरसाचा आस्वाद प्राप्त होऊन मोक्षमार्ग सुलभ होवो. हीच शुभभावना आहे.

अमृतचन्द्र आचार्यांच्या अपेक्षेने १०८ गाथांद्वारे दूसरा ज्ञेयाधिकार समाप्त झाला व जयसेन आचार्यांच्या अपेक्षेने ११३ गाथांद्वारे दूसरा सम्यग्दर्शन अधिकार पूर्ण झाला.

'शुभं भूयात्, भद्रं भूयात् ! '